# गौरव गाभारा

अनिल सहस्त्रबुद्धे

**गौरव गाभारा Gaurav Gabhara**
**(स्फूट लेखन – ललित गद्य)**
**लेखक : अनिल सहस्त्रबुद्धे**
‘आई’, समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७
भ्रमण भाष– ९८८१५००९४२
usahasrabuddhe@gmail.com
Website - www.anilsahasrabuddhe.com

© सौ. उषा अनिल सहस्त्रबुद्धे

प्रकाशक

**प्रथम आवृत्ती :** २

**टाईपसेटिंग–लेआऊट :**
कुलकर्णी टाईपसेटर्स, श्रीपाद कुलकर्णी,
अहमदनगर ९८५०२३२८९०

**ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।**
**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते**
**ॐ शांतिः शांतिः शांतिः ।**

**गौरव गाभाऱ्यातील**
**गौरवित**
**तपस्विंना**

# गौरव गाभारा

## अनुक्रमणिका


गौरव गाभाऱ्यात डोकावतांना - अनिल सहस्रबुद्धे ०१

१) मज सद्‌गुरू भेटला (पू. ह. वि. फडके सर)

२) माझे मामा (पी. बी. तथा मामा/बाबा टाकळकर)

३) मामींची माऊली (प्रमिला पुरुषोत्तम टाकळकर)

४) बहरला चंदनाचा वृक्ष (दामोदर माधव दाते तथा दामुअण्णा)

५) आधारवडातली मूळमाया (अयोध्या तथा बाई बन्सीशेठ मुंदडा)

६) सन्‌मित्र पाठीराखा (डॉ. चं. प्र. देशपांडे)

७) वात्सल्यरूप संस्थाचालक (त्र्यं. वि. तथा नानासाहेब निसळ)

८) मराठी सारस्वताच्या पालखीचा पायिक (प्रा. डॉ. भीमराव कुलकर्णी)

९) मोरजाई मठीचा दुर्वासा (प्रा.डॉ. गंगाधर मोरजे)

१०) दिव्यत्वाची येथ प्रतीती (पू. स्वामी गोविंददेवगिरी महाराज तथा पू.श्री. किशोरजी व्यास)

११) मातृस्वरूपा (सोमणी वहिनी तथा सरस्वती गणपत सोमणी)

१२) माईची माया (शशीकला नागेश सहस्रबुद्धे तथा मधुकांता मधुकर गाडगीळ)

१३) वात्सल्य शारद (सौ. शारदा विनायक नातू)

१४) राष्ट्राय स्वः! (भार्गवराम तथा तात्या बापट)

१५) प्रकांड पुरोहित (पू.वे.शा.सं. वासुदेव रामचंद्र धर्माधिकारी)

१६) नाना भिंती एकच माती (निकाळजे बाबा)

१७) कीर्तनरंगी रंगात देह जावो! (सिन्नरकर बुवा)

१८) आनंदयात्री (शामसुंदर विष्णुपंत शाळिग्राम तथा बाळासाहेब)

१९) तेजाच्या लेण्याला सलाम (शाहीर अमरशेख)

२०) महाराष्ट्राचे आचार्य (प्रल्हाद केशव तथा आचार्य अत्रे)

२१) सन्मानपूर्वक, आत्मियतेने जपणारा मित्र (प्रा.डॉ. सु. प्र. कुलकर्णी)

२२) संस्कृतिगौरव (प्राचार्य डॉ. मधुसूदन नागेश बोपर्डीकर)

२३) प्रकाशपुष्पे उधळणारी आनंदयात्री (प्रा.डॉ. लीला गोविलकर)

२४) फर्डा वक्ता, कलावंत, शिक्षक (प्राचार्य अनंत दत्तात्रय देशपांडे)
२५) महाराष्ट्राच्या अक्का (डॉ. सरोजिनी बाबर)
२६) लोकसाहित्याची रुपरेखा (डॉ. दुर्गा भागवत)
२७) नगरचे नेहरू (डॉ. श्रीराम रानडे)
२८) ज्ञानपिपासू शिक्षण महर्षी (झुंबरलालशेठजी सारडा)
२९) वर्षे अमृताचा घनू (प्रा. मधुसूदनजी मुळे)
३०) मार्गात भेटले सहज मित्र (प्रा.डॉ. यु. म. पठाण सर)
३१) संयतशील, समावेशक, स्वागतशील पुरोगामी प्राध्यापक (डॉ. नागनाथ कोत्तापल्ले)
३२) स्वागतशील साक्षेपी भाष्यकार (प्रा.डॉ. सदानंद मोरे)
३३) लोकसाहित्य अभ्यास क्षेत्रातील कल्पवृक्ष (प्रा.डॉ. प्रभाकर मांडे)
३४) सनातन दैवतकथांचा, सांस्कृतिक अन्वयार्थ उद्घाटक लोकवैज्ञानिक (डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे सर)
३५) शिक्षण, साहित्य, संस्कृती क्षेत्रातील लोकसंग्राहक चिरतरुण कार्यकर्ता (प्रभाकर अनंत संत सर)
३६) मिरासदारी (द. मा. मिरासदार)
३७) मनोमनीचा संमेलनाध्यक्ष (प्रा.डॉ. आनंद यादव)
३८) महाराष्ट्र कविकुलगुरु (कुसुमाग्रज तथा तात्यासाहेब शिरवाडकर)
३९) मनातलं पु. ल. साठवण (पु. ल. देशपांडे)
४०) सारस्वतांचा भुकेला (प्राचार्य डॉ. ह. कि. तोडमल सर)
४१) सिद्ध सद्‌गुरू प्रेमस्वरूपा (डॉ.ॲड. विष्णु रामचंद्र पारनेरकर)
४२) विज्ञान ज्ञानयोगी (स्वामी विज्ञानानंद)
४३) स्वातंत्र्यवीर कोहिनूर (स्वा.वीर.विनायक दामोदर सावरकर)



# गौरव गाभाऱ्यात डोकावतांना...

जीवनभराच्या आपल्या प्रवासात खरेच आपण प्रवासत असतो? आपल्या गुणगौरवाचे धनी खरंच आपण असतो? आपला स्वभाव, आपला छंद, आपली साधना, आपले यश, आपला विजय, आपला प्रभाव, आपला ज्ञानसंचय, आपला लोकसंग्रह, यातील आपले नेमके असते तरी काय? आपल्यातील जिवंतपणावर, आपल्या शरीरावर, आपल्या मनावर, आपल्या प्रतिभेवर, आपल्या आत्मसंवेदनेवर, आपल्या प्रकट होण्यावर तरी आपला अधिकार असतो का? जन्म, जीवन आणि मृत्यूही, असल्यास पुनर्जन्मही आणि अनंतातून प्रवासत आलेले अनेकानेक जन्म तरी आपल्या स्वाधीन असतात का? या सर्व प्रश्नांची उत्तरे नकारात्मक असतांनाही; आपण, 'मी'काराने प्रकटत असतो. मीच्या धुंदीने सारे प्रश्न परागंदा झालेले असतात. जगताच्या, आकाशाच्या आणि अवकाशाच्याही कदाचित, असणाऱ्या स्वामीवर, स्वामित्व गाजविण्यातच आपण दंग होतो. आपल्यालाच आपण गौरवित करीत, गर्वाचे गीत गात, वावरत असतो. असणे, मिळणे, देणेघेणे, रमणे, भोगणे, सारे सारे स्वाधीन असल्याचे मीत्व मिरविण्यात गुंग असतो. स्वत्वाचे विसर्जन मीत्वात करून; घेतलेलेच विसरून जातो. विसरण्याचे वरदान कोणी दिले; याचा विचारही या विस्मृतीच्या कोठडीत कोपऱ्यात कोंडून मोकळे होतो. स्मृती आणि विस्मृती असे काही नसते, असते ती जगण्यांतील क्षणांची मालिका. त्यातील प्रत्येक क्षण, गोवर्धन पेलणाऱ्या, असंख्य गोरख काठ्यांसह, त्या अनामिकाने घडविलेला, सांभाळलेला असतो, कोहिनूरसारखा! 'मीत्व' प्रकटविण्यासाठी, त्या मीत्वातील खरा मी देहाच्या मंदिराच्या गाभाऱ्यात स्वयंभूपणे प्रकटलेला असतो. जगताचा आनंदभोग भोगण्यासाठी. या स्वयंभूच्या

प्रकटण्याचे स्वागत, गाभाऱ्यात झेपावणारे असंख्य 'मी' करीतच असतात. स्वयंभू अनगडाचे मूर्तिरूप होताना; झेपावलेल्या अनेक मींचे, गौरवित असे 'मी कण' आपल्या असलेपणाने गाभारा भरून, भारून टाकतात! गाभाराच 'गौरव गाभारा' होतो. देहमंदिरातील स्वयं जगात गौरवाने मीत्वासह मिरवू लागतो.

जीवनातील निर्लेप आणि संवेदनात्मक क्षणी गाभाऱ्यातील गौरवित 'मी कण' उसळी मारून स्पंदित होत मीत्वाचा अनुभव घेऊ लागतात; तेव्हा कुठे 'मीत्व' गळून पडते आणि सर्वात्मक स्वयंभूत्वाचा स्पर्श संवेदित होतो. आपल्याच अस्तित्वाच्या गाभाऱ्यात अनेकानेक गौरवित मित्वांना आपण आपल्या नकळत विनम्रतेने गौरवाने चिरंतनासाठी सांभाळलेले असते. त्यांच्या बळावर तर, आपल्या जीवनातील प्रत्येक क्षणाची परीक्षा पारित करीत; आपण पुढे पुढे जात असतो.

'मी' चा 'गौरव गाभारा' अशाच गौरवपूर्ण मीत्वांच्या प्रतिष्ठापनांनी गौरवित आहे. ही 'मी'त्वे जीवनाच्या सर्व अंगांना व्यापून आहेत. 'मी'चे मीत्व अशा मीत्वांच्या चिन्मय स्पंदनांनी, संवेदनांनी आकारले आहे. मीत्वांच्या अंतःप्रवाहाने या 'मी'चे मीत्व मिरविते आहे. निर्लेप आणि संवेदनात्मक क्षणाक्षणांच्या, चित्कालातून उसळून मीच्या ठिकाणी स्पंदित झालेली, काही मीत्वे, मीच्या मीत्वाची साक्ष देतात. या चैतन्य स्फुरणांना मी चे कृतज्ञतापूर्वक अभिवादन! 'मी' एकला असतोच कुठे? प्रत्येक मी मीत्वांच्या तेजपुंजातून, तेजोमान होऊन प्रकटतो. नव्या मीत्वांच्या तेजपुंजातील एक तेजकण म्हणून. असे असंख्य तेजपुंज मिळून विश्वात्मक मीत्व प्रकटते हे मात्र सतत जाणवत राहाते.

'गौरव गाभारा' अनुभवतांना अनुभवणाऱ्या प्रत्येक 'मी'ला त्या त्या मीत्वाचा 'गौरव गाभारा' गवसेल आणि विश्वात्मक मीत्व प्रकाशमान होईल. यासाठी हा 'मी' चा 'मी' शी संवाद. या प्रकटनाने संग्रहित मीत्वांविषयीच्या लेखनात चुकूनही चुकीचा, अमर्यादकारक, अधिक्षेपक, औधत्यपूर्ण, अपमानकारक मजकूर लिहिला गेला असेल; तर प्रेमपूर्वक क्षमा करावी. कृतज्ञतापूर्वक प्रकटीकरणाचा प्रयास म्हणजे 'गौरव गाभारा'.

**मी**

**अनिल सहस्रबुद्धे**



# मज सद्‌गुरू भेटला !

## (पू. ह. वि. फडके सर)

''पू. ह. वि. फडके सर गेले'' हे वृत्त आले नि ओठातून शब्द प्रकटले ''अकोल्यातील अगस्त्य अवताराचा अस्त!'' अवतार मीमांसा कोणी मानो की न मानो; युगायुगातून अशक्य ते शक्य करून दाखविणारे करुणामूर्ती महामना प्रकट होतात आणि जग सांभाळण्याचा, पुढे नेण्याचा प्रयत्न करतात; याचा मात्र आपण अनुभव घेतोच घेतो. फडके सर हे काही कोणी भाविकमान्य सिद्धपुरुष किंवा संत नव्हते. एक सामान्य शिक्षक! हाडाचा शिक्षक, वृत्तीने शिक्षक, व्रती शिक्षक. गांधी टोपी, धोतर, शर्ट, सारं शुभ्र, त्यावर पांढूररंगाचा कोट, पायात वहाणा. धारदार नाक, दुर्दम्य आशेसह संकल्पसिद्धी करतेले तेजस्वी पाणीदार, तरी करुणा श्रवणारे डोळे, गोरापान देह. चपळ, कर्मवान, वक्तशीर आणि शिस्तशीर! नखशिखांत महात्मा गांधींचा अनुसारक!

पंधरा ऑगस्ट, सहवीस जानेवारी, गांधी सप्ताह आणि शालेय पर्यावरणातील, जयंत्या, मयंत्या, स्पर्धा, संमेलने अशा प्रसंगी फडके सरांना उधाण यायचं. प्रभातफेऱ्या काढायच्या, घोषणा द्यायच्या, विद्यार्थ्यांना आपल्यातल्या चैतन्याने, चैतन्यमयी करून टाकायचं. गांधी सप्ताह म्हणजे तर पर्वणीच. शाळेच्या मागच्याच बाजूला मांगवाडा होता. फडके सर, झाडू, टोकऱ्या आदि आमच्या हाती देऊन; आम्हाला मांगवाड्यात न्यायचे. स्वतः हातात झाडू घेऊन स्वच्छता करू लागले की; आम्ही मुले आणि मांगवाड्यातले सारे मोठ्या श्रद्धेने आमच्या बरोबर, फडके सरांच्या मोहिमेत सहभागी व्हायचे ''देव बाप्पा झाडुसुलय चला!'' म्हणत लोक कामाला लागत. झाडून लख्ख

झालं की मुलांना न्हाऊमाखु घालणं सुरू व्हायचं. ''अरे रोज अंघोळपांघोळ करून शाळेला जावं.'' ''हां हां'' एव्हढंच म्हणत 'दिवाळी सण साजरा करावा आणि मग आवरसावर विसरून जावं. असंच घडायचं. आठवी ते अकरावी चार वर्ष विद्यार्थी दशेत मी हे सारं अनुभवत होतो. सरांचा उत्साह तसुभरही कमी झाला नाही. कसं राहावं, शिकून शहाणं व्हावं, याचा संदेश दलित, आदिवासी, वाड्यावस्त्यांवर जाऊन, प्रत्यक्ष प्रात्यक्षिकासह करतांना; सर कधीच थकत नसत. सांस्कृतिक कार्यक्रम नृत्य, नाट्य आदि बसवून घेऊन सादर करावेत; कुस्त्या, हुतुतु, खो-खो, लांबउड्या अशा खेळांच्या स्पर्धा घ्याव्यात. निबंध, रांगोळ्या, चित्रं अशा स्पर्धा तर उत्सवाच्या निमित्त व्हायच्याच. सरांनी गणेशोत्सव तर थेट पुण्याच्या तोडीचा अकोल्यासारख्या आदिवासी भागातल्या आठ-दहा हजार वस्तीच्या शहरात म्हणून सुरू केला. व्याख्यानं आणि उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा हे या उत्सवाचं खास वैशिष्ट्य असायचं. या सगळ्या उपक्रमांतून तयार झालेले कितीतरी विद्यार्थी देशात शिखरावर पोहोचले. निष्ठेनं. सर्वांच्या मनात फडके सर गुरुकुलाच्या गुरुमाऊली सारखे दृढावलेले.

सर इंग्रजी शिकवायचे. सहज, सुलभ प्रात्यक्षिकांसह, हावभावासह, प्रसंगी फलकावर चित्र रेखाटून, घोकून घ्यायचे, बोलायला लावायचे, लिहायला लावायचे. प्रसंगी त्रास वाटायचा पण तेव्हढीच आवड निर्माण व्हायची. आम्ही मुले त्यांच्या नकलाही करीत असू. छडीच्या धाकासह, त्यांच्या तळमळीचा धाक आम्हाकडून अभ्यास करून घेत असे. मराठी, गणित, इतिहास, संस्कृत एवढंच काय खेळ देखील ते तेव्हढ्याच कौशल्याने शिकवित असत. श्रमदान आणि सहभोजन हे त्यांचे अगदी जिव्हाळ्याचे विषय. श्रमदानातून त्यांनी वर्गखोल्या उभ्या केल्या आणि सहभोजनातून शिपायापासून सर्व शिक्षकांपर्यंत आणि पाचवीतल्या विद्यार्थ्यांपासून मॅट्रिकच्या अर्थात अकरावीच्या विद्यार्थ्यांपर्यंत मुलं, मुली जिव्हाळ्यानं जोडल्या.

अकोले गाव तालुक्याचं. तालुका आदिवासी बहुल. दुर्गम. निबीड. भीती वाटायची. नगर जिल्ह्यातून मुलकी सेवेतील, न्याय सेवेतील, आरोग्य सेवेतील लोकांची अकोल्याला बदली; म्हणजे एक प्रकारे शिक्षा देण्यासाठीची कारवाई असायची. स्वातंत्र्यानंतर नगरच्या कलेक्टरांनी एक बक्षीस घोषणा केली ''जी संस्था अकोले येथे माध्यमिक विद्यालय सुरू करेल; त्या संस्थेला दहा हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येईल.'' कोणी संस्था धजेनात. स्थानिक



काही करेनात. नगरची गांधी चळवळीतूनच प्रेरणा घेऊन स्थापन झालेली 'हिंद सेवा मंडळ' ही संस्था सरसावली. विडा उचलला. 'मॉडर्न हायस्कूल अकोले' अशी शाळा १९५०-५१ मध्ये एका वाड्यात सुरू झाली. नगरहून एन. आर. कुलकर्णी म्हणून हेडमास्तर पाठवले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे; दलितांना शिक्षणाची दारं खुली नव्हती असं म्हणतो; पण अकोल्याचेच रहिवाशी पुण्यात आणि संगमनेरात शिकून स्नातक झालेले; पुढे महाराष्ट्रालाच नव्हे तर देशालाही आणि विश्वालाही ज्ञात झालेले, महाराष्ट्राचे मंत्री, बुद्ध सोसायटीचे नेते, दादासाहेब रुपवते, पहिले शिक्षक म्हणून रुजू झाले. वर्षसहा महिनेच, पण या शाळेतला पहिलेपणाचा मान त्यांना मिळाला. त्यांच्याबरोबर जेमतेम मॅट्रिक पास चित्रकलेत निपुण, अनंत देशपांडे हे स्थानिक तरुण व्यक्तिमत्त्व, मास्तर म्हणून काम करू लागले. पुढे ते फर्डे वक्ते आणि ह्या शाळेचे प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त झाले. असे शिक्षक दादासाहेब रुपवते यांच्या बरोबर होते. एकूण सह्याद्रीच्या कळसुबाई, हरिश्चंद्रगड, रतनगड, पट्टागड ह्या गडकोट किल्ल्यांच्या परिसरात भंडारदरा डॅम जवळ, प्रवरा नदीच्या तीरावर, ऋषी अगस्ती आश्रमाच्या सान्निध्यात, सिद्धेश्वर मंदिरानजिक पहिली माध्यमिक शाळा सुरू झाली. पहिल्या सात-आठ वर्षात कुलकर्णी, देशपांडे, अष्टेकर अशा हेडमास्तर मंडळी नगरहून पाठवावी लागली. शाळा चालली होती. जोडीला सर्वोदय योजनेअंतर्गत सत्यनिकेतन संस्थेचे 'कोळी बोर्डिंग' होते. असे असले तरी; शिक्षक राहात नसत. विद्यार्थी यायलाही फारसे तयार नसत. रडतखडत शाळा सुरू होती. संस्थेने सांगलीहून आलेले 'बी.ए.बी.टी.' झालेले समर्पित व्रतस्थ असे पू. ह. वि. फडके सरांना अकोल्याचे मॉडर्न हायस्कूल सांभाळण्याची विनंती केली. ते आले. त्यांनी पाहिले. आपले मानले. आदिवासी भागात ज्ञानगंगा पोचविण्याचे अशक्य कार्य अंगावर घेतले आणि पाहाता पाहाता फडके सर अकोले आदिवासी भागाचे कुलगुरू झाले. जणू अगस्त्य अवतरले! गावोगावी फिरले. वसतिगृहाशी जिव्हाळ्याचा संबंध जोडला. महात्मा गांधीजींच्या वृक्षारोपण, मुलोद्योग, ग्रामसुधारणा, स्वच्छता, प्रौढशिक्षण, स्त्रीशिक्षण या साऱ्या विचारमोहिमा स्वतः सुरू केल्या. प्रेरित केले. लोकांना चळवळीत ओढले. ग्रामस्थ, नेते भारावून टाकले. पाहाता पाहाता शाळेतील विद्यार्थी संख्याही हजारापर्यंत पोचली. तालुक्यात, ज्ञानसूर्याचा उदय, अथक परिश्रम आणि तळमळीतून झाला. मी बालवयातच त्यांच्या

व्यक्तिमत्त्वाने भारावून गेलो. केवळ पुस्तकी नव्हे, प्रत्यक्षानुभवातून ज्ञान याकडे खेचला गेलो.

अन्य कारणे काहीही असोत; दारिद्र्य हे सर्वात मोठे कारण; मला नोकरी करायला भाग पाडणारे होते. मॅट्रिकनंतर कसाबसा, अनेकांचे अनेक प्रकारचे आधार घेऊन श्रीरामपूरला टी.डी. पूर्ण केले. त्यातही कमवा शिका सुरूच होते. मॉडर्न हायस्कूल अकोलेमध्ये; रजेच्या मुदतीतील एक जागा शिक्षकाची निर्माण झाली होती. मी लगेच फडके सरांना भेटलो. मला त्यांनी १ मार्च ते ३० एप्रिल अशा दोन महिन्यांसाठी नेमले. दोन महिन्याचे अडीचशे रुपये मिळणार होते. मी रुजू झालो. त्यात परीक्षेपुरती रजा काढली. १९६५ सालची ही गोष्ट. आता मला आपल्याच शाळेत फडके सरांनी सामावून घेतले; तर चिंताच मिटेल, असा आशाळभूत झालो. काम केल्याशिवाय पोट भरणे शक्य नव्हते. जमेना. रोज फडके सरांसमोर केविलवाणा, आशाळभूतपणे पाहात बसू लागलो. करुणामूर्तीलाही ताण सोसवेना, ''अनिल नाईलाज आहे. जागा होणे कठीण आहे. शिपाई म्हणून येतोस?'' सरांनी विचारले. मी खुशीने ''हो'' म्हणालो. ११ जुलै १९६५. मी माझ्या शाळेत, सरांचा लाडका विद्यार्थी, शिपाई म्हणून रुजू होऊन; काम करू लागलो. सरांना समाधान आणि दुःख दोन्ही झाले. दुपारी मला बोलावून ते म्हणाले, ''संध्याकाळपर्यंत एक निर्णय होण्याची शक्यता आहे, मग पाहू.'' सर शून्यात पाहात बोलत होते. मला काहीच कळेना. मिळालेली अर्धीचतकोर जाऊ नये एवढे मनोमनी म्हणालो. शाळा सुटली तरी सर शाळेतच थांबले होते. सहा सव्वासहा झाले. स्वाभाविक आम्ही शिपाई बाहेर प्रतीक्षा करीत होतो. एवढ्यात पोस्टातला रनर टेलिग्राम घेऊन आला. मी समोरच होतो. घेतले व सरांकडे दिला. सरांनी सही करून दिली. टेलिग्राम वाचला, ''अनिल इकडे ये, हे बघ, उद्यापासून मास्तर म्हणून ये'' सर अतीव आनंदाने मला म्हणाले. परमेश्वर प्रत्यक्ष भेटला असे मला वाटले. डोळे वाहू लागले. मी सरांचे पाय धरले. त्यांनी मला उठवले. पोटाशी धरले. ''हं आता रडत बसू नकोस, आता काम आणि शिक्षण एव्हढेच करा. संधी मिळाली आहे,'' सर म्हणाले. मी त्यांच्या करुणापूर्ण डोळ्यांना, डबडबल्या डोळ्यांनी विश्वास देत म्हणालो, ''हो, हो सर!'' मी कामाला लागलो. खाण्यापिण्याचा आठजणांच्या कुटुंबाचा प्रश्न सुटला होता. आता मेहनत माझ्या हातात होती. ''उत्तीष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान निबोधत'' या सुविचार आज्ञेने मी सुरुवात केली. अजून अठरा वर्षे पूर्ण होणार होती. सरांनी तोही विचार केला नाही. २४ ऑगस्ट रोजी मी अठरा वर्षे पूर्ण केली. येथवरचा पगार शासनाने डिसअलावूड केला. सरांनी तो अनुमतीपूर्वक संस्थेतूनच भरला.

मी शिक्षक म्हणून काम सुरू केले. एकीकडे दिवसभर शाळेत शिक्षक म्हणून काम करायचो. संध्याकाळपासून दुसऱ्या दिवशी शाळेत जाईपर्यंत अभ्यास करायचा. पू. फडके सरांनी अध्यापनाचे अक्षरशः वर्गात येऊन प्रात्यक्षिकासह धडे तर दिलेच; त्याचबरोबर संध्याकाळी त्यांच्या घरी मला एकट्याला बसवून प्री. डिग्रीसाठीचे इंग्रजी शिकवायचे. तोच शिरस्ता मी एस.वाय.बी.ए.ला बसलो तोपर्यंत सुरू होता. मी इंग्रजीचा शिक्षक, प्राध्यापक व्हावे असे त्यांना वाटे. जो उत्साह पन्नास विद्यार्थी समोर असतांना तोच मला एकट्याला घरी शिकवतांना असायचा. एस.वाय.बी.ए.चा अभ्यास सुरू झाला आणि फडके सरांना अकोले सोडून जावे लागले. खरेतर गेल्या दोन वर्षांपूर्वीच ते शासकीय नियमाप्रमाणे सेवानिवृत्त झाले होते. संस्थेने शाळेच्या विकासाच्या दृष्टीने त्यांना सुपरिटेंडेंट असे पद निर्माण करून; संस्थेच्यावतीने पगार देऊन; अकोल्यात ठेवले होते. सर अकोले सोडून गेले. मी पोरका झालो! पण शिक्षण सोडले नाही.

बह्यस्थ स्वरूपात मी एम.ए. मराठी झालो. पीएच.डी. झालो. हा प्रवास एकलव्यासारखा सुरू होता. बह्यस्थ स्वरूपात आणि शिक्षक म्हणून काम करता करता मला इंग्रजीचा अभ्यास करणे शक्य नव्हते. तरी मी इंग्रजी शिकवित होतो, अभ्यास सातत्य आणि सराव यामुळे मी दहावी अकरावीपर्यंत इंग्रजी शिकवीत होतो. अध्यापनातले काही शॉर्टटर्म कोर्सेस मी पूर्ण केले होते. पण एम.ए. नंतर स्वाभाविकपणे मी आमच्याच शाळेला जोडलेल्या ज्युनिअर कॉलेजमध्ये मराठी शिकवीत होतो. हे करतांनाच मी पीएच.डी. पूर्ण केले. पू. फडके सर अकोल्यातून जे गेले ते पुन्हा अकोल्यात आलेच नाहीत. मी मध्येच एकदा कोल्हापूरजवळच्या मुरगुड गावी, त्यांच्या मुलीच्या घरी ते असतांना भेटून आलो. माझा सगळा वृत्तांत सांगितला. पीएच.डी. करतोय हे सांगितले. सरांना समाधान वाटले. मी ७९-८० मध्ये पीएच.डी.ची डिग्री घेतली. 'वनवासी कल्याण आश्रमा'च्या सेवाकार्यात रमलो. अकोले आणि मनातले फडके सर कधीच विसरलो नाही. पुढे मी ८५ साली नगरला, सारडा महाविद्यालयात,

आमच्याच संस्थेत, बदली होऊन आलो. आता माझ्या नावावर चारदोन पुस्तके होती. मी पीएच.डी.चा गाईड झालो होतो. साधारण १९८७-८८ सालची गोष्ट असेल. पू. फडके सरांचा श्रीकांत नावाचा मुलगा पुण्यात टिळकरोडला 'युनायटेड वेस्टर्न बँकेचा मॅनेजर' म्हणून आल्याचे समजले. सर त्याच्याचकडे राहात होते. वीस वर्षे उलटून गेली होती. सर आता ८२-८३ वर्षांचे झाले होते. मी माझा पीएच.डी.चा प्रबंध सरांनाच अर्पण केलेला होता. त्यांचे दर्शन घेऊन; त्यांच्या पायावर प्रबंध वहावा; असे मी ठरवले.

गेलो. सर भेटले. अक्षरशः पायावर प्रबंध वाहिला. सरांनी हातात घेतला. पाहिला. डोळे पाणावले. उभे राहिले. मला जवळ घेतले. पाठीवरून थोपटत हात फिरतांना; मला जग जिंकल्यासारखे झाले. ''खूप मोठं काम केलस. हे यशवंतरावांना सांगितलं पाहिजे. थांब,'' असे म्हणत, काही मनाशी योजून, सर आतल्या खोलीत गेले. बाहेर येतांना हातात एक पुस्तक होते. माझ्या हातात देतांना म्हणाले, ''अनिल माझी इच्छा आहे. तू ज्ञानेश्वरीवर काही लिही.'' मागचा पुढचा विचार न करता मी पायावर डोकं ठेवत म्हणालो, ''सर, तुमचा आशीर्वाद आहे. जरुर लिहीन. काही अशक्य नाही.'' मी भाबडेपणे बोलून गेलो. ''मोठा हो!'' सरांनी तोंडभरून आशीर्वाद दिला. मी सरांकडून निघालो. वाटेत पुस्तक पाहिले. गुरुदेव रानड्यांनी श्रीमद् भगवद्गीतेवर केलेले भाष्य होते. इंग्रजीत - अजूनही फडके सरांचा इंग्रजीचा हट्ट आणि वरदहस्त दोन्ही संगतीला होते. घरी आलो. पुस्तक वाचून काढले. थोडेफार समजले. अस्वस्थ झालो होतो. 'ज्ञानेश्वरीवर म्या काय लिहावे?' चाचपडत होतो. नुकतेच माझे 'लोकसाहित्यविचार' हे पुस्तक प्रसिद्ध झालेले होते. मनात स्फुरले. 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार'! बस्स याच विषयावर लिहिले. कसे कोण जाणे अभ्यासाला लागलो. मा. गो. देशमुखांचे 'मराठीचा साहित्यविचार' हाताशी होते. मार्गदर्शन घडले. माझे पीएच.डी.चे मार्गदर्शक नगरमध्येच होते. चर्चा केली. ग्रंथाचा आराखडा तयार झाला. अभ्यासाला लागलो. अवघ्या एकदीड वर्षात श्री ज्ञानेश्वरीतील निवडक ओव्यांच्या आधारे श्री ज्ञानेश्वर निरुपित साहित्यशास्त्र डोळ्यासमोर आणि मनात आकारले. लिहायला सुरुवात झाली. मांडत गेलो. लेखन पूर्ण करीत असतांनाच; गुरुवर्य फडके सर महानिर्वाणास गेल्याचे वृत्त आले. हबकलो. पण त्यांनीच दिलेल्या प्रसादाने सावरलो. लेखन पूर्ण केले. 'दास्ताने रामचंद्र आणि कं.' या प्रकाशनाने स्वीकारले. प्रकाशित केले. डॉ. शं. गो. तुळपुळे, डॉ. मु. श्री. कानडे, प्रा. वसंत दावतर, डॉ. गंगाधर मोरजे यांच्या उपस्थितीत, डॉ. लीला गोविलकर आणि डॉ. सु. प्र. कुलकर्णी यांनी मोठ्या उत्साहाने परिश्रमपूर्वक, हिंद सेवा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शानदार सोहळ्यात प्रकाशन समारंभ झाला.

एक दिवस अचानक टेलिग्राम आला. पुण्यात कांची कामकोटी पिठाच्या शंकराचार्यांनी श्री ज्ञानेश्वरी लेखन सप्तशताब्दी वर्षानिमित्त, ज्ञानेश्वरीवर स्वतंत्रपणे मराठीत लेखन केलेल्या नऊ विद्वानांची विद्वत् पुरस्कारासाठी निवड केली होती. 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' ग्रंथाचे लेखक अस्मादिक अर्थात डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांची त्यात निवड झाली होती. पुण्यातल्या कार्यक्रमात डॉ. रा. चिं. ढेरे, डॉ. उषा देशमुख, डॉ. ह. वि. इनामदार, प्रा. राम शेवाळकर, वि. रा. करंदीकर, डॉ. व. दि. कुलकर्णी आदींच्या बरोबर त्यांच्यातील नवागत असा मी, उपस्थित होतो. डॉ. व. दि. कुलकर्णींच्या मागे बसलेलो. का कोण जाणे; हा कोण नवीनच, असे कदाचित वाटले असेल, व.दिं.नी मागे वळून माझ्याकडे पाहिले. न राहून विचारलेच ''का हो तुम्हाला हे लेखन कसे सुचले?'' ''म्हणजे?'' मी या साशंक करणाऱ्या प्रश्नाने जरा गांगरलोच. ''नाही, श्री ज्ञानेश्वरीवर स्वतंत्र लेखन गुरुप्रसादाशिवाय शक्य नाही असं वाटलं, म्हणून विचारलं!'' व.दि. म्हणाले, क्षणात पू. सद्गुरु पू. हरिभाऊ फडके सरांची मूर्ती साक्षात झाली. मी क्षणाचाही विलंब न करता म्हणालो, ''माझे गुरू फडके सरांनी, गुरुदेव रानडे लिखित पुस्तक मला दिले आणि ज्ञानेश्वरीवर काही लिही अशी आज्ञा केली. त्यामुळे हे घडले.'' मी स्पष्ट सांगितले. व. दि. मान डोलवत म्हणाले, ''मला वाटलंच, गुरुप्रसादाशिवाय हे शक्य नाही.'' व.दि. म्हणाले. मी मान डोलवत म्हणालो, ''त्यांच्याच कृपेने घडले.'' महावस्त्र, श्रीफल, पुष्पहार, अभिनंदनपत्र यांसह रुद्राक्षमाला घालून कुंकुमाभिषकासह जगद्गुरू शंकराचार्य अर्थात पू.श्री. जयेन्द्र सरस्वती यांच्या शुभहस्ते विद्वत् पुरस्कार प्राप्त करतांना पू. फडके सरच जगद्गुरूंच्या रूपात येऊन आपल्याला पुरस्कार देऊन गौरवित आहेत असा भास मला झाला. मी मनोमनी नमस्कार करीत पुरस्कार स्वीकारला. सद्गुरूकृपेने अशक्य ते शक्य सहजचि घडते याची प्रचिती आली.

●●●

# माझे मामा
## (पी. बी. तथा मामा/बाबा टाकळकर)

अकोल्यात महाविद्यालय सुरू झाले. प्राचार्यांची नेमणूक व्हायची होती. प्रा. राम अत्रे त्यासाठी आले होते. मामांकडे उतरले. मामांनी मला हाक मारली. मी मामांकडे माडीवर गेलो. मामांनी माझा परिचय करून दिला. म्हणाले, ''एम.ए. झालाय, आठही पेपर्स एकदम देऊन'', मामांनी मोठ्या अभिमानाने सांगितले. मी ही थोडा फुगलोच. अत्रे सरांनीच ''आता पुढे काय?'' म्हणून विचारताच मामांनीच उत्तर दिले, ''पीएच.डी. करायचीये म्हणतोय.'' ''अरे, वा! मग प्रवेश वगैरे घेतला का?'' प्रा. राम अत्रेंनी विचारले. प्रा. राम अत्रे मामांचे जवळचे नातेवाईक होते. त्यामुळे त्यांनी मामांचा आग्रह आणि कल पाहून मला अधिक खोलात जाऊन विचारायला सुरुवात केली. ''नाही. आत्ताच एम.ए. झालो ना,'' मी म्हणालो. ''क्लास आहे का?'' अत्र्यांनी विचारले. ''हो, ''सेकंड क्लास'' मी म्हणालो. ''अरे वा, एम.ए. होल बह्यस्थ करूनही सेकंड क्लास मिळाला. अभिनंदन. प्रा. राम अत्रे अर्थात अकोले महाविद्यालयाचे प्राचार्य राम अत्रे म्हणाले, ''अहो, त्याने मॅट्रिकनंतरचे सगळे शिक्षण एक्सटर्नलच केलंय, नोकरी करतोय ना, पर्याय नव्हता,'' मामांनी जरा जास्त मोठेपणाने सांगितले. ''अरे, पण आता फॉर्म भरण्याची मुदत संपली असावी. बहुधा एवढ्यात इंटरव्ह्यूह असावेत!'' अत्रे सरांनी शंका व्यक्त केली. ''म्हणजे हे वर्ष गेलंच, असूद्या, पाहू पुढच्या वर्षी, मी त्यासाठीच त्याला लगेच बोलावलं. पण असूद्या'' मामा म्हणाले. ''असं करा डॉ. भीमराव कुलकर्णींना लिहा. काही जमत असेल तर होईल.''



प्राचार्य राम अत्र्यांनी मामांचा मूड पाहून सुचवले. आशा पल्लवित झाली. मी पत्ता घेतला. अत्रे सरांनी सांगितल्याप्रमाणे माझी सर्व कर्मकहाणी लिहिली. पत्र पोचले. पत्र आले. सोबत फॉर्म पाठवला होता. मामांना दाखवला. ''अनोबा, अत्र्यांना दाखवून, भरून, सांगितल्याप्रमाणे डॉ. भीमरावांना भेटा.'' नुसता पीएच.डी. प्रवेशासाठीचा फॉर्म आला होता; याचा विलक्षण आनंद मामांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता.

पीएच.डी. प्रवेशाचे सगळे सोपस्कार पूर्ण होता जवळपास वर्ष गेले. शहात्तर साल उजाडले. डॉ. गंगाधर मोरजे गाईड मिळाले. विषय ठरला ''चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास''. मी मामांबरोबर राजूर परिसरातल्या त्यांच्या शेताभातात लहानपणापासून जात होतो. आमच्या मातोश्री सौ. आनंदी सहस्रबुद्धे समाजकल्याण योजनेच्या तालुका समितीच्या सन्मान्य सदस्या होत्या. त्यांना समाजकल्याण मुख्य सेविका ताराबाई श्रोत्रीय यांच्याबरोबर डांगाणात व्हिजिटना जायचे असायचे. मी त्यांच्या बरोबरही डांगाणात जात असे. तेव्हांपासून या भागाला 'डांगाण' का म्हणतात आणि 'चाळीसगाव डांगाण' का म्हणतात याविषयी मनात कुतुहल होते. आता पीएच.डी.चा विषयच 'चाळीसगाव डांगाण' ठरला होता. त्यामुळे 'चाळीसगाव डांगाण'चे स्पष्टीकरण होणे आवश्यकच होते. माझ्याजवळ माहितीचा 'कल्पवृक्ष' होता, मामा! मी मामांना विचारले. ''थांब'' एवढेच बोलून ते तिसऱ्या मजल्यावर निघाले. मीही पाठोपाठ गेलो. त्यांनी भलीमोठी खानदानी लाकडी संदुक उघडली. दोन माणसं ऐसपैस बसतील एवढी संदुक (पेटी). झाकण भले जड. मामा आत डोकावले, जुन्या पिवळट जीर्ण कागदांच्या दप्तरी फाईल पाहू लागले. सापडली फाईल.'' ''हां चल'' मला म्हणाले. खाली आलो. फाईलीचे बंद सोडले. दोनचार कागद ओलांडल्यानंतर, एक दस्तऐवज, जुनापुराणा मोडी भाषेतला, मिळाला. ''हां हे घे 'चाळीसगाव डांगाण' ते म्हणाले. मी हातात घेतले. मोडी मला येत नव्हते. मग मामांनी माझ्या हातातून पेपर्स घेतले आणि त्यांनी ती सनद पूर्ण वाचून दाखविली. 'शहा आलम, शहा गाजी, दगाजी, पिराजी' यांनी दिलेली 'पाटीलकीच्या तक्षीमा' स्पष्ट करणारी चाळीस गावांची ती सनद होती. ह्या चाळीस गावांना 'चाळीसगाव डांगाण' म्हणतात.'' मामा म्हणाले. ''मामा, डांगाणचा गुजरातमधल्या डांग जिल्ह्याशी काय संबंध?'' मी विचारले. ''काही

नाही, या डोंगराळ भागाला डांगाण म्हणतात'' मामांनी स्पष्ट केले. ''चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास'' या प्रबंधाच्या खऱ्या संशोधनाची या कागदपत्रांच्या रूपाने मामांनी मुहूर्तमेढ रोवली. मी मग कामाला लागलो. मामा पाठीशी होतेच.

तात्या-काकूंचे कुटुंब काही दिवस सोमणी-संतवाड्यात आणि तहहयात टाकळकर वाड्यात राहिले. चारदोन महिने कधी जोशी वाड्यात घालवली असतील. १९३६ मध्ये तात्या अकोल्यात आले. पाठोपाठ लग्न होऊन काकू अकोल्यात आल्या. तात्या-काकू अकोल्याचेच म्हणून ओळखले जाते. माझा जन्म सोमणी दादा-वहिनींच्या घरातला आणि शैशवावस्थेपासून सांभाळ झाला तो टाकळकर वाड्यात. मामांच्या सहवासात. मामासुद्धा मुळातले अकोल्याचे नव्हते. ते नाशिकजवळच्या रामदासटाकळीचे म्हणून टाकळकर. अकोले हे त्यांचं खरेतर मातुलग्राम. त्याचेच इनामगावात रुपांतर झाले आणि टाकळकर अकोलकर झाले. जहागिरीच्या चौचौकी अनेकमजली दिमाखदार आणि खानदानी वाड्याला, त्याच आत्मियतेने आणि सन्मानाने लोक टाकळकर वाडा म्हणत. मी दोनअडीच वर्षांचा असतांना टाकळकर वाड्यात म्हणजे मामांच्या वाड्यात आलो. आम्ही मामा म्हणायचो पण त्यांच्या घरातले आणि बाहेरचे लोक त्यांना बाबा म्हणत. पण आमच्यामुळे मामांची मुलेही त्यांना मामाच म्हणू लागली. मी मामांच्या लग्नाचाही साक्षीदार. सतत मामांच्या बोटाला असायचो. कान्हेगाव वारीला मामांचे लग्न झाले. मला सारखे त्यांच्या जवळ बसायला हवे असायचे. कोणीसे मला बाजूला लांब बसायला सांगितले. मी रुसलो, पळत सुटलो. मामींची आई धावली. त्यांनी माझी कशीबशी समजूत काढली. एवढा मामांचा लळा. लग्न झाल्यावर मामी, मी नणंदेचा पोरगा असल्याने मला त्या वयातही आहोजावो म्हणायच्या. मामा लाडाने अन्याफन्या म्हणायचे, पण मामींनी ''अहो अनिल'' म्हणणे आजतागायत त्यांच्या वयाच्या नव्वदीत देखील सोडले नाही. मला मामा-मामींचा एवढा लळा. मामांबरोबर मी डांगाणात, कल्याणला मोठ्या मामांकडे नि नाशिकला अक्कामावशी आणि छोटूमावशी यांच्याकडेही जायचो. मला थोडेफार कळायला लागले तेव्हा; सहजच गप्पांच्या ओघात प्लेगच्या साथीचा विषय आला. मामांनी जवळची सगळी माणसं पाचआंब्यात (शेतात) झोपडीत नेली. आमचे कुटुंबही नेले. तात्यांना प्लेग झाला होता. ते पोस्टमन असल्याने इन्यॅक्युलेशनचा



मोठा डोस देऊनही प्लेग झाला. त्या अवस्थेत इतरांना त्रास नको म्हणून तात्यांनी तेथून गावात जाण्याचा हट्ट धरला. मामांनी ऐकले नाही. ''जे होईल ते सर्वांचे होईल! अशा अवस्थेत मी तुम्हाला जाऊ देणार नाही.'' मामा म्हणाले. जागरण, जमतील ते उपचार करीत राहिले. दैव आणि सदिच्छा बलवत्तर. तात्या वाचले. काही विपरीत घडले असते तर पुढे माझा जन्म होणेही अशक्यच होते. मी २४ ऑगस्ट १९४७ चा स्वातंत्र्यातला. मला गप्पांच्या ओघात ही हकिकत कळली आणि मामांचा लळा होताच तो दृढावला. मामा माझा प्रत्येक हट्ट पुरवित आणि मामी मोठ्या कौतुकाने त्याला दुजोरा देत.

१९५९ साली मी अनेक कारणांनी रामदास व्हायला घरातून बाहेर पडलो. मामांनी मला बरोबर नाशिकला छोटूमावशीच्या घरी गाठले. रामदास होण्यापासून परावृत्त करण्यात मामा सर्वात आघाडीवर. माझी मनःस्थिती मोठ्या समंजसपणे मामांनी मोठ्या वत्सलभावाने सांभाळली.

मामा म्हणजे पुरुषोत्तम बाळकृष्ण टाकळकर आणि मामी म्हणजे सौ. प्रमिला पुरुषोत्तम टाकळकर. मामा कुठे नोकरीला नव्हते. शेती-भाती आणि पूर्वजांचे वैभव टिकवणे, वाढवणे; यासाठीची त्यांची धडपड. कुळकायदा आला. मामा कुळकायदा अक्षरशः कोळून प्याले. त्या काळात सकाळपासून संध्याकाळपर्यंत मामांकडे सारखी लोकांची सल्ल्यासाठी रीघ असायची. येणारा-जाणारांची उठबस अर्थातच मामी करीत. लोक एवढ्या अदबीने त्यांच्या सदरेवर येत. कृतज्ञता व्यक्त करीत. जाता-येता त्यांच्या ज्ञानाची तारीफ करीत. मामांना कायद्याचे ज्ञान घेण्याचा छंद, तसा वाचनाचा छंद. कोणाही अभ्यासकाला लाजवील, रसिक चोखंदळ रसिकाला लाजवील असे त्यांचे वाचन. विज्ञान, तत्त्वज्ञान, ललित, तंत्रज्ञान, इतिहास, भूगोल, राजकारण, राजकीय तत्त्वज्ञान या अशा कितीतरी क्षेत्रातील त्यांचा व्यासंग दांडगा होता. कोणत्याही क्षेत्रातील संदर्भ विचारला की साल, घटना, व्यक्ती, प्रसंग, कारण, परिणाम या सगळ्या गोष्टींसह संदर्भ लगेच ते सांगत असत. याचा अनुभव मी जवळपास नित्य घेत होते. मी त्यांना 'ज्ञानकोश' म्हणायचो.

मामांचे देवघर म्हणजे एखाद्या खोलीसारखे. कोणते देव कोणत्या परंपरेतले हेही नेटकेपणाने माहीत असायचे. शैव, शाक्त, वैष्णव, गाणपत्य, दत्त आदि सगळ्या परंपरा, मूर्ती, तंत्र, यंत्र यांसह त्यांच्या देवघरात हजर.

देवीचं आणि खंडोबाचं नवरात्र असे. गणपती, अनंत यांचाही उत्सव असे. नित्य पूजापाठ, वैश्वदेव इ. सारंकाही नेमानं व्हायचं अगदी सोवळ्यात. श्राद्धपक्ष, घरातील गावातील सणोत्सव या सगळ्यात त्यांचा सहभाग असे. असे असूनही मामा कर्मठ आणि ब्राह्मण्यग्रस्त मुळीच नव्हते. उदार आणि स्वागतशील, जात, पंथ, धर्म, वैचारिकव्यूह - निरपेक्ष असे साक्षेपी पुरोगामी! त्यांच्यात एकांगी आणि एकाकी विचार कधीच जाणवले नाहीत. तरी ते बोलत कमी. वादविवादाच्या फंदात ते पडत नसत. समाजवादी, कम्युनिस्ट, सर्वोदयवादी, धार्मिक, राष्ट्रसेवादल आणि रा. स्व. संघ या सर्वच पठडीतल्या लोकांना बाबा टाकळकर आपला माणूस वाटे. या सर्वच प्रवाहातले नेते त्यांच्याकडे आवर्जून येत. पाहुणचार घेत, चर्चा करत. सर्वांना त्यांच्या-त्यांच्या प्रवाहातील पत्त्यामुद्यासह सूक्ष्म आणि विस्तृत माहिती मिळण्याचे एकमेव हमखास ठिकाण म्हणजे बाबा टाकळकर.

मी पीएच.डी.चा अभ्यास करीत होतो. क्षेत्रीय अभ्यास, लोकवाङ्मय, भाषा आणि संस्कृतीचा अभ्यास करतांना आदिवासी महादेवकोळी, ठाकर, तलवार कानडे, हटकर कानडे या जमातींचा त्यांच्या डोंगरउतरणीवरील आणि कळसुबाई, रतनगड, हरिश्चंद्रगड, आजूबा, पट्टागड यांच्या कुशीतील कोतुळडांग, राजूरडांग आणि समशेरपूर डांग या विभागांचा जवळून परिचय झाला. त्यांचे दुःख, दैन्य, दारिद्र्य, समस्या अडीअडचणी यांसह स्वाम्तभावानं जगणं जवळून अनुभवलं. सर्वोदय योजनेअंतर्गत राजूरला सत्यनिकेतन संस्थेमार्फत उभारलेल्या विविध योजना आणि शैक्षणिक सुविधांमधून होणारं परिवर्तन. कम्युनिस्ट चळवळीतून लोकमानसात रुजलेला वर्गलढा, स्वातंत्र्यपूर्वकाळात दिलेली झुंज आणि भूमिगतांना दिलेला औदार्यपूर्ण आश्रय या सर्व गोष्टी स्वतःला क्षेत्रीय सर्वेक्षणातून अनुभवयाला मिळाल्या. आणीबाणीच्या काळातली लोकमनःस्थिती या सर्व गोष्टींविषयी घेतलेले अनुभव मी मामांना सांगायचो. साधकबाधक चर्चा व्हायची. सम्यक दृष्टी आणि राष्ट्रहित म्हणजे काय? त्यात माणूस म्हणून माणसाचं नेमकं स्थान कोणतं; हे मला मामांच्या व्यक्तिमत्त्वातून शिकायला मिळालं. वास्तव आणि अद्भूत, पारंपरिक आणि परिवर्तनात्मक अनेक गोष्टींची जाणीव मला मामांकडून झाली. मामा म्हणजे चालतं-बोलतं विद्यापीठ. मी राष्ट्रसेवादलात लहानपणी जात असे. तसा इ. ९ वी पासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघातही जाऊ लागलो. रा. स्व. संघाचे विचार विश्वसमावेशक



असल्याचे जाणवले. पीएच.डी. प्राप्त केल्यावर मी खरेतर मोठ्या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून जायचे ठरवले. मामांनीही मला दुजोरा दिला. ''तीच खरी आता तुझी जागा आहे'' असे म्हणाले. पण तेव्हढ्यात माझ्यासमोर, आदिवासी अर्थात वनवासी वन-निवासी (अनाथ, पोरके, दरिद्री नव्हे) विद्यार्थ्यांसाठी रा. स्व. संघ विचाराचं वसतिगृह सुरू करण्याचा प्रस्ताव; विभाग प्रचारक तात्या बापट, संगमनेर-अकोले तालुका प्रचारक गोविंदराव लेले आणि नव्याने आलेले तालुका प्रचारक मदन चोरघडे यांनी मांडला. नगरला जिल्हा संघचालक मा. माणिकराव पाटील यांच्यासमवेतही चर्चा झाली. मी घरी आलो. आईशी आणि सौ. उषाशी बोललो. माझा निर्णय झाला. मामांना विचारल्याशिवाय मी कोणताही महत्त्वाचा निर्णय घेतला नव्हता. ज्युनिअर कॉलेजची नोकरी होतीच. साधकबाधक विचार केला. ''तुला काय करावेसे वाटते?'' मामांनी मला विचारले. ''मला आदिवासी विद्यार्थ्यांच्यासाठी सेवा कार्य करण्यात जास्त सार्थक आहे असे वाटते'' मी म्हणालो. ''ठीक आहे. आता मागचा-पुढचा विचार करू नकोस'' मामा म्हणाले. मी कंबर कसली. नुसते बोलून सांगून मामा थांबले नाहीत; त्यांना तो विचार पटला, आवडला आणि अर्थपूर्ण वाटला. त्यांनी वाड्यातल्या तीन खोल्या वसतिगृहासाठी दिल्या. त्याचबरोबर प्रांगणात होमगार्डसाठीची एक मोठी खोली बांधलेली होती तीही दिली. निरपेक्ष भावनेने, मोफत, आदिवासी विकासासाठी आणि माझ्या पाठीशी भक्कम उभं राहण्यासाठी; त्यांनी या खोल्या देण्याचा निर्णय घेतला. मामा संघाशी पहिल्या बंदीपूर्वीपासून जोडलेले होते हे मला माहीत होते. त्यांनी त्यांच्या बखळ जागेत संघस्थानासाठी जागा दिली होती याचा अनुभव मला होता. मात्र मामा संघिष्ट एकारलेले कधीच नव्हते हेही मला ज्ञात होते. 'गुहक विद्यार्थी वसतिगृह' सुरू झाले.

मामा-मामींचा टाकळकर वाडा म्हणजे एक शिक्षण संकुल होते. वाड्यात दहाबारा बिऱ्हाडं होती. ती सगळी या ना त्या प्रकारे शिक्षणाशी जोडलेली होती. अकोल्यात मॉडर्न हायस्कूल सुरू झाले त्याचे पहिले हेडमास्तर कुलकर्णी आणि त्यानंतर आलेले हेडमास्टर देशपांडे टाकळकर वाड्यातच वास्तव्याला होते. मामांची वाड्या पाठीमागे अर्थात वाड्याचा भाग म्हणून भली मोठी बखळ जागा होती. या बखळ जागेचा उपयोग मॉडर्न हायस्कूलने गॅदरींग साजरे करण्यासाठी करावा. श्रमदानातून बखळ जागेचे ओपन थिएटरमध्ये

रुपांतर झाले होते. मॉडर्न हायस्कूलच्या गॅदरींगचे सांस्कृतिक कार्यक्रम, नाट्यप्रयोग आणि मुख्य पारितोषिक वितरण समारंभ तेथेच होत असत. वाड्यात शिक्षकांचे वास्तव्य अधिक त्यामुळे सतत शाळेविषयी गप्पा. शिकवण्या आणि क्लासेसची सोय टाकळकर वाड्यात. विशेषतः गणित आणि इंग्रजीचे क्लासेस वाड्यात चालत. विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ वाड्यात असे. शिक्षक संघटनेच्या मिटींग्ज, ट्रिप्सचे नियोजन, खलबते, चकाट्या, गप्पा सारे काही वाड्यातच घडायचे. आम्ही सारेजण टाकळकर वाड्याला, टाकळकर विद्यापीठ म्हणू लागलो. एवढी वर्दळ पण मामा-मामी कधी चुकूनही वैतागले नाहीत, खेकसले नाहीत; उलट या समस्त घडामोडींचे नकळत पालकत्व मामा-मामी यांच्याकडे असे. वाड्यातल्या घराघरातल्या लहान मुलांपासून ते कर्त्या मंडळींपर्यंत सगळ्यांचं पालकत्व निःसंकोचपणे मामा-मामींनी करावे. मामा जणू टाकळकर विद्यापीठाचे कुलगुरू होते. नजर चौफेर असायची, प्रोत्साहन सर्वांना असायचे. सहाय्य मागेल त्याला मिळायचे, पण हस्तक्षेप कोणातही नसायचा. सर्वांच्या कुटुंबाचा धुरीण, जणू मामा असायचे. हे अनभिषिक्तपणाने निर्व्याजपणाने! दुखणीबाणी, सणोत्सव, सुखदुःख, प्रसंगकार्य सगळ्या गोष्टींना, सगळ्यांसाठी, शिशूंपासून प्रौढांपर्यंत सर्वांना मामा-मामी आधारवड वाटत.

या सगळ्यांत मी मोठाच भाग्यवान ठरलो. मी मामांचा लाडका. कदाचित स्वतःच्या मुलांपेक्षाही माझे लाड मामांनी अधिक केले; असे मला वाटत असे. तात्या-काकू भले १९३६ पासून अकोल्यात होते; तरी नोकरी तुटपुंजी, पोस्टमनची. भाड्यानी घर घेऊन राहायचे. अठराविश्वे दारिद्र्य. त्यात सहा मुलांचा पोरोडा. मी शिक्षक झालो. माझे लग्न झाले तरी आम्ही वाड्यात भाड्यानेच राहात होतो. मी सतत विचार करायचो. तात्या आईंच्या डोळ्यादेखत त्यांचं असं घर झालं पाहिजे. मी गावात प्लॉट शोधला. भला मोठा. व्यवहार जवळपास ठरला. पण मामांच्या कानावर घातल्याशिवाय काही करायचे नाही. मामांपुढे प्लॉटचा प्रस्ताव ठेवला. कधी नव्हे ते मामांचा चेहरा वाकडातिकडा झाला. कधीही न खेकसणारे मामा खेकसले, ''पैसे जास्त झालेत का? इथून कुठे हालायचं नाही. मला माझ्या बहिणीला राहायला स्वतःच्या दोन खोल्या बांधून द्यायच्या आहेत. मी वाड्यातच जागा देतो. बांध हवं तर.'' मी वरमलो. मामांनी मग मनावर घेतले. छोटीशी जागा जेमतेम दोन खोल्यांची निवडून दिली. ''बांधा इथं'' माझ्या जवळ तरी तसे काय होते. दगडामातीचे बालेखांबी घर केले. मामांच्या देखरेखीखाली. दगड माती वाड्यातलीच. बाकीच्या गोष्टी जमा केल्या. माझ्या आई-वडिलांचं स्वतःचं घर झालं. वाड्यातच मामांच्या सान्निध्यात. मामा आनंदले. आई-तात्या त्याच घरात परमधामास गेले. मामाही निजधामास पोहोचले. मामी मात्र आभाळमायेनं आजही सर्वांची आठवण काढीत पालकत्व निभावित आहेत. माझे अकोल्यात जाणे-येणे कमी झाले. जीवनाचे सारसर्वस्व अगस्ती आश्रमात भावनात्मकतेने केंद्रित झालेले आणि वाड्यात गेले की आईच्या कुशीतली स्वर्गीय सुखदायकता लाभते म्हणून त्या घराचे स्मारक करायचे ठरविले. पण जबाबदारी कोण घेणार? मामांचा थोरला मुलगा प्रतिमामा. तोही शिक्षकच. प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त झाला. त्याच्यावर जबाबदारी देऊन पी. बी. (बाबा/मामा) टाकळकर : ग्रंथालय व संशोधन केंद्र' असे स्मारक उभे करण्याचा प्रयत्न आहे. जागा खूप लहान आहे पण मामांचा अवकाश खूप मोठा आहे. मामींच्या साक्षीनं हे घडतं आहे. आमच्या सख्ख्या मामांपेक्षाही या भावनात्मक नात्याच्या मामांनी आमच्यासाठी मातुल उभे केले.

●●●

# मामींची साऊली

## (प्रमिला पुरुषोत्तम टाकळकर)

चिरेबंदी गल्लीत नारायणेश्वराचा चिरेबंदी विस्तीर्ण चौथरा. एका बाजूला रस्ता ओलांडून, रामाचं मंदिर, मंदिराला लागून चारमजली भव्य चुनेगच्ची नगारखान्याची इमारत, नारायणेश्वराच्या मागे अकोलकरांचा चिरेबंदी दुचौकी भव्य वाडा. या सगळ्याच्या मध्यभागी रस्त्यासह निर्माण झालेला चिरेबंदी चौक. या चौकात रामाच्या देवळासमोर भव्य चिरेबंदी प्रवेशद्वार. वास्तुकलेचा उत्तम नमुना, दिंडी दरवाजाची सोय. कधीकाळी हत्ती, घोडे, याच प्रवेशद्वारातून थेट वतनदार जाहगिरदार संतांच्या सातमजली चौचौकी, भव्य चिरेबंदी वाड्यात जात असावेत. आता मात्र त्याच्या केवळ खुणाच शिल्लक राहिलेल्या आहेत. जेथे कदाचित घोडे बांधण्याची सोय आणि फडावरच्या नोकरांची वर्दळ असावी; त्या जोत्यावर नव्याने तरी दोनएकशे वर्षांपूर्वी उभारलेला तीन मजली, खरेतर दोन मजली आणि मजल्यावर पुन्हा पाटाईमुळे झालेला तिसरा मजला म्हणावा, असा वाडा हा वाडा आता संतांचा नव्हे. आता टाकळकरांचा! हे टाकळकर मामींचे साम्राज्य! वाडा, बिऱ्हाडकरूंनी अगदी गजबजलेला. दहापंधरा बिऱ्हाडं वाड्यात नांदायची. यात अकोल्यात नोकरीनिमित्त आलेल्या नोकरदार मंडळींचाच भरणा असे. टाकळकरांच्या वाड्यात भाडेकरू म्हणून आलेला भाडेकरू, कुटुंबवाड्याचा; सहकुटुंब, टाकळकरवाडा लडिवाळ घटक म्हणून, टाकळकर मामींकडून स्वीकारला जाई. भाडेकरू, आपण भाडेकरू आहोत हे विसरून जाई. परक्या गावात आपण नोकरी करायला आलो हेही विसरून जाई. टाकळकर मामा-मामींनी त्यांचे पालकत्व केव्हांच स्वीकारले असे.



आजीआजोबा, लेकीसुना, पोरंसोरं सारंसारं मामींचं होऊन जाई. मामांची उदारता आणि मामींची माया, या सगळ्यांना आपल्या प्रेमपंखात, कुटुंबवत्सलतेच्या उबेत सांभाळी. टाकळकर वाड्यात, अनेक बिऱ्हाडं आहेत; ही भावनाच गळून पडे. वाड्याचं एक महाकुटुंब होई. जातपात विरून जाई. नवी कुटुंबातली नाती आपसूक निर्माण होतं. स्वयंपाकपाणी, लग्नकार्य, निवडणंटिपणं, उन्हाळी वाळवणं, सणवार, वेगळं वेगळं दिसलं तरी वेगळं असायचंच नाही. वाड्यातल्या मुलाबाळांना, वाड्यातून, संस्कार, वाड्यातून धाक, वाड्यातून लाडकोड, सारं वाड्यात व्हायचं. या सगळ्या कुटुंब वावराचा कणा म्हणजे टाकळकर मामी अर्थात सौ. प्रमिला पुरुषोत्तम टाकळकर आणि त्यांच्या जोडीला, मामी वाड्यात, टाकळकर मामी म्हणून येण्यापूर्वीपासून, राहणाऱ्या टाकळकर मामांच्या भगिनी, गावकाकू अर्थात सौ. आनंदी नागेश सहस्रबुद्धे. टाकळकर वाड्यातली नाती रक्ताची नव्हती. माणसाच्या मनातील चिन्मयी मानवतेच्या गंधानं धुंद झालेली, सनातनाएव्हढीच ही नाती घट्ट आणि दृढ व्हायची. वाड्यातल्या प्रत्येकाला मामी हक्काचा विसावा वाटायचा. वाड्यात खुशाल, पोरंसोरं एकटीदुकटी असोत; वाड्यात कितीही दुखणीबाणी येवोत, विपरिताला वाड्यात वस्तीला येणे शक्यच होत नसे.

या वाडा कुटुंबातील मी म्हणजे, सर्वात भाग्यवान सदस्य, असे मला नेहमीच वाटत आले आहे. बहुधा हे वाड्यात राहणाऱ्या, राहून गेलेल्या प्रत्येकालाच वाटत असावे; असे मला संवेदित होते आहे. पण मी जास्त भाग्यवान याचे कारणही तसेच आहे. मामा-मामींनी चिरंतनासाठी आमच्या कुटुंबाला घट्ट जखडून टाकले. टाकळकर वाड्याचा हा भावश्रीमंतीचा प्रसाद अवघ्या चिरेबंदी गल्लीला आणि गावालाही लाभत होता. मामी अर्थातच गावमामी झाल्या होत्या.

मामा-मामींचे वास्तव्य वाड्यात दुसऱ्या मजल्यावर, मजल्याला उत्तर, पूर्व, दक्षिण, पश्चिम खिडक्या, चारपाच दालनं. शिवाय तिसऱ्या मजल्यावर वावर. तळमजल्यावर शेतीभातीचे धान्यधुन्य इ. मजल्याच्या इमारतीच्या मागे विस्तीर्ण अशी, चौचौकी वाड्याचे अवशेष सांगणारी, बखळ जागा. बखळीत चिंच, कवठ आणि बोर यांची झाडं. पावसाळ्यात पावसाळी गवती झुडपे, फुलझाडे खूप माजायची. त्यात गुलबक्षीची रंगीबेरंगी फुले विपुल; धोत्रा, गुलतूर आदीही असत. छाती एव्हढाले रान माजे. आम्ही मुले त्यात हुंदडायला

जात. साप, विंचू, मुंगुस यांची वसती विपुल. आम्ही हुंदडायला गेलो की दुसऱ्या मजल्यावरच्या खिडक्यांमधून मामा-मामींच्या आरोळ्या सुरू होत. त्यात धाक असे तेव्हढीच काळजी असे. आम्ही ऐकतो थोडेच. ''मामी ओरडतील हं'' असे खेळगड्यांना एकमेकांना सांगत, हुंदडायला जायचेच. मामींच्या ओरडण्याने वाड्यातली पालक मंडळी जागृत होऊन आमचा शोध घ्यायची आणि मामींच्या धाकाला दाद द्यायची. बोरं, कौठं, चिंचाच्या मोसमात तर विचारूच नका. सगळ्यांचे डोळे चुकवून मेवा खायला जायचं. पण मामींच्या टेहळणी बुरुजावरून हेही त्यांना दिसायचं. मग मात्र आमची खैर नसायची. मला तर चिंचेच्या झाडावर चांगलं वरपर्यंत चढता यायचं. माझ्याभोवती सवंगडी असायचे. वाड्यातले आणि वाड्याबाहेरचे सुद्धा. चिंचा गाभूळल्या की आम्हाला मोह कसा आवरणार? मग मात्र मामी लाखोली घालू लागत. त्यात, ''आम्ही धडपडलो तर''ची काळजी असे. मामी नाईलाजाने शेवटचे हत्यार काढीत, ''चिंच विकली आहे हं, (फतरूभाईला किंवा लालभाईला) आता त्यांनाच तुमची नावं सांगते. एकेकाला पकडूनच न्यायला सांगते.'' हा धाक दुहेरी वाटायचा त्या भाईचा आणि घरच्यांचाही. कधीतर मामी थेट बखळीत येत किंवा कधी मामा येत. मग आमची पळताभुई थोडी होई. हे सगळं लडिवाळपणाचं. मामींनी काही खास केलं की त्या स्वतःच पोरांना हाक मारायच्या. हातावर किंवा बशीत देता देता, ''आता बखळीत परत जा तर खरं, मग बघते'' असं म्हणायच्या हे त्यांचं लटकं रागावणं. आमच्या अंगवळणी पडलेलं. हे म्हणतांनाच त्या खाऊचाही आग्रह करायच्या तेव्हां खूप गंमत वाटायची. आम्हीही आवडीचं काही असलं की हावऱ्यासारखं करायचो. भजी, लाडू, थालपीठं, पापड्या, कुरडया नि काय काय. मामींचं सारखं सुरू असायचं. पोरांना हाक मारून दिल्याशिवाय राहावायचं नाही. मामींचा धाकदरारा कुठल्या कुठे पळून गेलेला असायचा.

मामांचं पाचअंबा नावाचं लेंडीओहोळाच्या पलिकडे छानसं शेत होतं. पाचअंबा म्हणायचे पण माझ्या आठवणीत तो पाचवा आंबा मला कधी दिसला नाही. एक मोहाचं झाड आणि एक चाफ्याचं झाड मात्र होतं. मामा-मामी शेताकडे निघाले की हमखास त्यांच्याबरोबर असायचो. मामांना आता प्रकाश नावाचा मुलगा होता. तो आमच्या विद्याच्या बरोबरीचा. प्रकाशचं टोपणनाव मधु आणि विद्याचं टोपणनाव नंदा. मधुनंदाची लहानगी जोडी



आमच्याबरोबर असे. माझा धाकटा भाऊ रमेश त्याला मामा-मामी आणि आम्ही सर्व बाल्या म्हणत असू तोही कधी असायचा. आम्ही गेलो की गुलतुऱ्याच्या भरल्या शेंगा. त्यांना कटाव म्हणत असत. गुंजाचा पाला यावर तुटून पडत असू. गुलतुऱ्याची शेंग, दातात धरून फोडली की 'टॉक' असा आवाज यायचा. म्हणूनच त्याला कटाव म्हणत असावेत. गुंजाचा पाला तर गोडच. मग काय याशिवाय शेतात काय काय मिळायचं. काशीनाथ शेतकरी आमचे लाड करी. बाजऱ्या निंबुरावर आल्या की मामी काशीनाथला निंबूर भाजून द्यायला सांगत. आंब्यांच्या दिवसात कधी वळवाच्या वाऱ्यापावसाने सपाटून कैऱ्या, पाड पडत. आम्ही पोरं गोळा करायला जात. ''जपून जा आणि लवकर या'' मामींचा आम्ही निघतांना आरड होई. 'आंबे उतरवणं' हा एक उत्सव असे. त्यावेळी मात्र मामी, मामा, आम्ही सगळे बरोबर असायचो. मामींनी पिठलंभाकरीचा बेत बरोबर आणलेला असायचा. उतरणाऱ्याच्या हाताला पाड लागला की त्यावर आमचीच सत्ता असायची. संध्याकाळी बैलगाडी भरून आंबे घेऊन वाड्यावर यायचे. मग आंबे वाहून आणण्याची आम्हाबरोबर वाड्यातल्या पोरांची एकच धांदल व्हायची. असे दोनतीन दिवस चाले. मग आंबा पिकेपर्यंत दम नसायचा. ''अनिल सारखे आंबे हाताळू नका'' मामी दरडावयाच्या. पण एकदा आढी आली की आढीवर बसून आंबे खातांना आणि रसाने सगळं अंग लडबडून जातांना आम्ही आमच्याच आनंदोत्सवात मग्न असायचो. आंब्यावर आमचा ताव सुरू झाला की मामी कौतुकानं, वात्सल्यानं आमची गंमत पाहात असत. मामींच्या या वावरात वात्सल्य ओतप्रोत असायचं. त्यामुळं वाड्यातल्या पोरांना ''मामाच्या गावाला जाऊया'' असं म्हणायची वेळच कधी यायची नाही. बागडणं, खाणंपिणं, उदंड आणि मामींचं मामीपणही उदंड. मामांना याचं केव्हढं कौतुक. मामांच्या नजरेतून त्याचा वर्षाव आम्हावर व्हायचा.

वाड्यात ऐसपैस अंगण. चांदण्यात वाड्याची अंगतपंगत व्हायची. घराघरातून ताटं भरून अंगणात यायची. त्यात मामींची धावपळ तर विचारायचीच नाही. शेजारी बसण्यासाठीच्या भांडणांवरून ते कोणी कोणाच्या पानात काय टाकलं, पळवलं, कोणाला काय हवं इथपर्यंत आणि कोणाला काय अधिक आवडतं इथपर्यंत मामी जातीनं लक्ष घालायच्या. आम्ही मामींनाच हाक मारून भंडावून सोडायचं. मामींचं मग ''जा ग ते घेऊन ये; ते त्याला वाढनं;

हां असं नाही करायचं, कांद्याला काय काळ गेलाय?'', आणि काय काय सांगणं सुरू असायचं. वाड्यातली सगळी मंडळी मोठ्या कौतुकानं या अंगतीपंगतीचा आनंद घेत, आपणही लहान होऊन अंगणातच जेवायला बसायची. त्यांची जेवणं, गप्पा सुरू झाल्या की आमचा कालवा सुरू व्हायचा. मध्येच मामी, ''ए अरे जरा हळू ना, कळत नाही का?'' म्हणून उगाचच ओरडायच्या. मग स्वतःशीच सर्वांमध्ये म्हणायच्या. पोरांनी नुसता उच्छाद मांडलाय.

उन्हाळ्याची कामं सुरू झाली की आमची चंगळ व्हायची. पापडाचं डोंगर, वाळत घातलेल्या अर्ध्यावाळल्या पापड्या, कुरडयांचा चीक या सगळ्यावर ताव मारतांना मामींच्या लटक्या ओरडण्याने अधिक चव यायची. मामींनी वाड्याचं असं गोकुळ सांभाळावं.

मामांचं वाचन, अभ्यास मोठा दांडगा. खूप माहिती. कायद्याचं ज्ञान उत्तम. मामांकडं तालुक्यातले लोक यायचे. ते सगळे मामांना बाबा का म्हणत याचा शोध मला अद्याप लागला नाही. मामांची बैठक आल्यागेल्यानं सतत भरलेली असायची. चर्चा, माहिती, सल्ले यांची सत्र चालायची. तेव्हढाच वेळ मामींचं माजघरात आणि विशेषतः स्वयंपाक घरात वावरणं सुरू असायचं. त्याचवेळी चुलीवर, वैलावर, स्टोव्हवर आणि पुढे गॅसवर चहाचं पातेलं उकळतच असायचं. प्रसंगी स्वयंपाकाचा धबडका असायचा. वाड्यातली मंडळी अशा गडबडीत मामींशीच संपर्क करायची. स्वाभाविकपणे हवं नको, देणंघेणं सारं मामीच पाहायच्या. ''मामा म्हणतील तसं. माझं काय बाई, नाही, काय?'' हे त्यांचं पालुपद असायचं. मामींनी मामांकडे आल्यापासून कर्तेपणातली प्रगल्भता पुष्ट करीत नेली. मामांची सावली बनून त्या सेवारत आणि कार्यरत राहिल्या.

सुखदुःखाच्या लाटा, व्यवहाराचे चटके, परिस्थितीचे उन्हाळे-पावसाळे सर्वांनाच असतात. स्वार्थ कोणालाच चुकला नाही. स्वार्थ साधतांनाही व्यावहारिक परमार्थतेची आस असावी, याचं मूर्त रूप म्हणजे मामी! घरातली दुखणीबाणी काढणं हे तर साऱ्यांनाच करावं लागतं, पण शेजाऱ्यापाजाऱ्यांचं, अवतीभोवतीच्या लोकांचं, गावातल्यांच्या दुखण्याबाण्याला धावून, कंबर बांधून सेवा करायला सरसावणं म्हणजे परमेश्वराची करुणा वर्तनात आणणं; हे कोणीही मामींकडून शिकावं. सामान्यतः दुःखात तर सहानुभूतीने सहभागी



होण्याचा स्वभावच असतो. पण दुसऱ्याच्या सुखात, आनंदात तेव्हढाच आनंद मानण्याची उदारता केवळ श्रीमंत मनाच्या ठिकाणीच असते. जगाचं कौतुक करावं ते मामींनीच तेही 'माझं', 'स्वतःचं' मानून.

सत्तर सालची गोष्ट. तात्या, अर्थात माझे वडील गॅस्ट्रोने पछाडले होते. फोकच्या फोक जुलाब सुरू होते. मी मामींना बोलावले. आईने तर धीरच सोडला. मामी पक्क्या धीराच्या. मी कर्ता असलो तरी अवघा बावीसतेवीसचा, पाठची भावंडे बाल्या (रमेश) नि नंदा (विद्या) तेही घाबरलेले. डॉ. देशपांडे आलेले. त्यांचे प्रयत्न सुरू. तेही तसे घरातले. गाव लहान. तात्यांच्या अशा अवस्थेत काय करावे कळेना. डॉक्टर सलाईन लावून, त्यातूनच औषधे भरून, धीर देऊन जात. साथ मोठी. मामींनी कंबर कसली. वाड्यातले लोक धावले. तात्यांचे दुखणे अगदीच विकोपाला गेले. दुर्गंधी तर कोणालाच सहन होईना. त्यातही मामी एकीकडे आईची समजूत घालीत; तर दुसरीकडे अक्षरशः सूप सूप भरून काळ्या रंगाचे फोक बाहेर येत होते. मामी स्वतःच्या हातांनी ते सगळे भरून टाकून, पुसून सावरत. तात्यांची जवळपास शुद्ध हरपली. सलाईन जाते की नाही कळेना. डॉ. देशपांडे त्यातही धीर देत होते. अन्य लोकांशी बोलतांना गंभीर होत. ''काकू घाबरू नका. तुम्ही सारखं देवाचं करीत असता. सगळ्यांच्या मदतीला धावता. देव निष्ठूर नाही. तुमचं कुंकू बळकट आहे. वाटेल तात्यांना बरं.'' मामी आईची परोपरीनं समजूत घालीत होत्या. मामांनी मला बोलावून घेतलं. ''अनिल घाबरायचं नाही. तात्यांनी अशा कितीतरी साथी पचवल्या आहे. अरे प्लेगच्या साथीतून ते वाचलेत.'' मामांनी माझी पाठ थोपटत धीर दिला. नंदा आईच्या कुशीत शिरून रडत होती. बाल्या हिरमुसला होता. काय करावं त्याला कळत नव्हतं. तो भेटायला म्हणून पुण्याहून आला होता आणि हा प्रसंग गुदरला. तात्यांना झोप लागली. जुलाब थांबल्यासारखे वाटले. विचित्र वाटत होते. ''अनिल, आत्ता बरे वाटेल तात्यांना. झोप लागलीये जुलाब थांबलेत.'' मामींनी माझी समजूत घातली. मामींच्या इच्छाशक्तीला आणि आईच्या कुंकवाच्या बळकटीला यश आले होते. डॉक्टर आले त्यांना पाहिले, ''अनिल, तात्या लकी आहेत. वाचलेत. हळूहळू नॉर्मल होतील.'' डॉ. देशपांडे म्हणाले. मला आता रडू कोसळले. मामींचा खंबीरपणा पाहून मी थक्क झालो.

मामींचा प्रपंच व्यवहार असा कोसळणाऱ्या आभाळाला पेलणारा!

त्यांची मुलेही स्कॉलर. मुलांच्या कौतुकाबरोबर भोवतीच्या मुलांचेही थोड्या थोड्या यशाचे कौतुक मामींनी करावे. मामांचा स्वभाव असा स्वागतशील, समावेशक, उदार, सर्वांसाठी आधारवडासारखं उभं राहण्याचा. सुदैवाने मामींचा स्वभावही एवढा जुळता मिळाला हे गावाचं, वाड्याचं भाग्यच! मामा-मामींच्या या ऐश्वर्यवान मनश्रीमंतीचा, सर्वाधिक लाभ मला मिळाला, हे माझं भाग्य. या लोपामुद्रा स्वरूप मायमाऊलीच्या मायेचा वर्षाव आजही अवघ्या पंचक्रोशीवर आहे. मामा निघून गेले. आता मामांचेही दर्शन मामींमध्येच होते. मुले मोठी झाली. कर्ती झाली. नातवंड, पतवंड आली. त्यांच्यासह सर्वांवर मामींची छाया वर्धिष्णूच आहे. मामींच्या मायेचा प्रसाद लाभलेले सगळे लोक मामींच्या आणि त्यांच्या साम्राज्याच्या ओढीने येतात. मीही अलिकडे नगरला असतो. अकोल्याला जातो; तेव्हां ऋषी अगस्ती, श्री सिद्धेश्वर, श्री महालक्ष्मी, रोकडोबाबरोबरच या मायमाऊलीला भेटून दर्शन घेतल्याशिवाय प्रदक्षिणा पूर्ण होत नाही. मामींच्या पायावर डोकं ठेवलं की अवघ्या सृष्टीमातेचा आशीर्वाद मिळाल्यासारखे वाटतं. त्यांच्या दर्शनानं, श्रेय शिखर सर केल्यासारखं वाटतं!

●●●



# बहरला वृक्ष चंदनाचा!

## (दामोदर माधव दाते तथा दामुअण्णा)

आठवीतून नववीत गेलेलो. मे महिना. शेजारच्याच वाड्यात साठ्ये सर राहात. त्यांनी हाक मारली. धावत गेलो. त्यांच्याकडे पाहुणे होते. तेजस्वी आणि हसतमुख ''हा अनिल का?'' त्यांनी कौतुकाने माझ्याकडे पाहून विचारले. मी थक्क झालो. ''बाबा, अरे हा तर चांगला चुणचुणीत मुलगा आहे. आपले कामच झाले'' त्यांनी मला चुणचुणीत म्हटलेले आवडले, परंतु मी आणखीच चकित झालो.

''हे दामुअण्णा येथे शाखा काढण्यासाठी आलेत. संघाचे प्रचारक आहेत. मीच त्यांना तू चांगले काम करशील म्हणून सांगितले.'' संघ शाखा इ. मला ऐकून माहित होते. खरेतर मी राष्ट्र सेवा दलात जात असे. अकोल्याच्या पाटील वेशीवरील व्यायामशाळा आणि हनुमान मंदिराच्या पटांगणात पगारे नावाचे फुलटायमर आमची शाखा लावत. मला त्यांनी का कोण जाणे मुख्य शिक्षक केले होते. कलापथकात घेतले होते. गेल्या दोन महिन्यांत मात्र आमची राष्ट्र सेवा दलाची शाखा लागली नव्हती. पगारे कुठेसे गेल्याचे समजले, मी मोकळाच होतो. त्यात साठ्ये सरांनी नाव सुचविले आणि पाहुणे अर्थात दामुअण्णा मला चुणचुणीत म्हणाले त्यामुळे मी भलताच खुश झालो होतो. झाले दामुअण्णांनी मला हाताशी धरले. खांद्यावर हात टाकला आणि संघशाखेवर आणले. मुलांना गोळा केले आणि शाखा सुरू झाली. तशी अकोल्यात संघाची शाखा होती. स्वयंसेवक होते. पहिल्या बंदीत काहींनी तुरुंगवासही पत्करला होता. परंतु का कोण जाणे शाखा बंद होती. आम्ही

टाकळकर वाड्यात सुरू केली. अण्णांनी मला मुख्य शिक्षक केले. माझी आणि त्यांची चांगलीच गट्टी जमली. त्यांचे बोलणे मी कान टवकारून ऐकत राही. सांगितलेली प्रत्येक गोष्ट करी. ते माझ्यातली हुशारी, नेतृत्व फुलवीत. त्यांच्या प्रोत्साहक आणि राष्ट्राभिमानी, व्यासंगी आणि स्वागतशील, समावेशक आणि जिद्दीच्या व्यक्तिमत्त्वाने मला प्रभावित केले. त्यावेळी ते संगमनेर-अकोला तालुका प्रचारक होते.

अकोले तालुका कम्युनिस्टांचा. आदिवासी डोंगराळ भाग.स्वातंत्र्य चळवळीत भूमिगत झालेल्यांना सांभाळणारा, लढावू, स्वाभिमानी आणि जीवट. येथे गावागावात जाऊन संघशाखा लावणे आणि त्याविषयी बोलणे. महात्मा गांधींच्या निधनानंतर किती अवघड होऊन बसले असावे याची आज कल्पना येते. त्या काळात दामुअण्णा कोतुळ, राजूर, समशेरपूर, बारी या ठिकाणी जायचे. हिमतीने मुक्काम करायचे. सारा तालुका त्यांनी पायी प्रवास केला. पुन्हा शाखेची माणसे उभी केली. त्या काळात संघप्रचारकांशी संबंध ठेवण्याची देखील चोरी. सरकारची आणि कम्युनिस्टांची करडी नजर. त्यातच राष्ट्र सेवा दल, सर्वोदयी कार्यकर्ते हे संघाविषयी द्वेषानं बोलत. या परिस्थितीत दामुअण्णा जात आणि काम करत. मला ते सारं सांगत.

आमच्या घरी अठराविश्वे दारिद्र्य. आमटीभाकरी असे. आमटीत बुडी मारलीतरी डाळ हाती लागेल की नाही शंका. अशा परिस्थितीत घरातील आठ माणसात दामुअण्णांना आग्रहानी मी बोलवी. आई आमची समितीची आणि बालवयातच कान्हेरे क्रांतीकारकांच्या टोळीत काम करणारी. तिला अण्णांविषयी आपुलकी आणि आदर वाटे. ती असेल ते अगदी गूळ, कांदा, भाकरी दामुअण्णांपुढे ठेवी. दामुअण्णा प्रसन्नवदनाने आईच्या स्वयंपाकाचे कौतुक करीत खात. बऱ्याचदा त्यांना आमच्याकडे भोजन घेण्याची इच्छा असे. त्यामुळे तर दामुअण्णांशी माझे अगदी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. इयत्ता नववीनंतरच्या सुट्टीत ६२ साली त्यांनी मला संघशिक्षा वर्गाला प्रथम वर्षासाठी आग्रहाने नेले. त्यावेळी ते जिल्हा प्रचारक झालेले होते आणि चंद्रकांत जोशी हे आम्हाला तालुका प्रचारक होते.

मी संघशिक्षा वर्गात आजारी पडलो. आजार देखील गंभीर होता. दामुअण्णा माझ्यापर्यंत पू. सरसंघचालक गोळवलकर गुरुजींना घेऊन आले. मी भारावलो. ते स्वतः माझ्याशी बोलले. पुढे तर त्यांनी माझी भेट आणि



ओळख कायमच लक्षात ठेवली आणि मी नशखिशांत संघवाला झालो. दामुअण्णांनी माझ्या मनात आदिवासींमध्ये (वनवासींमध्ये) काम करण्याची इच्छा निर्माण केली. का कोण जाणे आईवडील, पू. फडके सर यांच्या इतके मी माझ्या मनात दामुअण्णांना जपू लागलो.

प्रांतांची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली होती; परंतु मी भेटलो की ते घरातील सर्वांची विचारपूस करीत. नवेच काम सांगत आणि मी भारावून जाई. पीएच.डी.चा रिझल्ट घेऊन मी तडक मोतीबागेत गेलो. त्यांच्या पायावर डोके ठेवले. 'खूप मोठ्ठे काम केलेस' एवढेच शब्द अतिशय गंभीर स्वरात त्यांनी उच्चारले. मला पोटाशी धरले. वनवासीमध्ये काम कर सांगून मोकळे झाले. ७९ सालची गोष्ट. कै. तात्यांनी, महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नोकरीस न जाता वनवासींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह काढण्याची कल्पना मांडली. मी होकार भरला. पुण्याला जाऊन योजना केली. दामुअण्णांना भेटलो आणि अकोल्यात येऊन विद्यार्थी वसतिगृहाची माझ्या घरात टाकळकर वाड्यात स्थापना केली. महाराष्ट्र वनवासी कल्याण आश्रम नंतर रजिस्टर झालं. जशपूर नगरची माहिती घेऊन कामाला सुरुवात केली. ८३ पर्यंत मी या कामात झोकून काम केलं. नंतर मात्र माझ्या पत्नीच्या डोळ्यांचा प्रश्न निर्माण झाला. काय काय घडले. मी त्या कामातून दूर झालो. दामुअण्णा या सर्व परीक्षेच्या काळात पाठीशी होते. ८५ साली नगरमध्ये आलो आणि आता वनवासींच्या संदर्भात काय करावे? असा विचार करता, अभ्यास आणि अनुभवातून भ्रमंतीतून आणि कामातून, वनवासींच्या जीवनाला ,माझ्यातील किंचित प्रतिभावंताला लिहिते केले. डांगाणी आणि अहिनकुल अशा सामाजिक आणि ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. संभाजीनगरच्या परिमल प्रकाशनाने त्या प्रसिद्ध केल्या. तात्या गेले होते. दामुअण्णांना भेटलो. 'अहिनकुल' ही आदिवासींनी (वनवासींनी) १८२७ ते ३५ च्या काळात केलेल्या स्वातंत्र्य लढ्याची हकिकत सांगणारी ऐतिहासिक कादंबरी दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांचे पूजन घडावे, गौरव व्हावा अशी इच्छा व्यक्त केली. पू. सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांचा प्रवास अनायासे घडत होता. त्यांच्या शुभहस्ते ग्रंथ विमोचन व्हावे आणि आम्हा उभयतांना पूजन करता यावे असा हट्ट धरला. दामुअण्णांनी तो हट्ट पुरविण्याचे मान्य केले. पू. सरसंघचालक बाळासाहेब देवरसांनी ग्रंथ विमोचन तर केलेच तथापि दामुअण्णांचा महावस्त्र घालून गौरव

केला. कै. तात्यांच्या (भार्गवराम तथा तात्या बापट) प्रतिमेचे पूजन केले. मी कृतकृत्य झालो.

अगदी अलीकडची गोष्ट. समसरता साहित्य परिषदेच्या निमित्ताने मला कार्यात पुन्हा ओढण्याची त्यांची युक्ती सतत जाणवत होती. याच सुमारास आमच्या मातोश्री खूप आजारी असल्याचे आणि त्या नगर मुक्कामी असल्याचे कळले. दामुअण्णा आता खूपच व्यापात होते तरीसुद्धा संभाजीनगर-पुणे प्रवासात त्यांनी आईला भेटण्याचे ठरविले. तासभरच पण दामुअण्णा आमच्या घरी आले. आईला विलक्षण आनंद झाला. ते आईची विचारपूस करावयास आले तर आईने त्याही परिस्थितीत त्यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. स्वतःच्या हाताने केलेले थालीपीठ दामुअण्णांना खायला लावले. काही दिवसांनी आई गेली आणि आता दामुअण्णाही गेले. माणसे जोडणारा, माणसे घडविणारा आणि राष्ट्रीय जिव्हाळ्याने त्यांना कामात सामावणारा निरलस कार्यकर्ता काळाच्या ओघात अमर झाला. चंदनाचा वृक्ष बहरला. सुगंध चिरंतनासाठी दरवळत आहे.

●●●



# आधारवडातील मूळमाया
## (अयोध्या तथा बाई बन्सीशेठ मुंदडा)

''अनिल शिकवणे जावणार हे, इसो कॅन कै जावे?'' बाई काकांशी बोलत होत्या. मी स्नान आटोपून कॉलेजला जायची तयारी करीत होतो. माई उठून, आवरून, सकाळीच पुणतांब्याला निघून गेली होती. ''अनिल, थांब, हे कपडे घालून जा!'' बाईंनी हाक मारून सांगितले. मला त्यांच्याकडं बोलावले नाहीच. मी ज्या खोलीत होतो तेथे बाई आल्या. त्यांनी माझ्या समोर कपड्याचे बॉक्स ठेवले. आकाशी रंगाचा मॅनेला आणि तशाच थोड्या गर्द रंगाची पँट माझ्या पुढ्यात ठेवली तीवर बेल्ट होता. आश्चर्य म्हणजे सोबत कागदात गुंडाळलेली नवी चप्पलही होती. मी थक्क झालो. काका नि बाई आदल्या दिवशीच कुठल्या गावाहून परतल्या होत्या. मला हा सुखद धक्का होता. मी आज्ञाधारकपणे कपडे घेतले. घालून पाहिले. तंतोतंत माझ्या मापाचे कपडे होते. नेमके मापाचे कपडे बाईंनी आणले कसे? याच्या विचारात मला कॉलेजला जायचंय, माझा आज पाठ आहे; हे सारं मी विसरून गेलो. दगडुभाऊंनी मला चहा आणून दिला. तेव्हां मी भानावर आलो. दगडुभाऊ म्हणजे घरातला हरकाम्या नोकर. मी पटकन चहा घेतला. पाठाचे सामान, आवश्यक वह्यापुस्तकं घेऊन; मी निघालो. काकांच्या आणि बाईंच्या पायावर डोके ठेवून त्यांचा आशीर्वाद घेतला. आज माझा टी.डी.चा पहिलाच पाठ होता. ''नीट जा आणि चांगलं शिकव. असे म्हणतांनाच, तू काय हायस्कुलात लेंगाशर्ट घालून शिकवायला जाणार होतास? आता कसा मास्तर दिसतोय!'' बाई म्हणाल्या. मला संकोचल्यासारखे झाले.

मी माईबरोबर श्रीरामपूरला मुंदडेबाईंकडे राहायला आलो होतो. तीच आमची सोय होती. माईला नोकरी मिळाली होती तरी तरुण मुलगी एकटीच पुणतांब्याला कशी राहणार; हा त्या काळातला गंभीर प्रश्न होताच, पण त्याचबरोबर मला श्रीरामपूरला टीडीला घालण्याचा सल्लाही मुंदडेबाईंनीच दिला होता. आमच्यापुढेही, परगावात जाऊन राहण्याचा सर्वच बाजूने गंभीर प्रश्न होता. माई अकोल्यात, मुंदडेबाईंचे बिऱ्हाड होते तोवर, त्यांच्या रमेश, अशोक, सोमनाथ आणि विजया या चारही एकाखालच्या मुलांच्या शिकवण्या घ्यायला जाई. बाईंना मदतही करे. माई बाईंच्या घरातलीच झाली होती. त्या तिची मुलीसारखी काळजी घेत. या सर्व गोष्टींकडे मुंदडेबाई दोन तऱ्हेने पाहात असत. मुलांना घरी शिकवणी देता येईल आणि गरीब ब्राह्मण कुटुंबाला मदतही होईल. तात्या आणि आईचा गावातला प्रपंच, हा कौतुकाचा विषय होता. त्यामुळेही आम्हाला मदतीचा हात पुढे येई. ह्याच गोष्टींचा विचार करीत मुंदडेबाईंनी मला श्रीरामपूरला घेऊन येण्याचा सल्ला दिला होता. बन्सीशेठजी मुंदडा अर्थात काका नुकतेच श्रीरामपूरला आले होते. नेवासे रोडवर लक्ष्मी इंडस्ट्रीज नावाची ऑईल मिल मधुशेठ बुब आणि काकांनी काढली होती. संगमनेर रोडवरील 'कुऱ्हाडे' बिल्डींगचा एक पूर्ण मजला त्यांनी भाड्याने घेतला होता. स्वयंपाकाला म्हाराज, कामाला दगडुभाऊ, मिलवरची माणसे आडल्या पडल्याला असत. खरंतर आमची परिस्थिती पाहाता मलाही त्यांनी कामाला ठेवले असते तरी मी आनंदाने तयार झालोच असतो. पण ''ब्राह्मण रो छोरी हे, आपलाकणे रेवे तो चोखो रेवे,'' अशी त्यांची धार्मिक धारणा होती. व्यवहारात ब्राह्मणांविषयीचा विद्वेष पसरलेला असतांना आणि ठरवून बामणांना शिव्या घालण्याचा काळ असतांना; मला बाईंचा विचार एक स्मितरेषा वाटे. मला त्यांनी आपला आणखी एक मुलगा, असा सन्मान दिला होता. ह्याचाच एक भाग म्हणजे मला आणलेले कपडे त्या दिवशी मी प्रथम पँट मॅनेला म्हणतात ते प्रतिष्ठेचे कपडे आणि पायाला चप्पल घातली. मनोमनी मी सतत काका बाईंना वंदन करत होतो. मला बळ आले होते. पाठही सातवीवर होता. रंगला. लेसननोटवर 'उत्तम' असा शेरा मिळाला. माझा आनंद गगनात मावेना. एकदम इंद्रपद प्राप्त झाल्यासारखे वाटले. पहिला पाठ तोही उत्तम. पहिलेच कपडे नि चपला तेही नव्याकोऱ्या मी जोरात सायकल मारत कुऱ्हाडे बिल्डींगमध्ये आलो. एव्हाना माईही आली होती. काका मात्र



मिलमध्ये गेलेले होते. मुले घरीच होती. मी बाईंजवळ गेलो. त्यांच्या पायावर डोके ठेवले. त्यांच्या हाती लेसननोट दिली आणि अक्षरशः हमसून रडू लागलो. बाईंनी लेसननोट पाहिली त्यांच्या डोळ्यात पाणी तराळले होते. मला मातृशक्तीचे दर्शन झाले. माईही रडत होती. ''रडत बसू नका'' बाई कडाडल्या. ''शशी त्याला चहा दे'' बाईंनी माईला सांगितले. रात्री मला बराच वेळ झोप लागली नाही.

मला शिळे खायला आवडत नसे, येथपासून; माझ्या आवडीनिवडींकडे बाईंचे लक्ष असे. त्या म्हाराजांना मला गरम फलका वाढायला सांगत आणि दगडुभाऊंनी मला हवं नको ते द्यायला कानकूच केली, तर त्यालाही रागावत. खरेतर पाचसहा जणांचा स्वतःचा प्रपंच. आलेगेले पाहुण्यांची वर्दळ. स्वतःच्या धाकट्या भावाला अर्थात शामशेठनाही स्वतःकडे ठेवून घेतलेले. त्यांना उभे करण्यासाठीची धडपड. धाकटी बहीण आजारी. संगमनेरहून तीही श्रीरामपूरला काही दिवसांसाठी आलेली. तिचे पथ्यपाणी, डॉक्टर तपासणी पाहायची. बन्सीशेठजींचा आतेभाऊ भानुशेठ त्यांनाही उभे करण्यासाठी श्रीरामपूरला आणलेलं. त्यांची सगळी सावर करणं. यासह घरातले सर्व व्यवहार; बाई न कंटाळता, न चिडता करीत याचं मला आश्चर्यच वाटे. वास्तविक बाईंना डोळ्यांनी काहीच दिसत नव्हतं. तरी भगवान सहस्ररश्मींप्रमाणे त्यांची नजर सर्वांवर असे. करडी आणि स्नेहाळ. बाई अशा आधारवडाच्या खानदानी श्रीमंतीत वावरत होत्या.

मी सतरा अठरा वर्षांचा. नुकताच पंख फडफडून व्यवहाराच्या अवकाशात सुळकांड्या मारण्यासाठी धडपडणारा. तरीही बाईंमध्ये असलेल्या धारणाशक्तीचा दिव्य अनुभव मनाला स्पर्श होई. मन थक्क होई. पण मन संकोच करी. बाईंच्या मुलांच्या बरोबरीने वागायला मिळावे हे मला अपराधीपणाचे वाटे. सातवी आठवीच्या वर्गात असल्यापासूनच काहीतरी कष्ट करून मगच स्वतःचा, शिक्षणाचा विचार करण्याचे बाळकडू आईकडून मिळालेले. वर्तमानपत्र टाकण्यापासून, जेवणाचे डबे पोचविण्यापर्यंत, पाणी वाटण्यापर्यंत कामे करण्याची सवय. वाटेल ते कष्ट करीन पण शिकेन ही जिद्द! येथे तर सगळेच उलटे झाले. माई कष्ट करीत होती. तिचीही बडदास्त बाई ठेवीत होत्या आणि माझीही! मन अस्वस्थ झाले. पहिले एकदोन महिने नाईलाज होता. माईचा पगार सुरू झाला नव्हता. जाणेयेणे आणि सारेच ती सोसत होती. त्यामुळे मनाचे

अपराधीपण वाढत होते. हळूहळू मी माईजवळ भुणभुण करू लागलो. नकळत ते बाईंपर्यंत पोचले. बाई म्हणाल्या, ''अनिल तू कसला विचार करू नकोस. शिक्षणाकडे लक्ष दे. पुढे तुलाच सगळं पाहायचंय.'' मी मान डोलावली पण मन ऐकायला तयार नव्हतं. मी माईला म्हणालो, ''माई, तू जाऊन येऊन नोकरी करून थकून जातेस. मला नाही सहन होत. आपण खोली घेऊन पुणतांब्याला राहू. मी येऊन जाऊन करीन.'' माईला ते पटत नव्हते असे नाही. ती बाईंजवळ विचारविनिमय करी; पण बाई पुन्हा तिला म्हणत, ''शशी हे बघ, हे सोपं आहे का? खोली भाडं, स्वयंपाक डबा यांचा प्रश्न, त्याच्या पासचा खर्च. आणि दोघच राह्यचं तरी काय लागत नाही. मग तू अकोल्याला काय पाठवणार. इथे चार माणसात कसंही निभावतं. जाईल वर्ष निघून. तुला पर्मनंट नोकरी लागली की मग पाहता येईल. त्यात तू नाही म्हटलं तरी एकटीच राहणार. अनिल तसा अजून लहान. हे बघ तुला संकोचच वाटत असेल तर तू तुझा पगार माझ्याकडे दे, मी बघीन काय करायचं ते.'' तसाही माईने बाईंच्याच हातात आलेला पगार दिला होता. बाईंनी हातोपाती अकोल्याला पैसे पोच केले होते. माई बाईंपुढे काय बोलणार. बाईंचं बोलणं सांगणं हे अगदीच व्यवहारी होतं. तेव्हढंच निरपेक्ष प्रेमानं होतं.

माझी भुणभुण सुरू होती. बाईंनी दोनचार वेळा समजावून सांगितलं. अखेर बाईंनी माझे मन समजावून घेतले. माई माझ्यापेक्षा सहा वर्षांनी मोठी. कालानुरूप विचार करता लग्नाचं वय केव्हाच होऊन गेलं होतं. पण तात्या आईच्या प्रपंचगाड्याचा जू तिनं मानेवर घेतला होता. माझ्या विचाराचं बाईंना कौतुक वाटलं. अखेर त्यांनी आम्हाला पुणतांब्याला राहाण्याची परवानगी दिली. पण बाईंनी मला केव्हढ्यातरी अटी घातल्या. वेळेवर यायचं जायचं, अभ्यास नेटानं करायचा, इथून रेशनचं सगळं सामान घेऊन जायचं, मला प्रत्येक गोष्ट सांगायची, एक ना अनेक. व्यावहारिक व्यवस्थापनाचा एव्हढा काटेकोर धडा मला बाईंकडूनच मिळत होता.

आम्ही पुणतांब्याला एका खोलीत राहू लागलो. बाईंचे घारीसारखे लक्ष माझ्यावर आणि माईवर होते. माझ्या मनासारखे घडले होते. माझा संकोच निघून गेला होता. नकळत माझ्यावर काही न कमावताही, कर्त्या माणसाची जबाबदारी, बाईंनी टाकली होती. माझे दुहेरी शिक्षण होऊ लागले. मी ही चुकूनही, बाईंच्या तीक्ष्ण तरी स्नेहाळ नजरेला चुकविण्याचा प्रयत्न



केला नाही. रविवारी मी आणि माई बाईंकडे येत असू. त्यावेळी आमची झाडाझडती अपसूकच होई. असे सुटीपुरते येणे मला आणि नंतर माईलाही मोकळेपणाचे आणि आनंदाचे वाटू लागले. बाईही समाधान व्यक्त करू लागल्या.

माझे पाठाच्या निमित्ताने शिकवणे पाहून, एका शिक्षकाने मला त्याच्या मुलाची आणि त्याच्याबरोबर आणखी पाचसहा मुलांची शिकवणी देऊ केली होती. मी बाईंना विचारले. त्यांनी, जाणेयेणे आदि सर्व गोष्टींचा हिशेब बांधला. माईही पुणतांब्याला चारसहा शिकवण्या खोलीवर करीत असे. एकूण वेळ आणि अन्य गोष्टींचा विचार करून बाईंनी परवानगी दिली. तसे कुऱ्हाडे बिल्डींगच्या मागच्याच भागात ह्या शिक्षकांच्या घरी शिकवणी घ्यायची. कॉलेज पाठ यातून वेळ काढता थोडी धावपळ होऊ लागली. जेमतेम दोन महिने शिकवण्या केल्या. सोडवेना. बाईंनी एकंदर विचार करून सोडून देण्याचे फर्मानच काढले व मग पुन्हा पूर्ववत सुरू झाले.

पुढे मार्चमध्येच मला अकोल्यात माझ्याच शाळेत, रजेच्या मुदतीत नोकरी मिळाली. मी अकोल्याला आलो. रजा घेऊन परीक्षेपुरता गेलो. मुंदडे बाईंना विलक्षण आनंद झाला. त्यांनी माझ्या लहरीप्रमाणे सारेकाही कौतुकाने सांभाळून घेतले. तोच मे च्या सुट्टीत माईचे लग्न झाले. म्हणजे योग आला. हिय्या करून घडवून आणले. सौ. अयोध्याबाई मुंदडे आणि बन्सीशेठ अर्थात काका भक्कमपणे पाठीशी होते. बाईंनी मला पुढच्या जबाबदारीची जाणीव करून दिली. मी गंभीर झालो.

पुढे फारसे जाणे येणे झाले नाही. कुशल कळत होते. बाई अकोल्याला आल्या की येऊन जात. विचारपूस करीत. कौतुक करीत, तसे मार्गदर्शनही करीत. माझ्या लग्नानंतर अशाच त्या एकदा आल्या. सौ. उषाने दर्शन घेतले. तिच्या देखतच बाई म्हणाल्या, ''काय रे, आता शिळे खातो की नाही!'' उषाला काहीच कळले नाही. बोलणे तऱ्हेवाईक वाटले. जेव्हा इतिहास कळला तेव्हां, आलेले हसू आवरता येईना.

आणीबाणीत काकांना जेलमध्ये डांबले होते. काका संघचालक होते. मारवाडी, व्यापारी, कारखानदार काकांच्या या धीरोदात्त अयोध्येने ज्या तऱ्हेने प्रसंगाला तोंड दिले त्याला तोड नाही. 'अयोध्या' नाव सार्थ झाले.

मध्येच एकदा मी डॉ. देवदत्त रानड्यांबरोबर श्रीरामपूरला गेलो. स्कूटरवर.

जातांना मी रानड्यांना म्हणालो, ''माझे एक घर श्रीरामपूरमध्ये आहे.'' त्यांना साठ्ये सरांचे आणि माझे संबंध माहीत होते. म्हणाले, ''साठ्ये सर ना जाऊ ना मग!'' मी म्हणालो, ''नाही!'' ''आं मग आणखी कोण?'' रानड्यांनी विचारले. ''थांबा सांगतो'' मी म्हणालो. आमचे ठरलेले काम संपल्यावर मी रानड्यांना नेवासा रोडने निघायला सांगितले. 'राम इंडस्ट्रीज' लागल्यावर मी म्हणालो, ''आपल्याला राम इंडस्ट्रीत जायचे आहे.'' गेलो. ऑईल मिलच्या कार्यालयात गेलो. काका होते. पायावर डोके ठेवले. रानडे पाहात होते. मी रानड्यांची ओळख करून दिली. ''बाईला भेटलास का?'' काकांनी विचारले. ''जातांना रस्त्यातच आहे ना, भेटतो!'' मी म्हणालो. ''जेवण करून जा'' काका म्हणाले. ''नको नको, उशीर होईल.'' मी म्हणालो. काका काही बोलले नाहीत. त्यांनी स्वतः फिरून आम्हाला ऑईल मिल, डाळ मिल दाखविली. चहा झाला. आम्ही निघालो. ''मी येतोच आहे. मी येईपर्यंत जाऊ नका'' काका म्हणाले. आम्ही निघालो. पाटाच्या पलिकडे 'सार्वमत' ऑफिस जवळच्या 'अयोध्या' बिल्डींगमध्ये पोहोचलो. घरात प्रवेश केला आणि बाई कडाडल्या, ''का रे फार शहाणा झालास का? काकांना जेऊन जात नाही म्हणालास? किती वेळात जायचंय. चल लगेच जेवायला बसा.'' बाईंचा तो आविर्भाव पाहून रानडे थक्क झाला. माझी नाही म्हणायची हिंमतच नव्हती. मी ओळख करून दिली. जेवायला बसलो. घरातल्या तीनही सुना वाढायला उभ्या होत्या. काही औरच थाट होता. रानडे जेवणापेक्षा सारे पाहूनच थक्क झाला होता. जेवण संपता संपता काका आले. ''कारे, बाईनी सांगितल्याशिवाय जेवायचं नव्हतं का?'' मी काय बोलणार. आम्ही निरोप घेऊन निघालो. रानडेने स्कुटर काढली. मी आता बसणार तोच काकांनी जवळ बोलावलं. ते माझ्याशी काही बोलले. मी होकार भरला. निघालो. रानडेला चैन पडेना. ''का हो काय म्हणाले?'' त्याने उत्सुकतेने विचारले. मी म्हणालो, ''काही नाही. जपून जा म्हणाले.''

●●●



# सन्मित्र पाठीराखा
## (डॉ. चं. प्र. देशपांडे)

पावसाळ्याचे दिवस होते. प्रवरेला पूर होता. नाव बंद करतील कदाचित, अशी वेळ होती. मी, सर्दीखोकला, अंगात कसकस घेऊनच दवाखान्यात पोचलो होतो. बहुधा तापही असावा. थंडीही वाजत होती. डॉक्टर नव्हते. सुधाताई होत्या. त्याही काही पेशन्टना औषधे देत होत्या. ''बस, अनिल, अरे डॉक्टर गर्दनीला गेलेत. गेलेत पहाटेच. एव्हाना यायला हवे होते. येतीलच.'' मी काही विचारायच्या आतच सुधाताईंनी सांगितले. तेव्हढ्यात मोटारसायकलचा आवाज आला. डॉ. चंद्रशेखर देशपांडे दारात उभे होते. त्यांनी मला पाहिले. ''काय रे आज शाळेत नाही गेलास?'' डॉक्टरांनी विचारले. ''कुठं गर्दनीला गेला होतां?'' उलट मीच विचारले. ''अरे, कुऱ्हाडीने पाठीत घाव घातले होते. तो भागा काळोखातच नदीतून पेट्यावर पोहत आला. मग जावेच लागले.'' डॉक्टर म्हणाले, ''अहो पण नाव नसती तर?'' ''त्याने पेटा आणला होता. आपण गेलो असतो!'' डॉक्टर आत्मविश्वासानं म्हणाले. मी समजलो.

डॉक्टरांचे धाडशी पराक्रम मी अनेकांच्या तोंडून ऐकले होते. पोहणे, पळणे, बिकट वाटेत मोटारसायकल घालणे, प्रसंगी वाघ, लांडगे यांना गुंगारा देणे, समोर प्रतिकार करणे, दारूड्यांना, गुंडांना चोपणे नि काय काय! प्रत्यक्ष काही प्रसंगांचा मी साक्षी झालेलो आहे. अकोले पंचक्रोशीत डॉक्टर देशपांडे यांच्याविषयीच्या अनेक दंतकथा सांगितल्या जातात. धाडशी, पोलादी आणि रुग्णसेवा तत्पर वैद्य! त्यांच्या दवाखान्यात नवनवीन सुविधा कराव्यात. प्रसंगी

तेथेच जमेल तशी सोय करून पेशंट, डिलेव्हरी पेशन्ट ॲडमिट करावेत. आणि अक्षरशः प्रसंगाशी झुंज देऊन; पेशंटला वाचवण्याची शर्थ करावी. गॅस्ट्रोसारख्या साथीमध्ये, स्वतःला केवळ तासदोनतासाच्या विश्रांतीवर भागवावे. काळ बदलत होता. त्याबरोबर साधनं बदलत होती. नवी साधने डॉक्टर लगेचच स्वप्रज्ञेनं आत्मसात करून वापरीत. काळाबरोबर वाटचाल करीत. रुग्णसेवाधर्म व्रतस्थतेने पाळणारा हा वैद्यडॉक्टर, लोक होऊन; लोकधुरीणपणे वावरत होता. आदिवासी भागातील, तालुक्याचे ठिकाण असलेल्या अकोलेसारख्या पाचसहा हजार वस्तीच्या गावात, शहरातून येऊन कायम राहण्याचा निर्णय घेऊन; नेटानं त्या गावचं गावकरी होणं; ही सोपी गोष्ट नव्हती. अनेकांना, अनेक कुटुंबांना डॉक्टर आपले कुटुंबसदस्य वाटत. एव्हढेच काय देव वाटत.

डॉ. चंद्रशेखर देशपांडे अकोल्यात आले. अकोले तालुका कम्युनिस्टांचा बालेकिल्ला. आदिवासीबहुल. पुरोगामी म्हणवणारा, डावा, चळवळ्या! अशा गावात एखाद्या ब्राह्मण माणसाने धैर्याने स्वतंत्र व्यवसाय करणे, सुप्रतिष्ठित होणे कठीण होते. पण डॉ. देशपांडे चं. प्र. यांच्या जवळ अपमान आणि प्रसंगी नुकसान सोसून निष्ठेने स्वस्वीकृत काम करण्याची निष्ठा आणि धमक होती. १९५७-५८ च्या काळात डॉ. चं. प्र. देशपांडे यांच्यावर रा. स्व. संघाच्या तालुका संघचालक पदाची जबाबदारी आली. त्यांनी ती स्वीकारली आणि अखेरपर्यंत निभावली. हे सोपे नव्हते. 'असु आम्ही सुखाने पथ्थर पायातील । मंदिर उभवणे हेच आमुचे शील' या पद्यपंक्तीचा वस्तुपाठ चं.प्रं.नी दिला. मी ६०-६१ मध्ये श्री. प्र. अ. साठ्ये सर आणि संगमनेर-अकोले तालुका प्रचारक पू. दामुअण्णा दाते यांच्या सहवासात आल्याने; संघाच्या शाखेत जाऊ लागलो. पहिलीपासून सातवीपर्यंत मी राष्ट्र सेवा दलात जात होतो. मुख्य शिक्षक होतो, बालांचा. संघाच्या शाखेवर थोड्याच दिवसात मुख्य शिक्षकाची जबाबदारी टाकली. १४-१५ वर्षांचा मी संघशाखेवर मुख्य शिक्षक म्हणून वावरू लागलो. तेव्हापासून मा. संघचालक डॉ. चं. प्रं.चा परिचय. आमच्या घरचे अठराविश्वे दारिद्र्य. आई जेवणाचे डबे करून देई. घागरीने पाणी नदीवरून वाहण्याचे काम आम्ही बहीण-भावंडे करीत असू. आणि काय काय. असे असूनही आई सामाजिक कार्यात रस घेई. महिलामंडळ, प्रौढ शिक्षण आणि समाजशिक्षण योजना या अंतर्गत तिचे कार्य चालू असे. मुळात क्रांतीकारक अनंत कान्हेऱ्यांच्या चळवळीत तिने काम केले होते.



राष्ट्रीय जाणीव, संघ-समितीचे कार्य तिला नुसते ज्ञात नव्हते तर तिचा त्याशी संबंध होता. त्यामुळे मी संघात जातो. मुख्य शिक्षक झालो. संघ प्रचारकांची उठबस आमच्या घरी होऊ लागली याचा तिला आनंद वाटे. त्यात 'तरुण-भारत' नावाचे संघाचे मुखपत्र सुरू झाले. डॉ. चं.प्रं.नी मला 'तरुण भारत' टाकत जा, संघकार्यही होईल आणि पैसेही मिळतील असे सांगितले. संघचालकच सांगताहेत म्हटल्यावर मी 'तरुण भारत' टाकू लागलो. प्रथम पाच अंक होते. त्याचे वीस अंकापर्यंत डॉ. चं.प्र. आणि समाजकल्याणचे कश्यपसाहेब यांनी पोचवले. मी नित्याने सायं. ६ ते ७ संघशाखा घेत असे. एप्रिलमध्ये परीक्षा आणि मे ची पुढे सुट्टी. त्याच सुमारास, या संघमंडळींनी, मी संघ शिक्षा वर्ग करावा असे ठरविले. ''संघ शिक्षा वर्गाला जातोस का?'' मला विचारले. पद्माकर जोशी कार्यवाह होते. त्यांनी आग्रह धरला. मी आईला विचारले. आई म्हणाली, ''जायला काही हरकत नाही. पण त्यासाठी पैसे जमवावे लागतील.'' त्या काळात पैसे जमवणे अगदीच कठीण. संघ शिक्षा वर्ग पुण्याला असतो. मी माझ्या बाल प्रवृत्तीप्रमाणे पुण्याला जायला हुरावलो. तरीदेखील गप्पच राहिलो. परीक्षा संपली. पद्माकर जोशी मला डॉ. चं. प्र. देशपांडे यांच्या घरी घेऊन गेले. दामुअण्णा दातेही आलेले होते. डॉ. चं.प्र. म्हणाले, ''अनिल, संघ शिक्षा वर्गाची तयारी कर. दामुअण्णा तयारी करून घेतील.'' ''पण... पण..'' मी जरा अडखळतोय असे पाहाता, ''तू फक्त जायची तयारी कर. बाकी आईतात्यांची परवानगी वगैरे आम्ही सगळे पाहू.'' डॉक्टर म्हणाले. मी संघ शिक्षा वर्गाला गेलो.

मी शाळेत शिक्षक झालो त्यावेळी डॉ. चं. प्र. देशपांडे यांचा आमच्या 'मॉडर्न हायस्कूल, अकोले' या शाळेच्या स्थानिक व्यवस्थापन समितीमध्ये सदस्य म्हणून प्रवेश झालेला होता. फॅमिली डॉक्टर, मा. संघचालक आणि शाळा समिती सदस्य म्हणून डॉ. चं. प्र. देशपांडे मला अधिकच आदरणीय झाले. स्वाभाविकपणे मी त्यांच्याबरोबर संघाच्या कामातही रस घेऊ लागलो. शाळकरी अनिलचा सहस्रबुद्धे सर झालो. या परिवर्तनाबरोबरच डॉ. चं. प्र. देशपांडे यांच्या आणि माझ्या नात्यात परिवर्तन झाले. आम्ही चांगले मित्र झालो. माझी शैक्षणिक प्रगती त्यांना विशेष कौतुकास्पद वाटे. त्याहीपेक्षा माझ्या नाट्यक्षेत्रातील गतीचे त्यांना विशेष कौतुक वाटे. पाहाता पाहाता हौशी नाटक मंडळी निर्माण झाली. माझा अभिनय, नाटकाचे अभिवाचन, सांस्कृतिक

कार्यक्रमांची जाण या सगळ्या गोष्टीमुळे ही सगळी मंडळी विशेष आकर्षित झाली; पण त्याहीपेक्षा नाट्यदिग्दर्शनाचे माझे ज्ञान आणि कौशल्य, विशेषतः डॉ. देशपांडे यांना अलौकिक वाटे. जवळपास पंचवीसावर नाटके मी दिग्दर्शित केली. त्याचवेळी त्यात भूमिकाही केल्या. डॉ. चं. प्र. देशपांडे आणि त्या सौ. सुधा देशपांडे दोघेही नाटकाचे शौकिन. त्यांच्या व्यवसायाच्या व्यग्रतेतून ते नाटकासाठी वेळ काढत. तो एक वेगळा इतिहासाचा विषय आहे. यात गमतीचा भाग म्हणजे दिग्दर्शन करतांना अनेकदा निरनिराळ्या भूमिकांचे संवाद साभिनय म्हणून दाखवावे लागत. डॉ. देशपांडे माझ्या या कौशल्यावर अक्षरशः फिदा झालेले. अनेकदा त्यांनी मला त्यांच्या भूमिकांचे संवाद वारंवार म्हणायला लावलेले आहेत. त्यांचे स्वतःचे स्वतःविषयीचे समाधान होत नाही तोपर्यंत ते हट्ट सोडीत नसत. 'अश्रुंची झाले फुले' मधील विद्यानंदचे संवाद त्यांनी मला कितीवेळा साभिनय म्हणून दाखवायला लावले असतील! शेवटी सौ. सुधाताई म्हणायच्या, ''आता पुरे झालं, तुमचे तुम्ही करा!'' त्यावेळी माझी सुटका व्हायची.

डॉ. चं.प्रं.ना जसे नाटकाचे वेड तसेच खेळाचे वेड. त्यांच्या कामाच्या रामरगाड्यातून वेळ काढून ते पाचच्या सुमारास शाळेत येत आणि रिकामे दिसतील त्यांच्याबरोबर विशेषतः रिंग टेनिस खेळू लागत. अकोल्यात होमगार्डची स्कीम आली आणि डॉ. चं. प्र. देशपांडे होमगार्ड कमांडंटही झाले. या त्यांच्या गोष्टीतही ते अनेकदा अक्षरशः बळजबरीने मला आणि माझ्या मित्रांना खेचून नेत असत.

मी एम.ए. झालो याचे त्यांना विलक्षण कौतुक. पुढच्याक्षणी मी प्राध्यापक व्हायला हवे असा त्यांनी आग्रहच धरला. मला तर पीएच.डी. करायचे होते. तोवर माझे लग्न झालेले होते. आईवडील आणि दोन भावंडे यांची जबाबदारी होती. मी डॉ. चं. प्रं.ना समजावून सांगितले; तेव्हा त्यांनी नुकत्याच शाळेत सुरू झालेल्या ज्युनिअर कॉलेजचा आग्रह धरला. त्याला यश आले. या सगळ्या प्रवासात आमचे संघाचे काम कुठेही थांबले नव्हते पण...

आणीबाणी जाहीर झाली. अकोले तालुक्यातील काँग्रेस आणि कम्युनिस्टेतर प्रमुख चळवळ्यांची यादी तयार झाली. अचानक डॉ. चं. प्र. देशपांडे यांना पकडले आणि तुरुंगात डांबले. समाज, संस्कृती, देव, देश आणि धर्म यावर राष्ट्रीय जाणिवेसह समर्पित भावनेने प्रेम आणि कार्य करणाऱ्यांचा, एव्हढा घोर अपमान, इतिहासात कोणीही केला नसेल! त्यात सौ. सुधाताईंना केवढे भोगावे लागले असेल? हा तर स्वतंत्र ग्रंथाचा विषय आहे. संघाचे शाखाकार्य थांबले. मीही बेडींग बांधून तयार ठेवले होते. कार्यकर्त्यांच्या धीरोदात्ततेचा परिचय या काळात घडला. एकीकडे माझे पीएच.डी.ही सुरू होते. डॉ. चं. प्र. देशपांडे एकोणीस महिने ''परं वैभवम् ने तुमेत्वत् स्वराष्ट्रम्'' म्हणत तुरुंगात समाधिस्त होते.

आणीबाणी उठली. तुरुंगवास संपला. संघ कार्यकर्त्यांना बरे दिवस आले. राजकीय वर्दळ अगदी डॉ. चं. प्र. देशपांडे यांचेकडेही वाढली. मला आठवतं प्रमोदजी महाजन आले होते. त्यांनी सभा घ्यायचे ठरविले होते. गांधी चौकात सभा घ्यायची. नियोजन शून्य. डॉ. चं. प्र. देशपांड्यांकडे प्रमोदजी थांबलेले. मा. संघचालक असल्यामुळे डॉक्टरांना खूप मर्यादा होत्या. त्यांनी मला आणि श्री. अशोक रसाळ यांना बोलावले. आणखी एकदोघे कार्यकर्ते. पण करायचे कसे? मला तंत्र माहीत होते; हे डॉक्टरांना माहीत होते. मी आणि यशवंत देशमुख टी.डी.ला श्रीरामपूरला असतांना सूर्यभान पाटील वहाडण्यांच्या अशा सभा १९६५ मध्ये केल्या होत्या. डॉक्टरांनी माझ्यावर कामगिरी सोपवली. डॉक्टरांचा दवाखाना आणि घर चौकातच ग्रामपंचायत कार्यालयासमोर. मी आणि अशोक गेलो. चहाच्या हॉटेलमधून एक मोठे बाकडे आणून चौकात मांडले. त्याच हॉटेलमधला एक टेबल समोर मांडला. बस् सभेची तयारी एव्हढीच. सर चौकात बाकड्यावर बसून काय करतात; म्हणून आजूबाजूच्या नजरांत कुतुहल चमकले. अशोकशेजारी मी बसलेलो. उभा राहिलो. जोरात ओरडलो, ''आत्ता, या ठिकाणी, गांधी चौकात भाजपचे नेते प्रमोदजी महाजन यांची जाहीर सभा होणार आहे. सर्वांनी हजारोंच्या संख्येने चौकात उपस्थित व्हावे. काही क्षणातच प्रमोदजी सभास्थानी येत आहेत.'' माझा आरड ऐकून सातआठदहा जण समोर गंमत पाहायला जमले. काही लोक काय भानगड आहे म्हणून आपापल्या दारात, गॅलरीत आले. मग अशोक आणि एकदोघे कार्यकर्ते टेबलाच्या समोर अर्थात चौकात बसले. ''मी पुन्हा म्हणालो, प्रमोदजी येत आहेत आपण टाळ्या वाजवून त्यांचे स्वागत करू.'' प्रमोदजी याचीच वाट पाहात होते. मोठ्या डौलात जणू हजारो लोकांतून वाट काढीत ते आले. मी त्यांचे स्वागत करून त्यांना

बसवले. त्यांचा परिचय करून दिला. प्रमोदजी उभे राहिले. बोलायला सुरुवात केली. समोर बसलेले फक्त तिघे. पाहाता पाहाता चार, पाच सात, पन्नास लोक समोर बसले. आजूबाजूला जाणारे-येणारे थांबले. गारूड्याचा खेळ पाहायला थांबावे तसे. प्रमोदजींनी खरंच गारूड केलं. भाषण सुरू असतांनाच सरपंच नारायणराव ताजणे येतांना दिसले. मी मधेच प्रमोदजींना थांबवीत म्हणालो, ''आपल्या गावचे सरपंच नारायणराव ताजणे येत आहेत, त्यांनी अध्यक्षस्थानी विराजमान व्हावं''. नारायणरावांचा नाईलाज होता. ते आले. त्याच बाकड्यावर बसले आणि रंगूनच गेले. आश्चर्य म्हणजे सभा संपताना मी उगाच घोषणा केली ''आत्ताच्या आत्ता भाजप अकोले शाखेची स्थापना ग्रामपंचायतच्या हॉलमध्ये होणार आहे. सर्वांनी वर हॉलमध्ये मिटींगला यावे.'' पाचपंचवीस थेट वर आलेही आणि नारायणरावांना अकोले भाजपचे अध्यक्ष करून स्थापना झाली. मग डॉ. देशपांड्यांच्या दवाखान्यात प्रमोदजींसह आम्ही जमलो. चहापान झाले. हे नाट्य दवाखान्यातून बसल्या बसल्या डॉक्टर पाहात होते. त्यांना विस्मय आणि आनंद झाला होता. ''अनिल, यार तू कमाल केलीस!'' डॉ. चं. प्र. म्हणाले. प्रमोदजींनी तर पाठीवर थाप मारली.

रा. स्व. संघाच्या राष्ट्रनिर्माण कार्यात असा डॉ. चं. प्रं.चा मोठा वाटा. सुखात आणि दुःखात, यश आणि अपयशात ते सतत पाठीशी राहिले. पुढे मी नगर मुक्कामी डेरेदाखल झाल्यानंतर माझ्या आईवडिलांकडे कोण पाहणार प्रश्न होता. विशेषतः वडील वातविकाराने आजारी असत. ''अनिल मी येथे आहे. बाकी कोणी काही सांगितले तरी मी सांगितल्याशिवाय गडबड करायची नाही.'' डॉक्टरांनी मला समजावले आणि ते खरोखरीच मुलाच्या भूमिकेने शेवटपर्यंत निभावले.

●●●



# वात्सल्यरूप संस्थाचालक

## (त्र्यं. वि. तथा नानासाहेब निसळ)

पू. त्र्यं. वि. तथा नानासाहेब निसळ यांच्या पायाभूत योगदानाने नगरमध्ये स्थापन झालेली 'हिंद सेवा मंडळ' ही शिक्षण संस्था बहरली. अक्षरशः शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची हजारो कुटुंबे, या गांधीवादी, स्वातंत्र्यसैनिकाने उभी केली, वाढवली. त्यांच्या सुखदुःखात सहभागी होत, आईच्या ममतेने सांभाळली. १९५०-५१ मध्ये अकोले येथील 'मॉडर्न हायस्कूल'ची स्थापना झाली; तेव्हांपासून शाळेच्या निमित्ताने नानासाहेब अकोल्यात येत असत. शुभ्र धोतर, सदरा, पांढुरका कोट, डोक्यावर गांधी टोपी अशा साध्या वेशातला हा सहा फूट उंचीचा, संस्थेच्या सर्व जबाबदाऱ्या सांभाळणारा कार्यकर्ता, करारी, मूल्यप्रिय, कडक तेव्हढाच मायाळू माणूस होता. त्यांच्याविषयीच्या मिथ्स हिंद सेवा मंडळ परिवारात प्रचलित आहेत. हे जग सोडून पंचवीस वर्षे उलटली तरी त्यांची कार्यशैली आजही, स्मृतीपटलावरून हालत नाही. नानासाहेब, तात्यासाहेब डॉ. श्रीराम रानडे (मोठे सर्जन, नगरचे कर्ते व्यक्तिमत्त्व) आणि झुंबरशेठजी सारडा यांच्या उल्लेखाशिवाय नानासाहेबांचे हिंद सेवा मंडळातील कर्ते विभूतिमत्त्व पूर्ण होत नाही. मी विद्यार्थी म्हणून १९६० मध्ये मॉडर्न हायस्कूल, अकोलेमध्ये इ. ८ वीचा विद्यार्थी म्हणून दाखल झालो. पुढे १९६५ मध्ये शिक्षक म्हणून नियुक्त झालो तेव्हांपासून हे विभूतिमत्त्व अनुभवू लागलो. अहमदनगर शहराचा चालताबोलता इतिहास, गांधी चळवळीचा ज्ञानकोश, अहमदनगर जिल्ह्याचा वाटाड्या आणि हिंद सेवा मंडळाचा कणा, असे हे व्यक्तिमत्त्व मनाच्या देव्हाऱ्यात साठवत गेलो.

आणीबाणीच्या काळात हिंद सेवा मंडळातील काही शिक्षकांनाही रा. स्व. संघ कार्यामुळे, तुरुंगात डांबले गेले. या परिस्थितीतही या गांधीवादी, काँग्रेस समर्थकाने, या शिक्षकांच्या कुटुंबियांना धीर दिला; एवढेच नव्हे तर; तुरुंगातून सुटका झाल्याबरोबर शाळेत रुजू करून घेतले आणि आकस तर सोडाच; परंतु प्रेमाने त्यांना सांभाळले.

१९७९-८० मध्ये मी 'चाळीसगाव डांगाण परिसर : वाङ्मयीन, सांस्कृतिक आणि भाषिक अभ्यास' या विषयावर पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी संपादन केली. हिंद सेवा मंडळातील कोणा शिक्षकाने प्रथमच पीएच.डी. पदवी प्राप्त केली होती. त्यातही आदिवासी भागात राहून आदिवासींवर पीएच.डी. प्राप्त केली होती. हिंद सेवा मंडळ, हिंद सेवा मंडळाच्या सेवकांची पतपेढी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि हिंद सेवा मंडळाची त्रिमूर्ती नानासाहेब, तात्यासाहेब आणि झुंबरशेठ; या सर्वांना विलक्षण आनंद झाला. पतपेढीच्यावतीने नगरला सत्कार समारंभ आयोजित केला आणि त्रिमूर्तींच्या हस्ते माझा आणि माझे गाईड डॉ. गंगाधर मोरजे यांचा भव्य सत्कार केला. एवढ्या मोठ्या स्वरूपात माझा प्रथमच गौरव होत होता. याप्रसंगी बोलतांना; नानासाहेब, खरेतर कधीही अवाजवी गौरवपूर्ण न बोलणारा माणूस, अतिशय संयतशील माणूस, एकदम म्हणाले, ''डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी आता आपल्या पेमराज सारडा महाविद्यालयात यावं. प्राचार्य व्हावं. त्यांचे अनुकरण अन्य प्राध्यापकांनी, शिक्षकांनी करायला हवं.'' नानासाहेब नुसते बोलून थांबले नाहीत. त्यांनी लगेचच मला पेमराज सारडा महाविद्यालयात कसे बोलावता येईल; याविषयी विचार सुरू केला. मी महाविद्यालयात जाण्याचा विचार करीत असतांनाच; आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करावे आणि राष्ट्रीय बाण्याचे संस्कार त्यांच्यावर करावेत असा विचार पुढे आला. रा. स्व. संघाच्या परिवाराच्या स्वरूपात 'वनवासी कल्याण आश्रम' सुरू करायचे ठरले. मी झोकून देऊन काम करू लागलो. तीन वर्षांत चांगले पन्नास विद्यार्थ्यांसाठीचे वसतिगृह सुरू झाले. मी गुंतत गेलो. तीन वेळा मला नगरला बोलावले. मी नानासाहेबांना भेटून माझा मनोदय सांगितला. ''तुमची मर्जी, पण तुमच्यासारखा माणूस संस्थेला कॉलेजमध्ये हवा आहे.'' एव्हढेच नानासाहेब म्हणत. काळ पुढे सरकला. माझ्या मिसेस, सौ. उषांस डोळ्याचा व्हिटरस हिमरेजचा त्रास झाला. त्यातून बाहेर पडता ८२ साल उजाडले. एक डोळा गेला. संस्थेने, संस्थेतील शिक्षकांनी सर्वप्रकारे मदत केली. प्रचंड कर्ज झाले. मिसेसने बी.एड. केले. त्याही परिस्थितीत नानासाहेबांनी मला आणि माझा प्रपंच उभा करण्यासाठी मिसेसनाही अकोले मॉडर्न हायस्कूलमध्ये शिक्षिका म्हणून घेतले. ८५ ऑक्टोबर उजाडले. कसेबसे कर्ज संपते तो दुसरेच संकट दत्त म्हणून उभे राहिले. मी मॉडर्न हायस्कूलच्या ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये मराठीचा प्राध्यापक होतो. तेथे सरप्लस अर्थात अतिरिक्त झालो. माझा सर्वार्थे नाईलाज होता. मला अकोले सोडणे क्रमप्राप्तच होते.

नानासाहेबांना भेटायला नगरला आलो. नानासाहेब खूपच चिडले होते. माझा अर्ज अक्षरशः फेकून देत म्हणाले, ''तीन तीन वेळा बोलावले आला नाहीत, तुम्हाला वनवासी कल्याण करायचे होते. जा, आता मी काही करू शकत नाही.'' मला कडेलोट झाल्यासारखे वाटले. क्षणभरात १९६५ पासूनचा दारिद्र्याशी फुगड्या घालत केलेला जीवनप्रवास आठवला. बाहेरच्या पायरीवर बसकण मारली. बाहेर कुठे तरी जायचे म्हणजे 'नवी विट्टी नवे राज्य' असे होणार होते. अद्याप कर्जात आकंठ बुडालेला होतो. त्याची निरवानिरव कशी करणार होतो? काही सुचेना. ओक्साबोक्सी रडू लागलो. सोबत अशोक रसाळ अकोले शाळेतला क्लार्क, पण अगदी सख्खा मित्र, धीर देत होता. आत खोलीत नानासाहेब आणि दादा चौधरी विद्यालयाचे हेडमास्तर श्री. जोशी सर आणि शाळांचे शासकीय स्वरूपाची सर्व कामे करून आणणारे कार्यालयीन कर्मचारी रा. वा. जोगळेकर बसले होते. नानासाहेबांनी रसाळला हाक मारली. मला बोलावले. ''आता रडून काय होणार? गेल्याच महिन्यात शाळेतून एका शिक्षिकेची सारडाच्या ज्युनिअरमध्ये बदली केली. आता वर्कलोडचा प्रयत्न. बघा, जा जोगळेकरांबरोबर काही होतं का पहा.'' नानासाहेब कठोरपणे पण आईच्या ममतेने बोलत होते. 'दैव देते नि कर्म नेते' याचा पुरेपूर अनुभव घेत होतो.

सारडा महाविद्यालय आणि भाई सथ्था नाईट ज्युनिअर कॉलेज मिळून कशीबशी वर्कलोडची पूर्तता केली. आशेचा किरण होता पेमराज सारडामधल्या दोन तुकड्यांना गेल्या दोन वर्षांपासून ग्रँट नव्हती. त्यांना ग्रँटवर आणले की प्रश्न सुटणार होता. महत्प्रयासाने नानासाहेबांनी मला संस्थेतून जाऊ दिले नाही. ''नानासाहेब, मी त्या दोन तुकड्यांच्या ग्रँटचं पाहातो. मला फक्त सगळी कागदपत्र द्या.'' मी मनाशी काही ठरवून बोललो. ''तुम्ही काय

करणार?'' नानासाहेबांनी विचारले. ''मंत्री मधुकर पिचड, विरोधक असले तरी; मला चांगले ओळखतात. त्यांच्याकडे जाऊन; मी करून आणतो.'' मी एकदम सांगून टाकले. ''करा. माझा विश्वास नाही. दोन वर्षापासून खटपट सुरू आहे. पण प्रयत्न करायला हरकत नाही.'' नानासाहेब माझी मुद्रा पाहात म्हणाले. मग काय वाटले कोण जाणे संस्थेची तुंबलेली जवळपास पाचसहा प्रकरणे नानासाहेबांनी माझ्याकडे दिली. म्हणाले, ''जा''. आता माझी परीक्षा होती. मला अशा कामांची सवय नव्हती. पण पिचडसाहेबांच्या एका जवळच्या कार्यकर्त्याला बरोबर घेतले. तो माझ्यावर प्रेम करणारा विद्यार्थी होता. धडकलो पिचडांच्या बंगल्यावर. सुदैवाने उत्तम प्रतिसाद मिळाला. अवघ्या दोन दिवसात सर्वच प्रकरणे मार्गी लावल्याचे पत्र घेऊनच मी परतलो. नानासाहेबांच्या हातात पत्रे दिली. पायावर डोके ठेवले, ''आपल्या आशीर्वादानेच हे घडले''. नानासाहेब काही बोलले नाहीत. ''अहो, अशी धडपड संस्थेच्या आणि कॉलेजच्या लोकांनी अगोदरच केली असती तर झाले नसते? पण नुसते बसून राहातात. पत्रव्यवहारानी कामं होत नाहीत. आता काय आम्ही जायचं, या वयात सगळीकडे. नानासाहेब काही देव नाहीत.'' आनंदाने तरी शून्यात पाहात नानासाहेब माझ्याशीच बोलत होते. ''आता तुम्ही या सगळ्यात लक्ष घाला'' नानासाहेब म्हणाले. ''नानासाहेब आपण सांगा मी प्रयत्न करीन.'' मी म्हणालो. आणि मी अवघ्या एक महिन्यात पुन्हा पूर्वपदावर व्यवस्थित संस्थेत ज्युनिअर कॉलेजला काम करू लागलो. सारडा कॉलेजचे प्राचार्य म्हणत, ''प्रॉब्लेम तिथं सहस्रबुद्धे.'' नानासाहेब मला हिंद सेवा मंडळाच्या विविध शाळांविषयीची कामे सांगत. तज्ज्ञ शिक्षक आणि प्राध्यापक म्हणूनही काही कामे असत. ८५ साली ऑक्टोबर महिन्यात मी आलो. एकटाच राहात असे. थोडा मोकळा वेळ मिळत असे. एवढ्या कालावधीत माझी 'डांगाणी' प्रसिद्ध झाली होती. आदिवासींच्या जीवनावरची सामाजिक कादंबरी. पाठोपाठ आदिवासींनी केलेल्या स्वातंत्र्य संग्रामाविषयीची 'अहिनकुल' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. मी ही कादंबरी कृतज्ञतापूर्वक श्री. दामुअण्णा दाते आणि श्री. तात्या बापट यांच्याबरोबरच नानासाहेब, या गांधीवादी चळवळीशी संबंधित स्वातंत्र्य सैनिकालाही अर्पण केली होती. प्रकाशन मा. सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांच्या हस्ते पुण्यात, मोतीबागेत होणार होते. या त्रिमूर्तींनी तेथे यावे असे मला वाटत होते. त्यांच्या विचारात ते शक्य दिसत नव्हते. मी



क्षेत्रीय संघचालक मा. माणिकराव पाटील यांच्याशी विचारविनिमय केला. नेमकी त्याच दिवशी सायंकाळी हिंद सेवा मंडळाची सर्वसाधारण सभा, दादा चौधरी विद्यालयात आयोजित केली होती. मा. माणिकरावांना हिंद सेवा मंडळाच्या कार्यकारिणीत अलिकडे घेतले होते. मा. माणिकराव म्हणाले, ''सकाळी पुण्यात प्रकाशन आहे, संध्याकाळी नगरमध्ये करूया.'' मला हवेच होते. मी नानासाहेबांना म्हणालो. नानासाहेबांनाही, मला सर्व शिक्षक, शिक्षकेतर, पदाधिकारी आणि सभासद यांच्यासमोर आणण्याची संधी वाटली. ठरले. त्याप्रमाणे घडले. माणिकरावांनी पुढाकार घेऊन त्रिमूर्तींचा यथोचित सत्कार केला. नानासाहेबांना माझे किती कौतुक करावे असे झाले. या सर्व गोष्टींचा परिणाम माझ्याकडे संस्थेचा पाहण्याचा दृष्टिकोन आणखी प्रोत्साहक झाला.

मी नगरमध्ये एकटा राहात होतो. नानासाहेबांकडे काही म्हणायची प्राज्ञा नव्हती. मला स्थैर्य दिले होते. अकोले, श्रीरामपूर, मिरजगाव येथून नगरमध्ये येण्यासाठी शिक्षकांची रांग होती. पण नानासाहेब पाहात होते. त्यांनी काहीही न बोलता निर्णय घेतला. मला म्हणाले, ''तुझ्या बायकोला बोलावून घे.'' मी काही न विचारता 'हो' म्हणालो. सौ. उषा मॉडर्न हायस्कूल अकोले येथे शिक्षिका होती. आली. उभयता नानासाहेबांकडे गेलो. त्यांनी आपल्या सूनबाईंशी सौ. उषाची ओळख करून दिली. रा. वा. जोगळेकर भाऊसाहेब आलेले होते. ''हे बघ, उषा, तुझी इथं सीताराम सारडा हायस्कूलमध्ये बदली करतोय. या शाळेत बागडपट्टी आणि रामवाडीतली मुलं असतात, व्रात्य असतात. दहावीला इंग्रजी शिकवावे लागेल, जमेल?'' नानासाहेबांनी विचारले. मी काही बोलत नाही असे पाहून सौ. उषा म्हणाली, ''चालेल, मी शिकवीन.'' मग मी म्हणालो, ''नानासाहेब आपल्याला किंवा संस्थेला खाली पाहावे लागेल असे आम्ही काही करणार नाही.'' मी म्हणालो. ''पाहू'' नानासाहेब नेहमीच्या पद्धतीने म्हणाले. त्यांनी जोगळेकर साहेबांना ऑर्डर काढायला सांगितली. आमचे कुटुंब दोन मुलांसह नगरमध्ये दाखल झाले. आम्हा सर्वांनाच नानासाहेब आता आईवडिलांच्या ठिकाणी वाटू लागले होते.

माझे लेखन सुरू होते. त्यातच १९८७ मध्ये मला 'आदर्श शिक्षक पुरस्कार' मिळाला. १९९१ मध्ये मी 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' हा ग्रंथ लिहिला. संस्थेविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तो ग्रंथ हिंद सेवा मंडळाच्या

त्रिमूर्तीला अर्पण केला. महाविद्यालयात प्रकाशन समारंभ दिमाखदारपणे झाला. नानासाहेबांनी बोलतांना पुन्हा ''डॉ. सहस्रबुद्धेसारखा माणूस या महाविद्यालयाचा प्राचार्य असला पाहिजे'' या त्यांच्या विचारांची पुनरोक्ती केली. तात्यासाहेब आणि झुंबरशेठनीही या विचाराची री ओढली. डॉ. शं. गो. तुळपुळे, डॉ. मु. श्री. कानडे, वसंत दावतर आणि डॉ. गंगाधर मोरजे यांच्या उपस्थितीत समारंभ झाला. याच ग्रंथाला १९९२ साली ज्ञानेश्वरी लेखन सप्तशताब्दीनिमित्त, महाराष्ट्रातील निवडक नऊ विद्वानांमध्ये कांची कामकोटी पीठाचा, जगद्‌गुरू शंकराचार्य जयेंद्र सरस्वती यांच्या हस्ते विद्वत पुरस्कार मिळाला. या गोष्टीने तर नानासाहेबांना मला कोठे ठेऊ कोठे नको असे झाले. कथा, कादंबरी, कविता, नाटक, वर्तमानपत्रातील लेखन सुरूच होते. नानासाहेबांना कौतुक वाटे. त्यांच्याबरोबरच तात्यासाहेब आणि झुंबरशेठ यांनाही याचे कौतुक वाटे. हिंद सेवा मंडळाची स्मरणिका, पेमराज सारडाचे वार्षिक यांची जबाबदारीही मीच सांभाळत होतो. १९८६ पासूनच मी वरिष्ठ महाविद्यालयात रुजू झालो होतो. पीएच.डी. गाईड झालो होतो. एम.फिल.चे विद्यार्थी, पीएच.डी.चे विद्यार्थी पारित होत होते. प्रत्येक प्रगतीच्या पावलागणिक नानासाहेबांचा माझ्यावरील विश्वास वाढतच होता. या त्रिमूर्तींकडून होणारे माझे कौतुक माझी कवचकुंडले होती. आत्मविश्वास प्रचंड वाढला होता. नव्यानव्या कल्पना नानासाहेबांच्या आशीर्वादाने मी प्राचार्य बोपर्डीकरांच्या सहाय्याने राबवत होतो.

अचानक एके सकाळी जन्मभर मधुमेहाशी झुंजणारा हा स्वातंत्र्यसैनिक अस्वस्थ झाला. त्यांना त्यांच्या चिरंजीवांनी पुण्यात हलवले. नानासाहेबांना हॉस्पिटलमध्ये ठेवले. त्यांना चिरंजीवांनी विचारले, ''नगरहून कोणाला बोलवायचे का?'' नानासाहेब म्हणाले, ''सहस्रबुद्धेला बोलवा.'' नानासाहेबांच्या चिरंजीवांबरोबर जोगळेकर भाऊसाहेब होते. ते म्हणाले, ''मी नगरला गेलो की सहस्रबुद्ध्यांना सांगतो.'' जोगळेकर आले ते थेट घरी. मी नानासाहेबांच्या प्रकृतीविषयी चिंतीत होतो. ''नानासाहेबांनी तुम्हाला बोलावलय'' जोगळेकर म्हणाले. ''निघालो!'' मी म्हणालो. असल्या कपड्यावर निघालो. हॉस्पिटलमध्ये पोचलो. नानासाहेबांनी जेमतेम मला पाहिले. नंतर त्यांची शुद्ध हरपली. ट्रिटमेंट सुरू होती. मी हॉस्पिटलमध्येच मुक्काम ठोकला होता. तिसऱ्या दिवशी डॉक्टरांचा राऊंड झाला. नानासाहेबांचे



चिरंजीव घरी चक्कर मारायला गेले होते. डॉक्टर म्हणाले, ''त्यांना लिक्विड आईस्क्रीम पुश करा.'' डॉक्टर गेल्यावर मी सिस्टरना सांगून आईस्क्रीम आणायला गेलो. बऱ्याच लांब जाऊन मला आईस्क्रीम आणावे लागले. आणले. मी स्वतः पुश केले. थोड्याच वेळात नानासाहेबांचे थोरले चिरंजीव पोचले. त्यांना सांगितले. त्यांना बरे वाटले. ''मी नगरला जाऊन येतो. माझे कपडे घेऊन येतो'' मी अनुमती मागितली. ''हरकत नाही, निवांत या'' निसळ म्हणाले. मी नगरला आलो. घरी पोचलो. तोच निरोप मिळाला सौ. मोरजेबाईंना ॲडमिट केले आहे. मी त्वरेने मोरजेबाईंना पाहायला गेलो. एकूण तालामाला पाहून, मी तासाभराने माझे गाईड डॉ. गंगाधर मोरजे सरांना म्हणालो, ''मला पुन्हा पुण्याला जावे लागेल.'' तेवढ्यात हॉस्पिटलमधून, मोरजेबाईंना पुण्याला हलवायला सांगितले. झाले आम्ही त्या कामाला लागलो. माझे लक्ष दोन्हीकडे वेधले गेले.

हे सर्व सुरू असतांना दादा चौधरी विद्यालयातून माझ्यापर्यंत निरोप सांगायला शिपाई पळत आला, ''सर तुम्ही पुण्याला जाऊ नका, नानासाहेबांना नगरला आणताहेत.'' त्याचे बोलणे ऐकून मी गोंधळलो. ''म्हणजे?'' मी विचारले. ''नानासाहेब गेले'' त्याने सांगितले. मी बसकण मारली. माझ्या डोक्यावरचे छत्र हरपल्यासारखे वाटले. त्यांची इच्छा मंडळाने २००३ मध्ये पूर्ण केली. मी झोकून कामाला लागलो. कॉलेजला नॅक ॲक्रिडेशनची 'ए' ग्रेड मिळाली. खऱ्या अर्थाने नानासाहेबांना श्रद्धांजली अर्पण झाली. आजही नानासाहेब माझ्या साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक व्यक्तिमत्त्वाला भावात्मकतेने व्यापून आहेत.

●●●

# मराठी सारस्वताच्या पालखीचा पायिक

## (प्रा.डॉ. भीमराव कुलकर्णी)

साहित्य जगतातला सच्चा मार्गदर्शक, कार्यकर्ता म्हणून प्रा.डॉ. भीमराव कुलकर्णी यांना, विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील, मराठी साहित्य आणि मराठीचे प्राध्यापक, आदराने ओळखतात. महाराष्ट्र साहित्य परिषद, महामंडळ, अखिल भारतीय साहित्य संमेलने, पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, ना. ठा. महिला विद्यापीठ (एस.एन.डी.टी.) या क्षेत्रातला कर्ता कार्यकर्ता म्हणजे डॉ. भीमराव कुलकर्णी. स्वतःच्या अभ्यास साधनेबरोबरच, अनेक अनेक प्राध्यापकांना, नवोदित साहित्यिकांना लिहिता करणारा माणूस.

मोठ्या नाट्यमयतेने त्यांचा नि माझा परिचय झाला. १९७५ साली मी एम.ए. (मराठी) झालो. प्राचार्य राम अत्रे, त्यावेळी नुकत्याच सुरू झालेल्या, अकोले महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य म्हणून रुजू झाले होते. अकोले, हे तालुक्याचे असले तरी लहान गाव, त्यामुळे, एक्सटर्नल आणि त्यातही एम.ए.चे दोन वर्षांचे मिळून आठही पेपर्स एकदम देऊन; एम.ए. उत्तीर्ण झालेला. त्यात संगमनेर महाविद्यालयाचे प्राचार्य, म. वि. तथा मामासाहेब कौंडिण्य आणि मराठी विभाग प्रमुख डॉ. सु. रा. चुणेकर यांच्या कौतुकाला पात्र ठरलेला मी काहीसा हुरळून गेलो होतो. मी प्राचार्य अत्र्यांना म्हणालो, ''सर, मला पीएच.डी. करता येईल का हो?'' ते म्हणाले, ''अवघड आहे, प्रक्रियापण सुरू झाली आहे, पण तुम्हाला अगदी मनातून खूपच तीव्र इच्छा असेल तर; पुण्यात डॉ. भीमराव कुलकर्णी यांना भेटा. पहा काही साधले तर, फार तर माझे नाव सांगा.'' झाले ते असं म्हणायचा अवकाश, मी डॉ. भीमराव



कुलकर्णी यांचा पत्ता मिळवला. काय करावे? मनात विचार करीत होतो. जाऊन धडकावे का? पण पूर्ण परिचय नाही. म्हणून मी त्यांना पत्र लिहायचे ठरविले. माझी सगळी कुळकथा पत्रात लिहिली. प्राचार्य राम अत्रे यांचा संदर्भ दिला आणि पोस्टात पत्र टाकले. पुढच्या आठवड्यात, साधारण शुक्रवारी दुपारी मला एक लिफाफा मिळाला. डॉ. भीमराव कुलकर्णी सरांनी लिफाफ्यात पीएच.डी. प्रवेशाचा फॉर्म पाठविला होता. सोबत अक्षरशः दोन ओळींचे त्यांच्या हस्ताक्षरातले पत्र होते. ''प्रवेशाची मुदत संपली आहे. खूप इच्छा असेल तर सोबतचा फॉर्म भरून; सोमवारी सकाळी नऊ वाजता, मला कॉलेजवर भेटा. दुपारी बारा वाजता मुलाखती आहेत. प्रयत्न करू. निश्चित सांगता येत नाही.'' पत्र वाचले. खूप आनंद आणि खूप चिंता वाटली. निर्णय घेतला. रविवारी पुण्यात दाखल झालो. सोमवारी सकाळी बरोबर पावणेनऊला डॉ. भीमराव कुलकर्णी यांच्या मॉडर्न कॉलेजमधल्या केबीनबाहेर थांबलो. ''सर, राऊंडला गेलेत, येतील.'' शिपायाने सांगितले. बाहेर सश्यासारखा थांबून राहिलो. आम्ही दोघे एकमेकांना ओळखण्याचा प्रश्नच नव्हता. प्रथमच भेटत होतो. काळीसावळी, गोल चेहऱ्याची, पाठीमागे केस फिरवलेले, मॅनेला आणि पँट घातलेली बुडगेली जाडगेली मात्र रुबाबदार व्यक्ती आली, माझ्याकडे पाहिले असावे. केबीनमध्ये जाऊ लागली, ''सर!'' मी हिय्या करून उद्गारलो. सर थबकले, पाहिले, म्हणाले, ''सहस्रबुद्धे का? यां आत''. पाठोपाठ मी आत गेलो. हायसे वाटत होते.

अत्र्यांचा नि माझा परिचय कसा; मी काय करतो, वगैरे चौकशी केली. तेव्हढ्यात चहा आला. त्यांनी आग्रहाने दिला. म्हणाले, ''प्रवेश मिळेल न मिळेल, मिळालेला चहा तर घ्या, घेताना?'' मोकळे वाटले. चहा प्यालो. हुशारी आली. ''कोणता विषय आवडतो? स्पेशल ऑथर कोणता होता?'' विचारले. ''संत वाङ्मय आवडते. स्पेशल ऑथर मुक्तेश्वर होता.'' म्हणालो. ''काय वाचलेत, मुक्तेश्वरांचे?'' विचारले. ''सर फार काहीच नाही. महाराष्ट्र सारस्वतातली माहिती आणि महाभारताची दोन पर्वे'' उत्तरलो. ''ठीक आहे, अकरा वाजता विद्यापीठात मराठी डिपार्टमेंटबाहेर भेटा. मी लवकर येईल. मुलाखती बारा वाजता आहेत. फॉर्म आत द्या. काय म्हणतात ते पहा. मी येईपर्यंत भेटून ठेवा.'' सांगितले निघालो. विद्यापीठात लगोलग गेलो. दहा-साडेदहा झाले असतील. विद्यापीठाच्या मराठी विभागात पोचलो. 'मराठी

विभाग प्रमुख' म्हणून पाटी पाहिली नि लगेच दार किलकिले करून, ''आत येऊ का?'' विचारले. ''या!'' जरा राकट हुकमी आवाज आला. त्या आवाजानेच थोडा घाबरलो. ''काय आहे? कोण तुम्ही?'' सरांनी विचारले. (नाव आठवत नाही असे नाही पण सांगत नाही.) ''मी सहस्रबुद्धे. थेट अकोले, आदिवासी भागातून आलो. पीएच.डी. करायचे आहे. डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी आपल्याला फॉर्म देऊन भेटायला सांगितले.'' मी एकाच दमात सारे सांगून टाकले. अपेक्षा सहानुभूतीची होती. थोडा आदिवासी भागाचा आधारही घेतला होता. पण व्यर्थ. ''आदिवासी भागातून या नाहीतर मलबारहिलवरून या. नियम तो नियम. पीएच.डी. प्रवेशाची मुदत संपली आहे. भीमरावांना काय लागतंय कुणाला पाठवायला, या!'' सर खेकसले, मी हादरलो, पांढराफटक पडलो. बाहेर आलो. आता डॉ. भीमरावांना भेटायचे आणि अकोल्याचा रस्ता धरायचा; म्हणून मराठी विभागाच्या बाहेर, खाली येऊन उभा राहिलो. ताटकळत, केविलवाणा!

बरोबर अकराच्या आसपास डॉ. भीमराव कुलकर्णी आले. त्यांनी पाहिले. ''काय दिला फॉर्म?'' डिकीतून एक पुस्तक काढीतच त्यांनी मला विचारले. मी केविलवाणेपणाने, केबीनमध्ये घडलेले सांगितले. ''बरं ठीक आहे. हे पुस्तक घ्या, वाचून ठेवा. शेजारच्या खोलीत मुलाखतीसाठी प्राध्यापक जमतील त्यात बसून राहा. बघु काय होतंय ते!'' म्हणाले आणि माझ्या हातात पुस्तक देऊन निघून गेले. पुस्तक होते 'मुक्तेश्वरांचे संक्षेप रामायण'. भली साठ पृष्ठांची प्रस्तावना होती. लेले यांनी संपादिलेले पुस्तक. मी काही वेळ इकडेतिकडे रेंगाळलो. मग बाराच्या सुमाराला मुलाखतीसाठी आलेल्या उमेदवारांच्या दालनात आलो. खूप सिनियर प्रोफेसर मंडळीही तेथे मुलाखत देण्यासाठी आली होती. मी आणखी निराश झालो. तेव्हढ्यात शिपाई आला. टाईप केलेली एक यादी पुढे करून त्याने उपस्थितांच्या सह्या घ्यायला सुरुवात केली. स्वाभाविक माझे नाव नव्हते. मी म्हणालो, ''मला कुलकर्णी सरांनी थांबायला सांगितले.'' थांबलो बापडा. क्रमाने मुलाखती झाल्या. एकेकजण निघून गेला. आशा मावळली. तेव्हढ्यात केबीनचे दार अर्धवट उघडून स्वतः कुलकर्णी सर ओरडले, ''आणखी कोणी राहिलंय का?'' ''मी, मी'' चाचरत मी म्हणालो. ''या'' सरांनी सांगितले. मी भीत भीत निमूट आत गेलो. मनात आशा पल्लवीत झाली. मुलाखत सुरू झाली. ''स्पेशल ऑथर कोण होता?'' सरळ डॉ. भीमरावांनीच विचारले. ''मुक्तेश्वर!'' मी उत्तरलो. ''काय काय वाचले?'' ''संक्षेप रामायण, महाभारत'' मी म्हणत होतो. तेव्हढ्यात माझे बोलणे तोडत ''संक्षेप रामायणावर प्रबंधिका लिहिणार?'' मी मनोमनी सुखावत काहीशा उतावळीने म्हणालो, ''हो!'' हा माझ्यातला आत्मविश्वास बोलत नव्हता. डॉ. भीमराव कुलकर्णी यांचा वरदहस्त बोलत होता. ''असं करा, मुक्तेश्वराचे संक्षेप रामायण आणि एकनाथांचे भावार्थ रामायण : तुलनात्मक अभ्यास, हा विषय घेऊन पन्नास-शंभर पानांचा शोधनिबंध लिहा आणि सादर करा. तीन महिने मुदत आहे.'' मी होकार भरला. माझा फॉर्म आता ठेवून घेतला होता. मला जायला सांगितले. मी बाहेर आलो. डॉ. भीमरावांची वाट पाहात उभा राहिलो. खूप उशीराने सर्वांबरोबर ते बाहेर आले. त्यांचे लक्ष माझ्याकडे गेले, म्हणाले, ''अरे, तुम्ही अजून गेला नाहीत?'' ''नाही, कसे लिहायचे?'' मी. ''असं करा घरी जा, दोन्ही रामायणांच्या प्रस्तावना वाचा, मग तुम्हाला कोणते मुद्दे सुचतात ते पत्राने कळवा. या'' त्यांनी सांगून मला निरोप दिला.

मी पीएच.डी. झाल्याच्या आनंदात घरी पोहोचलो. दोन्ही रामायणे मिळविली आणि वाचून काढली. मुद्दे सुचतील ते पाच सात मुद्दे लिहिले. पत्र लिहिले. उत्तर आले, ''अरे वा! तुम्ही छान मुद्दे काढलेत. आता या मुद्यानुसार 'शोधनिबंधाची लेखनपद्धती' ही मालशांची पुस्तिका पाहा. त्यातील सूचनांनुसार लिहा.'' कामाला लागलो. भरपूर श्रम आणि भरपूर आनंदाचा धनी झालो. निबंध पाठवला. रीतसर पीएच.डी.ला प्रवेश मिळाला. पण गाईड मिळाले डॉ. गंगाधर मोरजे. थोडा गडबडलो पण डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी सतत पाठराखण केली. पीएच.डी. झालो.

पदवीदान समारंभावेळची गोष्ट. विद्यापीठात मंचावर पदवी प्राप्त होणार होती. अकोले तालुक्यातला त्यावेळी (१९७९-८०) मी पहिला असल्याने मी अति उत्साहात होतो. त्यातच पदवीदान समारंभात, पु. ल. देशपांडे यांना सन्मान्य आणि रा. चिं. ढेरे यांना ग्रंथांवरील डी.लिट प्रदान होणार होती. त्यांच्याबरोबर प्रोसेशनमध्ये आणि चहापानास संधी मिळणार होती; म्हणून मी विशेष आनंदी होतो. समारंभस्थानी डॉ. भीमरावांना पाहून तर मी भलताच खूष झालो. चहापानाच्या दालनात डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या जवळच डॉ. भीमराव उभे होते. मी मध्येच घुसलो. डॉ. भीमरावांनी तेव्हढ्या गर्दीत ओळख करून

दिली, ''हे सहस्रबुद्धे, आदिवासींवर काम केलंय!'' ''अरे, हे मोरज्यांचे विद्यार्थी ना, मी ओळखतो.'' डॉ. ढेरे लगेच म्हणाले. मी अधिक सुखावलो. चढून गेलो. शहाणपणाने 'चक्रपाणी' ग्रंथातील, हरिश्चंद्र गडाविषयीची शंका विचारली. मला ती माझ्या अभ्यास प्रदर्शनाची संधी वाटली. '' हां, हां, ठीक पाहातो'' असे त्रोटक उत्तर डॉ. रा. चिं. ढेरे यांनी दिले. मी गप्प झालो. समारंभ संपल्यावर निघतांना मी गुरुवर्य सरांना भेटलो. ''तुला हा शंका विचारण्याचा उद्योग कोणी सांगितला होता?'' डॉ. भीमरावांनी मला चांगलेच झापाडले. माझी चूक माझ्या लक्षात आली.

माझा 'एकता'च्या अंकात 'पुरोगाम्यांच्या तावडीत 'संत समर्थ रामदास' असा मोठा खुसखुशीत उपरोधिक लेख छापून आला होता. मी पुण्यात लोकमान्य नगरमध्ये डॉ. भीमरावांच्या मुक्कामी खास अंक घेऊन दाखवायला गेलो. त्यात, मी लेख का लिहिला, हे सांगितले. मला 'प्रतिगामी संत रामदास' हा लेखाचा मथळा पाहून संताप आला होता. प्रतिक्रियात्मक लेख पाहून, डॉ. भीमराव म्हणाले, ''लेख चांगला साधलाय, पण अशा लोकांवर आपण प्रतिक्रियात्मक लेख लिहून त्यांनाच सार्वत्रिक चर्चेत आणून मोठं करतो. संत रामदास आहेत तसे ते असतातच! अशा फंदात न पडलेलं बरं. त्यापेक्षा तू ललित लेखन कर, कथा, कादंबरी असं. तुझ्या अभ्यासावर आधारित.'' सद्‌गुरू डॉ. भीमरावांनी कानउघाडणी तर केलीच पण मार्ग दाखवला. मी पुन्हा अंतर्मुख झालो आणि 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास' या प्रबंधावर आधारित 'डांगाणी' आणि 'अहिनकुल' या दोन कादंबऱ्या लिहून मोकळा झालो. दोन्ही गाजल्या. डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी डांगाणी भाषा आणि कादंबरीलेखन यांवर स्वतः आकाशवाणीवर तीन व्याख्याने दिली. मला गुरुप्रसाद वाटला. पुणे आकाशवाणीवर व्याख्यानासाठी माझे नाव सुचवून; मलाही संधी मिळाली. 'आज इथं तर उद्या तिथं' या भटक्यांवरील व्याख्यानमालेत मी 'वंजारी' आणि 'वडारी' यांवर व्याख्यानं लिहून दिली. 'चालविशी हाती धरोनिया' याचा पुरेपूर अनुभव मला डॉ. भीमराव कुलकर्णी यांच्या सहवासात मिळाला. मला पुण्यात संधी मिळावी म्हणून 'मॉडर्न कॉलेज'मध्ये सिलेक्शन केले. मी 'वनवासी कल्याण आश्रमा''च्या कामात गर्क होतो, गेलो नाही. पण डॉ. भीमराव कुलकर्णी यांच्याशी सतत संपर्क राहिला, घरगुती संबंध राहिले.



हा अनुभव माझाच एकट्याचा नाही. डॉ. भीमराव कुलकर्णी यांचे संशोधन व साहित्य यांविषयी, साहित्य संमेलनातील कामगिरीविषयीच्या नोंदी वाङ्मयेतिहासात विपुल आहेत. माझ्यासारख्या असंख्य सारस्वत उपासकांना सदैव मदतीचा हात देऊन, मार्गदर्शन करीत, डॉ. भीमरावांनी सारस्वतांची एक पिढी वाचती, लिहिती तर केलीच. त्याचबरोबर संशोधनमग्नही केली. मित्र, मार्गदर्शक आणि सद्‌गुरू अशा सर्व भूमिका पार पाडत ह्या कर्त्या सारस्वताने मराठी भाषा आणि साहित्याची पालखी आजन्म वाहिली.

●●●

# मोरजाई मठीचा दुर्वासा
## (प्रा.डॉ. गंगाधर ना. मोरजे)

गुरुवर्य डॉ. गंगाधर मोरजे, महाराष्ट्राला माहीत असलेलं, एक अभ्यासू व्यक्तिमत्त्व. लोककला, लोकसाहित्य, लोकसंस्कृती, हे अभ्यासक्षेत्र निर्देशित करतांना, डॉ. गंगाधर मोरजे यांचे स्मरण आणि विचार केल्याशिवाय पुढे जाता येत नाही. मात्र, एव्हढेच त्यांचे अभ्यासक्षेत्र होते, असे नाही. दैवतकथाशास्त्र, मानववंशशास्त्र, साहित्यशास्त्र, समीक्षा, इतिहास संशोधनशास्त्र या क्षेत्रातलाही हा दादा माणूस! स्वाभाविकपणे तत्त्वज्ञान या क्षेत्राचा विशेष अभ्यासही त्यांनी केलेला. 'अहमदनगर महाविद्यालय' या महाविद्यालयात, 'मराठी विभाग प्रमुख' म्हणून त्यांची कारकीर्द खूपच लक्षणीय ठरली. तसे ललित साहित्य त्यांनी लिहिले नाही, असे नाही. उमेदवारीच्या काळात ललित साहित्यापासूनच त्यांची लेखनाला सुरुवात झाली. अहमदनगर महाविद्यालयात असल्यामुळे स्वाभाविकपणे त्यांचे लक्ष 'ख्रिस्ती मराठी साहित्य' या साहित्य दालनाकडे गेले. या दालनात त्यांनी अक्षरशः मुसंडी मारली. इतकी की, त्यांना लोक ख्रिश्चन मानू लागले.

१९७५ च्या ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात मी त्यांना भेटायला नगरला आलो. त्याचे झाले असे की; मला पीएच.डी. करायचे होते. ज्येष्ठ समीक्षक, संशोधक आणि साहित्यिक कार्यकर्ते, अभ्यासू विद्यार्थ्यांचे संकटमोचक असे ज्यांचे वर्णन करता येईल; असे प्रा.डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी बोटाला धरल्याने; मला पुणे विद्यापीठात पीएच.डी.ला प्रवेश मिळाला. आता तेच माझे गाईड असे गृहित धरून; मी निवांत असतांनाच मला पत्र मिळाले. गाईड



म्हणून प्रा.डॉ. गंगाधर मोरजे, माझ्यासाठी नेमले गेले होते. मला ना त्यांची ओळख ना पाळख ना काही माहिती. मी डॉ. भीमरावांकडे धावलो. त्यांनी सांगितले, ''अरे, डॉ. मोरजे खूप अभ्यासू माणूस आहे. आम्ही बरोबर काम केले आहे. मी सांगतो.'' झाले. मला आता डॉ. मोरजे यांना भेटणे भागच होते. भीतभीतच सरांच्या घरी गेलो. डॉ. गंगाधर मोरजे आणि त्यांच्या सौ. प्रा. पद्मा मोरजे दोघांनीही मोठ्या आत्मियतेने माझी चौकशी केली. मी माध्यमिक शाळेला जोडलेल्या ज्युनिअर कॉलेजमध्ये नोकरीत आहे, हे ऐकून ते थोडे नाराज झाल्यासारखे वाटले. ''कोणत्या विषयात रस आहे?'' हा प्रश्न विचारला जातो हे मला माहीत नव्हते. मनात विचार केला. पीएच.डी.च्या प्रवेशाकरिता; 'मुक्तेश्वरांचे संक्षेप रामायण आणि एकनाथांचे भावार्थ रामायण : तुलनात्मक चिकित्सक अभ्यास' या विषयावर मी प्रबंधिका लिहिली होती. अर्थात डॉ. भीमरावांनी दिलेल्या मुद्यांनुसार आणि सांगितल्याबर हुकूम. म्हणूनच मी डॉ. मोरजेंच्या प्रश्नाला ठोकून उत्तर दिले, 'पंडित आणि संत वाङ्मय'. मग मात्र त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मी फारशी उत्तरे देऊ शकलो नाही. जरा नाराज होत गेलो. पीएच.डी.ला प्रवेश मिळूनही; नाकारला जातो की काय, अशी भयशंकाही निर्माण झाली. थोड्याच वेळात चर्चेचा ट्रॅक सरांनी बदलला. म्हणाले, ''लोकसाहित्यात करतो का?'' ही मोठीच आपत्ती कोसळली. मी 'लोकसाहित्य' हा शब्द लोकगीतांच्या संबंधाने आणि रेडिओवरील लोकसंगीत या संदर्भात ऐकला होता. डॉ. मोरजे म्हणाले, तू आदिवासी भागात भंडारदरा, कळसूबाई परिसरात राहातो, म्हणालास ना त्यांच्यातील, पारंपरिक गाणी. बायकापुरुष म्हणत असतील ती, दंतकथा असे काही मिळेल का? आता मी माझ्या परिसरात म्हणजे घरातच पोचलो म्हणाना! त्यातच मी बी.एड.ला असतांना डॉ. सरोजिनी बाबर यांच्या लोकसाहित्य समितीच्या प्रकाशन पुष्पाच्या मालिकेतील 'एक होता राजा' मधील लोकगीतांच्या आधारे 'प्रोजेक्ट' सादर केला होता. काहीतरी पटकन करायचे म्हणून! त्याचे स्मरण झाले. 'अपने गली में कुत्ता भी शेर' तशा आविर्भावात मी ठोकून दिले हो हो गाणी गोष्टी मिळतील ना! त्यांनी विचारले, ''किती?'' मी पटकन म्हणालो, ''खूप?'' त्यावर ते म्हणाले, ''शेदोनशे गाणी आणि पाचपन्नास कथा मिळाल्या तरी खूप झाले. ''तू असं कर, जाऊन नमुन्यादाखल पाचदहा गाणी एखाद्दुसरी लोककथा घेऊन ये मग आपण

पाहू.'' मी म्हणालो, ''ठीक आहे''. मी उतावीळ होतो. रेटून म्हणालो आणि पीएच.डी. झाल्याच्या थाटातच त्यांच्याकडून निघालो. तेव्हांपासून डॉ. मोरजे यांचा परिचय. त्यांच्या सहवासात मी लोकसाहित्याचा गाढा वगैरे अभ्यासक कधी झालो ते कळलेच नाही.

'मराठी लावणी वाङ्मय' या विषयावर पीएच.डी. संपादन करून डॉ. गंगाधर मोरजे यांनी संशोधन क्षेत्रात पदार्पण मोठ्या दिमाखदारपणे केले. 'लावणी वाङ्मय' आणि 'शाहिरी वाङ्मय' हा त्यांचा अभ्यासाचा विषय त्यांनी मोठ्या परिश्रमाने, साक्षेपाने, सूक्ष्मतेने आणि सखोलतेने अभ्यासकांसमोर मांडला. 'अंधारातल्या लावण्या' 'भेदिक' यांवर त्यांनी विशेष प्रकाश टाकला. 'लोकसाहित्य : एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र' हे त्यांचे पुस्तक लोकसाहित्य अभ्यासासाठी दीपस्तंभ ठरले. 'लोकसाहित्य ही प्रयोगसिद्ध वाङ्मय कला आहे' या त्यांच्या लोकसाहित्य सिद्धांताने, लोकसाहित्याच्या अभ्यासाला निश्चित आणि नेमके आयाम मिळाले. 'क्षेत्रीय अभ्यास पद्धती'मुळे संशोधनाला दिशा मिळाली. त्यांनी लोकसाहित्याच्या अभ्यासासाठी केलेल्या शोधयात्रेतल्या आम्हा सहप्रवाशांना श्रीमंत अनुभव प्राप्त झाला आहे.

संत साहित्य आणि लोकसाहित्य यांचा अनुबंध स्पष्ट करता करता, ते संत वाङ्मयाचे व्यासंगी अभ्यासक झाले. 'षड्भूजगणेश' यावरील त्यांचे संशोधन आणि 'ज्ञानदेव ज्ञानदेवी' यावरील भाष्य, 'महालयाचा' शोध, शेखमहंमदांचे अप्रसिद्ध अभंग, ज्ञानेश्वरी दर्शन, दोलामुद्रिते इ. वरील त्यांचे लेखन महत्त्वाचे ठरले.

अनेक ग्रंथांना प्रस्तावना, 'ज्ञानोदया'करिता कार्य, 'आलोचना'मधील लेखन, 'संशोधन पत्रिका'मधील लेखन, वाङ्मयेतिहासातील त्यांचे योगदान; असे कितीतरी कार्य, त्यांचे पुन्हापुन्हा स्मरण करविते. 'लोकसंबंधविज्ञान' हे अभ्यासक्षेत्र समृद्ध करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. आज त्यांच्या नावावर पन्नास ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

डॉ. मोरजे सरांच्या षष्ट्यब्दीपूर्तीला डॉ. वि. म. कुलकर्णी, डॉ. मे. पू. रेगे आणि मुख्य म्हणजे महाराष्ट्राचे कविकुलगुरू महाकवी कुसुमाग्रज उपस्थित होते. तर त्यांच्या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन करतांना फादर दिब्रिटो, न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर आदि लोक त्यांच्यावरील प्रेमापोटी उपस्थित होते. डॉ. मोरजे यांनी 'अहमदनगर कॉलेज'मध्ये भरविलेली सहावी लोकसाहित्य परिषद, डॉ.



सरोजिनी बाबर, कमलाकर सोनटक्के, सत्यभामाबाई आदींच्या उपस्थितीमुळे तसेच प्रयोगसिद्धतेसह परिचर्चेमुळे; ऐतिहासिक ठरली. डॉ. मोरजे यांनी आप्पा कोरपे या 'हमाल' कार्यकर्त्याचे 'सांगीवाचे लिखित' स्वरूपात प्रकटविलेले 'मी तो हमाल' हे आत्मकथन वाङ्मयेतिहासात महत्त्वाचे ठरले. डॉ. मोरजे यांचा डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी स्फूर्ति प्रकाशन मंचच्या माध्यमातून केलेल्या ग्रंथयागातील सहभाग अहमदनगरच्या वाङ्मयेतिहासात वज्रलिपित झाला आहे.

डॉ. गंगाधर मोरजे कर्तव्यकठोर, तितकेच शिस्तप्रिय आणि तेव्हढेच स्पष्टवक्ते किंवा फटकळ म्हणा हवेतर. साहित्यिक आणि प्राध्यापक विश्वात त्यांचा आदरयुक्त दरारा होता. मोरजे सर म्हणजे फणस आणि नारळ. हे ज्यांना कळे ते मोरजे सरांचे होऊन जात. महाराष्ट्रातील कितीतरी लहानथोर अशी मोरजे सरांची माणसे, आम्ही पाहिली. आम्हालाही त्यांनी आपलेसे केले.

मोरजे सर सौ. मोरजेबाईंच्या कौटुंबिक आणि सांस्कृतिक शिस्तीत नेहमी मोठ्या आत्मियतेने वागण्याचा प्रयत्न करीत. मी, डॉ. पी. एस. पवार, फादर डॉ. ख्रिस्तोफर, शेळके एस. जे. हे त्यांचे सुरुवातीचे पीएच.डी.चे विद्यार्थी. डॉ. पी. एस. पवार हे स्वतःला मोठ्या अभिमानाने मोरजे सरांचे पहिले विद्यार्थी म्हणून घेतात. पीएच.डी. पूर्ण करून पारित होण्यात मात्र मी पहिला ठरलो. तर आम्ही तिघेही बाहेरगावाहून नगरमध्ये येत-जात असू. सौ. मोरजेबाईंनी आम्हाला कधी बाहेर कुठे उतरू दिले नाही; की जेवायला बाहेर जाऊ दिले नाही. त्या आणि सर नेहमी म्हणायचे, ''हे गृहस्थाचं घर आहे. त्यात लोकसाहित्यवाल्याचे. इथं आलात की घरातले झालात!'' हळूहळू गुरुगृहाचे गुरुकुल झाले. आलो की; साहित्यविषयक, तत्त्वज्ञानात्मक, शैक्षणिक आणि प्रसंगी स्थितीगतीच्या गप्पा तासन्‌तास रंगत. मोरजेबाई मोरजे सरांपेक्षा काकणभर अधिक चौकस वाचक. त्या चर्चेत भाग घेत, तेव्हां सगळ्यांना हरवत. अनेकदा घरातल्या गप्पांतून सहभागींना नव्या लेखनाचे विषय सुचत. बीज सापडे. सरांच्या घरात नगर महाविद्यालयातील, त्यांना मानणारी, प्रेम करणारी प्राध्यापक मंडळी आणि बाई आयुर्वेद कॉलेजमध्ये संस्कृत शिकवित असल्याने, आयुर्वेद कॉलेजमधील काही लोक येत असत. आमच्या मुक्कामात आमच्या विचारांना अनेक ज्ञानक्षेत्रातील आयाम मिळत. सरांकडे राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील महाराष्ट्रातले दिग्गज येत, साहित्यिक

संशोधक मंडळी येत. त्यांच्या भेटीगाठींनी आम्ही समृद्ध होत असू.

पुढे कर्मधर्मसंयोगाने मला नगरच्या सारडा महाविद्यालयात यावे लागले. त्यावेळी तरी नगरमध्ये मोजक्या ओळखींमध्ये माझे जवळचे असे मोरजे सरच होते. नगरला आल्यावर जवळपास रोज संध्याकाळी मोरजे सरांच्या घरी जाणे व्हायचे. हळूहळू काही दिवसांनी सरांच्या घरी गुरुकुलाचे मोरजाई मठीत रूपांतर झाले. त्याला अनेक कारणे घडली. त्यांतील मुख्य कारण प्रा.सौ. मोरजेबाई लवकरच हे जग सोडून गेल्या. मुलगा प्रभवने अमेरिकेतच संसार थाटला आणि कन्येचा प्रपंच समीर घोष यांच्याबरोबर टाटानगर, कधी दिल्ली, कधी पुणे असा होत गेला. सर एकटेच नगरला 'मोरजाई'त असत. मात्र त्यांना आम्ही कधीच एकटे सोडले नाही. प्रा. ए. एम. पवार, डॉ. गोपाळराव मिरीकर, डॉ. एम. एस. बागवान, डॉ. लोंढे, डॉ. सोमाणी, डॉ. पवार, मी स्वतः आणि यांत भर म्हणजे डॉ. मोरजे यांचे मानसपुत्र डॉ. धोंडिराम वाडकर, त्यांचे ज्युनिअर कॉलेजमधील मित्र, हमाल पंचायतीतले आप्पा कोरपे, महादेव कुलकर्णी अशी मंडळी जवळपास नित्य जमायची. त्यात मधूनच वसंत दावतर, मधुकर नेराळे, डॉ. मालशे, डॉ. सुधीर काळे, प्राचार्य रामदास डांगे असे एक ना अनेक पाहुणे यायचे. मग मोरजाई मठी गजबजून जायची. चर्चेला उधाण यायचे. हक्काचे वक्ते, चर्चक, हक्काचे श्रोते, हक्काचे वाद आणि हक्काचे संवाद. कधी वितंडही. अशी चर्चा रंगत जायची. रोजचेच झाले. यात कधी सरांचे कधीमधी येणारे विद्यार्थी डॉ. अशोक एरंडे, डॉ. प्रभा मुळे. डॉ. खांदवे, डॉ. सुनील शिंदे हेही सहभागी व्हायचे. कधी साहिंत्यिक मंडळी यायची. चर्चेला अमुकच विषय हवा असे नाही. साहित्य समीक्षेचे सर्व प्रवाह, वाङ्मय प्रवाह, भाषाविज्ञान, संत, शाहीर यांच्या परंपरा, राजकारण, धर्मकारण इ.इ. सगळे विषय मोठ्या गांभीर्याने, तावातावाने चर्चिले जायचे. कधी अभिनिवेश असायचा. पण वाह्यातपणा नसे. या चर्चेला नेटके वळण, तारतम्य द्यायला प्रज्ञासूर्य डॉ. गंगाधर मोरजे असत. अलिकडे चॅनलवर चर्चा होते ना तसे काहीसे घडे.

'मोरजाई' मठीत जमले की एकमेकांची सुखदुःखेही एकमेकांत सहानुभूतीने झेलली जायची. पालकत्व मात्र डॉ. गंगाधर मोरजे यांचेकडे असायचे.

नगरच्या मोरजाई मठीतील हा दुर्वास ऋषी काळाच्या पडद्याआड गेला तरी मठीच्या सदस्यांच्या मनात प्रेम, शिस्त यांसह रुतून आहे. मठीतली



सगळी मंडळी त्या त्या क्षेत्रात अधिकारी होतीच. ते अधिक अधिकारवाणीने आता आपापल्या क्षेत्रात वावरत आहेत. प्रत्येकाचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व होतेच, मठीत ते विकसित होत होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव त्या त्या क्षेत्रात जाणवतो आहे. अभिमानाने मठीचे मेंबर म्हणून सांगतांना प्रकांड प्रज्ञेचा प्रकाश अंतःपटलावर प्रकाशमान असतो.

●●●

# दिव्यत्वाची येथ प्रतीती...

## (पूज्य स्वामी गोविंददेव गिरी महाराज तथा पू.श्री. किशोरजी व्यास)

ह.भ.प.श्री. मुकुंदमहाराज जाटदेवळेकरांचे चिरंजीव पीएच.डी.साठी, दिलेल्या विषयावरील काही लेखन घेऊन; दाखविण्यासाठी आले होते. चर्चा सुरू होती. ''हरिद्वारला जाणार आहोत!'' ते म्हणाले, ''काय विशेष?'' मी सहज विचारले. ''महाराज संन्यास दीक्षा घेणार आहेत.'' ''अरे वा!'' मी म्हणालो. महाराज म्हणजे श्री किशोरजी व्यास. त्यांच्याशीही पीएच.डी. विषयासंबंधी चर्चा झाली होती म्हणून; त्यांचा विषय निघाला. श्री किशोरजी व्यास यांना मी ओळखत होतो. अकोल्याला मारवाडी राममंदिरात, श्रीमद् भागवत कथेचे आयोजन केले होते. मी आवर्जून सातही दिवस कथेला उपस्थित होतो. शुद्ध अस्खलित वाणी, कथाकथनाची अजोड शैली, तात्त्विक आणि विशेष गंभीर प्रसंगांची वर्तमानाशी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाशी सांगड घालीत; अध्यात्माची उकल करून; सांगण्याचे कौशल्य मला भावले होते. व्यासंगी, तत्त्वज्ञ, कथाकार आणि राष्ट्रनिष्ठ अशी त्यांची प्रतिमा त्यावेळेपासूनच माझ्या मनात दृढ झाली होती. तेव्हापासून त्यांना पाहात व ओळखत होतो. फारसा संबंध आला नव्हता. तरी तेही मला ओळखत होते. जाटदेवळेकर माझ्याकडे पीएच.डी. करणार आहेत हे ऐकल्यावर; ''मग काही काळजी नाही'', असे म्हणून त्यांनी जाटदेवळेकरांना आश्वस्त केले होते. पुढे विविध कारणांमुळे जाटदेवळेकरांचे पीएच.डी. राहून गेले ती गोष्ट वेगळी. पण त्यांच्यामुळे



श्री किशोरजी व्यासांनी माझे लक्ष पुन्हा वेधून घेतले.

आता स्वामी गोविंददेव गिरी महाराज अर्थात श्री किशोरजी व्यास जगद्विख्यात संत, कथाकार म्हणून ख्यातकीर्त झाले आहेत. अधिकाधिक होत आहेत. माझ्या मनात त्यांच्या विषयीचा पूज्य भाव अधिकच वाढला होता. कारण त्यांची विद्वत्ता, व्यासंग, राष्ट्रीय जाणिवेने सामाजिक प्रबोधन, आणि शांत, प्रसन्न, स्वागतशील, प्रसादपूर्ण सर्वसमावेशकता असे त्यांचे व्यक्तिमत्त्व हे होय. त्याचबरोबर ते नगर जिल्ह्यातले आहेत, आपले आहेत आणि समविचारी असे विभूतिमत्त्व आहे; हेही दुसरे कारण होते. तरी मी काही त्यांचा विधिवत वगैरे अनुयायी नव्हतो. मात्र त्यांचेही माझ्या एकूण व्यक्तिमत्त्वाकडे नक्कीच लक्ष असावे असे जाणवत होते.

मी पेमराज सारडा महाविद्यालयात प्राचार्य असतानाची गोष्ट. आमच्या संस्थेचे एक ट्रस्टी श्री. शामसुंदर सारडा यांना कवितासंग्रह करायचा होता. कविता करण्याचा छंद होता. जवळपास दोनेकशे कविता त्यांनी केलेल्या होत्या. स्थानिक वर्तमानपत्रातून त्या प्रसिद्धही झाल्या होत्या. त्यांनी निवडक कवितांचा संग्रह करावा अशी इच्छा व्यक्त केली. मीही आनंदाने स्वीकारली. संग्रह निश्चित झाला. ''सर, याला प्रस्तावना कोणाची घ्यावी?'' एवढे विचारून ते थांबले नाहीत म्हणाले, ''गोविंददेवगिरी महाराजांची प्रस्तावना घ्यावी असा माझा आग्रह आहे. आमच्या आईंची त्यांच्यावर खूप श्रद्धा आहे. त्यांचं भागवत करावं अशी आईंची खूप इच्छा असायची.'' एका दमात शामसुंदर शेठनी सांगून टाकले. श्री. किशोरजी व्यास यांना मी ओळखत होतो. पण कवितासंग्रहाला वगैरे ते प्रस्तावना लिहून देतील; याविषयी साशंक होतो. ''चालेल, तुमची इच्छाच असेल तर संपर्क करा.'' मी म्हणालो, ''नाही सर, तुम्ही माझ्याबरोबर चला, महाराज नगरमध्ये आलेले आहेत. ते श्री. नंदुशेठ मणियार यांच्या फार्म हाऊसवर थांबले आहेत.'' शेठजींनी सांगितले. मी लगोलग श्री. मणियारशेठना फोन लावला. तेही आमच्या संस्थेचे ट्रस्टीच असल्यामुळे माझा संपर्क होतच असे. त्यांना शामशेठजींचे मन्तव्य ऐकवले. ते म्हणाले, ''या साडेतीन चारला, फार्म हाऊसवर.'' आमचे जायचे ठरले.

गेलो. महाराजांच्या दर्शनासाठी भली तीनसाडेतीनशे भक्तांची गर्दी होती. एकदम पुढे जाणे औचित्याचे नव्हते. तेव्हढ्यात महाराज गोविंददेवगिरींचे लक्ष आमच्याकडे गेले. ''सर, या असे इकडे या, हे आमचं असंच चालणार!''

स्वतः महाराजांनीच आज्ञा केल्यामुळे आम्ही सहज पुढे गेलो. महाराजांच्या आसनापासून; तरी पंधराएक खुर्च्या ओलांडून आम्ही रांगेत बसलो. महाराजांच्या दर्शनभेटींचा कार्यक्रम पुढे सुरू झाला. चारसहा भक्तमंडळी महाराजांशी बोलून; दर्शन वगैरे घेऊन गेल्यानंतर आम्ही सातआठ खुर्च्यांच्या टप्प्यात आलो. कदाचित संवाद होणे शक्य आहे हे जाणून महाराज म्हणाले, ''हा बोला सर काय, कसे आलात? सर प्राचार्य आहेत. त्यांच्या कामातून वेळ काढून ते आले आहेत. बोला, सर!'' महाराजांनी इतरांना समजावून, मला विचारलं. मला महाराजांनी ओळखलं हे पाहून साश्चर्य आनंद वाटला. ''महाराज, शामशेठ सारडांनी एक कवितासंग्रह केला आहे. त्या संदर्भात आपल्याला त्यांना भेटायचं आहे. मी त्यांच्याच बरोबर आलोय.'' मी थेट बोलणे उचित नाही हे लक्षात घेऊन; शामशेठचे नाव पुढे केले. ''आणा, शामशेठ काय म्हणताय?'' महाराजांनी माझा संकोच ओळखून शामशेठना बोलावले. शामशेठ उठून पुढे गेले. त्यांचे बोलणे झाले. कवितासंग्रहाची टाईप्ड प्रत हातात दिली. महाराजांनी त्यातली काही पाने पाहिली किंवा पाहिल्यासारखी केली, ''पाहतो, करतो, आणखी काय?'' त्यांनी विचारले, ''प्रकाशनाला आपण यावे अशी इच्छा आहे. आपण द्याल ती तारीख चालेल. कॉलेजमध्ये प्रकाशन करूया.'' शामशेठने नेटाने सांगितले. ''बघुया'' म्हणत कवितांचे चोपडे ठेवून घेतले.

हा त्यांचा संवाद सुरू असतांना मी मनोमनी वेगळ्याच भाववृत्तीत पोचलो होतो. ऋषी अगस्त्यांचे दिव्यदर्शन मला झाले होते. भगवान अगस्त्यांनी मला लिहून प्रकट करण्याची आज्ञा केली होती. मी मनाने अगस्त्यमय झालो होतो. तेव्हढाच बुद्धीने अस्वस्थ झालेलो होतो. आलेला अनुभव दिव्य होता. बुद्धिप्रामाण्यवादी, विज्ञाननिष्ठांच्या समाजात आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजच्या प्राचार्यांनी दिव्य अनुभव सांगणे व्यवहारतः शक्य नव्हते. माझी घुसमट होत होती. दिव्यानुभूतीने मी वेडा झालो होतो. शामशेठचे महाराजांशी बोलणे सुरू असतांना, ''आपण अध्यात्म क्षेत्रात अधिकारी ठरलेल्या, गोविंददेवगिरी महाराजांना आपला अनुभव सांगून; शंकानिरसन का करू नये? महाराज परिचित आणि जवळचेही आहेत; असा विचार मनात उफाळून आला. तेवढ्यात महाराजांचे लक्ष माझ्याकडे गेले. मी एकदमच म्हणालो, ''महाराज, मला आपल्याशी बोलायचंय!'' ''अरे, बोलाना!'' महाराजांना बहुतेक, शामशेठ, कवितासंग्रह, याचबाबतीत मला बोलायचे असावे, असे



वाटले असावे. ''महाराज, मला अगदी खाजगी बोलायचे आहे.'' मी म्हणालो, महाराजांनी मला जवळच्या खुर्चीत बसायला सांगितले. ''महाराज मला अगदीच खाजगी बोलायचे आहे.'' मी पुन्हा म्हणालो. तेव्हा मात्र अन्य सर्व लोकांकडे दुर्लक्ष करून महाराजांनी माझ्याकडे कळल्यासारखे केले. मग मी माझी खुर्ची थोडी पुढे सरकवून जणू त्यांच्या कानी लागलो. माझी दिव्यानुभूती आणि मनोवस्था महाराजांना दबक्या आवाजात सांगत होतो. पाचसहा मिनिटे आमचा हा एकेरी संवाद लोकांतातही एकांतपणे सुरू होता. माझे बोलणे संपताच महाराजांनी गंभीर मुद्रा करीत तीक्ष्ण नजरेने माझ्या डोळ्यात रोखून पाहिले. त्यांची ती नजर थेट माझ्या अंतरमनोगर्भापर्यंत पोचल्याचे मला जाणवले. ते ताडकन उठले. तरातरा एकदम थेट आत कुठल्याशा खोलीत गेले.

महाराज पुन्हा बाहेर अगदी क्षणात प्रकटले तेव्हा त्यांच्या हातात आम्रफल होते. एक ग्रंथ होता आणि भलामोठा हार होता. ''सर, असे समोर या''. त्यांनी मला आज्ञा केली. मी संभ्रमितपणे त्यांच्यासमोर उभा राहिलो. गोविंददेव गिरी महाराजांनी तो भला मोठा पुष्पहार माझ्या गळ्यात घातला. हातात नम्रभावाने आम्रफल आणि ग्रंथ दिला. सर्वांकडे पाहात महाराज म्हणाले, ''हा सहस्रबुद्धे सरांच्या ज्ञानाचा सत्कार आहे.'' पुन्हा माझ्याकडे रोखून पाहात महाराज म्हणाले, ''लाखो लोकांतून एखाद्याच्या वाट्याला असे ज्ञान होण्याचे भाग्य लाभते. घाबरू नका. ज्ञानाला सामोरे जा. ऋषी अगस्त्य सांगतील तेच आणि तसे लिहा. ते तुमच्याकडून करून घेतील.'' महाराजांच्या वाणीने मी रोमांचित झालो. डोळे वाहू लागले. मी महाराजांच्या पायावर डोके ठेवण्यासाठी खाली वाकलो. महाराजांनी मला खांदे धरून उठवले. मी धन्य झालो. जमलेले सर्व लोक थक्क होऊन, पाहात होते. मला सद्‌गुरूंचे बळ प्राप्त झाले. भ्रम नाहिसा झाला. त्या पुलकित अवस्थेतच मी परतलो. वाटेत शामशेठ सारखे बोलत, विचारत होते. मी औपचारिकपणे, ''हो, हो, काही नाही, खाजगी आहे'' असे म्हणत वेळ मारून नेत होतो.

महाराज शामशेठच्या कवितासंग्रहाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने महाविद्यालयात आले. माझ्या केबिनमध्ये दोन क्षण विसावावे असे वाटत होते. विसावले. मी दर्शन घेतले. महाराज प्रश्नार्थक मुद्रेने पाहात होते. मी लगेच म्हणालो, ''आपल्या कृपेने मी काम सुरू केले आहे.'' ''अगस्त्यांच्या

कृपेने...'' महाराज शून्यात दृष्टी लावून म्हणाले. मग आम्ही दोघेही अबोल झालो. प्रकाशन समारंभात महाराज प्रज्ञा, प्रतिभा आणि दिव्यानुभूती यावरच बोलले. जणू मलाच महाराज प्रबोधित करीत होते. त्यांनी त्यावेळी माझ्या हातात दिलेले पुस्तक प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराजांचे होते. त्या पुस्तकाच्या रूपाने जणू अध्यात्म संज्ञा परंपरा स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी माझ्यापर्यंत पोहोचविली असावी.

अगस्त्यांच्या संदर्भात जे काही अगस्त्यांच्या आज्ञेनुसार घडत गेले त्या सर्व गोष्टींच्या मागे स्वामी गोविंददेव गिरी महाराजांचे भक्कम पाठबळ आहे; अशी माझी भावना आहे. २००८ ची गोष्ट 'अगस्त्य' कादंबरी पद्मगंधा प्रकाशनाच्या माध्यमातून प्रसिद्ध होणार होती. मी प्रकाशक अरुण जाखडे यांना अट घातली; स्वामी गोविंददेवगिरी महाराजांच्या शुभहस्ते कादंबरीचे विमोचन झाल्याशिवाय; कादंबरी बाजारात नेऊ नये. व्यवसायाच्या दृष्टीने हे चुकीचे होते. माझा हट्ट होता, लवकरात लवकर प्रकाशन व्हावे. श्रीमान नंदुशेठ मणियारांना गाठले. फोनवरून संपर्क करण्याचा प्रयत्न केला. मी उतावीळ झालो होतो. मणियारशेठना म्हणालो, तुमचा फोन झाला तर तुम्ही बोला. माझा झाला तर मी बोलेन. मी थांबतो थोडाच. सारखा मागचापुढचा विचार न करता फोन करीत राहिलो. दुसऱ्या दिवशी दुपारी एक वाजताची गोष्ट. महाराजांनी फोन उचलला. म्हणाले, ''अहो सहस्रबुद्धे इतक्या कमी वेळात मला तारीख देणे केवळ अशक्य आहे. अगदी तुम्ही सांगता त्या सगळ्या तारखा गेलेल्या आहेत. मला नगरला येणं शक्य नाही.'' ''पुण्यात करूया?'' मी म्हणालो, ''अहो पुण्यात कुठे करणार? मी नाहीच आहे. होळीच्या अधल्या दिवशी रात्रीच मला जायचंय.'' महाराज म्हणाले, ''मग आम्ही असं करतो. पुण्यात आपल्या निवासस्थानी, सांगाल त्या वेळेला येतो. आपल्या हातात पुस्तक दिल्याशिवाय, पुस्तक विक्री करू नका, असं मी प्रकाशकांना सांगितलंय. ''तेव्हढी अनुमती द्या'' मी अजीजीने म्हणालो. ''ठीक आहे, तुम्ही साडेचार वाजता पुण्यातल्या निवासस्थानी या.'' महाराज म्हणाले. माझा आनंद गगनात मावेना. मी लगेचच मणियार शेठना, अरुण जाखडेंना फोन करून सांगितले. झाले, ठरले. मी लगेचच पुण्याला जाण्याची तयारी केली. कधी मी त्यांच्या हातात 'अगस्त्य' देतो असे झाले. मी हुरावलो होतो. तेव्हढ्यात फोन खणाणला. महाराजांचाच फोन होता. मन साशंक



झाले. महाराजांनी स्वतःच फोन केला होता. म्हणाले, ''सहस्रबुद्धे, अहो माझे सगळे ठरलेले कार्यक्रम रद्द झालेत. आता मी होळीपौर्णिमेच्या दिवशी नगरमध्ये येऊ शकतो. नगर-संगमनेरचे सगळे तुंबलेले कार्यक्रम या दिवसात करणार आहे. पण नगरच्या हनुमान चालीसा मंडळाचा कार्यक्रम आहे. त्याला जोडून अगोदर कार्यक्रम ठरवता?'' माझा विश्वासच बसेना. मला स्वतःलाच कुठे ठेवू कुठे नको असे झाले. ''अगदी अवश्य, मी लगेच कामाला लागतो'' मी म्हणालो. ''नंदुशेठची गाठ घेऊन ठरवा'' महाराज म्हणाले.

होळी पौर्णिमेच्या दिवशी कार्यक्रम सुरू झाला. प्रकाशन झाले. महाराज बोलू लागले. ''महर्षी अगस्त्यांचा प्रभाव केवढा आहे याची मला प्रचिती आली. माझे या चार दिवसातले सर्व कार्यक्रम रद्द झाले. 'अगस्त्य' कादंबरीच्या प्रकाशनाला यावेच लागले. मी धन्य झालो.

अगस्त्य कादंबरीचे इंग्रजी, कन्नडमध्ये रुपांतरे झाली आहेत. हिंदी आणि तमीळमध्ये रुपांतरे करण्याचे काम सुरू आहे. कादंबरी लिहून अगस्त्य आज्ञेचे पूर्णत्वाने पालन झाले नाही. 'अगस्त्य माहात्म्य' उपासना ग्रंथ माझ्याकडून लिहून घेतला गेला.

'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' ग्रंथाच्या निमित्ताने मी नव्याने स्वतंत्र वैचारिक व्यूह मांडला. त्यावर लिखित परिसंवाद घ्यायचे ठरविले. त्यानिमित्ताने पुन्हा स्वामी, गोविंददेवगिरी महाराजांशी संपर्क झाला. ''पाठवा मी पाहीन आणि लिहीन. कल्पना चांगली आहे.'' महाराजांनी प्रतिसाद दिला. वाचले. त्यावरील चर्चात्मक प्रतिक्रिया लिहून पाठवली. त्यातील महत्त्वाचा अंश असा ''सर्वे भवन्तु सुखिनः । सर्वे सन्तु निरामयाः । सर्वे भद्राणि पश्यन्तु । माः कश्चित दुखमाप्नुयात ।। हा विश्वकल्याणाचा मंगलमय श्लोक भारतीय संस्कृतीचा जाहीरनामा, विश्वकल्याणाच्या व लोकसेवेच्या भारतीय धारणेला, नगरचे सुविख्यात विद्वान डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' असे नाव दिले व मोठ्या अध्यवसायाने हा विचार बौद्धिक भूमिकेवरून मांडला. केवळ तात्त्विक चर्चा करण्यापुरते अथवा आपल्या विद्वत्तेचा जनप्रत्यय व्हावा म्हणून हा उद्योग करीत नसून; ते कालमानानुसार बदलत जाण्याच्या संकल्पना आणि ज्ञानसंवेदना यांचे लिखित स्वरूपात विवेचन करून; 'अध्यात्म' म्हणजे काय, याचा बोध व्हावा या भूमिकेतून आपले सारे नैपुण्य व सामर्थ्य पणाला लावतांना दिसतात. या माध्यमाने तत्त्वज्ञ, संत आणि विचारवंत यांच्या प्रबोधन

आणि सहानुभूती या सर्वात्मक भावनेने समाजधुरिणांच्या कार्याकडे लक्ष वेधण्याचा त्यांचा प्रयत्न व योगदान निश्चितच कौतुकास्पद आहे.''

श्री स्वामी गोविंददेवगिरी महाराज अध्यात्मिक, धार्मिक चळवळींमध्ये राष्ट्रीय जाणिवेसह निराळ्या सामर्थ्यवान मंचावरून प्रबोधन करतांना दिसतात. भारतीय समाजाला आस्तिकतेच्या विशुद्ध प्रवृत्तीमध्ये संस्कारित करून; पुरुषार्थ साधण्यास प्रवृत्त करण्याचे त्यांचे प्रबोधक कार्य सुरूच आहे. पाहातो आणि अनुभवतो तेव्हां, त्यांच्याविषयीचा पूज्य भाव वाढतच जातो. मी मनोमनी पुन्हा पुन्हा त्यांना वंदन करतो.

●●●



# मातृस्वरूपा

## (सोमणी वहिनी तथा सरस्वती गणपत सोमणी)

वडाखालचा चौचौकी वाडा. संत आणि सोमणी हे त्या वाड्याचे मालक. अर्ध्या भागात संत आणि अर्ध्या भागात सोमणी. दोन्ही घराणी तालेवार, घरंदाज आणि वतनदार; तेव्हढेच प्राचीन पारंपरिक वजनदार. वाड्यात प्रवेश केला की; प्रवेशद्वारापुढील ओवरीला आढ्याला, प्रतिवर्षीच्या पर्यायाची, सुबक, डौलदार, कुसरीची, ऐस, सागवानाची सिद्धेश्वराची पालखी आढ्याला बांधलेली असायची. एका बाजूला भिंतीला पालखीचा दांडा आढ्याला टेकून बांधलेला. ओसरीवर जातांना जोतं चढून जायचं. मधे चिरेबंदी चौक. हे प्राचीन परंपरेचे अवशेष नकळत मनात दरारा निर्माण करायचे. मी वाड्यातल्या दुसऱ्या भागात म्हणजे सोमण्यांकडे जायचो. या वाड्याला वडाखालचा वाडा का म्हणतात ते मला अद्यापही कळलेले नाही. माझा जन्म याच वडाखालच्या वाड्यातला. सोमण्यांच्या घरातला. आजतागायत वडाखालचा वाडा का म्हणतात ते मला कोणीच सांगितलं नाही. ते कुतुहल केव्हा शमणार कोणास ठावूक? वाडा वडाखाली आहे, असे स्वप्नात कितीतरी वेळा मी पाहिल्याचे मला जागृतावस्थेतही जाणवले आहे. याचा अर्थ मला उमगला तो असा; तिथला अक्षयवट कधीकाळी अस्तित्वात असावा. वाड्याचे पुनरुत्थान किमान पाचसात वेळा झाले असावे. शतचौकी सातमजली वाड्याचे रूपांतर होता होता, हा एक आता चौचौकी म्हणविणारा आणि दुचौकीच असलेलो भला वाडा, उभारतांना अनाहूत साक्षी वटवृक्ष आहूत झाला असावा. हा तर्कदेखील आता इतिहासजमा झालाय. कारण ह्या वाड्याचीही आता बखळ झाली आहे. ह्या वाड्यातील, सोमण्यांच्या वाटणीतील, सोमणी वहिनी मात्र माझ्या भावविश्वात, आजही मला वात्सल्याने माझी आलाबला घेतांनाच दिसतात.

जन्मापासून अवघा अडीचतीन वर्षांचा असतांना आमचे कुटुंब वडाखालच्या वाड्यातून चिरेबंदी गल्लीतल्या महाकाय संत वाड्याच्या मध्यवर्ती भागात, 'टाकळकर वाडा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाड्यात राहायला आलो. मी मात्र कधी आईला गुंगारा देऊन, या माझ्या दुसऱ्या आईकडे जायचो, ते आईला कळायचं नाही. ''गेला असेल सोमणी वहिनींकडे'' असे आई माईला म्हणे आणि माई म्हणजे माझी ज्येष्ठ भगिनी मला खमाटून घेऊन जायला यायची. आणि ती ही सोमणी वहिनींच्या मायेत गुरफुटून जायची. बराच वेळ झाला की सोमणी वहिनीच म्हणायच्या, ''शश्ये, अगं अनिलला घेऊन जा; नाहीतर काकू ओरडतील.'' नजरेतून वात्सल्य पाझरे आणि हातांचा वत्सल स्पर्श मला सोमणी वहिनींकडे खुंटवून ठेवी. माझ्या बाललीलांचे त्यांना अनिवार कौतुक. जे मला अवगत होई, गोष्टी, गाणी, नकला सारे मी सोमणी वहिनींजवळ जणू सांभाळून ठेवायला देई. त्यांना माझ्याशिवाय चैन पडत नसे.

सोमणी वहिनींना आम्ही वहिनीच म्हणत असू. खरे तर मावशी, काकू असे काही म्हणणे शोभून दिसले असते. पण आई त्यांना वहिनी आणि त्यांच्या 'अहों'ना दादा म्हणायची. आम्ही भावंडेही त्यांना त्याच नावाने हाक मारीत असू. वहिनी आईला काकू आणि माझ्या वडिलांना तात्या म्हणत असत. सगळे गाव आईला काकू आणि वहिनींना सोमणीवहिनी म्हणत असे हे मला हळूहळू उमगले. अशा नावांवरून नेमके नाते संशोधकांनाही कळणे कठीण. मात्र गावतल्यांचा घोटाळा व्हायचा नाही.

दादा अकोल्यात कधी कधी येत. वहिनी एकट्याच अकोल्यात. सगळे ओसंडून येणारे वात्सल्य माझ्याच वाट्याला यायचे. पाटी, पेन्सील, पुस्तक, लिहिणे, वाचणे या सगळ्या गोष्टी त्यांच्याशी व्हायच्या. प्रसंगी वहिनी ओरडायच्या, हाकलून द्यायच्या, ''करशील परत असं?'' दरडवायच्या. पण क्षणभरच. नंतर सारं काही एव्हढ्याशा खाऊन विरघळून जायचं. खाऊलाही अधिक गोडी यायची.

दादा कधी आले की महिना पंधरादिवस असत. त्यावेळी तर माझी चंगळच असायची. मी खोड्या करी. वहिनी दरडावत. दादा मात्र त्यावेळी खळखळून हसत. वहिनींना राग येई. लटकाच! ''डामरट आहे!'' दादा म्हणत. दिवसातून, माझ्या फेऱ्या वाढत. आई तात्या रागवत, ''सारखं काय



आहे, वहिनींकडे?'' दोघांना माझ्याशिवाय करमत नसे. मी गेलो की ''आले आनोबा'', म्हणून दोघांनाही विलक्षण आनंद असे. मी चांगला पाचवी सहावीत असेन. सोमणी वहिनी दादांबरोबर, दादांच्या नोकरीच्या ठिकाणी गेल्या. दादा 'हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन' कंपनीत कामाला होते. मला त्यांच्या जाण्याचा विलक्षण त्रास झाला. मी बोलू, सांगू शकत नव्हतो. पाचएक वर्षांनी दोघेही अकोल्यात आले. मी मोठा झालो होतो. अकरावीला असेन. आता दादा-वहिनी दोघेच नव्हते माझ्यासाठी, चांगला चारएक वर्षाचा लहानगा भाऊ बरोबर होता. त्याचे नाव त्यांनी 'अनिल' ठेवले होते. मला विलक्षण आनंद झाला. गम्मत वाटली. अभिमान वाटला. पाचसहा वर्षात वहिनी मला आणि मी वहिनींना विसरलो नव्हतो. नातं अधिक दृढावलं होतं.

मी मॅट्रिक झालो. नोकरी शोधू लागलो. कॉलेजला जाणं शक्य नव्हतं आणि परवडणारं तर नव्हतंच. वहिनी म्हणाल्या, ''जायचंय का कॉलेजला? तू खर्चाची काळजी करू नकोस!'' मला भरून पावलं. तेव्हढी समज आता मला आली होती. माईला अर्थात माझ्या थोरल्या बहिणीला टेंपररी का होईना; शिक्षिकेची नोकरी मिळाली होती. नेमणूक पुणतांब्याला होती. तिच्याबरोबर मी जायचं ठरवलं. सोबत होणार होती, पुणतांब्याला. श्रीरामपूरला कॉलेज होतं. चंद्ररूप डाकले कॉलेजला टी.डी.चा वर्ग होता. मी टीचर्स डिप्लोमाला जायचं ठरवलं. दादा वहिनींना ही गोष्ट आवडली. दोन्ही साधणार होतं. नकळत माझी कॉलेजला जाण्याची हौसही भागणार होती. त्यांचा मदतीचा हात होताच. पण माईच्या सोबतीला मी असणार होतो आणि मी प्रपंचाची जबाबदारी घ्यायला कंबर कसली होती; याचा दादा वहिनींना अभिमान होता. मी टी.डी. झालो. अठराविश्वे दारिद्र्य ही सर्वात मोठी क्वालिफिकेशन नोकरी मिळवून देण्यासाठी उपयोगी पडली. गुरुवर्य ह. वि. फडके सरांनी मॉडर्न हायस्कूलमध्ये नोकरी दिली होती. माईचे लग्न त्याच वर्षी ठरले. उरकले. वहिनींची मोठी मदत झाली. प्रपंचाचा सगळाच भार माझ्यावर पडला होता. तरी मित्रपरिवार, समाज यांच्या जबाबदाऱ्या मी सामंजस्याने उचलत होतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं काम करीत असे. वहिनींना याचंही कौतुक.

मी मित्राच्या अर्थात यशवंत रघुनाथ देशमुखच्या लग्नाला जाणार होतो. त्याला हजारपाचशेची गरज होती. त्याने मला मागितले. झाले.

एकादशीच्या घरी शिवरात्र. पण मदत करणे आवश्यक होते. होय, म्हणून बसलो होतो. आमच्याने शक्य नव्हते. शाळेतल्या कोणाला मागावे, तर नुकताच लागलो होतो. बरे दिसले नसते. मी वहिनींना म्हणालो. वहिनींनी मला पाचशे रुपये दिले. त्यावेळी काही बोलल्या नाहीत. पण मी हळूहळू त्यांना पैसे परत केले. ते पैसे यशवंतकडून घेऊन फेडायला वर्ष लागले. सगळे पैसे परत करतांना वहिनी म्हणाल्या, ''अनिल असली विकत दुखणी घेण्याचा मोठेपणा करू नये! हां तशीच अडचण असली तर मदत केलीच पाहिजे. पण लग्नकार्य, समारंभ यासाठी या तऱ्हेनं 'रीण काढून सण' करत बसू नये.'' वहिनींनी शिकविलेला व्यवहार मी माझ्या वैयक्तिक जीवनात अनुसरत राहिलो, पण परिवारातील लोकांनाही जमेल तसे सांगत राहिलो.

तात्या, मी मॅट्रिक झालो त्याच महिन्यात निवृत्त झाले. साधे पोस्टमन. त्या काळात म्हणजे १९६० साली पेन्शन किती बसणार? बसली बेचाळीस रुपये. खाणारी सहा माणसं. भावंडांची शिक्षणं, माईचं लग्न, दुखणीबाणी सारं माझ्या तुटपुंज्या नोकरीवर येऊन पडलं. एव्हाना दादा गेले होते तरी वहिनींनी मदतीचा हात तसाच ठेवला. माझ्या धडपडण्याचं, त्यांना केव्हढं कौतुक!

दादांना अर्धांग झालं होतं. वहिनींना कसल्याश्या कामासाठी जायचं होतं. आठ दिवसांचा प्रश्न होता. मी वहिनींना म्हणालो, तुम्ही काळजी करू नका. मी पाहीन. मी दादांचं सगळं करी. मी जेवण भरवू लागलो, उचलून नेऊ लागलो की दादांना खूप हसू येई. ते माझ्याकडे पाहून हसत बसत. वहिनी आल्या. त्यांना माझं कौतुक आणि अभिमान वाटला.

'अनिल'ने चांगले शिकावे, मोठे व्हावे असे त्यांना वाटे. त्याच्या शिक्षणात त्यांनी लक्ष घातलेले. अनिल कधी माझ्याकडेही मार्गदर्शनाला येई. मलाही अनिल माझा धाकटा भाऊच वाटे. कसे कोण जाणे त्यालाही माझी आंतरिक ओढ आहे.

आता वहिनी नाहीत. 'आईची माया म्हणजे आभाळाची माया' याची अमृत अनुभूती वहिनी देऊन गेल्या. वैयक्तिक, जीवनातील अन्य सर्व गोष्टींपेक्षा स्वतःतलं आईपण जपण्याची किमया प्रकृतीने प्रकृतिरूपा स्त्रीत प्रेरित केली आहे याचा अनुभव मी वहिनींच्या मातृस्वरूपात अनुभवत होतो. दूरदूरपर्यंत नातं नव्हतं, मानलेलं नातं! तरी आंतरिक हक्काचं! हेच ऋणानुबंधाचं स्नेहबंधन. अनिल भेटला की वहिनी आठवतात आणि आभाळ दाटून येतं. ●●●



# माईची माया
## (शशिकला नागेश सहस्रबुद्धे तथा मधुकांता मधुकर गाडगीळ)

मी मॅट्रिकला असतांनाची गोष्ट. तात्यांच्या नोकरीचे शेवटचेच वर्ष होते. अलिकडे, डिलेव्हरी करतांना, मनिऑर्डर वगैरेचे पैसे देता, घेतांना गोंधळ होई. लोकांना तात्यांविषयी विलक्षण आदर आणि विश्वास. लोक खूपच सांभाळून घेत. एकदा तर शंभराची नोट नोटेला चिकटून गेली. परत पोस्टात आल्यावर हिशेब लागेना. त्रेसष्ट-चौसष्टमध्ये शंभराची नोट म्हणजे खूपच मोठा ऐवज. पोस्टातल्या पोस्टमास्तर वगैरेंनी तात्यांना धीर दिला. घरी कळले तेव्हां सगळेच चिंतीत झाले. आईतर हबकलीच. आई डबे करून, जेवायला घरी कोणाला ठेवून, कसाबसा गाडा चालविण्याचा प्रयत्न करी; तर मॅट्रिक होऊनही अद्याप नोकरी नाही म्हणून बावीसतेवीसची ऐन तारुण्यातली, उफाड्या अंगाची माझी माई, दोन नंबरची बहीण, शिकवण्या करी. घरच्यासारखे संबंध असलेल्या घरात, नदीवरून घागरीने पाणी वाही, आईला घरात सर्वतोपरी मदत करी. जणू आईतात्यांच्या प्रपंचाचा भार स्वतःच्या शिरावर घेऊन काम करी, बालवाडी चालवी. एकूणच तीच आता घरातली कर्ती झाली होती. नाईलाज होता. तिच्या पाठीवरल्या भावाला नोकरीसाठी दत्तामामाने बीड जिल्ह्यात नेलेले पण अद्याप नोकरी नाही. अशा परिस्थितीत, तात्यांकडून जर असे घडू लागले तर कसे होणार; या कल्पनेनेच आईचे हबकणे स्वाभाविक होते. तात्यांना मुळात जेमतेम पगार नव्वद रुपये. हातात पडत ऐंशी रुपये. मोठे

कुटुंब. आम्ही असे गेलेले शंभर रुपये कसे फेडावेत. दुसरा दिवस उजाडला आणि सकाळीच माळीझापचे ते गृहस्थ टाकळकर वाड्यात तात्यांची चौकशी करीत आले. ''काय पपाजी आज सकाळीच इकडं'' टाकळकर मामांकडे सगळ्यांचे येणे-जाणे असल्याने मामांनी विचारले. ''तात्यांकडे आलो!'' ते म्हणाले. तात्या, आई आणि आम्ही भावंडे घाबरलो. आता आणखी काय झाले असावे? पपाजी घरात आले, ''अहो तात्या, काल मनिऑर्डर देतांना तुम्ही मला शंभर रुपये जास्त दिले. नोटेला नोट चिकटलेली. मी पाहू लागलो तर शंभराची नोट जास्त. मी हाक मारतोय, तर तुम्ही तरा तरा लांब निघून गेलात. मला मळ्यात जायची घाई होती. म्हटलं सकाळचंच जाऊ. हां हे घ्या.'' पपाजी म्हणाले. आम्हाला साक्षात देव प्रकटल्यासारखे वाटले. ''तात्या जरा जपून करत जा, थोडा दिसण्यावर परिणाम झालाय का?'' पपाजींनी विचारले. तात्यांच्याच नव्हे तर आम्हा सर्वांच्या डोळ्यात पाणी होते. ''गावातले सगळे लोक सांभाळून घेणारे म्हणून बरं. खूप उपकार झाले'' आईच पुढे होऊन म्हणाली.

''आई, माझ्याही प्रयत्नांना अजून यश येईना, आज उद्या ऑर्डर येईल म्हणून वाट पाहते आहे. पण...'' माई म्हणाली, जिल्हा परिषदेकडे शिक्षिकेच्या नोकरीसाठी खटपट करीत होती. यादीत नाव आहे असे कळले होते तेव्हांपासून हुरावून गेली होती. वाट पाहात होती. ''नोकरी मिळालीना की मी तात्यांना रजा घेऊन घरी बसायला सांगेन. आता काय सात आठ महिने राहिलेत. त्यात काही नको'' माई काळजीने आईला म्हणाली. ''काय करणार शशे, देव पाण्यात घालून बसल्येय. पण देवच दडी मारून बसला तर काय कराच?'' आई काम करता करता म्हणाली. प्रसंग निभावला. सगळे आपापल्या कामाला लागले. मी शाळेत गेलो. शनिवारचा दिवस. दुपारी डिलेव्हरी गावात करता करताच तात्या घरी आले. असे कधी येत नसत. ''शशे हे बघ काय पाकीट आहे ते!'' म्हणाले. आवाजात उत्सुकता, काळजी आणि आतुरताही होती. माईने पाकीट उघडले, पाहिले आणि आनंदाने ओरडली, ''अहो, तात्या ऑर्डर आहे. मला सात दिवसात कोपरगावच्या तीन चारीवरच्या शाळेत हजर व्हायला सांगितलंय''. तात्या, आई आनंदाने गहिवरले. आईने देवापुढे साखर ठेवली, ''तू आहेसरे बाबा'' म्हणाली. मी शाळेतून घरी आलो. घर आनंदाने फुलून गेले होते. मी, बाल्या (रमेश) आणि नंदा (विद्या) आम्ही लहान



भावंडे. ''माई पेढे?'' मी म्हणालो. आईने पाच रुपये दिले. पेढे घेऊन आलो. मामांना आणि वाड्यात सर्वांना दिले. संध्याकाळी सहा साडेसहाला तात्या आले. आनंद, काळजी आणि थकलेपण सगळेच एकवटले होते. चहा घेता घेता म्हणाले, ''शश्ये तुला नोकरीला पाठवावं लागतय,'' तात्यांचा चेहरा, डोळ्यातील अश्रू शिकस्तीने थोपवीत, भरल्या काळजाने बोलण्याचा प्रयत्न करीत होता. सगळेच गंभीर झाले. ''तात्या भलता विचार नाही करायचा, अहो आत्ता अनिल मॅट्रिक होईल. तवर सोसायचं. आणि तात्या हल्ली मुली सगळ्या नोकऱ्या करतात बरं का!'' उत्साहाने, प्रोत्साहनाने आणि कर्तेपणाच्या भावनेने माई बोलली आणि घरातले वातावरण बदलले. एकाच दिवशी नाट्यमयतेने घरातले वातावरण एकदम बदलून गेले होते. आता माईने कधी जायचे? बरोबर कोण जाणार? यावर चर्चा सुरू झाली होती.

सोमवारी मी आणि माई तीनचारीत दाखल झालो. अनंत प्रश्न, अनंत अडचणी. माईला तेथे सोडून येतांना माझ्या तरुण मनाची होरपळ झाली. माईने दिवस काढले. मार्चपर्यंतचा काळ संपला. ऑर्डरचा कालावधी संपला. माई अकोल्यात आली. पुढच्या ऑर्डरची प्रतीक्षा सुरू झाली. डोळ्यात प्राण आणून वाट पाहाणे सुरू झाले. मे अखेरीस माझा मॅट्रिकचा निकाल लागला. मी उत्तीर्ण झालो. सात विषय घेऊन दिव्य केले होते पारित झालो. घरादारात उत्सव झाला. दोन दिवसांनी तात्या सेवानिवृत्त झाले. पेन्शन बसली बेचाळीस रुपये. काळावर मात करून पुढे जायचे होते. मी पुरा न होऊ शकणारा हट्ट धरून बसलो होतो. कॉलेजमध्ये जायचेच! आई आणि माई दोघींनाही मी कॉलेजला जावे असे वाटत होते. पण जाणार कसे आणि कोणत्या बळावर? मी कमवून शिकेन; तर माझा मी एकला बाहेर पडून प्रपंच वाऱ्यावर कसा सोडणार? आज ना उद्या माईचे लग्न करणे आवश्यक होते. जूनच्या साधारण दुसऱ्या आठवड्यात माईला पुन्हा ऑर्डर आली. पुणतांब्याच्या शाळेची. विचार करता मुंदडेबाईंनी उपाय सुचविला. आधार दिला. माईनी माझी समजूत घातली. मलाही समजून घेणे भागच होते. दोघांनी बाईंकडे राहावे. माईने पुणतांब्याला जाऊन-येऊन करावे आणि मी टीचर्स डिप्लोमाचा कोर्स करावा. दुधाची तहान ताकावर भागवावी असे वाटले. माईने एक प्रकारे माझ्या जन्माचे उद्दिष्ट आणि भाकरीचे कौशल्य माझ्या हाती ठेवले. सुरुवातीला तीन-चार महिने आम्ही बाईंकडे राहिलो. माईचा त्रास पाहावेना आणि मला संकोचून

राहाणे शक्य होईना. मुंदडेबाईंच्या सल्ल्याने माई आणि मी पुणतांब्यात खोली घेऊन राहू लागलो. माझे येणे-जाणे सुरू झाले. पुणतांब्याला एका आठ बाय आठच्या खोलीत आम्ही भावंडांनी स्वतंत्र बिऱ्हाड थाटले. माईने सारे काही तीसपस्तीस रुपयात भागवून साठ रुपये घरी पाठवण्याचा निर्णय घेतला. ती शिकवण्या करू लागली. माझा रेल्वेचा पास, डबा, जाणे-येणे सारे सांभाळत माई, आईकडे डोळे लावून दिवस काढीत होती. ते सहा महिने काढण्याचे अक्षरशः दिव्य माईने केले. मला सांभाळले. आठवले की अंगावर काटा येतो. माईच्या मायेने आईच्या आणि माझ्याही डोक्यावर आभाळाची माया पांघरली. फेब्रुवारी संपत आला. माईला मार्च-एप्रिल एन्डपर्यंतच ऑर्डर होती. माझी परीक्षा एप्रिलमध्ये होणार होती. सहज म्हणून रविवारी अकोल्यात आलो होतो. पू. फडके सरांकडे गेलो. त्यांनी विचारपूस केली. मी गणित, शास्त्र, हिंदी आणि स्पेशलफिल्ड ऑफ एज्युकेशन-फिजिकल एज्युकेशन असे घेतल्याचे समजताच त्यांना कसलीशी आठवण झाली. म्हणाले, ''अनिल एक मार्चपासून एप्रिलअखेर दोन महिने शाळेत शिक्षक म्हणून येतोस का?'' मी मागचापुढचा विचार न करता, येतो म्हणालो. माईला सांगितले. तिला विलक्षण आनंद झाला. पण पुन्हा दोन महिन्यांसाठी सगळेच प्रश्न निर्माण झाले. पुन्हा मुंदडेबाईंशी विचारविनिमय केला. अखेर त्यांनी सांभाळून घेतले. मी मॉडर्न हायस्कूलमध्ये रुजू झालो. अवघे अठरावे वर्ष सुरू होते. ऑगस्ट महिन्यात पूर्ण होणार होते. गुरुवर्य फडके सरांच्या लक्षात आले पण त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. श्री. नेहुलकर सरांच्या जागी मी गणित आणि शास्त्राचा शिक्षक म्हणून काम करू लागलो. मार्च-एप्रिल परीक्षेचे दिवस असल्याने मला खूपच मेहनत घ्यावी लागली. मी सराईत शिक्षकासारखा रुळलो. माझीच शाळा असल्याने शाळेचा स्वभाव आणि व्यक्तिमत्त्व माहीत होते. या सगळ्याचा परिणाम म्हणजे मी टेंपररी लागलोय. एप्रिलमध्ये ही नोकरी संपणार आहे, हेच सगळे विसरून गेलो. माई नोकरी संपवून आली. मी रजा घेऊन परीक्षेला जाऊन आलो. मी नोकरीला लागलो ह्याचा विलक्षण आनंद झाला. मोकळे झाल्यासारखे वाटले. आता माईला, कधीका पुढची ऑर्डर येईना किंवा ट्रेनिंगला निवड होईना, धास्ती नाही असे वाटू लागले. दुसरीकडे कसे कोण जाणे पू. फडके सर, साठे सर यांनी माईसाठी स्थळ सुचवले. आईला बोलावून सांगितले. मला तर मी नोकरीला लागल्यापासून मीच घरातला कर्ता पुरुष झाल्यासारखे वाटू लागले



होते. झाले, फडके सरांच्या मध्यस्थीने गाडगीळ सरांच्या भावाशी अर्थात मधुकर गाडगीळ यांच्याशी माईचा विवाह ठरला. मे महिन्यात सगळी जमवाजमव करून; माईचे लग्न उरकले. लग्न झाले आणि सगळेच भानावर आलो. माईची नोकरी संपली. आता पुन्हा मिळाली तरी पगार गाडगीळांकडे जाणार. माझी नोकरी संपली. माईच्या लग्नामुळे त्या काळातही तीनचार हजार रुपयांचे कर्ज झालेले. पासष्ट सालात ते कर्ज डोंगराएवढे होते. तात्यांना अवघी बेचाळीस रुपये पेन्शन होती. अंधार दाटला. अवतीभोवतीचे धीर देत होते. मी 'टी.डी.' झालो होतो. नोकरी लागण्याची शक्यता होती पण, नव्हती पण, हे वास्तव होते. माई आता मधुकररावांच्या नोकरीच्या ठिकाणी जाणार होती. ''आई, काळजी करू नकोस, अनिलला नोकरी मिळेलच. फडके सरही पाहातो म्हणाले आहेत. तोपर्यंत मला नोकरी मिळाली तरी त्याला नोकरी मिळेपर्यंत मी पाहीन!'' माई म्हणाली. सोबत मधुकररावही होते. त्यांना परिस्थितीची जाणीव झाली, तेही म्हणाले, ''तात्या काळजी करू नका, आम्ही दोघे आहोत.'' तात्या आईच्या डोळ्यात पाणी तराळले. ''शश्ये अगं, मुलीच्या नोकरीचे पैसे घ्यायचे बरं वाटतं का? लागेल अनिलला नोकरी, तवर मी जीवाचं नावं शिवा ठेवून कष्ट करीन, तू इकडची काळजी करू नकोस निभावेल कसंतरी.'' आई म्हणाली. ''आई, माझ्या लग्नाची उगाच घाई केलीस, सगळं स्थिरस्थावर झाल्यावरही लग्न करता आलं असतं'' माईचं हे बोलणं ऐकून सगळ्यांनाच अनावर झालं. माई आता सौ. मधुकांता मधुकर गाडगीळ झाली होती. खरं तर तिचं लग्न जगराहाटीप्रमाणे पाच वर्षांपूर्वीच होऊन जाणे अपेक्षित होतं. दारिद्र्याच्या होरपळीवर फुंकर घालता घालता तिनं तिच्याच तारुण्याचं इंधन प्रपंचासाठी लावलं होतं. कर्तव्यबुद्धीनं, जबाबदारीनं, प्रेमानं आणि कर्तेपणानं. ''आपलं चालूच राहणार, पोरीला किती दिवस तसंच ठेवाचं. परमेश्वराला डोळे. ती लाख म्हणाली तरी आपण का तसंच वागाचं!'' आईचं हे मधूनच प्रकटणारं पालुपद जिव्हारी लागायचं. मी नोकरीच्या शोधात जीव खाऊन लागायचो. परमेश्वर परीक्षा पाहतो म्हणतात तसं घडत होतं खरं. जून सरला. किमान वीसपंचवीस ठिकाणी हात पसरून पाहिले. पण नकारघंटाच वाट्याला. रोज संध्याकाळी फडके सरांचं डोकं खायचं. कधी आईनंही जायचं. त्याचा त्यांनाही ताण आला. काय करावं कळेना. एक दिवस त्यांनी तिरीमिरीसरशी, ''उद्यापासून शिपाई म्हणून येतोस का?'' विचारले. मी हो

म्हणालो. सरांच्या डोळ्यात पाणी आले. जणू माईच्या लग्नाची मध्यस्थी करून त्यांनी आमचे कुटुंब दत्तक घेतले होते. माईला तर त्यांनी जणू शब्दच दिला होता. पण संधी चालून आली आणि मी शिपाई म्हणून शाळेत गेलो. त्याच दिवशी येऊ घातलेले देशमुख नावाचे शिक्षक येणार नसल्याचा टेलिग्राम आला. सरांनी मला ''उद्यापासून मास्तर म्हणून ये'' सांगितले. अकरा जुलैपर्यंतचा काळ चक्रीवादळात सापडलेल्या कागदाच्या कपट्यासारखा आमच्या कुटुंबाला कोठे घेऊन जातो कळत नव्हते. जणू माईच्या असण्याला, नशीबाला आमचे नशीब बांधले होते. मला नोकरी मिळाली आणि माई खऱ्या अर्थानं आईतात्यांच्या प्रपंचपाशातून मुक्त झाली. भेटली तेव्हा आम्हा दोघांना रडू आवरत नव्हतं. बोलत काहीच नव्हतो. माई आणि मी परस्परांकडे पाहून पाहून हमसून हमसून रडत होतो. त्यात आईची भर.

माईचा प्रपंच सुरू झाला. त्यातच डी.एड. साठीच्या ट्रेनिंगला निवड झाली. बदल्या आणि बाळंतपणे यांनी तिच्या संसाराला खूपच व्यग्रता आली. आई माईच्या या व्यग्रतेत तिच्याबरोबर सतत राहिली. निभावले. आईच्या अनुपस्थितीत आम्हीही अकोल्यात कसे बसे निभावत होतो. एव्हढ्या व्यग्रतेतही माईचे माझ्या नोकरीकडे, शिक्षणातील प्रगतीकडे बारकाईने लक्ष असे. खोदून खोदून प्रश्न विचारून माझ्या शैक्षणिक प्रगतीविषयी जाणून घ्यावे. माझे उदंड कौतुक करावे. पुढे शिकण्याचा हट्ट धरावा. मी बहात्तर साली बी.एड्. झालो. आई, तात्या, ताई, बाळासाहेब यांच्याबरोबर तिनेही माझ्या लग्नाचा आग्रह धरला. प्रसंगी आर्थिक मदतीचा हात पुढे करावा. मी ही तेव्हढ्याच तत्परतेने व्यवहारात चोख असावे. त्याचाही तिला केव्हढा अभिमान. घर बांधणे, एम.ए. करणे, पीएच.डी. करणे, आकस्मिक आलेल्या संकटांना तोंड देणे सगळ्या सगळ्या गोष्टीत माईने आईच्या मायेने उदंड आशीर्वादासह सक्रिय पाठराखण केली. मीही सतत माईच्या प्रपंचाला माझ्या परीने जे जे म्हणून करता येईल. ज्या परीने करता येईल तेवढी खऱ्या अर्थाने आणि कर्तव्यतत्परतेने पाठराखण करीत गेलो. माईला या सगळ्याच गोष्टींचे एवढे कौतुक की प्रसंगी मला संकोचल्यासारखे होई.

मुलांची शिक्षणं, लग्न, कार्य या सगळ्याच बाबतीत ही सगळ्यांना एकच सांगे. ''अनिल सांगेल. तो पाहिल काय करायचं ते.'' हे तिचे पालुपद आजही सुरूच आहे. नकळत सतत कर्तेपणाची, जबाबदारीची जाणीव ती



मला करून देत आली; असे नव्हे. तिला मी म्हणजे सर्वात ज्ञानी, सर्वात मोठा साहित्यिक, सर्वात मोठा प्रमुख पाहुणा आणि काय काय वाटते ती गोतावळ्यातल्या सर्वांना, शेजाऱ्यापाजाऱ्यांनाही ते ऐकवते. मला मात्र संकोचल्यासारखे वाटते. तिच्या मनातल्या अथांग मायेच्या उबेत राहणेच मी राहणे पसंत करतो आणि सुखावतोसुद्धा!

●●●

# वात्सल्य शारद
## (सौ. शारदा विनायक नातू)

''भोग आहेत, त्याला काय कराचं, त्यांच्यावर भरोसा ठेवाचा आणि भोगाचं'' हे जीवनभोगसूत्र अवलंबिल्याशिवाय मार्ग तरी कोणता असतो माणसाकडे. ब्रह्मसूत्रच ते! ''आपण चांगलं कराचं, हे आहे नं आपल्या हाती. एक डोळा हसवतो नि एक डोळा रडवतो, त्याशिवाय माणसाला त्याची किंमत तरी कशी कळाची?'' अशी कर्मनिष्ठा आणि नियंत्याची नियती, विवेकानं समजून, अखंडपणे, गृहकर्मयोगिनी म्हणून जगतांना, मी गेली चार तपं, सौ. शारदांना पाहात, अनुभवत आलो आहे.

जून महिन्यात, पडत्या पावसात, शोभाच्या अर्थात उषाच्या आणि माझ्या विवाहाचा योग जुळून आला. निम्नमध्यमवर्गीय, त्यात टपालखात्यात सेवारत असलेल्या, सरळमार्गी, कोकणस्थ ब्राह्मणाची पहिली मुलगी उजविण्याचा हा प्रसंग. कल्याणहून अकोल्याला आलेल्या; विनायक आणि शारदेच्या जोडीला; एव्हढे झटपट सगळे घडेल, याची कल्पनाही नव्हती. तसे त्यावेळी उषाचे वय जेमतेम अठरा एकोणीस वर्षांचे, उलट मीच गद्धेपंचविशीतला. पण या मध्यमवर्गीय युगूलाला तीन मुली उजवण्याची केव्हढी चिंता. बैठक झाली. लगेच साखरपुडा करायचा ठरले. लगोलग अवघ्या आठदहा दिवसांनी लग्न होणार होते. कुटुंब, ओळखीतल्या मान्यवरांसह कन्येला घेऊन अकोल्यात आलेलं. शारदाबाईंकडे मधूनच माझं लक्ष जाई. धपापल्या, काळजीभरल्या, काळजाची संवेदना डोळ्यातून डोकावतांना, कौतुक, आनंद आणि करुणापूर्ण



वात्सल्याने, काळजीवर मात करून; माझ्याकडे भरल्या नजरेनं पाहावं. काही आश्वासक गवसल्याचा भाव मुद्रेवर पसरतांना, मनोमनी आम्हा दोघांची अलाबला घेत वावरावं; हा विलक्षण, पवित्र तेव्हढाच जबाबदारीची जाणीव करून देणारा अनुभव शारदाबाईंची भावमुद्रा, त्यांच्या अवघ्या हालचालीतून; थेट माझ्या मनात, खोलवर, संचिताचं बोहलं बांधित होती. तेव्हांपासून मी ह्या माऊलीला अनुभवत आलो आहे.

लहानपणीच पोरकेपणानं चासकमान गावी कोणा लांबच्या नातलगाच्या आश्रयानं जगणं वाट्याला आलं. विधवा वहिनीनं सावत्रपण बाजूला सारून, दारिद्र्याच्या वळचणीला, आपल्या बरोबर या पोरक्या पोरीला सांभाळण्याचाही विडा उचललेला. माणुसकीच्या आर्तघन जाणिवांसह, दोघींनी एकमेकीला समजून सांभाळण्याचं दिव्य अनुभवलेलं जीणं, जेव्हां मला सुखदुःखाच्या उजळणीतून कळलं; तेव्हां तर मी, या आनंदमग्नतेनं, मध्यमवर्गीय काटकसरी, हिशेबी आणि महिनाअखेर कशीबशी निभावून नेणाऱ्या माऊलीला, मनोमनी दंडवत घातला. ''संस्कृति ही जणू सुमूर्त स्त्री माझे नाव असे'' या स्त्रीसूक्ताचा मी शारदाबाईंत अनुभव घेत आलो. हां एक खरे, शारदाबाई माझ्या सासूबाई आणि मी त्यांचा जावई, हे नातं अपेक्षित क्षितिजांसह अवकाश सांभाळत राहिलं. नात्याचं एक अनोखंपण असतं. त्या त्या नात्याचं एक वेगळं सांस्कृतिक सौंदर्य असतं. याचाही प्रत्यय मला, नेहमीच, त्यांच्या सान्निध्यात, नित्य येत राहिला.

स्वप्निलच्या जन्माचा उत्सव होत असतांना, हरखून गेलेला सासूबाईंचा चेहरा, माझ्या डोळ्यासमोर नेहमीच तेजोनृत्य करतो. प्रत्यक्ष परब्रह्म घरात प्रकटण्याचे भाग्य लाभले आहे; असे त्यांचे डोळे, सगळ्यांना जयघोष करीत सांगत होते. उषाला पहिला मुलगा झाला याचं त्यांना विलक्षण अप्रूप होतं. निगुतीनं बाळंतपण करतांनाची शारदाबाईंची लगबग ''नंद के घर आनंद भयो । जय कन्हैय्या लाल की । हाथी घोडा पालकी । जय कन्हैय्या लाल की ।'' या आनंदोत्सवाचे स्मरण घडवित होती. मी स्वप्निलला बघायला गेलो तेव्हांचा त्यांचा आनंद, त्यांच्या डोळ्यातून चमकून माझ्याकडे झेपावत होता. त्यांची ओतप्रोत तृप्त नजर माझ्या मुद्रेचा वेध घेत होती. स्वप्निलला माखून्हाऊ घालतांना, त्यांचे आभाळभरले वत्सल हात, त्याच्यावरून फिरतांना, चोरटी नजर माझ्या तृप्त नजरेचा अंतरबाह्य ठाव घेत होती. मला सासूबाईंच्या या

दिव्य मायापखरणाची खूप गंमत वाटत होती. मनमुराद आनंदानं भरून जात होतं. ''शोभे नीट बघून ठेव हो'' असं त्या मधेच म्हणत तेव्हां सुखावून, लाजणारे, उषाचे डोळे मला मोरपिसासारखे जपून ठेवावेसे वाटे. रडणं, शी करणं, शू करणं, भुकेनं आकांत मांडणं, नजरेनं रंगवेध घेणं; सगळ्यासगळ्यांचं केव्हढं कौतुक, सासूबाईंच्या नेतृत्वाखाली अवघ्या प्रियजनांत! बारशाचा थाट करतांना तर सासूबाईंची दिमाखदार लगबग त्यांच्या मुद्रेला भरतीच्या चंद्राचं लोभस आणि अमृतसिंचक रूप देत होती.

माझा विवाह झाला तेव्हां मी बी.ए., बी.एड्. झालेला सेकंडरी टीचर होतो. एम.ए. झालो. पीएच.डी. झालो. ज्युनिअर कॉलेज, सिनिअर कॉलेज आणि एका मोठ्या महाविद्यालयाचा प्राचार्य झालो. अनेक ग्रंथांचा लेखक झालो. अनेक पुरस्कार मिळाले. माझ्याबरोबर सौ. उषाही पुढे शिकली. बी.ए.बी.एड्. झाली. माझ्या बरोबरीने नोकरी करू लागली. या सगळ्या प्रवासात, प्रत्यहीही, आईंचा प्रसन्न, प्रसादपूर्ण आशीर्वाद बळ देत होता.

आणीबाणी जाहीर झाली. त्या दिवसात 'आई' अर्थात सासूबाई अकोल्याला आमच्याकडे आलेल्या होत्या. धरपकड सुरू होती. मी रा.स्व. संघाचा, अकोल्यातला महत्त्वाचा कार्यकर्ता होतो. संघचालक डॉ. चं. प्र. देशपांडे यांना उचलले होते. यादीत माझे नाव दुसऱ्या क्रमांकावर होते. सौ. उषाला हे माहीत होते. अजून सौ. उषाला नोकरी वगैरे तर नव्हतीच पण तिचे शिक्षणही झाले नव्हते. स्वप्निल उणापुरा दोनअडीच वर्षांचा. आम्हाला घरदार, शेतीभाती काही नाही. नोकरीशी उठायचं नि नोकरीशी बसायचं. माझी आई सामाजिक कार्यकर्ता होती. त्यामुळे तिला या सर्व परिस्थिचीचं आकलन झालेलं होतं. त्यात घरात खाणारी चार माणसं. सौ. उषा धास्तावली होती. स्वाभाविकपणे आईंच्या हे लक्षात आलं होतं. सौ. उषा तरी कोणाजवळ बोलणार होती? मी शाळेतून घरी आलो. त्या दोघींचं काही बोलणं सुरू होतं. मायलेकींचं बोलणं जावयाने चोरून ऐकू नये म्हणतात; पण मी ही सौ. उषाच्या मनःस्थितीने चिंतीत होतोच. उषा रडलेल्या आवाजात आईंशी बोलत होती. मी गुपचूप कान टवकारले. ''हे बघ शोभे, त्यांनी काही चोऱ्या केलेल्या नाहीत. देशावर प्रेम करणं हा का गुन्हा आहे? करूदेत मेल्या सरकारला काय कराचं ते! जे जगाचं होईल ते आपलं होईल. घाबरून, रडून चालणार नाही; आणि आम्ही आहोतच ना! कसंही करू! तुझ्या सासूबाई



बघ डगमगताहेत का?'' मी ऐकत होतो. मी मनोमनी माऊलीच्या महद्शक्तीला अभिवादन केलं. स्वातंत्र्य चळवळ, शिवरायांचं स्वराज्य यशस्वी होण्यातलं मुख्य कारण मला उमगलं! दुर्दैवानं म्हणा की सुदैवानं म्हणा मला उचललं गेलं नाही. डॉ. चं. प्र. देशपांड्यांवरच भागलं. एव्हढच नव्हे तर मी सत्याग्रह करून नाशिक सेंट्रल जेलची हवा खायला गेलो; तेही फक्त पंधरा दिवसांवर भागलं. सौ. शारदाबाईंच्या त्या जाणत्या शहाणपणाच्या दर्शनानं, माणसातलं, या जिजीविशेचं मर्म कळलं. कर्मविपाकातली कुटुंब व प्रपंचनिष्ठा समजली.

८१-८२ सालातली गोष्ट. सौ. उषाला अचानक व्हिट्रस हिमरेजचा डोळ्यात त्रास सुरू झाला. अंधत्व येण्याचा प्रसंग. डोळ्यात उतरलेलं रक्त, पंधरा तीनवार मुंबईतल्या जे. जे. हॉस्पिटलमधील ट्रिटमेंटने गेलं. मी निःश्वास टाकला. एव्हाना माझ्या पदरात दोन मुलं होती. मी पीएच.डी. होऊनही 'वनवासी कल्याण आश्रमा'च्या कार्यात झोकून दिल्यामुळे, सिनिअर कॉलेजला वगैरे गेलो नव्हतो. एकटाच कमावता. अवतीभोवती सगेसोयरे पुष्कळ पण सगळेच माझ्यासारखे मध्यमवर्गीय. आपला त्रास कोणालाही होता कामा नये हा परंपरेने दिलेला संस्कार. त्यातही आपण कुटुंबाव्यतिरिक्त सामाजिक जबाबदारी घेतली तर कुटुंबातली कर्तव्य भागवून मग उठाठेव करावी हा दंडक. सौ. उषाच्या या दुखण्याचा दचकदिवा सतत मनात. घडलेही तसेच. पुन्हा त्रास सुरू झाला. पुन्हा 'जे. जे.' पण काही होईना. अहमदाबादला डॉ. नागपालांकडे जावे लागणार होते. ८२-८३ च्या काळात सुमारे पासष्ट हजार रुपयांचा खर्च होणार होता. आभाळ फाटले. सौ. उषा कोलमडली. मी हबकलो. ठाण्याच्या डॉ. राम भागवतांनी नागपालांशी संपर्क केला. ते अमेरिकेत गेलेले. तोपर्यंत सहा महिने डोळ्यात इंजेक्शने घेणे आवश्यक होते. ती सर्जनकडून घ्यायची. तेही करून झाले. सहा महिन्यांनी जाण्याचा प्रसंग आला. मला तर जाणे आवश्यकच होते. तोवर सासूबाईंच्याभोवती व्याप खूपच वाढलेला होता. माझ्या आईने मुलांची जबाबदारी घेतली. तेव्हढ्यात तात्या बापट आणि लक्ष्मणराव इनामदार या पूजनीय संघकार्यकर्त्यांचा प्रवास झाला. अहमदाबादला जायचे कुठे, राहाणे इ.इ. व्यवस्था संघ कार्यालयातून होणार होती. तरी आमच्याबरोबर कोणी येणे आवश्यक होते. माझ्या सहकारी शिक्षक मित्रपरिवाराने पैशाची तरतूद केली होती. मी कसे निस्तरणार होतो? पण परिस्थितीशी झुंज देण्याची सवय होती. निघालो. सासूबाईंना म्हणणे म्हणजे संकट होते. पण

त्याच सरसावल्या. म्हणाल्या, 'मी येते.' मला हायसे वाटले. संपूर्ण अंधत्व येण्याचा प्रसंग. सौ. उषाचे मन सांभाळणे भाग होते. सगळ्या अडचणींकडे पाठ फिरवून कोसळणाऱ्या आभाळाला पेलायला त्या निघाल्या. सुदैवाने संघाच्या माध्यमातून पोचण्या-राहण्याची व्यवस्था होणार होती. गेलो. आमची चोख व्यवस्था, तत्कालीन अहमदाबादच्या संघ कार्यालय मंत्र्यांनी अर्थात श्री. नरेंद्र मोदी नावाच्या पूर्णवेळ कार्यकर्त्याने केली. रेवाबाई धर्मशाळेतल्या खोलीपुढील अंगणात सतरंजीवर, आई, उषा, मी आणि श्री. नरेंद्रभाई बसायचो. प्रसंगी श्री. नरेंद्रभाईंनी समुपदेशन केले. सौ. आईंची धीरोदात्तता त्यांनी सौ. उषाला समजावून सांगितली. दोनतीन दिवसांनी ऑपरेशन झाले. एक डोळा निकामी झाल्याचे कटू सत्य सांगितले गेले. पण एक डोळा पूर्ण वाचला. सौ. शारदाबाईंनी अर्थात आईंनी अर्थात माझ्या सासूबाईंनी सौ. उषाला ज्या संयमाने, धैर्याने आणि जीवनप्रेरकतेने सांभाळले, त्याला तोड नाही! केवळ आणि केवळ त्यांच्या पाठीवरल्या आणि डोक्यावरल्या हाताने सौ. उषा पुन्हा उभी राहिली. त्यानंतर पुढे शिकली. बी.ए.बी.एड्. झाली. आयुष्याची दोन तपे नोकरी केली. माझ्या उद्‌ध्वस्त होऊ पाहाणाऱ्या, उन्मळून पडणाऱ्या प्रपंचाला, मुळातून उभे राहण्याचे सामर्थ्य सौ. उषामध्ये या मातृभूमिकेतून मिळाले.

सहस्रचंद्रदर्शन पार करून; 'शतंजीव शरदो'चे भाग्य संपादन करण्याच्या वाटेवर पणजोबा श्री. विनायक महादेव नातूंच्या सौभाग्यवती शारदीदेवींच्या भोवती लेकी, सुना, नातवंड, पतवंड यांचा गोतावळा आहे. कुटुंबवत्सलतेने आणि कासवीच्या मायेने शारदाआजी या सगळ्या प्रगमनशील गोतावळ्याचं उदंड कौतुक करीत आहेत. गोतावळा आपले विलक्षण अनुभवकण भावूकतेने आजींच्या रांजणात साठवण्यासाठी लडिवाळपणे झेपावतो आहे.

वार्धक्याच्या खुणा क्षणाक्षणाला गर्द होत असतांनाही, आई कलावतींची उपासना निष्ठेने सुरू आहे. सुखदुःखांचे उन्हाळे पावसाळे अंगावर समर्थपणे सोसण्याची हिंमत हारलेली नाही. आरोग्यसंपन्न हिवाळ्याची उब सगळ्यांना देण्यासाठी आतुरता, उत्सुकता, तीतीक्षा आणि धैर्य अद्याप ताजेतवाने आहे. जीवनदृष्टी निखळ आहे, तेव्हढीच नेत्रदृष्टी अजून जीवनाचा वेध घेते आहे. वाचन सुरू आहे आणि नेत्रपल्लवीतून कौतुक, आनंद, आशीर्वाद, दिव्यप्रतिसाद आणि परमात्म्याच्या प्रेमाचा वर्षाव अद्याप सुरू आहे. सौभाग्य लेण्याची



कर्तव्ये निभावण्याची जिद्द आहे. विनायकरावांचा सरळमार्गी, तेव्हढाच हट्टी आणि करारी बाणा, सांस्कृतिक परंपरांच्या पीळासह जपण्याची शारदाबाईंची धडपड दीपविणारी आहे. दुःखानं कोसळू पाहणाऱ्या भिंतींना, आभाळासह सावरण्याची चित्शक्ती सदैव जागृत आहे. 'काय म्हणते तब्येत?' असं कोणी विचारलं तरी ''आता काय, बरी आहे. दुखायचं ते दुखतयंच! पण तेच का धरून बसाचं? त्याची वाट पाहायची, इतकच!'' एव्हढ्यावरच गाऱ्हाणं थांबतं आणि नकळत जीवनाची मात सुचवून जातं.

नगरमध्ये भलं घर बांधलं. घराला नाव काय द्यावं असा विचार सौ. उषाच्या नि माझ्या मनात सुरू झाला. दोघांच्याही ओठावर एकाचवेळी शब्द उमटले 'आई'. वास्तुशांतीला माझी आई आणि सौ. शारदाबाई दोघी ज्या आनंदमग्नतेनं आणि कौतुक न मावणाऱ्या नजरेनं आम्हा उभयतांकडे मायेचा वर्षाव करीत होत्या; ती श्रीमंती आम्ही मनोमनी जपून आहोत. जीवनाच्या पैलतीराकडे प्रवासतांना; अशा परानुभूतीचे दर्शन त्यांच्या विभूतिमत्त्वातून होतांना; अंतर्मुख होत जातो. ही आनंदगायनाची किमया या मातृशक्तीला लाभली तरी कशी? जीवनाच्या सुरुवातीलाच, समूळ उद्‌ध्वस्ततेतून अंकुरण्याची अनुभूती, ज्या जीवनाने घेतली त्या विभूतिमत्त्वाला जीवनातील त्सुनामी, ज्वालामुखी, धरणीकंप, प्रलयंकारी वीजवादळे कशी पराभूत करू शकतील? आदिशक्तीची संवेदना मिळालेल्या या मातृशक्तीच्या आशीर्वादांच्या उबेचा प्रसाद घेत पुरुषार्थ साधावा हेच श्रेय.

●●●

# राष्ट्राय स्वः!

## (भार्गवराम तथा तात्या बापट)

भार्गवराम तथा तात्या बापट म्हणजे, पुणे येथील तळजाईला झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या, महाशिबिराचे, महाव्यवस्थापक. त्यावेळी ते आमचे विभागप्रचारक होते. या शिबिराच्या जमवाजमवीसाठी त्यांचा प्रवास घडला. तेव्हा ते आमच्या घरी आले होते. मी, मदन तथा अण्णा चोरघडे अर्थात त्यावेळचे संगमनेर-अकोले, तालुका प्रचारक, असे गप्पा मारत होतो. गप्पा कसल्या शिबीर नियोजन, आवश्यकता आणि आमच्याकडूनची अपेक्षा याविषयी ते बोलत होते. तेव्हा मी वनवासी कल्याण आश्रमाचे काम पाहात होतो. तात्या म्हणाले, ''शंभर वनवासी (आदिवासी) तरुण शिबिरात सहभागी झाले पाहिजेत, कसे करायचे ते तुम्ही पाहा. पन्नास हजार तरुणांचे शिबीर व्हायचे आहे.'' मी पटकन म्हणालो, ''येतील!'' अण्णा आणि तात्या या; आढेवेढे, समस्या आदि कशाचाही उल्लेख न करता दिलेल्या; उत्तराने माझ्याकडे क्षणभर पाहातच राहिले. ''मी वाट पाहातो'' तात्या म्हणाले. खरेतर मी त्यांच्या सुरू असलेल्या क्रांतीकारी दीर्घोद्योगाने, संघटनविचाराच्या झेपेने आणि त्यांच्या भरीला घालण्याच्या कथनशैलीने भारावलो होतो. मोठ्या समाधानाने तात्या निघाले. राष्ट्रउभारणीसाठी तिळतिळ झिजणाऱ्या, समर्पित आणि दुर्दम्य आशावादी लोहपुरुषाचा तो प्रवास; किती कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य स्फुल्लिंग फुलवित असेल; याचाच विचार, मी खूप वेळ करीत राहिलो. काही वेळाने भानावर आलो. अकोले तालुक्यातून शंभर आदिवासी तरुण पूर्ण गणवेशात शिबिरात उभे करणे; ही गोष्ट नक्कीच सोपी नव्हती. कामाला लागलो. त्यांच्याच आविर्भावात गाठीभेटी, आग्रह, समजावून तयार करणे सुरू झाले. अण्णा माझ्याबरोबर असत. डॉ. देशपांडे आणि अशोक रसाळ, अनिल सोमणी आदि काही ध्येयनिष्ठ स्वयंसेवक बरोबर होते; पण मुख्य जबाबदारी माझ्यावर होती. प्रासंगिक स्वरूपाचे शिबीर. जीवाचा आटापिटा करावा लागला. शिबिरात पोचलो तेव्हां शिबिराचे विराट दर्शन पाहून; पुराणांतरीच्या सैन्यशिबिरांचे स्मरण झाले. शोधत शोधत महत्प्रयासाने तात्यांपर्यंत पोचलो. त्यांच्यापर्यंत पोचणे सोपे नव्हते. स्वयंसेवकांचे अक्षरशः लोंढे शिबीरस्थानी पोहोचत होते. शिबिरार्थींचा आकडा तीस हजारांच्या पुढे केव्हाच पोचला होता. ''काय रे आले का शंभर वनवासी तरुण?'' भेटताच तात्यांनी प्रश्न विचारला. आम्ही मोठ्या उत्साहाने तात्यांना भेटायला गेलो होतो. शिबीर पाहून उत्साह शतगुणित झाला होता. मोठ्या फुशीरकीने म्हणालो, ''तात्या आम्ही एकशे सत्तावन्न आहोत!'' ''शाब्बास! व्यवस्था झाली का?'' तात्यांनी विचारले. ''त्यांना सांभाळणे तुमचे काम'', तात्या म्हणाले. ''व्यवस्था झाली'' आम्ही सांगितले. जिल्हावार व्यवस्था असल्यामुळे फारशी अडचण आली नाही. शिबिरांचे स्वरूप पाहून; प्रत्येकाच्या मनात एकच विचार येत होता, ''हे एवढे, कसे जमविले असेल? तेही सुनियोजित?'' आम्ही आमच्या आमच्या तंबूत पोहोचलो. संचलनाची तयारी करायची होती. मी मात्र तात्यांच्या 'त्यांना सांभाळणे तुमचे काम'', या म्हणण्याचाच विचार करीत होतो. येथे तर अशी व्यवस्था होती की, प्रत्येकजण स्वयंभूपणे सर्वांना सांभाळण्याच्या प्रयत्नात होता. अविस्मरणीय शिबिराच्या अनुभवाने वैभवसंपन्न राष्ट्राच्या उभारणीसाठी, आपण मनात नक्कीच काही करू शकतो; असा आत्मविश्वास प्रत्येकाच्या मनात निर्माण झाला होता. आमच्या सोबत आलेल्या वनवासी तरुणांत मोठाच उत्साह संचारला होता. खरेतर त्यांना सांभाळण्याचा प्रश्नच नव्हता. शिस्तबद्ध, एकात्मभावात्मक सामूहिक कृतींमधून प्रत्येकजण सारखाच राष्ट्रसैनिक म्हणून सरसावला होता. परततांना प्रत्येकाने त्या महाशिबिराच्या, महाव्यवस्थापक, महापुरुषाचे अत्यंत पूज्य भावाने मनोमनी दर्शन घेतले.

गोविंदराव लेले यांनी आपला पाच वर्षांचा, समर्पित असा कार्यकाळ संपवला होता. अण्णा चोरघडे यांनी त्यांची जागा घेतली होती. गोविंदराव कार्यकर्त्यांचा परिचय करून देण्यासाठी अण्णांना घेऊन आले होते. तोपर्यंत माझे 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि भाषिक

अभ्यास' या विषयावर पीएच.डी. पूर्ण झाले होते. मध्यप्रदेशातील जशपुरनगर येथील बाळासाहेब देशपांडे यांनी चालविलेल्या 'वनवासी कल्याण आश्रम' या गुरुकुलाप्रमाणे काही काम अकोले तालुक्यातील आदिवासी महादेव कोळी, ठाकर यांच्यासाठी करावे; असा विचार पुढे आला होता. नगर येथे संघ कार्यालयात परिवाराच्या बैठकीप्रसंगी मा. संघचालक माणिकराव पाटील, प्रांत प्रचारक दामुअण्णा दाते, मी एकत्र बसलो होतो. मला परिवाराच्या बैठकीला निमंत्रित केले होते. खरेतर 'पीएच.डी.' झाल्यानंतर मी कुठेतरी मोठ्या महाविद्यालयात प्राध्यापक होण्यासंबंधीच्या हालचाली सुरू केल्या होत्या. ''प्राध्यापक झाल्याने नेमका कोणता बदल होईल? पगार किती वाढेल? जाणं आवश्यकच आहे का? वनवासी कल्याण आश्रमाचे काम महाराष्ट्रात सुरू करता येईल'' मा. जिल्हा संघचालक माणिकराव पाटील, पू. दामूअण्णांच्या साक्षीने बोलत होते. तात्या बापट लक्षपूर्वक ऐकत होते. पू. दामूअण्णा प्रांत प्रचारक होते. खरेतर त्यांच्याच बोटाला धरून मी आठव्या यत्तेपासून संघात आलो होतो. त्यांच्यामुळेच माझे संघशिक्षा वर्गाला जाणे घडले होते. गोविंदराव लेले शांतपणे हे ऐकत होते. या सगळ्याच्या मुळाशी तेच तर भक्कमपणे बसून होते. मला काय करावे कळेना. प्राध्यापक होण्याचा मोह एका बाजूला, दुसऱ्या बाजला राष्ट्रनिर्माणाचे पवित्र कार्य. मी बालवयात ते स्वीकारले होते; तरी अंधपण त्यात डोकावूसुद्धा दिले नव्हते. मी अंतर्मुख झालेलो पाहून; सर्वच स्तब्ध झाले. त्यांच्यातच वनवासी कल्याण आश्रम सुरू करण्याने काय होऊ शकेल; याविषयी विनिमय सुरू होता. माझ्या गंभीर मुद्रेकडे पाहात मा. माणिकराव म्हणाले, ''मग काय ठरवताय डॉक्टरसाहेब'' मी पीएच.डी. झाल्यापासून ते कौतुकाने डॉक्टरसाहेब म्हणत. मी भानावर आलो. म्हणालो, ''ठीक आहे, मी नाही जात प्राध्यापक म्हणून! पण कसं?'' ''तुम्ही कंबर कसलीत; तर होईल सारं काही!'' मा. माणिकराव म्हणाले. ''ठीक आहे, करूया!'' मी काही विचार करीत म्हणालो. ''माझे येणे होईलच, तुम्ही कामाला लागा'' एवढावेळ लक्षपूर्वक ऐकणारे तात्या बापट मध्येच म्हणाले, खरे तर, कसे; काय; इ. काहीच ठरले नव्हते. मी मात्र मनाशी काही विचार केला. अकोल्यात घरी आलो. काय आणि कसे करावे विचार करीत होतो. विठ्ठल बारकु खाडे ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी माझ्याजवळ होता. त्याला आम्ही सर्वतोपरी मदत करीत होतो. त्याची सोय 'कोळी



बोर्डिंग'मध्ये केली होती. त्याला वनवासी कल्याण आश्रमातला पहिला विद्यार्थी म्हणून मी स्वीकारले. रखमा मुठे शेलविहिरेचा आणि निवृत्ती झडे रतनवाडीचा यांची सोय होत नव्हती मी त्या दोघांना स्वीकृत केले आणि घरातच माझ्या मातोश्री आणि अर्धांगी सौ. उषा यांच्या मदतीने पहिल्या तीन विद्यार्थ्यांसह 'वनवासी कल्याण आश्रम' म्हणून महाराष्ट्रात अनौपचारिकपणे पहिले विद्यार्थी वसतिगृह घरात सुरू झाले. आता प्रश्न होता असे विद्यार्थी गोळा होऊ लागले तर त्यांच्या सांभाळण्याचा, अर्थात जेवणखाण आणि निवास यांचा. मी इंग्रजी शिकवीत असे. घरात इंग्रजीच्या इ. १० वी एस.एस.सी. साठीच्या शिकवण्या घ्याव्यात आणि त्यातून नित्याचा खर्च भागवावा अशी युक्ती माझ्या अल्पशक्तीला सुचली. आई आणि पत्नी यांनी कंबर कसली. सुरू झाले. तात्या बापटांचा प्रवास होणार होता. तोपर्यंत माझ्यासमोर ज्युनिअर कॉलेजमधील पंधरा विद्यार्थ्यांचा एक वेगळाच प्रश्न निर्माण झाला होता. त्यांची कोणत्याही वसतिगृहात सोय नव्हती. कुठे कुठे खोली घेऊन हे विद्यार्थी राहात असत. शास्त्र शाखेला आलेले आदिवासी विद्यार्थी. वेळ जमवाजमवीत जात असे. मी मुलांना वर्गात मराठी वाङ्मय आणि भाषा शिकविणारा. त्यांना मी असे काही करतोय हे विठ्ठलकडून कळलेले. ते मला भेटून काही मार्ग निघतो का म्हणून विचारीत. त्यातील बहुतेकांना दारिद्र्याच्या आणि उपासमारीच्या झळा सोसून शिक्षण घ्यावे लागत होते. एस.टी. साठीची स्कॉलरशीप मिळणार होती पण ती मार्चएन्डला कधीतरी. त्यातील काही तर शिक्षण सोडण्याचा विचार करीत होते. मी, आमचे मामा पी. बी. तथा मामा टाकळकर यांच्याशी या समस्येवर बोललो. त्यांनी जमेल तशी मदत करण्याचे आश्वासन दिले. तात्या बापट यांचा प्रवास ठरला. अण्णा चोरघडे आणि ते आले. माझे प्रयत्न पाहून थक्क झाले. ''शंभर तरुणांचे वसतिगृह करूया'' ते म्हणाले. मला जे करण्याचा प्रयत्न करीत होतो; ते करण्यासाठी केवढी यातायात करावी लागणार होती. ''हे कसं शक्य आहे? यासाठी पैसा कसा उभा करणार? ग्रँट मिळणे शक्य नाही!'' मी फरगडे फोडले. ''पैसे कसे उभे होणार? का लोक देतील? धनिकांच्या गचांड्या धरून पैसे घेऊ. द्या म्हणून नव्हे. तळातल्या लोकांच्या जीवावर ही धनिक मंडळी उभी झालीत. देत कसे नाहीत? द्या किंवा उपकार नकोत!'' तात्या बापट उसळून बोलत होते. मला कम्युनिस्ट चळवळीतील नेत्यांची आठवण झाली. मी त्यात वाढलेला पण

प्रत्यक्षात काय? सगळाच अंधार! मी मग काही बोलण्यापेक्षा माझ्यासमोरच्या ज्युनियर कॉलेजमधल्या त्या विद्यार्थ्यांचा प्रश्न मांडला. माझे प्रयत्न सांगितले. त्या सर्व तरुण विद्यार्थ्यांना सामावून घेऊन त्यांची व्यवस्था करण्याचा मनोदय सांगितला. मार्चपर्यंत कसेतरी ट्यूशनमधून पैसे उभे करण्याचा प्रयत्न करणार हेही सांगितले. मामा टाकळकर वाड्यातल्या खोल्या मोफत देणार असल्याचे सांगितले. हे ऐकून तात्या थक्क झाले. म्हणाले, ''करा सुरू, काय करता येईल ते पाहू! पुढच्या आठवड्यात पुण्यात या, जे शक्य ते करतो.'' ''ठीक आहे!'' मी म्हणालो. टाकळकर मामांना भेटलो. कामाला लागलो. विद्यार्थ्यांची सोय केली. मार्चमध्ये येणारी स्कॉलरशिप माझ्याकडे आणून देण्याचे ठरले. तात्पुरते खोलीवर राहाण्यासाठी जे अन्नधान्य आणले जाते ते वर्गणी म्हणून आणण्याचे ठरले. वसतिगृह सुरू केले. तात्यांना पुण्यात भेटलो. काही न बोलता त्यांनी एका महत्त्वाच्या व्यक्तीकडे जावयास सांगितले. त्या व्यक्तीने माझे आदरातिथ्य केले आणि सहा हजार रु. रोख हातावर ठेवले. तूर्तास हे घेऊन जा. एकोणऐंशी साली सहा हजार रुपये ही मोठी रक्कम होती. गावी आलो. कार्यकर्ते जमलो. त्यांना सांगितले आणि टाकळकर वाड्यात 'गुहक विद्यार्थी वसतिगृह' हे 'वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र'चे पहिले केंद्र सुरू झाले. जीवाचा आटापिटा करून मी शिवणीतून पैसे देऊ लागलो. पालकांनी मदत केली. फेब्रुवारीमध्ये मी शाळेप्रमाणेच या वसतिगृहाचे स्नेहसंमेलन ठरविले. या वेळेपर्यंत तात्या बापटांचे मार्गदर्शन मिळत होतेच. त्यांनी मला पुन्हा पुण्याला बोलावले. त्यांनी स्टॅटफिल्ड कंपनीच्या मोहनराव घैसासांना भेटायला सांगितले. भेटलो आणि आश्चर्याचा धक्का बसला. स्टॅटफिल्डच्यावतीने रुरल डेव्हलोपमेंट अंतर्गत बाराशेपन्नास रुपये प्रतिमास द्यायचे ठरले. प्रथम पुढच्या एक वर्षासाठीची ही तरतूद होती. स्नेहसंमेलन प्रसंगी तात्यांनी उत्साहाने मोहनराव घैसासांना आणले. आम्हा कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून; तात्यांना हुरूप आला. माझी पाठ थोपटत त्यांनी मला अधिक आश्वासितच केले. सुरू झालेले वसतिगृह आता पन्नास विद्यार्थ्यांचे वसतिगृह स्वतःच्या जागेत सुरू आहे. मी तर अनेक कारणांनी त्र्यांशी सालापासून या कामातून थांबलो आहे.

एकोणीसशे ब्याऐंशीची गोष्ट. माझे कुटुंब उद्ध्वस्त होण्याचा प्रसंग. सौ. उषाला अचानक अंधत्व येण्याचा प्रसंग. याप्रसंगी अहमदाबाद येथे जाऊन ऑपरेशन करण्यासाठी प्रयत्न करायचे होते. तात्यांनी पुढाकार घेऊन लक्ष्मणराव इनामदारांना अर्थात क्षेत्रीय प्रचारकांना सांगून माझी अहमदाबादमधील व्यवस्था करविली.

राष्ट्रउभारणीचे कार्य करणाऱ्या या कार्यकर्त्यांना स्वतःच्या शरीराची तिळमात्रही पर्वा नसते हेच खरे. जीवघेण्या आजाराने पछाडूनही त्याकडे तात्या दुर्लक्ष करीत होते. आजन्म पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून समर्पित झालेले तात्या अचानक निघून गेले. अंत्यदर्शन घेतांना मनात विचार आला प्रपंचाच्या पलिकडे जाऊन; 'राष्ट्रय स्वः इदम्‌न मम ।' असे मला कधीतरी काही जमेल का?

'अहिनकुल' ही आदिवासींनी केलेल्या पहिल्या स्वातंत्र्य संग्रामावरील कादंबरी प्रसिद्ध होणार होती. एकोणीसशे शह्यांशी सालची गोष्ट. एका तोफेच्या बळावर, कॅप्टन माकिनटोशच्या मोठ्या सैन्याशी पंधरा दिवस शर्थीने झुंज देणाऱ्या गोविंद खाडे, रामजी भांगरे आणि रामा किरवा यांची शौर्यकथा. हिंदवी स्वराज्याच्या अस्मितेने झुंजलेली ही आदिवासी महादेवकोळी ठाकर मंडळी. १८२६ ते १८३५ सालातला हा सह्य शिखरातील, गॅझेटमध्ये उल्लेखिल्याप्रमाणे 'कोळ्यांचा पहिला उठाव' 'परिमल' प्रकाशन औरंगाबादने कादंबरी प्रसिद्ध केलेली. ह्या कादंबरीची अर्पणपत्रिका लिहायचे ठरविले आणि पू. दामुअण्णा दाते आणि तात्या बापट यांना कादंबरी अर्पण करायचे ठरविले. कादंबरीचे प्रकाशन मा. सरसंघचालकांच्या हस्ते करावे आणि तात्यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दामुअण्णांचा सत्कार मा. संघचालकांच्या हस्ते करावा असा हट्ट केला. मोतीबाग संघ कार्यालयाने तो पुरविला. मा. सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांच्या हस्ते मोतीबागेत एका साध्या समारंभात प्रकाशन झाले. तात्यांना यथोचित अभिवादन करण्याची माझी इच्छा पूर्ण झाली.

●●●

# प्रकांड पुरोहित

## (पू.वे.शा.सं. वासुदेव रामचंद्र धर्माधिकारी)

कमरेला दाभळ, कपाळी गंध, शिरी शिखा, गळ्यात यज्ञोपवित, हातात पूजेचे तबक, एका हातात जलकलश, पायी खडावा, मुखी नामस्मरण घोष, नखशिखांत सोवळ्यातील वासुदेवशास्त्री रस्त्यातून राममंदिराकडे जाऊ लागले की, ते कितपत घाईत आहेत; निवांत आहेत; तब्येत काय म्हणते; त्यांची आजची आणि अगदी आत्ताची मनोवृत्ती अर्थात मूड कसा आहे; हे खडावांच्या आवाजावरून कळायचे. त्यांचे दर्शन नित्याचेच असले तरी, त्यांच्या संचाराकडे लोक श्रद्धेने आणि नम्रतेने मनोमनी आणि नजरेने अभिवादनपूर्वक पाहात. आमच्या मातोश्रींनी वासुदेवगुरूंच्या आईकडून अर्थात रामभाऊ पुराणिक धर्माधिकारी यांच्या सौ. जानकीकाकू यांच्याकडून लक्ष्मी मंत्र घेतलेला. यामुळे नात्याने वासुदेवगुरू आमचे मामा. गाव त्यांना वासुदेवगुरूच म्हणे. गावाचे गावगुरू वासुदेव, गावाची श्रद्धा जागवायचे, सांभाळायचे, वाढवायचे, मनामनांत जपायचे. सोवळेओवळे अति कडक तरी कारुण्यपूर्ण नजरेत अस्पर्शतेचा लवलेश नाही. अकोलकरांच्या वाड्यातल्या श्री नरसिंहाची, चिरेबंदी जवळच्या प्रभु रामचंद्रांची पूजा घरातल्या देवपूजेप्रमाणे अगदी नित्याची.

मला वासुदेवगुरू आवडायचे ते कथेकरी म्हणून. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून रामाचं नवरात्र सुरू व्हायचं. नित्य आरतीला चैत्राला शोभेसा, कैरीची डाळ, कलिंगडाची फोड, कैरीचं पन्ह आणि काय काय असा प्रसाद असायचा. रामाची आरती म्हणजे मोठा दणका असायचा. आरतीनंतर तासा दीडतासानं रामचरित्रावर अर्थात रामायण कथेवर कीर्तन असे. मस्तकावर टिळकछाप



पगडी, एकटांगी धोतर, बाराबंदी, उपरणं, हाती चिपळ्या किंवा झांजा, मागे विणेकरी, बाजूला निवृत्ती महाले संवादिकेसाठी (हार्मोनियम) आणि एका बाजूला निवृत्ती खांबेकर तबलजी. देऊळ भरलेलं, श्रीराम सन्मुख वासुदेवगुरू, कीर्तनासाठी अर्थात नारदीय कीर्तनासाठी उभे आणि पुढ्यात अगदी समोर बालवयातला (अगदी शैशवावस्थेपासूनचा नित्य) मी आतूर होऊन बसलेला. कीर्तन सुरू व्हायचं आणि संगीत मैफलीसारखं रंगत जायचं. मी रामायणकथेत हरवून जायचो.

रामनवमीला रामाच्या देवळासमोर मोठा मंडप उभा व्हायचा. मंडपात पाळणा बांधला जायचा. गाव उत्सवाला लोटायचा. वासुदेवगुरू त्या दिवशी खास भाववृत्तीत असायचे. रामजन्म कथेतील श्रावणबाळाची कथा डोळ्यात पाणी आणायची, तर राण्यांना लागलेल्या डोहाळ्यांची कथा सृजनाच्या रंगात रंगून टाकायची. पाळण्यात रामबाळांना अर्थात सांकेतिक (किनखापाच्या रेशीम वस्त्रात गुंडाळलेला नारळ) घालतांना भाविकांची एकच धांदल व्हायची. पाळणा सुरू व्हायचा तेव्हा नवोढा, मातृत्वइच्छुक ललनांची पाळण्याची दोरी ओढायची एकच गर्दी उसळायची. त्या भावमधुर, भारल्या वातावरणात, प्रभुरामचंद्रांचा चैतन्यशाली जन्मोत्सव घडायचा. पाळण्यात बाल राम आहेत असे वाटायचे. डोहाळे आणि पाळणा आजही माझ्यासारख्या असंख्यांच्या स्मरणात आणि मनात बालमुग्धतेने रुतून आहे. रामाचं देऊळ आता जीर्णोद्धाराची वाट पाहात आहे. समोर उभं राहिलं, चिरेबंदीवर बसलं की वासुदेवगुरू खडसावून रामाच्या जीर्णोद्धारासाठी हाक मारताहेत असं वाटतं.

'गीता वा रामरक्षा पाठशाळा' सुरू झाली. रोज संध्याकाळी राममंदिरात वासुदेवगुरू आम्हा मुलांना भगवद्‌गीता आणि रामरक्षा शिकवू लागले. गीतेतील दोन श्लोकांची संथा गुरू देत असत, अगदी संधीविग्रह आणि अर्थासह शिकवीत. सामूहिक म्हणायला लावत. रोज अगोदर झालेले श्लोक म्हणून दाखवायचे आणि पुढचे दोन श्लोक शिकायचे. असा परिपाठ होता. वासुदेव गुरूंनी श्री. मुंदडाशेठ यांचेकडून गीतेची पुस्तके आणवली होती. ती सगळ्या मुलांना मोफत दिली. गीतेचं, संस्कृत भाषेचं महत्त्व सांगायचं, शब्दसौंदर्य आणि अर्थसौंदर्य उलगडून दाखवायचं, संथा द्यायची, आम्हा मुलांना त्यांनी पाठांतराचं महत्त्वच पटवून दिलं एवढंच नव्हे तर पाठांतर आणि संस्कृत श्लोक म्हणण्याची आवडही निर्माण केली. त्या दिवशीची गोष्ट. मला पाठ केलेले

आणि त्या दिवशी संथा दिलेले श्लोक म्हणायला सांगितले. मी उत्साहाने म्हणालो, ''वा काय वाणी आहे! स्पष्ट आणि शुद्ध, असे पाठांतर हवे!'' गुरू म्हणाले. माझी छाती फुगली. मला पाठांतराचा छंदच लागला. ''गीताजयंतीच्या दिवशी, गीता रामरक्षा पाठांतर स्पर्धांचे आयोजन करावे, म्हणजे गीता पाठांतर चांगले घडेल'' गुरूंनी मुंदडाशेठना सांगितले. मुंदडाशेठ सश्रद्ध आणि धार्मिक. भगवद्‌गीतेची परंपरा घरात. त्यांना गुरूंची योजना आवडली. एक श्लोक, पाच श्लोक, अध्याय, तीन अध्याय, अठरा अध्याय गीता वाचन पाठांतर स्वरूपात गट केले आणि जवळपास सर्वांनाच भगवद्‌गीता पठणाच्या उपक्रमात गुरूंनी सामावून घेतले. गीता जयंतीच्या दिवशी बक्षीस वितरण होई पण त्या अगोदर अठरा अध्याय गीता पठण आणि विष्णूसहस्रनाम पठण व्हायचे. मग पारितोषिक वितरण. संथा घेणारी मुले आपसुकच पुस्तकात पाहून का होईना अठरा अध्याय गीता वाचनात सहभागी होत. सर्वांनाच बक्षीस, प्रमाणपत्र आणि प्रसाद मिळायचा. माझे जे काही भगवद्‌गीता पाठांतर झाले, अभ्यास झाला त्या सर्व अभ्यासाचे श्रेय केवळ आणि केवळ वासुदेवगुरूंना आहे.

गाव आणि पंचक्रोशी यातील परंपरा, पर्याय जतन करावेत, यासाठी वासुदेवगुरूंची धडपड असे. प्रवरा अमृतवाहिनीच्या उगमस्थानीच्या अमृतेश्वराला प्रतिवर्षीचा रुद्र अभिषेक कधी चुकला नव्हता. पडत्या पावसात आणि वाढत्या पाण्यातून जाण्याची तयारी या शास्त्र्याची असे. अकोल्यातील शेतात उत्खननात सापडलेले श्री सिद्धेश्वराचे मंदिर प्राचीन शिल्पकलेचा खास नमुना आहे. मंदिर सापडल्यापासून सरदार जहागीरदार, यांच्या यजमानित्वाला अनुसरून श्रावण महिनाभर आणि पुढे तीन ते पाच दिवस यजमानांचा आणि पुढेपुढे गावकरी भाविकांकडूनचा लघुरुद्र करण्यात; पुरोहितांचा पुढाकार असे. ती परंपरा वासुदेवगुरूंनी दिमाखदारपणे सुरू ठेवली. ते तेहतीस दिवस श्री सिद्धेश्वराच्या सेवासाधनेतच घालवत. शेवटी सहस्रभोजनासह पालखी असे. लग्न, मौंज, वास्तु, अन्य शांती, सत्यनारायण इ.चे त्यांचे पौरोहित्य लोकांची श्रद्धा वाढवत असे. वासुदेवगुरू जसे वेदशास्त्रसंपन्न तसेच उत्तम संगीततज्ज्ञ, संवादिनी वादक आणि गायकही. तसे समस्त धर्माधिकारी घराण्यात संगीतसाधनेचे वेड. पौरोहित्यात संगीत नाटकांची कलात्मकता आणण्याएवढा मन्वंतर विचार त्यांच्याकडे होता. संगीत सत्यनारायण आणि संगीतबद्ध मंगलाष्टके यांबद्दल त्यांची ख्याती देशविदेशापर्यंत पोचली. बिदागी किती मिळेल; याचा वासुदेवगुरू



कधी विचार करत नसत. मुंबई-पुण्यात जाऊन आल्यावरही त्यांच्यात असा व्यावसायिक व्यूह आला नाही. अन्यथा माझ्यासारख्याच्या घरी कार्यात असा संगीतासह उत्सव झालाच नसता. पौरोहित्याच्या बाबतीतही त्यांचे धोरण म्हणजे सुविहितता, शास्त्रोक्तता आणि श्रद्धापूर्णता याकडेच त्यांचे लक्ष असे. आम्हा भावंडांच्या मौंजी व्हायच्या होत्या. वडील साधे पोस्टमन. एकाने कमवायचं नि आठजणांनी खायचं. पण वासुदेवगुरूंनी जबाबदारी घेऊन आमच्या मौंजी यथासांग केल्या.

संगीततज्ज्ञ तर ते होतोच; त्याचबरोबर कीर्तनकारही ते होते. येथवर त्यांची कलासक्ती थांबत नाही. ते उत्तम नट होते. संगीत नाटके आणि प्रोज नाटके दोन्ही प्रकारात ते हौशी कलावंतांच्या संचात काम करीत. प्रसंगी स्त्रीपात्रही करीत आणि तेही अगदी उत्तम. लोक त्यांना अकोल्यातले बालगंधर्वच म्हणायचे. हौशी नाटक चमूने 'प्रेमा तुझा रंग कसा' नाटक बसवायला घेतले. माझे दिग्दर्शन सर्वांना हवे असायचे. या नाटकात बाज्याचे वडील कोळसेवाले गोरे यांची भूमिका मी वासुदेवगुरूंना दिली. मी बाज्याचे काम करीत होतो. वासुदेवगुरूंचे पाठांतर म्हणजे कंसातल्या सूचनांसह असायचे. कितीही सांगितले तरी नाट्यप्रवेशात एकदोन वेळा तरी, अनवधानाने, ते कंसातली सूचनाही बोलायचे. हशा व्हायचा तरीही लोक त्यांचे कौतुक करायचे. नाटकात बाज्याचे वडील बाज्याचा कान धरून त्याला ओढत घेऊन जातात; असा प्रसंग होता. मी त्यांना परोपरीने कंसातले बोलू नका, त्याप्रमाणे फक्त अभिनय करायचा असतो असे सांगायचो; पण ज्येष्ठ आणि कसलेला नट नव्या पिढीतल्यांचे ऐकतो थोडाच? प्रसंग आला. वासुदेवगुरू एवढे गोऱ्यांच्या भूमिकेत, बाज्याचे वडील म्हणून रंगून गेले होते की; त्यांनी बाज्याचा अगदी शब्दशः करकचून कान धरला आणि ओढत नेऊ लागले; (बाज्याचा म्हणजे अर्थात माझा) की बाज्याला अभिनय करण्याची गरजच पडली नाही. त्या वास्तव प्रसंगाला प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात जोरदार दाद दिली. माझा कान मात्र पुढे किमान महिनाभर दुखतच होता. मात्र वासुदेवगुरूंच्या अभिनयाला तोड नाही!

चातुर्मास सुरू झाला की वासुदेवगुरू पुराणिकेच्या भूमिकेत यायचे. सायंकाळी चार ते पाच पुराण सांगायचे. रामाच्या देवळात प्रामुख्याने स्त्रीवर्ग अधिक असायचा. भागवत, रामायण, रामविजय, हरिविजय, मलमासपोथी

आणि काय काय. उत्तम कथनशैली असल्याने पुराणात लोक रंगून जात. मी शाळेला सुटी असली की गुरूंच्या पुराणाला रामाच्या देवळात उपस्थिती लावायचो. एकादशीला कीर्तन व्हायचे. माझ्या आठवणीत खूप दिवस ही प्रथा सुरूच होती. रामाच्या देवळात 'श्रावणी' व्हायची. यज्ञोपवित बदलणे, पंचगव्य पिणे ह्या गोष्टी व्हायच्या. वासुदेवगुरूंनीच मौंजी करविल्या असल्याने सुरुवातीला एक-दोन वर्ष नाईलाजाने गेलो. पुढे पंचगव्याच्या भीतीने काही ना काही कारण सांगून टाळत गेलो. पंचगव्याचे महत्त्व खूप उशीरा कळले.

मी सातवीला होतो. ती खूप मोठी कथा आहे. माझ्या मनाने घर सोडून जायचे आणि रामदास व्हायचे ठरवले. मोठ्या शिताफीने मी गुंगारा देऊन; एस.टी. स्टँडवर पोचलो. इगतपुरी गाडी लागली होती. मी मागचापुढचा विचार न करता गाडीत चढू लागलो. तोच मागून आवाज आला, ''अरे, अनिल तू कुठे चालायस?'' गुरूंनी विचारले. ''राजूरला, तांदूळ आणायला!'' मी ठोकून दिले. गाडी निघाली. मी घोटीचे तिकीट काढले. पुढे बोभाटा झाला. शोधाशोध झाली. गुरूंच्या कानावर गेले. गुरू घरी गेले. तात्यांना नि आईला म्हणाले, ''अहो तुम्ही त्याला राजूरला तांदूळ आणायला धाडलेतना? त्यानेच मला सांगितले. इगतपुरीने गेला.'' वासुदेवगुरूंनी दिशा सांगितली. भविष्यही पाहिले आणि ''नाशिकला सापडेल'' हेही सांगितल्याचे मला नंतर कळले. मामांनी नाशिकला येऊन मला गाठले. ''मी विचार करीत होतो, बारा-तेरा वर्षाच्या पोराला, तात्या तांदूळ आणायला कसे पाठवतील. गुरुवारच्या बाजारात नाही घेता येत!'' वासुदेवगुरूंनी स्वतःला प्रसंगीच आलेली शंका केवळ आई-तात्यांजवळच बोलून दाखवली नाही; तर गावभर सांगितली. मला रामदास होण्यापासून परावृत्त करणाऱ्या फौजेतला वासुदेवगुरू महत्त्वाचा दुवा ठरले होते.

मला पीएच.डी.ला प्रवेश मिळवायचा होता. त्यासाठी मी मुक्तेश्वराचे संक्षेप रामायण आणि एकनाथांचे भावार्थ रामायण असा तुलनात्मक अभ्यास प्रसंगवर्णन आणि शैलीच्या संदर्भाने करून शोधनिबंध सादर करणार होतो. त्यात सीता स्वयंवर, लंकादहन हे प्रसंग मी निवडले होते. डॉ. भीमराव कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे मला वाल्मिकींनी ते प्रसंग कसे वर्णन केले आहेत; हे समजावून घ्यायचे होते. मी डॉ. भीमरावांना म्हणालो, आमच्या गावातले वासुदेवशास्त्री धर्माधिकारी विद्वान संस्कृततज्ज्ञ आणि रामकथेवर



प्रभुत्व असलेले आहेत. त्यांचे मार्गदर्शन घेतो. ही कल्पना डॉ. भीमराव कुलकर्णी आणि प्राचार्य राम अत्रे यांना आवडली. मी वासुदेवगुरूंकडे गेलो. त्यांना मला काय करायचे ते सांगितले. वासुदेवगुरूंमध्ये उत्साह संचारला. एकतर माझ्यावर त्यांचे विलक्षण प्रेम आणि त्यांना माझे खूप कौतुक आणि दुसरे म्हणजे एवढ्या दिवसांच्या संस्कृत व्यासंगाचा विद्यापीठीय अभ्यासासाठी उपयोग होणार. गुरुवर्य वासुदेवशास्त्र्यांनी मूळ वाल्मिकी रामायणातील हे दोन्ही प्रसंग पंधरा दिवसात मला वाल्मिकींच्या छंदोरचनेतील श्लोकांची उकल करीत शिकवले. माझी प्रबंधिका वेळेत आणि उत्कृष्ट झाली. माझी परीक्षाच होती! पण गुरुप्रसादाने माझ्या प्रबंधिकालेखनाने तज्ज्ञ प्राध्यापक मंडळी थक्क झाली. एखाद्या छोट्या गावात असा कोणी वेदशास्त्रसंपन्न शास्त्री, कीर्तनकार, पुराणिक आणि संस्कृत विद्वान असू शकतो; यामुळेच ही तज्ज्ञमंडळी दिपून गेली. मला पीएच.डी.ला प्रवेश मिळाला.

●●●

# नाना भिंती एकच माती

## (निकाळजे बाबा)

**धाडु नको ना वनी राम ।**
**आन, कैकई, धाडु नको ना वनी राम ।।**

एकतारी आणि चिपळ्या यांच्या साथीनं, आर्त स्वरात आणि मंद्रलयीत गाणं गात, नव्हे रामायण कथा सांगत निकाळजे बाबांची फेरी, भिक्षाटनासाठी यायची. त्यांचं सात्त्विक विभूतिमत्व मनात खोलवर एखाद्या लेण्यासारखं कोरलं गेलं आहे. टाकळकर वाड्यात तशी पाचसात बिऱ्हाडं असायची. बाबा वाड्याच्या अंगणात बिऱ्हाडांच्या मध्यावर येऊन; कथागीत सादर करीत, शांतपणे जणू रामरंगात, गानरंगात किंवा भजनरंगात रंगून गेलेले असायचे. भगवं उपरणं डोक्याला उभार पद्धतीनं गुंडाळलेलं, लांबसा पायघोळ अंगरखा तोही भगवा, कमरेला भगवं उपरणं भक्कम बांधलेलं, गळ्यात एकतारी, एका खांद्यावर पीठासाठीची झोळी, एका हातात चिपळ्या लयीत आणि तालात खळाळत्या. खाली लुंगी तीही भगवी गुंडाळलेली पायात वाहाणा. पेहेराव भगवा पण काहीसा विटलेला विटकरी. कपाळी गंध आणि चेहऱ्यावर मुद्रा पांढरट पिवळट केशरी गोपीचंदनाच्या. काळ्या रंगावर उठून दिसणाऱ्या. आम्ही मुलं त्यांच्याकडं निरखून पाहात, गाण्यात रंगून जात. त्यांच्याकडे पाहतांना; कबीर, मेहता यांची शाळेत गुरुजींनी सांगितलेली चरित्रे आणि मुद्रा उगा मनात प्रकट व्हायच्या. वाड्यातल्या माऊल्या ''मांगबाबाला वाढायला हवं, किती वेळ झालाय'' म्हणत पीठ घेऊन येत आणि बाबांच्या झोळीत घालत. कधी कोणी ढबु पैसा देत. बाबा काही न बोलता चिपळ्यांचा हात



उंचावून आशीर्वाद देत.

कधी कधी रस्त्यात, सकाळच्या शाळेतून साडेदहा अकराच्या सुमाराला येताना बाबा भेटत. ''सुटली का शाळा?'' एवढंच बाबा विचारीत. ''बाबा वाड्यात नाही यायचं का?'' मी विचारी, ''काल आलो होतो. आता, उद्या येईल. गावात सगळ्यांकडे जावं लागतं. आयाबाया वाट पाहातात, माधुकरीला'' बाबा म्हणत. निकाळजे बाबा भिक्षेला माधुकरी म्हणत. पीठ किंवा पैसा अशी कोरडी भिक्षा घेत. क्वचित कधी पाणी मागून घेत. आयाबाया त्यांना भिक्षा म्हणून वाढतांना मोठ्या श्रद्धेने वाढत.

गावातून भिक्षाटन झाले की बाबा थेट इस्लाम पेठेतल्या तोंडाशी असलेल्या आपल्या कुटीकडे जात. त्यांच घर मातीच्या भेंड्यांच. आटोपशीर. वरती कवलार. नीटनेटकं. पांढऱ्या मातीनं सारवलेलं. बाहेर अंगण ओटाही निर्मळ सारवलेला. सांडपाण्याची जागा आळूपानांनी भरगच्च. अंगणातील आंघोळीच्या दगडावरूनही पाणी आळूत जायचं. मातीच्या वृंदावनात मंजुळांनी बहरलेली डौलदार तुळस. अंगणाच्या कडेला बाईंनी लावलेल्या परसबागेत, सदामस्तक, पुदिना, कोथिंबीर, मिरची, वांगं अशी छान मशागतीनं जोगलेली. घरात खुंटीला एकतारी विसावलेली. कोपऱ्याजवळच्या भल्या कोनाड्यात चिपळ्या फेरीला पुन्हा जाईपर्यंत विश्रांती घ्यायच्या. झोळी बाईंच्या ताब्यात दिली की बाबा निवांत व्हायचे. पोरांकडे लक्ष द्यायचे. पोरं शाळेत गेली, नाहीत? चौकशी करायचे. बाबांचा दोन बायकांचा विस्तार असं सांगितलं जायचं. मला मात्र माझ्या मित्राची निकाळ्याची, भाऊची आईच दिसायची. प्रेमानं माझी, का कोण जाणे, घरी गेल्याबरोबर आलाबला घ्यायची.

निकाळजे बाबांचा भावड्या, त्याला आम्ही मित्र निकाळ्याच म्हणत असू. शाळा सोबती. माझा मित्र. माझे जाणे त्याच्या घरी होई. जिव्हाळ्याने आणि कुतुहलनाने. निकाळजे बाबा काही काम करण्याच्या ऐवजी गाणी म्हणत किंवा भजनं गात भिक्षा का मागतात? भिक्षेतून आणलेल्या शिध्यातून बाई स्वयंपाक कसा करीत असतील? बाबा जातीने मातंग. अकोल्यात मातंग वाडा, कुंभारवाड्याजवळ, मॉडर्न हायस्कूलच्या मागे नदीच्या रस्त्याला. मातंगांची, मातंगी देवी, त्यांची वस्ती, त्यांचा दोर वळण्याचा व्यवसाय, वाजंत्रीचा व्यवसाय त्याच वस्तीवर! त्या वस्तीत निकाळजेबाबा का राहात नाहीत? अशा साधुवेशात ते राहतात, पण ते साधुसारखे ध्यानधारणा वगैरे तर करीत

नाहीत? ते सरळ बायको, मुलं असा संसार थाटून, आपल्या वस्तीपासून वेगळे राहतात. एरवी त्यांना चित्रपट पाहाण्याचाही नाद होता. गावातल्या एकमेव 'अगस्ती चित्र मंदिर' मध्ये नवा चित्रपट आला की ते पाहाणारच; हे त्यांच्याच सांगण्यावरून आम्हाला कळले. मात्र मुलांनी शिकावं, वशाट वंगाळ खाऊ नये, भक्ती करावी. लोकांना चांगलं शिकवावं. आपण चांगलं वागावं, असं ते म्हणत. मी कुतुहलाने त्यांना विचारी. मी मॉडर्न हायस्कूलमध्ये आठव्या यत्तेत गेल्यानंतर मला मातंगवाड्यातील राहण्यावागण्याचा अधिक परिचय झाला. निकाळजेबाबांना मांगवाड्यात राहून प्रबोधकाचं व्रत घेऊन जगणं जमलं नसतं. मात्र ते ज्ञातीबांधवांपासून तुटले नव्हते किंवा आपल्या ज्ञाती बांधवांकडे ते तिरस्कारानेही पाहात नसत. त्यांनी मुलांना शाळेत घालावे. ओढलेल्या, पडलेल्या जनावरांचे मांस खाऊ नये. दोर वळण्याच्या, वाजंत्रीच्या व्यवसायाबरोबरच अन्य कामे करावीत. अनैतिक वर्तन कटाक्षानं टाळावं, यासाठी ते आपल्या ज्ञातीबांधवांना सावध करीत. करतांना स्वतः तसे वागून दाखवित. रस्त्यावरल्या ओटेगोटे दैवतांना, ते जाता येता मुद्दाम पूजत. 'ओटे गोटे नमस्करणीय की' हे सूत्र त्यांना अवगत होते. चेहडा, मुंजोबा अशा दैवतांना ते आवर्जून भजत आणि भूतदेवता किंवा पूर्वज देवतांना ग्रामदेवतांचे रूप देण्याचा किंवा दाखविण्याचा प्रयत्न करीत. अगस्ती चित्रमंदिराबाहेर छोट्याशा कमानीत असलेल्या शेंदुरभोगल्या गोलाकार देवतेला, कुणी चेहडा तर कुणी मुंजोबा म्हणत. बाबा त्या देवतेची जातायेता पूजा करीत. लोक त्याला 'मुंजोबा' ऐवजी 'मांगबाबा' म्हणू लागले ही माझ्या बालमनाला जाणवलेली मोठी गोष्ट.

**उद्धवा अजब तुझे सरकार**
**उद्धवा आन् अजब तुझे सरकार**
**लबाड जोडिती इमले माड्या**
**गुणवंतांच्या मात्र झोपड्या**
**पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा**
**आन् वेश्येला मणी हार**
**आन् उद्धवा अजब तुझे सरकार ॥**

निकाळजेबाबा एकतारीवर भजन, गाणं गातांना सूर ताल लय भंग न होऊ देता 'आन्' असे पूरक मध्येच का घालत असत याचा शोध मला अजूनही लागायचा आहे. चित्रपटाचे संगीतबद्ध गाणे ऐकण्याची जी रंगत असते; त्यापेक्षा शतपटीने प्रबोध भान या पालुपदातून संवेदित होऊन; शहाणपण शिकवून जायचे.

संत तुकड्याची भजनं गातांना निकाळजेबुवांना प्रबोधनाचा आवेश यायचा–

**देव बाजारचा भाजीपाला नाही हो**
**देव अशान पावत नाही हो ॥**

म्हणत, मांगबाबा थेट बुद्धिनिष्ठ पुरोगामी विचारवंत व्हायचे. तेच बाबा ओटेगोटे पूजतांना माणसामाणसातली, भूतभविष्यवर्तमानातील श्रद्धा जागवून प्रकृतीच्या अस्तित्वाशी एकरूप होण्याचे तत्त्वज्ञान सांगून जायचे. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण गायकीचे जेवढे मला वेड लागले होते तेव्हढेच वेड; त्यांच्या मुलाबरोबर, बाईच्या हातची भिक्षेच्या शिध्यातून थापलेल्या, चुलीच्या आहारावर भाजलेल्या खरपूस भाकरीचे आणि परसातील पुदिन्याच्या चटणीचेही वेड लागले होते. मला अजून आठवते त्या दिवशी मी भावड्याकडे गेलो होतो. बाबा भिक्षा करून आलेले होते. भावड्या खरपूस भाकरीवर ताव मारत होता. ''चल जेवायला, चटणी भाकरी खातो? अरे त्याला दे!'' बाबांनी माझ्या उत्तराची वाट न पाहता बाईला सांगितले ''बया, अव त्येला चालन का? त्यो बामण हाये!'' आता काय बोलावे हे मला कळेना.'' बाई भावड्याला चालतं मला पण चालेल''. मी पटकन बोललो. गेली अनेक वर्षे बाबांच्या गाण्यांतून दारादारात आळवलेल्या एकात्ममानवतेचा कढ जणू माझ्या मनाच्या गाभाऱ्यातून घुमला असावा. बाईच्या डोळ्यात पाणी तराळलं. बाबांचा चेहरा आनंदानं फुलला होता. बाईनं लगबगीनं ताटात अर्धी भाकरी आणि पुदिन्याची चटणी वाढली. खमंग कोरड्यासही उलीसं वाढलं. अमृताची चव कोणी अनुभवली असेल की नाही कदाचित सांगता येणार नाही पण त्या दिवशी जीवनातल्या पूर्णब्रह्माची चव मी नक्कीच अनुभवली. पुढे असे भाकरी खाणे अनेकदा घडले. कधी भावड्या आमच्या घरी तर कधी मी त्याच्या घरी. दोन्ही घरातल्या मातांच्या वात्सल्यात मला कधीच दुजाभाव जाणवला नाही. व्रतस्थ भिक्षेकराच्या साधनेचा हा परिपाक असावा.

मी मोठा झालो. लिहू लागलो. भोगले, अनुभवलेले, मनात घर करून बसलेले, घोळलेले शब्दातून आविष्कृत होऊ लागले. मी 'मातंगी' कादंबरी

लिहिली. अपरिहार्यपणे माझ्या मनात दृढावलेले निकाळजेबाबा थेट ‘मातंगी’त एकतारी आणि चिपळ्या घेऊन अद्वैताचे भजन करीत, मानव्याचा प्रसाद आपल्या भिक्षेतून जगाला वाटत प्रकटले

**नाना भिंती एकच माती**
**रांजण आणि शेगड्या**
**आन् जगा मधी एकच ब्रह्म गड्या**
**जगामधी एकच ब्रह्म गड्या.**

आता बाबांची मुले माझ्याच वयाची होऊन कदाचित रिटायर्ड होऊन जीवनाचं सोनं लुटत असतील. कसे कोण जाणे पण मला पुन्हा तो निकाळ्या भावड्या भेटला नाही. गावात बाबाचं भजनी ठेक्यावरचं गाणं गुंजलं नाही. मात्र निकाळजेबाबा मनात संजीवन समाधीसारखे संजीवकतेने प्रकट होतच आहेत.

●●●



# कीर्तनरंगी रंगात देह जावो!

## (सिन्नरकर बुवा)

**‘‘लागले हो लग्न । लग्न किती छान ।**
**करावे आता कन्यादान । लागले हो लग्न ।।’’**

लग्नाचे रसभरीत वर्णन करावे ते सिन्नरकर बुवांनीच. नव्हे नव्हे सिन्नरकर बुवा हे, वर्णन करीत; प्रसंग रंगविणारे ‘बुवाणाम् बुवा’ होते. लग्न लागले, झाले, की जेवणाची पंगत बसावयाची.

**‘‘थाट माट बहू पाट शिशीचे**
**सुगंध सुटले उदबत्त्यांचे ।।’’**
**‘‘महाराज, चांदीच्या ताटात –**
**स्वच्छ शुभ्रषा लवणा जवळी**
**विराजली ती लिंबे पिवळी’’**

या कटाव गायनाने त्यातही झांज, तबला, पेटी, घुंगरू, चिपळ्या यांच्या ठेका, ताल, सूर यांनी कीर्तनात प्रत्यक्ष षड्रस अन्नांचा घमघमाट सुटायचा. मंडळी तांबूल खाऊन तृप्त व्हायची.

मी अवघा दुसऱ्या वर्गात शिकत असेन, तेव्हांपासून अकोल्याच्या मारवाडी राममंदिरात, आईबरोबर, कीर्तनाला जात असे. आईला अनेकदा जमत नसे; तरी माझे कीर्तन कधी चुकायचे नाही. लवकर जाऊन बरोबर बुवांच्या सतरंजीला जवळ समोर बसावे आणि कथा ऐकाव्यात. नारदीय कीर्तनपरंपरेतील सिन्नरकर बुवा हे कथाकीर्तनकार. मात्र त्यांच्या मस्तकाला भला पांढरा फेटा शोभा आणी. खास बाराबंदी म्हणतात तसा अंगरखा,

एकटांगी धोतर, चेहरा प्रसन्न, गोल, उपरणे. बुवा सतरंजीवर श्रीराम सन्मुख उभे राहात तेंव्हा त्यांच्याजवळचे विठ्ठलरखुमाईंचे भले संपुष्ट समोर मांडलेले असे. शांत, धीरगंभीर आवाजात मंगलाचरण होई. कीर्तनाला आलेले लोक भावगभीरतेने उत्कटतेने कीर्तन श्रवणाला सज्ज होत. बुवा गाऊ लागत ''ये सद्‌गुरू राया । कीर्तनी ये सद्‌गुरू राया ।।'' भजनात सगळेच रंगून जात. असे वाटे की सद्‌गुरू दारातून येत आहेत आणि आम्ही सर्व मोठ्या पूज्य भावानं, सद्‌गुरूंना व्यासपीठावर विराजमान करीत आहोत. सिन्नरकर महाराजांचे तबला, पेटी, वीणा यांचे साथीदार ठरलेले होते. तबलजींच्या हाताला घुंगुरवाळाच म्हणावा असा बांधलेला असे. त्यामुळे तबल्याबरोबर नृत्य सुरू झाल्याचा आभास होई. कधी हे साथीदार काही कारणाने नसले तर तबल्याला गुरव गुरुजी किंवा निवृत्ती खांबेकर आणि पेटीला निवृत्ती महाले ही गावातली मंडळी असत.

सिन्नरकर बुवा नक्कीच सिन्नरचे असावेत हे माझ्या मनावर ठसलेले. त्यांची दरवर्षी ठराविक काळात अगदी महिना-महिना सव्वा महिना कीर्तनं होत असत. या महिनाभर बुवा नेमके कुठे राहतात, दिवसभर काय करीत असावेत, रोज तेवढ्याच उत्साहवर्धक प्रसन्नतेने बरोबर नवाच्या ठोक्याला मारवाडी राममंदिरात कसे प्रकटतात याचे मला कुतुहल वाटे. नंतर पुढे हे कुतुहल माहिती मिळाल्याने नाहीसे झालेही. तोपर्यंत मी चांगला सातवी-आठवीत गेलेलो होतो. सिन्नरकर बुवांची भगिनी अकोल्यात वॉचमेकर जोशींकडे दिली होती असे कळले. पण कुतुहलपूर्तीपेक्षा मला त्या माहितीचे महत्त्व नव्हते. मी अक्षरशः त्यांच्या कीर्तन सादरीकरणाने वेडा झालो होतो. त्यांचे कीर्तन म्हणजे एकपात्री संगीत नाट्य प्रयोगच असायचा. गायन, संभाषण, संवाद, आवेशपूर्ण निवेदन, लाघवी वर्णने या सर्वच गोष्टींचा संस्कार माझ्या बालमनावर होत होता. सिन्नरकरबुवा म्हणजे माझे प्रत्यक्ष प्रकटलेले ज्ञानपीठ होते. मी कधीच त्यांचे कीर्तन चुकवित नसे. माझे समोर असणे हे सिन्नरकर बुवांनाही सवयीचे झाले होते. मला बरे नव्हते म्हणून मी त्या दिवशी कीर्तनाला नव्हतो. ''आमचा बाल श्रोता आज दिसत नाही'' म्हणत सिन्नरकर बुवांनी विचारलेले मला कळले; तेंव्हा तर मी त्यांचा नुसता श्रोता राहिलो नाही दृढ भक्तच झालो. मी असल्याशिवाय कीर्तन रंगतच नाही असे उगाचच माझ्या बालमनाला वाटू लागले. आपण कीर्तनाला नाही गेलो तर बुवांचे कसे



होईल; असा विचारही मनात येत असे. थोडी नव्हे जवळपास सहासात वर्षे मी त्यांची कीर्तने कधीच चुकविली नाहीत.

वेदपुराणांतर्गत कथांपासून स्वातंत्र्यलढ्यापर्यंतच्या ऐतिहासिक कथा सिन्नरकर बुवांच्या आख्यानांचा विषय असे. संतकथा गातांना तर सिन्नरकर बुवा भक्तिरसात श्रोत्यांना भावमुग्ध करीत असत. लोक त्यांना राष्ट्रीय कीर्तनकार म्हणत. त्यांच्या कीर्तनांमुळेच बालवयातच दिव्यकथा, शौर्यकथा, भक्तिकथा, नीतिकथा, तपसाधना, भक्तिसाधना, कर्तव्यनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा, नृत्य, नाट्य, संगीत, कला अशा गोष्टींची माझ्या ज्ञानसंचयात उदंडता प्राप्त झाली. आज मी उत्तम वक्ता आहे असं लोक म्हणतात. त्या वक्तृत्वशैलीची जडणघडण बहुधा या कीर्तनसंगातूनच झाली अशी माझी श्रद्धा आहे. सुभाषिते, अभंग, श्लोक यांचे संदर्भ, व्याख्यानाला येणारी लय आणि व्याख्यानात येणारे विपुल संदर्भ यांचे श्रेयही सिन्नरकर बुवांच्या कीर्तनाच्या प्रभावाला जाते, असे मला वाटते. शिक्षकाच्या व्यक्तिमत्त्वाला संवादक, प्रबोधक, संज्ञापक, समुपदेशक असा आकार नक्कीच कीर्तनसंगातून मिळतो. श्रोतृसंवादात्मकता हा व्याख्यानातला आणि कथनशैलीतला अत्यंत महत्त्वाचा गुण संस्कारित करण्याची ताकद बुवांच्या कथनशैलीत होती. माझ्या बालवयात जणू नियतीने योजनापूर्वक हे प्रशिक्षण मला दिले असावे.

सिन्नरकर बुवांच्या कथासत्रांमध्ये, एका कीर्तनात एक आख्यान दोन, तीन, पाच, सात दिवसात एकच प्रदीर्घ आख्यान गुंफलेले असे. यांत पौराणिक आणि ऐतिहासिक कथांवर आधारित जोड आख्यानेही बुवा लावत. 'कीचकवधाख्यान आणि क्रांतीकारकांचे जुलमी ब्रिटिश अधिकारी वधाख्यान', 'आग्र्याहून सुटका आणि सावरकरांचे बंदीतून सागरामार्गे पोहून येण्याचे आख्यान' अशी कितीतरी जोड आख्याने मी बुवांच्या मुखाने ऐकली. कीचकवध नाटकाने स्वातंत्र्यलढ्याला बळ कसे दिले याची उकल मला पुढे झाली ती या अशा जोड आख्यानातून. ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीला सामूहिक चळवळीच्या बळाने उलथून टाकता येते हे भक्त प्रल्हाद, समुद्रोल्लंघन यांसारख्या आख्यानांतून उलगडले. भक्तीतून मुक्तीची साधना हे संतांच्या आख्यानातून अवगत होत गेले. सिन्नरकर बुवांचे प्रत्येक आख्यान हे पुरुषार्थ प्रबोधक असायचे. त्याचबरोबर ही आख्याने रंजक करतांना आणि समकालीन वास्तविक जीवनातील व्यवहाराशी जुळणी करतांना, प्रचलित जनजीवनातील संवादात्मकता ते मोठ्या कौशल्याने

वापरत. ''अहो, ऐकलंत का, गडे'', असा संवाद साभिनय ऐकतांना श्रोतेमंडळी थेट स्वतःच्या घरात पोहोचत. पौराणिक आख्यानांनाही मग वर्तमानाची झळाळी येई. आख्यान आपल्या अवतीभोवती घडते असे वाटायचे. भक्तीची आर्तता, अनन्यता असली की संकटांनी मांडलेल्या आकांतातही प्रत्यक्ष देव प्रकट होतो हे एव्हढ्या समरसतेने बुवा सांगत की, माझ्या बालवयात माझ्यावर कोसळलेल्या संकटावर मात करण्यासाठी मी देवाला हाक मारी. असे कितीतरी प्रयोग मी बालवयात केले आणि आश्चर्य म्हणजे, त्या त्यावेळी माझी संकटातून बेमालूम सुटका झाली. पाचवी-सहावीतली गोष्ट. एकदा मी आणि रावबा शाळेतून गुरुजींनी सांगितले म्हणून शाळेच्या शेतावर राखण करायला गेलो. तेथून पलिकडेच असलेले धुमाळांचे, भल्या कैऱ्यांनी लगडलेले, आंब्याचे झाड आम्हाला खुणावत होते. शाळा सुटण्याच्या वेळी म्हणजे सायंकाळी पाच-साडेपाचच्या सुमारास दोघांनी ठरवले आणि पळतच आंब्यापाशी पोचलो. इकडेतिकडे पाहिले कोणीही दिसेना. अगदी जवळच्याच मोठ्या फांदीवर, अगदी हाताला येतील अशा उपफांद्यांना चांगले आंबे लगडले होते. दोघे झाडावर चढण्यात पटाईत. चढलो. चांगला पाडाला लागलेला आंबा, खोबऱ्यासारख्या गोड. पाहून कैऱ्या तोडल्या, कचाकचा लचके तोडून खाऊ लागलो. आणखी घ्याव्यात म्हणून खाकी चड्डीच्या खिशात दोन-दोन कैऱ्या आरामात भरल्या. आमचा फराळ मुराद सुरू होता. तेव्हढ्यात ''धार, धार, धार, पळता का नाही, दमानं बघतोच तुमचा बेत, चड्ड्याच घेतो सोडून...'' आरड ऐकू आला. आम्ही खाली उड्या ठोकल्या आणि बहिरोबाच्या टेकडीच्या दिशेनं पळू लागलो. धुमाळाने आमचा पाठलाग सुरू केला होता. आम्ही चिंगाट पळत होतो. मनात सिन्नरकरबुवा भेटले. देवाचा धावा सुरू केला, जोरात पळत होतो. मध्येच मागे वळून पाहात होतो. धाप लागली होती. धावा सुरू होता. तेव्हढ्यात धुमाळ पळता पळता, त्याचा पाय त्याच्याच धोतरात अडकून पडल्याचे लक्षात आले. ''दमानं तुमच्यायला तुमच्या मास्तरला उद्या येऊन सांगतो'' असे उगाच ओरडत धुमाळ माघारी फिरला. देवानेच त्याला शिक्षा केली होती असे एक ना अनेक प्रसंग. आता आठवले की हसू येते. भक्तीची उत्कटता आणि भक्तिसाधनेवरील विश्वास जागविण्याची किमया सिन्नरकर बुवांमध्ये नक्कीच होती.



**''मोरोपंत तांब्यांची कन्या । सगुणरूप खाणी ।**
**वाजला हो डंका । त्रिभुवनी ।''**

येथपासून झाशीच्या राणीचं आख्यान सुरू होई आणि ''लगाम खेचला घोडा चार खुर मागे आला, खिंकाळला आणि... झाशीवालीनी... फेकला तटाहून घोडा'' राणी साहेब निसटल्या जीवाच्या आकांतानं ''दड दड दड दड'' तबला आणि घुंगुरांच्या तालावर वायू वेगानं झाशीच्या राणींचा घोडा सुसाट पळत होता. राणी लक्ष्मीबाईच नव्हे तर जिजाऊसाहेब, अहिल्यादेवी, सीतामाई, द्रौपदी अशा कितीतरी स्त्रीशक्ती, मातृदेवता सिन्नरकर बुवांनी मांडाव्यात आणि मातृशक्तीला, स्त्रीशक्तीला प्रत्यक्ष संस्कृतीला वंदन करीत, राष्ट्रीय भावनेने, पावित्र्याने, धीरोदात्ततेने मने भरून, भारून टाकावीत, मुक्ताबाई, जनाबाई, सतीमहानंदा, मीराबाई, सोयराबाई या स्त्रीसंतांच्या आख्यानातून स्त्रीमनातील समर्पित भक्तिभावना सर्वांपर्यंत पोचवावी. तुकोबारायांचं वैकुंठगमन, गोरोबांचं चिखलातून पुनर्चैतन्य आवाहन, मुक्ताईची संत परीक्षा, चांगदेवांचे गर्वहरण, ज्ञानोबांचे समाधीग्रहण, नामदेवांचा भोजन हट्ट रंगवितांनाची वर्णनं म्हणजे स्पर्शकारी चित्रशैलीचा अजब नमुना असायचा.

**''मनी धीर धरी शोक आवरी जननी**
**भेटेन नऊ महिन्यांनी''**

कुंजविहारींच्या कविता गायनातून हसत हसत फासावर लटकणाऱ्या क्रांतीकारकांच्या, मातृभूमीसाठीच्या समर्पणाला नाट्यपूर्णतेने कारुण्य आणि शौर्य, राष्ट्राभिमान आणि मनाची ओजस्विता एकाचवेळी प्रकट करतांना; तरुणांची मनं पेटवावीत आणि माऊलींची मन ओलीचिंब करावीत.

**''पाहताच छाती धडके । वासुदेव बळवंत फडके''**

असं आवेशपूर्ण आख्यानगायन सुरू झालं की त्या ज्वलंत जहाल क्रांतीकारकांबरोबर अबालवृद्धांचे बाहू स्फुरण पावत.

शिवछत्रपतींच्या मावळ्यांचं गडकोट किल्ले सर करण्याचा इतिहास म्हणजे प्रत्यक्ष चित्रपटच पाहातो आहोत, असे वाटे.

पांडवांचा अज्ञातवास, त्यातही विराटाकडील त्यांचा निवास गमतीदारपणे रंगवावा तो सिन्नरकर बुवांनी. कौरव सैन्यावर चढाई करायला निघालेल्या उत्तर बाळाचं सारथ्य करायला निघालेला बृहन्नडा आणि त्या राणीवशात उत्तराने केलेली दर्पोक्ती, सैन्य पाहून उडालेली घाबरगुंडी, सिन्नरकर बुवा मोरोपंतांच्या

आर्यांमधून रंगवित; तेव्हां त्यांच्या पांडित्य-लाघवाच्या दर्शनानं श्रोते हरखून जात-

**''कुरू कटकासी पाहाता तो उत्तर बाळ फार गडबडला**
**स्वपर बळाबळ नेणूनी बालीश बहू बायकात बडबडला ।''**

कितीतरी प्रासंगिक आर्या सहज बुवांच्या मुखातून बाहेर पडत.

हरिदासाची कथा मूळपदावर येऊन; भजनाची वेळ आली की ''बाळकृष्णा चरणी लक्ष लागो रे । कीर्तन रंगी रंगात देह जावो रे ।'' हे मोठ्या तळमळीने सुरू होई. कधी मंगळवार, शुक्रवार देवीचा जागर करताना ''अनादिनिर्गुणी प्रकटली भवानी । आईचा जोगवा मागेन बयाचा जोगवा मागेन ।'' असा जोगवा व्हायचा. कधी प्रभुरामांचा नामावली जप व्हायचा. आरती करतांना सुरुवातीला 'हे चि दान देगा देवा तुझा विसरनं व्हावा' म्हणून तबलापेटीवर जोरदार आरती होई. दुसऱ्या दिवशीचे 'आख्यान' जाहीर होई. कधी कोणी संस्था, एखादे मंडळ दुपारी चारच्या सुमारास त्यांचे कीर्तन आयोजित करी. ते कीर्तन ऐकायला मात्र मी मुकत असे.

महिना सव्वामहिन्यांचा ज्ञानयज्ञ संपवून सिन्नरकर बुवा निघून जात, तेव्हां माझ्या मनाला सुनेसुने वाटे. पुन्हा कधी येतील याकडे डोळे लागत. सिन्नरकर बुवांच्या अवघ्या व्यक्तिमत्त्वाच्या संस्कारांचा परिणाम; तेव्हढाच गमतीशीर आणि ऐतिहासिक स्वरूपात स्वाभाविकपणे प्रकटला. पंच्याहत्तर शहात्तरमध्ये सत्याग्रह केल्याने नाशिकच्या सेंट्रल जेलमध्ये जावे लागले तेव्हां मदांध सत्तेविरुद्ध, जेलमध्ये ओजवी कीर्तन माझ्याकडून घडले. बालपणीच्या कीर्तन संस्कारात मी असा अखंड बुडालो होतो.

●●●



# आनंदयात्री

## (शामसुंदर विष्णूपंत शाळिग्राम तथा बाळासाहेब)

घरंदाजाचं घरंदाजपण, रावरंकपणाच्या पलिकडे. माणूस म्हणून सहानुभूतीसह शहाणपणानं जगण्यात असतं; याचा प्रत्यय बाळासाहेबांच्या सहवासात, बालवयापासून माझ्या मनाला स्पर्श होत गेला. समाज आणि कुटुंब जीवनात, प्राप्त भूमिका, तत्परतेने प्रेमपूर्वक प्रकटून वठवायच्या असतात. सुखदुःख हीच तर जीवन क्रीडा आहे. प्राप्त स्थलकाल परिस्थितीत स्वीकार्यतेने जीजीविशेने आणि आनंदाने जीवन क्रीडा करीत जगण्यातच जीवनाची श्रेयता असते. बाळासाहेब अर्थात शामसुंदर विष्णूपंत शाळिग्राम हा या मानवी शहाणपणाचा वस्तुपाठ होता.

अकोले तालुक्यातल्या समशेरपूर गावातलं तालेवार, वतनदार, घरंदाज घराणं आता सर्वदूर विखुरलं आहे. प्रज्ञा, प्रतिभा, उदारता आणि सहजीवनासाठीचे समायोजन हे या घराण्याचे अनुवंशिक गुणविशेष, घराण्याच्या संतांनांतील अनेक वंशजांकडून ठळकपणे अनुभवता येतात. त्यातील एक कुटुंब कल्याणमध्ये आलं विष्णूपंतांचं. भलं कुटुंब! पण कुटुंबाच्या वाट्याला वणव्याची होरपळ कशी भोगण्याचं वाट्याला आलं सांगता येत नाही. त्या वणव्यातून बाहेर पडून पित्याला पराकाष्ठेनं, जपत जगणारा एक तरुण मुलगा म्हणजे शामसुंदर. कल्याणच्या टिळक चौकाजवळच्या मुरारशेठ वाड्यातल्या, भाडेकरूंसाठीच उभारलेल्या एका दोनखणी, बैठ्या आणि कौलाराच्या खोलीत राहणाऱ्या या तरुणाची कहाणी, या तरुणाचे माझ्या ताईशी अर्थात नलिनीशी विवाह झाल्यानंतर मला त्यांच्या शेजारी राहणाऱ्या बारेभाभींकडून कळली. बहिणीच्या

घरी वर्ध्याला एका प्रकारे पोरकेपणाने, वडिलांच्या पश्चात राहणाऱ्या या मुलाने स्टँडवर चिवडा विकण्याचे काम करून कसेबसे काही दिवस निभावून नेले. त्याच्या आणि ताईच्या सुदैवाने किंवा दुर्दैवाने म्हणा, रेल्वेत खलाशी म्हणून या तरुणाला नोकरी मिळाली. तेव्हांपासून हा तरुण मुरारशेठ वाड्यात या साडेसात बाय पंधराच्या खोलगंडात एकटाच राहात होता. तात्यांनी ताईला स्थळ पाहाण्यासाठी शब्द टाकायला सुरुवात केली होती. मोठे टाकळकर मामा अर्थात वासुदेव टाकळकर, गंगाधर सोमणी ही मुळातली अकोलकर मंडळी, आमची जवळून परिचित. टाकळकर मामांना तर आम्ही सख्ख्या मामांप्रमाणे मानीत असू. त्या दोघांनी अकोले तालुक्यातल्या मुळच्या समशेरपूर येथील शाळिग्रामांच्या या शामसुंदराचे स्थळ सुचविले. भरीला घातले. तात्यांचा सहा मुलांचा पोरवडा, पोस्टमनची तुटपुंजी नोकरी, मुलीचे शिक्षण जेमतेम सातवीपर्यंत, या एकूण परिस्थितीचा विचार झाला. एकादशीच्या घरी शिवरात्रीने संसार थाटावा तसा शामसुंदर आणि नलिनीचा त्या खोलगंडात संसार सुरू झाला. ताई सहस्रबुद्ध्यांच्या घरंदाज घराण्यातली, आईच्या सुसंस्कारात वाढलेली. दिल्या घरी प्रपंच करायचा, निष्ठेनि नि निमूटपणाने, एव्हढेच मनी दृढावलेले. संसार सुरू झाला. खोलीतल्या संसारात शामनलिनी रमून गेली आणि ताई बाळंतपणाला अकोल्याला आली. परमेश्वर लीलाविग्रह करतांना सुखद किंवा दुखद परमोत्कर्ष बिंदू गाठतो तसे झाले. शामसुंदरांच्या वाट्याला अकल्पित जीवघेणे दुखणे आले. अखेर घशात काच रुतल्याने हे घडले हे निष्पन्न झाले. आईनं महत्प्रयासाने त्यांना वाचवले. त्याचवेळी ताईनेही कन्यारत्नाला जन्म दिला. 'कल्पना' प्रकटली.

१९६२ च्या मे महिन्यातली गोष्ट. कल्पनाला घेऊन ताई पुन्हा कल्याणला गेली होती. माझे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या, संघशिक्षा वर्गाच्या प्रथम वर्षाला जायचे ठरले. पुण्याला जायला हुरावलो होतो. अगोदरच चारपाच दिवस पुण्यात दादामामांकडे अर्थात गजानन काणे यांच्या घरी छत्तीस बुधवारात दाखल झालो. पोहण्याची आवड. एस. पी. कॉलेजच्या टँकवर पोहायला गेलो. वातावरण पाहून मोकाट सुटलो. बारा मीटर उंचीवरून कोलांट्या मारल्या. चटकच लागली. दुसऱ्या दिवशी संघशिक्षा वर्गात दाखल व्हायचे होते. म्हणून रानभरी होऊन मुराद पोहत होतो. कसे कोण जाणे थोडे चुकले आणि बारा मीटरवरून कोलांटी घेतांना चुकून चक्क छातीवर आपटलो.



पाण्यात काही वाटले नाही. कळलेही नाही. मी नुकताच इ. ९ वी होऊन संघशिक्षा वर्गाला आलो होतो. उणापुरा चवदापंधराचा असेल. संघशिक्षा वर्गात दाखल झाल्यावर दोन दिवसाची दिनचर्या, शारीरिक इ. व्यवस्थित झाले. तिसऱ्या दिवशी छाती, नाक, घसा भरला, गुदमरल्यासारखे झाले. नंतर आकडी आल्यासारखे वाटले. मी जेव्हां शुद्धीवर आलो तेव्हां मी संघशिक्षा वर्गाच्या रुग्णालयात होतो. दर दोन-तीन तासाने तसे होऊ लागले. दुसऱ्या दिवशी पू. सरसंघचालक गोळवलकर गुरुजींचा प्रवास होता. ते रुग्णालयात आले. थेट माझ्याजवळ येऊन त्यांनी माझी नाडीपरीक्षा केली. ''याला हॉस्पिटलात ससूनला न्या!'' त्यांनी सांगितले. मला ससूनला हलवले. प्रचंड घाबरलो. त्या दिवशी जो बेशुद्ध झालो तो दुसऱ्या दिवशीच शुद्धीवर आलो. हॉस्पिटलचे वातावरण पाहून आणखी घाबरलो. तोवर तात्या, आई सगळे आले. त्यांना पाहून तर मी हॉस्पिटलात न थांबण्याचा हट्टच घेतला. संघाचे ज्येष्ठ पूर्णवेळ कार्यकर्ते दादा चोळकर माझ्यापाशी बसून होते. सौम्य पितृवत व्यक्तिमत्त्व. ते म्हणाले, ''पाहू डॉक्टरना विचारून!'' स्वतः सरसंघचालकांनी पाठवल्यामुळे माझी बडदास्त फार मोठी होती. त्यामुळे तर मी आणखीच घाबरलो. डॉक्टरांचे रिपोर्ट आले. साधं टॉन्सिलमुळे हे घडते आहे, असे म्हणणे पडले. भोवतीच्या माणसांनी सुटकेचा निःश्वास टाकला. पण दुसऱ्या क्षणी डॉक्टर म्हणाले, ''भूल देऊन ऑपरेशन करणे धोक्याचे आहे. पेशंट दगाऊ शकतो.'' हे ऐकून सगळेच हबकले. त्यात मामांच्या घरी त्यांच्या मुलीचे लग्न होते. मामीने तर ''लग्नात वन्संच्या मुलग्यानं विघ्न आणलनि हो!'' म्हणून भोकाड पसरले. माझ्या जाण्याचा हट्ट वाढला. सगळ्यांचा डोळा चुकवून मी थेट बाहेर पळालो. मला पुन्हा आत डांबता डांबता मंडळी मेटाकुटीला आली. मी पुन्हा बेशुद्ध झाल्याने सगळे आणखी घाबरले. डॉक्टर म्हणाले, तुमच्या जबाबदारीवर घेऊन जा. मामीला मी तेथे नको होतो. मला हॉस्पिटलला ऱ्हायचे नव्हते. अकोल्याला नेऊन उपयोग नव्हता. तात्या मानी स्वभावाचे. काय करावे कळेना. आई तात्यांनी डोक्याला हात लावला. बाळासाहेब मला बघण्यासाठी आले होते. त्यांनी परिस्थिती पाहिली. दादा चोळकरांशी चर्चा केली. दोघेही कल्याणचे असल्याने मोकळेपणाने चर्चा झाली. बाळासाहेब मग आईदेखत थेट दरडावून तात्यांना म्हणाले, ''तात्या मी आता कोणाचंच ऐकत नाही. तुम्हाला होच म्हणावं लागेल. पोराला मरू द्यायचं का? मी त्याला कल्याणला घेऊन

जातो!'' तात्यांचा नाईलाज होता. ठरलं. पुणं सोडून तात्या आई वगैरे सगळे अकोल्याला आणि मी बाळासाहेबांबरोबर कल्याणला रवाना झालो. कल्याणला घरात पोचलो मात्र मला आकडी आली. ताई घाबरली. तिने बोळ्यानं माझी छाती शेकण्याचा प्रयत्न केला. त्यात जळकं फडकं गडबडीनं छातीवर ठेवलं गेलं. छातीला फोड आले. भाभींनी कल्पनाला घेतलं. बाळासाहेब चिडले, पण काही क्षणात मी शुद्धीवर आल्यावर सारं शांत झालं. ससूनची कागदपत्र घेऊन बाळासाहेब काही लोकांकडे गेले. त्यात त्यांच्या वहिनीची नि त्यांची भेट झाली. त्या त्यांना डॉ. म्हस्करांकडे घेऊन गेल्या. डॉ. म्हसकर धाडशी आणि समाजहितैशी डॉक्टर. त्यांनी सगळे पाहून माझे ऑपरेशन करण्याचा चंग बांधला. जबाबदारीची जाणीव करून दिली. यावेळी मात्र बाळासाहेब थोडे घाबरले. तरी मला म्हणाले, ''कसं करूया भूल न देता ऑपरेशन करायचं. अगदी जुजबी लोकल बधीर करू म्हणाले. तू सहन करशील?'' मी वैतागलो होतो. म्हणालो, ''असं मरण्यापेक्षा तसं मरणं बरं, मी सहन करीन.'' माझं लहानग्या वयातलं बोलणं ऐकून बाळासाहेबांचे डोळे पाणावले. ताई रडू लागली. तिच्यावर तान्हुल्या कपीला सांभाळायचं आणि मला वाचवण्याचा प्रयत्न करायचा; दोन्ही जबाबदाऱ्या होत्या. बाळासाहेबांच्या दुखण्याच्या आणि बाळंतपणाच्या दिव्यातून ती नुकतीच बाहेर पडली होती. पण तिनेही कंबर कसली. सगळे झाल्यावर तात्यांना सांगू असं बाळासाहेब म्हटल्यावर तर ताईला हबकल्यासारखं झालं. बाळासाहेबांनी भाभींशी विचारविनिमय केला. पैशाच्या जमवाजमवीचा मोठा प्रश्न होता. बाळासाहेबांजवळ त्यांच्या घराण्यातली काही भली भांडी होती. परात, डेग, मोठे पातेले. माळ्यावरून काढून बाळासाहेबांनी थेट बाजार दाखवून विकून टाकली.

डॉ. म्हसकरांकडे दाखल झालो. अक्षरशः अर्धा तास. त्यांनी मला खुर्चीला बांधून, ऑपरेशन केले. त्या दिव्यातून जातांना मी मरत्या, मान कापत्या गुरासारखा ओरडलो. पण वाचलो. डॉक्टरांनी माझी पाठ थोपटली. बाळासाहेबांची पाठ थोपटली. बाळासाहेब रडत होते. मी मात्र आइसक्रीम चघळत शांत होत गेलो. बाळासाहेबांच्या धीरोदात्त खंबीरपणाने मी जगलो. अन्यथा...

एस.एस.सी.ची परीक्षा झाली. आगाऊपणाने आणि अतिरिक्त आत्मविश्वासाने चार भाषा, दोन सायन्स आणि गणित अशा सात विषयांचीच



परीक्षा द्यायचे ठरविले. खरेतर आठ विषय घेऊन सातात पास झाले तरी चाले. त्यात इंग्रजी आणि गणिताचा बागुलबुवा केलेला असे. पेपर संपले. ते पुढे कायचे काहूर माजले. तात्या मे अखेरीस निवृत्त होणार होते. घरातल्या माई, दादा या ज्येष्ठांना नोकरीचा पत्ता नव्हता. नुसतीच धडपड सुरू होती. त्यात माझी भर पडणार होती. बाळासाहेब म्हणाले, ''अनिल तू कल्याणला निघून ये, पाहूया काही जमले तर. मुंबईत कोणीही पोट भरते.'' बाळासाहेबांच्या या सांगण्याने मी मुंबईत जाऊन काही करायची स्वप्ने रंगवू लागलो. स्वप्ने घेऊनच कल्याणला आलो. मुळात बाळासाहेबांची खलाशी म्हणून नोकरी. तुटपुंजा पगार. त्यात दोन मुली. महिनाअखेरही गाठणे मुश्कील. त्यात माझी भर. मी गेलो. ताईने सुटीला आलाय म्हणून कौतुक केले. काम शोधायचे होते. बाळासाहेब याला त्याला विचारीत. काही जमेना. कुठे डॉक्टरांकडे, दुकानात सेल्समन म्हणून, अशीही कामे शोधू लागलो. कल्याणच्या टिळक चौकातल्या 'यु. जी. पै.' किराणा मालाच्या दुकानात विचारले. वर्तमान पत्रातील जाहिराती वाचून मुंबईतल्या काही मोठ्या हॉटेलमध्ये विचारून आलो. जाण्यायेण्याचा खर्च वाढला. बाळासाहेब कोठून कसे पैसे देत, ते त्यांचे त्यांनाच माहिती. सगळा खर्च फुकट गेला! ताई स्वाभाविकपणे किरकिर करू लागली. हातभार लागण्याऐवजी खड्डाच पडू लागला. बाळासाहेब मात्र नित्य नवी कल्पना सांगत, सुचवत. दुर्दैवाने सगळीकडून नकारघंटा वाजे. अखेर मी म्हणालो, ''बाळासाहेब, मी अकोल्याला जातो. पाहातो काही मिळते का.'' त्यांनीही नाईलाजाने होकार भरला. पण बजावले, ''हे बघ तुझा रिझल्ट आहे. रिझल्ट लागल्यावर थेट इकडे निघून ये.'' मी सरळ अकोल्यात दाखल झालो. रिझल्ट लागला. मी सुदैवाने पास झालो. नोकरी मिळण्याची आशा पल्लवीत झाली. मित्रांप्रमाणे कॉलेजला जावे असेही वाटे, पण ते शक्य नव्हते. तेव्हढ्यात माईला शिक्षिका म्हणून जिल्हा परिषदेची नोकरी मिळाली. तात्या निवृत्त झाले होते. पण प्रश्न सुटला होता. माझे माईच्या सोबत राहण्याचे ठरले. एका बाजूला टी.डी. करता येणार होते. मी आणि माई श्रीरामपूरला गेलो. कल्याणला जाणे टाळले. ताईपुढीलही धर्मसंकट टळले. त्या एका खोलीत आणि बाळासाहेबांच्या तोटक्या मिळकतीत ती तरी काय करणार होती? तिचा जीव तुटत होता. बाळासाहेबांना आपण काहीतरी करावे असे वाटत होते. आम्हाला त्यांचा केवढा आधार वाटे!

मी ‘टी.डी.’ झालो. लगोलग मला अकोल्यातच ‘मॉडर्न हायस्कूल’मध्ये शिक्षकाची नोकरी मिळाली. सगळेच बदलले. प्रश्न सुटल्यासारखे वाटले. दिवाळीच्या आणि मे महिन्याच्या सुट्टीत कल्याणला जाणे मोठ्या आवडीने सुरू झाले. माझे विद्यापीठीय शिक्षण बह्यस्थ स्वरूपात सुरूच होते. माईचे म्हणजे ताईच्या पाठच्या बहिणीचे, दादाचे म्हणजे माझ्या थोरल्या भावाची नोकरी, लग्न अशी प्रगती झाली होती. सुट्टीला कल्याणला गेले की ताई आणि बाळासाहेबांना मला कुठे ठेवू कुठे नको व्हायचे. मुली आतुरतेने मामाची वाट पाहायच्या. मग मात्र आम्ही चंगळ करीत असू. मी बी.एड. झालो आणि पगारही बऱ्यापैकी झाला. स्थिरावलो आणि आई, तात्या, ताई, बाळासाहेब सर्वांच्याच मनात माझ्या लग्नाचा विचार सुरू झाला. ताई आणि बाळासाहेब तर हुरावले. लग्न जमवणाऱ्या दोनचार लोकांकडेही जाऊन आले. मी मे च्या सुट्टीला गेलो आणि ताईने तर उचलच खाल्ली. मग बाळासाहेबांच्या उत्साहाला उधाण आले. ‘सोहनी मावशी’ नामक सामाजिक कार्यकर्त्यांनी स्थळ सुचविले. पत्रिकादि सोपस्कार झाले आणि नातूंची मुलगी पाहण्याचेही बाळासाहेबांनी ठरवून टाकले. शाळा सुरू होणार होती. त्याच्या आधी अवघे दोन दिवस पाहण्याचा कार्यक्रम. ताई बाळासाहेबांना चैन पडेना. पाहण्याचा कार्यक्रम झाला. बाळासाहेब तर माझ्या खनपटी बसून, निर्णय विचारू लागले. ‘मुलगी कशी वाटली; हे तर सांग’’ बाळासाहेबांनी विचारले. मी म्हणालो, ‘‘ठीक आहे, पण अकोल्याला गेल्यावर कळवतो’’ असे म्हणून वेळ मारून नेली. आणि मी दुसऱ्या दिवशी अकोल्याला निघालो. बाळासाहेबांनी कामावर दांडी मारली. ते मला सोडायला स्टँडवर आले. गाडी सुटतांना त्यांनी पुन्हा विचारले, ‘‘का रे मुलगी तर ठीक वाटली ना?’’ ‘‘हो हो, कळवतो’’ म्हणालो. गाडी सुटली. मी अकोल्यात पोचलो. एकच दिवस गेला. मी शाळेतून घरी आलो तर बाळासाहेब अकोल्याला घरी हजर. मी चकित झालो. ‘‘अरे, ताईनी सोहनी मावशींकडे तुझी पसंती कळवली आहे आणि ते गुरुवार शुक्रवारी अकोल्याला मुलगी घेऊन घर वगैरे पाहायला येणार आहेत.’’ मी गडबडलो, पण मनाशी विचार केला; आपल्याला घर ना दार, वाड्यातले भाड्याचे घर, जबाबदाऱ्या एवढ्या, आई, वडील, एक धाकटा भाऊ, एक बहीण हे पाहूनच काय ते ठरवतील आणि निर्णय आपल्याच हातात आहे. विचार करून मी म्हणालो, ‘‘येऊ दे.’’ ‘‘पण हे बघ, तू आता नाही म्हणू नकोस!’’ बाळासाहेब जरा दरडावून आणि हुकमीपणाने, तेही आई तात्यांच्या समोर म्हणाले. ‘‘मी उद्या सकाळीच जाणार आहे’’ त्यांनी जणू सगळा निर्णयच घेऊन टाकला होता. सगळी उठाठेव करून बाळासाहेबांनी आमचे लग्न लावून दिले. बाळासाहेब आणि ताईचे लग्न झाले तेव्हा मी अवघा आठवीला होतो. बाळासाहेबांना आपला लहानगा भाऊ असल्यासारखे वाटे. आम्हालाही थोरला कर्ता भाऊ नव्हता त्यामुळे आमचे सगळे हट्ट बाळासाहेबांकडेच चालत. माझे लग्न झाल्यावर लाड आणि हट्टांची मिसार नकळत सौ. उषाकडे गेली. बाळासाहेब एवढे सौ. उषाचे लाड करीत की जणू त्यांचीच कन्या! अगदी तिच्यासाठी कामावरून येतांना खाऊसुद्धा आणत. विशेष म्हणजे ताई नि बाळासाहेब दोघेही ‘कल्पना’ आणि सौ. उषामध्ये विलक्षण साम्य अनुभवीत. माझे लग्न झाले, मुलगा झाला. साऱ्या साऱ्या गोष्टींचे कोडकौतुक बाळासाहेबांनी पुरविले. अकोल्यात तात्या, आईसाठीचे आमचे स्वतःचे घर झाले. बाळासाहेबांना केव्हढा उत्साह.

पंच्याहत्तरमधली गोष्ट. टेलिग्राम आला. आभाळ कोसळले. बाळासाहेब कामावरून परत यायला निघतांना यार्डात ॲक्सिडेंट झाला. त्यांच्या अंगावरून पासष्ट डब्यांची मालगाडी गेली. तुकडे झाले होते. त्यांना उचलून रेल्वे हॉस्पिटलमध्ये आणोस्तवर आणि ताईची भेट होवोस्तवर तग धरून होते. ताईकडे आणि कल्पना, कामिनीकडे पाहिले आणि त्यांनी यात्रा संपवली.

स्वतःच्या बालपणापासून काटेरी वाटेवरून वाटचाल करणारा आनंदयात्री क्षणात नाहीसा झाला. ताईला आहाळावरून चालण्याचे व्रत देऊन; खस्ता, दारिद्र्य आणि नैराश्यावर मात करीत जीवनाची आरोळी ठोकणारा, प्रपंचयोद्धा नियतीपुढे नामोहरम झाला!

●●●

# तेजाच्या लेण्याला सलाम

## (शाहीर अमरशेख)

कॉम्रेड बी. के. देशमुखांच्या प्रचारासाठी राजुरात सभा होती. प्रचारासाठी आचार्य अत्रे येणार होते. त्याचबरोबर शाहीर अमरशेख यांच्या कलापथकाचा कार्यक्रम होता. मी तेरा मैल पायी राजूरला पोचलो. रामाच्या देवळात आमच्या ओळखीच्या आत्याबाई होत्या. मुक्कामाची सोय होती. अवघ्या सहावी यत्तेत होतो मी. पण अशा गोष्टींची आवड होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा बालमनावरही परिणाम झालेला. त्यात शाहीर अमरशेखांच्या पथकातील काही कलावंत कोतुळमधले होते. त्यांच्या सोयीने काहीवेळा कलापथकाचा सराव मुरली मास्तर नवले यांच्याकडे, एस.टी. स्टँडसमोरच्या घरात किंवा नबाजी मनकर यांच्या घरी चालायचा. स्टँडच्या जवळच आमचे जीवन शिक्षण मंदिर. आम्ही मुले हा सराव ऐकायला जायचो. आम्हाला कोणी अडवायचेही नाही. शाहिरांच्या पहाडी सुरेल आवाजाची, त्यांच्या ओजस्वी रचनांची मोहिनी बालमनाला पडलेली. प्रत्यक्ष संपूर्ण कलापथक पाहायला, ऐकायला मिळणार, त्याचबरोबर आचार्य अत्र्यांचे भाषण ऐकायला मिळणार याचे आकर्षण होते. कलापथकाला सुरुवात झाली. मी अगदी पुढ्यात समोर मांडी घालून बसलेलो होतो. जन्मभूमीच्या वंदनेने कलापथकाची सुरुवात झाली,

**''जन्मभूमी – प्रिय माय जन्मभूमी**
**आकाश निळें नीलमणी धरति सुवर्णा**
**चंदेरी नद्या वाहती भोती हरितगालिचा**



**वायूमंद गीत–गंध उधळि दशदिशा**
**कवि पुलकीत क्षणाक्षणात जीवन आशा**
**माय जन्मभूमी अशी थोर जन्मभूमी**
**प्रिय मला ही माझी माय थोर जन्मभूमी ।।''**

शाहीर गात होते. शैलेन्द्रांच्या 'मेरी प्यॅरी जन्मभूमी' गीत, सुरेख रुपांतरीत गीत, अमरशेखांच्या आवाजातून ऐकतांना मन भारतभूमीच्या प्रेमाने आणि अभिमानाने भरून येत होते. स्वातंत्र्य आणि राष्ट्रप्रेम जागविणारी ही कविता गाऊन झाली. अमरशेखांचे धरतीत एकरूप झालेले मन प्रकट होऊ लागले.

**''माझा देहचि धरती माता**
**हा कुराण ही माझी गीता**
**यातच धन, ऋण शक्ति उपजल्या**
**बुद्धि भावना रूप जाहल्या**
**शब्दांच्या या तारे मधुनी**
**जगी एक होऊनी प्रकटल्या**
**प्रकाशमय हे जीवन झाले**
**गुढ उकलण्या पुढे निघाले''**

भारतभूच्या मातीतून गीत होऊन प्रकटलेल्या या गाण्याने माझे मन भारून गेले. डफावरली थाप, प्रेमभावनेची ओतप्रोतता आणि आवाजातले ओजोयुक्त माधुर्य बालमनाला संस्कारीत करीत होते. शाहीर, बी. के. देशमुखांच्या प्रचाराला आलेले. समोर आदिवासी महादेवकोळी, ठाकर, तलवार कानडे अशी सह्यशिखरांच्या डांगाणातील ही श्रमजीवी भुलेकर. स्वातंत्र्य चळवळीतही कणखरपणाने भूमिगतांना सांभाळणारी शिवप्रेम, महाराष्ट्रप्रेम, राष्ट्रप्रेम यांनी भारलेली. साम्यवादी चळवळीला जवळची, शेतकरी लढ्यातली, जंगल सत्याग्रहातली, या साऱ्यांना संयुक्त महाराष्ट्र चळवळीत शाहिरांनी साद घातलेली. त्यांच्या हृदयाला साद घालीत शाहीर गाऊ लागले,

**''कड्या कपारी वणवण फिरतो**
**कणकण झिजतो शाम मुकुंद मुरारी**
**माझा कृष्ण गोविंद मुरारी''**

स्वत्वाने आणि भक्तीने मने शाहिरांशी एकवटून गेली. आणि पुढच्याच गाण्याने सभा सळसळून उठली,

**''शेतकऱ्यांनो यारे, घ्या एकीची हाती मशाल**
**कामगार या सारे, उधळा वरती रक्त गुलाल ।।''**

सहाव्या यत्तेत शिकणाऱ्या बालमनावर झालेल्या या संस्कारांनीच कदाचित पीएच.डी. करण्याची वेळ आली तेव्हा याच 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास' असा विषय घेऊन अभ्यास मांडण्याची बुद्धी झाली असावी.

बासष्ट सालची गोष्ट. चीनने भारतावर आक्रमण केले होते. मी नवव्या यत्तेत होतो. राष्ट्र जागरणासाठी शाहीर अमरशेखांचे कलापथक थेट आमच्या मॉडर्न हायस्कूलच्या मैदानावरच होते. मी अमरशेखांवर नको एवढे प्रेम करीत होतो. मला पर्वणीच वाटली. कलापथक सुरू झाले. भूवंदना झाली आणि शाहीर गाऊ लागले,

**''बर्फ पेटला हिमालयाला विझवायाला चला**
**वृद्ध तरुण या फक्त रक्त द्या, द्या रे साथ हांकेला**
**या रे द्या रे साद हांकेला**
**रक्तलश हिमगिरीवर चढुं द्या**
**जनसागर सीमेला भिडु द्या**
**शिरकमलें अग्नींत पडुं द्या**
**ध्वज राष्ट्राचा सीमेवरचा भिडुं द्या रे गगनाला ।।**
**पक्ष पंथ धर्म भेद सारूनि**
**गिळिली भूमि मुक्त करोनी**
**गान शांतिचे घुमवूं गगनीं**
**न्यायी भारत, नाहिं आक्रमक दावूं या जगताला ।।**

शाहिरांच्या अशा गाण्यांनी मी पेटून उठत असे. 'राष्ट्र सेवा दल' आणि आठव्या यत्तेनंतर 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' या भारतराष्ट्रीय संस्कार करणाऱ्या नियमित संस्थांकडे; मी कदाचित, शाहीर अमरशेखांच्या गाण्याने खेचला गेलो होतो. शाहीर अमरशेखांची गाणी माझ्या मनात सतत हाक मारतांना जाणवत राहतात एवढे खरे.

१९६९ सालातली गोष्ट. अमरशेख गेले. मी त्यावेळी 'मॉडर्न हायस्कूल अकोले'मध्ये शिक्षक म्हणून सेवारत होतो. श्रद्धांजलीचा कार्यक्रम घडवला. मन स्वस्थ बसत नव्हते. जानेवारीमध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल काढायचे



ठरविले. 'मुंबई दर्शन' हे केवळ निमित्त. यानिमित्ताने दोन महामानवांचे स्मृतिस्थळ विद्यार्थ्यांना दाखवता येईल हा स्वार्थ मनात होता. आचार्य अत्रे यांचे धडे पाठ्यपुस्तकात होते त्यामुळे त्यांचे आकर्षण होतेच पण अकोल्याशी अमरशेख संबंधित असल्याने मुलांच्या पालकांना माहीत होते. पाहाता पाहाता दोन बस भरल्या. मुंबईत शाहिरांच्या निवासस्थानी शोधत शोधत गेलो. पूर्वसूचनाही दिली नव्हती. एकदम दोन बसेस दारात उभ्या झाल्या. शाहिरांच्या स्मृतींना वंदन करायला आलेल्या विद्यार्थ्यांना पाहून शाहिरांचे कुटुंब गहिवरले. त्यात अकोल्याकडचे विद्यार्थी पाहून गहिवर अधिक दाटला. सगळ्यांनी प्रतिमेला वंदन केले. काय करावे हे कुटुंबियांना समजेना. तरी बाईंनी सांगितले ''तसे जाऊ नका''. आम्ही थांबलो. बाईंनी भुईमुगाच्या शेंगा आणि गुळ सर्वांना दिला, पाणी दिले. शाहिरांच्या स्मृतींनी साऱ्यांनाच दाटून आले. आता मलिका अमरशेख ताई शाहिरांचा प्रतिभा स्फुरणाचा वारसा चालवित आहेत. अमरशेख अध्यासन मुंबई विद्यापीठात सुरू आहे. पण ती आणि तशीच डफावरली थाप आणि अंतःकरणातून अंतःकरणापर्यंत मारलेली हाक ऐकू येत नाही...

पेमराज सारडा महाविद्यालयात नगरला मराठीचा प्राध्यापक म्हणून सेवारत झालो. अभ्यासक्रम पाहातांना मनाला खटकत असे. विशेषतः एफ.वाय.बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी.च्या वर्गांना शिकवतांना मनात येई या नवतरुणांमध्ये मानव्यप्रेम आणि ज्वलंत राष्ट्रप्रेम जागविलं पाहिजे. विकसनशील देश म्हणून; पाश्चात्यांच्या अनुकरणाचा सपाटाच अद्याप सुरू होता. जीत मनस्थितीतून, आम्ही बाहेरच पडत नव्हतो. नवतरुण या राष्ट्रीय स्वाभिमान संवेदनेला पारखे आहेत; असे जाणवत होते. कॉलेजचे जीवन फुलपाखरी आहे हे ठसविण्यापेक्षा; राष्ट्रनिष्ठ सैनिक म्हणून तरुणांच्या जीवनाला साद घातली पाहिजे असे सारखे वाटत होते. अगदी केवळ महाराष्ट्र म्हणून मर्यादित विचार केला तरी माझी ताकद कितीशी? एखाद्या शिक्षकाने असा विचार आधुनिक काळात करून कितपत आणि काय साध्य होणार? मन स्वस्थ बसू देत नव्हते. नगरला आल्यापासून गुरुवर्य डॉ. गंगाधर मोरजे यांच्याकडे जाणे नित्याचे. आम्ही काही मंडळी रोजच अनेक विषयांवर तेथे मंथन करीत असू. सद्गुरुची मठी 'मोरजाई' मठी असेच त्या घराचे स्वरूप झाले होते. तेथे मी स्वतः, डॉ. धोंडीराम वाडकर, ज्येष्ठ पत्रकार श्री. महादेव कुलकर्णी, 'मी तो

हमाल'कार आप्पा कोरपे, डॉ. एम. एस. बागवान असे काही सदस्य अगदी नित्याचे. डॉ. फादर ख्रिस्तोफर, शेळके एस. जे., डॉ. पंडितराव पवार, डॉ. अशोक एरंडे, डॉ. प्रभाताई मुळे, डॉ. गोपाळराव मिरीकर अशी गुरुबंधुभगिनी मंडळी कारणपरत्वे येतच असत. १९९९ सालातील गोष्ट. डॉ. पंडितराव पवार आणि डॉ. बाळासाहेब बळे मराठी अभ्यास मंडळावर होते. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले पुणे विद्यापीठ मराठी विभागप्रमुख होते. या संधीचा फायदा घ्यायचे ठरवले. 'राष्ट्रीय जाणिवेच्या कविता' असा मध्यवर्ती विषय घेऊन कवितांचे पाठ्यपुस्तक तयार करावे असे योजले. डॉ. गुरुवर्य गंगाधर मोरजे आणि मठीच्या सदस्यांमध्ये चर्चा केली. खूप चर्चा झाली. स्वातंत्र्यवीर सावरकर, कुसुमाग्रज आणि शाहीर अमरशेख यांच्या कवितांचं हे पुस्तक असावं असा विचार मी मांडला. अनेकांना स्वातंत्र्यवीर सावरकर आणि शाहीर अमरशेख ही नावं ऐकून धक्का बसला. चर्चांच्या अनेक फेऱ्या होत गेल्या. हळूहळू सर्वांना आणि विशेषतः गुरुवर्यांना कल्पना आवडली. डॉ. पंडितराव पवार यांच्याजवळ विषय मांडला. गुरुवर्यांच्या वर त्यांना समजून सांगण्याची जबाबदारी टाकली. पण फारसा वेळ लागला नाही. डॉ. पंडितराव नाशिकचे असल्याने त्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर आणि कुसुमाग्रज जवळचे वाटत. पण माझा आग्रह शाहीर अमरशेखांचा होता. चर्चेतून डॉ. पंडितरावांना ते पटले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पंधरा कविता, कुसुमाग्रजांच्या वीस कविता आणि शाहीर अमरशेखांच्या पंधरा कविता घ्यायचे ठरवले. विस्तृत प्रस्तावना लिहिण्याचे काम डॉ. पंडितराव पवारांवर सोपविले. सर्व कवितांचे संदर्भ, टीपा, कविपरिचय लिहिण्याचे काम माझ्याकडे घेतले. दोघांनी मिळून कविता निवडल्या. 'दास्ताने रामचंद्र आणि कंपनी' प्रकाशनाच्या श्री. विश्वासरावांनी प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली. हे सगळे घडल्यावर एकदा डॉ. नागनाथ कोत्तापल्ल्यांना भेटलो. त्यांच्यासमोर कल्पना मांडताच; त्यांना शाहीर अमरशेख नाव ऐकताना एक सुखद धक्का बसला. ''हे कसं सुचलं?'' त्यांनी थेट विचारलं. मी त्यांना माझा आणि शाहीर अमरशेखांचा संबंध समजावून सांगितला. विलक्षण आनंदाने पाठ्यपुस्तक करण्याचा निर्णय झाला. स्वाभाविकपणे शाहिरांच्या कविता निवडीचे काम मला करावे लागले.

'माझा देहचि धरती माता', 'कलश', 'जन्मभूमी',



**''जय महाराष्ट्र संयुक्त महाराष्ट्राच्या गाऊ गाना ।**
**गाऊ उंचावुनी माना, घेऊं तानावर ताना**
**भाषेचा थाट मराठी । अहिराणी, कोंकणी, घाटी ।**
**शब्दोच्चाराची खोटी । शत्रुला वाटते धास्ती ।।**
**ज्ञानेशापासुनि भिल्ल वाटली घेई नित नवरसना...''**

'प्रणाम - हिंदी-संघ-राज्याच्या जन-आत्म्या तू घेई प्रणाम', 'आदेश- हे शिवराया देई मला आदेश', 'हैड्रोजन बाँब', 'रात्र आहे वैऱ्याची जागा रहा - जागा रहा । ''काल लाल किल्ल्यावर आपुला रोविला तिरंगा । हुतात्म्यांनिशीं झुंज दिली । रक्ताची वाहून गंगा । तो जाळाया आज पेटवी शत्रू जातिय दंगा । संघराज्य धोक्यात आहे रे । तुझी दिल्लीची गुहा - जागा रहा ।।'', 'बर्फ पेटला', 'मानव जाईल यशाप्रती', 'पेटत नाहींत कशी ही मनें', 'भारतरत्न कर्वे यांसी', 'पाव शतक', 'जात्यावरच्या ओव्या', 'शेतकऱ्यांनो यारेऽ', आणि 'दुनिया दोन हाताची' अशा कविता निवडल्या.

विविध प्रकारची भवतिन भवती झाली पण 'तेजाची लेणी' हा कवितासंग्रह पाठ्यपुस्तक म्हणून लावण्यात यश आले. पुढे तो मुंबई आणि गुलबर्गा येथेही अभ्यासाला लागला.

तेजाच्या लेण्याला सलाम करण्याचे भाग्य मला लाभले

●●●

# महाराष्ट्राचे आचार्य
## (प्रल्हाद केशव तथा आचार्य अत्रे)

संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती ही आमच्या निर्मितीबरोबरच झाली; त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या चळवळीत आमचे योगदान नाकारणारा निर्माण होणे शक्य नाही; असे आचार्य अत्रे स्टाईलने आम्ही म्हणालो; तर कोणी गैरसमज करून घेऊन; अभिनिवेशाने, खंडनार्थ, सरसावू नये. आमचा जन्म १९४७ च्या ऑगस्टमधील २४ तारखेचा. या दृष्टीने १५ ऑगस्ट १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या भारतीय पुनर्रचनेसाठीच आम्ही सरसावलो, असे म्हणायला हरकत नाही. १९४९ सालीच आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांनी 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे', ही घोषणा दिली होती. हे आम्हाला सांगोवांगी माहीत झाले. तब्बल अकरा वर्षांनी म्हणजे १९६० साली संयुक्त महाराष्ट्र साकार झाला. तेव्हा आम्ही सहाव्या यत्तेत शिकत होतो.

बालवयात एखाद्या चळवळीचा कितपत परिणाम होतो; हे सांगणे, तसे मानसशास्त्राचा विषय असला; तरी आमच्या बालमनावर या चळवळीचा बऱ्यापैकी परिणाम झाला होता. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरची पहिली दहाबारा वर्षे स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्यांच्या निःश्वासाचीच म्हणावी लागतील. त्यामुळे भारत देश, स्वातंत्र्यलढा, प्रभातफेऱ्या, स्वातंत्र्य दिनाचा सोहळा, महात्मा गांधी वधाच्या परिणामाने आलेली कटुता, त्यातच आमच्या अकोले तालुक्याने अनेक भूमिगतांना सांभाळलेले, त्यांच्या कथा, भरीसभर म्हणजे; पत्रीसरकार, जंगल सत्याग्रह, शेतकरी शेतमजुरांच्या कम्युनिस्टांच्या चळवळी यांचा बालेकिल्ला असलेला आमचा तालुका. या सर्व गोष्टींची चर्चा गल्लोगल्ली, मोटार अड्ड्यावर, शालेय कार्यक्रमप्रसंगी येणाऱ्या पुढाऱ्यांच्या मुखाने, घरात आणि दारात होतच असे. लोकशाही व्यवस्थेमुळे सुरू झालेल्या निवडणुकांचे सत्र, त्यातील मिरवणुका, प्रतिमिरवणुका या सर्व गोष्टी आमच्या बालमनासमोर घडत आणि त्यांचा परिणाम आमच्या मनावर होत असे. अकोले तालुका हा कम्युनिस्टांचा बालेकिल्ला. विडी कामगार संघटना मोठ्या प्रमाणावर, शेतकरी संघटनांचा बढीवार असायचा. 'विळाकणीस', 'विळा हातोडा', 'लाल निशाण' ह्या गोष्टी आम्हाला क्रांतीची चिन्हे वाटत. अकोले तालुक्यातील साम्यवादी विचाराची मंडळी, सारख्या चळवळी करीत. त्यामुळे शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमरशेख अशी शाहीर मंडळी त्यातच सर्वोदय चळवळ ही या तालुक्यात सुरू झालेली. राष्ट्र सेवा दल आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचीही भर. त्यामुळे बालमनाला आकर्षित करून घेणाऱ्या, या राजकीय चळवळीतल्या घडामोडी विलक्षण परिणाम करून जात. त्यात आमची 'जीवन शिक्षण मंदिर' ही शाळा मोटार अड्ड्याच्या शेजारीच. हे स्थान या सर्व गोष्टींचे परवलीचे स्थान म्हणाना! पाचवी सहावीच्या दहाबारा वर्षांच्या संवेदनशील मनावर छोट्या गावात याचे किती परिणाम होत असतील याचा विचार केलेलाच बरा. आज या वयातील मुले एकतर 'ममाज बॉय' नाहीतर 'होस्टेल बॉय' असतात. तो काळ सर्व सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय घडामोडींच्यामध्ये सहज पोरंटोरं म्हणून सहभागी होण्याचा होता. कॉ. श्रीपाद अमृत डांगे, आचार्य अत्रे, कॉ. बी. के. देशमुख, लाल निशाण गट स्वतंत्र स्थापणारे कॉ. दत्ता देशमुख, पी. डी. कडू पाटील अशी कितीतरी नावे सतत कानावर यायची. एव्हढेच काय त्यांच्या सभा असायच्या. आम्हाला काय कळते, यापेक्षा, तावातावाने होणाऱ्या भाषणांचे क्रांतीकारी नाट्य अनुभवायला मिळायचे. प्रसंगी झेंडे हातात धरून मोर्चा मिरवणुकीत सामील व्हायला मिळायचे. तेव्हढीच मजा!

कॉ. बी. के. देशमुखांच्यासाठी राजूर येथे प्रचारसभा होती. मोठी संधी. शाहीर अमरशेखांच्या कलापथकाचा कार्यक्रम आणि आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांची सभा-भाषण. या कार्यक्रमासाठी मी अक्षरशः अकोल्याहून राजूरला पायी, तेरा मैल चालत गेलो. सभास्थानी अगदी स्टेजच्या पुढ्यात पहिल्या रांगेत बसलो. आजही; शाहीर अमरशेख आणि महाराष्ट्राचे लाडके द्रष्टे, विचारवंत, 'मराठा' पत्राचे संपादक, विनोदी लेखक, चित्रपट निर्माते,

नाटककार प्रल्हाद केशव अत्रे यांच्यासह; ते चित्र स्मरणपटलावर त्या क्षणांएव्हढंच ताजं आहे. मा. यशवंतराव चव्हाण आणि मा. मारुतराव कन्नमवार त्यांच्यावर ज्या पद्धतीने आचार्य अत्र्यांनी आपल्या खास ढंगात विधानं केली होती ती जशीच्या तशी लक्षात आहेत.

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे बी.टी. झालेले होते. त्या काळात 'बी.टी.' व्हायला गेलं तर 'टी.बी.' होऊन परत यावे लागे; असे अत्रे म्हणत. त्यामुळेच मी 'बी.टी.' होण्याची वाट नाही पाहिली. ते मला शक्यही नव्हते. 'बी.टी.' होण्यासाठी अगोदर ग्रॅज्युएट होणे आवश्यक असे. मी आपला एस.एस.सी.नंतर एक वर्षाच्या 'टी.डी.'ला गेलो आणि झटपट मास्तर झालो. अगदी १९६५ मध्येच. मास्तर झाल्यापासून आचार्य अत्रे माझ्यासमोर प्रकटले ते संपादक, नाटककार, विडंबनकार, वैचारिक तरी विनोदी लेखक आणि चरित्रकार म्हणून.

मास्तर झाल्यानंतर अवघ्या दोन वर्षातच माझी नाटककार अत्र्यांशी भेट झाली. माझे शिक्षक अनंतराव साठ्ये नाटकाचे शौकिन, दिग्दर्शक. त्यांनी स्टाफचे 'साष्टांग नमस्कार' हे नाटक बसवायला घेतले. पात्रनिवड केली. त्यात माझ्याकडे कविवर्य भद्रायूची भूमिका आली होती. हा तथाकथित नवकवी मला साकार करायचा होता. वेशभूषा, संवाद आणि भावूकता थेट नवकवीची. तोवर अत्र्यांचे बहुआयामी लेखन आणि सादरीकरणात्मक नाट्यलेखन आणि चित्रपटलेखन आणि प्रकटन, प्रसिद्ध झालेले होते. त्याचबरोबर विडंबन कविताही प्रसिद्ध झाल्या होत्या. 'साष्टांग नमस्कार' हे अत्र्यांचे पहिले विनोदी नाटक होते. यातून त्यांनी छांदिष्ट माणसांचे एक संपूर्ण विश्वच साकारले होते. त्यातील प्रत्येकाचे वेड हे समकालीन एकेका प्रवृत्तीचे निदर्शक आहे. बोलक्या चित्रपटातील सिनेनटी होण्याचे वेड त्रिपुरीच्या रूपाने, मिलिटरीचे वेड शंतनूच्या भूमिकेत, दैववादी किंवा भविष्यवेडा सिद्धेश्वर, कथालेखिका होण्याचे मीरा अर्थात शोभनाचे, नवकवी भद्रायू, तालेवार वतनदार रावबहादूर यातील भद्रायूचे नाते थेट 'झेंडूच्या फुला'शी. भद्रायू आपल्या प्रियेचे वर्णन कवितेतून करतांना म्हणतो, 'शोभना, शोभावती, शुभांगी, घे गाडगे, घे माडके, घे गुलचमन, घे लाडके इ.'' या नाटकाने रंगभूमीला एक नवे चैतन्य दिले. 'विनोदाचे तत्त्वज्ञान' सांगतांना 'विनोद गाथेत' अत्रे लिहितात, ''विनोद ही जीवनाकडे पाहण्याची एक विशाल दृष्टी आहे. व्यंग म्हणजेच



अपेक्षाभंग म्हणूनच माणसाची सर्व शारीरिक आणि मानसिक व्यंगे ही हास्यविषय होऊन बसली आहेत. विनोद हे अहिंसेचे एक मोठे नाजूक पण प्रभावी शस्त्र आहे. किंबहुना ती वाङ्मयातली अहिंसाच आहे.'' संगीताचा माफक वापर आणि विनोदाची खुबीदार गुंफण यामुळे अत्र्यांची विनोदी नाटके अजरामर झाली. 'भ्रमाचा भोपळा', 'मी उभा आहे', 'पराचा कावळा', 'लग्नाची बेडी', मोरुची मावशी', 'कवडीचुंबक' इ. 'साष्टांग नमस्कार'ने आम्हाला अत्र्यांच्या नाटकांचे वेड लावले. 'साष्टांग नमस्कार'मधील रावबहादुरांची भूमिका आमच्या स्टाफमधील ज्येष्ठ शिक्षक द. शं. वाणी करीत असत. आम्ही सर्व त्यांना डॅडी म्हणू लागलो, ते आजतागायत डॅडी म्हणूनच आमची हाक स्वीकारतात आणि 'साष्टांग नमस्कार'च्या प्रयोगाची आठवण करून देतात. 'उद्याचा संसार', 'घराबाहेर', 'जग काय म्हणेल' ही गंभीर नाटकेही अत्र्यांच्या नाटकातील विषयांचा गांभीर्याने विचार करायला लावणारी ठरली. 'तो मी नव्हेच' ह्या नाटकाने तर या सर्वांवर कळसच चढविला. जीवनाच्या अखेरपर्यंत अत्र्यांनी मर्मभेदकतेने आणि व्यंगात्मकतेने नाट्यलेखन केलेले दिसते. प्रेक्षक म्हणून यातील बहुतेक नाटके मी पाहिली.

नाटकांप्रमाणेच अत्र्यांच्या चित्रपटांनीही वेड लावले. 'ब्रह्मचारी', 'ब्रँडीची बाटली', 'अर्धांगी', 'पायाची दासी' यांतील विनोदाबरोबरच सामाजिक आशयही कालबाह्य झाला नाही. अत्र्यांचे 'मास्तर आणि पोलीस', 'गुत्यात नारद', 'बाजारात तुरी' इ. कथांचा परिणाम माझ्यावर झाला आणि नाटक, चित्रपट, कथा आणि विडंबन कविता या सर्वांचा एकत्रित प्रभाव माझ्या कथालेखनावर झाला हे माझे मलाच 'सत्यनारायण थापाडे पाटील', 'विलक्षण', 'चंद्री आणि इतर कथा' आणि 'नारद ब्रेकींग न्यूज'मधून जाणवत राहिले आहे.

अत्र्यांच्या 'झेंडूची फुले'ने सर्वांप्रमाणे माझेही लक्ष वेधून न घेतले तरच नवल. त्यातच 'झेंडूच्या फुले'तील 'आम्ही कोण' ही केशवकुमारांनी केशवसुतांच्या 'आम्ही कोण'चे विडंबन म्हणून केलेली कविता, पाठ्यपुस्तकात शिकवायला होती. 'झेंडूची फुले' ही अनेक अर्थाने मराठी काव्यक्षेत्रातली एक अपवादात्मक व अनन्यसाधारण घटना होती. मराठीत ही रचना आजही एकमेवाद्वितीय ठरली आहे. 'झेंडूच्या फुलां'चा जन्म चकाट्या पिटणाऱ्यांच्या क्लबात म्हणजे पठाण क्लबात झाला; असे जरी अत्रे म्हणत असले, तरी

एवढ्या थिल्लरपणाने या कवितांकडे पाहून चालत नाही. ह्या कविता मराठी कवितेचे गुणदोषांसह दर्शन घडविणारा आरसा आहे. तसाच अनुकरण तथाकथित्व आणि प्रतिभाविलास यातील थेट फरक स्पष्ट करणारा अंतर्मुख करविणारा आरसा आहे.

**आम्ही कोण म्हणूनि काय पुसता आम्ही असु लाडके**
**देवाने दिधले असे जग तये आम्हास खेळावया ।।**
**आम्हाला वगळा गतप्रभ झणी होतील तारांगणे**
**आम्हाला वगळे विकेल कवडी मोलावरी हे जीणे ।।**

या कृष्णाजी केशव दामले अर्थात केशवसुतांच्या काव्य आणि सार्थगौरवपर कवितेचे विडंबन 'साष्टांग नमस्कार'मधील भद्रायूसारख्या तथाकथित ट ला ट री ला री कवि म्हणणारे बाजारी अशा बाजारू कवीचे तेव्हढ्याच अभिनिवेशाने दर्शन घडवितांना केशवकुमार अर्थात प्रल्हाद केशव अत्रे लिहितात,

**आम्ही कोण म्हणूनि काय पुसता थोबाड वेंगाडुनी**
**फोटो मासिक पुस्तकात तुम्ही कान आमुचा पाहिला**
**आम्हाला वगळा गतप्रभ झणी होतील साप्ताहिक**
**आम्हाला वगळा गतप्रभ झणी होतील ना मासिके**

अशाप्रकारे बाजारू कवींचा कविसंमेलनातून भरलेला बाजार आजही कालबाह्य झालेला नाही.

आचार्य अत्र्यांची भाषणे सभेत गाजायची. एव्हढी लोकप्रियता असे की; अत्रे म्हणत ''लोक आमची भाषणे ऐकायला गर्दी करतात आणि मते मात्र विरोधकांना देतात''. अत्र्यांची भाषणे आणि विनोद यांची खमंग चर्चा लोक चढाओढीने करीत. आमच्या शेजारी एक चहाचे एजंट श्री. का. न. कुलकर्णी म्हणून राहात असत. त्यांना आम्ही पंत म्हणत असू. त्यांची माझ्याकडे हटकून रोज बैठक असे. त्या बैठकीत अत्र्यांचे किस्से सांगितले नाहीत, असा एक दिवसही जात नसे. कधी कधी हे किस्से सरदारजींचे किस्से सांगावेत तसे ते सांगत. त्यामुळे गंमत वाटे. मात्र किस्से ऐकावेसे वाटत. मला प्रत्यक्ष अत्र्यांचे दर्शन एकदाच घडले, पण त्यांच्या चित्रपटांनी, नाटकांनी, साहित्याने मनावर गारूड केले आहे. वक्तृत्व ही कला आहे आणि ती अर्जित करावी लागते याचे धडे अत्र्यांनी 'मी वक्ता कसा झालो' मधून दिले आहेत. त्यातील दादासाहेब खापर्डे, अच्युतराव कोल्हटकर यांचे उल्लेख आणि



भाषासमृद्धीच्या दृष्टीने अत्र्यांनी मान्य केलेले राम गणेश गडकरी यांचे ऋण अत्र्यांची व्यासंग निष्ठा आणि पूर्वसूरींविषयी निष्ठा स्पष्ट करणारी आहे.

'कऱ्हेचे पाणी' या त्यांच्या आत्मचरित्रातून मात्र अत्रे पूर्णपणे उलगडतीलच असे नाही. अत्रे जेव्हढे आक्रमक होऊन; विरोधकांच्या चुकांचे बुरखे फाडीत तेव्हढ्याच सहृदयतेने त्यांचे गुणगानही करीत. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावरील त्यांनी लिहिलेला मृत्यूलेख म्हणजे काव्य आहे. नेहरूंच्या उत्तुंगतेचे दर्शन आचार्य अत्र्यांशिवाय कोणीही एवढ्या ताकदीने घडविले नाही. अत्रे म्हणजे महाराष्ट्राला पडलेले एक स्वप्न होते असे म्हणणे अतिशयोक्त होणार नाही. डाव्या उजव्या विचारसरणीचा समतोल आचार्य अत्र्यांमध्ये बेमालूम भरला होता. 'मराठा' सर्वाधिक खपाने खपला जायचा तो अत्र्यांच्या अग्रलेखाने, मिश्कीलपणानेच. या पत्रिकारितेने महाराष्ट्राची आमच्यासारखी एक पिढी घडविली. अतिवप्रेमाने अनेकजण अत्र्यांना 'अत्रंग' म्हणत. त्यांच्या या आत्रंगपणाचा धाक, सत्ताधिशांना आणि तथाकथित धनदांडग्यांनाही वाटे. १९६९ च्या सुमारास अत्रे इहलोकाची यात्रा संपवून गेले. मात्र त्यांच्या साहित्याने, भाषणांनी, चित्रपटांनी आणि शामवरील प्रेमाने त्यांना अजरामर केले. सदानंद देशपांड्यांनी 'मी अत्रे बोलतोय'च्या प्रयोगातून अत्र्यांना महाराष्ट्राच्या मनात पुन्हा प्रकटविले.

बालवयापासूनच हृदयात स्थान मिळविलेल्या अत्र्यांविषयी अपार प्रेम असल्याने विद्यार्थ्यांना अत्रे समजावून सांगताना माझ्या मनात दडलेले अत्रे ओठातून आणि मुद्रेतून प्रकट होत. वर्ग रंगून जाई. आचार्य गेल्यानंतर त्यांच्या 'मराठा' प्रेसला त्यांच्या ज्ञानसाधनेच्या, लेखनसाधनेच्या खोलीला आणि खुर्चीला वंदन करण्यासाठी खास सहल मुंबईला नेली. रोझा देशपांडे यांच्या मुखाने प्रेसची आणि अत्र्यांच्या ग्रंथसंग्रहासह लेखनसाधनेची माहिती विद्यार्थ्यांना घडवली. मला शिक्षक म्हणून कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. एका शिक्षकाने साहित्य, संस्कृती, समाज, राष्ट्र, राज्यव्यवहार, तत्त्वज्ञान या सर्व क्षेत्रांत लोकशिक्षकाची भूमिका निभावणाऱ्या आणि महाराष्ट्राच्या मनावर विनोदी लेखन आणि निखळ राष्ट्रप्रेम यांचा संस्कार घडविणाऱ्या शिक्षकाला वाहिलेली ती श्रद्धांजली होती. ते असतांना त्यांच्या साधना बैठकीला मला वंदन करता आले असते की नाही माहीत नाही. त्या दिवशी मात्र त्या खुर्चीला वंदन केले. आचार्य अत्र्यांना वंदन केल्यासारखे वाटले! ●●●

# सन्मानपूर्वक, आत्मियतेने जपणारा मित्र

## (प्रा.डॉ. सु. प्र. कुलकर्णी)

सुंदर हस्ताक्षर आणि साक्षेपी शुद्धलेखन असलेली व्यक्ती, मनाने निर्मळ आणि प्रांजळ असते; असे ऐकून होतो. नगरला आलो. सु.प्र. सरांना भेटलो आणि उक्तीच्या प्रत्यक्ष सहवासात अनुभव घेत राहिलो. हां, हे ही खरे की, अशी व्यक्ती भोळी, भाबडी किंवा व्यवहारशून्य असते; असे कोणी समजेल तर; तो मात्र वेडेपणा ठरेल. व्यक्ती निर्मळ आणि प्रांजळ असते याचा स्पष्ट अर्थ त्या व्यक्तीच्या हेतुची शुद्धता असते. आणि व्यवहारातील कर्मपरतेची दिशा, सर्वहितैशी असते. अर्थात त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या मर्यादेतच हे सर्व अनुभवायला मिळते. नगरमध्ये आलो ते माझ्या नोकरी संबंधातील व्यक्तिगत तरी संस्थात्मक अडचणींच्या परिस्थितीत. मी नगरला सारडा महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून यावे; असे जाणीवपूर्वक आणि मनापासून वाटणारा, शिक्षकहितैशी, शिक्षक म्हणून; डॉ. सु. प्र. कुलकर्णी यांना मी ओळखत होतो. नगरला आल्यावर आमचे कधी मैत्रीत रुपांतर झाले; हे दोघांच्याही लक्षात आले नाही. माझा स्वभाव आणि माझा एकूण व्यवहार यांविषयी खूप मतभिन्नता मला त्यांच्या प्रतिक्रियांमधून जाणवायची. पण माझे हित जपण्याचा आणि माझ्यातील गुणात्मकता फुलविण्याचा प्रामाणिक प्रयत्नच त्यात असायचा.

श्री समर्थ रामदास स्वामींच्या 'महाराष्ट्रधर्म विचाराचे' तत्त्व प्रचलित शिक्षणपद्धतीत रुजवायला हवे; या ध्येयाने प्रेरित झालेल्या, श्री. सुधाकर प्रल्हाद कुलकर्णी यांनी समविचारी शिक्षकांना गोळा करून 'श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाले'ची सुरुवात केली. आपल्या आदर्शांची जपणूक करण्यासाठी शालांतर्गत कार्यक्रमाचे वार्षिक वेळापत्रक आणि कार्यक्रम आखून; त्या कार्यक्रमात; समर्थ रामदासांचे विचार आणि प्रामुख्याने विवेकनिष्ठा, आरोग्य व शरीरसामर्थ्याबरोबर मनशक्ती विकास; यांचा सहज समावेश केला. शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, राष्ट्रीय आणि व्यक्तिमत्त्व विकासात्मक गोष्टींवर जाणीवपूर्वक लक्ष देऊन एक आदर्श जीवनप्रणाली, प्रयत्नांची पराकाष्ठा करून निर्माण केली. प्रयोगसिद्धीसाठी 'चॅरिटी बिगिन्स ॲट होम' या सूत्रानुसार स्वतःबरोबर सहधर्मचारिणींनाही कार्यात सहभागी करून घेतले. स्वतःची उत्तम आणि कायमस्वरूपातील नोकरी सोडून; लोपामुद्रा वृत्तीने सौ. रत्नमालाताईंनी या कामात उडी घेतली. दोघेही व्रतस्थतेने, अनेक तपे घेतलेला वाणवसा जपत आहेत. शाळा आणि संस्था आज सु.प्रं.ची शाळा किंवा संस्था म्हणून ओळखली जाते.

'श्री समर्थ विद्या प्रसारक संस्था' निर्माण करून; एका बाजूला लोकमान्य टिळकांप्रमाणे झोकून कार्य करीत असतांनाही; सारडा महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक म्हणून कर्तव्यतत्परतेत तसूभरही दुर्लक्ष, या समर्थवृत्तीच्या शिक्षकाने होऊ दिले नाही. विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून ते अभ्यासक्रम आखणी, विविध प्रकारची चर्चासत्रे, मार्गदर्शन, संशोधन, स्वतःचे लेखन, विद्यार्थी संघटन, समुपदेशन, प्राध्यापक संघटन आणि प्राध्यापकांसह समाजातील सर्व थरातील लोकांच्या सुखदुःखात सहभाग आणि आधार देणे; येथपर्यंत सर्व गोष्टींत, वृत्तीने नखशिखांत शिक्षक असलेल्या या माणसाचे चुकूनही दुर्लक्ष झाले नाही. याचा मला विलक्षण फायदा झाला. माझं सारडा महाविद्यालयात यथायोग्य समावेशन आणि यथावकाश झालेली जी काही प्रगती म्हणता येईल; त्यात सु.प्रं.चा सिंहाचा वाटा आहे. त्यांची ही भूमिकाही केवळ एक ज्येष्ठ मित्र म्हणून!

१९८५ मध्ये मी नगरला आलो. त्यावेळी माझी 'डांगाणी' कादंबरी प्रसिद्ध झालेली होती. मी सु.प्र.सर आणि डॉ. लीला गोविलकर या दोघांच्याही हातात 'डांगाणी' दिली. सु.प्रं.नी कादंबरी वाचली आणि ते एकदमच प्रसन्न झाले. ''वा! वा! सहस्रबुद्धे अरे काय रसरसता अनुभव, अगदी चित्रदर्शीपणानं; तेही डांगाणी बोलीत; बस् या कादंबरीला तोड नाही. तुमचं सगळं तप या कादंबरीमध्ये अगदी शिगोशिग भरलंय, मराठी साहित्यात ही कादंबरी गाजणार!''

त्यांच्या या अभिप्रायानं मी सुखावलो. एव्हढा हृदयसंवाद करणारा समानधर्मा रसिक मला प्रथमच भेटला. आजतागायत माझ्या लेखनाचा विषय निघाला, चर्चा होऊ लागली की डॉ. सु. प्र. कुलकर्णी यांचा असा अभिप्राय पुन्हा स्फुट झालाच समजा. कधी कधी मी हिरमुसतो. माझी आता साठावर पुस्तकं झाली आहेत. अनेक पुरस्कार मिळाले आहेत. साहित्य परिषदेतल्या पुरस्कारांचे तर ते प्रत्यक्ष साक्षी आहेत. पण सगळं साहित्य बाजूला राहातं आणि 'डांगाणी' मात्र पुन्हा प्रकटते. इतके ते त्या 'डांगाणी'च्या प्रेमात आहेत.

खरे तर नंतर लगोलग 'अहिनकुल', 'वावटळ' आणि 'भेद' या कादंबऱ्या आल्या. 'वावटळ'चं प्रकाशन सारडा महाविद्यालयात घडविण्यात सु.प्रं.नी पुढाकार घेतला. डॉ. सु. प्र. कुलकर्णी हे नुसतेच मराठीचे प्राध्यापक नव्हते. ते सिद्धहस्त लेखकही होते. बालवाङ्मयातही त्यांना रस होता. एकदा मी डॉ. सु. प्र. कुलकर्णी, डॉ. गोविलकर, प्रा. देवदत्त रानडे आणि मित्रमंडळी चहाच्या टपरीवर चहाला बसलो होतो. चहा हे निमित्त. खरे तर साहित्य, संस्कृती, राजकारण, समाजकारण आदि आदि गंभीर विषय आणि आपसातल्या हव्या नको त्या 'टेलटिकोच्या टिंगलटवाळ्या' (प्रा. रानड्यांचा खास शब्द) यांचा 'कॉलेज कट्टा' म्हणाना. प्रा. देवदत्त रानड्यांवर डॉ. सु.प्रं.चं भारी प्रेम. लाडोबाच! मला गंमत वाटायची. एकदा मी विचारलंच, ''प्रा. रानडे खासच लाडके दिसताहेत?'' डॉ. सु.प्र. किंवा प्रा. रानडे काही बोलणार; त्याच्या आतच डॉ. गोविलकर म्हणाल्या, ''अहो, तुम्हाला सु.प्रं.चं हे लाडकं बाळ, माहीत नाही का? अहो हा त्यांच्या नाटकातला हिरो आहे.'' मग मला सगळीच माहिती मिळाली. 'स्वप्न रंगले राजूचे' हे तीन अंकी बालनाट्य 'सु.प्रं.'नी दादा चौधरीत म्हणजे पूर्वीच्या मॉडर्न हायस्कूलमध्ये शिक्षक असतांना लिहिलं होतं. त्या नाटकातला राजू म्हणजे प्रा. देवदत्त रानडे. नाटक स्पर्धेला गेलं. नंबर आला. नाटकाच्या लेखनाला, महाराष्ट्र राज्य शासनाचा 'उत्कृष्ट साहित्य निर्मिती पुरस्कार'ही मिळाला होता. म्हणजे डॉ. सु. प्र. कुलकर्णी हे अन्य सर्व कार्याबरोबरच साहित्य, संगीत, नाट्य यांतही रस घेणारेच नव्हे तर त्या क्षेत्रातील अधिकारी व्यक्तिमत्त्व होते.

डॉ. सु. प्र. कुलकर्णी यांनी 'मयसभा' हे स्फुटलेखन केले. म्हटल्या तर कथा, म्हटली तर कादंबरी, म्हटले तर ललित गद्य, हटले तर आगळीवेगळी स्मरणगाथा. पुस्तक प्रसिद्ध झाले. मी वाचले आणि थक्क झालो. उपरोधिक



ललित लेखनाचा अद्वितीय नमुना! म्हटले तर वास्तव घटिताचे जीवघेणे, तरी खेळकर प्रकटन. पुढे 'झिंदाबाद मुर्दाबाद' कादंबरी आली आणि मला वाटले की आता सु.प्र. शैली निश्चित झाली. मात्र हा माझा भ्रम होता. खेळकर, विनोदी, उपरोधिक, रंजनात्मक अशा लेखनाबरोबर अतिशय गंभीर प्रकारच्या लेखनातही त्यांच्या प्रतिभा विलासाची स्पर्शता जाणवते. चरित्रात्मक कादंबरी वाङ्मयावर त्यांनी मांडलेला प्रबंध सर्वांग परिपूर्ण समीक्षात्मक संशोधनाचा उत्तम नमुना आहे. पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून, मार्गदर्शनात नेटकेपणा, साक्षेप आणि सूक्ष्मातिसूक्ष्म संदर्भशोधन यावर त्यांचा असलेला भर विद्यार्थ्यांना प्रसंगी जिकिरीचा वाटला तरी भावी संशोधन करतांना, आपण तयार झालो आहोत; असा अनुभव आल्याचे विद्यार्थी बोलतात. हाच गुण माझ्याशी चर्चा करतांना मला अनुभवास आला. विशेषतः संतवाङ्मय आणि भाषाविज्ञान या बाबतीत तर याचा उल्लेखनीय प्रत्यय आला. 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' यावर लेखन करीत असतांना, त्यांच्याशी झालेल्या चर्चेचा मला खूप उपयोग झाला.

डॉ. सु. प्र. कुलकर्णी हे स्वतः साहित्य, समीक्षा, भाषाविज्ञान, व्यावहारिक मराठी या विषयांचे केवळ प्राध्यापकच होते असे नव्हे तर, या क्षेत्रात मोठ्या ताकदीने ते मार्गदर्शक म्हणूनही काम करीत असत. आजही त्यांचे हे कार्य सुरू आहे. या क्षेत्रातील डॉ. सु. प्र. कुलकर्णी यांचे ऐतिहासिक कार्य चिरस्मरणीय ठरणारे आहे.

नगर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष म्हणून त्यांचे कार्य साहित्यविश्वाला दिपवून टाकणारे आहे. स्वागताध्यक्ष मा. यशवंतरावजी गडाख पाटील यांना सर्वतोपरीने सहाय्यभूत होत, अतिशय दिमाखदार, सर्वसमावेशक आणि अद्वितीय असे संमेलन त्यांनी संयोजित केले. त्या संमेलनाचे आजही धडे गिरविले जात आहेत. डॉ. सु. प्र. कुलकर्णी यांचे मौलिक मार्गदर्शन या सर्व संमेलनांना लाभत आहे. आम्ही सर्व मित्र याचे साक्षी आहोत.

महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे मा. संपादक म्हणून त्यांनी केलेल्या संपादन कार्यास इतिहासात तोड नाही. अंकाचे स्वरूप आणि दर्जा अधिक उंचीवर नेऊन; एकप्रकारे आधुनिक काळाच्या दृष्टीने त्यांनी अंकाचे पुनरुज्जीवन केले. शतकोत्तर रौप्यमहोत्सवी अंकाचे संपादन करतांना त्यांनी सव्वाशे वर्षांचा पट

अतिशय बारकाईने आणि वेधकपणाने उलगडून, एक प्रकारे संपूर्ण इतिहास उलगडण्याचे कार्य केले. निवडक संपादकीय, निवडक विषयांवरील निवडक लेख, चर्चिले गेलेले साहित्यविषयक वादसंवाद, अशा संपादनांची त्यांची योजना अतिशय लक्षणीय आहे. पत्रिकेचे संपादक म्हणून पूर्ण एक तप कार्य करतांना महाराष्ट्रातील, प्रतिष्ठित, सुप्रसिद्ध, प्रस्थापित, नवोदित, धडपडे अशा सर्व स्तरातील, सर्व विभागातील साहित्यिक, प्राध्यापक, समीक्षक, साहित्य चळवळीतील कार्यकर्ते अशा सर्वांना सहभागी करून घेऊन; लिहिते केले. मी स्वतःही या त्यांच्या प्रयत्नांच्या फळाचा लाभार्थी आहे.

अमोघ वक्तृत्वाची देणगी त्यांना मिळाली आहे. चळवळीतील आक्रमक, प्रबोधक आणि प्रोत्साहक असं बोलण्याचे कौशल्य विद्यार्थी संघटना, शिक्षक संघटना, प्राध्यापक संघटना, पतपेढीची उभारणी यासाठी तर उपयोगी पडले. सभाशास्त्र जाणणाऱ्या या कर्त्या धुरिणाने अनेक सभांना निर्णायक मार्गदर्शन केलेले आम्ही अनुभवले आहे. चर्चासत्रे, प्रकाशने, संमेलने, साहित्यविषयक विशिष्ट विषयावरील व्याख्याने, उद्‌बोधने याप्रसंगीची त्यांची व्याख्याने म्हणजे सालंकृत, धारावाही, नृत्यकारी अशा वाग्विलासाची मेजवानी असते. त्यातही विशेषतः मित्रपरिवारातील व्यक्तींचे कौतुक प्रसंग म्हटले; की त्यांची वाणी मिश्कील तेव्हढी लाघवी आणि लडिवाळ होऊन प्रकटते.

अभ्यासक्षेत्र, कार्यक्षेत्र, मित्रपरिवार, साहित्यकला परिवार, वैचारिक व्यूह परिवार या सर्व गोष्टींना स्वतंत्र वर्तुळे मानून व्यवहार करतांना; त्यांची कर्तव्यकठोरता प्रदर्शित होते. त्याचबरोबर आत्मसन्मान, आत्मियता यांसह सर्व क्षेत्रांचा व्यावहारिक, सांस्कृतिक आणि भावनिक समन्वय घालून व्यवहार करावा तो डॉ. सु. प्र. कुलकर्णी यांनी. ही अलौकिक जीवनशैली बहुधा अध्यात्मिक जाणिवेतून त्यांच्या व्यक्तित्वात प्रकटली असावी असे मला वाटते.

'भक्तिसाहित्याचे स्त्रोत' असा प्रकल्प करावयाचे ठरविले. वस्तुतः हा प्रकल्प पेमराज सारडा महाविद्यालयात योजनाबद्धतेने आणि चर्चासत्रांसाठीच्या अनुदानासह आम्ही राबवत होतो. डॉ. सु. प्र. कुलकर्णी महाविद्यालयातून निवृत्त झाले होते. सहज भेट झाली. मी प्रकल्प त्यांच्या कानी घातला. पहिले चर्चासत्र 'श्री संत रामदास आणि रामदासी संप्रदाय' या विषयावर घ्यायचे ठरविले होते. डॉ. मालुंजकर समन्वयक होते. तरी देखील मी प्राचार्य या भूमिकेतून डॉ. सु. प्र. कुलकर्णी आणि डॉ. लीला गोविलकर या ज्येष्ठ आणि माजी विभागप्रमुखांना समक्ष भेटून प्रकल्पाविषयी माहिती देऊन त्यांचा सहभाग घेण्याचे ठरविले होते. डॉ. सु. प्र. कुलकर्णी म्हणाले, ''नुसते चर्चासत्र आणि शोधनिबंधांचे सादरीकरण नको. त्याचे पुस्तकही झाले पाहिजे.'' ''पण अगोदर तशी तरतूद करायला हवी होती'' मी म्हणालो. ''अरे, त्याची चिंता करू नका. आपण खर्च करूया!'' सु.प्र. म्हणाले, मला त्यांच्या आत्मियतेचे कौतुक वाटले. ''चालेल मीही स्वतः मदत करीन आणि कॉलेजमधून काय करता येते पाहू'' मी त्यांचा प्रस्ताव आणि उत्साह दोन्हींचे स्वागत करण्याचा प्रयत्न केला. ''थांबा.'' सु.प्र. म्हणाले. उठले. आत गेले. बाहेर येतांना हातात चेक होता. ''हां, हे घ्या शुभस्य शीघ्रम!'' डॉ. सु.प्र. म्हणाले. मी अक्षरशः गहिवरलो.

'स्फूर्ती प्रकाशन मंच'च्यावतीने दोन वेळा ग्रंथयाग अर्थात सामूहिकपणे ग्रंथ प्रसिद्ध करतांना आणि 'आनंदोत्सव' चॅरिटेबल ट्रस्टच्या सर्व कार्यक्रमांप्रसंगी, त्यांचे सहकार्य वाखाणावेच लागते. अन्य कामे बाजूला ठेवून; ते सर्व कार्यक्रमांत निरपेक्ष कार्यकर्त्याच्या भूमिकेत उपस्थित होतात. म्हणावी ती भूमिका मोठ्या आत्मियतेने तळमळीने पार पाडतात. त्यावेळी ह्या संस्थेशी आपला कोणताही, औपचारिक संबंध नाही; हे विसरून जातात. सहस्रबुद्धे म्हणतोयना; साहित्य आणि सांस्कृतिक चळवळ आहेना; बस्. मित्रांविषयीची अशी आत्मियता ही मला केवळ अध्यात्मिक स्वरूपाची वाटते.

डॉ. सु. प्र. कुलकर्णी हे ज्येष्ठ असूनही जीवाभावाचे मित्र झाले. माझ्या भौत्तिक आणि अध्यात्मिक जीवन व्यवहारातही त्यांचे मार्गदर्शन मी घेत गेलो. तसा त्यांचा अधिकारच आहे.

मला श्री अगस्त्य ऋषींनी 'मला लिहून प्रकट कर!' अशी आज्ञा दिली. हा प्रसंग आणि अनुभव केवळ अलौकिक जाणिवेच्याच कक्षेतला. मी अक्षरशः भौतिक जगतात तो अनुभव प्रकट करतांना गुदमरलो. कुणाला तरी सांगावे असे वाटू लागले. मी डॉ. सु. प्र. कुलकर्णींना गाठले. त्यांना आलेला अनुभव मोकळेपणाने सांगितला. ''घाबरू नकोस, मात्र संयमाने आणि धैर्याने सामोरा जा. अनुभव पेलता आलाच पाहिजे. असा अनुभव पेलता न आलेल्या लोकांना मी वेड लागलेलं पाहिलंय. धैर्यानं आणि श्रद्धेनं उपासना करीत राहा. ते म्हणतात तसे कर!'' डॉ. सु. प्र. कुलकर्णी म्हणाले. मला धीर आला. मी

सरसारवलो. 'अगस्त्य महात्म्य' लिहून समर्पित केले. मला, सद्‌गुरू भेटल्याचा आनंद झाला.

डॉ. सु. प्र. कुलकर्णी आता अमृतमहोत्सव पार करून सहस्रचंद्र दर्शनाच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. कधी नगरमध्ये तर कधी पुण्यात त्यांचे वास्तव्य असते. फोन होतात. भेटी होतात. खूप दिलखुलास गप्पा होतात. आजही तीच उमेद, तीच क्रियाशीलता, सारे काही तेच आणि तसेच. वृद्धिंगत झाले ते काळ थांबत नाही म्हणून वय आणि क्षणाक्षणाला अधिकाधिक प्रकट होते ते ज्ञान. ज्ञानोपासक पुरुषार्थपूर्ण माणसाचे हेच तर लक्षण असते.

●●●



# संस्कृतिगौरव

## (प्राचार्य डॉ. मधुसूदन नागेश बोपर्डीकर)

नगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयात मी प्राध्यापक म्हणून ज्युनिअर कॉलेजमध्ये रुजू झालो, तेव्हाची गोष्ट. स्वाभाविकपणे मी प्राचार्यकक्षात गेलो. काहीसे वाचतावाचताच मला ''या'' म्हणून आज्ञा मिळाली. मी टेबलासमोर उभा राहिलो. हातातले बाजूला ठेवत, सर म्हणाले, ''आपण सहस्रबुद्धे ना, छान!'' हे बोलतांना प्राचार्य डॉ. बोपर्डीकरांच्या मनात माझ्याविषयी नेमके काय चालले होते, हे मला मुद्रेवरूनही कळेना. ते, ''छान'' कशाला म्हणाले, मी, सहस्रबुद्धे येथे आलो, म्हणून? सहस्रबुद्धे आहे म्हणून? की मला नगरमध्ये आणण्यासाठी वर्कलोड करता जी खटपट करावी लागली; त्यात संस्थेने जो हस्तक्षेप केला; त्यामुळे? मला कळले नाही बहुधा तिसरे कारण महत्त्वाचे वाटले. खरे तर माझा आणि सरांचा परिचय नव्हता. मध्यम बांधा, फारसा प्राचार्यपदाचा रूबाब वाटावा असे काही नाही, टेबलावर हाताने काही, बोटांचा चाळा चाललेला. मला खरेतर व्यक्तिमत्त्वाचा थांगच लागेना. ''जा प्राचार्य बोपर्डीकरांना भेटा, मोठा विद्वान माणूस'' असे संस्थेचे मानद सचिव नानासाहेब निसळ यांनी सांगितले होते. मोठा विद्वान माणूस आणि प्राचार्य या शब्दांनी जे कल्पनाचित्र रंगवले होते; तसे सकृतदर्शनी मला वाटले नाही हे खरे. ''बसा'' सर म्हणाले. त्यांनी टेबलावरची बेल दाबली. शिपाई आत आला. ''पु. रा. आणि गोविलकरांना बोलवा'' सर म्हणाले. मग माझी चौकशी सुरू झाली. माझा एकूण परिचय समजावून घेतांना त्यांची मुद्रा प्रसन्न होत गेली. मी अकोल्यातून आल्याने त्यांनी अगस्ती आश्रमाविषयी

आणि सह्याद्रीच्या उंच शिखरांविषयी चौकशी केली. मी भरभरून बोलू लागलो. बोलता-बोलता ''डांगाणी'' कादंबरी त्यांच्या हातात दिली. आणि बोपर्डीकर सरांचा नूरच पालटला. ते मोठ्या स्वागतशीलतेने बोलू लागले. प्रा. पु. रा. देशपांडे आणि प्रा.डॉ. लीला गोविलकर आले आणि सरांनी परिचय करून दिला, ''गुड ॲडिशन यू युवर डिपार्टमेंट, आपल्या संस्थेतल्या शिक्षकांतून झालेले हे पहिले पीएच.डी. आहेत. आमच्या अगस्त्यांच्या सान्निध्यातून ते आले आहेत.'' ''सर, मी त्यांना भेटलोय, अकोल्याला त्यांच्या घरी गेलो होतो.'' पु.रां.नी पुस्ती जोडली. ''सु.प्रं.नी सांगितलंय सगळं, आम्ही त्यांना याआधीच आग्रह करीत होतो.'' डॉ. गोविलकर म्हणाल्या आणि वातावरणात एकदमच मोकळेपणा आला. चहा झाला आणि मला वर्कलोड वगैरे समजावून सांगावे असे सांगून, डॉ. बोपर्डीकर म्हणाले, ''संस्था आपली आहे. खूप काम करा.'' मी ज्येष्ठ प्राध्यापकद्वयांबरोबर बाहेर पडलो.

मला सारडा महाविद्यालयात आणि भाई सथ्था नाईट ज्युनिअरला वर्कलोड पूर्ण करायचे होते. सारडात दोन डिव्हीजन विनाअनुदानित होत्या. म्हणजे त्यांचे अनुदान प्रकरण पेंडींग होते, मला त्यासंदर्भात तातडीने खटपट करायची होती. नानासाहेबांनी जबाबदारी माझ्यावर टाकली होती. त्या खटपटीत मी होतो. अध्यापन, विषयज्ञान, लेक्चर्स या संदर्भात माझा प्राचार्यांशी फारसा संबंध येणे शक्यही नव्हते. पण या खटपटीमुळे मला सारखे प्राचार्यांना भेटावे लागे. मी, ''हे हवे ते हवे'' असे म्हणत त्यांना विचारी तेव्हा ते कार्यालयप्रमुख श्री. पाटणींकडे बोट दाखवित. एकदा तर स्वतः नानासाहेबांनी त्यांना, ''आपण स्वतः पाहात जा'' म्हणून माझ्या समोर सांगितले तोपर्यंत ''सरांना या टेक्निकल व्यावहारिक गोष्टीमध्ये रस नाही'' हे लक्षात आले होते. त्यांनी त्यांचा पाच संस्कृत नाटिकांचा संग्रह; सांगितिका ''स्वर्गधरेची मोहक कन्या'' मला आवर्जून भेट दिली होती. ती वाचतांना मी थक्क झालो होतो. संस्कृत आणि संगीत क्षेत्रातील त्यांच्या उत्तुंग ज्ञानाला मी मनोमनी सलाम केला होता. मी पीएच.डी. असल्यामुळे माझ्याकडून त्यांची ॲकेडमिक कामाची अपेक्षा होती. जेव्हा मी दोन्ही तुकड्यांना मुंबईच्या, मंत्रालयातल्या अवघ्या एका फेरीत मंजुरी आणली त्याचबरोबर संस्थेच्या शाळांची तुंबलेली कामे करून आणली तेव्हा ते थक्क झाले. ''संस्थेचे संकटमोचक'' असे म्हणत त्यांनी छद्मीपणाने



नव्हे तर अगदी मनापासून गौरव केला.

अवघ्या सहा महिन्यात मला सिनियर कॉलेजमध्ये समाविष्ट करण्याचा प्रस्ताव स्वतः नानासाहेबांनी मांडला तेव्हा त्यांना मनापासून आनंद झाला. त्यांनी प्रा. पु. रा. देशपांडे, प्रा.डॉ. लीला गोविलकर आणि प्रा.डॉ. सु. प्र. कुलकर्णी यांना संपूर्ण स्वातंत्र्य दिले माझे सिनियरला समावेशन करतांना नोकरीच्या सुरक्षिततेसाठी. ''एक्स्ट्रॉऑर्डिनरी लीव'' हा प्रकार त्यांनी स्वतः संस्थेच्या निदर्शनाला आणून दिला. संस्थेने प्राचार्यपदाची धुरा या साहित्यिक, संगीततज्ज्ञ, कलावंताकडे का दिली असावी; हे मला उमगले. म्हणजे सरांना सेवांतर्गत कायदेनियमादी गोष्टींत रस नव्हता. असे असले; तरी त्याचे परिपूर्ण ज्ञान होते. प्रशासकाला ते आवश्यक असते. मात्र त्याच्या प्रदर्शनात सरांनी कधीच वेळ फुकट घालवला नाही.

संस्कृत, पाली, मराठी, इंग्रजी या वरील भाषा प्रभुत्वाबरोबरच त्यांच्या तत्त्वज्ञान व्यासंगाचा, संगीत साधनेचा आणि विशेषतः हार्मोनियम वादनाचा मला परिचय होत गेला. या सर्व गोष्टींपेक्षाही मला विशेष आकर्षित करून घेणारी गोष्ट म्हणजे त्यांचं स्फूट आणि वैचारिक, तसेच संशोधनात्मक लेखन. अतिशय संवेदनशील हृदयाचा हा संगीतात रमलेला माणूस, कवी नसेल तरच नवल. गेली तीस वर्ष मी या माणसाच्या प्रतिभेला प्रकटलेले नवे नवे उन्मेश अनुभवतो आहे. मला लेखनाचा आणि वाचनाचा छंद आहे हे त्यांनी ओळखले आणि आमची चर्चा रंगू लागली. परस्परांना दाद देतांना गुणदोषात्मक चिकित्साही घडू लागली.

डॉ. म. ना. बोपर्डीकरांनी मुक्तछंदात्मक स्फुटलेखन केले होते. अतिशय मिश्कील, वाचकाला अंतर्मुख करविणारे, चिमटे काढणारे तसेच गुदगुल्या करणारे. त्याचे प्रकाशन करायचे होते. नगरमधून प्रकाशकांशी संपर्क करणे तसे कठीण. त्यांनी माझ्याजवळ प्रस्ताव मांडला. विचार झाला. आणि ''स्फूर्ती प्रकाशन मंच''ची तयारी केली. मी जबाबदारी घेतली. प्रकाशन व्यवसाय नव्हे केवळ प्रकाशनार्थ सेवा मंच. स्फूर्ती हे माझ्या कन्येचे नाव. प्रकाशनाला शोभेसे. सरांच्या या स्फुटलेखनाचे पुस्तक ''स्फूर्ती प्रकाशन मंच'' द्वारा प्रकाशित झाले. ''खिडक्या'' या पुस्तकाच्या नावातही मिश्कीलपणा होता. ह्या प्रकाशन मंचाला या पुस्तकाने मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली. नगर शहरात आणि जिल्ह्यात उभारलेल्या प्रकाशन मंचाच्या माध्यमातून पाहाता

पाहाता दोन वेळा ग्रंथयाग घडले. सामुदायिक स्वरूपात ग्रंथांची प्रकाशने करायची असे या यागाचे स्वरूप होते. पहिला प्रकल्प केला 'प्रणवकुंज'. यात द्वादश कवींनी-कवयित्रींनी आपापले कवितासंग्रह प्रसिद्ध केले. प्रत्येकाने संपूर्ण निर्मिती खर्च स्वतःच करायचा आणि वितरणही स्वतःच करायचे. या 'प्रणव कुंज'ला महाराष्ट्र काव्य विश्वाच्या परंपरेचा साज एका बॉक्स स्वरूपात आम्ही चढवला. 'प्रणव कुंज'ला कविकुलगुरु कुसुमाग्रज यांनी काव्यरूप पाठबळ दिले. 'प्रणव कुंज' बरोबरच आणखी सात गद्य ग्रंथांनाही संधी मिळाली. रमेश तेंडुलकर, मंगेश पाडगांवकर आणि डॉ. द. दी. पुंडे यांच्या उपस्थितीत भव्य प्रकाशन सोहळा झाला. याचे नेतृत्व तर डॉ. बोपर्डीकरांनी केलेच. हौस एवढी की प्रत्येक कवितासंग्रहातील दोन-दोन कविता संगीतबद्ध करून त्यांनी सादर करविल्या. ''प्रणव कुंज'' मधून प्रेरणा घेऊन अनेकांनी असे प्रयोग महाराष्ट्रात केले. नगरमध्ये साहित्य संमेलन प्रसंगी पुन्हा 'स्फूर्ती प्रकाशन मंच'ने ग्रंथयाग केला. यावेळी २४ पुस्तकांचे असेच सामुदायिक प्रकाशन झाले.

सर आज पंच्याऐंशी पार करून वाटचाल करीत आहेत. पण अजूनही पंधरा वर्षाच्या तरुणाला लाजवील असा मनाचा उत्साह आहे. लेखन, संगीतसाधना आणि सांस्कृतिक कार्यक्रम सुरूच आहेत. ''जे जे आपणाशी ठावे ते इतरांशी सांगावे, शहाणे करूनी सोडावे सकलजन''. त्यांची शब्दक्रीडा, काव्यक्रीडा, विचारसौंदर्यविलास आणि प्रतिभाविलास सुरूच आहे. रसिकांच्या प्रकाशपुंजात अनेक रंगांची उधळण करावी हा त्यांचा स्वभाव. सौ. कुमुदिनी बोपर्डीकर याही तेव्हढ्याच मनस्वीपणे 'स्वरानंद प्रबोधिनी'मध्ये शब्द, स्वर, सूर, ताल, लय आणि आनंदमुग्धता यांत रमून गेलेल्या असतात. येथे सर्वांचे स्वागत असते. प्रोत्साहक पाठबळ मिळते आणि जाता जाता साक्षेपही मिळतो. अगदी परवा त्यांनी जयदेवांचे 'गीत गोविंद' नव्याने स्वरानंद प्रकाशन द्वारा प्रकाशित केले. मला म्हणाले, ''गीत गोविंदाचे प्रकाशन तुमच्या हस्ते आणि गीत गोविंदावर तुम्हीच बोलायचे!'' गुरुवर्यांची आज्ञा. मी संस्कृत आणि संगीत दोन्हीतही अनभिज्ञ. बहुधा मला या दोन्ही ज्ञानक्षेत्रांचे सामर्थ्य उमगावे म्हणून हे आयोजन त्यांनी केले असावे, असे समजून मी आव्हान स्वीकारले आणि त्यांच्याच आशीर्वादाने ते पेलले याची दाद संगीततज्ज्ञ विद्वत्सभेत मला मिळाली.



महर्षी अगस्त्यांच्या आज्ञेनुसार मी कृपाप्रसादपूर्वक महर्षी अगस्त्यांना लिहून ग्रंथरूपाने प्रकट करण्याच्या खटपटीत होतो. 'अगस्त्य माहात्म्य' लिहून अगस्त्यचरणी अर्पण केल्याने, या प्रकल्पाची परिपूर्ती झाली. या प्रवासात प्रथम 'अगस्त्य' कादंबरी लिहून प्रकट करावे म्हणजे, बुद्धिप्रामाण्याचा अडसर येणार नाही; असा विचार करून मी कादंबरी लिहिली. या लेखनाला पाठबळ हवे होते. प्राचार्य डॉ. बोपर्डीकरांनी अगस्त्यांच्या काही वाङ्मयाधारे, संस्कृत विषयात, पीएच.डी. केली होती; हे मला माहीत होते. 'युगायुगातील अगस्त्य परंपरा' हे त्यांचे पुस्तक प्रसिद्ध झाले होतेच. मी त्यांना 'अगस्त्य' कादंबरीला प्रस्तावना लिहिण्याची विनंती केली. त्यांनी या कादंबरीची मोठ्या साक्षेपाने चिकित्सा करून 'महाप्रकल्प' असा गौरव केला. त्यांनी लिहिले, ''अशा कलाकृतीला ऐतिहासिकतेचे निकष लावणे योग्य होणार नाही. परंतु आजसुद्धा ज्या अगस्त्य-प्रवृत्ती-विद्या आणि ऊर्जाशक्तीची गरज आहे, तिचे अत्यंत प्रभावशाली दर्शन तज्ज्ञांना व सामान्यांना कलात्मरीतीने घडविणारी ही पौराणिक कादंबरी मराठी साहित्याच्या इतिहासात एक क्रांतिकारक पाऊल ठरावी अशीच आहे.'' त्यांच्या पाठबळाने 'अगस्त्य माहात्म्य' लेखनाची मानसिक प्रक्रिया प्रकर्षाने प्रवृत्त झाली हे मात्र खरे.

'उघडली कवाडे प्रकाशाची' हा अमृतानुभवाचा रसास्वाद घडविणारा त्यांचा ग्रंथ मला विशेष आकर्षित करणारा ठरला. मी ज्ञानेश्वरीचा वाचक, अभ्यासक होतो. त्याहीपलिकडे 'अमृतानुभव' हा ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरांचे प्रत्यक्ष प्राकट्य आहे हे मला जाणवले. संत ज्ञानेश्वरांनी त्यांना चांगलेच झपाटले असल्याचे माझ्या लक्षात आले. चांगदेवपासष्टीचा परिचय 'मौनाची अक्षरे भली' या स्वरूपात त्यांनी करून दिला. त्यांच्या विद्वत्ता आणि व्यासंगाचा परिचय मला घडला. समानधर्मा म्हणून आमचा संवाद होत राहिला. या संवादाला औपचारिकता आणि वयाचे बंधन कधीच आले नाही. त्यांना सहज म्हणून मी भेटायला गेलो तरी त्यांना विलक्षण आनंद वाटे.

मी प्राचार्य असतांनाची गोष्ट. लोकसाहित्य परिषद आयोजित केली. लोकसाहित्याची संस्कृत परंपरा सोदाहरण मांडण्याचा मी त्यांना आग्रह केला. त्यांचा या संबंधातील लेख 'लोकसाहित्य-जीवनकला' या ग्रंथात समाविष्ट केला. या त्यांच्या लेखाने मराठी लोकसाहित्य अभ्यासकांना, समूहमनाचे अनुभवसंचित युगायुगात त्या त्या लोकभाषेत प्रकटच होत असते; लोकसाहित्य

ही लोकात्मविष्कार प्रक्रिया आहे; याचे भान आले.

'कोऽहम' आणि 'प्रिया' या माझ्या दोन कवितासंग्रहांचे प्रकाशन महाविद्यालयात होते. डॉ. बोपर्डीकरांना एवढा उत्साह संचारला की त्यांनी त्यातल्या निवडक आठदहा कवितांचे गायन त्यांच्या स्वरानंद प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांकडून मोठ्या मेहनतीने बसवून घेऊन सादर केले. मला त्यांच्यामधील रसिकमनाचा, त्यांच्या संगीतसाधनेचा आणि प्रामुख्याने ज्ञानावरील नितांत प्रेमाचा प्रत्यय आला.

जवळपास पन्नासावर छोटी-मोठी मराठी, संस्कृत, चर्चात्मक, स्फुट, वैचारिक, काव्यात्मक, अध्यात्मिक, रूपांतरित, भाषांतरित अशी पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. उदंड स्फुटलेखन वर्तमानपत्रांतून घडतेच आहे. संस्कृत, अर्धमागधी, पाली, मराठी भाषाप्रभू, संगीततज्ज्ञ असा हा रसिकराज अवलिया, संस्थात्मक कार्यात तेव्हढाच रस घेणारा आहे. ज्येष्ठ नागरिक मंचाची स्थापना, बंदिश सांगीतिक प्रतिष्ठान, सरगमप्रेमी मित्रमंडळ अशा अनेक संस्थांतील त्यांचा सहभाग फार मोठा आहे. त्याचबरोबर संगीत दिग्दर्शन, संवादिनी व ऑर्गन वादनाचे स्वतंत्र कार्यक्रम महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर सर्वत्र सुरूच आहेत.

स्फूर्ती प्रकाशन मंच आणि आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट या मी उभारलेल्या संस्था म्हणजे डॉ. बोपर्डीकर यांचेच अनुकरण आहे. नगर शहराने त्यांना गुरुस्थानी मानले आहे. आनंदोत्सवने त्यांना 'जीवनगौरव' पुरस्काराने अभिवादन केले आहे. संगीत, नाट्य, साहित्य, संस्कृती, इतिहास आणि भाषा क्षेत्रातील विद्वान नगरला आले तर गुरुवर्य प्राचार्य डॉ. मधुसूदन बोपर्डीकर यांना भेटल्याशिवाय पुढे जात नाहीत. स्वागतशीलता आणि पुढीलांना ममतेने आशीर्वाद देऊन; प्रोत्साहित करण्याचा त्यांच्या 'माऊली' स्वभावाचा मला वारंवार अनुभव येतच राहिला आहे.

●●●



# प्रकाशपुष्पे उधळणारी आनंदयात्री

## (प्रा.डॉ. लीला गोविलकर)

महाविद्यालय आणि विद्यापीठ स्तरांवर पदव्युत्तर विभाग स्थापित करून मोठ्या प्रमाणावर, सर्वस्तरांतील अभ्यासकांचा, त्या त्या विषयांतर्गत सूक्ष्म आणि स्थूल अभ्यास संशोधन कार्यात सहभाग होईल, असे नियोजन करण्यावर स्वातंत्र्योत्तर काळात, मानव संशोधन विकास मंत्रालय, शिक्षण खाते, विद्यापीठ अनुदान मंडळ आणि विद्यापीठे यांचा भर आहे. हे धोरण मानवी व्यक्तिमत्त्व विकास, राष्ट्रोन्नती, भौतिक प्रगती, जागतिकीकरणातील स्पर्धेत विधायक आणि सकारात्मक झेप, या सर्व गोष्टींसाठी आवश्यक आणि महत्त्वाचे आहे. शिक्षण प्रक्रियेत ज्ञानात्मक विकासाचे ध्येय हे अंतिम ध्येय असते, हे खरे असले, तरी ज्ञानात्मक विकासाला अंत नाही, तसाच ज्ञानसाधनेला देखील अंत नाही. या ज्ञानसाधनेचे सातत्य राखणे हे एकट्या-दुकट्याचे काम नव्हे. गुरुकुलांच्या परंपरांचे हे कार्य आहे. कोणत्याही ज्ञानक्षेत्रात सतत नव्या माहितीची, ज्ञानात्मक सूत्रांची भर पडत असते, किंबहुना तशी पडणे अपेक्षित असते. जुने नवे तपशील, माहिती, संकल्पना, त्यांचे उपयोजन आणि ज्ञानशाखेचा विकास व या प्रक्रियेतून मानवी जीवनमूल्ये, सारणी आणि सौंदर्यभावना यांचे भरणपोषण अपेक्षित असते.

स्वाभाविकपणे अशी ज्ञानप्रक्रिया अखंडपणे सुरू ठेवण्याची महत्त्वाची जबाबदारी पदव्युत्तर विभागातील प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक यांच्या चमूवर येऊन पडते. त्याकरिता हा प्राध्यापक चमू एकात्म, ज्ञानपिपासू, द्रष्टेपणाने सेवारत असणारा आणि लोकाभिमुख असावा लागतो. हे साध्य करण्यासाठी

प्रक्रियेतील कार्याची तळमळ, समावेशक, समंजस तसेच प्रगल्भ बुद्धी आणि वृत्ती यांची आवश्यकता असते. महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशपातळीवरील पदव्युत्तर विभागांतील प्राध्यापक चमूंनी अनुकरण करावे असे, उद्बोधक उदाहरण म्हणजे महाराष्ट्रातील अहमदनगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयातील मराठी विभागातील प्राध्यापक चमू (अर्थातच या चमूतील सदस्यांमध्ये सतत बदल होत असतात. त्यामुळे त्या चमूच्या सुकाणूस्वरूप विभागप्रमुखावर मोठी जबाबदारी येऊन पडते) येथे आपण उदाहरण पाहात आहोत ते १९८५ ते १९९६ या कालावधीतील; सारडा महाविद्यालयातील मराठी विभागातील प्राध्यापकांच्या चमूचे. या संघाच्या संघनायक किंवा कर्णधार म्हणून सेवारत होत्या डॉ. लीला नारायण गोविलकर. त्यांचे सहयोगी होते, प्रा.डॉ. सु. प्र. कुलकर्णी, डॉ. अनिल सहस्रबुद्धे, डॉ. एस. एस. शारंगधर, डॉ. वि. रा. जोशी, डॉ. विमल कवडे, प्रा. मनिषा मुळे, प्रा. एस. एस. कुलकर्णी ही सर्व मंडळी आपापल्या विषयातील, विशेष अभ्यासातील क्रियाशील, तज्ज्ञ मंडळी! स्वभाव भिन्न, सामाजिकदृष्ट्या कार्यक्षेत्र भिन्न, दृष्टिकोन आणि वैचारिक बांधिलकी भिन्न. डॉ. सु. प्र. कुलकर्णी शैक्षणिक, सामाजिक, संघटनात्मक कार्यात ख्यातकीर्त. त्याबरोबरच साक्षेपी, कर्मठ आणि न्यायप्रिय संशोधक, समीक्षक आणि लेखक, नगर जिल्ह्यात आदर्शभूत शिक्षणसंस्था निर्माण करणारा संस्थापक कार्यकर्ता, विद्यार्थी व साहित्य या क्षेत्रातील चळवळींचा आधारस्तंभ. नगर येथे झालेल्या, अभूतपूर्व अशा अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्षपद सांभाळणारा हा माणूस 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'चा साक्षेपी आणि यशस्वी संपादक म्हणून आज महाराष्ट्राला परिचित आहे; तर डॉ. अनिल सहस्रबुद्धे सामाजिक, स्वयंसेवी संघटनांच्या कार्यात झोकून कार्य करणारे, आदिवासी आणि अन्य उपेक्षित, तळागाळातल्या लोकांत सेवाकार्य रचनात्मकतेने उभे करणारे, साहित्यिक, समीक्षक, संशोधक, लोकसाहित्यविशारद, मार्गदर्शक आणि साहित्य चळवळीत साहित्यिक कार्यकर्ते म्हणून कार्य करणारे, समीक्षा संशोधन यासाठी वाहिलेल्या 'आनंदोत्सव' या षण्मासिकाचे विद्यमान संपादक आणि पेमराज सारडा कॉलेजचे यशस्वी प्राचार्य म्हणून सर्वांना परिचित असलेले विचारवंत. ही अशी खंदी माणसं बरोबर घेऊन शिक्षण आणि साहित्य क्षेत्रात मैलाचा दगड ठरावे, वस्तुपाठ ठरावे असे सांघिक स्वरूपात काम करणे सोपे नाही. त्यासाठी आधारवडाची



अविचल, वर्धिष्णु वृत्ती लागते, द्रष्टेपण हवे असते, मानापमान सहन करीत, नेतृत्व करीत असताना, स्वतःचे साधक व्यक्तिमत्त्व सांभाळून, कार्यकर्ता म्हणून विनम्रपणे आणि क्रियाशीलतेने तेव्हढ्याच झुंजारपणाने तितिक्षा आणि तत्परता, ताटस्थ आणि गंभीरता यासह कार्यरत रहावे लागते, प्रसंगी स्वतःच्या महत्त्वाकांक्षांना मुरड घालण्याची तयारी ठेवावी लागते. या सर्व आवश्यक गुणांचा प्रत्यक्ष अनुभव घडविणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे लीलाताई होते.

मी १९८५ मध्ये नगरमध्ये आलो आणि अवघ्या काही दिवसात लीलाताईंच्या समर्थ व्यक्तिमत्त्वाचा अनुभव समग्रपणे येत राहिला. मराठी विभाग प्रमुख म्हणून त्यांचे मार्गदर्शक सहकार्य लाभले. महाराष्ट्र साहित्य परिषदेत जिल्हा प्रतिनिधी आणि नगर शाखेच्या अध्यक्षा म्हणून त्या काम करीत होत्या. माझ्यातील कार्यकर्त्या व्यक्तिमत्त्वाचा चपखलतेने उपयोग त्यांनी त्या क्षेत्रातील कार्यासाठी करून घ्यायला सुरुवात केली. विभागात आणि शहरातील साहित्य चळवळीत व व्यापक साहित्य क्षेत्रात प्रत्येकाचा मगदूर ओळखून, मैत्रभाव सांभाळून काम कसे करून घ्यावे हे त्यांना अवगत.

डॉ. कुलकर्णी, मी आणि त्या पीएच.डी. मार्गदर्शक आहोत, याचा थेट उपयोग महाविद्यालय आणि अभ्यास क्षेत्र विकासात, त्यांनी करून घ्यायचे ठरविले. आपल्या सहकाऱ्यांची आणि स्वतःची पोहोच कोठे आणि कशी आहे, त्याचा अचूक फायदा करून घेण्याची त्यांची दृष्टी वाखाणण्यासारखी होती. त्यांनी विद्यापीठ पातळीवर क्रांतीकारी निर्णय घेतला. पेमराज सारडा महाविद्यालयात 'मराठी प्रगत अध्ययन केंद्र' (एम.फिल. पीएच.डी. रिसर्च सेंटर) सुरू करावयाचे ठरविले. आज अनेक महाविद्यालयांना विविध विषयात अशी केंद्र दिलेली दिसतात. या योजनेमागील कल्पनेच्या पायाभूत संकल्पक त्या आहेत, हे त्या काळातील अग्रणींना ठाऊक होते. तरी हे आज कोणाला माहितही नाही. त्यांनी कल्पना मांडली, प्रस्ताव तयार केला. माझा डॉ. सरोजिनी बाबर यांच्याशी घनिष्ट स्नेह आहे आणि त्या विद्यापीठात पदाधिकारी आहेत याचा अचूक उपयोग त्यांनी करून घेतला. डॉ. सरोजिनी बाबर यांच्या नेतृत्वाखाली मी आणि लीलाताई रिसर्च सेंटरसाठीचे प्रस्ताव घेऊन मा. कुलगुरू डॉ. वि. ग. भिडे यांचेकडे गेलो. डॉ. भिडे यांना पटवून देण्यात यश मिळविले. त्यांनी सुचविल्याप्रमाणे महाराष्ट्रातील प्रगत महाविद्यालये आणि विद्यापीठे यात रिसर्च सेंटरचे कार्य कसे चालते ते अनुभवण्यासाठी डॉ.

सरोजिनी बाबर यांच्याबरोबर महाराष्ट्रात प्रवास केला. एक प्रकारची चळवळच ती. पुढे विद्यापीठाच्या पातळीवर विद्यापीठांतर्गत, विद्यापीठाबाहेर रिसर्च सेंटर न देण्याचा निर्णय झाला आणि पेमराज सारडात रिसर्च सेंटर सुरू होता होता थांबले. मात्र सर्वत्र रिसर्च सेंटर या कल्पनेच्या उद्‌गात्या डॉ. लीला गोविलकर आहेत हे कोणाला नाकारता येणार नाही.

लीलाताईंनी, विद्यापीठीय पातळीवर, आंतरविद्यापीठीय अर्थात राज्य पातळीवर अथवा राष्ट्रीय पातळीवर मराठी विषयासाठी चर्चासत्रे, उद्‌बोधनवर्ग, परिसंवाद, परिचर्चा, गुणवत्तासुधार व्याख्यानमाला आयोजित केल्या नाहीत, असे एक वर्षही गेले नाही. प्रतिवर्षी पेमराज सारडात उपक्रम असणारच. विषयांची अभिनवता, ज्ञानक्षेत्राची व्यापक आवश्यकता आणि उपयोगिता विचारात घेऊनच, कार्यक्रमांचे आयोजन असायचे. उपक्रमासाठी विद्यापीठ, विद्यापीठ अनुदान मंडळ वा महाविद्यालय अनुदान मंजूर करो न करो, त्यांच्या नेतृत्वाखाली आम्हा सर्वांच्या वर्गणीतून आम्ही उपक्रम राबवीत असू. तज्ज्ञांनी कधीही आमचे निमंत्रण नाकारले नाही की मानधन, प्रवास खर्च आदींच्या अटीही घातल्या नाहीत, याचे थेट कारण या तज्ज्ञांशी लीलाताईंचे सुप्र सरांचे किंवा आमच्यापैकी कुणाचेतरी असलेले स्नेहबंध. अभ्यासक्षेत्राची अपेक्षा लक्षात घेऊन, अभ्यासक्रम अध्यापन यांना न्याय आणि अपेक्षापूर्ती व मार्गदर्शन घडविणारे हे उपक्रम असायचे. 'समीक्षेची नवी रुपे', 'भाषाविज्ञान व व्याकरण अध्यापनाची आवश्यकता आणि दिशा', 'विविध नववाङ्‌मय प्रवाहांचे अध्यापन' 'संतसाहित्याच्या अभ्यासाची दिशा', 'भारतीय साहित्यशास्त्र', एक ना अनेक. या काळात व्यावहारिक व उपयोजित मराठीच्या अभ्यासाची गरज सर्वच पातळ्यांवर निर्माण झाल्याचे लक्षात आले. या प्रकारच्या अभ्यासक्रमाची आखणी करण्यापासून ते प्रात्यक्षिकांसह प्राध्यापकांना प्रशिक्षित करण्यापर्यंतची जबाबदारी महाराष्ट्राच्या पातळीवर, आव्हानात्मकतेने स्वीकारून परिश्रमपूर्वक ग्रंथनिर्मितीची जबाबदारी लीलाताईंनी स्वीकारली. आज सर्व विद्यापीठात पदव्युत्तर पातळीपर्यंत व्यावहारिक व उपयोजित मराठीचा अभ्यासक्रम सुरू आहे. प्राध्यापकांना नवे विषय, नवे परिमाण, नवा अवसर देण्यात डॉ. लीलाताईंचा सिंहाचा वाटा आहे. व्यावहारिक व उपयोजित मराठी अंतर्गत अतिशय व्यापक असे राज्यस्तरीय प्रदीर्घ चर्चासत्र डॉ. सु. प्र. कुलकर्णी यांच्यावर जबाबदारी सोपवून घेण्यात, लीलाताईंनी पुढाकार घेतला.



बी.ओ.एस. (मराठी अभ्यास मंडळ)च्या सन्माननीय सदस्य म्हणून तर अभ्यासक्रमाचा दर्जा आणि नियोजन यातील श्रीमंतपण जपण्यासाठी अभ्यासक्रमाच्या, अध्यापनाच्या दृष्टीने ग्रंथनिर्मिती करण्यात आणि करवून घेण्यात त्यांचा सतत पुढाकार आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील मराठी अभ्यासकांच्या तोंडी डॉ. लीला गोविलकरांचा सन्मानपूर्वक उल्लेख असतो.

पेमराज सारडामध्ये होणाऱ्या व्याख्यानादी उपक्रमांचा फायदा नगरच्या जिज्ञासू रसिकांना मिळावा या हेतूने त्यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या व्यासपीठावर दुहेरी व्याख्यानमाला आयोजित कराव्यात आणि आम्ही सर्वांनी मिळून त्याचे नियोजनही मोठ्या हिरीरीने करावे, असा शिरस्ताच झाला. त्यामुळे नगरच्या साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात तज्ज्ञ आणि प्रसिद्ध संशोधक, समीक्षक आणि साहित्यिक यांची अक्षरशः शेकडो व्याख्याने झाली. पडद्यापुढे आणि पडद्याआड अशा दोन्ही आघाड्यांवर लीलाताईंचा पुढाकार असायचा. 'लीलाताईंचे कॉलेज', 'लीलाताईंचे नगर', असे उद्‌गार महाराष्ट्रात ऐकायला मिळत. असा हा आमच्या अभिमानाचा विषय.

डॉ. लीलाताई गोविलकर या त्यांच्या विद्यार्थी जीवनात विशेष गुणवत्ताधारक होत्या हे वेगळे सांगावयास नको. मात्र त्या महाराष्ट्रातील मराठी व्याकरण परंपरेतील श्रेष्ठ वैय्याकरण आहेत हे वेगळे सांगावयासच हवे. वैय्याकरण म्हटले की, ज्या गंभीर व्यक्तिमत्त्वाचे रूप डोळ्यासमोर त्या प्रकारच्या व्यक्तिमत्त्वाला धक्का बसेच, एव्हढे लीलाताईंचे व्यक्तिमत्त्व आजही खेळकर आहे आणि प्रसंगी लडिवाळ लहानग्यात खट्याळ आणि अल्लड आहे. असे असले तरी भाषेचा वापर, भाषेचे व्याकरण, भाषा व्युत्पत्ति, भाषा शुद्धीकरण आणि भाषेचे शुद्धलेखन या संदर्भात त्या कर्तव्यकठोर आहेत. शुद्धलेखन चळवळीत आणि भाषाभिवृद्धीच्या चळवळीत त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. स्थानिक पातळीवर भगिनीवर्गासाठी, प्रौढांसाठी आणि लहानग्यांसाठी त्यांनी मुक्त विद्यापीठ, साहित्य परिषद, भगिनी मंडळे, विविध शाळा यांतून साहित्य व भाषा या संदर्भात परीक्षा स्पर्धा, अभ्यासवर्ग, उद्‌बोधनवर्ग, शिबिरे असे उपक्रम राबविले. विविध शाळांमधील आपल्या मैत्रिणींना अभ्यासकांना त्या चळवळीत त्यांनी कार्यरत केले. मराठी शुद्धलेखन प्रकल्पांतर्गत त्यांनी आपल्या मैत्रिणींना बरोबर घेऊन मराठी शुद्धलेखन पुस्तिकेचे प्रस्तुतीकरण केले आणि विविध शाळांमध्ये त्यांचे उपयोजन करवून घेतले. व्याकरण आणि शुद्धलेखन

याविषयी कठोर असणाऱ्या लीलाताई साहित्य क्षेत्रात धडपडणाऱ्या सर्व स्तरांतील लहान थोरांसाठी तेव्हढ्याच स्वागतशील आहेत. म्हणूनच निबंध स्पर्धांपासून ते विविध संस्थांच्या ग्रंथपरीक्षण व पुरस्कार समितीवर त्या काम करताहेत.

मी स्वतः राबविलेल्या स्फूर्ति प्रकाशन मंचावरील, सामुदायिक आणि सहकार तत्त्वावरील 'प्रणव कुंज' प्रकल्पास्वरूपातील ग्रंथयागाच्या कार्यात लीलाताईंनी आधारवडासारखे योगदान दिले आहे. ग्रंथ परीक्षण, संपादन निवड, मुद्रितशोधन आणि प्रकाशन या संपूर्ण प्रक्रियेत त्यांनी साहित्य क्षेत्रातील निरपेक्ष कार्यकर्ता म्हणून काम केले आहे. पहिली विद्यार्थी साहित्य परिषद, यांच्या नेतृत्वाखाली, त्यांनी आम्हा सर्व सदस्यांच्या सहाय्याने उभी केली. नगरमधील प्रतिथयश विनोदी लेखक संजय कळमकर यांस त्या परिषदेचे अध्यक्ष केले होते. साहित्य परिषद महाविद्यालय आणि नगरमधील विविध साहित्य संस्कृतीविषयक कार्य करणाऱ्या संस्था यांत त्यांनी मार्गदर्शक आणि अगदी सतरंजी उचलणारा कार्यकर्ता येथपासूनच्या भूमिका बजावल्या आहेत.

त्यांच्या या सर्वप्रोत्साहक आणि सर्व समावेशक कार्यपद्धतीमुळे साहित्य क्षेत्रात सांघिक वृत्तीने रचनात्मक कार्य करण्याचा पायंडा पडला आहे. पंच्याऐंशी ते शहाण्णव या कालावधीत कॉलेजच्या व्यासपीठावरून गाव आणि सहकारी यांना बरोबर घेऊन साहित्य क्षेत्रात त्यांच्या कामाचा झपाटा, तथाकथित सेवानिवृत्तीनंतर अधिक वाढला. आता स्वतःच्या वयाची सहस्रचंद्रदर्शन वाटचाल करतानाही कार्यशैलीतील उत्साह वर्धिष्णु ठेवला आहे. स्त्रीचे वय विचारू नये हे गमतीशीर विधान लीलाताईंनी आपल्या चिरयौवन स्वरूपातील कार्यपद्धतीने सार्थ केले आहे. आजही त्यांचा विविध महाविद्यालये, विद्यापीठे यातून होणाऱ्या चर्चासत्रे, संमेलने, परिसंवाद, उद्‌बोधन वर्ग या उपक्रमात मौलिक सहभाग असतो. नगरमधील महाविद्यालय त्याची साक्ष देतील त्याचबरोबर शैक्षणिक, सांस्कृतिक, संस्थांच्या उपक्रमातून त्यांचे कार्य मार्गदर्शक आणि कार्यकर्ता म्हणून सुरूच आहे. सतत क्रियाशील असल्यामुळे त्यांना गृहित धरूनच अनेक संस्था, कार्यकर्ते, उपक्रम योजक, नियोजन आयोजन करीत असतात. म.सा.प. पुणे प्रकाशित वाङ्मयेतिहास खंडांच्या लेखनातील सहभाग हे त्यांच्या समग्रकार्याची साक्ष देते. कोणीही साहित्यप्रेमी, नवोदित, अभ्यासक, संस्था सदस्य, विशिष्ट वैचारिक व्युव्हांसह सांस्कृतिक चळवळ करणारे कार्यकर्ते



डॉ. गोविलकर यांच्याकडून सहाय्य, मार्गदर्शन, सहभाग, प्रोत्साहन याबाबतीत विन्मुख जात असतील, हे संभवत नाही. अलिकडे ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या माध्यमातून तर त्यांनी साहित्य चळवळीला उपकारक पूरक उपक्रम राबविलेच. त्याचबरोबर साहित्यप्रेमी भगिनी मंडळाला घेऊन साहित्यिक चळवळ मंचाची स्वतःच्या घरात उभारणी करून चळवळ चालू ठेवली आहे.

डॉ. गोविलकरांनी जोडलेले महाविद्यालयातील सर्व सहकारी तर आजही त्यांच्याशी जोडलेले आहेतच, त्याच ताकदीने आणि एकात्म भावनेने सहकाऱ्यांनी सुरू केलेल्या विविध उपक्रमांना त्यांचे सक्रीय सहाय्य आहे. त्याचबरोबर नगर शहरातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील सांस्कृतिक केंद्रातील, साहित्य संस्कृतीविषयक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचे मोहोळ त्यांच्या भोवती आहे. उमेदीच्या काळातील, उमेदवारी प्रमाणेच आजही त्यांची उमेदवारी आणि वडिलकीच्या नात्याने सांगी, महाविद्यालयापासून विद्यापीठापर्यंत सुरूच आहे. ज्ञानक्षेत्रातील कार्यकर्ता; ज्ञानसाधना प्रक्रियेप्रमाणे, नेहमी साधक कार्यकर्ताच असतो, याचा वस्तुपाठ म्हणजे महान विदुषी डॉ. लीला नारायण गोविलकर होत. महाविद्यालयातील किंवा विद्यापीठीय स्तरावरील प्राध्यापक हा केवळ प्राध्यापक नसतो तर तो अखिललोकचा प्रबोधक लोकशिक्षक असतो. डॉ. गोविलकरांनी ललित, समीक्षात्मक, संशोधनात्मक वैचारिक अशा स्वतःच्या लेखन सातत्याबरोबर, भोवतीच्या साहित्यिक रसिक, जिज्ञासू, ज्ञानपिपासू अभ्यासक या सर्वांना क्रियाशील केले आणि साहित्य संस्कृतीस्वरूप आदिशक्तीचे अखंड जागर मांडले हा त्यांचा आदर्श विविध महाविद्यालये, विद्यीपाठे विविध संस्था, संघटना चळवळी यांतील कार्यकर्त्यांनी घेतला पाहिजे असे आवर्जून सुचवावे वाटते.

फोडिले भांडार । धन्याचा हा माल ।। अशा मानसिकतेने भाषा, साहित्य, संस्कृती क्षेत्राला, सक्रीय सहभागपूर्वक सर्वांसाठी खुले करीत 'उठारे लुटारे अमृताचे कुंभ' । अशी आवाहक साद घालीत, परिसराला साहित्यकलासौरभाची उधळण करणारी ही विदुषी, आजही 'अल्लड पोरीसमान आज सकाळ । तोडीत गळ्यातील सोन्याची फुलमाळ' अशा 'सकाळ' रुपात आपल्याला गवसलेली आणि आपल्या जवळ असलेली, प्रकाशफुले सर्वांसाठी उधळीत, अमर्त्यतेच्या वाटेवर 'आनंदाचे आवारू मांड जगा' । या उन्मन्स्कतेने वाटचाल करीत आहोत. ●●●

# फर्डा वक्ता, कलावंत, शिक्षक
## (प्राचार्य अनंत दत्तात्रय देशपांडे)

अकोले येथील मॉडर्न हायस्कूल, हे जसे अकोले तालुक्यातील पहिले हायस्कूल, तसे देशपांडे सर हे त्या हायस्कूलमधले पहिले शिक्षक. उत्तम हस्ताक्षर, उत्तम शुद्धलेखन, उत्तम चित्रकार आणि उत्तम वक्ता. पुण्यातून मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण घेऊन आलेली ही व्यक्ती, अकोल्यातच राहाण्याशिवाय पर्याय नव्हता, म्हणून अकोल्यात राहिली. आकर्षक वेशभूषा आणि केशभूषा यांचा जसा या माणसाला शोक तेव्हढाच वाचन आणि पान खाण्याचाही शोक. पुण्यातील शाळांमधील विविध उपक्रम आपल्या शाळेत सुरू झाले पाहिजेत म्हणून आग्रही. मी लहानपणापासूनच देशपांडे सरांना पाहात होतो. त्यांचं अक्षर आणि त्यांचं वक्तृत्व यांचं गारूड मनाला भूल घालीत होतं. गावातल्या सिद्धेश्वराच्या पालखीपासून शाळेतल्या गणपती उत्सवापर्यंत सरांचा हिरीरीने भाग असे. शाळेत हेडमास्तर आणि अन्य शिक्षक असत तरी शाळा, देशपांडेसरांची शाळा म्हणून ओळखली जाई. घरातली आणि बाहेरची प्रेमाची मंडळी त्यांना अण्णा म्हणत असत. तसे सर सावरकरप्रेमी. अकोल्याच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास सरांना पाठ. रंगवून सांगावा तोही देशपांडे सरांनीच. शाळेच्या स्नेहसंमेलनप्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रम आणि नाट्यप्रयोग बसवून सादर करण्यात त्यांचा सहभाग मोठा गमतीचा असे. त्यांनी कधी नाट्यदिग्दर्शन केलं नाही की नाटकात भूमिकाही केली नाही. परंतु प्रसंगी तबलादी वाद्ये वाजवण्यापासून मेकअप करण्यापर्यंतची कामे सरच करीत. त्यांचा सहभाग असे तो, स्नेहसंमेलनाचा पाहुणा शक्यतो साहित्यिक आणणे, त्यांचा परिचय



करून देणे. विद्यार्थ्यांच्या गुणांचे त्यांच्या खास वक्तृत्व शैलीत गुणवर्णन करणे यात. गावातल्या मोजक्याच असलेल्या प्रतिष्ठित माणसांमध्ये त्यांची उठबस असे. डॉ. फारुकी, गावात येतील ते मामलेदार, येतील ते फौजदार, येतील ते न्यायाधीश, येतील ते सरकारी आरोग्य केंद्रातील डॉक्टर असे सगळे डॉ. फारुकी यांच्याकडे बैठकीत नित्य असणारच. त्या सर्वांत हा रुबाबदार फर्डा वक्ता माणूस अर्थातच सन्मान्य ठरे. अगदी अलिकडच्या पंचवीस वर्षांपर्यंत हा 'बिस्मिल्ला क्लब' (लोक गमतीने म्हणत असत) अर्थात सिद्ध प्रतिष्ठित मंडळ सुरू होते. तालुकाभरात विद्यार्थ्यांच्या तोंडी सरांचे नाव आणि त्यांच्याविषयीच्या कथा असत. शाळेत दाखल होणाऱ्या प्रत्येक मुख्याध्यापकाला देशपांडे सर स्वतः मुख्याध्यापक होईपर्यंतसुद्धा त्यांच्याच तालावर काम करावे लागे.

पुणे विद्यापीठाने बह्यस्थ शिक्षण कार्यक्रम सुरू केला आणि देशपांडे सरांनी महाविद्यालयीन शिक्षणाची बह्यस्थ परंपरा अकोल्यात आणली. अकोल्यात महाविद्यालय १९७५-७६ मध्ये सुरू झाले. तोपर्यंत महाविद्यालयीन शिक्षण घ्यायला विद्यार्थ्यांना संगमनेर किंवा अन्यत्र जावे लागे. हे ज्यांना शक्य नसे त्यांना देशपांडे सरांनी अवलंबिलेला एक्स्टर्नल एज्युकेशनचा पर्यायच अवलंबावा लागेल. मी नेहमी म्हणतो, मी महाविद्यालयात गेलो ते प्राध्यापक म्हणूनच. त्यामुळे आम्हा विद्यार्थ्यांपुढे देशपांडे सर म्हणजे 'आयकॉन' होते.

मी १९६४ साली एस.एस.सी. पास झालो. कॉलेजला जाता येणे शक्य नव्हते. घरातील दारिद्र्याच्या पोलादी बेड्या आमच्या पायात होत्या. थोरल्या बहिणीला त्या काळातही एस.एस.सी. असल्यामुळे प्राथमिक शिक्षकाची नोकरी मिळणे शक्य होते. मोठ्या खटपटीने मिळाली. ती नेमकी जूनमध्ये, श्रीरामपूरजवळ पुणतांब्याला. आम्ही बन्सीशेठजी मुंदडा यांच्याकडे राहून; तिने जाऊन-येऊन नोकरी करणे आणि मी चंद्ररूप डाकले कॉलेजमध्ये सुरू झालेला टी.डी. कोर्स करणे, पसंत केले. इलाजच नव्हता. टी.डी. होत असतांनाच मॉडर्न हायस्कूलमध्ये मार्च-एप्रिल दोन महिन्यांसाठी शिक्षकाची जागा झाली. दारिद्र्य या क्वालिफिकेशनमुळे, मला ती नोकरी मुख्याध्यापक ह. वि. फडके आणि देशपांडे सर यांनी दिली. मी मास्तर झालो. पण दोनच महिने. टी.डी. झालो. नोकरी शोधू लागलो. आमच्या दृष्टीने या क्षेत्रातील सर्वात मोठा वशिला म्हणजे देशपांडे सर आणि फडके सर. कुठे भेटीगाठी घ्यायला जायचे तर खिशात पैसे नाहीत. मी सारखा अश्रु ढाळत मागे लागलो

होतो. एक दिवस सर म्हणाले, ''अनिल असं कर, तू राजूरला पाटणकरांकडे जा. मी पत्र देतो.'' माझ्यासमोर पर्याय नव्हता. मे महिन्यात बहिणीचे लग्न झाले होते. वडील रिटायर्ड, घरात सहा माणसं खाणारी. मला काम करणं भागच होतं. मी आशाळभूतपणे म्हणालो, ''सर मी कोणतंही काम करील.'' ''अरे हो हो, जाऊन तर बघ.'' सर म्हणाले. त्यांच्या सुंदर हस्ताक्षरात पत्र लिहिले. मी पाहात होतो. त्या पत्रात सुंदर हस्ताक्षरात माझं गुणवर्णनही होतं. मला त्याचवेळी नोकरी मिळाल्यासारखं वाटलं. पत्र घेतलं, तरी मी तेथेच रेंगाळतोय असं पाहून; सर म्हणाले, ''का रे, पैसे आहेत ना?'' मी मूक राहिलो. सरांनी ओळखले. चटकन खिशातून दोन रुपये काढले. माझ्या हातात दिले. म्हणाले, ''जाऊन ये, मला भेट, काय झालं ते सांग.'' मी पायावर डोकं ठेवलं. देशपांडे वहिनी मोठ्या ममतेनं पाहात होत्या. त्यांच्याही पायावर डोकं ठेवलं. गेलो. पाटणकरांनी चौकशीतर खूपच आस्थेवाईकपणे केली, पण जागाच नाही म्हणून माझी बोळवणही केली.

देशपांडे सरांचे मेव्हणे शामराव जोशी यांनी शिक्षणसंस्था काढली होती. त्याचे मुख्यालय नाशिकला होते. सानेगुरुजींच्या स्मरणार्थ काढलेल्या या संस्थेची एक शाखा अकोले तालुक्यातील लिंगदेव गावी होती. गाव तसे अडवळणी आहे. आताएवढी साधने नव्हती. या शाळेत नोकरी मिळण्याची खात्री होती. त्यावेळी ती शाळा नुकतीच उभी राहात होती. कानवडे सर नावाचे मुख्याध्यापक होते. त्यांचा परिचय होता. त्यांना भेटायला सांगितले. ते म्हणाले, ''एस.टी. स्टँडवर भेटा. तेथेच भेटू.'' मी गेलो. परांडेकरांच्या कॅन्टीनमध्ये चहा पिता-पिता बोलणी झाली. शिक्षकांचा सेवाभाव, सामाजिक शैक्षणिक कार्य, त्याग वगैरे खूप मोठ्यामोठ्या गोष्टी बोललो. गरजवंताला अक्कल नसते. मी हो हो करीत अखेर नोकरी देतात की नाही, हे ऐकायला अधीर झालो होतो. जुलै महिना उलटून आठ दिवस झाले होते. अखेर चाळीस रुपये पगारावर सौदा ठरला. 'बुडत्याला काडीचा आधार' मी येतो म्हणालो. देशपांडे सरांमुळे मला नोकरी तर नक्की मिळाली होती. जाऊन सरांना वृत्तांत सांगितला. सरांनी काही विचार केला. 'बरं पाहू' म्हणाले. सायंकाळी पू. ह. वि. फडके सरांकडे गेलो. त्यांना सांगितले. माझ्या डोळ्यात पाणी तराळले. त्यांना गहिवर दाटला. ''अनिल काय करू, जागा नाही, तुला क्लार्क म्हणून घेतले असते, कसेबसे पण तुझे अक्षर चांगले नाही. 'बघू उद्या



भेट' त्यांनी मला समजावत सांगितले. सकाळी पुन्हा देशपांडे सरांकडे. सर नऊ-साडेनऊला उठत रात्री खूप वेळ वाचन करीत जागे असत हे त्यांचे नित्याचेच. त्यामुळे त्यांना भेटायचे तर दहाच्या पुढेच. किती त्रास देणार पण 'आशाळभुताला विवेक नसतो'. गेलो बसलो. सर, बाहेर आले 'काय झालं?' त्यांनी विचारलं. मी फडके सरांनी सांगितलेलं परत त्यांना सांगितलं. ''बरं पाहू तू काळजी करू नको. काहीच नाही जमलं तर आता कानवडे सरांनी सांगितलं आहेच. होईल काहीतरी.'' त्यांनी समजूत घातली. मी निघालो. डोक्यात कीडे पडले होते. काय करावे समजत नव्हते. जूनच्या शेवटच्या आठवड्यात मी कल्याणला थोरल्या बहिणीकडे गेलो होतो. मिळेल ते काम करावे असा विचार होता. तिच्याकडे राहाणे म्हणजे 'एकादशीच्या घरी शिवरात्रीने राहावे' असे होते. किराणा दुकानापासून, हॉटेल्सपर्यंत फिरून आलो होतो. सारासार विचार करीत, बाळासाहेब शाळिग्राम माझे मेहुणे मला म्हणाले होते, ''हे काही खरे नव्हे. आगीतून फुफाट्यात पडल्यासारखे होईल.'' म्हणूनच अकोल्यात येऊन देशपांडे सर आणि फडके सर यांच्याकडे धरणे धरल्यासारखे केले होते. मधूनच प्रभाकर साठ्ये म्हणून सर होते. त्यांच्यामुळेच माझी आणि संघप्रचारक दामुअण्णा दाते यांची भेट झाली होती. साठ्ये सर फडके सरांच्या शेजारीच राहात. ते डोकावून मला टेकू देत. आता बहुदा लिंगदेवला जाण्याशिवाय पर्याय दिसत नाही असा विचार माझं डोकं खात होता. संध्याकाळी फडके सरांकडे गेलो. साठ्ये सरही होते. ''काय करावं. हा रोज येतोय पण माझे हात बांधल्यासारखे झालेत,'' ते साठ्ये सरांकडे पाहात म्हणाले. तेवढ्यात माझ्याकडे पाहात म्हणाले, ''शिपाई म्हणून काम करतोस?'' ''अहो सर, त्याने दोन महिने शिक्षक म्हणून काम केलंय,'' साठ्ये सर मध्येच म्हणाले. ''हो पण, दुसरा पर्याय नाही. ते वि. भा. देशमुख येतात की नाही कळत नाही, अनंतराव म्हणत होते ते येण्याची शक्यता नाही. पण नानासाहेब काय करतील त्यावर आहे.'' फडके सर साठ्ये सरांशी माझ्यासमोर मुद्दामच स्पष्ट, सविस्तर बोलले असावेत. मला वाटले, शिपाई तर शिपाई. गावातल्या गावात परवडेल. मी स्टेटस वगैरेचा कोणताच विचार करण्याच्या अवस्थेत नव्हतो. अधीरतेने म्हणालो, ''चालेल सर शिपाई म्हणून! कधीपासून येऊ?'' ''ये उद्यापासून'' सर म्हणाले. माझा आनंद गगनात मावत नव्हता. गावातल्या गावात घराजवळ, घराला ऊब देणारी नोकरी मिळाली होती. मी धावतच

देशपांडे सरांचे घर गाठले. देशपांडे सर शाळा सुटल्यानंतर डॉ. फारोकींकडे जात असत. त्याच्या आत त्यांना गाठले. सांगितले. त्यांनी ''अरे, ठीक आहे, ये बघू'' असे सांगून मला जायला सांगितले. दुसऱ्या दिवशी मी शिपाई म्हणून शाळेत आलो. फडके सर, देशपांडे सर, साठ्ये सर यांना कसलेसे मोठे दडपण आले होते. शाळा सुटली. सगळे परतले, हे तिघेही आता निघतील मग घरी जायचे असा विचार सुरू असतांनाच पोस्टातल्या रनरने टेलिग्राम आणला. नेमका माझ्या हातात दिला. मी फडके सरांना दिला. तिघेही एकत्रच होते. फडके सरांनी वाचला आणि मला एकदम म्हणाले, ''अनिल, उद्या मास्तर म्हणून ये. अनंतराव तुम्ही म्हणत होता तेच खरे झाले. भय्या देशमुख येत नाहीत.'' मला उमगले. आनंद शतगुणित झाला. मी त्रिमूर्तींच्या पायावर मस्तक ठेवले. शाळेत दुसऱ्या दिवसापासून मास्तर म्हणून रुजू झालो.

शिक्षक म्हणून काम करू लागलो. देशपांडे सरांचे अनुकरण करीत बी.ए. झालो. बी.एड. झालो. बी.एड.ला फुल पे डेप्युटेशन मिळाले. ज्युनिअर कॉलेज सुरू होणार होते. तसेच अकोले महाविद्यालयाची उभारणी करण्यात देशपांडे सर सरसावले होते. संस्थेने देशपांडे सरांकडे मुख्याध्यापकाची सूत्रे सोपविली होती. एम.ए. होण्याचा विचार करीत होतो. ''आता भराभर एम.ए. व्हा. कॉलेज उभे करतोय, उपयोग होईल.'' देशपांडे सरांनी पंखात हवा भरली. एम.ए. होल अर्थात दोन्ही वर्षांचे पेपर्स एकदम दिले, सेकंड क्लास मिळाला. संगमनेर महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी शाळेत फोन केला, ''तुमच्याकडे सहस्रबुद्धे आहेत का, ते आमच्या सेंटरला पहिले आलेत एम.ए. मराठीला.'' देशपांडे सरांनी हाक मारली. मला ही आनंदवार्ता एव्हढ्या आनंदाने सांगितली की जणू त्यांनीच यश मिळविले असावे. ''आता पीएच.डी. करा, आमचे राहून गेले!'' देशपांडे सरांनी मनात ईर्षा जागवली. देशपांडे सर संस्कृतीकोशाचे सदस्य होते. ते सावरकरांवर पीएच.डी. करीत होते. अकोल्यासारख्या आदिवासी ग्रामीण भागात राहून पुरुषार्थपूर्णतेने स्वतःचा प्रपंच सर्वार्थे सांभाळीत शाळेचा आणि गावाचाही प्रपंच सांभाळीत होते. त्यांच्या एका वाक्याने मी कंबर बांधली. पीएच.डी.साठी खटपट करू लागलो. प्रवेश मिळाला. ''चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास'' असा आंतरज्ञानशाखीय प्रबंध मांडायचे ठरविले. खरे तर इंटरडिसिप्लिनरी असा विषय मला मिळाला हे देशपांडे सरांनीच मला सांगितले.



पीएच.डी. पूर्ण झाली. व्हायवा होऊन रिझल्ट डिक्लिअर झाला. मी पुण्यातून अकोल्यात रात्री पोहोचलो. केव्हा उजाडते असे मला झाले. उजाडले. आवरले. प्रबंध घेतला आणि साडेनऊलाच देशपांडे सरांकडे पोहचलो. सर समोरच वर्तमानपत्र वाचीत बसले होते. चहा समोर होता. मी आत गेलो. प्रबंध सरांच्या पायाशी ठेवला. पायावर डोके ठेवले आणि अक्षरशः ओक्साबोक्सी रडू लागलो. माझे रडणे ऐकून वहिनी गतीने बाहेर आल्या. 'काय झालं?' त्यांनी घाबरत विचारले. ''पठ्ठ्या, पीएच.डी. झाला. हे आनंदाश्रु आहेत'' देशपांडे सर माझ्या पाठीवर थोपटत म्हणाले. ''वा रे पठ्ठे, पारणे फेडलेस'' सर अनावर हर्षाने म्हणाले. त्यांचेही डोळे पाणावले.

शाळेमध्ये ही आनंदवार्ता सरांनी सरळ नोटीस वहीद्वारा सर्व विद्यार्थी व शिक्षकांपर्यंत पोहोचविली. संध्याकाळी सत्कार समारंभ ठेवला. त्या दिवशी सर स्वतःच्या इतिहासाबरोबरच माझ्या जीवनप्रवासावर भरभरून बोलले. ''हा अकोले तालुक्यातला पहिला पीएच.डी. आहे. डॉक्टरेट! शाळेचे, गावाचे, तालुक्याचे आणि संस्थेचे नाव उंचावले. संस्थेच्या मस्तकावर शिरपेच चढवला.'' सरांच्या अमोघ वाणीने मला स्वर्ग ठेंगणा वाटला. मी बोलू शकलो नाही. सारे श्रेय फडके सर, देशपांडे सर आणि मॉडर्न हायस्कूलचेच होते. अभिनंदनाचा वर्षाव झाला. निघतांना सर म्हणाले, ''आता तुमची जागा शाळेत नाही, महाविद्यालयात जा!''

●●●

# महाराष्ट्राच्या अक्का
## (डॉ. सरोजिनी बाबर)

अक्कांना मी प्रथम भेटलो ते 'एक होता राजा' या लोकसाहित्य समितीच्या प्रकाशन पुष्पाच्या निमित्ताने. 'अक्का' खरेतर अवघ्या महाराष्ट्राच्या 'अक्का' अर्थात डॉ. सरोजिनी बाबर. 'अक्का' भारतीय संसदेत स्व. इंदिरा गांधी यांच्या बरोबरीने, महाराष्ट्रातून पहिल्या महिला खासदार. महाराष्ट्रातल्या सर्व तत्कालीन राजकीय नेत्यांवर त्यांचा मोठा वचक. एका अपघातात पायाला दुखापत झाली आणि काहीसे पाय उचलून टाकत चालावे लागू लागले. मात्र अक्का सर्वांना स्वतःची लाज वाटावी एव्हढ्या गतीने चालत, पळत. सानेगुरुजींचा अक्कांवर प्रभाव. भारतीय संस्कृती आणि महाराष्ट्र धर्म अक्कांच्या नसानसांत भिनलेला. महाराष्ट्र संस्कृतीचे आणि भारतीय मनाचे, विलोभनीय दर्शन 'अक्का' लोकसाहित्यावरील भाष्यातून घडवीत.

'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास' हा पीएच.डी.साठी प्रबंधाचा विषय म्हणून मी निवडला. 'एक होता राजा'चा प्रभाव माझ्यावर होताच. मला सह्याद्रीच्या सर्वोच्च शिखरांच्या, डोंगरउतरणीच्या प्रदेशातील महादेवकोळी, ठाकर, कानडे, तलवार कानडे आणि परिसरातील अन्य मराठमोळी माणसं, यांचं लोकसाहित्य, क्षेत्रीय सर्वेक्षणपूर्वक गोळा करायचं होतं. आदिवासी-वननिवासी जमातींच्या लोकसाहित्याचा हा अभ्यास होता. मी 'अक्कांचं' मार्गदर्शन घ्यायचं ठरवलं. डॉ. मोरजे, माझे गाईड, त्यांच्या अनुमतीने मी अक्कांकडे पुण्यात, ना. सी. फडक्यांच्या 'दौलत' बंगल्याशेजारील, 'जवाहर' बंगल्यात अक्कांच्या दर्शनाला,



पोहोचलो. पेशवे उद्यानाच्या परिसरात अगदी जवळ हा बंगला. 'समाज शिक्षणमाला' आणि 'लोकसाहित्य समिती महाराष्ट्र राज्य' या संस्थांच्या पुस्तकांनी अक्कांची बैठक सजलेली. अक्कांनी मोठ्या ममतेने माझी विचारपूस केली. गोळा केलेली काही गाणी, गोष्टी वाचून पाह्यल्या. 'भरपूर काम करावं लागेल, हिंडावं लागेल, लोकांच्या जवळ जाऊन मनात शिरावं लागेल, करशील ना? हा वाण वसा आहे!'' अक्कांनी प्रेमभरल्या जरबेनं विचारलं. मी मनापासून होकार भरला. महाराष्ट्राच्या अक्कांच्या परिवारात आणखी एका भावाची भर पडली. त्या दिवसापासून मी अक्कांच्या सतत संपर्कात राहात गेलो. मला लोकसाहित्यावर आधारित पीएच.डी. मिळाली याचा त्यांना विलक्षण आनंद वाटला. लोकसाहित्य समितीच्या विविध ग्रंथात त्यांनी माझं लेखन, संपादून समाविष्ट केलं, मीही लिहित राहिलो. मी डॉक्टरेट संपादन करूनही, आदिवासी भागात, अकोल्यात, एका माध्यमिक विद्यालयाला जोडलेल्या उच्च माध्यमिक विभागात ज्यु. कॉलेजमध्ये काम करतो आहे. त्याचबरोबर 'वनवासी कल्याण आश्रम' अशी संस्था उभी करून 'गुहक विद्यार्थी वसतिगृह' माझ्या घरातूनच सुरू केलं आहे याचं त्यांना विलक्षण कौतुक वाटायचं.

''माझ्या शाळेच्या स्नेहसंमेलनाला प्रमुख अतिथी म्हणून याल का? माझं वसतिगृहही पाहाता येईल!'' मी काहीसं संकोचानं विचारलं. त्यांनी आनंदाने होकार भरला. १९८२ सालातली ही गोष्ट असावी. 'अक्का' अकोल्याला आल्या. त्या सरकारी बंगल्यात उतरल्या नाहीत. थेट माझ्या घरी आल्या. माझं घर अक्षरशः बालेखांबी कौलारू, सारवलेल्या जमिनीचं, बाहेर ओटा, बाहेरच कसेबसे बांधलेले शौचालय! ''अरे वा, घर छान आहे तुझं'' त्यांनी सौ. उषाला अभिप्राय दिला. चौफेर नजर टाकली. ''छान कसं शेणानं हिरवंगार सारवलं आहे. आमच्या गावाकडल्या सारखं.'' अक्कांच्या या अभिप्रायानं त्यांचं माझं गाव आणि मन दोन्ही जोडलं गेलं. 'अक्का' येणार म्हणून आईनं आणि सौ. उषानं पुरणावरणाचा घाट घातला होता. पानं मांडली, पुढं रांगोळी रेखलेली. पानं वाढली 'अक्का' पानाशी बसल्या. पानातल्या वरणभाताच्या मुदीशेजारी, खरपूस गरमगरम अशी, पुरणपोळीची घडी पाहिली. 'पुरणपोळी केलीस?' त्यांनी उषाला विचारलं. आणि एकाएकी गंभीर स्तब्ध झाल्या. डोळ्यात पाणी तराळलं, चेहरा रडवेला झाला. आम्ही संकोचलो,

घाबरलो. काय झालं कळेना. क्षणभर आवंढा गिळण्यात गेला. आम्ही श्वास रोखून होतो. अक्कांनी अश्रु आवरत हळूच आमच्याकडे पाहिलं. म्हणाल्या, ''वडील नुकतेच गेले, त्यांच्यासाठी पुरणपोळी सोडली.'' आम्हाला अपराध्यासारखं झालं. ''हां, हां, भावजईनं मी येणार म्हणून रांधलंय, आईनं प्रेमानं मांडलय, म्हणून मी खाणार पुरणपोळी!'' त्या मनापासून दोघींना जणू उराशी कवटाळत म्हणाल्या. सर्वांच्याच डोळ्यात अश्रु तराळले. ''अक्का...'' उषा काही म्हणणार तोच अक्का म्हणाल्या, ''अहं आता काही बोलू नकोस, मी आता पुरणपोळीवर ताव मारणार!'' अक्का म्हणाल्या. सर्वांनाच मोकळं वाटलं.

अक्कांचे वडील म्हणजे आदर्श शिक्षक कृ. बा. बाबर. प्रौढ शिक्षण आणि वाचन संस्कृतीची चळवळ पश्चिम महाराष्ट्रात रुजविणारं, कै. यशवंतराव चव्हाण, कै. वसंतदादा अशा कितीतरी कर्त्या पुरुषांचे गुरुजी! दुःख गिळून आनंद वाटत महाराष्ट्राला आपलं घर अंगण मानणाऱ्या तेजस्विनीचं दर्शन आम्हाला अक्कांच्या रूपाने घडलं. शाळेत अक्कांनी पुन्हा घराचं, सारवणाचं आणि माझ्या कामाचं कौतुक करीत आदिवासी भागात पहिली माध्यमिक शाळा धाडसानं उभारणाऱ्या हिंद सेवा मंडळाचंही कौतुक केलंच, पण आपल्या गोड आवाजात ओव्यांचं गायन करीत आपल्या वक्तृत्वानं विद्यार्थी आणि पालकांना संमोहित केलं. गुहक विद्यार्थी वसतिगृहाची पाहाणी केली. 'समाजशिक्षण मालेचे' मासिकपुष्प पाठविण्याचा संकल्प केला. आदिवासी विद्यार्थ्यांशी गप्पा मारल्या. आपला गोतावळा वाढवीत अक्का परतल्या. त्यांचा सहवास संस्मरणीय झाला.

पंच्याऐंशी सालची गोष्ट. परिमल प्रकाशनाने माझी 'डांगाणी' ही डांगाणी भाषेचाच वापर करीत लिहिलेली कादंबरी प्रसिद्ध झाली. त्याच सुमारास लोकसाहित्य समितीच्या मालेतील एका पुस्तकाचे प्रकाशन वसंतदादा पाटील, शरदरावजी पवार, राम मेघे आदि मान्यवर पुढाऱ्यांच्या हस्ते पुण्यात होणार होते. अक्कांनी मला कार्यक्रमाला बोलावले. भेटण्याची संधी चालून आली होती. मी 'डांगाणी'च्या तीन प्रती पिशवीत टाकल्या. पुण्याला गेलो. अक्कांना भेटलो. अक्कांनी पुस्तक पाहिले. खूप आनंद व्यक्त केला. ''या पुस्तकाचे प्रकाशन झाले का? हे तुझे पहिलेच पुस्तक ना?'' त्यांनी विचारले. मी गोंधळलो. प्रकाशन वगैरे काही करायचे असते हे माझ्या गावीही नव्हते.



''किती प्रती आणल्यास?'' त्यांनी विचारले. ''तीन'' मी म्हणालो. ''बरं असू दे. दोन प्रती माझ्याकडे दे पाहू.'' मला काहीच कळले नाही. मी निमूट दोन प्रती दिल्या. दुपारी लोकसाहित्य समितीच्या परिसंवादात 'छंद माझा वेगळा'मध्ये सहभागी झालो. दुसऱ्या दिवशी भाईसच्या की कुठल्याशा हॉलमध्ये समारंभ होता. अक्कांनी मला सभागृहात पहिल्याच रांगेत बसायला सांगितले होते. मी उपस्थित झालो. बसलो. अक्कांचे लक्ष वेधले. समारंभ सुरू झाला. लोकसाहित्य समितीच्या पुस्तकाचे प्रकाशन झाले. भाषणे सुरू झाली. वसंतदादा पाटील बोलायला उभे राहिले. मी चमकलो, त्यांच्या हातात माझे 'डांगाणी' हे पुस्तक होते. त्यांनी बोलायला सुरुवात केली, ''मला अक्कांनी आज्ञा देऊन एक काम सांगितलंय...'' एव्हढे म्हणत त्यांनी 'डांगाणी' सर्वांसमोर हातात उंचावून धरले. म्हणाले, ''अक्कांचे एक अभ्यासक बंधू आहेत अनिल सहस्रबुद्धे त्यांनी कोळी ठाकर यांच्या सामाजिक जीवनावर त्यांच्याच भाषेत 'डांगाणी' ही कादंबरी लिहिली आहे. बघा, त्या कादंबरीचे प्रकाशन झाले असे मी जाहीर करतो!'' हे त्यांचे बोलणे ऐकतांनाच मला अक्कांनी खुणावल्याप्रमाणे मी उभा राहिले. सभागृहाबरोबर मीही टाळ्या वाजवल्या आणि सर्वांना तेथूनच अभिवादन केले. माझ्या पहिल्या ग्रंथरूप अपत्याचे अक्कांनी मोठ्या लडिवाळपणाने असे अनपेक्षित तरी दिमाखदारपणे स्वागत केले. मी करंटा असा की त्या स्वागताचे फोटो आणि वृत्त मी वज्रलिपित करू शकलो नाही. मी हरखून गेलो होतो. माझे अक्कांकडे जाणे-येणे सुरूच होते.

मी त्याच वर्षी नगरमध्ये सारडा महाविद्यालयात रुजू झालो होतो. १९८६ साली डॉ. गंगाधर मोरजे यांनी नगरला 'सहावी लोकसाहित्य परिषद' भरवायचे ठरविले. लोकसाहित्य संशोधन मंडळ आणि नगर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद होणार होती. डॉ. प्रभाकर मांडे आणि डॉ. मोरजे यांनी डॉ. सरोजिनी बाबर यांना अध्यक्ष म्हणून येण्यास विनंती केली. लोकसाहित्यविषयक समांतरपणे अशासकीय स्वरूपातील या संशोधन मंडळाविषयी काही ग्रज डॉ. सरोजिनी बाबर यांच्या मनात असावा. त्यांनी होकार देण्याचे थोडे लांबणीवर टाकले असावे. डॉ. मोरजे माझे मार्गदर्शक. ते म्हणाले, ''अक्कांचे आणि तुझे चांगले संबंध आहेत, तू जरा आग्रह करून पाहा. त्या येतील.'' मी जरा सुखावलो. अक्कांकडे गेलो. हट्ट धरला. अक्कांनी लोकसाहित्य संशोधन मंडळाविषयी अनेक प्रश्न उपस्थित केले. रोख लक्षात

आला. पण अक्कांनी माझा हट्ट मान्य केला. त्या आल्या. उत्तम भाषण केले. सर्वांचे कौतुक केले. त्यातही उल्लेख केला, ''माझा धाकटा भाऊ येऊन खनपटीला बसला म्हणून मी आले.'' मला मूठभर मास चढले. अक्का अशी कितीतरी नाती जपत असत.

महाविद्यालयात एम.फिल. केंद्र मिळावे म्हणून आम्ही प्रयत्नशील होतो. मी मराठी विभागप्रमुख डॉ. लीला गोविलकर यांना म्हणालो, ''आपण अक्कांकडून प्रयत्न करू या का?'' मॅडमना कल्पना आवडली. संपर्क केला. अक्कांनी मला आणि डॉ. गोविलकरांना सर्व प्रस्ताव घेऊन बोलावले आणि थेट कुलगुरू डॉ. वि. ग. भिडे यांच्या विद्यापीठातील निवासस्थानी त्या आम्हाला घेऊन गेल्या. सोबत पतंगराव कदमही होते. त्यांच्याच गाडीतून आम्ही गेलो होतो. ''महाराष्ट्रात असे महाविद्यालयाला कोठे केंद्र दिलेले आहे का? कसे चालते? याची पाहाणी करून; प्रस्ताव ठेवला पाहिजे'' कुलगुरू म्हणाले. ''ते होईल, प्रस्ताव देऊन पुढे जाऊ का ते सांगा.'' अक्का कुलगुरूंना म्हणाल्या. ''तुम्ही म्हटल्यावर अडचण कसली?'' कुलगुरू म्हणाले. आम्हा दोघांनाही केंद्र मिळाल्याचा आनंद झाला.

अक्का तेथेच थांबल्या नाहीत. त्यांना त्यांच्या गावी 'वागणी' गावाला जायचे होते. त्या आम्हाला म्हणाल्या, ''चला माझ्या बरोबर'' आम्ही होकार भरला. आम्ही दोघे अर्थात मी आणि डॉ. लीला गोविलकर अक्कांसोबत निघालो. केव्हढा आमचा रुबाब, गाड्याबरोबर नळ्याची म्हणानात. महाविद्यालयांना भेटी दिल्या. शिवाजी विद्यापीठाने एम.फिल. केंद्र महाविद्यालयात दिले होते पाहिले. यशवंतराव चव्हाणांचे घर पाहिले. त्यांच्या बंधूंच्या घरी गेलो. विशेष म्हणजे सांगलीला वसंतदादा पाटलांच्याच घरी उतरलो. अक्कांबरोबर आमचीही केव्हढी बडदास्त. दादांच्या चिरंजीवांनी स्वतः साखर कारखाना दाखवण्यापासून आमची सर्व प्रकारे सरबराई केली. पुढे अक्कांच्या घरी वागणीला गेलो. रात्री बरेच लोक अक्कांभोवती जमले. गप्पागोष्टी सुरू झाल्या. मध्येच अक्का म्हणाला, ''तुझ्या आदिवासींमधल्या गोष्टी, अनुभव लोकांना सांग.'' त्यांनी माझा प्रोत्साहक परिचय करून देत मला आज्ञा केली. मीही सरसावून माझे अनुभव सांगितले. अक्कांनी पाठ थोपटली.

अक्कांचे निमित्ताने नगरमध्ये येणे झाले. मी गंगा चेंबर्समध्ये वनरुम किचनमध्ये राहात होतो. अक्का आल्या, राहिल्या. माझे महाविद्यालय आणि



ग्रंथालय पाहिले. खूप सूचना केल्या.

अक्का होत्या तोपर्यंत सतत संपर्क राहिला. मोठ्या भगिनीचे कर्तव्य त्यांनी बजावले. लहान भावाने अक्कांच्या अपेक्षा पूर्ण केल्या की नाही हे त्यांनाच माहीत.

ई टी.व्हीवर 'रानजाई' कार्यक्रमातून शांता शेळके आणि अक्का यांनी जन्मभर केलेल्या महाराष्ट्र संस्कृती आणि लोकसाहित्यविषयक कामगिरीला संजीवकपणे लोकांसमोर ठेवले. त्यावेळी त्यांच्यातली गायिका, अभिनेत्री, अभ्यासक, संशोधक आणि महाराष्ट्राची धुरीण भगिनी लोकांच्या हृदयसिंहासनावर पुन्हा विराजमान झाली. चिरंजीवपणे.

●●●

# लोकसाहित्याची रुपरेखा

## (डॉ. दुर्गा भागवत)

प्रा. वसंत दावतर आले होते. त्यांचा नि मोरजे सरांचा गाढा स्नेह. मोरजाई मठीत मग साहित्यिक चर्चेला उधाण यायचं. चर्चेत वेगळेच मुद्दे दावतर सर उपस्थित करीत. त्यांना पाहाणारा आणि भेटणारा मी नवखा. मी अकोल्याहून काही मार्गदर्शनाच्या निमित्ताने डॉ. गंगाधर मोरजे यांचेकडे 'मोरजाई'त गेलो. सरांनी माझा परिचय करून दिला. झाले. दावतर सरांना नवीन माणूस आणि नवीन विषय चर्चेला मिळाला. दावतर सरांनी विचारले, ''नाव काय म्हणे तुझ्या प्रबंधाचं?'' ''चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास'' मी उत्तरलो. ''चाळीसगाव डांगाणचं कोणतं वाङ्मय?'' दावतर सर काहीशा अचंब्याने म्हणाले. मी गडबडलो. त्यांना कदाचित कोणते ग्रंथ वगैरे इ. विचारायचे असावे; असे त्यांच्या मुद्रेवरून वाटले. ''नाही, नाही, चाळीसगाव डांगाण परिसरातील गाणी, गोष्टी गोळा करून, त्यांच्यावर आधारित लिहिणार?'' मी उत्तरलो. ''हां, हां! म्हणजे लोकवाङ्मयावर आधारित तुमचा थिसीस आहे!'' त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. ''हो, हो!'' मी जरा चाचरतच म्हणालो आणि जरा भेदरल्या नजरेने डॉ. मोरजे यांच्याकडे पाहिले. मग मात्र माझे गाईड डॉ. गंगाधर मोरजे माझ्या मदतीला धावले. त्यांनी माझ्या प्रबंधाची संकल्पना नीट समजावून सांगितली. तो प्रबंध कसा, क्षेत्रीय अभ्यासावर आधारित, अंतरज्ञानशाखीय वगैरे होणार आहे, इ. सांगितले. त्यांचे बोलणे मी लक्षपूर्वक ऐकत होतो. मलाच माझ्या अभ्यासाचे स्वरूप, एव्हढे गहन वगैरे आहे; हे त्या चर्चेतून



कळले. खरे मार्गदर्शन झाले. दावतर सरांनी मग माझ्या प्रबंधाची रुपरेषा पाहिली. मागे संदर्भग्रंथ सूची होती. ती पाहिली. ''यात, लोकसाहित्याची रुपरेखा, हे दुर्गाबाईंचं पुस्तक दिसत नाही. तुम्हाला त्याच पुस्तकानुसार तात्त्विक अभ्यास करावा आणि मांडावा लागेल.'' दावतर सर म्हणाले. ''मागवायचं ते पुस्तक महाविद्यालयाच्या ग्रंथालयात'' डॉ. मोरजे म्हणाले. ''हं ठीक आहे'' दावतर म्हणाले. मग इकडच्यातिकडच्या गप्पा झाल्या. माझा पत्ता वगैरे विचारून झाला. आलोचनेला वर्गणी पाठवा, सांगून झाले. त्यांच्याबरोबरच मोरजे सरांकडे जेवण झाले. कसाबसा त्यांच्या कचाट्यातून सुटून अकोल्याला पोचलो. मनात सतत विचार सुरू होता. चाळीसगाव डांगाणच्या लोकवाङ्मयाचा तात्त्विक वगैरे अभ्यास करायचा म्हणजे नेमके काय करायचे?

आठवडाभरानी एक रजिस्टर पोस्ट पार्सल माझ्याकडे आले. दावतर सरांनी पाठवलेले. मी उत्सुकतेने आणि उतावळेपणाने उलगडले. 'आलोचना' मासिकाचा एक अंक होता आणि पुठ्ठाबाइंडिंग केलेले. एक बऱ्यापैकी लठ्ठ पुस्तक होते. ''लोकसाहित्याची : रुपरेखा'' ले. डॉ. दुर्गा भागवत.

मी 'लोकसाहित्याची रुपरेखा' वाचू लागलो. अनुक्रमणिका वाचत गेलो आणि हादरलोच. माहिती आणि ज्ञान यांच्या निबीड अरण्यात आपण येऊन पडलो आहोत, याची जाणीव झाली. भेदरलो. मनाचा हिय्या केला. पुस्तक नुसते वाचायचे नव्हते. ते आत्मसात करून त्याच्या आधारे माझ्या प्रबंधाची तात्त्विक मांडणी करायची होती. लोक, लोकसाहित्य, अभ्यासाचे जागतिक क्षेत्र, भारतीय क्षेत्र, अभ्यासाच्या परंपरा, अभ्यासातले सिद्धांत, मी जसजसा त्या अरण्यात शिरून पुढे पुढे जाऊ लागलो, तसे चकव्यात अडकावे तसा अडकत गेलो. पुन्हा पुन्हा पाहिले की चकव्यातून सुटण्याचा मार्गही दिसू लागला. मानवी शरीर, जीवन, संस्कृती, इतिहास, भूगोल, नि काय काय माणसाची नस अन् नस लोकसाहित्याच्या अभ्यासाने उलगडता येईल; एव्हढा महत्त्वाचा आणि माणसाचा सनातन शोध घेणारा विषय आणि शास्त्र माझ्यापुढे आव्हान म्हणून उभे होते. गडबडलो, घाबरलो, सावरलो, शोधत गेलो. आत्मविश्वास वाढत गेला. भक्कम झालो आणि धाडसाने नव्हे आत्मविश्वासाने, आत्मियतेने अपौरुषेयाच्या पौरुषेय अभ्यासाला डॉ. दुर्गा भागवत यांच्याबरोबर निघालो. मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, इतिहास, दैवतकथाशास्त्र,

भाषाशास्त्र, न्यायशास्त्र, राज्यशास्त्र अशा अनेक शास्त्रांचा समुदाय संगतीला घेतला. खरेतर ही संगत सोबत डॉ. दुर्गा भागवत यांनी घडवली होती.

नंतर कधीतरी थक्क करणारी कथा ऐकायला मिळाली. डॉ. दुर्गा भागवतांनी 'लोकसाहित्याची रुपरेखा' हा प्रबंध वाङ्मयशाखेअंतर्गत मुंबई विद्यीपाठाला सादर केला होता. तो रिजेक्ट झाला. मग डॉ. दुर्गा भागवतांनी तो ऑक्सफर्ड विद्यीपाठाला सादर केला. तेथे तो पारित झाला. आणि आता हा प्रबंध लोकसाहित्य क्षेत्रातल्या अभ्यासकांना मूळबंधासारखा, कुंडलिनी शक्तीसारखा उपयुक्त झाला आहे. मी 'लोकसाहित्याची रुपरेखा' म्हणून दुर्गा भागवतांनाच मनात आणि अर्थात अभ्यासात साठवत राहिलो.

शहात्तर-सत्त्यात्तर सालची गोष्ट. डॉ. प्रभाकर मांडे यांनी पुढाकार घेऊन 'लोकसाहित्य संशोधन मंडळ, महाराष्ट्र, औरंगाबाद'च्या विद्यमाने पहिली लोकसाहित्य परिषद औरंगाबाद येथे घ्यायचे ठरविले होते. त्यात डॉ. प्रभाकर मांडे यांची लोकसाहित्यावरची पुस्तकेही प्रसिद्ध होणार होती. त्यानिमित्त शोधनिबंधांचे सादरीकरण करावे असा कार्यक्रम करावयाचा होता. डॉ. प्रभाकर मांडे यांनी डॉ. दुर्गा भागवत यांना परिषदेचे अध्यक्षपद भूषविण्यासाठी निमंत्रित केले होते. डॉ. गंगाधर मोरजे यांनी मोठ्या विश्वासाने मला शोधनिबंध लिहिण्यास सांगितले. मी अगदी सहज होकार भरला. शोधनिबंध डॉ. दुर्गा भागवतांच्या समोर वाचण्याचे भाग्य मिळणार होते. अर्थात 'लोकसाहित्याच्या रुपरेखे'शी प्रत्यक्ष भेट होणार होती. तोपर्यंत मी डॉ. दुर्गा भागवतांविषयी अनेक कथा मौखिक परंपरेतून ऐकल्या होत्या. अर्थात डॉ. भीमराव कुलकर्णी, दावतरसर आदींकडून. मी मोठ्या आत्मविश्वासाने अभ्यासपूर्वक शोधनिबंध तयार केला - ''लोकसाहित्यातील धर्मश्रद्धा आणि त्यांचा अन्वयार्थ''. माझे गाईड डॉ. गंगाधर मोरजे यांनी पाहिला. ''ठीक आहे!'' म्हणाले. मी डॉ. गंगाधर मोरजे यांच्या बरोबर औरंगाबादला पोचलो.

उद्घाटन समारंभ बराच लांबला. ग्रंथप्रकाशन झाले. भोजनपूर्व काही शोधनिबंधांचे वाचन करायचे ठरले. मोजकेच लोक थांबले. त्यामुळे व्यासपीठावरून वाचन करण्याचे रद्द करून; वर्तुळाकार खाली बसून वाचन करायचे ठरले. माझे सारखे लक्ष डॉ. दुर्गा भागवतांवर खिळलेले होते. 'लोकसाहित्याची रुपरेखा' वाचल्यापासून मी त्या तेजस्विनीचा भक्त झालो होतो. त्यांच्या जवळ जाण्याची संधी पाहात होतो. काहीसे लहान मुलासारखे



म्हणाना. वर्तुळाकार बसू लागलो. मी मोठ्या शिताफीने आणि लहान मुलाच्या आतुरतेने डॉ. दुर्गा भागवतांच्या शेजारची जागा पटकावली. त्यांच्या शेजारी उजव्या हाताला मी, डाव्या हाताला सुप्रसिद्ध समीक्षक द. ग. गोडसे बसले होते. रिंगणात किमान तीस ते चाळीस थोर आणि नवोदित अभ्यासक असावेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे शोधनिबंध वाचनासाठी माझा पहिला नंबर लागला. शेजारीच बसल्यामुळे असेल कदाचित. माझा परिचय शाळेतला शिक्षक म्हणून केला तेव्हा. काहींनी भिवया उंचावल्या. त्यांच्या मुद्रा पाहून मी काहीसा हिरमुसलो. ''हं वाचा'' डॉ. दुर्गा भागवत म्हणाल्या. मी वाचू लागलो... माझ्या शोधनिबंधाचे नाव - लोकसाहित्यातील धर्मश्रद्धा आणि त्यांचा अन्वयार्थ असे आहे. मी वाचत गेलो. वाचतांना फक्त आणि चोरट्या नजरेने मधूनच डॉ. दुर्गा भागवतांकडे पाहात होतो. त्यांच्या चेहेऱ्यावर गंभीर आणि समाधानाचे भाव पाहून मला हुरूप येत होता. मी जवळपास सात दैवतकथांच्या आणि स्थानांच्या आधाराने माझा शोधनिबंध मांडला होता. शेवटच्या शब्दापर्यंत खणखणीत आणि ज्या गोष्टींवर तात्त्विक दृष्ट्या भर देणे आवश्यक होते; त्यावर जोर देऊन माझा निबंध वाचला. ''वा! शाब्बास!'' माझ्या पाठीवर थाप टाकीत डॉ. दुर्गा भागवत म्हणाल्या, ''खूप छान'' मी सुखावलो. इतका की; माझी लोकसाहित्यातील तपःश्चर्या पूर्ण झाल्यासारखे वाटले.

भोजन विश्रांतीच्या काळात डॉ. द. ग. गोडसे यांनी तर माझ्या क्षेत्रात भ्रमंती करण्याचा मानस व्यक्त केला. मी हवेतच तरंगत होतो. एखाद्या कॉन्फरन्समध्ये शोधनिबंध वाचण्याचा माझा हा पहिलाच अनुभव होता. अभ्यास क्षेत्रातल्या देवतेने पाठीवर थाप देऊन शाबासकी दिली होती. आणखी काय हवे होते.

सायंकाळी पाचच्या सुमारास समारोप होता. समारोप प्रसंगी डॉ. दुर्गा भागवत अभिप्रायात्मक आणि मार्गदर्शनात्मक भाषण करणार होत्या. त्या समारंभाला पुन्हा उद्घाटन समारंभासारखी गर्दी झाली. डॉ. मांडे, डॉ. मोरजे, अन्य पदाधिकारी मंचावर उपस्थित होते. मात्र माझे सगळे लक्ष डॉ. दुर्गा भागवतांच्याकडे होते.

समारोपाचे शेवटचे भाषण डॉ. दुर्गाबाईंचे होते. डॉ. दुर्गाबाई बोलू लागल्या आणि मला एकदम दिव्य सुखद धक्काच बसला. डॉ. दुर्गा भागवत

बोलत होत्या, ‘‘अनिल सहस्रबुद्धे यांच्यासारखे तरुण आणि नवोदित संशोधक ‘लोकसाहित्यातील धर्मश्रद्धा आणि त्यांचा अन्वयार्थ’ अशा गंभीर आणि अतिमहत्त्वाच्या विषयावर मुळात जाऊन संशोधन करण्याचे धाडस करतात, आणि मुलभूत आणि सूक्ष्म संशोधन करतात. त्यांनी माणूस, त्याचं मन, वृत्ती प्रवृत्ती, श्रद्धा आणि भय, दैवत आणि दैवतकथा निष्पत्ती यांची सूक्ष्म उकल करून मानव, देव, दैवतकथा, धर्म यांचे महत्त्व उलगडले, हे पाहून मला लोकसाहित्य संशोधन क्षेत्राला उत्तम अभ्यासक, संशोधक या चळवळीतून मिळतील याची खात्री पटली...’’ डॉ. दुर्गा भागवत माझ्याविषयी, होय, माझ्याच शोधनिबंधावर बारकाईने बोलत होत्या. मलाही मी नेमके काय केले ते उलगडत गेले. माझा हुरूप शिगेला पोचला. समारंभानंतर मी त्यांना बरोबर गाठले. नेमक्या त्या डॉ. गंगाधर मोरजे यांच्याशीच काही बोलत होत्या. मी पटकन झुकलो त्यांच्या पायावर अक्षरशः डोके ठेवले. ‘‘अरे, अरे, हे काय? मोठ्ठा हो!’’ त्या कौतुकाने म्हणाल्या आणि त्याचवेळी त्या म्हणाल्या, ‘‘मोरजे, तुमचा विद्यार्थी मोठं काम करतोय!’’ पुन्हा माझ्याकडे वळून म्हणाल्या. काही शंका आली तर, डॉ. मोरजे आहेतच, पण जरूर ये. मला तुझ्याशी चर्चा करायला आवडेल.’’ त्यांच्या या बोलण्याने डॉ. मोरजे सुखावले. मी हरखून गेलो.

डॉ. दुर्गा भागवतांची तेजस्विता केवळ अभ्यासक्षेत्रापुरती नव्हती. आणीबाणीत कऱ्हाडला झालेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलतांना त्यांनी मानवी स्वातंत्र्यासाठी केलेली गर्जना भारताला दिपवून गेली. हा इतिहास देशाला माहीत आहे.

नंदीबैलवाले, अस्वल, यासारख्या असंख्य विषयावरचे त्यांचे संशोधनात्मक लेखन भारतीय संस्कृतीचे पदर उलगडून दाखवतात. अभ्यासकांना बरोबर घेत, अभ्यासातील धोक्याची स्थाने निर्देशित करून; सावध करीत; शेवटपर्यंत त्यांचे संशोधन सुरू होते. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयात त्यांचे सतत वाचन, नोंदी संशोधन सुरू असे.

कठोर संशोधक जशा त्या होत्या, तशाच त्या मनस्वी ललित लेखिकाही होत्या. ‘पैस’ सारखी त्यांची पुस्तके गाजली.

स्वाभिमान त्यांच्या नसानसात भिनला होता. मुंबई विद्यापीठाने प्रबंध नाकारला, देशात स्वातंत्र्याची मुस्कटदाबी झाली याचा त्यांच्या स्वाभिमानी मनावर विलक्षण आघात झाला. एरव्ही क्षेत्रीय अभ्यासासाठी पायपीट, पायपोळ करीत झोपडी झोपडीत, वनावनात लोकसंवाद साधत संशोधन करीत फिरणाऱ्या विदूषीने स्वाभिमानपूर्वक कोणताही शासकीय पुरस्कार स्वीकारला नाही.

मी एकोणऐंशी साली पीएच.डी. झालो. प्रबंध घेऊन डॉ. दुर्गा भागवतांना भेटायला मुंबईत गेलो. नऊवार साडीतल्या कोकणी करारी, सूक्ष्म नजरेच्या आणि आभाळमनाच्या त्या विदूषीने माझा प्रबंध पाहिला, चाळला. अनुक्रमणिका बारकाईने पाहिली. भाषिक अभ्यास आणि लोकसाहित्याची तात्त्विक मांडणी, मौखिक परंपरेतील लोकगीते, लोककथा, म्हणी, वाक्प्रचार, आहाणे, उखाणे इ.च्या परिशिष्टातील संहितेस्वरूपात जोडलेले पाहून; पुन्हा माझी पाठ थोपटली. त्यांना ऐकू जाईल असे पुटपुटलो, ‘लोकसाहित्याची रुपरेखा’चा हा आशीर्वाद आणि प्रसाद आहे!’ त्यांना ऐकू गेले असावे. त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे स्मित दिसले. मी धन्य झालो. प्रा. दावतरांनी पाठविलेले ‘लोकसाहित्याची रुपरेखा’ हे पुस्तक मी आजही धर्मग्रंथासारखे जपून ठेवले आहे.

●●●

# नगरचे नेहरू

## (डॉ. श्रीराम रानडे)

''अकोल्याला हिंद सेवा मंडळाची शाळा काढली; ते आव्हान होतं. दुर्गम, आदिवासी, क्रांतीकारी भाग. तरी पूर्ण अविकसित. माध्यमिक विद्यालय तालुक्यात नव्हतं. कलेक्टरनी त्या काळात, शाळा सुरू करण्याचं आव्हान स्वीकारणाऱ्या संस्थेसाठी दहा हजार रुपयांचं बक्षीस ठेवलं होतं. बरं. आपल्या संस्थेतले कार्यकर्ते स्वातंत्र्य लढ्यातले, सेवाभावी, कार्यकर्ते, गांधी चळवळीतले. संस्थेनं आव्हान स्वीकारलं. हायस्कूल सुरू झालं. १९५० मध्ये. आता १९८० म्हणजे तीस वर्ष उलटली. नगरला कॉलेज काढलं १९६२ साली. मी हे सांगतोय म्हणजे तुम्हाला माहीत नाही असं नाही. पण त्या शाळेतला एक शिक्षक, मॅट्रिक त्याच शाळेत झाला. लगेच शिक्षक म्हणून आपण घेतला. गरिबीत वाढलेला. बी.ए., एम.ए. आणि आता पीएच.डी. झाला. हे गेल्या अठरा वर्षात कॉलेजमधल्या एकाही प्राध्यापकाने करू नये. या मुलाकडून प्रेरणा घ्या. कॉलेजमध्ये सगळ्या सुविधा आहेत. नसतील तर देऊ. ज्याला करण्याची इच्छा आहे, त्याला सगळ्या अडचणींवर मात करता येते. बरं. या मुलानं पीएच.डी.साठी विषयही आदिवासींचा निवडला. संस्थेला अभिमान वाटतो. त्यानं खरं म्हणजे कॉलेजमध्ये यायला हवं.'' तात्या बोलत होते. तात्या म्हणजे नगरचे तात्यासाहेब. डॉ. श्रीराम रानडे. त्या काळातले एम.एस. सर्जन. त्यांना सगळे श्रीमंतांचे डॉक्टर म्हणत. ते हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष होते. पंतप्रधान नेहरूंपर्यंत पोच असलेला, गोरापान, उंचापुरा, नाकेला, अत्यंत हुशार, शहरावर दरारा असणारा, मात्र विचाराने साम्यवादी असा माणूस. मला



तात्यासाहेबांचा परिचय याच समारंभात होत होता. मिटींग किंवा अन्य कामांसंबंधाने मंडळ अकोल्यात येई तेव्हां केवळ स्टाफमध्ये असल्याने लांबूनच त्यांना पाही. माझ्या गाईडच्या समोर अर्थात डॉ. गंगाधर मोरजे यांच्यासमोर आणि जिल्ह्यातील व शहरातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह, हिंद सेवा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत, हिंद सेवा मंडळाच्या सेवक सहकारी पतपेढीच्यावतीने माझा सत्कार होत होता. क्षणात मी सर्वांच्या डोळ्यासमोर आलो. प्राचार्य सदाशिव आठवल्यांसह सर्व प्राध्यापक मंडळी उपस्थित होती. उत्साही आणि शिक्षकांचं नेतृत्व करणारे श्री. म. ग. मुळे आणि पतपेढीतील श्री. सु. प्र. कुलकर्णी, श्री. सोनटक्के, श्री. ए. व्ही. जोशी यांनी पुढाकार घेऊन कार्यक्रम आयोजित केलेला. नाही म्हटले तरी; मला एव्हढे दिवस या संस्थेत काम करतो त्याचे सार्थक झाल्यासारखे वाटले. कार्यक्रम झाला.

मी अकोल्यात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतःच्या पुढाकाराने सुरू केलेल्या 'वनवासी कल्याण आश्रम'– कार्यात गढून गेलो. संस्थेने लक्षात ठेवून तीन वेळा नगरला कॉलेजमध्ये बोलावले. मी नकार दिला. ध्येयाने वेडावलेल्या मनाने प्राध्यापक होणे नाकारले. तरी संस्थेने नव्याने आमच्याच शाळेला जोडून सुरू झालेल्या ज्युनियर कॉलेजमध्ये मला संधी दिली होतीच. १९८५ मध्ये माझ्या नोकरीचाच प्रश्न आला. मी सरप्लस झालो. महाराष्ट्रात कोठेही जाण्याचा प्रसंग. १९६५ ते ८५ च्या प्रवासात मी संस्थेत आणि संसारात गुरफटलो होतो. संस्थेने सामावून घेतले तर ठीक असे शासनाचेही म्हणणे होते. नगरला ऑनररी जनरल सेक्रेटरी श्री. नानासाहेब निसळ यांना येऊन भेटलो. पीएच.डी. झाल्यापासून अनेकदा श्री. नानासाहेबांना भेटलो होतो. तीन वेळा नाकारल्याने संस्था काहीशी चिडली होती. तरी माझ्याविषयीचा अभिमान कमी झाला नसावा. श्री. नानासाहेबांनी संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीराम रानडे आणि कार्याध्यक्ष श्री. झुंबरलालशेठजी सारडा यांना भेटायला सांगितले. तात्यासाहेबांनी भेटायला गेल्यावर माझी चांगलीच कानउघाडणी केली. पण म्हणाले, ''जा कॉलेजमध्ये जाऊन प्राचार्यांना भेटून कामाला सुरुवात कर, बघू काय होते ते.'' मला हायसे वाटले. तात्यासाहेबांनी खंबीरपणे माझ्या पाठीशी उभे राहात, सर्वप्रकारे समावेशनासाठीची तरतूद करण्याची आज्ञाच जणू संस्थेला दिली.

तात्यांना माझे भारी कौतुक. नगरमध्ये आलो ते त्यांच्या समोरच्या

वाड्यातच राहायला आलो. एवढे मोठे डॉक्टर मी आणि माझ्या कुटुंबियांचे जणू फॅमिली डॉक्टर झाले. तात्या आता प्रॅक्टीस करत नव्हते. ते सतत त्यांच्या पलंगावर पहुडलेले असायचे. खिडकी समोरच. हमरस्त्यावरचे जाणारे–येणारे, तात्यांना सहज रामराम शामशाम करणारे खिडकीतून करू शकत. त्यांची छबी पलंगावर पहुडलेल्या अक्कलकोट स्वामींसारखी दिसे. मी अगदी सहज खिडकीतूनही संपर्क करू शके. पाहता पाहता संस्थेचे अध्यक्ष हा भावच मनातून पसार झाला. घरातलं एखादं वडीलधारं वृद्ध माणूस असावं तसं वाटू लागलं. कॉलेज सकाळचं. दुपारी चारच्या सुमारास मी तात्यांकडे जाऊन बसे. मग तात्या इतिहासाची पानं उलगडत. नगरमधल्या संगीत मैफिलींचा, नाट्यपरंपरेचा इतिहास मला तात्यांकडून ऐकायला मिळाला. जिल्ह्यातली कर्ती मंडळी तात्यांच्या आरेतुरेतली असत. खा. बाळासाहेब विखे असोत की अॅड. आठरेपाटील असोत. तालेवार मंत्रीसंत्री त्यांच्याकडे हजेरी लावूनच जात. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंचे नगरला येणे, कॉलेजच्या उद्‌घाटनाचा प्रसंग, नगर क्लबमधील दिग्गज आणि त्यांच्या गमतीजमती मला तात्यांकडून ऐकायला मिळायच्या. कॉलेजची सुरुवात आणि विकास यांच्या कथा तात्या सांगत.

माझ्या सिनियर कॉलेजमधील सिलेक्शनचा प्रसंग. तात्पुरती अॅडजेस्टमेंट करून मला १९८६ मध्येच सिनियर कॉलेजला घेतले होते. दोन वर्षे असे गेले आणि कमिटीद्वारा सिलेक्शनचा प्रसंग आला. त्यावेळी माहितीतल्याच प्रेमाच्या लोकांनी काही गमतीशीर राजकारण केले. मला खरेतर एक्स्ट्रॉऑर्डिनरी लिव्ह, ज्युनियर कॉलेज व्यवस्थेत मंजूर करून; सिनियरला नेमले होते. लिव्हची मुदत संपली होती. त्या दिवशी सिलेक्शन होऊन मला थेट नेमणे आवश्यकच होते. या प्रियजनांना आपला आणखी एक प्राध्यापक बसवायचा होता. कारण आमच्यातला एक रिटायर्ड झाला होता. हा प्राध्यापक सर्वपरिचित असला; तरी बाहेरच्या महाविद्यालयातून येणार होता. आमच्या महाविद्यालयातील ज्युनियर विभागातील एक स्त्री प्राध्यापक नुकत्याच पीएच.डी. झाल्या होत्या. डॉ. रानड्यांच्या मनात त्यांना घ्यायचे होते. गुंता निर्माण झाला होता. वास्तविक मला अधल्या वर्षीच कमिटीकडून सिलेक्ट करून रेग्युलराईज केले असते तर झाले असते. या प्रियजनांनी गुंता वाढवला. बाहेरचा माणूस सिनियर आणि अनुभवी होता. कमिटीने कमिटीमध्ये अट घातली या प्राध्यापकांना घेत



असाल तरच सहस्रबुद्धे यांचे सिलेक्शन करतो अन्यथा आम्ही निर्णयच घेत नाही. तात्या चिडले. सर्व माणसं परिचयाची. तात्यांचा आदर करणारी. मात्र हितसंबंधाचा गुंता झाला. मला येऊन तीन वर्ष झाली होती तरी मी नवाच होतो. कमिटी म्हणाली, ''तुमचा आग्रहच असेल तर आम्ही त्या बाईंना आणि या प्राध्यापकांना घेतो. डॉ. सहस्रबुद्ध्यांना ज्युनियरलाच राहू द्या! ते तिकडे कायम आहेतच.'' तात्या चिडले. त्यांना संस्थेतलीच दोन्ही माणसे हवी होती. अखेर ते म्हणाले, ''डॉ. सहस्रबुद्ध्यांचे सिलेक्शन करा त्यासाठी तुम्हाला काय हवे ते करा'' हे नाट्य माझ्यासमोर घडत होते. या नाट्याला एकप्रकारे श्री. झुंबरशेठजी सारडांची मूक संमतीच होती. माझे सिलेक्शन करण्याचा टोकाचा आग्रह पाहून; माझ्या मनातील संस्था आणि तात्या दोघांविषयीचा आदर शतगुणीत झाला.

'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' या माझ्या ग्रंथाचं प्रकाशन मुद्दाम महाविद्यालयात ठेवलं होतं. गुरुवर्य डॉ. गंगाधर मोरजे, पुणे विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. मु. श्री. कानडे, ख्यातकीर्त संतसाहित्याचे संशोधक डॉ. शं. गो. तुळपुळे आले होते. स्वाभाविकपणे, आमच्या संस्थेचे त्रिदेव डॉ. श्रीराम रानडे, मा.श्री. त्र्यं. वि. तथा नानासाहेब निसळ आणि कार्याध्यक्ष श्रीमान झुंबरशेठजी सारडा उपस्थित होते. डॉ. श्रीराम रानडे बोलायला उभे राहिले तेव्हां म्हणाले, ''तुम्हाला सांगू; डॉ. अनिल सहस्रबुद्धे हा इंच अॅन्ड इंच हिंद सेवा मंडळाचा प्रॉडक्ट आहे. इ. ८ वीपासून तो या संस्थेत आहे. इ.इ.इ.'' डॉक्टरांनी माझा प्रवास त्यांच्या शब्दात मांडला. मला खूपच संकोचल्यासारखे झाले. तात्यांना मात्र सर्व स्टाफसमोर एक उदाहरण म्हणून मला मांडावेसे वाटत होते. अखेर तर ते म्हणाले, ''सिनियर कॉलेजमधला प्राध्यापक कसा असला पाहिजे त्याचे सहस्रबुद्धे हे उत्तम उदाहरण आहे.'' डॉ. शं. गो. तुळपुळ्यांनी मोठ्या कौतुकाने चिमटा काढला, ''मा. अध्यक्ष डॉ. रानडे बोलत असतांना मला कळेनासे झाले की ग्रंथ प्रकाशनासाठी आलोय की सहस्रबुद्ध्यांच्या प्रकाशनासाठी? मी ग्रंथलेखक आणि चांगले प्राध्यापक म्हणूनही डॉ. सहस्रबुद्ध्यांचे अभिनंदन करतो. मात्र आज 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' हा त्यांनी लिहिलेला अभिनव ग्रंथ समजावून घेणार आहोत.'' त्यांच्या या चिमटा काढण्याला, स्वतः तात्यांनीही भरभरून दाद दिली. पुढे या ग्रंथाचे कौतुक कांचीकामकोटी पीठाच्या जगद्‌गुरू शंकराचार्य श्री जयेन्द्र

सरस्वती यांनी, ज्ञानेश्वरी लेखन सप्तशताब्दी निमित्ताने, पुण्यात; डॉ. रा. चिं. ढेरे, डॉ. व. दि. कुलकर्णी, डॉ. उषा देशमुख, डॉ. वि. रा. करंदीकर, श्री. राम शेवाळकर, डॉ. हे. वि. इनामदार आदि ज्ञानेश्वरीवर स्वतंत्र लेखन करणाऱ्या निवडक नऊ विद्वानांना, अभिनंदनपत्रासह विद्वत पुरस्कार देऊन केले त्यात मी होतो. त्यावेळी तर डॉ. श्रीराम रानडे यांच्या उत्साहाला पारावार नव्हता. खाजगीत त्यांनी मला जवळ घेऊन पाठीवर थाप मारून, ''तू संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा लावलास'' असे म्हणत सद्‌गदित कंठाने कौतुक केले. डॉ. श्रीराम रानडे यांच्याविषयी मी खूप वेगवेगळ्या प्रकारे ऐकून होतो. सर्वांनाच त्यांचा भीतीयुक्त दरारा वाटे. मला त्यावेळी त्यांचे वात्सल्य रूप विशेष भावले. संस्थेविषयीचा ओतप्रोत अभिमान जाणवला.

'हिंद सेवा मंडळ' संस्थेचा अमृतमहोत्सव साजरा होणार होता. सोहिनुर अर्थात स्मरणिका तयार करण्याच्या कार्यात माझ्यावर मोठी जबाबदारी होती. त्यात मी अध्यक्ष डॉ. श्रीराम रानडे, मानद सचिव त्र्यं. वि. तथा नानासाहेब निसळ आणि कार्याध्यक्ष श्रीमान झुंबरशेठजी सारडा यांच्या मुलाखतींवर आधारित हिंद सेवा मंडळ आणि प्रामुख्याने 'पेमराज सारडा महाविद्यालय' असा संस्थेचा इतिहास रंजकतेने लिहिण्याचे काम हाती घेतले. तात्यांकडे गेलो नि अपेक्षित प्रश्न विचारू लागलो की तात्या भूतकाळात जात आणि एखाद्या निष्णात कादंबरीकाराप्रमाणे संस्थेच्या उभारणीतील प्रसंग वर्णन करून सांगत असत. त्यात त्या, त्या व्यक्तींचे संवाद तर आपण नाटकातले संवाद ऐकत आहोत अशा पद्धतीने सांगत. याच संवादातून, तात्यांनी अनेक नाटके दिग्दर्शित केलीत आणि स्वतः त्यांनी प्रमुख भूमिका बजावल्याचे समजले. या इतिहासातील तात्यांचा प्रिय आणि ऐतिहासिक प्रसंग म्हणजे भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या शुभहस्ते महाविद्यालयाच्या उभारणीला आरंभ. ते हा प्रसंग समरस होऊन सांगत. त्यांचा हात पंडित जवाहरलाल नेहरूंच्या हाती असे. दोघांच्याही भावमुद्रा आनंदविभोर असत. हे तात्यांकडे पाहात ऐकत असतांना जाणवे. त्यांना नगरचे पंडित जवाहरलाल नेहरू का म्हणत; याचा उलगडा मला या भेटीत झाला. साहित्य, संगीत, नृत्य, नाट्य आदि कला आणि ब्रीज, रमी यासारख्या बड्या खेळाबरोबरच, नगर क्लबमधील बिलीयर्ड यासारख्या खेळात रमून जाणारा रसिकराज, राजकारणात पुरोगामी विचारानं वाटचाल करणारा तत्त्वनिष्ठ राजकारणी,



संस्थाचालक म्हणून, कुटुंबप्रमुखासारखे काम करणारा कर्ता पुरुष आणि निष्णात डॉक्टर यांसारख्या माणसाशी आपण अगदी जवळची मैत्री? होय मैत्रीच करू शकलो; याचे मला नेहमीच गूढ आणि अभिमान वाटत असे. तसाच त्यांच्याविषयी आणि स्वतःचाही अभिमान वाटत आला आहे.

●●●

# ज्ञानपिपासू शिक्षण महर्षी

## (झुंबरलालशेठजी सारडा)

''के रेवे गितडा, के रेवे भितडा, अशी आमच्यात एक म्हणच आहे. सारडा कुटुंबियांनी हे कायम लक्षात ठेवलंय. अहो, व्यवसाय, व्यापार आणि व्यवहार यात कमवण्यासाठी, सतत म्हणजे जास्तीत जास्त नफ्यासाठी आम्ही व्यापारी मंडळी, प्रयत्न करत असतो. वेळ पाहून दाम मिळविण्यासाठी आमच्या व्यापारी पद्धतीने जास्त कमी किंमत करूनच व्यापार करावा लागतो. तुम्ही लोक ज्याला सचोटी म्हणता, तसं व्यापाऱ्याला जमणारच नाही. ''अहो, व्यापारीका बच्च्या कभी न बोले सच्च्या, जो बोलेगा सच्च्या उसका गुरू कच्च्या!'' अशी सांगीच आहे. म्हणजे आम्ही मालात फसवत नाही, किमतीत फायदा पाहातो.'' श्रीमान झुंबरशेठजी सारडा बोलत होते. मी हिंद सेवा मंडळाच्या अमृत महोत्सवी स्मरणिकेसाठी, त्यांची एक मुलाखत घेण्यासाठी, खरे तर गप्पा मारण्यासाठी गेलो होतो. श्रीमान झुंबरशेठजी सारडा हे हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष आणि पेमराज सारडा महाविद्यालयाचे चेअरमन असल्यामुळे त्यांची मुलाखत महत्त्वाची होती. सारडा कुटुंब सुरुवातीपासूनच हिंद सेवा मंडळाशी जोडलेले. कुटुंबात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक कार्याबरोबर राजकीय चळवळीचीही आवड. स्वातंत्र्य लढ्याशी संबंधित जी काही व्यापारी कुटुंब आढळतात त्यात अहमदनगरमधील सारडा कुटुंबाचा समावेश होतो. त्यांच्याच कुटुंबाकडून मिळालेल्या पहिल्या, त्या काळातील अर्थात ६१-६२ मधील पन्नास हजार रुपयाच्या धनादेशस्वरूपातील देणगीने, पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते; पेमराज सारडा महाविद्यालयाची



मुहूर्तमेढ रोवली गेली. अमृतमहोत्सवाची मिटींग झाली तेव्हां मी सहज म्हणालो, ''सोहिनूर करता मुलाखती घेण्याचे काम जुन्या जाणत्या, नगरमधील प्राध्यापकावर सोपवावे. माझ्यासारख्या ज्युनियर माणसावर नको.'' मी असे म्हणताच, झुंबरशेठ म्हणाले, ''ज्युनियर इज अवलेज सिनियर ॲण्ड यु आर अलवेज सिनियर'' त्यांचे हे बोलणे मोठे गमतीशीर वाटले, तरी मी खूप वेळ त्याचा विचार करीतच होतो.

नगर शहरातील कपड्याच्या व्यापारात ख्यातकीर्त सारडा कुटुंबीय; त्यातील सार्वजनिक जीवनातील सुप्रतिष्ठित असे व्यक्तिमत्त्व म्हणजे झुंबरशेठजी. पण नम्रता, रुजुता, समंजसपणा, गोरगरीबांविषयीची कणव, लहानथोर सर्व कर्मचाऱ्यांच्या खांद्यावर हात टाकून अगदी कुटुंबातील कर्त्या पुरुषाप्रमाणे बोलण्याची त्यांची लकब. गांधी टोपी, धोतर, शर्ट असा साधा परिवेश, करारी तरी स्नेहाळ नजर, यामुळे सर्वांना ते आपले हितैशी वाटत.

श्रीमान झुंबरशेठना मी अकोल्याला अर्बन बँकेच्या निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने आणि मॉडर्न हायस्कूलच्या विशेष समारंभाच्या निमित्ताने पाहिले होते. त्यांची प्रत्यक्ष जवळून भेट, माझ्या पीएच.डी.साठीच्या सत्कार समारंभप्रसंगी झाली. त्यांनी सत्कार कार्यक्रमानंतर मोठ्या गौरवाने माझ्या पाठीवर मारलेली थाप मला सतत स्मरते. नगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयात मला यावे लागले; त्यावेळी अतिआग्रही आणि स्वागतशील भूमिका श्रीमान झुंबरशेठ सारडांनी बजावली. ते स्वतः चेअरमन असल्याने, मला नगरमध्ये आणण्याचा त्यांचा उत्साह पाहून अनेकांच्या भुवया उंचावल्याचे मला जाणवले होते. ''स्वतः झुंबरशेठजींनी एवढा उत्साह दाखवलेला कधी पाहिले नव्हते'' असे एका प्राध्यापकाने, थेट स्टाफरुममध्ये उद्‌गार काढले तेव्हां मला खूपच संकोचल्यासारखे झाले.

'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' या ग्रंथाच्या प्रकाशनापासून आणि त्या ग्रंथाला कांची कामकोटी पीठाच्या जगद्‌गुरू श्री शंकराचार्य श्री जयेन्द्र सरस्वती यांनी गौरविल्यापासून; माझे श्रीमान झुंबरशेठजींच्या निवासस्थानी जाणे वाढले. कारणही तसेच होते. सारडा कुटुंब सश्रद्ध तर होतेच पण स्वतः श्रीमान झुंबरशेठजी सारडांचा श्रीमद्‌भगवद्‌गीता ग्रंथाचा अभ्यास होता. त्या ग्रंथाच्या समर्पण पत्रिकेत त्यांचाही सन्मान्य उल्लेख केला होता. श्रीमद्‌भगवद्‌ गीतेतील कर्मयोग आणि विभूतियोग यावर ते सतत भाष्य करीत. माझा भगवद्‌गीतेचा

आणि ज्ञानेश्वरीचा अभ्यास आहे हे लक्षात येताच; ते मला त्यांच्या चिंतनशील मूड प्रसंगी घरी बोलावून घेत. त्यावेळी खरे तर माझी परीक्षा असे. त्यांना पडलेले प्रश्न, हा अनुभवांचा परिपाक असे. प्रवचनातून ऐकलेल्या, जाणवलेल्या आणि भावलेल्या भाष्यावरचे चिंतन गर्भ प्रश्न त्यांचे मन अस्वस्थ करी. त्यांच्या अशा प्रश्नांकित चिंतनावर त्यांना माझ्याशी चर्चा करायची असे. मी माझ्या कुवतीप्रमाणे त्यांच्याशी चर्चा करीत असे. त्या चर्चेने ते खुलत आणि चर्चा रंगत जाई. तास दीडतास कसा निघून जायचा ते कळायचेही नाही. एकदा त्यांनी थेट एका श्लोकावरच चर्चा सुरू केली. सामान्यतः भगवद्‌गीतेतील कर्मयोगावर बोलतांना लोक सांख्ययोगात वर्णन केलेल्या तत्त्वज्ञानात्मक श्लोकाशी संबंध जोडून बोलतात. ''कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन'' दुसऱ्या अध्यायातील हे सुभाषितवजा वाक्य सांगत बोलत असतात. कर्मयोगावर भगवद्‌गीतेत तिसऱ्या अध्यायात भाष्य केले आहे. ते भाष्य ज्ञान आणि कर्म यांच्या तुलनात्मक विचारावर केलेले आहे. श्रीमान झुंबरलालजींनी चवथ्या अध्यायातील 'ज्ञानकर्म सन्यासयोग' संदर्भातील श्लोकावर चर्चा सुरू केली. श्लोक असा ''कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः । स बुद्धिमान्मनुष्येसु स युक्तः कृत्सकर्मकृत् ।।'' अर्थात, जो पुरुष कर्मांमध्ये अकर्म पाहील आणि अकर्मामध्ये कर्म पाहील, तो मनुष्यांमध्ये बुद्धिमान होय आणि तो योगी सर्व कर्मे करणारा आहे. त्या दिवशी माझ्या आणि त्यांच्या चर्चेच्या अक्षरशः दोन तीन फेऱ्या झाल्या, खाणेपिणे सारे मग त्यांच्या निवासस्थानीच घडले. घरातल्या लोकांना, नोकरचाकरांना काहीतरी गहन विषयावर व्यवहार चाललाय असे वाटू लागले. मला मात्र श्रीमान झुंबरलालजींच्या चिंतनशीलतेची सखोलताही जाणवली आणि कौतुकही वाटले. त्या प्रसंगापासून तर आमचा परस्पर स्नेह आणि आदरभाव विशेष वाढला.

त्या काळात अजून मी सायकल वापरत होतो. शेठजी महाविद्यालयात डोकावले की स्वाभाविकपणे प्राचार्यांच्या केबीनमध्ये जाऊन बसत. थोड्याच वेळाने मला निमंत्रण येई. तोपर्यंत त्यांचे आणि प्राचार्यांचे बोलणे झालेले असे. वेळही साधारण अकरा साडेअकरा अशी असे. मी केबीनमध्ये आलो की, पहिला प्रश्न असे, ''आटोपले का आजचे कामकाज?'' मी प्राचार्यांकडे पाहात ''हो झाले ना'' म्हणून मोकळे व्हायचो. ''काय येताय? बसुया, जरा शंका आहेत'', शेठजी म्हणत. त्यांना चर्चेची लहर आलेली असायची.



चर्चेला समानधर्मा हवा असतो. तो ते माझ्यात पाहात. मग मला सायकल महाविद्यालयातच ठेवून त्यांच्याबरोबर जावे लागे. संकोचल्यासारखे होई. पण ते ऐकत नसत. मग मला कोणाकडून तरी पुन्हा महाविद्यालयावर सोडले जाई. काहीवेळा तर, ते स्वतः मला सोडायला कॉलेजवर येत. तसे कॉलेज त्यांच्या घरापासून फार दूर नव्हते. मी, ''पायी जाईन'' असे म्हटले की त्यांना राग येई. त्यातून त्यांची स्नेहाळ नजर माझ्याविषयीचा आदरभाव सांगून जाई. ते जेव्हा स्वतःच मला सोडायला येत तेव्हा मात्र मला खूपच संकोचल्यासारखे होई. पाहाणाऱ्या लोकांच्या भुवया उंचावत.

श्रीमान झुंबरशेठजी सारडा, डॉ. श्रीराम रानडे आणि श्री. त्र्यं. वि. तथा नानासाहेब निसळ ही नगर शहरातली आणि आमच्या संस्थेतली कर्ती आणि अतिमहत्त्वाची माणसे. त्यांच्या सतत संपर्कात असलेले मला पाहून; सहकारी प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी, अर्थात त्यापैकी काहींनी मला 'संस्थेचा चमच्या' ठरवले होते. वास्तविक पाहाता या त्रिदेवांमधील प्रत्येकाशी माझा स्नेह अगदी भिन्नभिन्न प्रकारचा होता. श्रीमान झुंबरशेठजींना, ते चेअरमन असल्याने मी नोकरी संदर्भाने एकदोन वेळा काही कामे सांगून पाहिली; त्या त्यावेळी त्यांनी मला ''ते सगळं नानासाहेब पाहातात, आम्ही फक्त मम म्हणतो'' असे सांगून मला अक्षरशः थोपवले. पण कामे होताना अनुभव असा येई की या तिघांमध्ये एकवाक्यता असे. त्या तिघांनाही प्रत्येक गोष्टीचा पूर्ण तपशील ज्ञात असे. आपण वेगवेगळे भेटले तरी; त्यांच्या बोलण्या, सांगण्यात आणि कृतीत निश्चितता आणि एकवाक्यता असे. मला यातून संस्था संचालनासंदर्भात अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या.

माझी, आदिवासींच्या स्वातंत्र्य संग्रामाविषयीची 'अहिनकुल' कादंबरी त्यांनी बारकाईने वाचली होती. त्याचा उल्लेखही ते महाविद्यालयातल्या वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या निमित्ताने करीत असत. चळवळीतील या कार्यकर्त्याला या लेखनाचा नकळत अभिमान वाटत होता, हे माझ्या लक्षात आले होते.

'लोकबंध' हा लोकसाहित्यावरील सैद्धान्तिक ग्रंथ 'दास्ताने रामचंद्र आणि कंपनी' प्रकाशनाने प्रसिद्ध केला होता. प्रकाशन भूतपूर्व प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या शुभहस्ते करण्याचा मानस होता. अर्थात त्यावेळी ते पंतप्रधान नव्हते. पत्रही प्रेषित झाले होते. श्रीमान झुंबरशेठजी सारडांना एव्हढा उत्साह संचारला की त्यांनी महाविद्यालयात प्रकाशन सोहळा करण्याचे

मनसुबे सुरू केले. मात्र हे सगळे करतांना त्यांनी ‘लोकबंध’ पूर्ण आणि बारकाईने वाचून काढले याचे मला खूपच आश्चर्य वाटले. त्यांचा ज्ञानपिपासूपणा त्यातून अधोरेखित झाला होता. ते केवळ वाचून थांबले नाहीत. त्या ग्रंथातील ‘लोक’ आणि ‘लोकबंध’ या दोन्ही संकल्पना समजावून घेतल्या. भगवद्गीतेतील ‘लोक’ शब्दाचा विविधतेने झालेला उपयोग समजावून घेतांना ते विशेष रस घेऊन बोलत होते. ‘‘हा ग्रंथ खूपच आगळा वेगळा आहे’’ असे वारंवार, केवळ माझ्याजवळच नव्हे तर अनेकांजवळ नमूद केले. मा. अटलजींच्या हस्ते प्रकाशनाचा योग आला नाही, पण त्या ग्रंथाला संशोधन पुरस्कार मिळाला. ग्रंथ पदव्युत्तर वर्गांसाठी संदर्भग्रंथ म्हणून जवळपास सर्व विद्यापीठांना लागला. सेट, नेटच्या परीक्षांमध्ये त्यावर स्वतंत्र प्रश्न विचारले जाऊ लागले. याचा त्यांना विलक्षण अभिमान वाटला.

श्रीमान झुंबरशेठजी सारडांचे जिज्ञासू आणि ज्ञानपिपासू व्यक्तिमत्त्व तर मला मनापासून आवडलेच, त्याचबरोबर त्यांच्या प्रोत्साहनाने माझ्याकडून अधिकाधिक लेखन घडतच राहिले हे नक्की. एकदा तर प्राचार्य डॉ. मधुसूदन बोपर्डीकरांच्या समोर माझ्याशी बोलता बोलता ते प्राचार्यांना पटकन म्हणाले, ‘‘हा माणूस प्राचार्य व्हायला हवा.’’ त्यांच्या पश्चात २००३ मध्ये मी खरोखरीच पेमराज सारडा महाविद्यालयाचा प्राचार्य झालो. विशेष म्हणजे त्यांचेच चिरंजीव श्रीमान ब्रिजलालजी सारडा हे त्यावेळी ‘पेमराज सारडा महाविद्यालय’ आणि ‘हिंद सेवा मंडळ’ या शैक्षणिक संकुलाचे कार्याध्यक्ष म्हणून काम पाहात होते. त्यामुळे स्वाभाविकपणे त्यांच्याशी बोलतांना श्रीमान झुंबरशेठजी सारडांच्या आठवणींना उजाळा मिळायचा.

•••



# वर्षे अमृताचा घनु

## (प्रा. मधुसूदन मुळे)

नगरला येण्यापूर्वीपासून नगरमधल्या ज्या चारदोन लोकांचा नि माझा परिचय झाला होता, त्यात प्रा. मधुसूदन मुळे यांचा अग्रक्रम होता. कार्यकर्ता, संघटक, शिक्षक, मित्र आणि पाठीराखा म्हणून मी मोठ्या आदराने त्यांना अनुभवत होतो. त्यांच्या अमृतमहोत्सव प्रसंगीच्या स्मरणिकेला मी प्रस्तावना लिहावी अशी त्यांची आज्ञा मला कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीची नामी संधी चालून आली.

प्रा. मधुसूदन मुळे यांचा अमृत महोत्सव ही एक पर्वणी होती. नगरच्या सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीयही क्षेत्रातील गत पाऊणशे वर्षांचा इतिहास. प्रत्यक्षदर्शित्वाने उलगडणारं, खेळकर विचक्षण, सर्वस्पर्शी, नम्र, स्नेहल तरी बेरकी, उदार, स्वागतशील आणि वक्तृत्वसंपन्न व्यक्तिमत्त्व म्हणजे मुळेसर! समाजाच्या सर्व जातीधर्मातील, सर्व स्तरांतील, सर्व व्यवसायातील, सर्व वृत्ती-प्रवृत्तीच्या माणसांचा, स्नेहशील गोतावळा त्यांच्याशी जोडलेला आहे. एखाद्या सामान्य मध्यमवर्गीय व्यक्तीचे एवढे व्यापक गणगोत पाहून कोणीही थक्क व्हावे. प्रा. मधुसूदनांच्या सहधर्मचारिणींचा अभिप्राय या संदर्भात खूप काही सांगून जातो ‘ह्यांच्या बरोबर गाडीवर जाताना; ह्यांचा एक हात, कोणाला तरी अभिवादन करतांना किंवा अभिवादन स्वीकारतांना सतत वरच असायचा.’ मधुसूदनजींचे भतिजे शेखसाहेब, म्हणतात, ‘आज हमारे परिवार के सभी बुजुर्ग सदस्य नही रहे. हमारी जिम्मेदारीया बढ गयी है लेकीन पोपटचाचाके (मधुसूदनजी) रहते हुवे हमे कभीभी हमारे बुजुर्गोंकी कमी महसुस नही होती.’ या दोन्ही अभिप्रायांतून मधुसूदनजींची घनव्यापकता सहज

अनुभूत होते. म्हणूनच मधुसूदनजींचा अमृतमहोत्सव हा नगरच्या दृष्टीने महत्त्वाचा आत्मचिंतन आनंदसोहळा होता.

भारतीय परंपरेत अमृतमहोत्सव सोहळा हा संन्यासाश्रम प्रवेश सोहळा मानला जातो. प्राचीन सारणीतील आश्रमव्यवस्थेला, वर्तमानात नवे आयाम प्राप्त आहेत. संन्यास याचा अर्थ उन्मन अवस्थेसह घडणारे नियमनात्मक सिद्ध वर्तन; असे मान्य केले तर; आजच्या गतिमान, विज्ञाननिष्ठ, प्रगमनशील वैश्विक युवा जीवनाला; सनातन सांस्कृतिक सामाजिक जीवन-संदर्भांसह मूल्य दर्शन करण्याचे कार्य, अमृतमहोत्सवी वाटचाल करणाऱ्या मधुसूदनजींसारख्या प्रगल्भ व्यक्ती करू शकतात. बदलत्या सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय पर्यावरणामध्ये अशा मूल्यदर्शनाची नितांत आवश्यकता आहे.

मधुसूदनजी, जणू शिक्षक म्हणून जन्माला आले, सार्वत्रिक जीवनात शिक्षक म्हणूनच ते वावरतात. आपल्या भोवती असलेले सर्व विद्यार्थीच आहेत अशी त्यांची धारणा स्वाभाविकपणे प्रकटते. शिक्षक म्हणून लोकमान्यतेच्या सर्व कसोट्या आणि सन्मान त्यांना प्राप्त आहेत. म्हणूनच त्यांचे एक विद्यार्थी डॉ. अनिल खिंवसरा म्हणतात, 'एक आगळं वेगळं व्यक्तिमत्त्व, एक आधारवड, एक दीपस्तंभ म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून माझे लाडके - प्रा. मधुसूदन मुळे सर... माणसातलं माणूसपण जपणारे कर्मयोगी म्हणजेच प्रा. मधुसूदन उर्फ पोपटराव मुळेसर!' त्यांच्या संदर्भात ते पुढे सूत्रबद्ध काव्यात्मकतेने म्हणतात, 'रास्ते पर तो सभी चलते हैं । जो रास्ता बनाये वही इन्सान है ।' नेमक्या शब्दात केलेलं हे वर्णन, शिक्षक मधुसूदनजींचा यथोचित सन्मान करणारं आहे.

प्रा. मधुसूदनजींचा अमृतमहोत्सव ही पर्वणी त्यांच्या गणगोतातील माझ्यासह सर्वांनाच मोठ्या आनंदाची, तेवढ्याच संस्मरणीय अमृतकण वेचण्यासाठीची पर्वणी वाटली. ही स्वाभाविक गोष्ट असते. एवढ्या व्यापक गोतावळ्यातील प्रातिनिधिक नोंदी सर्वांपर्यंत, त्यांच्याच भावना म्हणून पोहोचविण्याला पर्याय नसतो. संयोजकांनी तोच मार्ग स्वीकारणे सर्वस्वी श्रेयस्कर असते. या नोंदीमध्ये आपण, आपल्या शिष्योत्तमांचे भरभरून तरी वास्तव गुणवर्णन करणाऱ्या प्रा.डॉ. मुहम्मद आझम या ख्यातकीर्त सुफीतत्त्वज्ञ ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्वाबरोबरच; शिक्षक, मार्गदर्शक, साहित्यिक, समीक्षक आणि साक्षेपी संपादक प्रा.डॉ. सु. प्र. कुलकर्णी यांना भेटतो. डॉ. सु. प्र.नी सहकारी मित्र म्हणून सांगितलेल्या आठवणींनी प्रा. मधुसूदनजींच्या अनेकविध पैलूंना सलाम



करतो. मित्रपरिवारातील श्रीगोपालजी धूत यांच्या स्मरणगाथेतून संस्थात्मक व्यक्तिमत्त्वाचा परिचय घडतो. प्रा. मुथा दिशादर्शक मित्राचा सहवास वर्णितात, तर प्राचार्य डॉ. मधुसूदन बोपर्डीकर 'संस्थामयोऽयं पुरुषः ।' असे मधुसूदनाचे नगरच्या परिक्षेत्रातील सांस्कृतिक व्यक्तिमत्त्व आपल्या समोर उभे करतात. आज प्रौढ कर्ते नागरिक म्हणून वावरणारे त्यांचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, मित्र सौ. शांभवी जोशी, डॉ. अनिल खिंवसरा, श्री. मिलिंद चवंडके, प्रा.डॉ. विमल कवडे, वसुधा गंधे-देशपांडे, रविराज गंधे, श्रीमती पुष्पा चितांबर आदींनी आपल्या प्रौढपणाबरोबरच मोठ्या लडिवाळपणाने सरांच्या आठवणी सांगून सरांच्या सरपणाचा गौरव केला आहे.

नगरच्या संस्थात्मक जीवनातील प्रा. मधुसूदनजींचे मित्र म्हणविणारे प्रा. मोहन कामत आणि प्रा.डॉ. प्रभाकर प्रताप यांनी संस्थात्मक जीवनातील सरांच्या कार्याचा गौरव केला आहे. नगरमधील प्रभावी आणि गत पन्नास वर्षे सामाजिक, राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या मा. रामनाथजी वाघ यांनी हिंदी साहित्यिक कमलेश्वरांनी केलेली, 'जो मित्रकी उत्कर्षता कर सकता है वो ही सच्चा मित्र होता है' ही मित्राची व्याख्या सांगून मधुसूदन अर्थात पोपटराव यांचा मित्र म्हणून वास्तव परिचय घडवला आहे.

या प्रियजनांच्या स्मरणात प्रा. मधुसूदन मुळे यांचे नाट्यक्षेत्रातील कार्य विशेष स्मरणीय स्वरूपात उल्लेखित आहे. नगर येथे झालेल्या अखिल भारतीय नाट्यसंमेलन प्रसंगीचा ज्येष्ठ कार्यकर्ता, कार्याध्यक्ष म्हणून सरांचे कार्य सर्वांच्या स्मरणात तर आहेच, परंतु त्यांच्या बरोबर प्रत्यक्ष नाट्यप्रयोगात काम केलेले नाट्यप्रयोग संरचना आणि सादरीकरण करण्यात सहभागी झालेले त्यांचे मित्र मोठ्या अहमहमिकेने अनेक रंजक, वेधक प्रसंग सांगतात; तेव्हा सरांच्या नाट्यसेवेचा आवाका किती मोठा होता हे लक्षात येते.

राजकीय वर्तुळातील विशेषतः राष्ट्रीय पक्षांतील सरांच्या सहभागाविषयी स्व. राजाभाऊ झरकर, प्रा. फरांदे आदि दिग्गजांनी त्यांचा गौरव मोठ्या गांभीर्याने केल्याचे मी अनुभवले आहे.

मी स्वतः प्रा. मधुसूदन मुळे यांना हिंद सेवा मंडळातील सहकारी शिक्षक म्हणून अनुभवत आलो आहे. 'हिंद सेवा मंडळ' म्हणजे प्रा. मधुसूदनजींचे जीवन, त्यांनी 'हिंद सेवक' या स्मरण ग्रंथात आपला हिंद सेवा मंडळातील सेवाकार्याचा आणि संस्था इतिहासाचा पट उलगडला आहे. एक सामान्य

शिक्षकापासून, मंडळाचा खंदा कार्यकर्ता, विद्यार्थी आणि सहकाऱ्यांचा कैवारी मित्र आणि कुशल प्रशासक म्हणून सर्व जबाबदाऱ्या मोठ्या तळमळीने निभावल्याचे प्रदर्शित केले आहे.

अमोघ वक्तृत्व, तेही मराठी आणि हिंदी दोन्ही भाषांत ही खरोखरीच मुळेसरांना लाभलेली दैवी देणगी होय. त्याचा उपयोग राजकीय पक्षांनी, विविध सामाजिक संस्थांनी, जेवढ्या प्रमाणात कौशल्याने करून घेणे अपेक्षित होते, तेवढा करून घेणे झाले नाही; ही खंत आहे. त्यांच्या वक्तृत्वाचा दरारा अनेकांनी अनुभवला आहे.

समारंभ व्यवस्थापन कार्यात प्रा. मधुसूदन मुळे यांची उपस्थिती नेहमीच मुख्य व्यवस्थापक, संचालक अशी सर्वांनाच अनुभवास आली आहे. समारंभ सुयोग्य, भव्य आणि निर्विघ्नपणे आणि प्रभावीपणे पार पडावा, या विषयीची त्यांची तळमळ त्यांच्या हालचालीतून सर्वांना जाणवते.

एखाद्या समाजाभिमुख व्यक्तीचे जीवन व्यक्तिगत, कौटुंबिक असं मर्यादित राहात नाही; ते सार्वजनिक स्वरूपातच प्रकटतं हे खरं, परंतु त्यातही सामान्य कौटुंबिक जिव्हाळा जपत, स्वतःचं कुटुंब सांभाळणं हे यशस्वी पुरुषार्थपूर्ण आहे. प्रा. मधुसूदन मुळे यांनी आपलं हे कौटुंबिक जीवन व्यापक तरी कुटुंबमर्यादापूर्णतेने सांभाळलं आहे. त्यांच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने त्यांच्या कौटुंबिक परिवारातील प्रियजनांच्या भावना या संदर्भात खूपच बोलक्या आहेत. 'अडक्यांचे जावई' मधील संस्मरणीय असे हळुवार प्रसंग, हा कौटुंबिक जिव्हाळी श्रीमंतीने उभे करणारे आहेत. त्यांच्या लेकी, सुना, मुलं, जावई यांनी व्यक्त केलेल्या भावनाही अशाच आहेत.

वैश्विक जीवनाचा, राष्ट्रीय परिप्रेक्षाचा, प्रादेशिकतेचा विचार करतांनाच, ज्ञाती या व्यवस्थेचा विचार करण्याची सामाजिक बांधिलकी ब्राह्मण्यग्रस्ततेने नव्हे; तर वैश्विक उदारतेसह सरांनी जपली. श्री. नंदू जोशी यांनी व्यक्त केलेल्या भावनांतूनच आणि श्री. सुनीलजींनी मांडलेल्या अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वाटचालीचा पट यातून प्रा. मधुसूदन मुळे यांच्या ज्ञाती संघटनेविषयीच्या भावना आणि त्यांचे संघटन कौशल्य दोन्ही प्रकट होते.

या सर्व उल्लेखांपलिकडे जावून प्रा. मधुसूदनजींनी यानिमित्ताने अत्यंत भावगभीरतेने, जिव्हाळ्याने, आत्मियतेने प्रकट केलेले आपल्या जीवनातील भावप्रसंग कधी उत्तुंग मानव्याचे दर्शन घडविणारे, तर कधी मानवतेचा गहिवर



दाटून आणणारे, कधी अष्टसात्विकभाव उचंबळविणारे, कधी प्रेमपान्हा घालणारे, कधी सहकार्याचा, सामंजस्याचा, स्नेहपूर्णतेचा हात पुढे करणारे, वात्सल्याच्या अमृतात सचैलस्नान करणारे आणि लौकिक व्यवहारातही मानव्याचा शोध घेत फुले वेचित जाणारे प्रसंग अतिशय समर्थ प्रसादशैलीतून, नाट्यपूर्णतेने तरी संयतशील वृत्तीने आणि कृतज्ञ भावनेने शब्दबद्ध केले आहेत. साहित्याच्या जीवनभराच्या साधनेतून, आचार्यपदाच्या तपश्चर्येतून, सांस्कृतिक कार्याच्या सनातन संस्कारातून हे सारे प्रसंग मनाच्या गाभाऱ्यातून जिव्हाळ्यासह विश्वाच्या गाभाऱ्यात; अमृतमहोत्सव सोहळ्याच्या निमित्ताने आपली सहचारिणी सौ. प्रेमा यांच्यासह अमृतमय वाटचालीला सुरुवात करतांना; पृथ्वीला अमृतवर्षावाने नवचैतन्य देणाऱ्या अमृतघनाप्रमाणे, आपल्या जीवनातील अमृत कहाण्यांचा वर्षाव सर करतात नव्या जीवनाला सनातनाचे सौंदर्य बहाल करण्यासाठी! या अमृतमहोत्सव सोहळ्याचे प्रयोजनही हेच आहे.

प्रा. मधुसूदन मुळे यांचे जीवन हे गत पंचाहत्तर वर्षांतील ग्रामीण आणि शहरी भागातील सर्वच मध्यमवर्गीय दरिद्री कुटुंबातून पुढे सरसावण्याची धडपड करणाऱ्या क्रियावान माणसांसारखेच आहे. या अवस्थांतरात कर्म ज्ञानवानतेने प्रकटवित समग्र मानवी समाजाला कवेत घेत, आपल्यातील दोषांवर, अपप्रवृत्तींवर, असमजावर, रूढीग्रस्ततेवर मात करीत पुढे जाण्याचा पुरुषार्थ करणारी जी जगावेगळी तरी जगाची माणसे असतात, तसा जिव्हाळा उरात घेऊन विश्वातच विश्वंभर पाहणारा मधुसूदन हा आगळा माणूस आहे. म्हणूनच त्यांच्या मार्गदर्शनाच्या अमृतधारा नव्या जीवनाला मिळाव्यात. याकरिता नातवंडांच्या ताटव्यात हरखून रमून जात, हळूवारपणे त्यांच्या कानात मानव्याचा मंत्र सांगून, डोळ्यात मानव्याचे रंग पाहणाऱ्या मधुसूदनाला आणि त्यांच्या सौभाग्यवती प्रेमाताईंना आमच्या समग्र परिवाराच्या हार्दिक शुभेच्छा!

हार्दिक शुभेच्छा, असे म्हणतांना नकळत औपचारिकता पसार झाली. स्मरणिकेतील सहभागी सुहृदांनी अनुभवलेले अनुभव माझेच अनुभव आहेत असे सारखे संवेदित होत गेले. मी नगरमध्ये आल्यापासून; माझ्या नगरमध्ये येण्यात, असण्यात, साहित्यिक उपक्रमात, माझ्या प्राचार्यपदी विराजमान होण्यात, मला अनेकानेक पुरस्कारांनी गौरवित होतांना, माझ्या सुखदुःखात सतत, प्रा. मधुसूदन मुळे यांनी कासविच्या स्नेहाळ नजरेने माझी पाठराखण केली आहे. म्हणूनच या अमृत घनाला तेव्हढ्याच संवेद्यतेने विनम्र अभिवादन! ●●●

# मार्गात भेटले सहज मित्र

## (प्रा.डॉ. यु. म. पठाण सर)

गुरुवर्य डॉ. यु. म. पठाण यांचा आणि माझा परिचय केंव्हा आणि कसा झाला; हे स्मरत नाही; एव्हढा घनिष्ट परिचय आमचा झाला! मला वेगवेगळ्या निमित्ताने बोलवून घेत. अनेक विषयांवर, अर्थात वाङ्मय आणि संशोधक, प्राध्यापक यांच्याविषयी विशेष गप्पा होत. औरंगाबादहून पुण्याकडे जातांना सरांनी नगरमध्ये माझ्याकडे आवर्जून यावं. निमित्ताने आणि आठवण आली की फोन करावा आणि खळखळून हसवावं, हसावं. गंभीर विषयांवर संशोधन करणारा आणि विशेषतः संतवाङ्मयावर चर्चा करणारा हा माणूस; तेव्हढाच खेळकर आणि अबालवृद्धात समावेशक असा आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, जागतिक संत साहित्य संमेलन, यांसह कितीतरी साहित्य संमेलनातील त्यांचा अध्यक्ष म्हणून सहभाग लक्षणीय ठरला आहे. भागवत, सुफी आणि मुस्लिम मराठी संत यांविषयी जसा त्यांचा गाढा व्यासंग आणि विपुल लेखन; तसेच महानुभावांविषयीही त्यांचे लेखन आणि संशोधन सुरूच आहे. वर्तमानपत्रातून तर त्यांचे अखंड लेखन वयाच्या नव्वदीतही सुरूच आहे.

अगदी दोन वर्षांपूर्वीची गोष्ट. श्रीगोंद्याच्या संत शेखमहंमद महाराज उत्सव ट्रस्ट कमिटीचे लोक माझ्याकडे आले. मी त्यांच्यासाठी 'सार्थ योगसंग्राम' असा ग्रंथ तयार करून दिलेला असल्यामुळे; त्यांना तसे काही करायचे असले की ते माझ्याकडे येत. त्या मंडळींनी संत शेखमहंमद महाराजांच्या अभंगावरील निरुपणात्मक म्हणावे, असे डॉ. यु. म. पठाण यांनी लिहिलेले सदर वाचलेले



होते. ट्रस्ट मंडळी मला म्हणाली, ''डॉ. यु. म. पठाण साहेबांना विचारून आपण त्या अभंगाचं पुस्तक करू या का?'' ''वा! चांगली कल्पना आहे.'' मी दुजोरा देताच त्या मंडळींना उत्साह आला. ''मग कसं करायचं?'' लोखंडे सर, आव्हाड आणि मोटे पाटलांनी पृच्छा केली. ''थांबा'' मी म्हणालो आणि लगेचच पठाण सरांना फोन लावला. नेहमीप्रमाणे दिलखुलासपणे बोलणे सुरू झाले. घरातल्यांची चौकशी केली. मग जरा त्यांना थांबवत मी म्हणालो, ''सर ही श्रीगोंद्याची मंडळी आली आहेत. त्यांना आपण शेखमहंमदांच्या अभंगावर जे लेखनसदर करता आहात; त्याचे पुस्तक करायचे आहे.'' ''अरे वा, चांगली गोष्ट आहे, पण माझे शेसव्वाशेच अभंग झाले आहेत. जवळपास साडेतीनशे अभंग आहेत. ते सर्वच व्हावेत असे वाटते. पण... आता जरा होत नाही आणि तातडीने होणे शक्य दिसत नाही.'' सर म्हणाले. थोडा नकारात्मक सूर दिसला. मी जरा आग्रहाने म्हणालो, ''सर, मी त्यांना आपल्यावतीने खात्रीच देऊन टाकलीये. त्यांचे तर म्हणणे आहे की शेखमहंमदांचे सर्वच वाङ्मय पुन्हा प्रसिद्ध करावे.'' ''ही तर गोष्ट फारच चांगली आहे'' सर म्हणाले. मी म्हणालो, ''सर श्री. भीमा मोदळे माझ्याकडे पीएच.डी. करीत होते, तेव्हा आष्टीच्या प्रा. हंबरड्यांकडून मिळालेल्या माहितीवरून मी त्यांना आपणाकडे पाठविले होते. आपल्या विद्यापीठाच्या डिपार्टमेंटच्या लायब्ररीत ते बाड दिल्याचे कळाले होते.'' मी पुढे म्हणालो.

''बा. सी. बेंद्रे यांनी संपादित केलेल्या साहित्याव्यतिरिक्त साठीसंवत्सर हा ग्रंथ वेगळा मिळाल्याचे आपण म्हणालात. तो कोणी नेलाय हे आपणास स्मरत नव्हते. आपण दोन नावे सांगितलीत. आम्ही तो ग्रंथ डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्याकडून मिळवलाय. डॉ. भीमा मोदळे यांच्या प्रबंधात त्याची फोटोकॉपी टाकलीये. तर, मला वाटतं आम्ही आपल्याला समक्ष भेटायला येतो. मग नेमकं कसं काय करायचं, ते ठरवूया.'' ''मग हरकत नाही'' सर म्हणाले. ''फोन करून आम्ही येतो. आपल्याकडचे बाड तर आपण काढून ठेवा'' मी सुचविले. झाले, ठरले. मोटे पाटील म्हणाले, ''पुढच्याच आठवड्यात आम्ही त्यांची अपॉईंटमेंट घेतो, आपण याल ना?'' ''हो हो'' मी होकार भरला.

श्रीरंग लोखंडे सरांनी पठाण सरांची अपॉईंटमेंट घेतली. आम्ही गेलो. सरांनी त्यांच्याजवळ असलेलं बा. सी. बेंद्रे संपादित पुस्तक, अन्य काही

कागदपत्र आणि त्यांनी लिहिलेल्या अभंग सदराच्या कात्रणांची फाईल काढून ठेवली होती. चर्चा सुरू झाली. ''सर आपण असं करूया, आपण जेव्हढ्या अभंगावर निरुपणवजा अर्थलेखन केले आहे ते अभंग आणि उरलेले अभंग मी सार्थ करतो. त्याचं एक पुस्तक करूया आणि उरलेलं सर्व साहित्य आपण पुनर्मुद्रित करून; एकत्रित छापूया. त्याला आपण प्रस्तावना लिहा. अशी दोन पुस्तके होतील. चालेल?'' मी प्रस्ताव ठेवला. ''अरे, सहस्रबुद्धे, तू म्हणतोसना; कर काय करायचंय ते'' सर म्हणाले. लोखंडे सरांना उत्साह आला. ''सर मी हे सगळं बरोबर घेऊन जातो'' मी म्हणालो. सरांनी अभंग-सदराच्या झेरॉक्सची फाईल दिली. ''मी प्रस्तावना लिहितो, तोपर्यंत'' सर म्हणाले. सर्वांनी सरांचं दर्शन घेतलं. निघालो. प्रवासात बाकी सगळे ठरले. उत्सवात प्रकाशन करण्याच्या दृष्टीने काम करायचे ठरले. आणलेली फाईल आणि अन्य साहित्य टायपिंगला दिलं आणि मी उर्वरित अभंगाचा, सार्थ अभंगगाथा करायला सुरुवात केली. 'संत शेखमहंमद कृत सार्थ अभंगावली' आणि 'संत शेखमहंमदांची कविता' अशी दोन पुस्तके झाली. 'अभंगावली' डॉ. यु. म. पठाण आणि मी (डॉ. अनिल सहस्रबुद्धे) असं संयुक्त पुस्तक आणि दुसरं डॉ. यु. म. पठाण सर संपादित अशी दोन पुस्तके. उत्सवात प्रकाशन करताना मात्र पठाण सर येऊ शकले नाहीत. थोडे आजारी होते. पुन्हा आम्ही सगळे सरांना भेटायला गेलो. सरांना पुस्तके सादर केली. त्यांचे मानधन दिले. सर भारावले. म्हणाले, ''सहस्रबुद्धे, सेवानिवृत्तीनंतरही एव्हढी धडपड करून; महत्त्वाचे वाङ्मय उजेडात आणण्याचे काम करणारे; किती प्राध्यापक असतील? अपवादात्मक, तुमच्यासारखा, एखादा!'' सर गलबलले. आम्हाला सगळ्यांनाच भरून आलं. मी म्हणालो, ''सर, तरुण प्राध्यापक आपल्याला पाहाताहेत त्यातूनही नवे लोक पुढे येतीलच.'' ''तुम्ही सकारात्मक विचार करता, चांगलंय.'' आम्ही परतलो. प्रवासात बोलत होतो. मी म्हणालो, ''अहो, सरांचा जेव्हा जेव्हा फोन येतो तेव्हा तेव्हा ते सौंशी बोलल्याशिवाय राहात नाहीत. मला त्या सांभाळतात याचेच त्यांना कौतुक अधिक असतं.''

वर्षा पटारे-तोडमल यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली 'स्वामी विज्ञानानंद' यांच्या व्यक्तिमत्त्व आणि वाङ्मय' या विषयावर पीएच.डी.साठी प्रबंध सिद्ध केला होता. या प्रबंधाला बह्यस्थ परीक्षक म्हणून डॉ. यु. म. पठाण यांची नियुक्ती झाली होती. मला मनापासून आनंद वाटला. पुणे विद्यापीठात मौखिक परीक्षेचे आयोजन होते. त्यानिमित्ताने डॉ. यु. म. पठाण सरांचा प्रवास होणार होता. ते वर्ष पठाण सरांचं अमृतमहोत्सवी वर्ष होतं. पठाण सरांची सासुरवाडी अहमदनगरची. मी विचार केला पठाण सरांच्या अमृतमहोत्सवाचं आयोजन अहमदनगरमध्ये करावं. मी कल्पना सरांपुढे मांडली. ते जरा संकोचले. पण भाभींना कल्पना आवडली. कार्यक्रमाला भाभी येतील की नाही; याविषयी साशंक होतोच. परंतु त्याचा विचार न करता करायचं ठरवलं. पद्मश्री डॉ. यु. म. पठाण, अहमदनगरचे जामात, त्यातही भागवत, महानुभाव, सुफी आदि सर्व संप्रदायांच्या संतवाङ्मयाचे व्यासंगी संशोधक, अभ्यासक, अ.भा.म.सा. संमेलनाचे अध्यक्ष, उत्तम वक्ते इ.इ.इ. अशा सुप्रसिद्ध व्यक्तिमत्त्वाचा अमृतमहोत्सव कोणत्या व्यासपीठावर, कोणत्या सांस्कृतिक पार्श्वभूमीवर करावा; असा प्रश्न मनात होता. विद्यार्थी आणि मी विचारार्थ बसलो. एकदम मनात आले 'नगर जिल्हा वाचनालय!' हो, जिल्हा वाचनालय म्हणजे सर्वात जुने, सव्वाशे वर्षांपेक्षा जास्त परंपरा असलेले वाचनालय. त्यांना यात सहभागी करून घ्यावे. गेलो. भेटलो. जिल्हा वाचनालयात आमचे प्रा.डॉ. देवदत्त रानडे, प्रा. एम. डी. कुलकर्णी, कविवर्य चंद्रकांत पालवे व्यवस्थापकीय मंडळात होते. त्यांना माझी कल्पना आवडली. नगर जिल्हा वाचनालय विद्यार्थी व साहित्यिक मित्रमंडळींच्या विद्यमाने कार्यक्रमाची आखणी झाली.

भव्य कार्यक्रमांत सरांचे प्रियजन, साहित्यिक, विद्यार्थी, वाचनालयाचे कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरांचा भव्य सत्कार झाला. मुख्य सत्कार समारंभाबरोबरच उत्स्फूर्त नागरी सत्काराने सर भारावले. मनोगत व्यक्त करतांना गहिवरले. आनंदोत्सव पाहून हरखून गेले. ''माझ्या आयुष्यातला हा माझा सर्वात मोठा सन्मान मानतो. एव्हढ्या निर्व्याज प्रेमाने आजवर माझा गौरव झाला नव्हता'' सर म्हणाले. प्रेक्षागृह भारावले.

सरांच्या या प्रवासाचा मी चांगलाच उपयोग करून घ्यायचे ठरवले होते. पेमराज सारडा महाविद्यालयात सदिच्छा भेट आणि ग्रंथालयात संतवाङ्मय दालनाचे उद्घाटन, त्याच दिवशी करविले. डॉ. सुभाष शेकडे हे आमचे लाडके विद्यार्थी. त्यांच्या कुंजविहारींच्यावरील प्रबंधावर आधारित दोन पुस्तके तयार होती. त्या पुस्तकांचा भव्य प्रकाशन सोहळा पाथर्डीत आयोजित केला होता. अशा विविध कार्यक्रमांच्या आयोजनाने सरांचा तीनचार दिवसांचा सुखद सहवास तर लाभलाच; त्याचबरोबर साहित्य आणि संस्कृतीविश्वाचा

सन्मानही झाला.

दोन हजार सात साली माझा षष्ट्यब्दीपूर्ती समारंभ आमच्या विद्यार्थ्यांनी करायचा ठरविला. विद्यार्थी मार्गदर्शनासाठी काही खास साहित्यिकांना भेटणार होते व निमंत्रणही करणार होते. ते निमंत्रित करण्यासाठी गेले. डॉ. आनंद यादव, डॉ. गं. ना. जोगळेकर, डॉ. ह. कि. तोडमल, डॉ. प्रभाकर मांडे आणि डॉ. यु. म. पठाणांना त्यांनी निमंत्रित करायचे ठरविले होते. ''माझ्या एकट्याचा गौरव होऊ नये, माझ्यापेक्षा वडील आणि मला समवयस्क अशा जास्तीत जास्त साहित्यिक, संशोधक, मराठीचे प्राध्यापक यांचा गौरव व्हावा'' विद्यार्थ्यांना कल्पना आवडली. त्यात डॉ. यु. म. पठाण सरांचे अर्थात सर्वात वडील व्यक्तीचे मार्गदर्शन घ्यायचे ठरवले. त्यांनी, 'ग्रंथतुला' करावी असे मार्गदर्शन केले. नियोजन झाले. निमंत्रित मान्यवरांची यादी काढली. डॉ. यु. म. पठाणांनी मोठ्या वत्सलभावाने मार्गदर्शन केले. ग्रंथतुलेसाठी आणलेले ग्रंथ देऊन सर्वांचे सत्कार झाले. सर मनोगतात म्हणाले, ''प्राचार्य डॉ. सहस्रबुद्धे ही कोणी व्यक्ती नाहीच. ते नगरचं चालतं बोलतं विद्यापीठ आहे.'' मला यापेक्षा कोणता गौरव हवा होता?

आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टच्या विद्यमाने 'अभंगपौर्णिमा' असा; संतवाङ्मयाच्या अभ्यासाला 'प्रयोगसिद्ध वाङ्मयकला' या दृष्टीने, अभ्यास करण्याची दिशा देणारा, प्रकल्प मी राबवला होता. या प्रकल्पांतर्गत संतवाङ्मयाचे एकूण पंधरा भाग करण्यात आले होते. ह.भ.प. अशोकानंद महाराज यांच्यावर कीर्तन आणि प्रवचनाच्या बाजात सादरीकरणाची जबाबदारी होती. मी आधुनिक समीक्षा पद्धतीप्रमाणे त्याच अभंगांची समीक्षा लिहित होतो. डॉ. मच्छिंद्र मालुंजकर यांना संपादन दिले होते. दास्ताने रामचंद्र आणि कंपनी यांनी त्या प्रकल्पाला ग्रंथरूप दिले. या प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा सांप्रदायिक आणि विद्यापीठीय पठडीतील अभ्यासक यांच्या मेळ्यात आणि दिंडीयात्रेच्या वातावरणात करण्याचा निर्णय घेतला होता. भव्य स्वरूपात होणाऱ्या या कार्यक्रमाची स्वागत समिती तयार केली. हमाल पंचायतीचे अध्यक्ष शंकरराव घुले पाटील हे या समितीचे अध्यक्ष होते तर नगर जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष सीताराम पाटील गायकर हे या समितीचे उपाध्यक्ष होते. हमाल पंचायतीत प्रतिवर्षी निवृत्तीनाथांची पालखी मुक्कामाला असते अशी पार्श्वभूमी होती. जेवणावळ, महाप्रसाद तेथेच आयोजित केला होता. डॉ. सदानंद मोरे, महामंडलेश्वर डॉ. रामकृष्णदास लहवितकर महाराज, नारदीय कीर्तनकार श्री. रंगनाथ धर्माधिकारी यांसह डॉ. यु. म. पठाण यांना खास निमंत्रित केले होते. डॉ. र. बा. मंचरकर, डॉ. देविप्रसाद खरवंडीकर, डॉ. सु. प्र. कुलकर्णी, डॉ. म. ना. बोपर्डीकर, डॉ. श्रीकांत केळकर अशी अनेक अभ्यासक मंडळी आणि जवळपास पन्नासावर भागवत सांप्रदायिक महाराज उपस्थित होते. शाळा, महाविद्यालये, गावोगावची भजनीमंडळे यांनी दिंड्या आणल्या होत्या. नगर शहर दिंड्यांनी दुमदुमून गेले होते. अभ्यासकांनी दिंड्यांचे ठिकाणी विविध संस्थांच्यावतीने स्वागत केले. याप्रसंगी पद्मश्री डॉ. यु. म. पठाण आनंदाने आनंदाश्रु ढाळीत होते. ''आपण सर्वांनी पुन्हा आषाढी वारीचा प्रयोग येथे मांडला. विद्यापीठीय स्तरावर बुकीश पद्धतीने संतवाङ्मयाचा अभ्यास करता येणार नाही. अभ्यासात लोकसंवेदनेसह अनुभूतींची चिकित्सा व्हायला हवी. यादृष्टीने हा मानव्यशास्त्रीय प्रयोग ऐतिहासिकच म्हणावा लागेल. अभंगपौर्णिमेच्या निमित्ताने संतवाङ्मयाच्या अभ्यासाला नवे आयाम लाभले. सर्व विद्यापीठांनी याचा स्वीकार अध्यापन आणि चिकित्सेत केला पाहिजे.'' सर भाषण करीत होते.

डॉ. यु. म. पठाणांचे भाषण सभागृह लक्षपूर्वक ऐकत होते. खरोखरीच अभंगपौर्णिमेचा स्वीकार सर्व विद्यापीठात झाला. या सर्व गोष्टींपेक्षा मला पठाण सरांचे कौतुक तेव्हां वाटले, जेव्हा ते सर्वांबरोबर, हमालपंचायतीत पंगतीला बसले आणि घोषणांच्या गजरातही सामील झाले. पठाण सर संतवाङ्मयात असे समरस झाले होते. ज्ञानाचे स्वागत जाती, धर्म, पंथ यांच्यापलिकडे जाऊन आत्मभावाने करायचे असते; हे जणू पठाण सर आपल्या प्रत्यक्ष वर्तनातून सर्वांना प्रबोधित करीत होते.

'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' असा एक नाविन्यपूर्ण वैचारिक व्यूह मी मांडला. महाराष्ट्रातल्या निवडक विचारवंत अभ्यासक विद्वानांसमोर तो मांडावा असे ठरविले. स्वाभाविकपणे पठाण सरांना तो ग्रंथ दिला. तो वाचून ते अक्षरशः थक्क झाले. त्यांनी मनमोकळेपणाने लिहिले ''अध्यात्म विचारमांडणीला नवे आयाम मिळाले''. मी हेतुपूर्वकच तीन मुस्लिम, दोन तत्त्वज्ञ, दोन ख्रिश्चन, दोन भागवत सांप्रदायिक, लोकसाहित्य विशारद, परिवर्तनवादी विचारवंत, आदिवासी, शास्त्रअभ्यासक, मनोवैज्ञानिक आणि पत्रकार अशा क्षेत्रातील लोकांची निवड केली होती. सर्वांच्या शंका, आक्षेप आणि सकारात्मक

अभिप्राय यांसह म्हणजेच लिखित परिसंवाद स्वरूपात व त्यावरील माझे म्हणणे मांडून ग्रंथ सिद्ध केला.

डॉ. यु. म. पठाण यांचा आशीर्वाद असा सतत मिळत गेला. एकदा तर ते सहज म्हणून जाता जाता माझ्या घरी नगरला थांबले होते. त्याच सुमारास सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. सदानंद भणगे आणि विनोदी साहित्यिक श्री. संजय कळमकर यांना कुठलेसे पुरस्कार मिळाले होते. आनंदोत्सव या माझ्या संस्थेमार्फत त्यांचे कौतुक व्हावे असे वाटत होते. चांगली संधी चालून आली होती. दोघांना बोलावले. डॉ. यु. म. पठाण सरांच्या हस्ते या दोहोंचे सत्कार केले. मी संधी साधली. दोघांनाही धन्य वाटले. सरांशी सतत संपर्क, गप्पा सुरूच आहेत. आजही!

•••



# संयतशील, समावेशक, स्वागतशील पुरोगामी प्राध्यापक

## (डॉ. नागनाथ कोत्तापल्ले)

'स्फूर्ती प्रकाशन मंच'च्यावतीने मी सामुदायिक ग्रंथनिर्मिती आणि प्रकाशन अशा स्वरूपात ग्रंथयाग आयोजित केला होता. स्नेही डॉ. पंडितराव पवारांचा आणि डॉ. कोत्तापल्ल्यांचा घनिष्ठ स्नेह. डॉ. पवारांनी प्रकाशन समारंभासाठी समीक्षक आणि विद्यार्थीप्रिय, पुरोगामी विचारक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांना निमंत्रित केले. प्रकाशन समारंभात आणि नंतर बैठकीत चर्चा करतांना; त्यांची विचार करण्याची आणि विचार मांडण्याची तर्कपद्धती मला भावली. माझा त्यांचा परिचय असा या समारंभाच्या निमित्ताने आला. त्यावेळी डॉ. नागनाथ कोत्तापल्ले औरंगाबादला प्राध्यापक होते.

सर, पुण्यात विद्यापीठात आले. आमचे संबंध वाढतच गेले. मराठी विभागप्रमुख म्हणून डॉ. कोत्तापल्ले कार्यरत होते. नेमके मार्गदर्शन आणि आपुलकीसह समुपदेशन या त्यांच्यातील गुणांचा परिचय घडत गेला. 'शेख महंमद यांचे वाङ्मय' असा अभ्यासविषय निवडून माझे विद्यार्थी भीमा मोदळे अभ्यास करीत होते. धुंडाळूनही आणि औरंगाबादच्या विद्यापीठात, डॉ. यु. म. पठाण सर यांच्याकडे शोध घेऊनही; षटचक्र साठीसंवत्सर हे शेखमहंमदांचे बाड मिळत नव्हते. आम्ही त्याची, त्याचप्रकारे नोंद करून; प्रबंध पूर्ण केला. विद्यापीठात सबमिट करण्यापूर्वी डॉ. कोत्तापल्ले यांना भेटायला विभागात त्यांच्या केबीनमध्ये गेलो. इकडच्या-तिकडच्या गप्पा झाल्या. मी सहज

म्हणालो, ''शेखमहंमदांचा 'साठीसंवत्सर' काही मिळाला नाही. जामखेडच्या प्रा. हंबर्ड्यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही औरंगाबादला सगळीकडे चौकशी केली. विद्यापीठातील बाडातून तो कुठे गेला कळत नाही.'' डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, ''अहो, थांबा मी तो घेऊन आलोय, कोणाला अभ्यासासाठी देता येईल म्हणून!'' आम्हाला आनंद झाला. ''पण आता काय करायचं? आमची अजूनही तो समाविष्ट करण्याची तयारी आहे. काय भीमा?'' मी म्हणालो. ''चालेल'' भीमाही तयारच होता. सर उठले, त्यांनी तो छोटासा ग्रंथ, अक्षरशः पन्नासएक पोथीपृष्ठांचा, आमच्याकडे दिला. म्हणाले, ''हा तसा वाङ्मय म्हणून अभ्यासण्यासारखा दिसत नाही. शास्त्रीय ग्रंथ भविष्याच्या संदर्भात आहे. म्हणूनच तो मागे राहिला'' सर म्हणाले. ''सर आपण असे करूया याची फोटोकॉपी आम्ही करून घेतो. ती प्रबंधात परिशिष्ट म्हणून जोडतो'' मी सुचविले. ''वा, उत्तम उपाय, सर्वांपर्यंत जाईल आणि प्रबंधालाही पूर्णत्व येईल'' सर म्हणाले. ठरले. झाले.

वर्षा पटारे माझी विद्यार्थिनी तशी ती इंग्रजी विषयात एम.ए. कवयित्री, आकाशवाणीवर निवेदिका, स्फुटलेखिका, पण या सगळ्यापेक्षा ती लोणावळ्याच्या स्वामी विज्ञानानंदांच्या मनशक्ती केंद्राशी जोडलेली. 'स्वामी विज्ञानानंद : व्यक्ती आणि वाङ्मय' या विषयावर मराठीत पीएच.डी. करण्याचा तिचा हट्ट होता. मी स्वामींचे वाङ्मय पाहिले आणि म्हणालो, ''काही हरकत नाही, करता येईल.'' प्रारूप तयार केले. विद्यापीठात मान्यतेसाठी पाठवले. डॉ. कोत्तापल्ल्यांशी संपर्क केला. ''अहो तो विषय अनिर्णित राहिला आहे. काहींचे म्हणणे हा पीएच.डी.चा विषय होत नाही. आणि दुसरे म्हणजे विद्यार्थिनीचा मराठी विषय एम.ए.ला नाही'' ते म्हणाले. मी म्हणालो, ''आम्हाला तर याच विषयावर पीएच.डी. करायचंय. मला विषय योग्य वाटतो आणि राहिला विषय मराठी एम.ए. नसल्याचा, तर वास्तविक ती कवयित्री आहे. एक पुस्तक तिच्या नावावर आहे. आणि तसा नियमांचा कोठे अडथळा दिसत नाही.'' माझे म्हणणे ऐकून ते म्हणाले, ''तुमचा याच विषयावर पीएच.डी. व्हावे असा आग्रह दिसतो. मग आपल्याला, हे, का आणि कसे होऊ शकते; हे पटवून द्यावे लागेल. तुम्ही असं करा, पीएच.डी.साठी ऐवज पुरेसा असल्याचे सविस्तर लिहून रिपोर्ट द्या आणि मराठी विषयात त्या कशा सक्षम आणि संशोधनकार्यात योग्य आहेत हे स्पष्ट करणारा सप्रमाण रिपोर्ट द्या, मी पाहातो.'' सरांनी नंतर अनौपचारिकपणे खूपच समजावून सांगितले. त्यांच्या चिकित्सक अभ्यासूपणासह मैत्रभावाचा अनोखा परिचय मला झाला.

मी आणि पंडितराव पवार डॉ. कोत्तापल्ल्यांच्या पुढ्यात बसलो होतो. ''सर, माझ्या डोक्यात एक कल्पना आहे. मी डॉ. पवारांशी बोललोय.'' ''काय? कशाबद्दल?'' सरांनी विचारलं. ''सर, एफ.वाय.बी.ए.ला आलेली मुलं पौगंडावस्थेतून तारुण्यात प्रवेश करणारी असतात. त्यांना जरा वेगळ्या प्रकारची कविता शिकविली गेली; तर त्यांच्या तरुणाईवर चांगला परिणाम होईल असे वाटते.'' मी विषयाला सुरुवात केली. ''म्हणजे, जरा स्पष्ट करून सांगा'' डॉ. कोत्तापल्ले जरा उत्सुकतेने म्हणाले. ''सर, मला वाटतं या तरुणांसमोर राष्ट्रीय जाणिवेची कविता यावी'' मी बोलू लागलो. ''म्हणजे सावरकर वगैरे का?'' सरांनी काहीशा छद्मीपणाने विचारले. ''नाही नाही सर, केवळ सावरकर नव्हे, कवी वेगवेगळ्या वैचारिक दृष्टिकोनाशी बांधिलकी सांगत असले तरी राष्ट्रीय जाणीव पाहिली तर ते सगळेच एकात्मतेने आणि निष्ठेने व्यक्त होतांना दिसतात.'' मी जरा स्पष्ट बोललो. ''पण मग याचा शोध घेऊन; मग टेक्स्ट तयार करावं लागेल. तुमचा काय विचार आहे?'' डॉ. नागनाथ कोत्तापल्ले डाव्या विचारसरणीचे, चळवळीचे साहित्य, पुरोगामी परिवर्तनवादी साहित्य आदि गोष्टीत ते रमत असले, तरी सौंदर्यनिष्ठा आणि राष्ट्राचा अवघा विचार, मला त्यांच्या कवितांमध्ये आणि कादंबरी इ. मध्येही पाहायला मिळाला होता. म्हणूनच त्यांच्यासमोर मी बोलत होतो. दुसऱ्याच्या विचाराचे विवेकाने स्वागत करावे, त्यातील सौंदर्यशोध आणि मानव्याची भावना शोधावी या सरांच्या स्वभावानेच आम्ही जवळ आलो होतो. माणूस म्हणून, सर्व विचारांच्या माणसांचा प्रथम विचार करावा हा त्यांचा दृष्टिकोन मला आवडे. मी सांगू लागलो ''सर, स्वातंत्र्यवीर सावरकर प्रखर बुद्धिवादी आणि राष्ट्रवादी, शाहीर अमरशेखांना मी लहानपणापासून अनुभवतो आहे. कामगार, शेतकरी, शेतमजूर यांच्या वर्गलढ्याबरोबरच प्रखर राष्ट्रनिष्ठ आणि महाराष्ट्राचे सर्वार्थाने कविकुलगुरु कुसुमाग्रज या तिघांच्या केवळ राष्ट्रीय जाणिवेच्या कविता आपण एकत्रितपणे तरुणांसमोर ठेवाव्यात. त्यात सावरकरांच्या १५, अमरशेखांच्या १५ आणि कुसुमाग्रजांच्या २० अशा ५० कवितांचा संग्रह करावा. आम्ही दोघे त्याला प्रस्तावना लिहू, टीपा लिहू. असा हा विचार आहे.'' मी प्रस्ताव ठेवला. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले काही वेळ

अंतर्मुख झाले. एकदम म्हणाले, ''फॅन्टास्टिक, उत्तम, लागा कामाला, करूया आपण!'' झाले. ठरले. आम्ही परिश्रमपूर्वक संग्रह तयार केला. टेक्स्टसाठीचे संस्कार केले. दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणेने तो संग्रह प्रसिद्ध केला. 'तेजाची लेणी' हे नाव सरांना एवढे आवडले की त्यांच्या तोंडून उमटले, ''वा क्या बात है ।'' संग्रह लावायला खूप त्रास झाला. पण संग्रहातील कवी आणि त्यांच्या विचारांमुळे किंवा आमच्या दृष्टिकोनामुळे नव्हे! विद्यापीठीय अभ्यासमंडळ आणि गटातटाच्या राजकारणामुळे, पण सर, भक्कमपणे आमच्या बाजूला उभे होते. डॉ. पंडितराव पवारही ॲकेडमिक कौन्सिलचे सदस्य होते. निभावून नेले. पुणे विद्यापीठाला एफ.वाय.बी.ए.ला 'तेजाची लेणी' चार वर्षे अभ्यासाला होता. नंतर तो संग्रह मुंबई आणि गुलबर्गा विद्यापीठालाही लागला. सरांचा विवेक, साक्षेप, स्वागतशीलता, लढवय्येपणा आणि दृढता यांचा प्रत्यय येतच राहिला.

मी 'परवेडा' कादंबरी लिहिली. नाट्यछटेच्या एकेरी तंत्राने लिहिलेली कादंबरी. एक नवा प्रयोग. डॉ. कोत्तापल्ल्यांना प्रस्तावना लिहिण्याची विनंती केली. त्यांनी संज्ञाप्रवाह, मनोविश्लेषण आणि नाट्यतंत्र यांवर प्रकाश टाकत कादंबरीचे वाङ्मयेतिहासातील वेगळेपण अधोरेखित करीत उदंड प्रोत्साहन दिले. तसाच पण त्यापेक्षा आणखी वेगळा प्रयोग कादंबरी साहित्य प्रकारात, अगदी अलिकडे मी केला. 'अनंत' या तत्त्वज्ञानात्म कादंबरीच्या रूपाने मी केवळ स्वगत आणि निवेदन तंत्राचा वापर करीत एका वेगळ्या आशयाला कवेत घेण्याचा प्रयत्न केला. यावर भाष्य करण्यासाठी डॉ. कोत्तापल्ले यांच्याकडे गेलो. त्यातील प्रयोगात्मकता, अद्वितीयता त्यांनी अचूक ओळखली. या कादंबरीत नायक आहे तोही निर्गुण, निराकार, निर्विकार, कैवल्य किंवा अनंत; याकडेही त्यांनी लक्ष वेधलं. त्यांची साहित्याविष्कारांचे स्वागत करण्याची ही उदारता वाखाणण्याजोगीच होय. जागतिक तत्त्वज्ञानावर भाष्य करतांना आणि तेही ललित तऱ्हेने करतांना, तत्त्वज्ञान प्रथम बऱ्यापैकी पचवावे लागते याकडेही त्यांनी लक्ष वेधले. पठडीनिष्ठेच्या पलिकडील स्वागतशीलता हीच तर सरांची खासियत होय.

मी प्राचार्य असतांनाची गोष्ट. डॉ. कोत्तापल्ले यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून नियुक्ती झाली. आम्हा मराठीच्या प्राध्यापकांना विलक्षण आनंद होणे स्वाभाविकच होते. मी विचार केला पुणे



विद्यापीठाच्या कार्यकक्षेत प्राचार्यपदी नियुक्त झालेल्या सर्व मराठी प्राध्यापक-प्राचार्यांचा एक मेळावा माझ्या कॉलेजमध्ये घ्यावा. विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या हस्ते डॉ. कोत्तापल्ले यांचा भव्य सत्कार या मेळाव्यात करायचा, ही कल्पना सर्वच मराठीच्या प्राचार्यमंडळींना आवडली. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले मराठीच्या प्राध्यापकांमध्ये आणि प्राचार्य झालेल्यांमध्ये नुसते अजातशत्रू होते असे नाही; तर हे सर्व प्राध्यापक त्यांच्याशी मैत्रभावाने जोडले गेले होते. त्या कार्यक्रमात सर्व (मराठी) प्राचार्य उपस्थित राहिले. कुलगुरू कोळास्करांनी ही गोष्ट अधोरेखित केली. सर्व प्राचार्यांचाही गौरव याप्रसंगी केला. या कार्यक्रमात बोलतांना सर सहज बोलून गेले, ''मराठी भाषा, साहित्य, मराठीचे प्राध्यापक हे माझं घर आहे. मी घरातल्या अनुभवाच्या बळावर विद्यापीठात कुलगुरू म्हणून काम करणार आहे.'' सरांच्या या उद्गाराने मराठी प्राध्यापक, प्राचार्य समूहाला मोठा अभिमान वाटला. माझ्या कल्पकतेला सरांनी भरभरून दाद देतांना मेळाव्याच्या आयोजनाचे कौतुक केले.

पुणे विद्यापीठात विभागप्रमुख असतांनाची गोष्ट. मी आमच्या महाविद्यालयात कविसंमेलन घ्यायचे ठरविले. सरांना म्हणालो, ''तुम्ही या कविसंमेलनाचे अध्यक्षपद भूषवावे. आपल्या कविताही सादर कराव्यात.'' ''अहो आता मी कविता करीत नाही. आणि कविसंमेलनाचे अध्यक्ष वगैरे, नको हो मी तुला 'फमु' किंवा दुसरा आणखी चांगला कवी देतोना.'' सर म्हणाले. ''हे पहा सर, तुम्ही या कार्यक्रमाला मी म्हणतो तसेच येणार आहात.'' सर माझ्या हट्टासाठी आले. तसे आमच्या महाविद्यालयात निरनिराळ्या कार्यक्रमात सर आले होते. विशेषतः चर्चासत्रांच्या निमित्ताने. गंभीर विषयावर बोलण्यासाठी. कार्यक्रमाचे अध्यक्षपद तर भूषविलेच पण चांगल्या तीन कविता सादर केल्या. असा हा संवेदनशील मनाचा माणूस. आपल्या विषयावर आणि विषयाच्या माणसांवर निखळ प्रेम करणारा माणूस.

माझ्या पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांनी माझा सेवापूर्ती आणि षष्ट्यब्दीपूर्ती सोहळा आयोजित करायचे ठरविले. याही कार्यक्रमाला त्यांना अध्यक्ष म्हणून बोलावले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ल्यांनी मोठ्या आनंदाने हे निमंत्रण स्वीकारले. डॉ. यु. म. पठाण, डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. आनंद यादव, डॉ. ह. कि. तोडमल आणि डॉ. गं. ना. जोगळेकर यांना विद्यार्थ्यांनी निमंत्रित केले होते. मी विद्यार्थ्यांना म्हणालो,

''या निमित्ताने माझ्या क्षेत्रातील माझ्यापेक्षा वडील आणि समवयस्क मित्र, प्राध्यापक, साहित्यिक, प्राचार्य यांना निमंत्रित करून; सर्वांचा गौरव व्हावा.'' विद्यार्थ्यांनी जवळपास साठसत्तर लोकांना निमंत्रित केले. पुन्हा एकदा अक्षरशः अद्वितीय सोहळा संपन्न झाला. माझी ग्रंथतुला करून; त्यातील ग्रंथ भेट देत सर्वांचा गौरव करण्यात आला. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले अध्यक्षपदावरून बोलताना म्हणाले, ''मी हा कार्यक्रम टाळूच शकलो नाही. कारण सहस्रबुद्ध्यांचा हा गौरव म्हणजे माणसातील माणूसपणाचा गौरव करायचा होता. त्यांनी आदिवासी वंचित यांसाठी केलेलं काम तर सर्वांना माहीत आहेच. पण दारिद्र्याशी झुंज देत सर्व मतांची, स्वभावाची, स्तरातली माणसं या माणसानं आपलीशी केली. अशा माणूस आणि मित्राचा हा गौरव आहे'' सरांना भरून आलेले मी पाहिले.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सर अ.भा.म.सा. संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढवीत होते. आम्हा सर्वच मित्रांना विलक्षण आनंद झाला होता. मतांची खात्री होती. तरी सर माझ्या घरी आले. सर, पुरोगामी वगैरे विचारांचे हे सर्वज्ञात आहेच. मी माझ्या सौभाग्यवतींना त्यांना औक्षण करण्यास सांगितले. सौ. उषाने सरांना, गंधतिलक लावून औक्षण केले, मस्तकावर अक्षता टाकल्या. ''सर, आता तुम्ही निवडून आलात म्हणून समजा'' मी म्हणालो. सरांच्या डोळ्याच्या कडा प्रेमाने पाणावल्या. सर्वांच्या भावनांचा कृतज्ञतापूर्वक आदर करणारा हा माणूस अ.भा.म. साहित्य संमेलनाचा विक्रमी मताधिक्क्याने अध्यक्ष झाला. आजही मित्रांचे मोहळ सरांभोवती असते. मराठी भाषा आणि साहित्य या क्षेत्रात भरीव असे कार्य अथकपणे सुरूच आहे. चाहत्यांची, प्रेम करणारांची, मित्रांची रीघ त्यांच्या घरी सतत असते. वहिनी या सगळ्यांची तेव्हढ्या अगत्याने उठबस करीतच आहेत.

●●●



# स्वागतशील साक्षेपी भाष्यकार

## (प्रा.डॉ. सदानंद मोरे)

१९८७ सालची गोष्ट. मला नगरला सारडा कॉलेजमध्ये येऊन दीडदोन वर्षं उलटली होती. आता मी शाळा, ज्युनिअर कॉलेज ओलांडून सिनिअर कॉलेजचा मराठीचा प्राध्यापक म्हणून कार्यरत होतो. जी गोष्ट ७९-८० मध्ये घडायची होती ती घडायला; मी आदिवासींमध्ये सेवाकार्यात गुंग असल्यामुळे, १९८५ साल उजाडले होते. याच गोष्टींमुळे नगरमधील साहित्य-संस्कृती-शिक्षण क्षेत्रातली मंडळी, कुतुहलाने पाहात होती. मी पीएच.डी. होतो. आमच्या संस्थेत एकमेव तर होतोच; पण कॉलेजविश्वात अपवादात्मक होतो. त्यातच माझ्या 'डांगाणी' आणि 'अहिनकुल' या आदिवासींवरील सामाजिक आणि ऐतिहासिक कादंबऱ्या प्रसिद्ध होत्या. त्याच कारणाने नगरकरांचे विशेष लक्ष माझ्या येण्यानं वेधून घेतलं होतं. त्यातच मला ५ सप्टेंबर १९८७ रोजी आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला. ही गोष्ट तर विशेष लक्षणीय होती. ७ सप्टेंबर १९८७ ची गोष्ट. नगरचं लडिवाळ, प्रिय असं, साहित्यविश्वातलं बेरकी बाळ, अर्थात अरुण शेवते माझ्या घरी आले. मी, अरुण शेवत्यांविषयी, माझे स्नेही सदाशिव शिंगे यांच्याकडून ऐकून होतो. मी त्यांचे स्वागत केले. त्यांनी माझे अभिनंदन करतांना त्यांच्या पैस प्रकाशनाने प्रसिद्ध केलेला एक कवितासंग्रह माझ्या हाती दिला. तो कवितासंग्रह, डॉ. सदानंद मोरे यांचा होता. 'बखर' हे या कवितासंग्रहाचं नाव. स्वाभाविकपणे मी कुतुहलाने तो कवितासंग्रह मनापासून वाचत राहिलो. मी गुंतलो. बखर, मार्क्सच्या नावानं, आगरकरांस पत्र, आम्ही कोण, मी आणि माझी कविता, या कवितांनी मला

डॉ. सदानंद मोऱ्यांकडे ओढलं. समानधर्मा भेटल्यासारखं वाटलं. अरुण शेवत्यांनी मला हा कवितासंग्रह का दिला याचंही उत्तर मिळालं. नगर जिल्हा डाव्या विचारसरणीचा गड. त्यात अर्क असलेल्या अकोले तालुक्यातला आणि त्यातही आदिवासींमध्ये लहानचा मोठा होत, आदिवासींचाच अभ्यास केलेला माणूस हे लक्षात घेऊनच, शेवत्यांनी ही औचित्यपूर्ण गोष्ट केली होती. तेव्हापासून एका बुद्धिप्रामाण्यवादी, साक्षेपी तत्त्ववेत्त्या भाष्यकाराला मी कुतुहलाने तेव्हढ्याच आदरपूर्वक भेटत राहिलो आहे.

सनातन धर्मसभा नगर आणि नगर जिल्हा वाचनालयाचे टिळक सभागृह यांत वेगवेगळ्या कारणाने डॉ. मोऱ्यांच्या व्याख्यानांना मी उपस्थित होतो. विषयाची मांडणी, चिकित्सक बुद्धीने आणि तात्त्विक मूलाधारासह, स्थल काल परिस्थिती सापेक्षतेने, बुद्धिप्रामाण्यपूर्वक, तरी श्रद्धा, सामाजिकता, सांस्कृतिक मूल्य, यांना विवेकपूर्वक संदर्भासह स्वीकारून; मांडण्याची त्यांची हातवटी; मला विशेष लक्षणीय वाटत राहिली आहे. नगरच्या न्यू आर्टस् कॉमर्समध्ये ते तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक होते. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकाने सर्व वैचारिक व्यूहांना अतिशय साक्षेपाने आणि समग्र संदर्भसूत्रांच्यासह समजावून घ्यायचे असते. स्थल काल परिस्थिती सापेक्ष, राजकीय, ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक घडामोडींचे तत्त्वज्ञान मांडणीचा तपशीलावर परिणाम अभ्यासून; तत्त्वज्ञानविषयक खंडनमंडनात्मक भाष्य करावे; याचे भान डॉ. सदानंद मोरे यांना आहे. प्राचीन भारतीय संस्कृती आणि इतिहासाचा गाढा अभ्यास असल्याने डॉ. सदानंद मोरे यांना भाष्य करतानाचे हे भान आले असावे. त्यांच्या भाष्यवृत्तीचे खरे दर्शन 'साप्ताहिक सकाळ'मधून संत तुकोबांवरील सदर लेखनातून महाराष्ट्राला घडू लागले. मी या सदराचा जवळपास नियमित वाचक होतो. नंतर नगरच्या गाज प्रकाशनाने 'तुकाराम दर्शन' असा; या सदरावरील ग्रंथ प्रसिद्ध केला आणि 'तुकाराम दर्शन' हे खरोखरीच एक 'दर्शन' आहे असे मला जाणवले. महाराष्ट्राच्या समग्र जडणघडणीला जेवढे योगदान संत तुकारामांच्या गाथेने दिले, तेवढे खचितच कोणत्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाने दिले आहे; असे माझे मत आहे. पुढे दै. 'सकाळ'ने 'तुकाराम दर्शन'ची आवृत्ती 'सकाळ' प्रकाशनच्यावतीने २०१४ मध्ये प्रसिद्ध केली. त्या आवृत्तीचे प्रकाशन नगर शहरात माझ्या हस्ते घडले, हे मला माझे भाग्य वाटले. येथवरच्या प्रवासात या ना त्या कारणाने डॉ. सदानंद मोरे यांच्याशी माझा



परिचय आणि संबंध दृढावत गेला. अन्यथा खूप दिवस त्यांना मी लांबूनच; वाचत, अनुभवत होतो. परिचय होता. भेटी होत होत्या. सरांविषयीचा आदरभाव मनात होता. डॉ. सदानंद मोरे पुणे विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक आणि मी पेमराज सारडा महाविद्यालयात नगरला मराठी विषयाचा प्राध्यापक त्यामुळे फारसा संबंध येत नसे. तरी संतसाहित्य आणि लोकसाहित्य या क्षेत्रातला मी विशेष अभ्यासक असल्याने संपर्क होता.

२००३ मध्ये मी पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी विराजमान झालो. माझ्या या हालचालींमध्ये डॉ. सदानंद मोरे यांनी मोठ्या सकारात्मकतेने विशेष रस घेतला. मी मराठी विषयांतर्गत 'भक्तिसाहित्याचे स्रोत' या विषयावर एक प्रकल्प करायचे ठरविले. प्रकल्पाचे समन्वयक म्हणून डॉ. मच्छिंद्र मालुंजकरांची नियुक्ती केली. स्वाभाविकपणे महाराष्ट्रातील विविध संप्रदायांचा विचार करून; गट करायचे ठरविले. त्यानुसार चर्चासत्रे करावीत आणि त्यातील चर्चेच्या आधारे खंडात्मक ग्रंथनिष्पत्ती करावी असा विचार होता. त्यातील पहिले चर्चासत्र 'संत समर्थ रामदास आणि रामदासी संप्रदाय' यावर घ्यायचे ठरविले. संत तुकाराम आणि संत रामदास हे भिन्न स्वभावप्रकृतीचे, समकालीन संत अशी समजूत आहे. मी हे लक्षात घेऊन; नेटक्या संशोधनाच्या दृष्टीने; संत तुकारामांचे वंशज आणि 'तुकाराम दर्शन'चे लेखक तत्त्वज्ञ डॉ. सदानंद मोरे यांना या चर्चासत्राचे बीजभाषण करण्यासाठी निमंत्रित केले. त्यांनी ते आनंदाने स्वीकारले. आणि मला अपेक्षित परिणाम साधता आला. या समकालीन संतांतील तात्त्विक आणि प्रवृत्तीपर साम्य डॉ. मोरे यांनी सप्रमाण उलगडत; एकूण संतपरंपरेतील तात्त्विक, धार्मिक, सांस्कृतिक, पारंपरिक आणि भक्तिसाधनाविषयक अनुबंध एवढ्या चपखलतेने उलगडला की अनेकांचे, अनेक प्रकारचे, दृष्टिकोन बदलून टाकण्याची क्षमता त्यात होती.

सेवानिवृत्तीनंतर माझे लेखन, वाचन, संशोधन आणि संस्थात्मक कार्य सुरूच आहे. मी 'आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट'च्यावतीने 'अभंगपौर्णिमा' नावाचा प्रकल्प करायचे ठरविले. आधुनिक वाङ्मयाचा परिणाम आणि लोकप्रियता किंवा स्मरण जनमानसात फारसे दिसत नाही. ते प्रसिद्ध होते आणि लुप्तही होते. मध्ययुगीन भागवत संतांचे वाङ्मय मात्र महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीचा कणा आहे. आधुनिक जीवनातही आदिबंधाच्या स्वरूपात ओठावर, मनात आणि नित्य वर्तनातही दृढावलेले आहे. हे का? कसे? या

वाङ्मयाच्या अभ्यासाची दिशा कोणती असावी? याचा विचार करता; या वाङ्मयाच्या 'प्रयोगसिद्ध वाङ्मय कला' स्वरूपाचे आकलन करून घेतले पाहिजे, असा विचार केला. त्यावर आधारित कीर्तनप्रवचन एकत्रित स्वरूपात पंधरा प्रयोग ह.भ.प. अशोकानंद महाराज यांना करण्याची विनंती केली. समीक्षालेखनाची आधुनिक परंपरा लक्षात घेऊन मी समीक्षा लिहायचे ठरविले. प्रयोगांचे रेकॉर्डिंग आणि ट्रान्सक्रिप्शन केले. त्याचा ग्रंथ तयार केला आणि त्याचे प्रकाशन संतसंमेलन आणि दिंडीपर्यावरणात केले. या सर्व प्रयोगाचे स्वरूप दस्तऐवजासह डॉ. सदानंद मोरे यांना सांगून त्यांना प्रकाशन समारंभातील मुख्य वक्ता म्हणून निमंत्रित केले. त्यांच्या वक्तव्यामुळे स्वाभाविकपणे अभ्यासाच्या दिशेला तात्त्विक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परिमाण मिळाले. लोकसाहित्यशास्त्रीय दृष्टीने संतवाङ्मयाचा अभ्यास घडला पाहिजे या अभ्यासदिशेला बळकटी मिळाली.

'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' असा तात्त्विक विचार मी मांडला होता. सिद्धांत नवा होता असे नव्हे. नव्याने, नव्या स्वरूपात आणि नवा पारिभाषिक शब्द उपयोजित करून; चर्चा केली होती. सनातन परंपरेत धुरिणांनी अर्थात ऋषी, मुनी, तत्त्वज्ञ आदींनी मांडलेले तत्त्वज्ञान मानवी व्यवहार व संस्कृतीमध्ये, दैवतकथा, कुळधर्म कुळाचार, रूढी परंपरा, विशिष्ट वर्तनपरंपरा, न्यायव्यवस्था, संकेत आदि स्वरूपात कसे सारणीत समाविष्ट केले आहे. याची उदाहरणासह चर्चा करीत; अध्यात्म विचार, भावना, जाणीव आणि कृतज्ञता या दृष्टीने परंपरांमध्ये लोकाचारात कसे रुजविता येईल याचा विचार मांडत, अध्यात्म ही सर्वोच्च आनंदस्वरूप अवस्था; लोकव्यवहारात किमान स्वरूपात का होईना, अनुभवता यावी याविषयी विचार करून; अध्यात्मज्ञानाचे व्यवहार प्रात्यक्षिक स्वरूपात प्रतिके, प्रतिमा, अनुसार, सांस्कृतिक सारणींच्या रूपाने कसे मंडित करता येईल, याचा विवेक या धुरिणांनी, शास्त्र किंवा विज्ञान आणि सारणी यांची सांगड घालत केला. हा विचार किंवा हे तत्त्व म्हणजे 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' होय. असे सांगत समूहाने जगणाऱ्या माणसांनी अध्यात्मविचारही समूह अर्थात लोकच्या आनंदमयतेसाठी केला आहे. हा त्या धुरिणांचा लोकनिष्ठ अध्यात्मवाद होय. असा व्यूह मांडल्यानंतर त्यावर एक लिखित परिसंवाद घडावा. विद्वानांचे म्हणणे, त्यांच्या गुणदोषात्मक प्रतिक्रिया स्वीकाराव्यात, त्यावर पुन्हा मांडलेल्या व्यूहाच्या दृष्टीने, भाष्य करावे असा



विचार करून; काही विद्वानांची निवड केली होती. त्यात तत्त्वज्ञानात्मक भाष्याच्या दृष्टीने पहिले नाव माझ्यासमोर आले ते डॉ. सदानंद मोरे यांचे. डॉ. यु. म. पठाण, डॉ. महंमद आजम, डॉ. एम. एस. बागवान, डॉ. फादर नेल्सन फलकाव, मा. फ्रान्सिस दिब्रिटो, महामंडलेश्वर डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर, अशोकानंद महाराज कर्डिले, श्री स्वामी गोविंद देवगिरी महाराज, श्री. गोपाळ अवटी, डॉ. दिनकरराव कुलकर्णी, डॉ. रावसाहेब कसबे, अनघा मोरजे-घोष, डॉ. माहेश्वरी गावित, एस. झेड. देशमुख या सर्वांनी या लिखित परिसंवाद भाग घेतला. आपापल्या परीने हा विचार या विद्वानांनी समजावून घेतला. त्यावर मी पुनर्भाष्य केले. 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' हा ग्रंथ पद्मगंधा प्रकाशनाने प्रसिद्ध केला. या सर्व प्रतिक्रिया येत असतांना डॉ. सदानंद मोरे यांचा एके सकाळी फोन खणाणला. म्हणाले, ''मला आपण लिहायला सांगितले हे फार चांगले झाले. फार महत्त्वाच्या विषयावर चर्चा होते आहे. अन्यथा मी या अनुभवाला मुकलो असतो. आत्ताच्या काळात तर अशी चर्चा अत्यंत आवश्यक आहे.'' जवळपास दहा-पंधरा मिनिटे सर फोनवर बोलत होते. कदाचित माझा अंदाज घेत असावेत. त्यांनी 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' हा वाद आकलित करून घेतला आणि त्यावर त्यांच्या स्वभावाप्रमाणे भाष्यही केले, त्यातील महत्त्वाचा अंश असा, ''लोकांना व्यक्तिनिष्ठ अध्यात्मवाद आणि अध्यात्मविरहित लोकनिष्ठा या गोष्टी स्वाभाविक व सोयीच्या वाटतात. पहिल्या प्रकारचे संन्यासी व साधक आपल्याला आपल्या देशात हवे तितके सापडतील, तर अलिकडच्या काळातील विविध प्रकारचे पुरोगामी चळवळ हे दुसऱ्या प्रकारची उदाहरणे होत. लोकनिष्ठ अध्यात्मवाद हा सहस्रबुद्धेंचा पर्याय म्हणून महत्त्वाचा ठरतो.''

संत शेख महंमद महाराज श्रीगोंदेकर यांच्या, मी संपादित केलेल्या 'सार्थ योगसंग्राम'चे प्रकाशन डॉ. सदानंद मोरे यांच्या शुभहस्ते झाले. त्यावेळचा प्रसंग. मी मनोगत व्यक्त करायला उभा राहिलो. बोलू लागलो तोच कसा कोण जाणे मंडपाच्या वरच्या बाजूला पेट घेतल्याचे लक्षात आले. मी नकळत बोलताबोलताच शेखमहंमदांच्या चमत्कार कथेप्रमाणे, हात उंचावले. हातावर हात चोळतांना संत शेखमहंमद महाराजांचा जयकार केला. सभामंडपातील सर्वांनी त्याला प्रतिसाद दिला. कोणी, कोण जाणे ती आग पटकन क्षणात जाऊन विझविली असावी. कळले नाही. माझे बोलणे झाले. प्रकाशन झाले.

डॉ. सदानंद मोरे बोलायला उभे राहिले आणि सुरुवात करतांनाच म्हणाले, ''डॉ. सहस्रबुद्धे यांचा अध्यात्मिक अधिकार आपण सर्व जाणतो. 'योगसंग्राम'चे सार्थ संपादन करण्याचे अतिमहत्त्वाचे काम त्यांनी केले आहे.'' लोकांनी पुन्हा एकदा संत शेखमहंमद महाराजांचा जयकार केला. संत शेखमहंमद महाराजांनी संत तुकोबारायांच्या मंडपाला लागलेली आग श्रीगोंद्यातून योगबळाने विझविली अशी चमत्कार कथा सांगितली जाते. मंचावर संत शेखमहंमदांचा 'योगसंग्राम' आणि संत तुकोबांचे वंशज डॉ. सदानंद मोरे यांच्या शुभहस्ते पुनः प्रकाशित झाला होता. असा संस्मरणीय योगायोग, प्रसंग श्रीगोंदेकरांना अनुभवायला मिळाला.

पुढे गंधर्ववेद प्रकाशनाने डॉ. सदानंद मोरे आणि श्री. अभय टिळक यां संपादका द्वयांच्या नेतृत्वाखाली 'संतदर्शन' चरित्रग्रंथ संच संपादित करायचे ठरविले. डॉ. सदानंद मोरे यांनी माझ्यावर 'संत शेख महंमद महाराज' यांचे चरित्र लिहिण्याची जबाबदारी टाकली. ''तुमच्याशिवाय हे चरित्रलेखन दुसरे कोणी करू शकणार नाही असे डॉ. मोऱ्यांनी सांगितले आहे.'' असे प्रकाशक खाडिलकर मला लेखन विनंती करतांना म्हणाले. ''डॉ. सदानंद मोरे सरांनी सांगितले ना; मग माझा होकार गृहित धरा. मला केवळ पत्राने कळविले असते तरी चालले असते'' मी म्हणालो. चरित्रलेखन झाले. साडेतीनशे पृष्ठांचे चरित्र झाले. डॉ. मोरे यांना ते एवढे आवडले की; या प्रकल्पाविषयी आणि संतवाङ्मयावर बोलतांना या गोष्टीचा ते आवर्जून उल्लेख करतात.

डॉ. सदानंद मोरे अ.भा.म.सा. संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढवित होते. ''सर, ही फार महत्त्वाची गोष्ट आपण करीत आहात. एकप्रकारे महाराष्ट्राची आणि मराठी भाषेची अपेक्षा आपण पूर्ण करीत आहात. तुम्हाला प्रचार उपचार करण्याची गरजच नाही. ही महाराष्ट्राची इच्छा आहे.'' माझ्या घरी भेटायला आलेल्या मोरे सरांना मी म्हणालो. ''सहस्रबुद्धे अहो, तुमची भावना बरोबर आहे. पण आपल्याकडे निवडणूक निवडणुकीच्या पद्धतीने होते'' सरांनी वास्तवाचे भान आणवून दिले. क्षेत्र, प्रसंग आणि पारंपरिक स्थितीगती यांचा विलक्षण विवेक सरांजवळ होता. आमच्या सौभाग्यवती उषांनी सरांना औक्षण केले. पुन्हा उभयतांनी शुभेच्छा देतांना म्हटले. ''तुम्ही अध्यक्ष होणार ही महाराष्ट्राची इच्छा आहे. तुम्ही निवडणूक जिंकणारच. निवडून आल्यावर प्रथम नगरला घरी या सर. सर निवडून आले. घरी आले. घरात त्यांच्या सत्काराचा, आनंदोत्सवच्यावतीने भव्य कार्यक्रम केला. सर अक्षरशः गहिवरले.

तत्त्वज्ञान हा सरांचा विषय. मी अगंतुकपणे, तत्त्वज्ञान क्षेत्रात, आगावूपणाने घुसखोरी केलेला माणूस. 'अनंत' ही तत्त्वज्ञानात्म कादंबरी लिहिली. नाटकातील 'स्वगत' तंत्र आणि निवेदन तंत्र वापरून ही कादंबरी लिहिली. स्वतः 'अनंत'चं पृथ्वीवरील सर्व तात्त्विक व्यूहाच्या यथार्थतेचा, वर्तमान मानवी जीवनाच्या आणि चराचराच्या संबंधाने धोंडाळा करीत प्रतिक्रिया, स्वगत स्वरूपात व्यक्त करीत प्रवासतो आहे. असे हे कथाबीज होते. अवघ्या शंभर पृष्ठांत हे लालित्याने बसविण्याचा प्रयत्न केला होता. त्या लेखनाला एक लय प्राप्त झाली आहे. असा माझा दावा होता. कादंबरी प्रसिद्ध करण्यापूर्वी डॉ. सदानंद मोरे यांनी वाचून मार्गदर्शन करावे असे वाटले. पाठवली. वाचली. एके सकाळी सरांचा फोन आला ''अहो, सहस्रबुद्धे कादंबरी अफलातून झाली आहे. असे काही लिहिले जावे असा मी विचार करीत असतांनाच कादंबरी हातात पडली.'' मी हुरावलो. सरांनी जागतिक तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने काही पुस्त्या दुरुस्त्याही सुचविल्या. यथाशक्ती ते लेखन करून; त्यांना पाठवले. सरांना मी त्यावर अगदी थोडक्यात प्रतिक्रिया लिखित रूपात देण्याची विनंती केली. मला त्या कादंबरीला प्रस्तावना वगैरे द्यायची नव्हती. त्यांनी लिखित स्वरूपात प्रतिक्रिया पाठवली ती मी कादंबरीच्या शेवटी दिली आहेच. त्यातील माझ्या फुशारकीचा महत्त्वाचा अंश असा, ''डॉ. सहस्रबुद्धे यांच्या प्रस्तुत कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे ती जणू त्या चैतन्यमय सत्तेचे – अनंताचे आत्मचिंतन आहे. अशा प्रकारची कादंबरी कोणी लिहू शकेल अशी कल्पनाही मी कधी केली नव्हती. या एकमेवाद्वितीय कृतीबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन! उपनिषदकालीन ऋषी, शंकरादि आचार्य, ज्ञानेश्वर, हेगेल अशा महान विचारवंतांशी नाते जुळविणारी ही कृती मराठीत निर्माण व्हावी याचा मला एक मराठी भाषक म्हणून अभिमान आहे.'' या कादंबरीचे प्रकाशनही डॉ. सदानंद मोरे यांच्याच हस्ते करविले.

सर साहित्य संस्कृती मंडळाचे औपचारिकदृष्ट्या अध्यक्ष झाले आहेत. आम्हा सर्वांना विलक्षण आनंद झाला. खरे तर महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृतीचे साक्षेपी भाष्यकार म्हणून ते अनभिषिक्त अध्यक्ष सदैवच होते. आहेत. राहतील. 'लोकमान्य ते महात्मा', आणि अशा भाष्यात्मक अनेक

प्रकारच्या लेखनातून, व्याख्यानातून, शासकीय आणि अन्य संस्थांतील कार्यातील सहभागासह, त्यांचे कार्य सुरूच आहे. संत तुकाराम केंद्रित महाराष्ट्र सांस्कृतिक इतिहासाच्या पुनर्लेखनाचा त्यांचा ध्यास आणि सिद्धता, यापेक्षा वेगळे 'सदेह वैकुंठ गमन' नसते.

●●●



# लोकसाहित्य अभ्यास क्षेत्रातील कल्पवृक्ष

## (प्रा.डॉ. प्रभाकर मांडे सर)

प्रा.डॉ. प्रभाकर मांडे हे लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती-अभ्यास क्षेत्रातील, सर्वमान्य, धुरीण, समावेशक आणि पथदर्शक लोकलेणं! लोकसाहित्याचे अंतःप्रवाह, गावगाड्याबाहेर, रामकथेची लोकपरंपरा, मांग आणि त्यांचे मागते, सांकेतिक आणि गुप्त भाषा, मौखिक परंपरा, लोकसाहित्याचे स्वरूप, लोकनागर रंगभूमी, यांसह पन्नासावर अशी लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासाला उपयुक्त पुस्तके मांडे सरांच्या नावावर आहेत. 'लोकसाहित्य संशोधन मंडळ' ही त्यांनी उभी केलेली संस्था, अशासकीय स्वरूपातील लक्षणीय कामगिरी करणारी, गेली पन्नास वर्षे; लोकसाहित्याचे अभ्यासक आणि लोकसाहित्यविषारदांचा मेळा गोळा करणारी, मेळा भरविणारी, एकमेव आणि अद्वितीय संस्था होय. ना कार्यालय, ना पदाधिकाऱ्यांची तालेवारी, ना प्रस्ताव, ना मान्यता, अशी कोणतीही औपचारिकता नसतांना देखील पन्नास वर्षे अविरतपणे कार्यरत असलेली संस्था! डॉ. मांडे यांचे घर हीच संस्था! औरंगाबादमधील 'मंगलप्रभा' ही महाराष्ट्र लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीची 'मंगलप्रभा' असेच म्हणावे लागेल. अतिशयोक्तीचा दोष पत्करून असे म्हणता येईल की, 'मंगलप्रभा' हेच 'लोकसाहित्य संशोधन मंडळ' अर्थात लोकसाहित्याच्या अभ्यासकांची पंढरी. मात्र या पंढरीतला पांडुरंग कोणी वेगळा नाही. 'लोक' हाच या पंढरीतला पांडुरंग आणि येणारे सगळेच 'लोक' भक्त. हां, अनेक गुरुपरंपरा आणि अभ्यासपरंपरा 'मंगलप्रभा'त येऊन मिळतात. लोकसाहित्य संशोधन मंडळाचे औपचारिक असे संस्थारूप

नीट उभे राहावे असे प्रयत्न अनेकदा झाले, होत आहेत. रजिस्ट्रेशन वगैरे झालेले असूनही; अभ्यासाच्या व्यग्रतेत आणि अग्रक्रमाने अभ्यास चळवळ राबविण्यात औपचारिकता अंतर्धान पावणेच अपेक्षित असते. मधूनच चिंतामग्न होऊन व्यवस्थापनाचा विचार करता औपचारिक गोष्टींसाठी हालचाल करायची इतकेच. लोकसाहित्य संशोधन मंडळाने अर्थात डॉ. मांडे यांनी 'लोकधाटी' हे नियतकालिक चालवायचे ठरवले आणि तेही असेच राहातच गेले. 'लोक'मध्ये औपचारिकता राहातच नसते हेच खरे. लोकसाहित्याच्या अभ्यासात हरवलेल्या या माणसाला 'लोक' म्हणूनच अनुभवावे लागते.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा'त प्राध्यापक म्हणून सेवारत असतांना आणि नंतरही शिक्षकवृत्ती न सांडता ज्ञानोपासक आणि मार्गदर्शक म्हणून, औपचारिकतेसह काम करण्यासही डॉ. मांडे कमी पडले नाहीत. अक्षरशः शेकडो विद्यार्थ्यांना एम.फिल., पीएच.डी.साठी मार्गदर्शन करीत स्वतःच्या नावावरील पन्नासावर पीएच.डी. विद्यार्थी पारीत केले. स्वतःचा अभ्यास सांडला नाही. औपचारिक पदव्यांचा विचार करायचा तर ते स्वतः 'पीएच.डी.' तर झालेच पण विद्यापीठाची ग्रंथांसाठी दिली जाणारी 'डी.लिट' देखील त्यांना प्राप्त झाली. आपल्या या लोकसाहित्य अभ्यासात गढूनच भोवती 'लोक' निर्माण केला. 'लोकसाहित्य' या विषयाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी आणि अभ्यासाचे महत्त्व सर्वांना पटवून देण्यासाठी, विद्यापीठीय अभ्यासक्रमात 'लोकसाहित्य' हा विषय पदव्युत्तर स्तरावर सुरू करण्यात यश संपादन केले. सर्व विद्यापीठात 'लोकसाहित्य' हा विषय आता शिकवला तर जात आहेच; त्याचबरोबर अनेक प्राध्यापक, आपण लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक म्हणून हिरीरीने काम करीत; मिरवतही आहेत. 'मंगलप्रभा' हा असा लोकसाहित्याचा आधारवड ठरला आहे.

'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास' या विषयावर मी प्रबंधलेखन करीत असतांनाच, 'लोकसाहित्य संशोधन मंडळ' या संस्थेची पहिली लोकसाहित्य परिषद औरंगाबादला झाली. त्यानिमित्ताने डॉ. प्रभाकर मांडे यांना मी प्रथम पाहिले. मात्र त्यावेळी माझे लक्ष, लोकसाहित्याच्या अभ्यासाची महाराष्ट्रात पायाभरणी खऱ्या अर्थाने आणि एक स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून उभी करणाऱ्या डॉ. दुर्गा भागवत यांच्याकडे होते. डॉ. गंगाधर मोरजे हे माझे गुरू. त्यांच्या बोटाला धरून मी परिषदेला



गेलो. शोधनिबंध वाचला. त्यामुळे माझ्याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले. डॉ. प्रभाकर मांडे यांना माझे विशेष कौतुक वाटले. पुढे स्वाभाविकपणे माझ्या पीएच.डी.च्या प्रबंधाला बह्यस्थ परीक्षक म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. त्यांना माझा प्रबंध एवढा आवडला की त्यांनी तो बराच काळ स्वतःकडे ठेवला. त्यावेळी पीएच.डी.ची मौखिक परीक्षा 'इन कॅमेरा' होत असे. आजही काही ठिकाणी तीच प्रथा आहे. डॉ. गंगाधर मोरजे यांच्या समवेत डॉ. भाऊ मांडवकर आणि डॉ. प्रभाकर मांडे एका केबीनमध्ये बसले. मला निमंत्रित केले. प्रबंधावर बोलायला सांगितले. मी बोलू लागलो. तोच डॉ. मांडवकर मी मांडलेल्या भाषा वैज्ञानिक अभ्यासाविषयी बोलू लागले. ते स्वतः 'कोलाम'चे अभ्यासक होते. त्यांनी माझ्या अभ्यासाला एकमेवाद्वितीय ठरवून टाकले. ''तौलनिक अभ्यासाला तोड नाही. त्यातही स्वतः क्षेत्रीय अभ्यास करून; भाषानमुने गोळा करून, प्रमाण मराठी भाषा, महादेव कोळ्यांची मराठी बोली, ठाकरांची मराठी बोली आणि हटकर कानड्यांची मराठी बोली यांचा तौलनिक अभ्यास करून; आज प्रचलित भाषेचे वर्णनात्मक व्याकरणही या प्रबंधात मांडले आहे. या प्रबंधाने आदिवासी आणि आदिवासीएतरांच्या बोलींच्या अभ्यासाला दिशा मिळाली.'' भाऊ मांडवकर बोलत होते. डॉ. प्रभाकर मांडे, ''बरोबर, बरोबर'' म्हणत होते. अखेर मांडे सरांनी त्यांना थांबवत लोकवाङ्मयाची लोकसाहित्य शास्त्रीय चिकित्सा आणि त्यातून लोकसंस्कृतीची उकल कशी केली आहे; यावर बोलायला सुरुवात केली आणि ते भारावून बोलतच राहिले. ''आता खरी लोकसाहित्याच्या अभ्यासाला हवी तशी सुरुवात झाली'' डॉ. प्रभाकर मांडे बोलत होते. आता यात मी काय बोलावे हे मला कळत नव्हते. डॉ. प्रभाकर मांडे भारावून आणि गहिवरून बोलत होते. मला माझ्या थिसीसचे महत्त्व उलगडत गेले. मला आनंद वाटत होता. अखेर डॉ. गंगाधर मोरजे त्यांना थांबवत म्हणाले, ''आपण त्यांचा चाळीसगाव डांगाण बघायला जाऊया.'' दोघांनी माझे मनःपूर्वक अभिनंदन केले. ''आता तुम्ही या क्षणापासून पीएच.डी. झालात!'' ते दोघेही माझा हात हातात घेऊन म्हणाले. माझे डोळे पाणावले, मी गहिवरलो. मला कधी एकदा अकोल्याला जाऊन माझ्या माणसांना भेटून; ओक्साबोक्सी रडू, असे झाले. मी डॉ. मांड्यांच्या प्रेमातच पडलो.

मी अकोल्यात, शाळेला जोडलेल्या ज्युनिअर कॉलेजमध्ये आणि ही

मंडळी औरंगाबाद, नगर, पुणे अशी. त्यात मी झोकून देऊन वनवासी कल्याण आश्रमाचे काम सुरू केलेले. भेट होत नसे. मध्येच एक दोन वेळा लोकसाहित्य परिषदेत सहभागी होण्याचा प्रयत्न केला. डॉ. मांडे यांचा, परिषद घ्यायची म्हटलं की शोधनिबंध लिहायला सांगायचा शिरस्ता. मीही दोन तीन शोधनिबंध लिहिले असतील.

मला १९८५ मध्ये नगरला येणे भाग पडले. आमच्याच 'हिंद सेवा मंडळ' या संस्थेच्या सारडा महाविद्यालयात मी रुजू झालो. आता वनवासी कल्याण आश्रमाचे काम थांबले. येथवर माझ्या 'डांगाणी' आणि 'अहिनकुल' अशा 'डांगाणी' बोलीचा मनसोक्त वापर करून लिहिलेल्या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या होत्या. दुरावलो होतो पण नाळ तुटली नव्हती. अभ्यासाला उपयुक्त असे काही आता लिहिले पाहिजे असे वाटू लागले. मी 'लोकसाहित्यविचार' असे पुस्तक लिहिले. साहित्य संस्कृती मंडळाकडे अनुदानासाठी पाठवले. त्या पुस्तकाला अनुदान तर मिळालेच. त्याचबरोबर; योगायोगाने असेल कदाचित; डॉ. प्रभाकर मांडे यांनी अभ्यासकांच्या सोयीसाठी निर्माण केलेल्या 'गोदावरी', 'सविता' अशा प्रकाशनांकडे म्हणजे डॉ. मांडे यांचेकडे ते पुस्तक गेले. मला पत्र मिळाले. लोकसाहित्याच्या अभ्यासात डॉ. मांडे हे माझ्या संदर्भात 'जेथे जातो तेथे । तू माझा सांगाती ।।' असे असल्यासारखे वाटले. मी डॉ. मांडे यांना म्हणालो, या पुस्तकाला प्रस्तावना स्वरूप तुम्हीच काही लिहा. म्हणजे ''पाटीलबुवा लग्न करा, बायको तुम्हीच व्हा' सारखा प्रकार झाला. त्यांनी प्रस्तावना लिहिली. पुस्तक प्रसिद्ध केले आणि ते पुस्तक खरोखरी लोकसाहित्याच्या अभ्यासाला विद्यापीठाच्या संदर्भग्रंथात समाविष्टही झाले.

दरम्यानच्या काळात १९८६ मध्ये नगरला सहावी लोकसाहित्य परिषद, प्रयोगसिद्धतेसह भरवली होती. मी डॉ. प्रभाकर मांडे आणि डॉ. गंगाधर मोरजे यांचा जवळचा कार्यकर्ता म्हणून झोकून काम करत राहिलो. त्यातच; माझा जाहीरपणे 'धाकटा भाऊ' म्हणून उल्लेख करणाऱ्या अक्काच अध्यक्ष होत्या. या परिषदेत मी डॉ. प्रभाकर मांडे यांच्या अधिकच जवळ गेलो. नंतर एकदोन वेळा इतरत्रही परिषदांमध्ये डॉ. प्रभाकर मांडे यांनी मला विशेष व्याख्याता म्हणून सहभागी करून घेतले.

माझे लोकसाहित्यविषयक चिंतन सुरू होते. लोकसाहित्याचे 'लोक'धारणेतील मूलभूत असे महत्त्व मनात ठसत होते. लोकधारणा करणारे



हेच ते विष्णूतत्त्व होय. अर्थात 'लोकबंध' होय; असे जाणवू लागले. मी मोठ्या उत्कटतेने आणि अभ्यासासह 'लोकबंध' ही संकल्पना सिद्ध केली. शिरस्त्याप्रमाणे नवे काही मांडले तर मोरजाई मठीत मांडायचे, चर्चा करायची आणि मग पुढे जायचे. मी 'लोकबंध' प्रा. वसंत दावतर, डॉ. गंगाधर मोरजे आणि डॉ. पी. एस. पवार यांच्यासमोर अक्षरशः शब्दन्शब्द सादर करीत मांडले. दावतर सरांनी आणि मोरजे सरांनी खूप घासून चर्चा केली. मी 'लोक', 'लोकबंध' आणि 'लोकसाहित्य' अशा मोजक्या तीनच प्रकरणात जवळपास पावणेदोनशे पृष्ठांचे पुस्तक मांडले. ग्रंथ सिद्ध झाला. दास्ताने कंपनीने तो प्रसिद्ध केला. याच सुमारास पुढच्या पिढीतील अभ्यासकांना प्रोत्साहन देण्यासाठी डॉ. प्रभाकर मांडे यांनी पुरस्कारित करण्याचे ठरविले होते. 'संशोधन पुरस्कार' देऊन गौरव करायचा असे त्यांनी ठरविले होते. प्रथमच दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी डॉ. प्रभाकर मांडे यांनी मी अर्थात डॉ. अनिल सहस्रबुद्धे, डॉ. मधुकर वाकोडे आणि डॉ. विश्वनाथ शिंदे यांना पुरस्कार देऊन; महाराष्ट्राचे तीनही प्रमुख भाग; लोकसाहित्य संशोधन पुरस्कारांनी जोडायचे ठरविले. खानदेश आणि विदर्भ येथून अमरावतीच्या रांजणगाव सुर्जीचे डॉ. मधुकर वाकोडे, संपूर्ण पश्चिम महाराष्ट्राचे, गोवा कोकणासह – असे कोल्हापूरचे डॉ. विश्वनाथ शिंदे आणि मराठवाडा, मध्यमहाराष्ट्र मधून नगरचा मी असे हे गणित होते. त्यातही लोकसाहित्याला जवळचा अभ्यास म्हणजे ग्रामीण जीवन, त्या दृष्टीने ग्रामीण साहित्याचे डॉ. रा. रं. बोऱ्हाडे यांच्या हस्ते हा 'संशोधन पुरस्कार' देण्याचा कार्यक्रम औरंगाबादच्या, डॉ. प्रभाकर मांडे यांनीच उभ्या केलेल्या किलबिल संस्थेत केला आणि मला 'लोकबंध' ग्रंथाला आणि एकूण संशोधनाला, 'लोकसाहित्य संशोधन मंडळाचा' पहिला 'संशोधन पुरस्कार' देऊन गौरविले.

मध्यंतरीच्या काळात आणि पुढे लोकसाहित्य परिषदांत सहभागी होणे, महाविद्यालयीन सेमिनारमध्ये जाणे चालूच ठेवले. आता मीही पीएच.डी. गाईड झालो होतो. डॉ. माहेश्वरी वीरसिंग गावित या माझ्याच महाविद्यालयातल्या तरुण, अभ्यासू आदिवासी प्राध्यापक पीएच.डी. करण्यासाठी माझ्याकडे आल्या. ''महाराष्ट्रातील आदिवासी साहित्य : एक चिकित्सक अभ्यास'' असा विषय ठरला. 'आदिवासी' आणि 'आदिवासी साहित्य' या संकल्पना अगदी स्वच्छ व्याख्यांसह स्पष्ट व्हाव्यात असा संकल्प केला. त्यासाठी

आदिवासी साहित्याचे अभ्यासक डॉ. विनायक तुमराम यांच्यासह काही अभ्यासकांना निमंत्रित केले आणि टेबल कॉन्फरन्स करायचे ठरविले. त्यात निरीक्षक आणि समारोपाचे मुख्य वक्ते म्हणून डॉ. प्रभाकर मांडे यांना निमंत्रित केले, त्यांना एकूण कल्पना दिली. दोन दिवसांच्या या टेबल कॉन्फरन्समधून 'आदिवासी' आणि 'आदिवासी साहित्य' ही संकल्पना नवनिताप्रमाणे स्पष्ट होऊन पुढे आली. या प्रक्रियेतील डॉ. प्रभाकर मांडे यांचा सहभाग अत्यंत मौलिक ठरला.

मी सारडा महाविद्यालयात प्राचार्य झालो. डॉ. प्रभाकर मांडे यांची अमृतमहोत्सवी वाटचाल सुरू होती. त्यानिमित्ताने मी आमच्या महाविद्यालयात डॉ. माहेश्वरी गावित यांच्या नेतृत्वाखाली आणि माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्रपणे भव्य अशी लोकसाहित्य परिषद घ्यायचे ठरविले. या परिषदेला आणखी एक किनार होती. माझे गुरुवर्य डॉ. गंगाधर मोरजे त्याच वर्षी निवर्तले होते. त्यांनी सहावी लोकसाहित्य परिषद नगरला प्रयोगसिद्धतेसह भरविली होती. त्यांना श्रद्धांजली आणि डॉ. मांडे यांना गौरवपूर्वक अभिवादन असे दोन्ही साधण्यासाठी 'प्रयोगसिद्ध वाङ्मयकला' या दृष्टीने लोकसाहित्याच्या सर्व अंगोपांगांचे प्रातिनिधिक प्रयोग सादर होतील आणि त्यावर गंभीर चर्चा होईल; असे नियोजन केले. रांगोळी, खाद्यजत्रा, विविध पारंपरिक खेळ, विधिनाट्ये, नृत्ये इ.इ. सारे काही यात होते. श्री. मधुकर नेराळे, शाहीर विठ्ठल उमाप, शाहीर आझाद नायकवाडी, नृत्यांगना मधु कांबीकर, ज्येष्ठ लोकसाहित्य विशारद डॉ. मधुकर वाकोडे, डॉ. विश्वनाथ शिंदे इ.इ. जवळपास साठ अभ्यासकांचा सहभाग यात होता. तीन दिवसांचा भरगच्च कार्यक्रम होता. त्यांत डॉ. प्रभाकर मांडे यांचा सपत्निक कार्यगौरव करायचे ठरविले. साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते गौरव करायचे ठरविले. या कार्यक्रमाला ताराबाई परांजपे देखील उपस्थित होत्या. 'न भूतो' अशी परिषद गाजली. नगर शहराने परिषदेला भरभरून प्रतिसाद दिला. परिषदेवर आधारित 'लोकसाहित्य : जीवनकला' असा ग्रंथ संपादित केला. तो सर्व विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात संदर्भासाठी स्वीकृत झाला. लोकसाहित्याच्या अभ्यासातील अग्रणींचे पांग अभ्यासानेच फेडण्याचा; कौतुकास्पद प्रयत्न प्रसारमाध्यमांच्या कौतुकाचा ठरला.

मी रिटायर्ड झाल्यानंतरही डॉ. मांडे यांच्याशी संपर्क सतत राहिला.



'लोकसाहित्य संशोधन मंडळा'चे कार्य विस्तारित व्हावे म्हणून इच्छा गुरुवर्य डॉ. प्रभाकर मांडे यांनी व्यक्त केली. प्रतिसाद म्हणून लोकसाहित्याचे अभ्यासक आणि डॉ. प्रभाकर मांडे यांचे विद्यार्थी व डॉ. गंगाधर मोरजे यांचे मानसपुत्र आमचे स्नेही डॉ. धोंडिराम वाडकर यांच्या अध्यक्षतेखाली अहमदनगर जिल्हा, लोकसाहित्य संशोधन मंडळ जिल्हा शाखा स्थापन केली.

डॉ. प्रभाकर मांडे लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासात रमलेले असतांना भारतीय सनातन सांस्कृतिक राष्ट्राची त्यांना झालेली जाणीव, भारतीयांच्या दृष्टीने आणि लोकसाहित्याच्या जागतिक अभ्यासक्षेत्राच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहे. वयाच्या पंचाऐंशीव्या वर्षी अजून चालतोचि वाट असे त्यांचे संशोधन कार्य आणि 'लोक' संबंध विस्तार सुरूच आहे.

●●●

# सनातन दैवतकथांचा, सांस्कृतिक अन्वयार्थ उद्‌घाटक लोकवैज्ञानिक
## (डॉ. चिंतामण रामचंद्र ढेरे सर)

'श्री नरसिंह उदय आणि विकास' या ग्रंथाची मांडणी करण्यात डॉ. रा. चिं. ढेरे आणि त्यांची कन्या डॉ. अरुणा ढेरे मग्न होते. चर्चा, संदर्भजुळणी, दैवतकथाशास्त्रीय मांडणी, संस्कृतीच्या प्रगमनशीलतेतील नरसिंह टप्प्याची चर्चा करण्यात अक्षरशः तासन्‌तास जात. भास्कराचार्य आणि लीलावती यांनी भारतीय गणित शास्त्राची प्रस्थापना ज्याप्रकारे केली, अगदी त्याचतऱ्हेने अतीव साक्षेपाने, तर्कशुद्धतेने भारतीय संस्कृतीचे सनातनत्व आणि पुनःप्रस्थापन करण्यात पितापुत्री गढून असावेत. जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात 'श्री नरसिंह उदय आणि विकास'च्या प्रकाशनाचा भव्य सोहळा करण्याचा संकल्प पद्‌मगंधा प्रकाशानचे प्रकाशक श्री. अरुण जाखडे यांनी आणि डॉ. अरुणांनी केलेला. कारणही तसेच होते. गेल्या कित्येक दिवसांपासून डॉ. ढेरे 'अर्धांग' झाल्याने विकलांग दशेत तळमळत होते. तरीही संस्कृती, दैवतकथा, लोकसंस्कृती, लोकसाहित्य विषय चर्चेत आणि अप्रसिद्ध वाङ्मयाची नीटस मांडणी करून त्याचे प्रकाशन होण्याची निकड, डॉ. ढेरे, डॉ. अरुणा ढेरे आणि प्रकाशक अरुण जाखडे यांना एकत्रित चर्चेसाठी प्रवृत्त करीत होती. याचे कारण शारीरविकलांगतेपलीकडील भारतीय संस्कृतीच्या पुनःप्रकाशमानतेची डॉ. रामचंद्रांच्या मनातील सूर्यमुखी तळमळ. 'श्री नरसिंह उदय आणि विकास' ग्रंथाची प्रुफे श्री. अरुण जाखडे स्वतः डॉ. रा. चिं.जवळ बसून वाचून दाखवित.



डॉ. अरुणा ढेरे डॉ. रामचंद्रांचे म्हणणे समजून सांगत. श्री. अरुण जाखडे आणि डॉ. अरुणा ढेरे यांनी डॉ. रा. चिं. ढेऱ्यांचे समग्र ज्ञानसंचित सर्वांपर्यंत पोचविण्याचा विडा उचललेला. ढेऱ्यांचा चिंतनसागर उपसणे हे खरेतर 'अगस्त्य' कार्य होय. त्यांचे कौतुक करता करता त्यांच्यावर कार्यधुरा सोपवून हा 'ज्ञानगभस्ती' अलगद आणि नकळत अस्तास गेला. आता 'श्री नरसिंह उदय आणि विकास' एकप्रकारे तपःस्मृति ग्रंथ स्वरूपात 'पद्‌मगंधा' प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. भारतीय सनातन संस्कृतीचा, महाराष्ट्रातील लोकविन्यास संशोधित करून प्रकाशित करण्याची जबाबदारी जणू पद्‌मगंधा प्रकाशन, डॉ. अरुणा ढेरे आणि अभ्यास क्षेत्रातील असंख्य अभ्यासकांवर सोपवून डॉ. ढेरे ज्ञानमय झाले.

भारतीय सनातन संस्कृतीचे गूढाद्‌भूत सत्य आणि सत्त्व दर्शन, आपल्या संततच्या व्यासंगपूर्ण व मूलगामी संशोधनातून न्यायचिंतनशीलतेने आणि गांभीर्याने, आपल्या प्रज्ञाविष्कारातून, वज्रलिपित करीत ग्रंथातून घडविणारे; डॉ. रा. चिं. ढेरे चिरंतनाच्या प्रवासास गेले. त्यांची ग्रंथसंपदा, मानववंशशास्त्र, पुरातत्त्व तथा प्राचीन अवशेषशास्त्र, दैवतकथाशास्त्र, इतिहासाचे पुराणीकरण आणि पुराणीकरणातून – सांस्कृतिक धारणासूत्राचे परंपराकरणप्रक्रिया, प्रतीकपूजा, धर्मशास्त्र, लोकसरणी किंवा लोकविद्याशास्त्र अर्थात लोकसाहित्य, भाषाविज्ञान आणि साहित्य चिकित्सा या अभ्यास क्षेत्रांना चिरंतन प्रेरणादायी ठरणारी आहे. मानव समजून घेण्याच्या अनेक दिशा त्यांच्या अभ्यासाने प्रकट व प्रचलित केल्या आहेत.

डेक्कन कॉलेजच्या लायब्ररीमध्ये संदर्भशोधन करीत या अभ्यासमग्र तपस्व्याचे दर्शन मला घडले; तेव्हापासून त्यांच्या अभ्यासाविषयी सतत कुतुहल वाटत राहिले. संस्कृतीच्या उदरात गर्भवास पत्करून पुन्हा पुन्हा ग्रंथरूपाने प्रकट होत गेलेले डॉ. रा. चिं. ढेरे महाराष्ट्रात अभ्यासक वर्तुळात एक 'मिथ' होऊन बसले आहेत.

३० मार्च १९८० ची गोष्ट. पुणे विद्यापीठात पदवीदान समारंभ होता. ह्या समारंभाने मला माझ्या आयुष्यात अभूतपूर्व आनंद दिला. या समारंभात मला 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास' या क्षेत्रीय अभ्यासावर आधारित संशोधनावर पीएच.डी. पदवी मिळणार होती. त्यावेळी पीएच.डी. पदवी मिळविणारांची संख्या तुलनेने खूपच कमी असे. त्यामुळे प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते मोठ्या सन्मानपूर्वक, कुलगुरू पदवीदान

करीत असत. प्रोसेशन होऊन व्यासपीठासमोर आम्ही बसलो तर व्यासपीठावर महाराष्ट्राची दोन अद्‌भूत व्यक्तिमत्त्वे विराजमान झाली होती. या दोहोंना 'डी.लिट' पदवीने सन्मानित करणार होते. त्यातील एक होते स्व. पु. ल. देशपांडे आणि दुसरे होते स्व. डॉ. रा. चिं. ढेरे. डॉ. रा. चिं. ढेरे यांना 'लज्जागौरी', 'चक्रपाणी', 'महाराष्ट्राचा देव्हारा', 'संतसाहित्य आणि लोकसाहित्य काही अनुबंध' अशा काही ग्रंथांच्या निमित्ताने संशोधनासाठी 'डी.लिट' देणार होते. नकळत माझ्या अभ्यास विषयातला दिग्गज भेटल्याचा आनंद झाला. पु.लं.विषयी आकर्षण होतेच. परंतु 'चक्रपाणी'मधील हरिश्चंद्र गडावरील शीलालेकांचा उल्लेख हे माझे विशेष आकर्षण होते. हरिश्चंद्रगड हा माझ्या क्षेत्रीय अभ्यासाचा भाग होता. मी समारंभानंतरच्या चहापान कार्यक्रमाच्या वेळी या दोघांशी सलगी केली. तेवढ्या गर्दीतदेखील डॉ. रा. चिं. ढेरे यांनी मोठ्या आत्मियतेने माझ्याशी हरिश्चंद्र गडावरील शीलालेकांविषयी चर्चा केली. या चर्चेत 'चक्रपाणी'त उल्लेखित शीलालेखांव्यतिरिक्त मला आढळलेला एक शीलालेख मी त्यांना छायाचित्र स्वरूपात पाठवायचे ठरले. पुढे मी तो पाठवलाही. त्यांच्याशी चर्चेतून मला एका उत्तुंग अभ्यासकाचे साक्षात दर्शन घडले. मला माझ्या 'लोकसाहित्य' क्षेत्रातील अभ्यासाला हे दर्शन प्रेरक ठरले.

डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या लोकसाहित्य, संतसाहित्य आणि दैवतशास्त्रविषयक अभ्यास यांविषयी माझे आकर्षण वाढतच गेले. आणि पुन्हा एकदा योगायोगाने आणखी एका आनंददायक प्रसंगाचा योग आला. संतसहवास आणि विद्वानांचा सहवास हा आत्मानंद देणारा असतो. ज्ञानेश्वरीलेखन सप्तशताब्दीचे वर्ष होते. त्यानिमिनत्त कांची कामकोटीपीठाच्या श्रीजगद्‌गुरु शंकराचार्यांनी अर्थात श्री जयेंद्र सरस्वतींनी पुणे येथे श्री ज्ञानेश्वरी ग्रंथावर स्वतंत्र भाष्यात्मक ग्रंथलेखन करणाऱ्या संशोधक विद्वानांना विद्वत् पुरस्काराने अभिनंदनपत्र देऊन सत्कारित करावयाचे ठरविले. कार्तिक शुद्ध ८, गरुवार शके १९१३, दि. १४ नोव्हेंबर १९९१ ही शुभ तिथी निवडली होती. पुण्यातल्या आश्रमात भव्य सोहळ्याचे आयोजन केले होते. मला माझ्या 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' या ग्रंथाच्या लेखनानिमित्ताने निमंत्रित करण्यात आले होते. मी उपस्थित झालो तेव्हा लक्षात आले, महाराष्ट्रातील नऊ विद्वानांना निमंत्रित केले आहे. सन्मानपूर्वक आमचे स्वागत करून आम्हाला विराजमान करविले तेव्हा मला जे दर्शन घडले ते खरोखरीच अभूतपूर्व होते. तेथे डॉ. रा. चिं. ढेरे, राम शेवाळकर, वि. रा.



करंदीकर, हे. वि. इनामदार, डॉ. उषा देशमुख, डॉ. व. दि. कुलकर्णी यांच्याबरोबर मला बसविण्यात आले होते. मला खूपच संकोचल्यासारखे झाले. मी बहुधा नववा, धडपडत तेथे पोचलेला असावा. परंतु डॉ. रा. चिं. ढेरे यांना पाहून मी विशेष सुखावलो. या सर्वांचा अधिकार आकाशाएवढा आणि माझा अधिकार एखाद्या वालुका कणासारखा. त्याही समारंभप्रसंगी डॉ. रा. चिं. ढेरे यांनी माझी अगदी घरातल्या माणसाने विचारपूस करावी तशी विचारपूस केली. हाच अनुभव मला डॉ. व. दि. कुलकर्णी, राम शेवाळकर आणि अन्य सर्वांचा आला. डॉ. ढेरे सारख्यांच्या ज्ञानपर्वत शिखराने, एखाद्या अभ्यासटेकाडाची विचारपूस करावी, याने मी हरखून गेलो. मला पुरस्कार घेण्यासाठी निमंत्रित केल्यावर मी उठून या सर्व महाविद्वानांच्या पाया पडलो आणि नम्र भावाने पुरस्कार स्वीकारला. ज्ञानसागरांच्या निरहंकारी विनम्र भावाने मी जमिनीवर आलो. डॉ. रा. चिं. ढेरे यांनी जाता जाता माझी पाठ थोपटली तेव्हा तर मी नखशिखांत भारावलो. पावन झालो. माझ्यातील अभ्यासवृत्तीला बळ मिळाले. डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या 'कल्पद्रुमाचिये तळी', 'ज्ञानदेव-ज्ञानदेवी' या ग्रंथांनी मला अगोदरच प्रभावित केले होते.

प्राचीन मराठी वाङ्मय, संतवाङ्मय, लोकसाहित्य व प्रामुख्याने भारतीय संस्कृती तथा लोकसंस्कृतीचे चोखंदळ व साक्षेपी अभ्यासक डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे यांच्या नावावर अक्षरशः दीडशेवर ग्रंथ आहेत आणि तेवढेच अप्रसिद्ध स्वरूपातील लेखन आहे. पाणिनीप्रमाणे ऐन तारुण्यात संशोधनाला झोकून कार्यरत झालेला हा संशोधक, समीक्षक, चिकित्सक, साहित्यिक, भारतीय लोकसंस्कृतीचा सनातन आणि अमर्याद सागर प्रवासत राहिला. त्यांच्या काही ठळक ग्रंथांचा मागोवा घेतला तरी त्यांच्या संशोधनकार्याची दिशा स्पष्ट होते.

आज्ञापत्र, भारतीय रंगभूमीच्या शोधात, दक्षिणेचा लोकदेव, दत्तसंप्रदायाचा इतिहास, श्री महालक्ष्मी, लज्जागौरी, लोकसाहित्य शोध आणि समीक्षा, लोकदैवतांचे विश्व, लोकसंस्कृतीचे उपासक, मुसलमान मराठी संतकवी, नाथसंप्रदायाचा इतिहास, संत, लोक आणि अभिजन, श्री आनंददायकी, श्री तुळजाभवानी, खंडोबा, श्री संतनामदेव जनी आणि नागरी, विठ्ठल एक महासमन्वय, विविधा, त्रिविधा, लोकसंस्कृतीचे प्रातिभ दर्शन, संतसाहित्य आणि लोकसाहित्य काही अनुबंध, लोकसाहित्य शोध आण समीक्षा, ज्ञानेश्वर

विविधा, ज्ञानेश्वर नवदर्शन, महाराष्ट्राचा देव्हारा, कल्पदृमाचिये तळी, ज्ञानदेव ज्ञानदेवी, महामाया, श्रीपर्वताच्या छायेत आदि ग्रंथांसोबत अक्षरशः 'योगसंग्राम', 'पांडुरंग महात्म्य'सारख्या अनेकानेक ग्रंथांचे संपादन करून; भारतीय लोकसंस्कृतीचे महाराष्ट्र द्वार त्यांनी सर्वांसाठी खुले केले.

महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीच्या लोकदैवतांचे स्वरूप आणि आविष्कार, डॉ. ढेरे यांनी लोकसाहित्यशास्त्रीय पद्धतीने प्रसंगी क्षेत्रीय अभ्यासपूर्वक उलगडून महाराष्ट्राच्या सात्त्विक आणि तेजस्वी स्वभावाचा 'उद्‌गम आणि विकास' यांवर प्रकाश टाकला. श्रीमहालक्ष्मी, श्रीतुळजाभवानी, श्रीआनंददायकी, महामाया, दत्तसंप्रदायाचा इतिहास यांतून लक्ष्मी, भवानी, अष्टदशभूजा, चतुःश्रृंगी, वणीपीठ आणि माहूर रेणुका महाराष्ट्रातील साडेतीन पीठांचा त्यांनी लोकसंस्कृतीच्या अंगाने केलेला पाठपुरावा अद्‌भूतच म्हणावा लागेल. साडेतीन शक्तीपीठांत अंबाजोगाई आणि वणी या अर्धपीठाची मीमांसा जाता जाता त्यांनी केली आहे. आज महाराष्ट्रात या मातृदेवतांची असंख्य रूपे प्रकट झाली आहेत. त्यांचा समाचार घेत दैवतकथानिर्मिती ही मानवी प्रवृत्ती आहे याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. 'खंडोबा' ही पितृदेवता शैव संप्रदायातून लोकदेवतेच्या स्वरूपात अनादिपणे महाराष्ट्रात प्रकटली. दक्षिणेकडून पश्चिमोत्तर घडलेला या देवतेचा प्रवास या देवतेचे उपासक, पितृदेवतांचे 'भैरवरूप' यांवर चिकित्सक भाष्य करीत, अवघ्या महाराष्ट्राचे 'खंडोबा' हे कुलदैवत, त्यांनी नेटकेपणाने आणि कुळधर्मकुळाचाराच्या व 'वाघ्यामुरळी' या उपासकांच्या वैविध्यपूर्ण स्वरूपवर्णनासह मांडले आहे. मातृदैवते आणि पितृदैवते यांच्या उपासना परंपरांतील सनातन वैदिक आणि पौराणिक कथात्मक परंपरा, धर्मधारणा, कुळधारणासूत्रे याबरोबरच, वर्तनात्मक, साधनात्मक आणि मौखिक अथवा शाब्द लोकबंध यांचे सूक्ष्म, चिकित्सक आणि तपशीलवार वर्णन करून महाराष्ट्र लोकसंस्कृतीच्या डोळस, श्रद्धापूर्ण, दृढ आणि शाश्वत पायाभूत आधाराची चिकित्सा केली आहे.

महाराष्ट्रातील भागवतधर्माचे उपास्य, आराध्य असे लोकदैवत म्हणजे 'विठोबा'. या दैवताची उद्‌गम विकास चिकित्सा म्हणजे लोकसंस्कृतीच्या संशोधनाची परमावधी म्हणावी लागेल. 'विठ्ठल एक महासमन्वय' या ग्रंथाचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अभिसरणाच्या दृष्टीने विचार करावा लागतो. विठ्ठलमूर्ती, त्या दैवताचा अर्थात मूर्तीचा प्रवास, पंढरपूर आणि पांडुरंग नाम



इतिहास, कर्नाटक आणि महाराष्ट्र, आंध्र आणि महाराष्ट्र यांचा भाषिक, लोकसांस्कृतिक, अध्यात्मविचारात्मक-भक्तिमार्गविषयक अनुबंध, मोठ्या साक्षेपाने आणि सप्रमाण प्रकट करताना स्कंद, विष्णू, ब्रह्म पुराणांचा केलेला धांडोळा, शीलालेख आणि या दैवताशी जोडलेल्या राजवटी, विविध पुरोहित व गृहस्थ घराणी यांचा संदर्भ देत केलेले विवेचन, स्थान महात्म्याचा केलेला सामाजिक व सांस्कृतिक विचार; समग्र सांस्कृतिक अभिसरण प्रक्रियेच्या, पुरातत्त्वशास्त्रीय, संस्कृतीशास्त्रीय, समाजशास्त्रीय, लोकसाहित्य आणि भाषावैज्ञानिक अभ्यासाला दिशा देणारा आहे.

दत्तसंप्रदायाचा इतिहास, अनुषंगाने आलेला नाथसंप्रदायाचा इतिहास, पश्चिमदक्षिण भारताच्या एकात्मतेला पूर्वोत्तर भारताचा अनुबंध जोडून अवघ्या एकात्म जंबूद्विपाच्या पायाभूत उभारणीचा दैवतकथाशास्त्रीय इतिहासच डॉ. ढेरे यांनी मांडला आहे.

महाराष्ट्रातील संतपरंपरेचा अभ्यास, त्याशी असलेला शैव-नाथ, वैष्णव, दत्त, गाणपत्य, शाक्त संप्रदायाचा अनुबंध, उलगडून मांडतांना डॉ. ढेरे यांनी केलेली संतवाङ्मयाची वाङ्मयीन, भाषिक, सांस्कृतिक आणि लोकधर्मी चिकित्सा, वाङ्मय चिकित्सेच्या अवघेपणाचा वस्तुपाठ देते.

विविध हस्तलिखिते आणि दुर्मिळग्रंथांचे संपादन करून वाङ्मयचिकित्सेची सम्यक दृष्टी वाङ्मयाचे सर्वांगे उद्‌घाटन करून, सांप्रदायिकांना, अभ्यासकांना, आस्वादकांना महाराष्ट्र सारस्वताचे आनंदप्रद दर्शन त्यांनी घडविले आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि शेख महंमद यांच्या वाङ्मयाचे चिकित्सक, मर्मग्राही साक्षेपी दर्शन घडवून डॉ. ढेरे यांनी संतवाङ्मयाचे आधारबंध स्पष्ट करीत भक्तिवाङ्मयाचे तात्त्विक आणि ललित बंधही उलगडून दाखविले. क्षेत्रपाळ देवता, यक्षसंप्रदाय यांचा शोध, महाराष्ट्रातील दुर्मिळ शीलालेखांचा अन्वयार्थ, विरगळांचे, नागयुगुलांचे सांस्कृतिक अनुबंध उलगडून डॉ. ढेरे यांनी लोकजीवनाचा गाभारा अभ्यासकांसाठी खुला केला. मागते, जोगते, भिक्षेकरी, आराधी या संस्थांना 'लोकसंस्कृतीचे उपासक' म्हणून अधोरेखित करीत, सनातन सांस्कृतिक प्रवाह आणि दैवतकथा व धर्मधारणा यांचे अनुबंध स्पष्ट करीत उपासकांची सामाजिक जीवनातील सांस्कृतिक, धार्मिक आणि तात्त्विक प्रतिष्ठा अधोरेखित केली हे त्यांचे कार्य केवळ अलौकिक होय.

वेद, ब्राह्मणे, उपनिषदे, दर्शने आणि पुराणे याचबरोबर बौद्ध, जैन परंपरेतील

कथात्मकता यांचा डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या एवढा विचार खचितकच कोणी केला असेल. भारतीय अतिप्राचीन इतिहासापासून वर्तमानकाळापर्यंतचे क्रियाप्रतिक्रिया आणि प्रवृत्ती, वृत्ती आणि प्रक्रिया यांचे भान राखत भारतीय लोकजीवनातील श्रेष्ठवान परंपरांचे मूलगामी चक्रनेमी आणि नित्यवर्तमान दर्शन लोकजीवनात शोधण्याचे महनीय कार्य डॉ. ढेरे यांनी केले आहे. त्यामुळे पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र, संस्कृतीविज्ञान, समाजविज्ञान, तत्त्वज्ञान, विविध शास्त्रे व कला त्याचबरोबर साहित्यशास्त्र आणि भाषाविज्ञान या सर्व ज्ञानशाखांना लोकबंधात्मक (लोकतत्त्वीय) दृष्टीने विचारात घेण्याची मूलगामी दृष्टी लाभली. मानवी जीवनाचा भूत, वर्तमान व भविष्याचा वेध घेण्यासाठीचे नेमके परिमाण यामुळे लाभले यात शंकाच नाही.

डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या संशोधक व्यक्तिमत्त्वाचा विचार प्रामुख्याने लोकसाहित्यविशारद म्हणून करावा लागतो. राजवाडे, सानेगुरुजी, डॉ. दुर्गा भागवत, डॉ. सरोजिनी बाबर यांनी लोकसाहित्यदर्शनाची परंपरा निर्माण केली हे खरे, मात्र देवतकथाशास्त्र आणि मानवी सांस्कृतिक जीवनाचा प्रवास या दृष्टीने लोकसाहित्याच्या अभ्यासाचे मूलगामीत्व डॉ. ढेरे यांनी अधोरेखित केले. वेदवाङ्मय, पुराणग्रंथ यांचा लोकबंधात्मक विचार करावा लागेल; अशा लोकतत्त्वीय अभ्यासमार्गाची प्रस्थापना डॉ. ढेरे यांनी केली. तत्त्वज्ञान, दैवतकथाशास्त्र, धर्माचार आणि लोकाचार यांचा नित्य अनुबंध असतो हे केवळ लोकसाहित्यशास्त्रीय अभ्यासाने स्पष्ट होऊ शकते. कारण लोकसाहित्याचा आविष्कार कला, क्रीडा, न्याय आणि समग्र सामूहिक किंवा सांघिक लोकाचार या स्वरूपात साधनपरंपरा, वर्तनपरंपरा आणि शाब्दपरंपरा यातून घडत असतो, याकडे त्यांनी चिकित्सक, साक्षेपी चर्चेच्या ओघात अनेक ग्रंथातून लक्ष वेधले. मराठी लोकसंस्कृतीचे उपासक, लोकसंस्कृतीची क्षितिजे, संतसाहित्य आणि लोकसाहित्य काही अनुबंध, लोकदैवतांचे विश्व, लोकसाहित्य : शोध आणि समीक्षा या ग्रंथांनी ही वैचारिक बैठक अतिशय भक्कम केली.

मूळ जीवनाच्या चलनपरंपरेतून, शास्त्रीय ज्ञानचलन परंपरा निर्माण होतात. त्या परंपरा पुन्हा लोकजीवनात प्रचलित होऊन लोकजीवनाच्या चलनपरंपरा निर्माण होतात. तपशील बदलत राहतात, प्रतिके, रूपके वाढतात बदलतात आणि नित्य वर्तमानात सनातनाचा लोकसंस्कृतीचा सारणीप्रवाह दृश्यमान होतो. हा सांस्कृतिक आणि दैवतकथाशास्त्रीय चक्रनेमीक्रम मानववंशपरंपरेत



अभिसरणात्मक प्रक्रियेसह घडतच राहतो. या प्रक्रियेचे दर्शन डॉ. ढेरे, आपल्या संशोधन यात्रेत अनेक संशोधन ग्रंथातून साक्षेपी विचारमांडणी, वादविवाद प्रक्रिया, मांडणी, पुनर्मांडणी, अलक्षित, दुर्लक्षित संदर्भांचे पुनर्गठन व त्यासह मांडणी करतांना विश्लेषणाच्या ओघात घडवितात. त्यामुळे अभिजन आणि लोक यांचा बंधानुबंध स्पष्ट होतो. अगदी प्राचीनतमपरंपरांना, वैदिक वाङ्मयाची प्रतिष्ठा मिळाली आणि वैदिक वाङ्मयाला लोकसाहित्य म्हणून प्रतिष्ठा मिळाली ती डॉ. ढेरे यांच्या मूलगामी चिंतनामुळे. लोकसाहत्याच्या जागतिक अभ्यास क्षेत्रात ढेऱ्यांचे हे कार्य ऐतिहासिक महत्त्वाचे आहे, यात शंका नाही.

विद्यावाचस्पतीपासून सर्वप्रकारच्या पदव्यांनी ढेरे विभूषित झाले. साहित्य अकादमी, महाराष्ट्र भूषण, ज्ञानोबा तुकोबा, महाराष्ट्र शासनाचे अनेक उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार, इतिहास संशोधन संस्थांचे पुरस्कार यांचा वर्षाव त्यांच्यावर होणे अत्यंत स्वाभाविक होते. पुण्यनगरीत पुण्यभूषण म्हणून गौरवून त्यांच्या ज्ञानसाधनेविषयी कृतज्ञता व्यक्त करणे ही अगदी नैसर्गिक गोष्ट होती. लोकजीवनाचा, लोकसंस्कृतीचा, भारतीय सनातनत्वाचा सतत विचार, चिंतन करणारा संस्कृतीउद्घाटक, साक्षेपी मूलगामी संशोधक म्हणून डॉ. रा. चिं. ढेरे यांचे ज्ञानावकाशात ध्रुवताऱ्यासारखे स्थान आहे, असे म्हणणे अतिशयोक्त ठरणार नाही.

या त्यांच्या संशोधन कार्याने मानव्यशास्त्रे, पुरातत्त्व, संस्कृती, भाषाविज्ञान, साहित्यशास्त्र आणि लोकसाहित्यशास्त्र अक्षरशः उपकारित झाले आहेत. या प्रवासात अनेक संशोधक अभ्यासक, गावोगावीचे कर्ते संस्कृतीउपासक जसे सहाय्यभूत झाले तसे त्यांच्या कन्या ज्येष्ठ विदुषी डॉ. अरुणा ढेरे या विशेष सहाय्यभूत ठरल्या. अशा संशोधनाला तेवढ्याच ताकदीचा, साक्षेपी, मूलगामी, व्यासंगी, शोधक असा वारस लाभला तर ज्ञानप्रक्रिया पुढे जाते. डॉ. अरुणा ढेऱ्यांच्या साधनासातत्याने ही ज्ञानप्रक्रिया प्रगमनशील राहील, यात शंका नाही. 'संस्कृती-संशोधनातून सामाजिक एकात्मतेकडे' असे ध्येय स्वीकारून 'डॉ. रा. चिं. ढेरे संस्कृती-संशोधन केंद्र' ही संस्था डॉ. अरुणा ढेरे यांच्या नेतृत्वाखाली, वर्षा गजेंद्रगडकर, प्रा. सुधीर दप्तरदार, नंदकुमार वाळवेकर आणि श्रद्धा कुलकर्णी आदींनी सुरू केली आहे ही अतिशय आश्वासक गोष्ट म्हणावी लागेल. पद्मगंधा प्रकाशनाचे प्रकाशक व एन.बी.टी.चे अध्यक्ष श्री. अरुण जाखडे यांनी डॉ. रा. चिं. ढेरे यांचे वाङ्मय संचित सतत प्रकाशात

आणण्याची मनीषा बाळगली आहे. महाराष्ट्रातील लोकसाहित्यविशारदांनी डॉ. रा. चिं. ढेरे यांचे समग्र चिंतन आपल्या अभ्यास व संशोधनातून सतत पुढे नेण्याचा संकल्प केला आहे. लोकमानसाचा आणि लोकसंस्कृतीचा उद्घाटक ज्ञानगभस्ती डॉ. रा. चिं. ढेरे या ज्ञानक्षेत्रातील संशोधन सातत्याच्या रूपाने नित्य प्रकाशमान राहील, यात शंका नाही!

●●●



# शिक्षण, साहित्य, संस्कृती क्षेत्रातील लोकसंग्राहक चिरतरुण कार्यकर्ता

## (प्रभाकर अनंत संत सर)

नाट्याभिनयाचा छंद लहानपणापासूनचा. अकोल्यासारख्या छोट्याशा तालुक्याच्या गावात, त्यात डोंगराळ, दुर्गम, आदिवासी भागात; पुण्यामुंबईसारखा छंद जोपासण्यासाठी किंवा त्या व्यवसायात जाऊन, निर्वाह करण्याइतपत वाव मिळणे शक्य नव्हते. बाजारांच्या दिवशी येणारे किंवा जत्रायात्रांत उभे राहणारे तमाशे, गावागावात घडणारी कीर्तने, जत्रायात्रांतील भवाडे, महाराष्ट्र नाटक मंडळी किंवा आनंद संगीत मंडळीसारख्या नाटक मंडळ्यांचे दोनचार वर्षांतून घडणारे प्रवास, कधीतरी येणारे टूअरींग टॉकीज, एका शेठीयाने गोडाऊनवजा जागेत खास तयार केलेले चित्रपटगृह, भटक्यांचे अर्थात, गारूडी, कोल्हाटी, डोंबारी, वाघवाले, नंदीबैलवाले, बहुरूपी इ. इ. मंडळ्यांचे पथप्रयोग यांतूनच नाट्यकलेचे संस्कार किंवा धडे मिळत. अकोल्यात हौशी नाटक मंडळी होती. ते एकत्र येऊन प्रयोग करीत. तालुक्यात पहिले हायस्कूल ''मॉडर्न हायस्कूल''. यांत मिरज-सांगलीकडून, पुण्या-मुंबईतून, नगरहून आलेली शिक्षकमंडळी १९५० पासून स्कूल गॅदरींगच्या निमित्ताने नाट्यप्रयोग घडवित. राष्ट्र सेवा दल कलापथक असे काही प्रवेशात्मक प्रयोग करीत. आवड असल्याने या सर्व केंद्रांतून मी नाट्यकण वेचले. प्रयोगांमध्ये भाग घेतला. चौसष्ट-पासष्टमध्ये म्हणजे एस.एस.सी. होताच मास्तर झालो. त्यामुळे स्वतः संवाद, नृत्ये, प्रवेश आणि तीन अंकी नाटक दिग्दर्शित करू लागलो. गावाने मला नावाजले, नव्हे

डोक्यावर घेतले. मनात सारखा विचार येई या गावात राहून तुटपुंज्या पगारात प्रपंचाचा गाडा ओढणे, राष्ट्र सेवा दल आणि नंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघात सैनिक आणि स्वयंसेवक म्हणून काम करणे यापलिकडे आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला वाव नाही. वक्तृत्व उत्तम आहे असेही लोक म्हणत. त्याला वाव कसा मिळणार आणि त्याचाही विकास कसा होणार? अडुसष्ट-एकोणसत्तर मधली गोष्ट. एकीकडे मी बह्यस्थ विद्यार्थी म्हणून ग्रॅज्युएट होऊ पाहात होतो. नाटकात करिअर करावे, याची तीव्र ओढ अधिक तीव्र झालेली. काय करावे कळत नव्हते. वाळवंटातील ओयासीस सापडावे तसे एक स्थान गवसले. प्रभाकर संत!

प्रभाकर संत मूळचे अकोल्यातले. त्यांच्याच वडाखालच्या संत-सोमणी वाड्यात जन्म झालेला. ते घरी आले. अगदी घरच्यासारखे आई-तात्यांशी बोलले. पण त्यावेळी मला ते फारसे महत्त्वाचे वाटले नव्हते. नंतर आईकडून मला त्यांच्याविषयी माहिती समजली. त्यांनी मला अंगाखांद्यावर खेळवले होते. आता ते खूप मोठे झाले होते. स्वतंत्र शिक्षण संस्था कल्याणमध्ये सुरू केली होती. या संस्थेच्या कल्याण, ठाणे अशा ठिकाणी शाळा होत्या. मनात विचार सुरू झाला. काय करावे? आपण कल्याण, ठाणेसारख्या मुंबईजवळच्या शहरात नोकरी करू लागलो तर, जबाबदाऱ्या सांभाळत आपले करिअरही करता येईल. प्रभाकर संतांकडे जायचे कसे? कल्याणमध्ये आता माझी ताई राहात होती. टाकळकर मामांचे थोरले बंधू वासुदेव टाकळकर म्हणजे मोठे मामा होते. त्यांच्याशी घरच्यासारखे संबंध. खूप विचार केला आणि ठरवले.

चांगले विस्तृत पत्र लिहिले. त्यात सगळी परिस्थिती आणि मनोदय स्पष्टपणे कळवला. पत्र पाठवले. वाट पाहात राहिलो. एक दिवस पोस्टकार्ड आले. त्यात मजकूर होता, ''कल्याणला येऊन भेटा. काय करता येईल पाहू.'' आशा पल्लवित झाल्या. अजून घरात आई-तात्यांनाही काही सांगितले नव्हते. कसे सांगणार? प्रपंचाची सगळी जबाबदारी माझ्यावर होती! आता कल्याणला जाऊन भेटायचे तर पुन्हा चर्चा होणारच. मी, घरात, प्रभाकर संतांनीच मला बोलावले आहे. त्यांचेच काही काम आहे, असे सांगायचे ठरविले. महत्प्रसायाने कल्याणला गेलो.

रणछोड भुवनमध्ये प्रभाकर संत राहात असत. त्याच चाळीत वरती



मोठे मामा राहात असत. संत-टाकळकरांत जवळचे नातेही होते. मी पोचलो. दार ठोठावले. उघडले गेले. ''कोण म्हणून सांगू?'' बसा, म्हणतांनाच प्रश्न विचारला गेला. ''अकोल्याहून अनिल सहस्रबुद्धे आलाय म्हणून सांगा.'' मी सांगितले. मनात विचारांचे काहूर माजले. येथे तर औपचारिकता होती. आपण तर घरगुती पद्धतीने पत्र लिहिले. काय विचारतील नि काय नाही. एक आधार होता मी संघाचे काम करीत होतो आणि तेही संघाचेच कार्यकर्ते होते; अशी माहिती मला मिळाली होती. शिवाय त्यांचे वडील दाजी संत यांना मी ओळखत होतो. त्यांचेच सतत येणे असे.

''काय पत्रलेखक, आलास का?'' प्रभाकर संत बाहेर येत मला म्हणाले. तेव्हापासून आजतागायत ते मला ''पत्रलेखक''च म्हणतात. आपण पत्र लिहिले हे बहुधा चुकलेच. घरच्यासारखे संबंध असलेल्या माणसाला असे पत्र कशाला लिहायचे; पत्रात काही चुकले तर नाही ना असे अनेक प्रश्न मनात गोंधळ उडवू लागले. ''अनिल, तू पत्र खूपच छान लिहितोस. सविस्तर, मुद्देसूद आणि संवादात्मक, छान!'' प्रभाकर संत म्हणाले. ''बरं काय घेतोस? चहा की...'' त्यांनी विचारले. ''नको, काहीच नको''. मी संकोचून म्हणालो. ''अरे, चहा घेतोस ना? मग घे ना.'' ते पुढे म्हणाले. थोडा मोकळेपणा आला. ''हं. मग तू काय इकडे, मुंबईकडे यायचं ठरवलयस? नक्की झालंय का? तू तिथं परमनंट असशील ना?'' त्यांनी एकदमच विचारले. आता बहुधा ''परमनंट नोकरी सोडून तू इकडे कसा येणार? घराच्या जबाबदाऱ्या?'' आदि सर्व गोष्टींवर मला समुपदेशन करवून घ्यावे लागणार असे वाटले. मी अंतर्मुख झालो. मी अकोल्यात मिळविलेली नोकरी अक्षरशः दारिद्र्याच्या क्वालिफिकेशनवर भीक मागून मिळवली होती. आपण यांना पत्र लिहून मूर्खपणाच केला असे वाटले. येथून पळून जाणेच चांगले असे वाटू लागले. तेव्हढ्यात मी प्रश्नांना उत्तरे देण्याची वाट न पाहता प्रभाकर संतच बोलू लागले. ''हे बघ, तुझा विचार चांगला आहे. तू परमनंट आहेस त्यामुळे त्या नोकरीत तुला तीन महिन्यांची नोटीस द्यावी लागेल. आपण असं करूया तू नोटीस दे. नोटीसीची मुदत संपण्याच्या दुसऱ्या दिवशी इथेच कल्याणमध्ये तुला मी जॉईन करून घेतो; म्हणजे राहण्याचा वगैरे प्रश्न सावकाश सुटेल. बघ कसं करतोस? नोटीस देताना मला कळव. जूनपासून तू इकडे ये. त्यात काही अडचण आली तर मला सांग. आम्हालाही एक चांगला ॲसेट मिळेल!''

त्यांचं हे बोलणं ऐकून माझ्या मनातल्या भीतीचं काहूर शांत झालं. ''चालेल.'' मी म्हणालो. ''मात्र जे करायचं ते शाळेतल्या आणि घरातल्या सर्वांना विश्वासात घेऊन कर!'' संत सरांनी सांगितलं. घरगुती संबंधाचं गारूड काय करू शकतं; त्याचा प्रत्यय मला आला. चहा घेतला. मी निघालो. हुरळलो होतो!

अकोल्यात आलो. खूप भवतीनभवती झाली. अखेर ''येऊ शकत नाही'' म्हणून कळवून टाकले. पण तेव्हापासून प्रभाकर संत यांच्याशी संबंध अधिक बळकट झाला. सतत संपर्क होत राहिला.

शिक्षक मतदार संघातून विधानपरिषदेसाठी प्रभाकर संत उभे होते. पहिले शिक्षक आमदार होण्याचा योग. निधीसंकलन आवश्यक होते. मी माझ्या तालुक्यातील शिक्षक मित्रपरिवारामध्ये फिरलो. समर्पित शिक्षक कार्यकर्ता विधानपरिषदेत शिक्षकांचे प्रश्न मांडण्यासाठी जाणार होता. मित्रांना समजावून सांगण्यात बऱ्यापैकी यश मिळाले. केलेले निधीसंकलन प्रत्यक्ष संत सरांच्या हवाली केले. ''अनिल तू कमाल केलीस! एवढे तू काही करशील असे वाटलेही नव्हते.'' संत सर म्हणाले. आता प्रभाकर संतांना सगळे संत सरच म्हणत होते. संत सर पहिले शिक्षक आमदार म्हणून निवडून आले. रा. स्व. संघ विचारांचा समर्पित कार्यकर्ता विधानपरिषदेत गेला. आमदार म्हणून कार्य करतांना एकही अधिवेशन असे गेले नाही की त्यात संत सरांनी शिक्षकांचे प्रश्न विधानपरिषदेच्या मंचावर मांडले नाहीत. सरांचा महाराष्ट्रभर बोलबाला झाला. शिक्षणमंत्री त्यांचा आवर्जून सल्ला घेऊ लागले. माझे संबंध अधिक दृढावलेले होते. खरे तर मला त्यांच्याकडून काही घ्यायचेही नव्हते. शिक्षकांचे प्रश्न, अडचणी, सर्क्युलरचे नेमके अर्थ मात्र, समजून घेण्यास त्यांची मदत होई. कार्यकाळात महाराष्ट्रातील अनेक शिक्षकांच्या घरी त्यांचा असा घरातली व्यक्ती म्हणून स्नेह दृढावला.

बहात्तर सालची गोष्ट. सुरेश लोखंडे नावाचा एक मित्र जोडला गेला होता. संगमनेरला बी.एड. करीत असतांना जोडला गेला. नोकरी मिळत नव्हती. त्याचे आईवडील चिंतेत होते. तोच सर्वांत थोरला. ''मुंबईत जातोस शिक्षक म्हणून? माझा संत सरांशी परिचय आहे. मी पत्र देतो पहा प्रयत्न करून''; मी सुचविले. सुरेश पत्र घेऊन गेला. पत्र दिले. ''अनिलचे पत्र घेऊन आलास ना. ठीक आहे. काही मुलाखतीची आवश्यकता नाही. उद्यापासून



ठाण्याच्या शाळेत रुजू हो!'' संत सरांनी सांगितले. संत सरांच्या मदतीने दोनचार मित्रांना मी नोकरी देऊ शकलो; ही माझ्या दृष्टीने खूप मोठी गोष्ट मला वाटते.

उद्‌बोधनवर्ग, चर्चासत्रे, अभ्यासवर्ग, मार्गदर्शनवर्ग, परीक्षांच्या दृष्टीने व्याख्यानमाला अशा उपक्रमाबरोबरच शिक्षक संघटना, शिक्षकांसाठीच्या पतपेढ्या, निरनिराळ्या ठिकाणी शाळांची उभारणी या व अशा गोष्टींमध्ये झोकून आजही सतत क्रियाशील असलेले संत सर, लोकसंग्रह करण्यातही तेव्हढेच रमलेले दिसतात. बारसे, मौंजी, विवाह, वास्तु, मर्तिके, उद्‌घाटने, गौरव समारंभ; साहित्य परिषदा, साहित्य मंडळे, वाचनालये यांसारख्या संस्थांचे विविध कार्यक्रम या सर्व गोष्टीत ते सक्रिय उपस्थिती नोंदवितात. ही त्यांची शिक्षण आणि संस्कृती क्षेत्रातील हालचाल सर्वांना हवीशी असते. गुणग्राहकतेने लोकसंग्रहातील व्यक्तींचे कौतुक करावे ते संत सरांनी. कार्यक्रमाला संत सर आले म्हणजे कार्यक्रमाची प्रतिष्ठा वाढते अशी मान्यता आहे. स्मरण एवढे दांडगे की बारीकसारीक गोष्टींची नोंद ते भेटताच उजळतात.

बहात्तर सालची गोष्ट. माझे लग्न ठरत होते. मुलगी पाहण्याचा कार्यक्रम झाला. कल्याणला मी सार्वत्रिकपणे माहित असण्याचे कारणच नव्हते. श्री. विनायकराव नातू अर्थात आता माझे सासरे श्री. आप्पा यांनी मला विचारले, ''कल्याणमध्ये आपल्या कोणकोण परिचित आहे?'' मला प्रश्नाचा रोख कळला. माझ्या ओळखीचे असे कल्याणमध्ये तीनचारच लोक त्यावेळी होते. श्री. वासुदेव टाकळकर मामा, श्री. गंगाधर सोमणी, श्री. दाजी संत आणि त्यांचे सर्व कुटुंबीय अर्थात श्री. प्रभाकर संत, त्यांचे बंधू डॉ. संत, सरांचे काका बाबा संत आणि माझे मेव्हणे श्री. शामसुंदर शाळिग्राम आणि त्यांचे कुटुंबीय. मी माझ्याकडून ही सर्व माहिती सांगितली. आप्पा नातू त्यावेळी काही बोलले नाहीत. माझ्याकडून मुलीला पसंती गेली. आप्पा त्यांच्या पत्नी, बंधू पतीपत्नी आणि मुलीला घेऊन अकोल्यात दाखल झाले. तेच मुळी संत वाड्यात. त्यांच्याबरोबर प्रभाकर संतांचे वडील दाजी संत होते. संतांचे टाळकरांशी नातेही होते. मी टाकळकर वाड्यात राहात होतो. ते सर्व टाकळकर मामांकडे दाखल झाले. यांच्याबरोबर दाजी संत कसे; मला कळेना. बैठकीत दाजींनीच सांगितले, ''प्रभाकर आणि नातू वर्गमित्र, त्यांनी प्रभाकरला गाठले आणि तुझी माहिती विचारली. मग इकडे येतांना त्यांनी प्रभाकरलाच बरोबर

येण्याचा आग्रह केला. त्याला काम होते. माझेही बरेच दिवसात येणे झाले नव्हते.'' आता सगळा प्रकार माझ्या लक्षात आला. प्रभाकर संत असे माझ्या विवाहालाही जामीन झाले.

मी एम.ए. झालो. पीएच.डी. झालो तेव्हा तर त्यांनीच कल्याणचे आमदार कापसे यांना सांगून डोंबिवलीच्या कॉलेजमध्ये येण्याचा आग्रह धरला. माझ्या पुस्तकांचे ते साक्षेपी वाचक झाले. दोनचार वेळा तर साहित्यिक कार्यक्रमांना त्यांनी मला प्रमुख अतिथी म्हणून बोलावले. साहित्य संमेलनातील परिसंवादात मी असावे असा त्यांचा आग्रह असतो. ठाणे जिल्ह्याचे म.सा.प. प्रतिनिधी म्हणून त्यांनी केलेले काम खरोखरीच वाखाणण्यासारखे आहे.

अगदी ११ मार्च २०१९ चा प्रसंग. विमल प्रकाशनद्वारा माझ्या ''अनंत'' कादंबरीचे प्रकाशन पुण्यात भांडारकर संस्थेच्या अर्थात प्राच्यविद्येच्या हॉलमध्ये डॉ. सदानंद मोरे, मनशक्तीचे श्री. प्रमोदभाई शिंदे, पूर्णवाद संप्रदायाचे अध्वर्यु श्री. गुणेशदादा पारनेरकर, डॉ. सु. प्र. कुलकर्णी यांच्या हस्ते होणार होते. तत्त्वज्ञानात्मक अभिनव अशी कादंबरी. ती ही स्वगत किंवा आत्मचिंतन स्वरूपात प्रयोगात्मतेने लिहिलेली. त्यांना कल्याणमधल्या माझ्या साडूंकडून अर्थात अनिल आपट्यांकडून प्रकाशनाचे कळाले. हा महामना, रसिकराज, लोकसंग्राहक, साहित्यसंस्कृतीचा उपासक कार्यकर्ता, वयाच्या ब्याण्णवव्या वर्षी धडपडत तेथे पोचला. मला विलक्षण आनंद झाला. तेव्हढीच काळजी वाटली. त्यांचा उत्साह, हालचाल मात्र ऐन बावीशीतल्या तरुणाला लाजविणारी होती. माझे भरभरून कौतुक तर केलेच पण हॉलमध्ये आलेल्या श्रोत्यांमधील अनेक लोक त्यांच्या भोवती जमा झालेले मी पाहिले तेव्हा मी थक्क झालो. अंतर्मुख झालो.

●●●



# मिरासदारी

## (द. मा. मिरासदार)

मी अकोलेसारख्या आदिवासीबहुल, मराठमोळ्या ग्रामीण भागातला. जन्मलो नि वाढलो तिथेच. ग्रामीण जीवनातील माणसे आणि त्यांच्यातलं माणुसपण, ग्रामीण जीवनशैली, निर्मळता आणि गावगुंडीही अनुभवत लहानचा मोठा झालो. अठराव्या वर्षीच मास्तर झालो. साहित्याची गोडी लागलेली. लहानपणीच जत्रायात्रा, कीर्तन आणि ठाकराठुकरांचे गावगन्ना आणि बाजारचे तमाशे पाहाता आले. खुमासदारी कळली. याच सगळ्या वळणावर 'माझ्या बापाची पेंड', 'व्यंकूची शिकवणी', 'माझी पहिली चोरी', 'झोप', 'भुताचा जन्म', 'चुटक्याच्या गोष्टी', 'विरंगुळा', 'गफलत', 'चकाट्या', भोजन भाऊ', 'देशी उपाय' अशी विनोदी म्हणून लोकप्रिय झालेली द. मा. मिरासदारांची कथा सांगणारी आणि ग्रामीण जीवन मिश्कीलपणे आणि चटकदारपणे उभी करणाऱ्या पुस्तकांनी मलाही वाचनाची चटक लावली. गावची चावडी, पार, कट्टा, अड्डा या गोष्टी ग्रामजीवनाची हृदये आहेत, मन आणि सारंकाही आहेत; याची जाणीव झाली. मी हळूहळू लिहू लागलो होतो. 'भरारी आणि भानगडी' हे माझं नाटक सत्तर साली आले. ते मुंबईशी जोडलेल्या अस्सल ग्रामीण जीवनाशी निगडित चिरेबंदी कट्ट्यावरून. ग्रामीण शेतीशी निगडित माणसांना शेतकामाच्या व्यग्रतेबरोबरच पारावरला, चावडीवरला, अड्ड्यावरला रिकामटेकडेपणा कसा मिळतो; हेही प्रत्यक्ष अनुभवत होतो. एकप्रकारे माझ्यातील कलावंत, साहित्यिक आणि माणुसवेड्या मनाला द. मा. मिरासदारांनी साद घातली.

मॉडर्न हायस्कूलच्या गॅदरिंगची परंपरा मोठी. प्रतिवर्षी या ८ वी ते ११ वी पर्यंतच्या, आदिवासी ग्रामीण जीवनातील, अकोले तालुक्यातील पहिल्या हायस्कूलमध्ये; फडके सरांनी आणि देशपांडे सरांनी, साहित्यिक प्रमुख पाहुणा आणण्याची परंपरा निर्माण केलेली. सांस्कृतिक कार्यक्रमांत रस घेणारा, काही लिहिणारा असा मी, मास्तर असल्यामुळे; मी द. मा. मिरासदारांना अकोल्याच्या शाळेत आणायचे ठरवले. पुण्यात त्यांना जाऊन गाठले. तोवर त्यांनी लिहिलेल्या कथांवरील सिनेमाही गाजू लागले होते. भीत भीत गेलो, पण दिलखुलास गप्पा मारून त्यांचा होकार घेऊन परतलो. ''काय, द. मा. यायला तयार झाले?'' विचारलें तेव्हा मी मोठ्या फुशारकीने म्हणालो, ''हो''. ''द.मा.'' आले. त्यांचा परिचय करून देण्याचे काम माझ्याकडे ओघानेच आले. मी त्यांच्या कथांमधून अनुभूत होणाऱ्या वैचित्र्य, विसंगती, इरसालपणा, भाबडेपणा, बेरकीपणा, यांच्या किश्यांची भरमार करीत; त्यांच्याच समोर त्यांचा परिचय करून देतांना, लांबण लावीत, परिचय करून दिला. किस्से ऐकून समोरचे खळखळून हसत तसतसा मला चेव येई. खुद्द मिरासदारांचे भाषण जेव्हा सुरू झाले तेंव्हा ते म्हणाले, ''सहस्रबुद्ध्यांची कमाल आहे. अहो, मला भीती वाटू लागली की आता मला भाषण करायला वेळ राहील की नाही? त्याहीपेक्षा आता माझं भाषण कोणी ऐकेल की नाही? पण एक खरं माझ्या साहित्याचा खरा रसिक वाचक मला भेटला, याचा मला आनंद वाटला.'' 'द.मां.'चे हे बोलणे ऐकून मी थोडा खट्टू झालो. आपले चुकलेच असे वाटले. ह्याचबरोबर 'खरा रसिक वाचक' या त्यांनी चढविलेल्या आभूषणाने मनोमनी सुखावलो सुद्धा.

द. मा. मिरासदार साहित्य संमेलनाची निवडणूक हारले होते. तेव्हा माझे मन दुखावले गेले होते. 'द.मां.'सारखा विनोदी साहित्यिक कथाकथक ही निवडणूक हारतो म्हणजे काय? या सुमारास मी आता नगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून सेवारत होतो. आदिवासी जीवनावर पीएच.डी. केलेला आणि कथा, कादंबरी, नाटक, कविता लेखन करणारा साहित्यिक म्हणून माझा परिचय होता. नगरच्या लोकांनी मला महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेच्या नगर शाखेचा कार्याध्यक्ष केले. अध्यक्ष होत्या डॉ. लीला गोविलकर. त्या आमच्या विभागप्रमुख तशाच महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या जिल्हा प्रतिनिधी. त्यावेळी साहित्य परिषदेच्या नगर शाखेला विभागीय साहित्य



संमेलन घ्यायचे सुचविले होते. डॉ. गोविलकरांनी माझ्याशी विचारविनिमय करून संमेलन घेण्यास संमती दिली. मी त्यांना सुचविले, ''आपण प्रा. द. मा. मिरासदारांना विभागीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून बोलावू या का?'' याची दोन कारणे होती. एक तर मी रा. स्व. संघाशी संबंधित होतो आणि द. मा. मिरासदार हेही या परिवाराशी घनिष्ठ परिचित होते. विशेषतः 'ए.बी.व्ही.पी.'च्या माध्यमातून. डॉ. गोविलकरांना माझी सूचना आवडली. मीही एक पत्र 'द.मां.ना माझ्या परिचयाच्या आठवणींचे लिहिले. डॉ. गोविलकरांनी पुण्यात हालचाली केल्या आणि संमेलनाध्यक्ष म्हणून स्वीकृतीचे पत्र घेऊनच त्या आल्या. झाले. माझ्या उत्साहाला उधाण आले. माझे माझ्या संस्थाचालकांशी संबंध अतिशय चांगले. त्यामुळे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना, त्यातही विशेष तडफदार अशा श्रीमान रत्नाकर दसऱ्यांना खूपच उत्साह आला. डॉ. गंगाधर मोरजे माझे पीएच.डी.चे गाईड, गुरुवर्य. त्यांच्या घरी आम्ही रोज जमत असू. वर्तमानपत्रात विभागीय साहित्य संमेलनाची बातमी देऊन मोकळे झालो. आणि येथेच माशी शिंकली. ''विनोदी लेखक द. मा. मिरासदार यांच्या अध्यक्षतेखाली नगर शहरात विभागीय साहित्य संमेलन'' अशी बातमी झळकली आणि तथाकथित विरोधकांचा 'इगो' दुखावला. ''कोणालाही विश्वासात न घेता संमेलन आयोजनाची मनमानी'' अशी विरोधी बातमी झळकली. चर्चा, पत्रकबाजी, आरोप-प्रत्यारोप आणि काय काय रोज येऊ लागले. मला अशा गोष्टींची अजिबात सवय नव्हती. मी व्यथित झालो. हमाल पंचायतीचे अध्यक्ष आणि नगराध्यक्ष शंकरराव घुले हेही मोरजाई मठीत असत. ते म्हणाले, ''सर, आम्हा राजकारण्यांना पत्रकबाजीची सवय असते, घाबरू नका. नेटानं काम चालू ठेवा.'' पण ''प्रा. द. मा. मिरासदार यांची संमती न घेताच अध्यक्षपद घोषित'' अशी बातमी झळकली. मी डॉ. लीला गोविलकर यांच्याशी बोललो. खूप अस्वस्थता आली. मदत करणारे लोक हे काय चाललंय म्हणू लागले. डॉ. गोविलकर म्हणाल्या, ''काय करूया?'' मी म्हणालो, ''बदनामी होणार नाही असे काही करूया.'' ''थांबा मी पुण्यात जाऊन येते'' त्या म्हणाल्या. पुण्यात गेल्या. विचारविनिमय झाला. आल्या. म्हणाल्या, ''सध्या स्थगित करण्याचा निर्णय झाला.'' 'मोरजाई'त 'द.मां.'चे पत्र फोटोकॉपीसह प्रसिद्ध करावे असे ठरले. दुसऱ्या दिवशी 'केसरी'मध्ये 'संमेलन तूर्तास स्थगित' अशी बातमी पहिल्या पानावर झळकली. याच

बातमीत मधोमध चौकटीमध्ये द. मा. मिरासदारांच्या पत्राची फोटोकॉपी होती. तथाकथित विरोधकांना हे सर्वाधिक झोंबले. पुन्हा 'कोणालाही विश्वासात न घेता संमेलन स्थगित' अशी बातमी झळकली. त्यातील काही लोकांनी तर मला आणि मॅडमना गाठून; त्यांनी संमेलनासाठीची मदतीची कोणती तयारी केली; हे सांगण्याचा प्रयत्न केला. भरपूर कारव झाला. एकूण नगरमध्ये साहित्य क्षेत्रातील असाहित्यिक गावगुंडी अनुभवण्याचा अनुभव मात्र आला.

'सत्यनारायण थापाडे पाटील' ही माझी प्रयोगात्म ग्रामीण विनोदी अशी लीळाचरित्रात्मक कादंबरी प्रकाशनासाठी सज्ज होती. प्रकाशन पुण्यात व्हायचे होते. ही कथात्मक आणि विनोदी अशी साहित्यकृती असल्याने 'द.मां.'च्या हस्ते प्रकाशन व्हावे असेही मला वाटत होते. ही ग्रामीण पर्यावरणातील कादंबरी असल्यानेही द.मा. योग्यच होते. सोबत ग्रामीण साहित्यात अग्रणी असलेले आनंद यादव यांनाही बोलवायचे ठरले. नगरचे प्रतिनिधी म्हणून डॉ. सु. प्र. कुलकर्णी यांना निमंत्रित केले. दिलीप महाजनांनी संपर्क केला तेव्हां 'द.मां.'नी आनंदाने निमंत्रण स्वीकारले. मला आनंद झाला. साहित्य परिषदेच्या सभागृहात झालेल्या समारंभात द.मा. बोलू लागले. ते काय बोलतात याकडे सगळ्यांचे लक्ष होते. ''सहस्रबुद्ध्यांनी विनोदी कादंबरी लिहून माझ्यावर मात केली. अहो, मी विनोदी कादंबरी लिहिण्याचं ठरवलं होतं. झालं नाही. सहस्रबुद्ध्यांनी बाजी मारली. मला वाटतं मराठी वाङ्मयात विनोदी कादंबरी बहुधा ही पहिलीच असावी. आणखी असेलही पण मला आठवत नाही. पण मला यात सत्यनारायण थापाडे या मानसपात्राच्या निमित्ताने ग्रामीण जीवनातील गमतीशीर गोष्टींचा खजिना उघडल्यासारखे वाटले. सहस्रबुद्ध्यांसारखे विनोदी लेखक पुढे येत आहेत. त्यामुळे विनोदाचं दालन समृद्ध होईल असा विश्वास वाटतो.'' प्रा. द. मा. मिरासदार यांच्या या वक्तव्याने मी फुगून गेलो होतो. तेव्हढ्यात ते म्हणाले, ''कारसेवक सत्यनारायण सारख्या लीळांत सहस्रबुद्धे गंभीर का झाले; कळत नाही. त्यामुळे कादंबरी नंतरच्या टप्प्यावर वैचारिक वळण घेते. त्यामुळे निखळ विनोदी लेखनाला बाधा येते; याकडे त्यांनी लक्ष द्यायला हवे.'' त्यांच्या या वक्तव्याने मी अंतर्मुख झालो. पुढे तर माझे विनोदी लेखन मावळलेच. वैचारिक, संशोधनात्मक लेखनाकडेच मी वळलो. असो. '' 'द.मा.' आणि आनंद यादव यांना एकाच व्यासपीठावर कसे?'' असा प्रश्नही कुजबुजला गेला. तेव्हा मात्र डॉ. सु. प्र. म्हणाले, ''असे काम फक्त सहस्रबुद्धेच करू शकतात.''

पहिले समरसता साहित्य संमेलन जळगावला होते. 'द.मां.'च्या हस्ते उद्घाटन होते. भेट झाली. ''नवीन काय?'' मी माझ्या नव्या पुस्तकांविषयी बोललो तेव्हां तर ते म्हणाले, ''अरे, आमचा विनोद मधेच सोडून दिलात काय?'' मग मी जरा धिटाईनेच म्हणालो, ''सर, विनोदच सोडून दिला तर जगण्यात आमोद कसा राहील? विनोदाला पर्याय नाही.'' 'द.मा.' अक्षरशः खळखळून हसले. एव्हाना 'द.मा.' अ. भा. म. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होऊनही पावले होते. अध्यक्ष म्हणून त्यांना सर्वदूर सारखी निमंत्रणे येत होती. 'मी तो हमाल'चे लेखक आप्पा कोरपे यांना पुण्यात सामाजिक कार्यगौरव पुरस्कार होता. पुरस्कार 'द.मां.'च्या हस्ते होता. आम्ही भेटलो. द. मा. मिरासदारांनी आस्थेवाईकपणे आप्पांची चौकशी केली. समरसता साहित्य संमेलनप्रसंगी आप्पांचा परिचय मी करून दिला होता. परिचय दुणावला. दोनपाच मिनिटांची भेट, मला अधिक सुखावून गेली. 'द.मां.'नी लक्षात ठेवून आप्पांची चौकशी करतांनाच माझ्या कामाचे कौतुकही केले होते. आप्पांना तर खूपच समाधान मिळाले. म्हणाले, ''एवढा मोठा माणूस, पण सगळं लक्षात ठेवतो, चौकशी करतो.'' साहित्यिक हा समाजजीवनात अलौकिक असता कामा नये, हे द. मा. मिरासदारांकडून शिकावे हेच त्यांच्या आस्थेवाईक संवादातून सूचित होत होते.

ठाण्याच्या साहित्य संमेलनात माझा परिसंवादात सहभाग होता. मी अभ्यागत कक्षात निवांत बसलो होतो. पाचसात लोकच कक्षात होते. तेव्हढ्यात दारातून द. मा. मिरासदार आले. प्रवेशताच इकडेतिकडे पाहू लागले. माझे लक्ष गेले. पटकन उठून धावत त्यांच्यापर्यंत गेलो. ''दादा या या बसा, मी आपण आल्याचे सांगतो.'' दादांना हात धरून आणून कोचावर बसविले. ते माजी संमेलनाध्यक्ष असल्याने त्यांची व्यवस्था बहुधा दुसरीकडे केली असावी. मी जाऊन व्यवस्थेत सांगितले. लगबग झाली. कार्याध्यक्ष दातार हे माझ्या साडूबंधूंचे थोरले भाऊ होते. ते स्वतःच त्यांचे स्वागत करायला आले. तेव्हढ्यात 'द.मा.' म्हणाले, ''सहस्रबुद्धे येथे होते म्हणून बरे. नाहीतर...'' ते ज्या मिश्कीलपणे म्हणाले त्या मिश्किलीतून अनेक अर्थ व्यंगात्मकतेने सूचित होत होते. आम्ही हसलो, तेव्हढेच वरमलोही.

●●●

# मनोमनीचा संमेलनाध्यक्ष

## (प्रा.डॉ. आनंद यादव)

'स्पर्श कमळे' हा स्फुट लेखांचा संग्रह मी वाचत होतो. शरीर आणि भाव यांचा स्पर्श झालेली वस्त्रे व्यक्तिमत्त्वाचं, भावपूर्ण हालचालींचं दर्शन घडवतात. नवरसांचं स्पर्शकारी उद्घाटन करण्याचं सामर्थ्य वस्त्रं स्पंदित करू शकतात, याचं नितांत सुंदर प्रत्ययकारी दर्शन वस्त्रांना होणाऱ्या प्रतिभा स्पर्शातून होत होतं. ती वस्त्रं किती तरी वेळ, नव्हे कालावधी माझ्या मनाला व्यापून राहिली. आनंद यादवांच्या या संग्रहानं मला आनंद यादवांकडे आकर्षित करून घेतलं. या संवेदनशील माणसाला भेटावं असं वाटे. पुढे 'झोंबी'नं तर ग्रामीण कृषीजीवनाची अनुभूती अवघ्या महाराष्ट्राला घडविली. 'पांढरी' आणि 'काळी' दोन्ही मातींमध्ये फुललेली महाराष्ट्राची ग्रामीण रसरसती संस्कृती नागरी जनांनाही स्पर्श करीत राहिली. या साहित्यिकाला भेटलंच पाहिजे असं मला सारखं वाटत होतं, तोपर्यंत माझी 'डांगाणी' प्रसिद्ध झाली होती. तिनं महाराष्ट्राचं लक्ष, सह्यशिखरांच्या कुशीतल्या डांगाण परिसरातल्या निसर्गश्रीमंत आदीम जीवनाकडं खेचून घेतलं होतं. योग आला. मी नगरला पेमराज सारडा महाविद्यालयात आलो आणि सेमिनारच्या निमित्ताने, पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात विभागप्रमुख म्हणून पदसिद्ध असलेल्या आनंद यादवांना आम्ही निमंत्रित केलं.

आनंद यादव आले. आमची भेट झाली. परस्परांशी काही बोलण्या अगोदरच आनंद यादवांनी उत्सुकतेनं विचारलं, '' 'डांगाणी' तुमचीच ना? अहो काय लिहिलीये तुम्ही, अवघं डांगाण अंतरबाह्य बोलकं केलंत, खूप



सुंदर!'' खरंतर मला त्यांच्याशी त्यांच्या साहित्याविषयी संवाद करायचा होता. तरी मी सुखावलो. नकळत आमची मैत्री केव्हा झाली कळलंच नाही.

'सत्यनारायण थापाडे पाटील' या मानसपात्रांच्या काही कथा वेळोवेळी प्रसिद्ध करून मी 'सत्यनारायण थापाडे पाटील' असं एक गमतीशीर पात्र उभं केलं होतं. त्याचं समग्र जीवन बहुपेडीपणे त्या कथांमधून चित्रित झालं होतं. या सगळ्या कथांच्या स्वरूपातून एक वेगळाच शब्द मनात स्फुरला 'लीळा' ह्या तर 'सत्यनारायणांच्या लीळा आहेत' असं वाटलं आणि एक अभिनव प्रयोग आपसुकच घडला. लीळाचरित्रात्मक कादंबरी 'सत्यनारायण थापाडे पाटील', मोरया प्रकाशन पुणे यांनी या कादंबरीच्या प्रकाशनाची जबाबदारी घेतली. या कादंबरीचा बाज विनोदी आणि ग्रामीण असा होता. विनोदी कादंबरीचा प्रयोग जवळपास मराठी कादंबरीत नव्हता. या कादंबरीचं प्रकाशन पुण्यात व्हावं असा आग्रह धरला. हे प्रकाशन ग्रामीण आणि विनोदी साहित्यातल्या दिग्गजांच्या हस्ते व्हावं असं ठरवलं आणि डॉ. आनंद यादव आणि प्रा. द. मा. मिरासदार यांचं नाव समोर आलं. आमचे ज्येष्ठ स्नेही डॉ. सु. प्र. कुलकर्णी यांना कल्पना आवडली आणि प्रकाशन समारंभ स्वाभाविकपणे मोठा दिमाखदार केला. हे पुस्तक मित्रमंडळींनाच अर्पण केलेले असल्याने, मोठ्या संख्येने मित्र कार्यक्रमाला उपस्थित राहिले. आनंद यादवांनी मोठ्या साक्षेपाने 'सत्यनारायण थापाडे पाटील' कादंबरीतील ग्रामीण जीवनाचे पदर कसे कादंबरीतून उलगडले जातात, यावर भाष्य केले. मीच लिहिलेले असले तरी मलाही ते स्पर्श झाले नव्हते. मी आणि प्रकाशक दोघेही चांगलेच सुखावलो. आनंद यादवांनी माझ्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीचे भरभरून कौतुक तर केलेच पण ग्रामीण साहित्यातील या आगळ्या साहित्यकृतीचे मनःपूर्वक स्वागत केले, पुढे सर्वाधिक खपाचे पुस्तक म्हणून कादंबरीचा गौरवही झाला. महाराष्ट्र टाइम्स आदि वर्तमानपत्रांतून, 'लोकप्रभा'सारख्या साप्ताहिकातून त्यावर लिहिले गेले. मी आणि आनंद यादव जवळ आलो. मित्र म्हणून खरे पण माझ्या मनात त्यांचा आदर, प्रतिभावंत साहित्यिकाबरोबरच साक्षेपी असा प्रवाह समीक्षक म्हणूनही दुणावला.

मच्छिंद्र मालुंजकर यांची 'एम.फिल.'ची मौखिक परीक्षा विद्यापीठात होती. गोडसे भटजींच्या 'माझा प्रवास'वर त्यांचे 'एम.फिल.' माझ्या मार्गदर्शनाखाली झाले होते. मच्छिंद्र मालुंजकर विद्यापीठात एम.ए. झालेले

त्यामुळे त्यांचेही विद्यार्थी. या व्हायवाच्या प्रसंगी आमची 'माझा प्रवास'वर जी चर्चा झाली त्यामुळे तर आनंद यादवांच्या व्यासंगाविषयी मी प्रभावित झालो. मालुंजकरांशी बोलता बोलता ते सहज बोलून गेले, ''सहस्रबुद्धे तुम्ही बह्यस्थ म्हणून शिकत गेलात तरी माणसं अनुभवत गेलात त्यामुळे इतिहास, वर्तमानाचं भाष्य मोठ्या साक्षेपानं आणि सर्वांगीण स्वरूपात तुम्ही करता, तुम्ही पुण्यातच यायला हवं.'' त्यांच्या या बोलण्यात माझा गौरव होता हे खरं, पण त्याचवेळी माझ्यातला साहित्यिक, संशोधक आणि संशोधक मार्गदर्शक पारखण्याचं त्यांचं सामंजस्य अधिक मौलिक वाटलं. ते मला त्यांच्या ग्रामीण साहित्य चळवळीतला मानू लागले. खरे तर मी आदिवासींमध्ये, ग्रामीण भागात वाढलो होतो; तरी मी साहित्याकडे, कोणत्या एका प्रवाहाचे साहित्य म्हणून, कधीच पाहात नव्हतो. त्यांच्या दृष्टीने ग्रामीण साहित्याचे दालन माझ्यामुळे पुष्ट होते आहे असे त्यांना वाटत होते. हे माझ्या गौरवाचेच होते.

समरसता साहित्य संमेलनाची संकल्पना संघपरिवारात प्रकटली. पहिले समरसता साहित्य संमेलन जळगावला व्हायचे होते. डॉ. आनंद यादवांना अध्यक्ष म्हणून निमंत्रित करण्याची कल्पना पुढे आली, त्यांनी ते पद स्वीकारले. त्यानिमित्ताने नगर जिल्हा समरसता परिषद स्थापन करण्याचा मनोदय होता. माझ्याशी विचारविनिमय झाला. मी माझे स्नेही श्री. पुंडलिक गवंडी यांना जिल्हाध्यक्ष करावे असे सुचविले. विशेष म्हणजे पुंडलिक गवंडी यांचा संघाशी काहीही संबंध नव्हता. माझे मित्र म्हणून त्यांनी स्वीकारले. असेच आश्चर्य आणि कुतुहल मला डॉ. आनंद यादव यांच्याविषयी देखील वाटत होते. ग्रामीण साहित्य चळवळीत डाव्या विचारसरणीच्या मंडळींचा भरणा होता. डॉ. आनंद यादवांचा संघाशी काही संबंध असावा किंवा आहे; हे मला माहीत नव्हते. जिल्हा शाखेच्यावतीने समरसता साहित्य संमेलन आणि परिषद यांविषयी एक मेळावा घ्यायचा ठरले. पुंडलिक गवंडींना या मेळाव्याला आनंद यादव येणार आणि मेळाव्यात त्यांची अध्यक्ष म्हणून घोषणा होणार; याचा विलक्षण आनंद झाला होता. कारणही तसेच होते. 'हातोडा' हे पुंडलिक गवंडींचे आत्मचरित्र नुकतेच मोरया प्रकाशनाने, माझ्या विनंतीनुसार प्रसिद्ध केले होते. ते पुस्तक डॉ. यादव यांनी वाचले. त्यांना ते खूप आवडले. त्यांनी श्री. गवंडींचे भरपूर कौतुक केले. पुस्तकाला माझी प्रस्तावना होती. समरसता साहित्य मूल्य या दृष्टीने ती डॉ. यादवांना खूपच आवडली होती. मेळाव्याला



बऱ्यापैकी निमंत्रित आले. खूप गप्पा झाल्या. डॉ. यादव, मी आणि पुंडलिक गवंडी भेटलो; तेव्हा डॉ. यादवांनी 'हातोडा'चे कौतुक करतांना त्यातील समरसता मूल्य उलगडले. स्वाभाविक मी लिहिलेल्या प्रस्तावनेवर आमची चर्चा झाली. त्या प्रस्तावनेचे समीक्षा आणि वैचारिक व्यूह या दृष्टीने असलेले महत्त्व त्यांनी हेतुपूर्वक माझ्यासमोर उलगडले. ग्रामीण चळवळीत डाव्या म्हणविणाऱ्या लोकांसोबत काम करणाऱ्या या आमच्या आवडत्या साहित्यिकाने एवढे उदारपणे उजव्या म्हणविणाऱ्या परिवारातील विचाराचे स्वागत करावे याचे आश्चर्य वाटले.

जळगावच्या समरसता साहित्य संमेलनाला मोठ्या उत्साहाने आम्ही बारापंधरा जण गेलो. त्यात पुंडलिक गवंडी तर होतेच, पण साहित्यिक म्हणून, आमच्या डॉ. गंगाधर मोरजे यांच्या नित्याच्या बैठकीतून उदयाला आलेले. 'मी तो हमाल'चे लेखक आप्पा कोरपे आमच्या बरोबर होते. ते तर हमाल माथाडी कामगार चळवळीचे होते. डॉ. गंगाधर मोरज्यांनी त्यांच्याकडून त्यांच्या आठवणींचे कथन करवून; 'सांगीवाचे लिखित' स्वरूपात ते पुस्तक कु. अश्विनी कावळे यांच्याकडून ट्रान्सक्रिप्ट करविलेले होते. पण त्या पुस्तकाच्या प्रसिद्धीची गळ मी मोरया प्रकाशनच्या दिलीप महाजनांना घातली होती. त्यांनीच माझी 'मातंगी' कादंबरी प्रसिद्ध केलेली. अशा समरसतेला बळ देणाऱ्या विविध स्तरातून आलेल्या व्यक्तींमुळे डॉ. यादव खूष होते. माझा तर डॉ. सुधीर रसाळांबरोबर थेट परिसंवादात सहभाग होता. या संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात लिखित भाषणांच्या पलिकडे जाऊन आमचा उल्लेख करण्याचा मोह डॉ. आनंद यादव यांना आवरला नाही. आम्हा तिघांनाही या उल्लेखाने खूपच आनंद वाटला. डॉ. यादवांविषयीचा आदर मनात शतगुणित झाला. डॉ. आनंद यादवांच्या या उदार, स्वागतशील आणि समावेशक व्यक्तिमत्त्वाला ग्रामीण साहित्य चळवळ परिवाराने, हाताळलेल्या चिमणीला ज्ञातीबांधवांनी टोचून मारावे तसे वाट्याला आले. ग्रामीण साहित्य संमेलनाच्या स्टेजवर त्यांना येऊ दिले नाही. असे होऊनही डॉ. यादवांनी समरसतेच्या संमेलनांमध्ये येण्याचे सोडले मात्र नाही. त्यामुळे तर माझ्या मनातला आदर अधिक पुष्ट झाला.

आनंद यादव अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढवीत होते. माझ्याशीही त्यांची या संदर्भाने चर्चा झाली. चर्चेच्या

ओघात अध्यक्षपदावरून थेट प्रगत व्यापक, मूलभूत असे चिंतन साहित्य समाज आणि स्थितीगती याविषयी घडावे असे माझे मत तर; त्यांनी अक्षरशः नोंदवून घेतले. डॉ. आनंद यादव अध्यक्ष म्हणून निवडून आले; परंतु एका वेगळ्याच आणि असहिष्णूपणे निर्माण झालेल्या (केलेल्या) वादात अडकले. तुकारामांवरील त्यांच्या कादंबरीची दुसरी आवृत्ती मेहता पब्लिकेशनने प्रसिद्ध केली होती. पहिली आवृत्ती संपून बराच अवधी लोटला होता. तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वाला बाधित करणारा किंबहुना त्यांची नको त्या प्रकारची बदनामी करणारा मजकूर त्यांनी लिहिला असल्याचा शोध काही लोकांना लागला. त्या मंडळींनी डॉ. यादवांवर बहिष्कार टाकण्यासाठीची चळवळच सुरू केली. डॉ. आनंद यादवांनी आपल्या परीने आणि 'कादंबरी' वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने लोकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. लोकांना समजून घ्यायचेच नव्हते. लोकांना डॉ. यादवांची बदनामी करून त्यांना समाजमनातून बहिष्कृत करायचे होते. हळूहळू चळवळ वाढली. त्यांनी संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्यासाठी जाऊ नये असे निरोप येऊ लागले. संमेलनात त्यांनी पाय ठेवला तर संमेलनच उधळून लावण्याच्या धमक्या आल्या. निरनिराळ्या तथाकथित क्रांतिकारी महाराष्ट्राभिमानी आणि पुरोगामी संघटना सरसावल्या. वर्तमानपत्रे आणि दृक्श्राव्य प्रसारमाध्यमांनी आपली कमाई करायला सुरुवात केली. हितैशी म्हणविणाऱ्या लोकांनी, दूरदृष्टीने डॉ. यादवांनी संमेलनाला जाऊ नये असे आवर्जून सांगण्यास सुरुवात केली. यादवांनी माफी मागून झाले. पब्लिकेशनने आवृत्ती बाजारातून स्टॉप करून झाले. मात्र चळवळ्यांना हे नको होते. डॉ. आनंद यादवांना संपूर्ण बहिष्कृत करायचे होते. मी डॉ. यादवांना फोन केला, ''सर तुम्ही निवडून आलेले अध्यक्ष आहात. लोकशाहीत निवडून आलेल्याला संरक्षणात त्याचा अधिकार बजावता येतो. आपण संमेलनाला जा. त्यामुळेच कावकाव थांबेल.'' मी परोपरीने सरांना समजावीत होतो. सरांचा अभिमन्यू झाला होता. त्यात सर्वश्रेष्ठ पोलिस अधिकाऱ्याने त्यांना 'न जाणे हिताचे' असे सर्वतोपरीने समजावल्याचे सरांनी सांगितले. ''काळ सोकावेल!'' असा इशाराही मी दिला. पण मी होतो तरी कोण? ना त्या तथाकथित क्रांतिकारकांच्या चळवळींना शांत करू शकणारा, ना त्यांना समरसतेच्या सिंहासनावर बसविणारा. एक शुभेच्छुक आणि सनदशीर मार्गावर विश्वास ठेवणारा मित्र! सर संमेलनास गेले नाहीत. संमेलनाध्यक्षाविना संमेलन झाले. हे मराठी भाषा, साहित्य आणि



महाराष्ट्राला भूषणावह करून दाखविण्याचे महान सहिष्णूतापूर्ण कार्य चळवळ्यांनी केले खरे! जगद्‌गुरू संत तुकाराम प्रत्यक्ष प्रकट झाले असते; तर त्यांनी डॉ. आनंद यादवांना संमेलनाध्यक्षांच्या खुर्चीवर बसवून; काय बोलायचे, बोल लिहायचे ते लिही, असेच सांगितले असते. असो.

●●●

# महाराष्ट्र कविकुलगुरु
## (कुसुमाग्रज तथा तात्यासाहेब शिरवाडकर

महाकवी, कविवर्य कुसुमाग्रज, महाराष्ट्र सारस्वताचं दिव्य लेणं आहे. कवी, नाटककार, कादंबरीकार म्हणून; विश्वाला मोहिनी घालणारे वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज, मराठी मनामनात खोलवर रुजून व्यापलेलं संस्कृतिसंचित आहे. 'ज्ञानपीठ'चा शिरपेच मस्तकावर धारण करतांनाच, महाराष्ट्राच्या मातीला, धर्माला, आर्त प्रजेला, गौतमीगंगेच्या तीरावर वननिवासी असलेल्या श्रीरामांना नतमस्तक होत; लोकगंगेत विनम्रभावाने प्रवाहित होतं. ''श्री राम श्री राम'' नामोच्चार करीत; समग्र 'लोक'ला पसायदानातील 'कल्पतरूंच्या आरवात' सुखी असण्याची कामना हे संस्कृतिसंचित करीत राहातं.

'स्फूर्ती प्रकाशन मंच'च्या ग्रंथयागाच्या निमित्ताने आम्ही द्वादश कवी-कवयित्रींचा, द्वादश कवितासंग्रहांचा एकत्रित असा 'प्रणव-कुंज' आकारणार होतो. कुसुमाग्रजांचे अर्थात कविकुलगुरुंचे आशीर्वाद असावेत म्हणून; मी स्वतः आणि कुंजातील काही सदस्य नाशिकला तरणतारण तलावावरील कुसुमाग्रजांच्या निवासस्थानी पोचलो. तसे घरात कोणीच नव्हते. कोणीतरी देखभाल करणारा असावा. त्यांनी आम्हाला बसायला सांगितले. आम्ही येत असल्याची पूर्वकल्पना दिलेली होतीच. आम्हाला फार वेळ वाट पाहावी लागली नाही. बाहेर येताच ''बरीच वाट पहावी लागली'', पुटपुटल्यासारखे. पण आम्हाला सहज ऐकू येईलसे तात्यासाहेब बोलले. ''नाही नाही तात्यासाहेब'' आम्ही उगा बोलायचे म्हणून बोललो. 'हं, काय म्हणताय?''



मग मात्र मी बोलू लागलो. 'प्रणव-कुंज'ची माहिती सांगितली. आशीर्वाद हवेत, म्हणालो. पुढे मोठ्या धाडसाने कवितारूप आणि पत्ररूप अशा दोन्ही तऱ्हेने हवेत; हेही सांगून टाकले. तेव्हढ्यात मघाचाच माणूस एका कुंड्यात लाडू घेऊन आला. तात्यासाहेबांनी मग पुढे काही न बोलता; बसल्या खुर्चीतूनच आम्हाला ''हं'' म्हणून लाडू घेण्यासाठी बोलावले. स्वतःच्या हाताने तात्या आमच्या हातावर लाडू देऊ लागले. हातात प्रसाद मिळावा तसे वाटले. वाकून झुकून नमस्कार करीत गेलो. तात्यांचे मुखाने 'श्री राम, श्री राम' सुरूच होते. आम्ही पाणी वगैरे घेता घेता आता आपले काम होणार हे गृहित धरून; उगाचच विचारायचे म्हणून औपचारिकपणे विचारले, ''काय चाललंय नवीन, तात्यासाहेब?'' ''आता ऽ काय? काही एक मर्यादेनंतर आपले काहीच नसते. एक आदिवासी गाव दत्तक घेतलंय, तिथे लायब्ररी, आरोग्य सेवा केंद्र, काही विद्यार्थ्यांना मदत इ. असं, काय, काय करतोय, श्रीराम!'' तात्या म्हणाले. आम्ही थक्क झालो. मनात माणुसकीचा गहिवर दाटला, आपण कोठे आहोत; याचे भान येऊन थोडा संकोचही वाटला. मग पुन्हा मनाचा हिय्या करून म्हणालो, ''तात्या, आशीर्वाद...'' मनात विचार येत होते, पाठवतो वगैरे म्हणतात की काय? पण सुखद धक्का बसला. तात्यासाहेबांनी पांढऱ्या स्वच्छ कागदाचे लेखन पॅड जवळ घेतले. हाती शाईपेन घेतला. लिहू लागले. कोणतेही आढेवेढे न घेता, मानभावीपणा न करता तात्यासाहेबांनी कवितेच्या चार ओळी आणि अभिप्रायाच्या चार ओळी लिहून माझ्या हातात दिल्या. वर मलाच म्हणाले, ''ठीक आहे ना? आणखी काय?'' मी कविता वाचली. त्यातील एकाच चरणात तात्यांनी वेदोपनिषदांचं सार आणि सर्वधर्मातलं तत्त्वज्ञान सहज प्रकट केलं होतं. चरण होतं ''प्रेम आहे संस्कृतीचा सारांश''. कवितेखाली कुसुमाग्रज अशी स्वाक्षरी केली होती. 'प्रणवकुंज' विषयक अभिप्रायाखाली वि. वा. शिरवाडकर अशी सही होती. मी हरखून गेलो. धन्य झालो. पुन्हा एकदा तात्यासाहेबांना नमस्कार करून मोठ्या विजयी मुद्रेने पुन्हा नगरला परतलो. 'प्रणवकुंज' मधील प्रत्येक कवितासंग्रहाच्या मलपृष्ठावर कविकुलगुरु कुसुमाग्रजांचा आशीर्वाद संजीवकपणे प्रेरणा देतच आहे.

डॉ. गंगाधर मोरजे यांचा षष्ट्यब्दी समारंभ मोठ्या थाटात, आम्ही, डॉ. गुरुवर्यांच्या सर्व विद्यार्थ्यांनी करावयाचा ठरविला. डॉ. गंगाधर मोरजे यांचे पितृतुल्य असे ज्येष्ठ बंधू आप्पा बैठकीला उपस्थित होते. डॉ. गंगाधर मोरजे

यांचे प्रिय आणि आदरणीय प्रा. वसंत दावतर, डॉ. स. गं. मालशे, मोरजे सरांचे पीएच.डी.चे गाईड कविवर्य डॉ. वि. म. कुलकर्णी आणि तत्त्वज्ञ श्री. मे. पु. रेगे यांनी आलंच पाहिजे असे ठरले. त्यातच प्राचार्य डॉ. पंडितराव पवार यांनी वेगळीच सूचना मांडली, ''आपण कुसुमाग्रजांना बोलावूयाका?'' या सूचनेला नको कोण म्हणणार? पण कुसुमाग्रजांचा आणि डॉ. मोरजे सरांचा संबंध नेमका कसा आणि कोणता? मला काहीच कळेना. डॉ. गंगाधर मोरजे आणि सौ. पद्मा मोरजे यांचा त्यांचा चांगला परिचय तर होताच; तात्यासाहेबांनी सौ. पद्मा मोरजे यांच्या कवितासंग्रहाला अभिप्रायही लिहिला होता. तेव्हांपासून डॉ. गंगाधर मोरजे यांचा शैक्षणिक आणि संशोधनात्मक प्रवास तात्यांना ज्ञात होता, हे कळले. मग त्यांना बोलवायचे ठरले. पण त्यांच्या तारखा जुळतील का? त्यांच्या कोणत्या अटी असतील. त्यांना कोणी भेटायचं? कसं? असे अनेक प्रश्न उपस्थित झाले. डॉ. पंडितराव म्हणाले, ''अहो, माझं त्यांच्याकडे सारखं येणंजाणं आहे. मी अनेकदा कवि अनिलांविषयी त्यांच्याशी चर्चाही केली आहे. आमच्या कॉलेजांमध्ये आम्ही त्यांना नेलं आहे. त्यांना आणायची जबाबदारी माझी.'' झाले सगळेच प्रश्न मिटले. त्यांना निमंत्रण द्यायला मी आणि पंडितराव सोबत डॉ. वाडकर असे जायचे ठरले. डॉ. मोरजे म्हणाले, ''मीही येतो.'' डॉ. पंडितराव म्हणाले हरकत नाही. मग अपॉईंटमेंट घेऊन जायचे निश्चित झाले. मग डॉ. पंडितराव पवारांनी अपॉईंटमेंट घेतली. वेळेवर, ठरल्या दिवशी आम्ही गेलो. भेटलो. तात्यांनी यायचे मान्य केले. म्हणाले, ''पण कार्यक्रम शैक्षणिक व्हावा, पुढाऱ्यांची उगा गर्दी नको.'' झाले. डॉ. गंगाधर मोरजे यांच्या स्वभावाला खाद्यच मिळालं. त्यांनी कोणाही आणि कितीही मोठ्या पुढाऱ्याला स्टेजवर येऊ देणार नाही असे आम्हाला बजावले.

कविवर्य कुसुमाग्रज नगरमध्ये जवळपास तीसचाळीस वर्षांनंतर येणार होते. त्यांचे स्वागत करायला नगरमधली सर्व साहित्यिक, कवी, त्यांना ओळखणारे, विविध संस्था आणि पुढाऱ्यांचे तर विचारूच नका, सारेच सरसावले! आता आमची पंचाईत झाली. आम्ही, नगराध्यक्ष शंकरराव घुले, आमच्या मोरजाई मठीतील बैठकीतले असल्याने; त्यांना विचारले. चर्चा करता करता नगरला दिल्लीगेटबाहेर मोठा मंडप उभारून तेथे नगरकरांनी त्यांचे स्वागत करावे असे ठरविले. या सर्व संधीचा फायदा मी स्वार्थीपणाने घ्यायचे ठरविले. डॉ. पंडितरावांच्या कानाला लागलो आणि प्लॅन ठरला.

नाशिकहून नगरला पोहचतांना पेमराज सारडा महाविद्यालय अगदी तोंडाशी. डॉ. लीला गोविलकर, डॉ. सु. प्र. कुलकर्णी आणि मी स्वतः तात्यांना परिचित. सारडा महाविद्यालयात तात्यासाहेबांच्या विश्रांतीची, फ्रेश होण्याची, स्वागत आणि चहापानाची जय्यत तयारी केली. 'एम.ए.च्या विद्यार्थ्यांशी गप्पा' असा अर्ध्या तासाचा कार्यक्रम आखला. सारडा महाविद्यालयात आनंदाला उधाण आले. सडे, रांगोळ्या, फुलांची पखरण, पेढ्यांचे बॉक्स, चहा-कॉफी-बिस्किटस्‌ची सोय. सारे काही दिमाखदारपणे आयोजित झाले. डॉ. पंडितरावांनी ठरल्याप्रमाणे प्रवासात तात्यासाहेबांना कल्पना दिली. ''हां हे बरं झालं'' तात्यासाहेब म्हणाले. त्यामुळे पंडितरावही खुशीत होते. तात्यांच्या सहवासात त्यांची विशेष काळजी घेणारे असे एक गृहस्थ पंडितरावांचे नातलगच होते. त्यांना तर ही कल्पना खूपच आवडली. प्रवेशद्वारातून आत येतांनाच स्वागताची तयारी पाहून तात्या भारावून गेले. त्यांना विश्रांतीच्या खोलीत, सर्व सोयी आहेतना; याची खातरजमा करून आराम करावयास सांगितले आणि आम्ही कामाला लागलो. विद्यार्थ्यांनी सुंदर फलकलेखनासह हॉल सजवला होता. आम्हा प्राध्यापकांना तर काव्यपंढरीचा पांडुरंग आल्यासारखे वाटत होते. कविवर्य, नाटककार, कुसुमाग्रजांनी विद्यार्थ्यांशी दिलखुलास गप्पा मारल्या. म्हणाले, ''एवढा निरागस, मनमोकळा संवाद अनुभव, खूप दिवसांनी अनुभवला. तुमच्या कॉलेजनं मला ऋणी केलं.'' तात्या मनापासून बोलले. विद्यार्थी प्राध्यापक सारेच भारावले. मी हळूच तात्यांजवळ गेलो. ''तात्या, आपल्या हातानं विद्यार्थ्यांना खाऊ, प्रसाद मिळावा, पेढे आणलेत.'' मी म्हणालो, ''अरे, मी नाशिकहून आणले असते. मिळतात तिकडे.'' तात्या म्हणाले. मी प्रसन्नपणे हसलो. तात्यांच्या हातांनी पेढा घेतांना फोटो काढण्यासाठी एकच तारांबळ उडाली.

ठरल्याप्रमाणे दिल्लीगेटला नगरकरांनी तात्यांचे, अर्थात कवी, नाटककार अर्थात साहित्यिकाचे अक्षरशः भव्य स्वागत केले. सर्व थरातली माणसं सरसावली होती. हार, फुले, शाली, श्रीफळे यांचा डोंगर झाला. ''आता, मला मी परमेश्वर झालो असे वाटते आहे. अहं ब्रह्मोस्मी की काय म्हणतात, ते असे असते का? पण असो मी नगरकरांचे चाळीस वर्षानंतर चारशे पटीने वृद्ध झालेले प्रेम अनुभवले. आभारी आहे!'' तात्या काय बोलतात, ते, लोक

कानात प्राण आणून ऐकत होते.

बरोबर सायंकाळी पाच वाजता सहकार सभागृहात डॉ. गंगाधर मोरजे यांचा षष्ट्यब्दीपूर्ती सोहळा सुरू झाला. नगर लोटले. सभागृह तुडुंब. पण डॉ. मोरजे सरांच्या आज्ञेप्रमाणे व्यासपीठावर नगराध्यक्ष शंकरराव घुले यांच्याशिवाय कोणी राजकारणी फिरकला नाही. समोर बसलेले लोक पाहून शंकरराव संकोचले. चुकल्यासारखे वाटले. कुसुमाग्रजांनी मात्र या कार्यक्रमाच्या आखणीची सुरुवातीलाच प्रशंसा केली. सहज जाता जाता त्यांनी पुन्हा सारडा महाविद्यालयातील विद्यार्थी भेटीच्या कार्यक्रमाचा उल्लेख केला. ''विद्यार्थ्यांशी मनमुराद गप्पा मारल्या, सारडा कॉलेजमध्ये! मात्र शेवटी मी कवी, नाटककार आहे की हलवाई किंवा बुवा आहे; तेच कळेना. मी आपला प्रत्येक विद्यार्थ्याला पेढे देतोय आणि नमस्कार स्वीकारतोय. पण मी श्रीरामांचा जप केला. विश्रांती झाली आणि प्रसन्नताही आली. दिल्लीगेटवर तर मी बहुधा दिल्लीच सर करून आलोय असे वाटून छाती फुगू लागली. मी घाबरलो. पण या सगळ्यातून डॉ. गंगाधर मोरजे यांची एक शिक्षकाची शिस्त, दरारा आणि सर्वांच्या समावेशाचे कौशल्य मला जाणवले. मी कृतार्थ झालो.'' तात्या बोलत होते. नकळत त्यांनी डॉ. मोरजे सरांच्या निमित्ताने शिक्षकवृत्तीचा गौरव केला.

खरे तर कुसुमाग्रजांची नि माझी प्रथम भेट झाली ती मी एफ.वाय.बी.ए. चा अभ्यास करतांना त्यांचा 'विशाखा' हा कवितासंग्रह अभ्यासाला होता. त्यामुळे कवितेची शक्ती, मंत्रात्मकता आणि प्रतिभेची उत्तुंगता, उत्फुल्लता, ओजस्विता काय असते याचा अनुभव वि. स. खांडेकरांनी लिहिलेल्या प्रस्तावनेच्या साहाय्याने घेत गेलो आणि कुसुमाग्रजांचाच झालो. त्यांच्या कवितांचा प्रभाव एव्हढा झाला की माझा 'आव्हान' हा पहिला कवितासंग्रह कुसुमाग्रजांच्या आशीर्वादानेच प्रकटतो आहे असे मला सारखे वाटत राहिले. 'आव्हान'च्याही मलपृष्ठावर तात्यांचे आशीर्वाद आणि अभिप्राय आहेत. मी 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास' असा प्रबंध करीत असतांना अहमदनगर जिल्ह्याच्या गॅझेटच्या १८७६ च्या पहिल्या आवृत्तीत, मला 'कोळ्यांचा पहिला उठाव' आणि 'कोळ्यांचा दुसरा उठाव' वाचायला मिळाले. त्यातील पहिला उठाव म्हणजे आदिवासी महादेव कोळी, ठाकर, कानडे यांनी ब्रिटिश सरकारशी हिंदवी स्वराज्याच्यावतीने



दिलेला पहिला लढा आहे असे वाटले. मी ऐतिहासिक कादंबरी लिहिली आणि कादंबरीचं बारसं करतांना कुसुमाग्रजांची नाग आणि मुंगुस यांचा लढा चित्रस्पर्शित्वाने मांडणारी 'विशाखा'तली कविता डोळ्यासमोर प्रतिमारूप होऊन उभी राहिली. मी कादंबरीला नांव दिले 'अहिनकुल'!

ज्येष्ठ नागरिकांची ज्येष्ठता सर्वार्थाने नाकारण्याची अहमहमिका सुरू असलेल्या युगात वि. वा. शिरवाडकरांच्या 'नटसम्राट'ने वेड लावले मला, महाराष्ट्राला आणि मराठी नटसम्राटांनाही. ज्ञानपीठ प्राप्त वि. वा. शिरवाडकर तथा 'कुसुमाग्रज' त्यांच्या अक्षरवाङ्मयांसह, संवादासह मराठी मनाशी सतत संवाद साधतच आहेत.

●●●

# मनातलं पु.ल. साठवण
## (पु. ल. देशपांडे)

''इन प्रेझेंट, डिग्री घेण्याची, ही माझी पहिलीच वेळ आहे. एरवी आतापर्यंतच्या सर्व डिगऱ्या मला इन ॲबसेन्शीयाच घ्याव्या लागल्या. आम्ही प्रत्येक डिग्रीला मुळी थर्ड रँकमध्ये जेमतेम पसार झालेलो असायचो त्यामुळे हा प्रश्नच कधी आला नाही. असं असूनसुद्धा कोणतीही परीक्षा न घेता मला थेट सन्मान्य डीलिट देण्याचा प्रसंग विद्यापीठाने ओढवून घेतला. परीक्षा घेतली असती तर हा प्रसंग ओढवला नसता. मी माझ्याबरोबरच विद्यापीठाचं आणि आपणा सर्वांचं अभिनंदन करतो. आपण या प्रसंगाचे साक्षी आहात.'' पु.लं.नी सुरुवातीलाच सभागृहात हास्यकल्लोळ घडविला.

१९८० चा पुणे विद्यापीठातला पदवीदान समारंभ ऐतिहासिकच म्हणावा लागेल. कारण (पु.लं.च्याच भाषेत बोलायचं तर) या समारंभात जगातल्या तीन उत्तुंग प्रतिभावंतांना; पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंनी मंचावर पदवीविभूषित केलं. त्यातील पहिले म्हणजे, साहित्य, संस्कृती, संगीत, कला इ. क्षेत्रातील उत्तुंग कामगिरीबद्दल सन्मान्य 'डीलिट' देऊन सन्मानित केलेले पु. ल. देशपांडे, दुसरे म्हणजे, 'लज्जागौरी', 'चक्रपाणी' आदि ग्रंथांच्या लेखनाबद्दल सन्मानित केलेले डॉ. रा. चिं. ढेरे, आणि या दोन महामनांबरोबरच 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास' या प्रबंधाबद्दल पीएच.डी.ने सन्मानित झालेले, तथाकथित महामना अस्मादिक होत. या समारंभाने मी भलताच खूष होतो.

याच प्रसंगीचा चहापानाचा प्रसंग. पु.लं.शी बोलावं त्यांना, भेटीचं



स्मरण द्यावं. आपण पु.लं.शी बोलतोय हे अनेकांनी पाहावं. अशी बालसापेक्ष उत्कट इच्छा स्वाभाविकपणे त्यांच्यासमवेत चहापान प्रसंगी; माझ्याही मनात निर्माण झाली. मी जवळ गेलो. अर्थात मोठ्या शिताफीनं. (लोचटपणा करायची फारशी सवय नसतांना) ''मी अनिल सहस्रबुद्धे. मागं आपल्याला निमंत्रण देण्याच्या निमित्तानं आपल्या घरी आलो होतो.'' मी पटकन सांगितले. ''असं का?'' एव्हढेच पु.ल. बोलले. तेव्हढ्यात त्यांच्याशी समारंभाचे प्रमुख पाहुणे बोलू लागले. मी हिरमुसलो. एक म्हणजे मला त्यांनी ओळखलेच नसावे या पराभवानं आणि दुसरे म्हणजे मी बोलत असतांना मधेच हे पाहुणे का कोलमडले; या गोष्टीनं. पण मी हार मानली नाही. माझी ओळख ते नक्कीच विसरले नसतील या आशेनं मी पुन्हा माझा प्रयत्न चालूच ठेवला. संधी मिळाली. मी पुन्हा त्यांना सन्मुख होत म्हणालो, ''मी अकोल्याला स्नेहसंमेलनाला निमंत्रित करायला आलो होतो.'' मी जरा अपेक्षेने त्यांच्या स्मृती जागवण्याचा प्रयत्न केला. ''अरे हो हो. तुम्ही अनिल सहस्रबुद्धेना, त्या हरिश्चंद्र, कळसुबाईच्या परिसरात आदवासी भागातले ना!'' पु.लं.नी मला न टाळता म्हटलं आणि मला हुरूप आला. ''आपल्याला पीएच.डी. आहे ना? अभिनंदन!'' मला आता आणखीच उत्साह आला. ''या एकदा निवांत तुमच्या विषयावर मला बोलायला आवडेल'' असं म्हणत, मग मात्र त्यांनी मला कटवले. तिथं आणखी किती वेळ देणार, अशी मनाची समजूत घालून, मी स्वतःला धन्य मानलं. अखेर मी जिंकलो. डॉ. भीमराव माझ्याकडे लक्षपूर्वक पाहात होते.

''अरे वा, भेटलात का पु.लं.ना? गुड!'' डॉ. भीमराव म्हणाले. मला मी योग्य केल्याची पावती मिळाली, बरे वाटले. पु. ल. देशपांडे आणि डॉ. रा. चिं. ढेरे यांना ज्या समारंभात डीलिट मिळाली, त्याच समारंभात मला पीएच.डी.ची डिग्री घेता आली; याचं विलक्षण अप्रुप वाटलं. आजवर किती मित्रांना कदाचित वारंवारही मी ते ऐकवलं असेल.

अकोले, मॉडर्न हायस्कूलची स्नेहसंमेलने भव्य असायची. प्रत्येक स्नेहसंमेलनाला कोणीतरी ख्यातकीर्त असा साहित्यिक, कलावंत प्रमुख पाहुणा म्हणून येत असे. आमचे गुरुवर्य व मुख्याध्यापक ह. वि. फडके यांनी असा पायंडाच पाडला होता. मी सांस्कृतिक कार्यक्रमाचा प्रमुख म्हणून काम करायचो. स्वाभाविकपणे पाहुणा पटवून आणण्याची जबाबदारी माझ्यावर असायची.

ह्याच कामगिरीच्या निमित्ताने मी. पु.लं.ना पत्र लिहिले. नंतर लँडलाईनवरून फोन केला, सुदैवानं त्यांनीच तो उचलला. मला अपॉईंटमेंट मिळाली. मोठ्या उत्साहाने पुण्यात गेलो. उतावीळपणे रिक्षाने थेट घर गाठले. दरवाजाच्या पुढ्यात उभा राहिलो. बेल दाबली, अगदी दाबूनच धरली म्हणाना. दार उघडण्याच्या आवाजाबरोबरच, ''कोणये, काही मॅनर्स आहेत? काय हवंय?'' कोणा बाईंनी दार उघडले होते, पण एक थोबाडीत मारून विचारावे तसे विचारले होते. बाई तर चांगल्या दिसत होत्या; पण खेकसणे? अहो माझा ससा झाला! मी चाचरतच म्हणालो, ''सरांना भेटायचंय.'' ''अगोदर वेळ घेतलीये?'' पुन्हा त्याच चढ्या आवाजात ''हो, हो, आजच बोलावलंय'', मी. ''अहो, पण किती वाजता?'' मॅडमनी विचारलं. मी हबकलो. मला काहीच आठवत नव्हतं पण हिय्या करून म्हणालो, ''ते....'' पण मॅडमनी पुढे बोलूच दिले नाही. ''सव्वाअकरा वाजता या, सहस्रबुद्धे ना?'' मॅडम म्हणाल्या. ''ठीक आहे! पण...'' मी काही बोलणार तोच धाडकन दरवाजा आपटला गेला. मला माझं कुत्रं झाल्यासारखं वाटलं. निघालो. जवळपास एक तास टाईमपास करायचा होता. बंगल्यांची लेन, जवळपास हॉटेल दिसत नव्हतं. तेव्हढ्यात एक रिक्षा मोकळी आली. विचार केला, जावं डेक्कनवर, पण पुन्हा विचार केला त्यातच वेळ गेला आणि सव्वाअकराला नाही पोचलो, तर? म्हणून इकडेतिकडे चकरा मारत वेळ घालवावा, असं ठरवलं. चकरा मारू लागलो. जगाच्या अंतापर्यंत सव्वाअकरा वाजणारच नाहीत की काय; असं वाटू लागलं.

अकरा दहा! माझ्या घड्याळात पाहिलं. जीव एकवटला. पुन्हा दारापर्यंत पोहोचलो. उगाचच घड्याळाकडं पाहिलं. अजून दोन मिनिटं होती. ''बापरे! थांबलो. बेल वाजवावी!'' मनाशीच पुटपुटलो आणि बेल वाजवलीच. काही क्षण गेले पलीकडून पावलांचा आवाज आला. दार उघडलं. समोर प्रसन्न, हसतमुख, स्वागतकर्ते डोळे, गोल चेहरा, होय, स्वतः पु.लं.नीच दार उघडलं होतं. ''या सहस्रबुद्धे, या. तुम्हाला थांबावं लागलं ना! मी जरा लिहित बसलो होतो! सॉरी हं!'' पु.ल. बोलत होते. मला आता एकदम स्वर्गात गेल्यासारखं वाटलं. मी मानभावीपणे म्हणालो, ''काही नाही सर!'' ''या... बसा''. बसलो. ''पाणी घ्या'' समोर पाण्याचा ग्लास होताच, भाईंनी तो स्वतः माझ्या हातात दिला. मी पाणी प्यालो. ''आता बोला काय म्हणताय?''



भाईंनी म्हणजे पु.लं.नी बोलायला सुरुवात केली. मी पण 'भाई' या नावानं संबोधत भिडायचं, असं ठरवलं होतं. ''भाई, मी अकोल्याहून आलो, आमचं 'मॉडर्न हायस्कूल' असं 'हिंद सेवा मंडळा'चं हायस्कूल आहे'' मी बोलू लागलो. तोच भाईंनी मध्येच सुरू केलं ''हो हो. तुम्ही पत्रात लिहिलंय सारं. तुमच्या गावातून प्रवरा वाहाते ना? का हो भंडारदरा कितीसा लांब आहे?'' भाईंनी विचारलं, आणि मग हरिश्चंद्रगड, रत्नगड, कळसूबाई, विश्रामगड, भंडारदरा, रंधाफॉल, अगस्ती आश्रम, रामायण नि महाभारत केव्हढ्या गप्पा भाई मारत राहिले. जवळपास अर्धातास गेला. तेव्हढ्यात मघाच्याच बाई चहा घेऊन आल्या. प्रसन्न आणि प्रेमळ वाटल्या. ''मग मघाशीच काय झालं होतं?'' मनाशीच म्हणालो. ''भाई, झालंय तुमचं की वेळ आहे?'' मॅडमनी विचारलं. ''झालं झालं. काही नाही संपलंच आहे. एक पाच मिनिट'' भाई म्हणाले. ''घ्या चहा घ्या'' भाईंनी मला चहाचा पाहुणचार केला. मी पुन्हा त्यांना काही म्हणू लागलो, ''होईल हो सारं, तुम्ही पत्रात लिहिलंच आहे ना सगळं. मला तो परिसर पाहायचाच आहे. दंडकारण्य ना? अहो रामायण खरं तिथंच घडलं!'' भाईंनी मला पुन्हा बोलतं बंद केलं तरी मी कसला ऐकतो.य एकदमच म्हणालो, ''भाई, मग पत्रात कळवली होती ती तारीख नक्की करतो'' मी म्हणालो. ''हो, हो, मी पत्रानं कळवतो. बाकी ठीक?'' भाई म्हणाले, ही मला निघण्याची सूचना होती. ''भाई, आपण मलाच सांगितलं असतं तर नियोजनाच्या दृष्टीने ठीक झालं असतं!'' मी म्हणालोच. ''नाही नाही. कळवतोना ताबडतोब!'' असं म्हणत ते उठलेच. मग माझा नाईलाज झाला. मी झुकून नमस्कार केला. ''येतो'' मी म्हणालो. 'या, या. जपून जा हं'' भाई दारापर्यंत मला सोडायला आले की दार लावायला आले होते. ते मला अद्यापही उमगलं नाही. भाईंनी आमंत्रण स्वीकारलं. पत्रानं कळवतो म्हणाले. सगळ्या परिसराची माहिती मोठ्या आस्थेवाईकपणाने घेतली. दारापर्यंत आले. भेटीतल्या या सर्व सकारात्मक गोष्टींनी भाई नक्की येणार, याची खात्रीच वाटली. या संमेलनाला मी पु.लं.नाच आणणार होतो.

मी मराठीचा मास्तर असल्याने मला पु.ल. अभ्यासक्रमात भेटणे स्वाभाविकच होते. 'बटाट्याची चाळ' १० वीच्या वर्गात शिकवतांना पु.ल. मला कोचरेकर मास्तरांबरोबर भेटले. 'व्यक्ती आणि वल्ली'मध्ये मी भरपूर चकाट्या पिटल्या. सांस्कृतिक कार्यक्रमाचीही जबाबदारी माझ्याकडेच असतांना

आणि माझ्या मुलाला नाटकाची आवड असल्यामुळे मी 'वयं मोठं खोटं' बसवलं त्यावेळी पु.ल. मला प्रत्येक बाल्यावस्थेतल्या मोठं होण्याच्या हौसेत आणि प्रत्येक प्रौढवृद्धात बाल्य जपण्याची हौस जपताना प्रपंचातल्या सुखदुःखाचा खेळ कसा खेळता येतो याचा अनुभव देत गेले. 'वयं मोठं खोटं' हे बालनाट्य आहे, हे 'खोटं' हे तर तत्त्वज्ञान नाट्यमय आहे. कैवल्याची अगाध लीला प्रपंचात कशी अनुभवावी याचा तो वस्तुपाठ आहे. 'वर्ल्ड इज द स्टेज अॅन्ड एव्हरी मॅन इज अॅन अॅक्टर'चा तो लेसन आहे. पुढे पेमराज सारडा महाविद्यालयात आल्यावर 'अपूर्वाई' आणि 'पूर्वरंग'तले संचार अनुभव वाचतांना आणि शिकवितांना पाश्चात्य आणि पौर्वात्य संस्कृतीचे तौलनिक आकलन, इतक्या सहजपणे घडले की स्वतः अनुभूत आल्यासारखे वाटले.

डॉ. भीमराव कुलकर्णी यांच्या कन्येच्या विवाहाचा प्रसंग. पुण्यात लग्न. डॉ. भीमराव हा साहित्यजगतातला कर्ता पुरुष. या समारंभाला पुण्यातले बहुतांशी साहित्यिक उपस्थित राहाणे अपेक्षितच होते. सर मला म्हणाले, ''अनिल तुझ्यावर एक कामगिरी!'' ''सांगाना सर'' मी म्हणालो. ''हे बघ आत्ता पु.ल. येतील. त्यांचं स्वागत करून त्यांना जाईपर्यंत काय हवं नको ते पाहाण्याची जबाबदारी तुझ्यावर, चालेल ना?'' सरांनी जबाबदारी टाकली. आता मी मोठा प्राध्यापक झालो होतो. दहापाच पुस्तकं माझ्याही नावावर होती. माझ्यावर टाकलेल्या जबाबदारीनं मी सुखावलो. पु.ल. आले. ''या भाई या भाई'' असे म्हणत अनेक सरसावले. मी मुसंडी मारीत पुढे झालो. चक्क त्यांचा हात हातात घेतला. ''या भाई, सर आपलीच वाट पाहात आहेत'' त्यांना हाताला धरून हॉलमध्ये अगदी पुढच्या रांगेतल्या महत्त्वाच्या लोकांच्या खुर्चीत बसवले. ''तुम्ही सहस्रबुद्धे ना हो!'' पु.लं.नी विचारले. मी मनातून आनंदलो. पु.लं.नी मला ओळखले होते. मधूनच लोक येऊन विचारपूस करीत पण अगदी खाजगीत त्यांना हवं नको पाहणारा दुसरा नव्हता. पु.लं.च्या त्या लोकांतातल्या एकांतात मला संगत करण्याची संधी मिळाली. मी त्यांना घेऊन वधू-वरांकडे गेलो. गुरुवर्य भीमरावांनी खूपच अगत्याने त्यांचा हात धरून त्यांना वधू-वरांपुढे उभे केले. पु.लं.नी वधू-वरांना आशीर्वाद दिले. गाड्याबरोबर नळ्याचेही फावले. माझाही परिचय करून दिला. फोटो झाले. ''सर जेवल्याशिवाय जायचं नाही. मी येतोच'' डॉ. भीमराव म्हणाले. ''अहो असूद्या असूद्या तुमची गडबड आहे. हे सहस्रबुद्धे मी आल्यापासून सगळी



सर्कस माझ्याकडून करवून घेत आहेत, ते का मला जेवल्याशिवाय बाहेर पडू देणार आहेत?'' सगळे त्यांच्या बोलण्याला मोठ्याने हसले. मी कावराबावरा झालो. जेवण करतांना अनेकजण पु.लं.ची विचारपूस करायला येत होते. मला संधीच नाही. त्यांच्याजवळ बसायला मिळालं हे खूप. लग्नातल्या माझ्या या धावपळीची मलाच अपूर्वाई वाटली. आजही वाटते. पु.लं.चं असं 'साठवण' 'निवडक वाङ्मयेतिहासा'सारखं मनात घर करून आहे.

●●●

# सारस्वतांचा भुकेला
## (प्राचार्य डॉ. ह. कि. तोडमल सर)

''अनिऽऽल आहेस का? आलो रे पोहे खायला!'' सुटीच्या दिवशी ही हाक ऐकू यायचीच. वेळ, सकाळी नऊचा सुमार. खरेतर पोहे वगैरे काही खायचे नसायचेच! हाक मात्र, हमरस्त्यावरून, आत येणाऱ्या बोळीच्या तोंडाशीच, गर्जनेसारखी, घातली जायची. अवतीभोवतीच्या सगळ्यांना सरांकडे, सर आलेले दिसताहेत! ह.कि.तों.चे म्हणजे डॉ. ह. कि. तोडमल यांचे सगळे वागणे, वावरणे म्हणजे गावगर्जना हे आता अंगवळणी पडलेले होते. सर आले की गंगा चेंबर्समध्ये तळमजल्यावर पहिल्याच फ्लॅटमध्ये, म्हणजे आमच्या घरात तासभर ढगांच्या गडगडाटासारख्या गप्पा व्हायच्या. साहित्य, समीक्षा, संशोधन यावर ती बाजारातली आमसभा असायची. त्यांच्या-माझ्या वाचनात आलेले नवे, अभ्यासक्रमातील गुणदोष, नाविन्यपूर्ण संशोधन विषय, ज्ञानोबा-तुकोबा, ऐतिहासिक कादंबऱ्या, नाटके, खंडकाव्य प्रसंगी एखादी कवितासुद्धा आमच्या गप्पांना पुरायची. गप्पा सुरू झाल्या की स्वप्नील, स्फूर्ती यांचा अभ्यास, सौ. उषाची सकाळची धावपळ सारे सारे ठप्प व्हायचे. गप्पांचा गदारोळ असा असायचा; तरी वितंड मात्र कधीच नसायचा. माझे नवे पुस्तक आलेले असले की मग तर विचारूच नका. त्याचे जाहीर डिसेक्शन गंगा चेंबर्समध्ये झालेच म्हणून समजा. भरभरून बोलायचं, वडिलकीच्या अधिकारीने सूचना करायच्या, कौतुक तर एवढं करायचं की मला क्षणभर आपण महाराष्ट्र सारस्वतावर अधिराज्य करतोय असं वाटायचं. हे केवळ घरी, जाता जाता माझ्याकडे येऊनच घडायचे असं नाही. न्यू आर्टस् कॉमर्सच्या वर्गात, कार्यालयात



आणि प्रांगणातही घनगर्जनेसह असंच, मुराद सुरू असायचं. या विषयीच्या अनेक दंतकथा प्रचलित झालेल्या, मला माहीत झाल्या होत्या.

तसा माझा त्यांचा संबंध, कोणत्याच स्वरूपात कधीच आलेला नव्हता. माझं पीएच.डी. सुरू असतांना डॉ. गंगाधर मोरजे यांच्याकडून मी त्यांच्याविषयी ऐकलं होतं खरं. मी पंच्यांशीमध्ये नगरमध्ये सारडा कॉलेजमध्ये आलो. डॉ. लीला गोविलकरांमुळे माझा त्यांचा परिचय झाला. त्यांनी मला पकडलंच. पण हे पकडणं सन्मान्य आणि आनंददायक होतं यात शंका नाही.

एकदा तर त्यांनी थेट माझं संतवाङ्मयावर व्याख्यानच ठेवलं. नगरच्या सिद्धेश्वराच्या मंदिरात व्याख्यानमाला होत असे. त्यांनी स्वतः अध्यक्षपद स्वीकारलं. मी संत ज्ञानेश्वरांच्या दिव्यत्वावर बोललो. जवळपास पन्नास मिनिटे मी बोलत होतो. समोर श्रोतृगणही मोठा होता. ''वा वा!'' ''वा रे पठ्ठे!'' ''अरे वा!'' ''सुंदर'' ''वा!!!'' असे शब्द शेजारून मोठ्याने उच्चारले जायचे. समोरून टाळ्या व्हायच्या. भाषण रंगल्याची जाणीव व्हायची. अध्यक्षीय समारोपप्रसंगी हकितोंनी सरळ माझे हात हातात घेतले. सर्वार्थानं बापमाणसाने माझे हात दाबत म्हटले, ''आता मी काय बोलणार?'' आणि त्यांनी खरोखरच दोन मिनिटातच समारोप केला, ''ज्ञानोबांच्या दिव्यत्वाचा अनुभव अनिलच्या बोलण्यातून घेता घेता माझ्या अनिलच्या दिव्यत्वाची प्रचिती ही सिद्धेश्वराच्या साक्षीने आली त्या आनंदातच आपण असावं असं वाटतं. अनिल मोठा वक्ता आहे!'' या समारोपानं हकितोंनी माझ्यातला अभ्यासक, प्राध्यापक आणि वक्ताही फुलवला होता. त्यांच्या ''माझा अनिल'' या शब्दांचं नकळत गारूड माझ्यावरही झालं.

एम.फिल., पीएच.डी.साठीचा गाईड म्हणून मी काम करू लागलो होतो. पाचसात विद्यार्थ्यांचे रजिस्ट्रेशन झाले होते. एकाचे काम पूर्ण झाले होते. सर्व विद्यार्थी एकत्र जमणार होते. त्यांचे कौतुक करावे, त्यांना सहज मार्गदर्शन मिळावे म्हणून मी प्राचार्य डॉ. ह. कि. तोडमलांना बोलावले. घरगुती कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या गोतावळ्यात बाबा तोडमल सर एवढे रमले की विद्यार्थ्यांचा संकोच परागंदा होऊन; मनमोकळेपणाने आजोबांशी नातवंडांनी गप्पा माराव्यात तसा मेळ जमला. प्रत्येकाच्या विषयाचे नाविन्य पाहून हकितो थक्क तर झाले होतेच; तेव्हढेच प्रसन्न होऊन गप्पा मारत होते. विद्यार्थ्यांना कल्पवृक्षाच्या सान्निध्यात असल्यासारखे वाटले. ''अरे, तुम्ही भाग्यवान आहात,

फिल्डवर्क पासून समीक्षा व्यवहारापर्यंत आणि कवितेपासून कादंबरीपर्यंत, साहित्यात रमणारा गाईड तुम्हाला मिळाला. माझा अनिल आहे म्हणजे मग प्रश्नच नाही.'' सरांचे बोलणे ऐकून विद्यार्थ्यांत देखील सुरक्षिततेची आणि कृतकृत्यतेची भावना प्रकटली.

स्फूर्ती प्रकाशन मंचचे काम सुरू झाले. दोन वेळा ग्रंथयाग घडविले. या दोन्ही यागात हकितोंना या ना त्या कारणाने सहभागी होता आले नाही. नगरमधील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने दुसरा याग होत होता. सर आमच्या सगळ्या कार्यक्रमांमध्ये उपस्थित असायचे. संमेलनाच्या निमित्ताने मी स्वतः 'नगर तरुण भारत' मधून नित्य 'साहित्यिकी' लिहित असे. त्या साहित्यिकीचे वाचन ते आवर्जून करीत. प्रसंगी अभिप्राय देत आणि मार्गदर्शनही करीत. माझ्याशी वक्ता, प्राध्यापक, साहित्यिक, समीक्षक, संशोधक मार्गदर्शक अशा विविध भूमिकांच्या संदर्भाने त्यांचा संवाद असे. 'सकाळ' दैनिकाने साहित्य संमेलनाच्या निमित्ताने, साहित्यिक, रसिक, आस्वादक, वाचक, प्राध्यापक या दृष्टीने काही निवडक लोकांच्या प्रतिक्रिया, सूचना, अभिप्राय जाणून घेण्याचा प्रयत्न केला. रविवारचा दिवस होता. मी 'सकाळ' चाळत होतो आणि माझे लक्ष माझ्याच नामनिर्देशाकडे गेले. ''जाण प्रतिसाद आणि आस्वाद यांचा मूर्तिमंत वस्तुपाठ म्हणजे माझा अनिल ''हां तुम्ही त्याला प्रा.डॉ. अनिल सहस्रबुद्धे असं काही म्हणा. पण एकटा माझा अनिल समोर असला, माझ्या भाषणाला, तरी मला सभागृह भरल्यासारखं वाटतं. त्याचा एक प्रतिसाद, माझ्या सगळ्या साहित्य संचिताला प्रतिसाद देतं. माझं भाषण रंगतं. असा सारस्वत अनिलच्या रूपानं नगर शहरात आहे ही आमच्या नगरची साहित्य श्रीमंती आहे.'' प्राचार्य डॉ. ह. कि. तोडमलांनी 'सकाळ'ला सांगितलं होतं. मला अखिल भारतीय साहित्य पुरस्कार मिळाल्यासारखं वाटलं. वास्तविक हकितोंचा साहित्यविषयक दृष्टिकोन, पठडी आणि अपेक्षा खूप भिन्न होत्या. पण निखळ आस्वाद, समीक्षा आणि संशोधन याबाबतीत आम्ही परस्परांचे नक्कीच समानधर्मा होतो.

ज्ञानेश्वरी लेखन शताब्दीच्या निमित्ताने मला कांची कामकोटी पीठाच्या जगद्गुरू शंकराचार्य स्वामी जयेंद्र सरस्वती यांच्यावतीने महाराष्ट्रातील निवडक नऊ विद्वानांमध्ये श्री ज्ञानेश्वरीवरील स्वतंत्र लेखनाबद्दलचा विद्वत पुरस्कार देण्यात आला. 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' असा ग्रंथ मी लिहिला होता.



बाबांना हे समजले. मात्र त्यांना अक्षरशः मला कुठे ठेवू आणि कुठे नाही असे झाले. घरी येऊन; त्यांनी ज्या तऱ्हेनं माझं कौतुक केलं त्याला तोड नाही. त्यात माऊलीचा गहिवर होता.

नगरच्या कोर्टगल्लीतील गंगा चेंबर्समधून आम्ही पाईपलाईन रोडवरच्या समर्थनगरमध्ये आमच्या 'आई' बंगल्यात राहायला आलो. या घराला बेसमेंट आहे. चांगले पाचशे चौरस फुटांचे. त्यात आमचे स्फूर्ती प्रकाशन मंचचे कार्यक्रम होऊ लागले. हकितो सरांची पंच्याहत्तरी करण्याचा विचार पुढे आला. त्यांचा न्यू आर्टस्‌चा गोतावळा, का कोण जाणे फारसा नव्हता. सर आमच्यात रमत. पंच्याहत्तरीच्या कार्यक्रमानिमित्ताने आम्ही त्यांना भेटलो. ''कोणताही कार्यक्रम नको, मी येणारच नाही'' असे ठाम पण तऱ्हेवाईक वाटावे असे उत्तर त्यांनी दिले. ''का?'' असे विचारताच, ''नकोच, ते पाव्हणे, तो देखावा, नको!'' ते म्हणाले. ''ठीक आहे, सर आपण असं करूया माझ्या नव्या घरात आपलं येणंच झालं नाही. आपण या. आम्ही अगदी घरगुती स्वरूपात कार्यक्रम करू. त्यात मंगलमय म्हणून पाच सुवासिनींच्या हस्ते औक्षण करू. एकत्र जेवण करू. गप्पा मारू. एवढ्यालातर आपण परवानगी द्यायलाच हवी.'' मी आग्रह केला. ''हां हे ठीक आहे. तेवढ्या पुरता मी येईन. पण मोठा समारंभ नकोच.'' त्यांनी पुन्हा बजावले. सर, असं का म्हणतात; याविषयी बरीच चर्चा आमच्यात झाली. अनेक कारणं पुढं आली. असो. आमच्या गुरुभगिनी डॉ. प्रभाताई मुळे यांची षष्ट्यब्दी होती. दोन्ही कार्यक्रम एकत्र झाले. कार्यक्रमप्रसंगी माझ्या कन्येच्या मैत्रिणीचे, आरतीचे कथक ठेवले. अवघ्या वीसपंचवीस अशा नित्याच्या परिवारातील लोकांच्या मेळाव्यातील या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. ह. कि. तोडमल खूप रमले, गहिवरले. त्यांच्या एकूण मुद्रेने अंतरंगातील अनेक खंतींना वाट करून दिली. जाता जाता म्हणाले, ''अनिल असा कार्यक्रम सग्यासोयऱ्यातही झाला नसता, होणार नाही! तू मला ऋणी करून टाकलंस!'' माझ्याच नव्हे तर ऐकणाऱ्यांच्या सर्वांच्याच डोळ्यात पाणी आलं. छोटासा घरगुती कार्यक्रम आम्हा सर्वांच्याच अंतःकरणाला स्पर्श करून गेला.

पुढे योगायोगाने मी पेमराज सारडा महाविद्यालयाचा प्राचार्य झालो. पाईलपाईनवरील घरी त्यांचे येणे घडत नसे. सारडा महाविद्यालयात मात्र ते जाता जाता येऊ लागले. ''येऊ का रे बाबा'', केबीनमध्ये येतांना आवर्जून

विचारीत. मी त्यांचे स्वागत करी. केबीनमध्ये कोणी असल्याचे बाहेर शिपायाकडून कळले की कटाक्षाने ते निघून जात. शिपायाने सरांना सांगू का म्हणून विचारले; तरी ते त्याला नको म्हणून निक्षून सांगत. आले की त्यांना नवीन काही वाचनासाठी हवे असे. कुतुहल जिज्ञासा उदंड असायची. सतत वाचन करीत. माझ्यासारखे कोणी कोणी भेटले की चर्चेला उधाण येई.

सायकलवर सगळीकडे फिरणे, नित्य विहिरीवर पोहायला जाणे, बाजारात फेरफटका मारणे हे रोजचेच. क्रिकेट मॅच असली की मग विचारायचेच नाही. उतारवयात त्यांना एकट्यालाच रहावे लागत होते. बालिकाश्रम रोडवरील लेंडकर मळ्यात एकट्याच्या वास्तव्यातही त्यांनी दुपारच्या वेळात जिज्ञासूंना गोळा करून श्री ज्ञानेश्वरीवरील निरुपणाचा पर्याय सुरू केला. ''ज्ञानाच्या मस्तीत मस्त जगावं'' असं ते नेहमी सांगत. माझ्यासारख्या अनेकांच्या मनावर ते कोरलं गेलं आहे.

२००७ सालच्या ऑगस्ट महिन्यातली गोष्ट. मी महिनाअखेरीस सेवानिवृत्त होणार होतो. माझ्या एम.फिल., पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांनी माझ्या जन्मदिनी २४ ऑगस्टला षष्ट्यब्दीपूर्ती सोहळा आयोजित केला. मित्रमंडळी आणि विद्यार्थी यांनी त्या सोहळ्याला एखाद्या साहित्य संमेलनाचेच रूप दिले. स्थानिक म्हणून कोणाला मंचावर विराजमान करावे असा प्रश्न घेऊन विद्यार्थी माझ्याकडे आले. मी म्हणालो, ''तुम्ही हा सोहळा मराठी सारस्वतांसाठी करता आहात तेव्हां नगरमधील मराठीच्या प्राध्यापकांत सर्वांत ज्येष्ठ असलेल्या प्राचार्य डॉ. ह. कि. तोडमलांना बोलवा.'' ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, गुरुवर्य डॉ. यु. म. पठाण, गुरुवर्य डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. आनंद यादव, डॉ. गं. ना. जोगळेकर यांच्यासोबत समकालीन सुमारे सत्तर साहित्यिक, संशोधक, प्राध्यापक मित्र यांना निमंत्रित केले. सर्वांचे पूजन यानिमित्ताने करायचे ठरविले. माझी ग्रंथतुला करून सर्वांना ग्रंथ भेट देण्याचे ठरले. या साहित्यिकांच्या मेळाव्यात डॉ. ह. कि. तोडमल एखाद्या लहान मुलासारखे रमले. आनंद ओसंडून वाहात होता. बोलायला सांगितले तेव्हा गहिवरले. ''माझ्या अनिलचा षष्ट्यब्दीपूर्ती सोहळा जसा व्हायला हवा होता तसाच तो आपल्या सर्वांच्या मेळाव्यात झाला. अनिलच्या अंतःकरणातील चैतन्यमयी कोंभाची वृक्ष होऊ पाहणारी लवलव मी अनिल नगरमध्ये आल्यापासून अनुभवत आहे. साक्षात चैतन्य नित्य भेटावे असा अनुभव मी त्याच्या सहवासात घेत आलो आहे. औपचारिक सेवापूर्ती ही प्रतिभेच्या अवकाशात झेपावण्यासाठीची सुरुवात आहे. वडिलकीच्या हक्काने आपण आशीर्वाद द्यायचे. प्रकाशित हो हे सूर्याला सांगावं लागत नाही!'' सरांचा सहवास असा साहित्यसागरात विहारासाठी घेऊन जाणारा.

●●●

# सिद्ध सद्गुरू प्रेमस्वरूपा

## (डॉ.ॲड. विष्णु रामचंद्र पारनेरकर)

''सर, आपणास भेटायचं आहे. सद्गुरू महाराजांनी आपल्याला भेटण्याची आज्ञा केली आहे. एका पुस्तकाला प्रस्तावना आपण लिहावी, अशी महाराजांची इच्छा आहे. ते म्हणाले, त्यांचीच प्रस्तावना घ्या.'' अमोघ गीद नावाचे, विमल प्रकाशनाचे व्यवस्थाप्रमुख बोलत होते. माझा त्यांचा कोणताही परिचय नव्हता. ''विमल प्रकाशनाची मी व्यवस्था पाहतो''; असे त्यांनीच मला सांगितले. मी एकदम असा प्रस्ताव घेऊन फोनवर संपर्क करणारा आणि स्वतःच्या सद्गुरूंची इच्छा, तेव्हढ्याच आत्मियतेने आणि विश्वासाने सांगणारा; परिवारातला, एखादा सेवेकरी, फोनवर प्रथमच अनुभवत होतो. खरेतर माझा आणि पूजनीय सद्गुरू विद्यासागर विष्णू महाराज यांचा अगदी ओझरता परिचय झाला होता. एकदा प्रसंगाने त्यांचे दर्शन घडले होते.

त्याचे असे झाले. पारनेर येथील पूर्णवाद प्रतिष्ठानच्यावतीने, स्थानिक स्वराज्य संस्था आणि प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने संशोधन केंद्र सुरू होते. डॉ. वृषाली तारे त्या केंद्राच्या केंद्रप्रमुख म्हणून काम पाहात होत्या. त्या नगरमधील माझ्या शेजारी. स्वाभाविकपणे त्यांनी मला संशोधन केंद्रात संशोधन पद्धती आणि मराठी साहित्य संशोधन यासाठी अभ्यागत तज्ज्ञ म्हणून निमंत्रित केले. मला या केंद्रात घडणाऱ्या संशोधन प्रकल्पांचे सामान्यरूप; अधल्यावर्षी काही प्रबंधिकांचे परीक्षक म्हणून काम केल्याने अवगत होते. त्यांचा आग्रह मी मोडू शकलो नाही. पारनेरला जाऊ लागलो. प्रौढ, वृद्ध, अनुभवी अशा विद्यार्थी म्हणविणाऱ्या, विद्यार्थ्यांपुढे लेक्चर्स झाली. काही विद्यार्थ्यांना



लेखनासाठी मार्गदर्शन करण्याची संधी मिळाली. एक दिवस डॉ. वृषालीताई म्हणाल्या, ''सर, थोडा वेळ आहे का, थांबताय? महाराजांचे दर्शन होईल.'' ''आज नको, उद्या चालेल?'' मी म्हणालो. महाराजांना भेटायचे तर रिकाम्या हाताने कसं जायचं? दुसऱ्या दिवशी मी माझे 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' हे पुस्तक घेऊन गेलो. थांबलो. सर्वांबरोबर भेट झाली. पुस्तक दिले, वंदन केले. चर्चेत सुचविले; पूर्णवाद प्रतिष्ठानचे स्वतंत्र विद्यापीठ असावे! महाराजांनी चमकून माझ्याकडे पाहिले. थोडी चर्चा केली. त्यानंतर पुन्हा अवघ्या काही दिवसांतच डॉ. वृषाली तारे यांनी अधल्या वर्षीच्या विद्यार्थ्यांच्या पदवीदान समारंभासाठी अध्यक्ष म्हणून बोलावले. गेलो. समारंभ झाला. भाषण झाले. निघतांना पुन्हा ओझरते असे महाराजांचे दर्शन हॉलमध्येच घडले. ''छान बोललात'' असे म्हणाले. अर्थात अशी औपचारिक प्रशस्ती मला नित्याची होती. त्यानंतर मी अभ्यागत म्हणून जाणेही बंद केले. आणि एकदमच श्री. अमोघ गीद यांचा फोन आला आणि त्यांनी प्रस्तावना लेखनाची महाराजांची इच्छाही मला बोलून दाखविली. का कोण जाणे मी नाही म्हणू शकलो नाही.

काही वर्षांपूर्वी सनातन धर्मसभा नगरच्या सभागृहात, पूर्णवादाच्यावतीने साहित्य संमेलन झाले होते. एका पुस्तकाच्या प्रकाशनार्थ मला निमंत्रित केले होते. संमेलनातल्या त्या कार्यक्रमाला उपस्थित होतो. पूर्वतयारी म्हणून डॉ. रामचंद्र महाराज पारनेरकर यांचा 'पूर्णवाद' प्रबंध पाहिला होता. पण तो प्रसंग मी केव्हाच विसरलो होतो. प्रबंधिकांना मार्गदर्शन करण्याच्या निमित्ताने उजळणी झाली होती, इतकेच. त्यामुळे कोणते पुस्तक? काय? याविषयी कुतुहल होतेच.

अमोघ गीद न चुकता दिलेल्या वेळेवर आले. महाराजांनी 'पूर्णवादाचे ज्ञानप्रक्रिया शास्त्र' या पंडित किसनराव पाडळकर लिखित, सद्गुरू विद्यासागर ॲड. श्री. विष्णु रामचंद्र पारनेरकर संपादित, ग्रंथाला प्रस्तावना लिहिण्याचे काम सोपवले होते. विषय गंभीर, ज्ञानप्रक्रियेचे शास्त्र अपेक्षित होते. हे लक्षात घेऊन मी म्हणालो, मी वाचतो आणि चारआठ दिवसात काय वाटते ते सांगतो. वाचले. शंका होत्या. बोलावले. मोकळेपणाने शंका बोलून दाखविल्या. स्पष्टीकरणे मागवली. ''सर, मी महाराजांना विचारतो आणि येतो.'' गीद म्हणाले. गेले. पुन्हा दुसऱ्याच दिवशी आले. आल्याबरोबर म्हणाले, ''सर, महाराज म्हणाले यासाठीच सरांनी प्रस्तावना लिहावी असे सांगितले.'' सर्व

शंकांचे निरसन झाले. महाराज स्वतः या प्रक्रियाशास्त्राला पूर्णत्व देणार होते. त्याची टिपणे सोबत पाठवली होती. मी वाचली. प्रस्तावना लिहिली. पू.डॉ. रामचंद्र महाराज पारनेरकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय आणि त्यांनी बुद्धिप्रामाण्यपूर्वक आणि तत्त्वोद्घाटक लिहिलेला 'पूर्णवाद' प्रबंध मी वाचला होता. मार्गदर्शनाच्या निमित्ताने डॉ. रामचंद्र पारनेरकर आणि प्रस्तुत ग्रंथाचे संपादक ॲड. विष्णु महाराज पारनेरकर यांची पूर्णवाद प्रबोध, युगारंभ अशी काही पुस्तकेही मी पाहिली होती. पं. किसनराव पाडळकर लिखित पूर्णवाद उलगडणाऱ्या, पूर्णवादाचे लोकजीवनामधील उपयोजन आणि संस्कारपूर्ण, स्वाभाविक परिवर्तनात्मक प्रक्रिया, याविषयीच्या लेखांतून प्रकटलेल्या, पूर्णवाद दर्शनाचे चिंतन करीत असतांना; मी अक्षरशः थक्क झालो. त्यांनी एकप्रकारे 'पूर्णवाद' व्यूहावरील उपनिषदात्मक चर्च्या या लेखसंग्रहातून केली आहे. उदाहरणच द्यायचे तर पूर्णवाद हृदगतावरील विवेचनातील नेमका विचार सांगताना, 'प्रश्न हे उत्तराचे हृदगत असते' हे स्पष्ट करून चर्चा केली आहे. ॲड. विष्णू महाराज यांनी पं. पाडळकरांनी चर्चात्मक, प्रश्नोत्तरात्मक, प्रबोधनात्मक आणि चिकित्सापूर्वक मांडलेल्या व्यापक चर्चेचे, मूळ बीज आणि त्याचा जीवनातील विस्तार कसा होत जातो यावर डॉ. रामचंद्र महाराजांच्या 'पूर्णवाद' सिद्धांताचे वर्धिष्णू स्वरूपात प्राकट्य, जीवनकलेमध्ये कसे घडते; हे सांगत, ग्रंथाला परिपूर्ण शास्त्रीय स्वरूप देत, 'पूर्णवादाचे ज्ञानप्रक्रिया शास्त्र' मंडित केलेले मला जाणवले. प्रस्तावना लिहितांना मी या संपूर्ण लेखन, संपादन आणि उद्घाटन प्रक्रियेवर, प्रकाश टाकला आणि प्रस्तावना सादर केली. या प्रवासात पूर्णवादाने माझे ज्ञानोत्सुक भावविश्व, समृद्ध आणि चिंब झाले. ऋषी अगस्त्यांच्या विभूतिमत्त्वाच्या थेट स्पर्शाने झालेल्या दिव्यानुभूतीला ज्ञानाचे अधिक घुमारे फुटले.

एक दिवस अचानक अमोघ गीदांचा फोन आला. ''सर आपण घरी आहात? पू. महाराजांना आणि दादांना आपल्याला भेटायचं आहे.'' अमोघजी म्हणाले. ''हो हो आहेना, सुदैवाने आज मी कुठेही गुंतलेलो नाही. महाराज घरी येताहेत हा आनंदाचा विषय आहे. केव्हा येताय?'' मी म्हणालो. ''सर, आपण सांगा ना, साधारणतः तीनच्या सुमारास आले तर चालेल?'' अमोघजींच्या स्वतःला हवी ती वेळ मागून घेण्याच्या कौशल्याचे कौतुक वाटले. ''या, मी वाट पाहातो.'' मी म्हणालो. ''सर पण एक रिक्वेस्ट आहे, महाराज आपल्या घरी येणार आहेत, हे कोणालाही सांगू नका.'' अमोघजी म्हणाले. आता मी प्रस्तावना लिहून दिली होती. खूप छान झालीये असा महाराजांचा अभिप्रायही मला कळवला होता. येथवरच्या प्रवासात महाराजांनी माझ्याशी स्वतः संपर्क केला नव्हता. असा संपर्क होण्याचे तसे काही कारणही नव्हते. महाराज येणार म्हटल्यावर मी विचार करू लागलो. पारनेरला भेटीत, भाविकांच्या आणि अनुयायांच्या वर्तनसारणीतून श्रद्धापूर्ण, पूजनीय असे त्यांचे विभूतिमत्त्व मला परिचित झाले होते. त्यांचे स्वागत कसे करावे? त्यांना खाण्यापिण्यासाठी काय द्यावे. त्यांच्या बरोबर आणखी कोण असतील? त्यांना कोणत्या स्थानी बसवावे? एक ना अनेक प्रश्न आम्हा उभयतांसमोर होते. आमच्या मनाला बरे वाटेल अशी जुजबी तयारी आम्ही करून ठेवली. वाट पाहू लागलो. फोन करतो म्हणणाऱ्या अमोघजींचा तीन वाजले तरी फोन येईना. न राहून मीच संपर्क केला. ''मी आत्ताच फोन करणार होतो, पण निश्चित ठरत नव्हते. आत्ताच महाराजांशी बोलणे झाले. आम्हाला इकडून निघायला उशीर झालाय सर, आपल्याकडे सायंकाळी सातला आले तर चालेल? महाराजांना आणखी एका ठिकाणी जायचंय?'' अमोघजी म्हणाले, खरेतर माझ्या स्वभावाप्रमाणे मला असे नियोजन आवडणारे नव्हते. त्यातही मी काही महाराजांचा अनुग्रहित शिष्य नव्हतो आणि तसा माझा व्यावहारिक किंवा सांप्रदायिक संबंध आला नव्हता. जो संबंध आला होता तो पुस्तकांच्या माध्यमातून. अभ्यागताला टाळणे हेही माझ्या संस्कारात आणि स्वभावात नव्हते. ''चालेल ना या, नक्की येताय ना?'' मी म्हणालो. अमोघजींना माझ्या टोनवरून उमगले असावे. ''नाही नाही सर, नक्की येणार, त्यांना आपल्याला भेटायचेच आहे.'' अमोघजी म्हणाले.

सात वाजता अमोघजींचा फोन आला. ''एक, पंधरा मिनिटात आपल्याकडे पोचतो. आपल्याकडे पुढे एकाला पाठवले आहे.'' मी प्रतीक्षा करू लागलो. पाचच मिनिटात एक धोतर शर्ट, डोक्याला काळी टोपी घातलेला तरुण बंगल्याच्या फाटकाशी येऊन थांबला. मी वरून पाहातच होतो. ''आले महाराज?'' मी त्या तरुणाला विचारले. ''येतच आहेत. पाच मिनिटात पोचतील. आपण खाली येतायका सर?'' त्या तरुणाने मला सूचित केले. का कोण जाणे मला खाली जाण्याचेच सुचलेच नव्हते. कदाचित मी माझ्याच कोशात अडकलो होतो. अहंकार, दुसरे काय? भानावर आलो.

''आलो, आलो!'' म्हणत मी खाली धावलो. फार वेळ तिष्ठत राहावे लागले नाही. कार आली. दार उघडले. उंच, गोरापान, डोक्याला काळी टोपी, कपाळी गंध, एकटांगी धोतरावर शुभ्र शर्ट, त्यावर जाकिटासारखा कोट, वर उपरणे. प्रसन्न मुखानं आणि स्नेहभरल्या नजरेनं त्यांनी माझ्याकडे पाहिलं. मी वाकून नमस्कार केला. मोठ्या अदबीने त्यांना वर घरात घेऊन आलो. त्यांच्या बरोबर, त्यांचे ज्येष्ठ पुत्र आणि प्रतिष्ठानचे कर्तेकरविते श्री. गुणेश दादा महाराज, अमोघ गीद आणि आणखी कोणी होते.

समोरच्या दिवाणावर पूर्णवाद वर्धिष्णू ॲड. विष्णु महाराज पारनेरकरांना बसविले. दुसऱ्या बाजूला बाकी सर्व स्थानापन्न झाले. मी आणि सौ. उषानं नमस्कार केला. ''कशा आहात वहिनी?'' महाराजांनी सौं.ना विचारलं. ''ठीक आहे.'' काहीतरी औपचारिक बोलायचं म्हणून सौ. उषा म्हणाली. काय बोलावं असा प्रश्न मला पडला होता. मी काही सुरुवात करणार तोच श्री. गुणेशदादांनी बोलायला सुरुवात केली, ''सर, आपण काय सुंदर प्रस्तावना लिहिलीत. हातात पडल्यापासून आम्ही अक्षरशः पारायण करतो आहोत.'' ''महाराजांना आवडली? तो ग्रंथच तसा आहे!'' मी सुखावून तरी संकोच्याने म्हणालो. ''महाराजांना, आवडली एवढेच नव्हे तर त्यांनीच आपली भेट व्हावी असा आग्रह धरला.'' गुणेशदादा पुन्हा म्हणाले. ''अगस्त्यांची कृपा!'' मी उद्‌गारलो.

''आज आपल्याला भेटावं म्हणूनच खास आलो. डॉ. बोपर्डीकर, डॉ. खरवंडीकर यांनाही भेटायचं होतं. डॉ. बोपर्डीकरांकडे अगोदर गेलो. तेथूनच आपल्याकडे येतोय. आपल्याशी बोलावं, आपल्याला पहावं अशी खूप इच्छा होती. खूप बरं वाटलं. खूप छान, तुमची ज्ञानसाधना सुरू आहे!'' महाराज माझ्याकडे, विशेषतः माझ्या डोळ्यात पाहात बोलले. ''अगस्त्यांची कृपा'' मी पुन्हा उद्‌गारलो. उठलो आत गेलो. त्यांच्या पुढ्यात काहीतरी ठेवायचं म्हणून ड्रायफ्रूट ठेवले. त्यांच्या खाण्यापिण्याविषयी मला काहीच माहिती नव्हती. ''आपण काय घेणार? दूध, चहा, कॉफी...'' मी विचारलं. ''खरं तर काहीच नको. बोपर्डीकरांची खूप दिवसांची, मी जेवायला यावं अशी इच्छा होती. म्हणून गेलो. वहिनींना पोहे करायला सांगितले. भरपूर खाणं झालंय. मी तुमच्यासारखाच गृहस्थ आहे. चहा चालेल.'' महाराजांनी मोकळेपणानं सांगितलं. मोकळेपणा आला. मी महाराजांचा महावस्त्र, श्रीफळ,



पुष्प देऊन सन्मान केला. एक पुस्तक दिलं. अशा विभूतिमत्त्वाला दुसरं काय देणार? महाराजांनी स्वीकारलं. ''अगस्त्यांची तर कृपा आहेच. आपली साधना आणि व्यासंगही चांगला आहे. आपल्या उभयतांचा सत्कार स्वहस्ते करावा म्हणून आलोय.'' महाराज म्हणाले. ''माझा सत्कार?... महाराज मी आलो असतो. पण आपण आलात खूप बरे वाटले.'' काय बोलावे कळत नव्हते. त्यांच्या प्रसन्न मुद्रेत दिव्यत्वाचा अनुभव माझ्या मनाला संवेदित होत होता. काही न बोलता मी उभा राहिलो. महाराज माझ्या पुढ्यात उभे राहिले. त्यांच्या पुढ्यात मी खूपच थिटा वाटत होतो. महाराजांनी मला महावस्त्र पांघरले आणि पुढच्याक्षणी अक्षरशः उराशी कवटाळले. ''ही राम-भरत भेट आहे असे समजा!'' त्यांच्या आलिंगनात मला, लक्षंदीप माझ्या अंतःपटलावर प्रकाशित झाल्याचा अनुभव आला. अगस्त्यांचे दिव्यदर्शन पुन्हा स्पंदित झाले. नेत्र पाणावले. मी त्यांच्या मुद्रेकडे पाहिले. त्यांच्याही नेत्रांत मला अथांग अवकाश भाव दाटून आल्याचे जाणवले. ''अगस्त्यांची कृपा'' मी पुन्हा उद्‌गारलो. नमस्कार केला. दिव्यानुभूतींनी शरीर पुलकित झाले. माझा सत्कार मनाप्रमाणे करून झाल्यानंतर, त्यांनी सौ. उषालाही श्रीफलादी देऊन सन्मानित केले. काही क्षण मुग्धतेत गेले. ''आणखी काय चाललय?'' महाराजांनी विचारले. मी माझ्या एकदोन प्रकल्पांविषयी सांगितलं. ''या पारनेरला!'' महाराज म्हणाले. निरोप घेतांना हात हातात घेतले. हातांना उष्ण, आश्वासक, पवित्र स्पर्श झाल्यासारखे वाटले. महाराज निघाले. मी खालपर्यंत सोडायला निघालो. ''सर आपण थांबा!'' महाराज स्वतः म्हणाले. ''नाही नाही महाराज, मी येतोना!'' मी अधीरपणे बोललो. अहंकार दर्प अवघा नाहीसा झाला होता.

डॉ. पारनेरकर महाराज स्मृती सार्वजनिक ग्रंथालयाच्यावतीने डॉ. पारनेरकर महाराज स्मृती ग्रंथमित्र, ग्रंथालय भूषण सेवाव्रती पुरस्कार आणि ग्रंथोपजीवी पुरस्कारांचे वितरण आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्राचे उद्घाटन होणार होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मी स्वीकारावे अशी ग्रंथालयाने विनंती केली. महाराजांनी सुचविले अशी पुस्ती जोडली. मी नाही म्हणू शकलो नाही. गेलो. कार्यक्रम संपन्न झाला. भाषण झाले. कार्यक्रमानंतर महाराजांनी भेटायला बोलावले. ''आपण खूपच छान बोललात. पूर्णवाद या तऱ्हेने मांडायला हवा.'' महाराज म्हणाले. मी सुखावलो. नमस्कार केला.

म्हणालो, ''आपण संधी दिलीत.'' ''तुमचं मार्गदर्शन महत्त्वाचं आहे. आपण मार्गदर्शन करीत जा. या पुढच्या लोकांना त्याचा उपयोग होईल.'' महाराज म्हणाले. एखाद्या ज्ञानपीठाच्या पीठाधिश्वराने दुसऱ्या कोणाला तरी गांभीर्याने मार्गदर्शन करायला सांगावं; यातूनच त्या विभूतिमत्त्वाचं अवकाशव्यापकत्व प्रसिद्ध होतं.

एक दिवस दुपारी पुन्हा अमोघ गीदांचा फोन आला. ''सर, दादा आलेत, त्यांना आपल्याला भेटायचंय, सोबत औरंगाबादचे काही लोक आहेत, चालेल ना? इथं एक कार्यक्रम आहे, झाला की येतो. चालेल? साधारणतः तीन साडेतीन होतील.'' मला थोडे काम होते. पण मी ते नंतर करू असा विचार करून; त्यांना होकार दिला. साडेतीन वाजता मंडळी आली. ''सर, आपण, जीवनकला मंडळ औरंगाबादच्यावतीने प्रतिवर्षी विद्वान व्यक्तिमत्त्वाला दिला जाणारा 'पूर्णाचार्य पुरस्कार' स्वीकारावा, अशी विनंती करायला ही मंडळी आली आहेत. ही महाराजांची इच्छा आणि आग्रह आहे'' असं सांगत श्री. गुणेशदादांनी पत्र माझ्या हातात देत, सर्वांची ओळख करून दिली. श्री. गुणेशदादांची पुरस्कार स्वीकारण्याविषयी विनंती करण्याची तऱ्हा म्हणजे, विद्यासागर श्री विष्णु महाराज पारनेरकरांची आज्ञा प्रसृत करण्यासारखे होते. मला त्यांचे कौतुक वाटले. सद्गुरूंची आज्ञा पोचविण्याची शक्ती फक्त सत्शिष्यात असते. मी नाही म्हणूच शकलो नाही. त्यातही प्रत्यक्ष महाराजांच्याच हस्ते पुरस्कार स्वीकारायचा होता. कार्यक्रमापूर्वी पाच महिने अगोदर नियोजन करण्याची पद्धती; जीवनकला मंदिराची संस्कार प्रक्रिया प्रदर्शित करीत होती.

पुरस्कार वितरण अजून खूप लांब होते. दरम्यान माझे 'अनंत'चे लेखन सुरू होते. 'अनंत' हा एक आगळा कादंबरी लेखन, स्वरूप प्रकार होणार होता. 'अनंत', स्वतः स्वतःचे तत्त्व, आकलित करून घेण्यासाठी, पृथ्वीतलावरील तत्त्वज्ञान संप्रदायांचा धांडोळा करीत प्रवासत आहे. 'स्वगत' किंवा आत्मचिंतन स्वरूपात त्या त्या तत्त्वज्ञानाचा युक्तायुक्त विचारात्मक भाष्य करीत आहे. संपूर्ण जागतिक तत्त्वज्ञान संप्रदायांचा धांडोळा घडत होता. अवघ्या शंभर पृष्ठात हा सर्व गंभीर तत्त्वज्ञान प्रवास लालित्यपूर्वक मांडायचा होता. या प्रवासात स्वामी विज्ञानानंद आणि पूर्णवाद मांडणारे डॉ. रामचंद्र पारनेरकर यांचे तत्त्वज्ञान प्रत्यक्ष उपयोजित करून जीवन साफल्याचा विचार



मांडणारी तत्त्वसारणी स्वाभाविकपणे माझ्या व्यासंगातून, कादंबरीत उल्लेखित झाली होती. ई-बुक स्वरूपात अपलोड करणार होतो, तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक डॉ. सदानंद मोरे, समीक्षक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, न्यू वे चे कार्यवाह प्रमोदभाई शिंदे आणि पूर्णवादवर्धिष्णु ॲड. विष्णु महाराज पारनेरकर यांच्या प्रकाशनपूर्व प्रतिक्रिया घ्याव्यात या उद्देशाने संपर्क केला. टाईप्ड कॉपी प्रत्येकाकडे पाठवली. विद्यासागर ॲड. विष्णू महाराजांना दुसऱ्याच दिवशी परदेशी प्रवासाला जायचे होते. बरोबर घेऊन गेले. वाचली. त्यांना राहवले नाही. त्यांनी एडमंटन, कॅनडाहून २४ ऑक्टोबरला प्रतिक्रिया कळवली, ''एकपात्री चमत्कृतीरूप, रहस्य रसपोषक, तरीही अनुक्रमयुक्त असा तत्त्वज्ञानाचा कलापूर्ण वाङ्मयीन आविष्कार! प्रत्येक जीवनकला जगण्याची इच्छा बाळगणाऱ्या वाचकास कथानक समरसतेने वाचताना आनंदाचे डोही डुंबत व पुनः क्षणभराने वर उसळी घेत जीवनदर्शन होत राहते, ही माझी अनुभूती...'' अमोघ गीदजींनी प्रतिक्रिया माझ्यापर्यंत पोहोचवली. यात बराच काळ गेला. मी कादंबरी अपलोड केली. अमोघजींनी मला विचारले, ''सर ही कादंबरी पुस्तकरूपाने प्रसिद्ध करणार आहात का?'' ''हो, बहुतेक मोरया प्रकाशनाच्यावतीने ती प्रसिद्ध करण्याचा विचार आहे'' मी म्हणालो. ''फायनल झालंय का?'' त्यांनी विचारले. ''नाही.'' ''माझे मत आहे तुम्ही आम्हाला ही कादंबरी प्रसिद्धीस द्यावी. मी महाराजांशी बोलतो.'' अमोघजी म्हणाले. ''तसं काही फायनल करण्याचा प्रश्न नाही. प्रकाशक मित्रच आहेत'' मी म्हणालो. ''सर महाराज दोन दिवसांनी येणार आहेत. मी आपल्याला कळवतो. आपण भेटायला याल? माझं आणि दादांचं बोलणं झालं आहे'' अमोघजी म्हणाले.

महाराज आले, अमोघजींचे बोलणे झाले. मला बोलावले. महाराजांनी मला घेऊन येण्यासाठी अमोघजींना पाठवले. भेट झाली. प्रत्यक्ष भेटीत महाराजांनी 'अनंत' कादंबरीची मला संकोच वाटावा एवढी प्रशंसा केली. ''गुणेशदादा आणि अमोघच्या विमल प्रकाशनाने ही कादंबरी प्रकाशित करावी असा आग्रह आहे. आपले अन्य प्रकाशनाशी बोलणे झाल्याचे समजले. शक्य असेल तर पाहा.'' स्वतः महाराजांनी प्रस्ताव मांडला. ''चालेल, मला मोरया प्रकाशनशी बोलावे लागेल एवढेच. मी त्यांच्याच समोर मोरयांच्या दिलीप महाजनांना फोन केला. ''महाजनजी, पारनेरकर महाराजांची त्यांच्या विमल प्रकाशनाच्यावतीने पुस्तक काढावे अशी इच्छा आहे. मी महाराजांचे

मन मोडू शकत नाही. पुढचे पुस्तक मी आपणास देईन. एका मोरयाकडून दुसऱ्या मोरयाकडे पुस्तक येते एवढेच.'' महाजन थोडे आढेवेढे घेत आहेत असे लक्षात येताच महाराज म्हणाले, ''त्यांचाच आग्रह असेल तर असू द्या.'' ''नाही नाही महाराज, काही हरकत नाही असंच म्हणताहेत.'' झाले ठरले. 'अनंत' विमल प्रकाशनाने काढली. 'अनंत'चे प्रकाशन पुण्यात व्हायचे होते. त्या प्रकाशनाच्या अवघ्या महिना पंधरा दिवस अगोदर पूर्णवादवर्धिष्णु विद्यासागर विष्णू महाराज यांच्या हस्ते मला 'पूर्णाचार्य' पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यावेळी आठवणीने महाराज म्हणाले, ''प्रकाशनाची सगळी तयारी झाली आहे. आपण आम्हाला संधी दिलीत बरे वाटले.'' ''महाराज आपण कोणतेही मला पेलेलसे काम सांगा'' असे मी पटकन बोलून गेलो.

येथवरच्या प्रवासात ॲड. विष्णु महाराज पारनेरकरांनी माझे मन बऱ्यापैकी व्यापले होते. त्यांच्या दिव्य अनुभूतीने मीही काहीसा त्यांच्याकडे खेचला गेलो.

•••



# विज्ञानयोगी

## (स्वामी विज्ञानानंद)

'मनशक्ती' प्रयोग केंद्र, लोणावळे, 'मनशांती न्यू वे आश्रम', या स्वामी विज्ञानानंद यांच्या तत्त्वज्ञान आणि साधनामार्गाच्या, आस्थापनेशी गत वीस वर्षांपासून संपर्क घडतो आहे. परोपरीने घडणाऱ्या चिंतनातून तथ्ये समोर येत आहेत. स्वामी विज्ञानानंदांचे 'ज्ञानयोगी' विभूतिमत्त्व सतत नाविन्यपूर्णतेने, आकलन आणि संवेदन प्रक्रियेत प्रकाशित होत आहे. ब्रह्मजिज्ञासा जशी अनंताकडून अनंताकडे प्रवास करते आहे; तसेच काहीसे स्वामी विज्ञानानंदांच्या तत्त्वस्वरूप विभूतिमत्त्वाच्या अनुभूतीविषयी जाणवते आहे.

'आधुनिक काळ' असे वर्णन, पाश्चात्य जगतातील पुनरुज्जीवनाच्या काळापासूनच्या काळासंदर्भात केले जाते; असे म्हणता येते. वैज्ञानिक दृष्टिकोन, वैज्ञानिक प्रयोगातून विश्वाचा वेध तसेच यांत्रिक साधनांचा शोध आणि उपयोजन, बुद्धिप्रामाण्यवाद, निसर्ग, जीवसृष्टी आणि मानवीसृष्टी यांच्या जैविक संबंधप्रक्रियेचा केवळ वैज्ञानिक विचार, व्यवस्थापन आणि पुनर्निर्माणाचा प्रयोगसिद्ध व्यवहार; ही आधुनिक काळाची वैशिष्ट्ये सांगता येतील. आधुनिक काळात प्रवाससाधने, संपर्कसाधने आणि अन्न, वस्त्र, निवारा या संबंधातील साधने; या संदर्भात वैज्ञानिक आविष्कार केवळ थक्क करणारा आहे. विज्ञाननिष्ठा, बुद्धिप्रामाण्याचा सर्वंकश आग्रह आणि साधनांची गर्दी यांत माणूस चक्रव्यूव्हातील अभिमन्यूसारखा अडकलाच नव्हे; तर हरवला आहे. या प्रक्रियेसह एकविसाव्या शतकाकडे जग झेपावत असतांना; विज्ञानाच्याच

मार्गाने माणसाचा, माणूसपणाचा, ब्रह्मांड आविष्कारातील अस्तित्वाचा, शोध घेऊन; माणसाला, माणसातील सोऽहम अस्तित्वाचा, बोध घडविण्याचा ध्यास घेणारा 'ज्ञानयोगी' अवतरला किंवा प्रकटला, असे म्हणता येईल; असे ज्ञानात्मक विभूतिमत्त्व म्हणून स्वामी विज्ञानानंदांना समजून घेऊन; अनुसरणे आवश्यक वाटते. आधुनिक काळ म्हणजे विज्ञानयुग होय. विज्ञानाच्या माध्यमातून, वैज्ञानिक प्रयोगसाधनेने, ज्ञानात्मक अवस्था प्राप्त करून घेता येईल; असा योगमार्ग सिद्ध करणारा योगी म्हणून स्वामी विज्ञानानंदांच्या 'न्यू वे' चा विचार करावा लागतो. यासाठीच मनशक्ती आणि मनशांती केंद्रातील साधकांचा, आश्रमाच्या साधक, सेवक संचालकांचा प्रयास, दीर्घोद्योग स्वरूपात, सुरुवातीपासून सुरू आहे.

'ज्ञानयोगी' असे स्वामी विज्ञानानंदांना संबोधताना, त्यांच्या वैज्ञानिक प्रयोगसिद्ध ज्ञानसाधना मार्गाचा; योगवैज्ञानिक विचार करणे आवश्यक आहे. आधुनिक युगाला आपण विज्ञानयुग म्हणतो; हे खरे असले; तरी ते अर्धसत्य आहे. काल आणि अवकाश यांना कोणतेही, बंदिस्त करणारे परिमाण लावता येत नाही. काल आणि अवकाश यांच्या अस्तित्वाची जाणीव किंवा संवेदना घडविणारे चिद्‌तत्त्व मानवाच्या ठिकाणी, माणसाच्या आरंभबिंदूपासून प्रकटलेले आहे. ते तत्त्व केवल आहे की सापेक्ष आहे; याचाच जिज्ञासापूर्वक, शोध घेण्याचा प्रयत्न; मानवी अस्तित्वाभोवती, अस्तित्वात असलेल्या पंचभौत्तिक सृष्टीच्या, भौत्तिक अस्तित्व अनुभूतीच्या आधारे, लावण्याचा प्रयत्न माणसाने आरंभबिंदूपासून केला. काल, अवकाश आणि चिद्‌तत्त्व हेच 'केवल' मूळ आहे, अर्थात ज्ञान आहे. त्याचा परिपूर्ण अनुभव म्हणजे ज्ञानानुभव होय. यालाच सत् चिद् आनंद असे द्रष्ट्या ऋषींनी म्हटले. हा आनंद मिळविण्यासाठी जो मार्ग निवडला तो मार्ग म्हणजे 'वेद' मार्ग होय. याचा स्पष्ट अर्थ म्हणजे, विश्वाच्या प्रयोगशाळेत, स्वतःच्या शरीराचा अर्थात पंचज्ञानेंद्रिये, पंचकर्मेंद्रिये आणि चिदेंद्रिय मन, या साधनांचा उपयोग केला. यांतूनच 'योगविज्ञान' प्रकटले. ऋषी, मुनी, सिद्ध ही विभूतिमत्त्वे योगवैज्ञानिक अर्थात योगीच होत. सृष्टीच्या प्रक्रिया, जाणिवेच्या कक्षेत आणून; 'स्व' चा प्रयोगसिद्ध वेध घेऊन; केवलत्वाचा अर्थात सत् चिद् आनंदाचा अनुभव भोगायचा; इतरांसाठी मार्ग प्रशस्त करायचा; हे या योगवैज्ञानिकांनी केले. पंचतात्त्विक सृष्टीचे अस्तित्व हे विज्ञान आणि त्या अस्तित्वातील काल, अवकाश आणि चिद्‌तत्त्व



म्हणजे ज्ञान होय. ज्ञानापर्यंत जाण्याचा मार्ग सृष्टी आणि शरीर अशा भौत्तिक विज्ञानातून जातो; हे अतिप्राचीन ऋषी, मुनी, सिद्ध यांनी जाणले आणि यज्ञसंस्थेबरोबरच साधनाशास्त्र सतत संशोधित करून वेद आणि योगविज्ञानाची मांडणी परोपरीने केली. या योगविज्ञानाला 'विज्ञान ग्रंथ' म्हणून मांडण्याचे कार्य, भगवान पतंजलींनी केले. हा सनातन विज्ञान-ज्ञान मार्ग म्हणजे योगविज्ञान होय. आधुनिक काळापर्यंतच्या प्रवासात, भौतिक साधनांच्या विकास प्रक्रियेत, प्राचीन काळापासूनच, शरीर आणि मन यांच्या ठिकाणी असलेल्या तत्त्वाचा विसर माणसाला पडत आला आहे. शारीरसुखात मनासह गुंतल्याने; भौतिक ऐश्वर्यालाच आनंद, सुख मानण्याची प्रवृत्ती; ही माणसाची सनातन देह प्रवृत्ती दृढावली आहे. त्यातूनच माणसाचे भोगी आणि अशांत असे बुभूक्षित रूप प्रकट होऊन; राक्षसी, सैतानी, शोषक प्रवृत्ती निर्माण झाल्या आणि वाढल्या आहेत. शरीराने आणि मनाने समग्र अस्तित्वाचा, निरपेक्ष आनंद घेण्याच्या प्रक्रियेपासून; अर्थात मूळ अस्तित्व 'सत्य' या पासून; मानव दूर जात राहिला आहे. हे सत्यापासून दूर जाणे थांबवून; माणसातील माणूसपण प्रकटविण्यासाठी, लोकधुरीण ऋषी कार्यरत होतात. 'यदा यदा हि धर्मस्य ग्लानीर्भवती भारत । अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।' ही भगवान श्रीकृष्णाची उद्घोषणा त्यासाठीच होय. आधुनिक काळात 'न्यू वे' स्वीकारून कार्यरत झालेले ऋषी म्हणजे स्वामी विज्ञानानंद होय. याच दृष्टीने स्वामी आधुनिक काळातील 'ज्ञानयोगी' होत.

विज्ञानानंद नावाने प्रसिद्ध असलेले हे ऋषी, बुद्धीला प्रमाण वाटणाऱ्या विज्ञानाच्या मार्गाने, प्रयोगातून सत्य सिद्धीचा, आनंदानुभव घेण्यासाठी आग्रही आहेत. सत्‌चिदानंद भोगण्यासाठी मनःशांतीची आवश्यकता असते. मनःशांती म्हणजेच केवलानंद प्रतिती होय. यासाठी मनाला प्रसन्न अवस्था प्राप्त व्हावी लागते. 'मन करारे प्रसन्न सर्व सिद्धींचे कारण' ही सर्वसिद्धी म्हणजे समाधानी जीवनाची अनुभूती होय. सद्‌चिदानंद अनुभूती भोगण्यासाठी शरीर आणि मन दोन्हींच्या शुद्धतेची आवश्यकता आहे. निकोप शरीर आणि निकोप मन ठेवण्यासाठी आज ज्या विज्ञानयुगात साधनांच्या गर्दीत माणूस प्रत्यक्ष जीवन जगतो आहे; तेथून दूर विजनवासात जाण्याची आवश्यकता नाही. विज्ञानाची निश्चित माहिती, साधनांचे सांघिक आणि सृष्टी हिताच्या भूमिकेतून विवेकपूर्ण असे, अर्थात औचित्यपूर्ण असे, मनाचे संतुलन साधणारे, व्यवस्थापन करणे

क्रमप्राप्त होय. त्यासाठी शरीर आणि मनावर युक्त संस्कार घडणे आवश्यक असते. शरीर आणि मन या दोहोंचे व्यवहार साधण्याचे देवदत्त साधन म्हणजे प्राण्याचा मेंदू होय. मेंदूला जागृत करणे, चिंतन, मनन, शोधन, निष्कर्षण, निर्माण, उपयोजन, आस्वादन इ.इ.इ. सर्व प्रक्रियांच्या बाबतीत कार्यान्वित करणे; यांसाठी योगिक साधनेची आवश्यकता असते. ही साधना भौतिक विज्ञानाच्या आधारे करण्याचा प्रयत्न करणे; त्याचबरोबर वैज्ञानिक साधनांचा उपयोग करून पारंपरिक ध्यानयोग साधनेची जोड देऊन करणे व यासाठी वैज्ञानिक प्रयोगांचा उद्दिष्टानुवर्ती अवलंब करणे; हा आधुनिक वैज्ञानिक युगाला सहज स्वीकार्य मार्ग, स्वामी विज्ञानानंदांनी स्वीकारला व तो आधुनिक विज्ञाननिष्ठ लोकधारणेपुढे मांडला. 'मार्गाधारे वर्तावे । विश्व मोहरे लावावे' असे वेदप्रामाण्य मानणाऱ्या श्री संत ज्ञानेश्वरांनी सांगितले किंवा 'आम्ही वैकुंठवासी । आलो याच कारणासी । बोलीले जे ऋषी । साच भावे वर्ताया ।।' असे श्री संत तुकारामांनी सांगितले. तोच मार्ग स्वयंप्रज्ञेने स्वामी विज्ञानानंदांनी स्वीकारला. मनःशक्ती वर्धिष्णू झाली पाहिजे, त्यासाठी मेंदू जास्तीतजास्त कार्यान्वित झाला पाहिजे तरच मनःशांतीपर्यंत अर्थात शाश्वत सुखापर्यंत, अर्थात केवलानंदापर्यंत आपण पोहोचू शकू. त्यातूनच प्राप्त जीवनात समाधान, साफल्य, आनंद लाभल्याची जाणीव होऊन; माणूस आपले कर्म ज्ञानवानपणाने करेल. हा शाश्वत सुखाचा मार्ग 'न्यू वे' च्या स्वरूपात या ज्ञानयोग्याने मांडला. बुद्धिप्रामाण्यासह अध्यात्म साधना म्हणजेच, विज्ञाननिष्ठेने, विज्ञानाच्या सहाय्याने ज्ञानसाधना करून जीवन साफल्य अनुभवण्याचा मार्ग होय.

'न्यू वे' अंतर्गत, या ज्ञानयोग्याने मनाची बुद्धिनिष्ठ व्याख्या मांडली - 'Mind is non matter because it trancends velocity of light' असे स्पष्ट करून; 'मन हे अजड आहे'; हे गणित, पदार्थविज्ञान व तर्क यांच्या आधारे स्पष्ट केले. यातूनच मन हे मृत्यूनंतरही अस्तित्वात असते हे स्वामींनी सिद्ध केले. ('विज्ञान ज्ञान गभस्ती - द्वि.आ. २०१३ पृ. २१६-१७) स्वामी विज्ञानानंदांनी मांडलेले 'न्यू वे' विचारधारेतील सिद्धान्त, जागतिक स्तरावर वैज्ञानिकांना आणि बुद्धिप्रामाण्यवाद्यांना मान्य करावे लागले आहेत. या सिद्धांच्या आधारे प्रयोगांचे मंडन करून, सिद्धान्त, प्रयोगसाधनेत अनुभवावयाचा प्रयास केला आहे. वैज्ञानिकांचे सिद्धान्त, 'न्यू वे' ने जीवनात उपयोजित करून दाखवले. अवघड सिद्धान्त सोप्या भाषेत मांडले. विज्ञान, धर्मशास्त्र, मानव्यशास्त्रे यांचा डोळस समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. सत्कर्म आणि अध्यात्म यांची सांगड घातली. अभ्यास अर्थात साधना आणि तत्त्व या आधारे भक्कम पुरावे देण्याचा प्रयत्न केला. अशा वैशिष्ट्यांसह 'न्यू वे' चे मंडन करतांना स्वतः योगसाधना आणि वैज्ञानिक प्रयोग यांचा अवलंब करून; अनुभवसिद्ध वस्तुपाठ स्वामींनी समोर ठेवले. या उपक्रमामुळे तरुण, तसेच विशिष्ट वैचारिक व्यूहात अडकलेल्यांना सुद्धा 'न्यू वे' ने आकर्षित करून घेतले. ज्ञानप्रक्रियेला प्रयोगसिद्ध वैज्ञानिक अधिष्ठान मिळाले. स्वामी विज्ञानानंदांची ही कामगिरी सर्व थरातील, सर्व प्रकारच्या शिक्षणप्रक्रियेला भौतिक विज्ञान आणि मनोविज्ञान यांसह, योगवैज्ञानिक दिशा देणारी ठरली. सुसंस्कारित, विज्ञाननिष्ठ, अध्यात्मप्रवण अशा स्वयंसिद्ध, सुसंस्कारित आणि समंजस भावी पिढी निर्माण करणे, आपल्या हातीच असल्याचा सर्वांचा आणि विशेषतः पालकवर्गाचा आत्मविश्वास बळावला. विज्ञान आणि ज्ञान यांचा मूल्यात्मक समन्वय 'न्यू वे' ने साधला. अखिल मानवजातीच्या कल्याणाचे कार्य साधण्याचा मार्ग या ज्ञानयोग्याने प्रशस्त केला.

'योगी' असे म्हटले की सिद्धी आणि समाधीची चर्चा सहजच घडते. स्वामी विज्ञानानंद या नावामुळेदेखील, बाहेरून ओझरते दर्शन घेणारांच्या मनातील गुढाद्भूत भावना नष्ट झाली नाही. स्वामी विवेकानंद यांच्याप्रमाणेच स्वामी विज्ञानानंद या विभूतिमत्त्वास अद्भुत गूढतेचे वलय चिकटले नसते तरच नवल. 'चमत्काराला नमस्कार' अशा मनःस्थितीतील लोकांना, विज्ञानयुगातही गुढाद्भूततेने भुरळ घातली आहे. स्वामी विज्ञानानंदांनी आपल्या विचार प्रकटीकरणातून, सहज संभाषणातून, सहज व्यवहारातून, गुढाद्भूततेचे वलय येणार नाही; याची विशेष काळजी घेतली. पराकोटीच्या वैज्ञानिक दृष्टी असलेल्या लोकांनी, समाधी ही साधना आत्महत्या ठरविली. वास्तविक कोणत्याही प्रकारे समाधी साधतांना भौतिक वासनादेहातून निसटून; सत्‌चिदानंद स्वरूप होण्याची प्रक्रिया घडत असते. जलसमाधी, वायूसमाधी, भूसमाधी, अग्नीसमाधी, प्रकाशसमाधी असे समाधी साधनेविषयी विशेषणयुक्त विशिष्ट प्रकारच्या समाधींची नावे आपण ऐकतो. समाधी म्हणजे मन आणि शरीर या दोन्ही साधनांनी अत्यंतिक एकाग्रतेने कलेवरातून चिदात्म तत्त्वाची सोडवणूक करून परमात्म्याशी अद्वैत साधावयाचे असते. कलेवर पंचभौतिकाच्या आधीन करून; शारीरतः जीवनमुक्त होऊन; सच्चिदानंदस्वरूप व्हायचे असते. विविध

प्रकारांनी साधलेली समाधी; ही संजीवन समाधीच असते. म्हणजे ती जीवाची पूर्ण ज्ञानावस्थाच असते. आत्महत्या शब्दच मुळात चुकीचा आहे. कारण आत्मतत्त्व हे अविनाशी आहे त्याची हत्या कशी होईल? 'आत्महत्या' या प्रचलित कल्पनेमध्ये अशांत अवस्थेत कलेवर सांडणे घडते. समाधी अवस्थेतही नश्वर देह पंचतत्त्वात विलीन करण्याचीच प्रक्रिया असते. परंतु देहात वास्तव्य करून असलेले चिद्‌तत्त्व; देह आणि प्रामुख्याने मन यांच्या निग्रहाने परमात्मतत्त्वाशी, अद्वैत घडविण्याची प्रक्रिया घडवावयाची असते. समाधीत निरासक्त अवस्था असते. आत्महत्या आसक्तीने घडते. समाधीयोग साधना करतांना; पंचभौतिकांच्या संघटन विघटन प्रक्रिया वैज्ञानिक व्यवहार म्हणून घडतात आणि ब्रह्मात्मैक्यज्ञान अवस्था प्राप्त होते. पंचमहाभूतांत संघटन विघटनाचे तत्त्व वापरून दृष्यादृष्य होण्याच्या प्रक्रियेसाठी, सिद्धीचा वापर योगशास्त्रात साधना प्रयोग म्हणूनच केलेला दिसतो. प्रकाशरूप होणे, जलरूप होणे, वायुरूप होणे, भूरूप होणे, अग्नीरूप होणे, इच्छारूप धारण करणे या गोष्टी योगविज्ञान साध्य आहेत. मात्र त्यासाठी योगविज्ञान अवगत केले पाहिजे. या विषयाची चर्चा हा स्वतंत्र ग्रंथाचा तसेच साधनेचा व अनुभूतीचा विषय आहे. स्वामी विज्ञानानंद योगशास्त्राचे परिपूर्ण अनुभवन करणारे विभूतिमत्त्व होते. हे त्यांच्या योगवैज्ञानिक साधना प्रयोगांच्या उदाहरणावरून स्पष्ट आहे. तेवढ्याच अभ्यासपूर्णतेने ते भौतिक विज्ञानाच्या आधारे समाधीयोग साधता येईल या मताचे पक्षधर होते हे लक्षात घ्यावे लागते. हे लक्षात घेतले तरच ऋषींची समाधी अवस्था लक्षात येते. सर्व ऋषी, योगी, सिद्ध, मुनी वर्तमानक्षणातही दृष्यमान होऊन; आपल्याशी संपर्क साधू शकतात; ह्याची अक्षरशः हजारो उदाहरणे परंपरेत आणि अगदी वर्तमान काळातही देता येतात. हे योगवैज्ञानिक वास्तव असते. ज्ञानअवस्था प्राप्त झाली की उपनिषदातील कोणत्याही महावाक्याचा, भौतिक वैज्ञानिक स्वरूपाचा प्रयोग सिद्ध करता येतो.

स्वामी विज्ञानानंदांचे मोठेपण, त्यांच्या भौतिक विज्ञानाच्या आधारे ज्ञानात्मक अवस्था प्राप्त करून; तो मार्ग सर्वांसाठी खुला करणे; यात आहे. वेद आणि आयुर्वेद, धनुर्वेद, ज्योतिर्वेद, संगीत अशा उपवेदांचे मंडन हे वैज्ञानिक प्रयोगातून पंचतत्त्वीय शक्तिमत्तेचे पुनः भौतिकतः प्रकटीकरण; कोणाही साधकाला करता यावे; यासाठीच आहे. अगदी त्याचप्रमाणे आजच्या भौतिक विज्ञानाच्या प्रयोगातूनदेखील पंचभौतिक शक्तिमत्ता प्रकट करून उपयोजित करणे साधकाला तेवढेच शक्य आहे. त्याचबरोबर योगविज्ञानाची जोड देऊन वैज्ञानिक साधना केली; तर वैज्ञानिक साधना सहज आणि सत्वर सिद्ध होऊ शकते हे स्वामी विज्ञानानंदांना आकलित झाले होते. 'मनशक्ती' केंद्रात, ध्यानधारणा प्रयोगाचे महत्त्व यासाठीच आहे. 'महाशून्य' वेध संकल्पना, हे या योगवैज्ञानिक संकल्पाचेच प्रयोगसिद्ध विचाररूप आहे. स्वामी विज्ञानानंदांनी भौतिक विज्ञान आणि योगविज्ञान अर्थात आयुर्वेदांतर्गत अष्टांगयोग साधना प्रक्रिया, यांची हेतूपूर्वक अशी सर्वकल्याण ध्येयाने घातलेली सांगड; त्यांच्या 'ज्ञानयोगी' विभूतिमत्त्वाचे द्योतक होय.

द्विरुक्तीचा दोष पत्करूनही 'विज्ञान ज्ञान गभस्ती' या ग्रंथाला मी लिहिलेल्या प्रस्तावनेतील मजकूर येथे देणे औचित्यपूर्ण वाटते. ''मानवी जीवनातील जन्मपूर्व अवस्था आणि मृत्योत्तर अवस्था आणि अस्तित्व, पुनर्जन्म या पारंपरिक जाणिवांतील गूढता नाहीशी करून; अविनाशी जीवनलहरींच्या स्वरूपातील वैज्ञानिक सत्याचे अन्वेषण स्वामींनी केले. समाधी ही आत्म्याने परमात्म्याशी भोगण्याची हंसमनस्क अवस्था आहे. विदेही होण्याची साधना करूनच ब्रह्मस्वरूप होता येते. ते ज्ञानात्मक जीवन अनुभवण्यासाठी समाधीयोग महत्त्वाचा होय. स्वामींच्या जीवनातील समाधीयोगाचे प्रयत्न हे विदेही होऊन संजीवन अनुभवण्यासाठीचे योगवैज्ञानिक मार्गाने करावयाचे, सिद्ध विभूतिमत्त्वाचे प्रयोग आहेत.

'प्रकाश-समाधी'चा अन्वयार्थ विज्ञान आणि अध्यात्म दोन्ही पातळीवर उलगडतो तेव्हा ज्ञानात्मक अनुभूती घडते. स्वामींच्या चरित्रशोधणीतील, कठोर तपश्चर्या, यमनियमन, प्रयोगनिष्ठा आणि समाधीयोग या गोष्टी समजावून घेतल्या तर विज्ञाननिष्ठेने जीवन आणि देह समर्पणाचे गूढ उकलते.'' याचा सरळ अर्थ असा की स्वामी विज्ञानानंदांना विज्ञाननिष्ठेने ज्ञानसाधना करण्याचा आणि करविण्याचा ध्यास होता.

आधुनिक काळाचा अर्थात विज्ञानयुगाचा विचार करता, अवघ्या मानवमात्राला शांतमनस्क करून; शाश्वत कल्याणापर्यंत न्यायचे असेल तर; युगप्रवृत्तीनुसार मार्ग स्वीकारावा लागेल; ह्याचा विवेक स्वामी विज्ञानानंदांजवळ होता. वैज्ञानिक प्रयोगातील प्रकाश आणि ध्वनी यांच्या आकारांचे विघटन पुनर् संघटन, पुनर् विघटन आणि पुनर् संघटन या विषयीचे तंत्र त्यांना ज्ञात

होते. शरीर आणि वस्तुमात्राच्या, योगवैज्ञानिक सिद्धीतंत्राने संघटन, विघटन, पुनर्संघटन, अष्टसिद्धींचे योगवैज्ञानिक चलन, मनोविज्ञानाच्या आधाराने, अष्टांगयोगातील तंत्राने कसे घडते याची अनेक उदाहरणे स्वामींच्या पुढे होती. चित्रपट व्यवसाय हा या तंत्राचा वैज्ञानिक आविष्कार असल्याचे स्वामींना अनुभूत होते. म्हणूनच वैज्ञानिकांचे सिद्धांत आणि योगविज्ञानाची सांगड घालण्याचा संकल्प स्वामींनी केला. वैज्ञानिक प्रयोगशाळेबरोबरच पंचमहाभूतांचा संघटित असा, शरीर नावाचा जिवंत पदार्थ, साधन म्हणून समोर होता; म्हणूनच या योग्याने विज्ञानमार्गे ज्ञानयोग साधण्याचा ध्यास घेतला. त्यातूनच सनातन 'सद्‌चिदानंद' अवस्था स्वतःत शोधण्यासाठी वैज्ञानिक प्रयोगांच्या साहाय्याने योगविज्ञानाशी सांगड घालून, 'मनशक्ती' अधिकाधिक बलवान स्वरूपात कशी सिद्ध करता येईल, 'मनशक्ती'च्या आधारे प्राप्त जीवन केवळ सकारात्मक उर्जेने कसे भारून टाकता येईल; या विषयीचा 'न्यू वे' अंगीकारला आणि हा नवा मार्ग सर्वांसाठी आपल्या साधकांच्या अथक प्रयत्नांतून खुला व प्रशस्त करण्यासाठी संकल्प केला. स्वतःबरोबर सर्वांना वैज्ञानिक मार्गाने ज्ञानयोगी होता येते हे सिद्ध केले. द्रष्ट्या ऋषींनी पाहिलेल्या शक्तींची 'सूक्त' स्वरूपात वर्णने केली, मंत्र स्वरूपात शक्तींच्या पुनःप्रकटीकरणासाठी सूत्रे दिली. मात्र त्या ऋचा स्पष्ट करण्यासाठी पुन्हा पुन्हा भाष्ये केली गेली. ब्राह्मणे, अरण्यके, उपनिषदे झाली. मीमांसा झाल्या. आधुनिक काळातील या स्वामी विज्ञानानंद नावाच्या ऋषींनी आपल्या विपुल साहित्यातून, भाषणातून चर्चेतून दृष्ट झालेला 'न्यू वे' मांडला, पुन्हा पुन्हा स्पष्ट केला. अनुभवासाठी प्रयोगशाळा घातल्या. योगविज्ञानाची सांगड घालून विज्ञानातून, विज्ञानापलीकडील शाश्वत, अविनाशी आनंदापर्यंत कसे जाता येईल, यासाठी मनोवैज्ञानिक प्रयोगांच्या मालिका तयार केल्या. वैज्ञानिक प्रयोगातून ब्रह्मजिज्ञासेची परिपूर्ती अनुभवण्याचे साधनातंत्र प्रस्थापित करण्यासाठी सर्व थरातील, सर्व ज्ञानशाखांतील साधकांना प्रेरित केले. याच साधनेमुळे विज्ञानयुगातील अर्थात आधुनिक काळातील 'ज्ञानयोगी' असे स्वामी विज्ञानानंदांचे विभूतिमत्त्व प्रकट झाले. त्याच विज्ञान-ज्ञानमार्गाने; सर्व साधक 'कृण्वंतो विश्वम् आर्यम्' हा ध्यास घेऊन; विज्ञाननिष्ठ ज्ञानयोगाचे तंत्रज्ञान सेवावृत्तीने सर्वगत करण्याचा प्रयत्न 'बुडति हे जन न देखवे डोळा' या कळवळ्याने करीत आहेत.



**संदर्भ ग्रंथ :–** ('मनशक्ती' केंद्रात उपलब्ध) १) शक्तियोग २) बुद्धियोग ३) विषयोग ४) श्रद्धायोग ५) विज्ञान ज्ञान गभस्ती ६) वितळता क्षण ७) विज्ञान परिभाषेत गीता.

●●●

# स्वातंत्र्यवीर कोहिनूर

## (स्वा.वीर विनायक दामोदर सावरकर)

१९६२ आणि १९६५ साली झालेली चीन आणि पाकिस्तानशी युद्धे प्रत्यही स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावकरांच्या 'शस्त्रगीत' या कवितेची आठवण करून देणारी होती. १९६२ ते १९६५ पर्यंत तसा मी शाळकरी मुलगा होतो. आपातता शाळेत शिक्षकही झालो होतो. अठरा वर्षाच्या अवस्थेत राष्ट्रभक्तीचे स्फुल्लिंग तेजस्वीपणे प्रकटले होते. त्यातच २६ फेब्रुवारी १९६६ मध्ये स्वातंत्र्यवीर जीवनमुक्त झाले. त्यामुळे तर त्यांचे चरित्र, त्यांचे साहित्य आणि त्यांचे चारित्र्य आम्हा तरुणांच्या हृदयाच्या गाभाऱ्यात प्रलयंकर शिवासारखे, सुदर्शनधारी श्री विष्णूंसारखे कोरले गेले. भारतमातेचा अभिमान रोमरोमात चैतन्यशाली होऊन; अखंड भारतमातेचा ध्यास मनाला लावत होता. १९६२ चे युद्ध हरल्याची आणि आमच्या तनमनातील कैलासपतींना हिसकावून घेतल्याची जखम पुन्हा पुन्हा भळभळती होत होती. म्हणूनच 'शस्त्रगीत' मनात स्फुरत राही–

**व्याघ्र–नक्र–सर्प–सिंह–हिंस्त्र–जीव संगरीं**
**शस्त्र शक्तिने मनुष्य हा जगे धरेवरीं**
**रामचंद्र चापपाणि चक्रपाणि श्रीहरी**
**आर्तरक्षणार्थ घेति शस्त्र देवहीकरीं**
**शस्त्र पाप ना स्वयेंचि, शस्त्र पुण्य ना स्वयें**
**अिष्टता अनिष्टताहि त्यास हेतुनेच ये**
**राष्ट्ररक्षणार्थ शस्त्र धर्म्य मानितें जरी**



**आंग्ल, जर्मनी, जपान राष्ट्र राष्ट्र भूवरी**
**भारतातची स्वदेरक्षणार्थ कां तरी**
**शस्त्र–धारणीं बळेचि बंध हा अम्हांवरी?**
**शस्त्र–बंधनें करा समस्त नष्ट या क्षणा**
**शस्त्र–सिद्ध व्हा झणी समर्थ आर्त रक्षणा**
**व्हावया स्वदेश सर्व सिद्ध आत्मशासना**
**नव्या पिढीस द्या त्वरें समग्र युद्धशिक्षणा !**

आजही तरुणांच्या तारुण्यसुलभ मनाला शस्त्रगीताचं आकर्षण वाटणं स्वाभाविक आहे.

तरुण वयात, विपन्न परिस्थितीशी झुंज देत; स्वतःला सिद्ध करण्याचे कवच, स्वातंत्र्यवीरांनी दिले. भोवती दारिद्र्य फुगड्या घालीत होते. ब्राह्मण जातीद्वेष सतत वृद्धिंगत होत होता. आजतर तो ब्राह्मणजातच नामशेष करण्यापर्यंत पोचला आहे. मरणकळा सोशित, जीवनात सन्मानाने उभे राहायचा निश्चय मात्र ढळत नाही, ढळला नाही. कोणी त्यास ब्राह्मणी अहंकार किंवा 'स्वयमेवमृगेंद्रता म्हणो'. मात्र हारायचे नाही. ब्राह्मणांनाच काय, स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भारतीयाला, हिंदू म्हणविणाऱ्या साऱ्यांना अध्यात्म प्रेरित करून, परिस्थितीवर मात करण्याची किल्ली 'आत्मबल' या कवितेच्या रूपाने दिली. त्या कवितेचे ध्रुपद जगण्याचा परवल झाला, याचा मात्र तेव्हांपासून आजवर अनुभव घेत आलो. संकटात देवाचा धावा सुचतो म्हणतात. मला स्वातंत्र्यवीर सावरकरांची कविता आठवे आणि फाटक्या कपड्यांतून, रिकाम्या खिशातून, भाड्याच्या घरातून, मारेकऱ्यांच्या चक्रव्यूहात सापडलेल्या अवस्थेत सुद्धा रक्तातून शब्द सळसळून ओठावर येतात ''अनादि मी अनंत मी, अवध्य मी भला । मारिल रिपु जगतिं असा कवण जन्मला ।।ध्रु।।'' हे शब्द प्रकटले की नैराश्य मरून जाते. एवढे सामर्थ्य या कवीच्या शब्दात आहे. यालाच मंत्रसामर्थ्य म्हणतात. साहित्याने समाजपरिवर्तन, मनपरिवर्तन होते का? या प्रश्नाला थेट उत्तर देण्याचे सामर्थ्य या कवितेत आहे.

'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरियसी' या उक्तीप्रमाणे मनामनात जन्मभूमीविषयी आत्माभिमान सावरकरांनी निर्माण केला. जन्मभूमीसाठी राष्ट्राय स्वः इद्म् न मम' एवढी समर्पण वृत्ती जोपासण्याचे कार्य त्यांच्या चारित्र्यातून प्रकटलेल्या शब्दचैतन्यातून घडले. भारतपुत्रांना मातृभूमीला समर्पित असे

मृत्यूपत्र लिहिले पाहिजे याचे जाज्वल्य उदाहरण म्हणजे स्वातंत्र्यवीरांचे 'माझे मृत्युपत्र' आहे -

**हे मातृभूमि ! तुजला मन वाहियेलें**
**वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेलें**
**तूतेंचि अर्पिली नवी कविता रसाला**
**लेखाप्रती विषय तूची अनन्य झाला ।।**
**की घेतलें व्रत न हें आम्हि अंधतेने**
**लब्ध-प्रकाश अितिहास-निसर्ग-मानें**
**जें दिव्य, दाहक म्हणूनि असावयाचें**
**बुद्ध्याचि वाण धरिलें करिं हें सतीचे ।।**

एवढी प्रखर राष्ट्रनिष्ठा जागवणारा हा महाकवी, पुन्हा एकदा भगिरथ, अगस्त्य, श्रीराम, छत्रपति शिवराय प्रकटल्यासारखा वाटे! दुर्दैवाने मी प्रत्यक्ष या महामानवाचे दर्शन घ्यायला मुकलो. मात्र राष्ट्रनिष्ठा, मातृभूमि निष्ठा, स्वातंत्र्यनिष्ठा आणि आत्मनिष्ठा यांचे जे दर्शन त्यांनी मनात जागवले त्याचे निःश्वास माझ्या लेखनात सतत प्रकट होत राहिले हे मात्र खरे.

आधुनिक युगातील महाकवी म्हणून गौरविलेले स्वातंत्र्यवीर, कवित्व, पांडित्य, भाषाशास्त्री, विचारवंत, स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा यांचे अभिमानी, संघटक, द्रष्टा, अग्रणी अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे महामना होते. कमला, विरहोच्छ्वास, महासागर, गोमंतक ही कविता या व्यक्तिमत्त्वाची साक्ष देते. त्यांची स्फूट गीते भारतसुपुत्रांच्या हृदयसिंहासनावर राज्य करीत आहेत. त्यांनी 'अभिनव भारत' ही संस्था स्थापन करून स्वातंत्र्य प्राप्तीसाठी स्वतंत्रपणाने चळवळ उभी केली. स्वातंत्र्यासाठी त्यांनी घेतलेले अपार कष्ट आणि ध्येयनिष्ठेमुळे सोसलेल्या हालअपेष्टा यांचे अतिशय जिवंत चित्रण त्यांच्या 'माझी जन्मठेप' आणि 'माझ्या आठवणी' या ग्रंथातून घडले आहे. ही पुस्तके स्वातंत्र्य इतिहासाची साधने ठरली आहेत. मॅझिनीचे आत्मचरित्र स्वातंत्र्याचा मंत्र देणारा आदर्श आहे असे त्यांना वाटे. '१८५७ चा स्वातंत्र्यसमराचा इतिहास', 'काळेपाणी' ही कादंबरी या त्यांच्या साहित्यकृतींनी ज्वलंत राष्ट्रप्रेमाने भारलेले समर्पित तरुण भारतात उभे केले.

मी इयत्ता १० वीच्या वर्गात, मॉडर्न हायस्कूलमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांची 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' विद्यार्थ्यांपुढे मांडत होतो. स्वतंत्रता देवीचा



उत्कट भक्तिभाव मनामनात जागवण्याचे सामर्थ्य या गीतात आहे.

**राष्ट्राचे चैतन्य मूर्त तूं नीति संपदांची**
**स्वतंत्रते भगवती ! श्रीमती राज्ञी तू त्यांची**
**परवशतेच्या नभांत तूंची आकाशी होशी**
**स्वतंत्रते भगवती ! चांदणी चमचम लखलखशी ।।**

स्वातंत्र्य ही कल्पना एवढी उदात्त आणि केवल आहे की या कल्पनेला परवशता स्पर्श करू शकत नाही. मात्र स्वातंत्र्य म्हणजे समूहजीवनाचे एकात्म विराटपुरुषरूप होय हे स्पष्ट करतांना स्वातंत्र्यवीर स्वातंत्र्य ही अध्यात्मिक संवेदना एवढ्या ताकदीने मांडतात; की त्या उदात्त संवेदनेत स्वतंत्रता देवीच्या भक्तिभावाने प्रत्यक्ष स्वातंत्र्य स्वरूप व्हावे. काया, वाचा, मन जीवनमुक्ततेने हरखून जावे. माऊली ज्ञानदेवांच्या पसायदानाने जो चराचराच्या संवेदनेचा भक्तिसोहळा प्रकटतो तसा मानव्याच्या स्वातंत्र्यरूपाचा सोहळा या गीतातून प्रकटतो -

**मोक्ष मुक्ति हीं तुझींच रूपें तुलाच वेदांती**
**स्वतंत्रते भगवती ! योगिजन परब्रह्म वदती**
**जें जें उत्तम उदात्त उन्नत महन्मुधर तें तें**
**स्वतंत्रते भगवती ! सर्व तव सहचारी होतें ।।**
**हे अधम-रक्त-रंजिते । सुजन-पूजिते । श्री स्वतंत्रते**
**तुजसाठी मरण तें जनन**
**तुजवीण जनन तें मरण**
**तुज सकल चराचर शरण**
**भरतभूमिला दृढालिंगना कधि देशील वरदे**
**स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे ।।**

ज्वलंत राष्ट्रभक्ती हीच स्वतंत्रता देवीची भक्ती असते; हे या स्तोत्रातून संवेदित करतांना; एकात्म मानवी समूह, राष्ट्र आणि स्वातंत्र्य ह्या गोष्टी एकच होत; हे उलगडून सांगत असतांना भारतीय समाज, असा स्वतंत्र राष्ट्र म्हणून पुनरुत्थापित करण्याची दुर्दम्य मनिषा स्वातंत्र्यवीर मनात जागवत होते. मी उलगडत होतो. समोर विद्यार्थ्यांचे डोळे राष्ट्रतेजाने चमकतांना दिसत होते. ते माझ्यात आणि मी त्यांच्यात एकात्म भारतराष्ट्र म्हणून प्रकटलो होतो. पिरियड संपल्याचे भान नव्हते. कोणी दुसरे शिक्षक बाहेर रेंगाळत होते. पिरियड संपल्याची घंटा झाली

तेव्हां, सगळे विद्यार्थी उभे राहिले होते आणि स्तोत्राचे समूहपुरःश्चरण घडत होते–

**जयोस्तुते श्री महन्मंगले ! शिवास्पदे शुभदे**
**स्वतंत्रते भगवती ! त्वामहं यशोयुतां वंदे ।।ध्रु।।**

मी बाहेर आलो तेव्हां ते शिक्षक म्हणाले, ''माझाही तास तुम्हीच घेतलात सर, पण मी ही हरवून गेलो होतो.'' मला आनंद वाटला.

१९९९ सालातली गोष्ट. मी सारडा महाविद्यालयात नगरला मराठीच्या अध्यापनात रमलो होतो. पीएच.डी.साठीचा गाईड झाल्याने, पुणे विद्यापीठाच्या प्राध्यापक वर्तुळात माहीत झालो होतो. गुरुवर्य डॉ. गंगाधर मोरजेही नगरमध्येच असल्याने नित्य भेट होई. 'मोरजाई' हे त्यांच्या बंगल्याचे नाव. 'मोरजाई' हळूहळू चर्चेची 'मठी' झाली होती. डॉ. पंडितराव पवार माझे गुरुबंधू, नाशिक जिल्ह्यात सेवारत होते. मराठा एज्युकेशन नाशिकमधून ते मराठी अभ्यास मंडळाचे, विद्यापीठात प्रतिनिधित्व करीत होते. नगरला येणे घडे. 'मठी'त अभ्यास पुनर्रचनेविषयी चर्चा होई. सहज बोलता बोलता विचार आला एफ.वाय.बी.ए.च्या वर्गाला अभिनव पद्धतीने कवितासंग्रह का नेमला जाऊ नये? टेक्सबुक करायचे तर ते विशिष्ट पद्धतीने का करू नये? चर्चा रंगली. कवितासंग्रहांच्या परंपरांची उजळणी झाली. कोण कोण लोक त्या कामी अगोदरच लागले आहेत; याचा आढावा झाला. मी डॉ. पंडितराव पवारांना म्हणालो, ''दरवर्षी प्रेमाची रंडागीतेच या पौगंडावस्थेतून ऐन तारुण्यात पदार्पण केलेल्या विद्यार्थ्यांपुढे मांडायची का? कविता म्हणजे प्रेमकविता असा तरुणांचा समज झालाय. त्यांच्या वयाला आणि तारुण्यसुलभ भावनांना योग्य वळण लावलं पाहिजे.'' ''बरं मग तुमचा काय विचार आहे?'' डॉ. पंडितराव पवारांनी विचारले. डॉ. गंगाधर मोरजेंसमोरच हे सर्व बोलणे सुरू होते. ''मला असं वाटतं राष्ट्रीय जाणिवेच्या कवितांचा संग्रह करावा.'' मी म्हणालो. ''अरे, पण आधुनिक मराठी कवितेत बहुतेक सर्वच कवींनी राष्ट्रीय जाणिवेची कविता लिहिली आहे. तो संग्रह खूप मोठा होईल. एफ.वाय.च्या दृष्टीने मर्यादा हवी.'' डॉ. मोरजे यांनी सुचविली. ''तुम्ही काही विचार केलाय का?'' पंडितरावांनी पुन्हा विचारले. मनातले बोलायची वेळ आली होती. मी म्हणालो, ''मी नेमका विचार केला आहे. केवळ तीन कवींच्याच निवडक कविता घ्याव्यात.'' ''हां हे ठीक होईल. स्वातंत्र्यवीर सावरकर, कुंजविहारी, वसंत बापट, बोरकर, विंदा असे कवी विचारात घ्यावेत.'' सूचना पुढे आली. मी म्हणालो, ''पंडितराव, असे केले तर, तीन स्वतंत्र विचारधारा असूनही राष्ट्रीय जाणीव मात्र समान असलेले तीन कवी घेतले तर?'' ''कोणते?'' गुरुवर्य मोरज्यांनी विचारले. ''स्वातंत्र्यवीर सावरकर, शाहीर अमरशेख आणि कुसुमाग्रज, असे तिघे घ्यावेत.'' मी म्हणालो. डॉ. पंडितराव पवारांना एकदम कल्पना आवडली. ते काहीसे सावरकरभक्त होते. शिवाय सावरकर आणि कुसुमाग्रज यांचा नाशिकशी संबंध. त्यात तात्यांशी पंडितरावांचा नित्याचा संबंध. ''काही हरकत नाही! पण कवितांची निवड कशी करणार?'' ते म्हणताच मी उतावीळपणे म्हणालो, ''स्वातंत्र्यवीर सावरकर आणि शाहीर अमरशेख यांच्या कविता मी निवडतो.'' बघता बघता सर्व काही ठरले. डॉ. पंडितराव पवार यांनी तिघांच्या कवितांतून समान धागा म्हणजे राष्ट्राभिमान आणि राष्ट्रीय जाणीव यावर प्रकाश टाकणारी विस्तृत प्रस्तावना लिहावी आणि मी या सर्व कवी आणि कवितांवर संक्षिप्त चरित्र, आणि संदर्भ, शब्दार्थ आणि टीपा लिहाव्यात. कवितासंग्रहाचे नाव ठरले 'तेजाची लेणी'. माझे मन यानिमित्ताने स्फुट झाले. स्वतंत्रतेचे स्तोत्र, प्रियकर हिंदुस्थान, सागरास, माझे मृत्युपत्र, आत्मबल, हिंदुनृसिंह, स्वदेशीचा फटका, दिपवाळीचें लक्ष्मीपूजन, जा झुंज, हा भगतसिंग हाय हा!!, पाण्यातली आग ती, भूमातेस, रँडचा वध, शस्त्रगीत, सुतक युगाचे फिटले अशा पंधरा कविता मी निवडल्या. मला स्वातंत्र्याची, मातृभूमीची स्मरणात्मकतेने सेवा केल्याचा आनंद मिळाला.

आता दोन हजार एकोणीस–वीस मध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांना 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्याचा प्रस्ताव पुढे आला, तेव्हां मात्र तथाकथित पुरोगामी, डावे आणि बेगडी महात्मा गांधीप्रेमी यांनी या प्रस्तावाला विरोध सुरू केला. या लोकांची डोकी ठिकाणावर आहेत का; असा प्रश्न मनात प्रकटला. दुसऱ्या क्षणी मनात आले 'कोहिनूरचे पुष्प रोज घे ताजे वेणीला' असे म्हणणाऱ्या आणि

**''तरि आंग्लभूमि भयभीता । रे**
**अबला न माझिही माता । रे**
**कथिल हें अगस्तिस आता । रे''**

असे गाणाऱ्या या भारतभूमिपुत्राला तुम्ही 'भारतरत्न' देणारे कोण? तो तर स्वयंभू 'भारतरत्न'च आहे. ●●●

माणसांच्या जगतात,
माणूस म्हणून प्रकट होतांना;
माणसाचे मन,
भोवतीच्या माणसांकडून;
गुण-संस्कारांचे कण स्वीकारते.
माणूस म्हणून संवादित होतांना,
जगतात...
या गुण-संस्कारांचे आकार प्रकटतात.
माणसाचे
हे सामूहिक प्रकटन असते-
एक निपरवाद सत्य-!
गुण-संस्कारांचे तेजःकण प्रदान करणाऱ्या,
अनेक सुहृद महामनांची प्रत्ययकारी
विभूतिमत्वे-
प्रत्येक माणसाच्या जीवनात
या प्रक्रियेचे प्रदर्शन
संवेद्य करतात.
'गौरव गाभारा'
असाच एक अनुभव!
सर्वांसाठी......